बोरीस पलेवोय

एका अस्सल माणसाची कहाणी



अनुवाद – अनिल हवालदार

चित्रे – नि० झुकोव

Борис Полевой

ПОВЕСТЬ О НАСТОЯЩЕМ ЧЕЛОВЕКЕ

На языке маратхи

Boris Polevoi

A STORY ABOUT A REAL MAN

in Marathi

सोविएत संघात मुद्रित

$П\frac{70302-088}{031(01)-82}304-83$ 4702010200

अनुक्रमणिका



Б. Полевой

चार शब्द *

युरोपच्या फार मोठ्या भागाला रक्ताने माखून काढणारे दुसरे महायुद्ध आम्हा सोविएत लोकांच्या दृष्टीने महान पितृभूमीरक्षक युद्ध होते. २२ जून १९४१ हा दिवस आम्ही सोविएत माणसे कधीही विसरणार नाही. त्या दिवशी हिटलरने अचानक आमच्या भूमीवर आपली उत्तम प्रशिक्षित आणि सशस्त्र २३० डिव्हिजन सेना घुसवली. नाझी सामर्थ्याच्या बहराचा तो काळ होता. पश्चिम युरोपातील सहज विजयांमुळे हिटलरी सेना धुंद बनल्या होत्या. युरोपचा आधारस्तंभ मानलेली राज्ये फॅसिस्ट डिव्हिजनांच्या प्रहारां-खाली अवघ्या काही आठवड्यांच्या अवधीत कोसळून पडली असती. काही राज्यांनी लढण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना चिरडून टाकण्यात आले. इतर काही राज्यांच्या दुबळ्या मनाच्या सत्ताधाऱ्यांनी आपल्या लोकांचा विश्वासघात केला आणि न लढता अथवा प्रतिकार न करता ते जेत्यांच्या आधीन झाले. त्या विजयी वाटचालीत हिटलरी सेना बलिष्ठ बनली, कारण सबंध पश्चिम युरोपचे कारखाने तिच्यासाठी राबत होते.

हिटलरला प्रतीकांचा नाद होता व सोविएत संघावर हल्ला करण्यासाठी त्याने वर्षामधील सर्वांत मोठ्या दिवसाची निवड केली होती. पण त्याच्या लष्करी नशीबाने त्याला चकविले. सोविएत भूमीच्या पहिल्याच किलोमीटरां-मध्ये घनघोर लढाई सुरू झाली. सीमेवरील सैनिकांशी आणि सीमेनजीकच्या शिबंदीमधील सैनिकांशी झालेल्या सीमाप्रदेशातील लढायांमध्ये शत्रूच्या सर्वोत्तम डिव्हिजनांना कंठस्नान घालण्यात आले. फॅसिस्ट सेनाविभागाने नियोजित केलेल्या आक्रमक चढाईच्या वेगवान वाटचालीला अडसर येऊ लागले. सोविएत भूमीवरील शत्रूच्या आगेकूचीच्या थेट प्रमाणात हल्लेखोरांची हानी वाढत होती. जर्मन सेनापतींच्या मतानुसार, सोविएत सीमेनजीकच ब्लिटझ्क्रीगची संपूर्ण योजना धुळीला मिळाली होती.

आमच्या दृष्टीने ते युद्धाचे शोकदायी महिने होते. शत्रू लढायांमध्ये

सामर्थ्य गमावीत होता, पण आमचा बराच प्रदेश काबीज करण्यात त्याला यश आले होते. लेनिनग्रादला त्याने वेढा घातला होता व मॉस्कोच्या दिशेने मुसंडी मारली होती. त्या काळात केवळ जर्मन सेनांशीच नव्हे, तर हिटलरला पाठिंबा देणाऱ्या पाच हस्तक देशांच्या डिव्हिजनबरोबरही सोविएत फौजा एकाकी झुंज देत होत्या. आणि युद्धाच्या त्या अत्यंत कसोटीच्या काळात आमच्या शत्रूंना आणि मित्रांना अशा दोघांनाही उमजले — आपल्या समाजसत्तावादी मातृभूमीच्या रक्षणार्थ, आपल्या विचारांच्या रक्षणार्थ, झुंजायला उभा ठाकलेला सोविएत माणूस म्हणजे काय आहे. महान पितृभूमीरक्षक युद्धाचा प्रत्येक दिवस सोविएत जनतेच्या अभूतपूर्व पराक्रमाने भरलेला आहे.

अशाच माणसांपैकी एकाला हे पुस्तक अर्पण केलेले आहे. त्या काळात, माझ्या बहुसंख्य देशबांधवांप्रमाणे, मीही लष्करी पायघोळ कोट अंगात घालीत होतो. इतिहासात कूर्स्कच्या कमानीजवळची लढाई म्हणून नोंद झालेल्या महान लढाईच्या वेळी मी त्याला पाहिले आणि त्याच्याशी ओळख करून घेतली. पाय नसलेला वैमानिक! आणि केवळ सामान्य वैमानिक नव्हे तर सर्वांना माहीत असलेला खंदा वैमानिक! हवाई लढाईत निष्णात असलेल्या जर्मन खंद्या वैमानिकांवर त्याने अनेकदा मात केलेली होती. सबंध युद्धआघाडीवर ज्याच्या त्याच्या तोंडी त्याचे नांव होते — अलेक्सेई मारेस्येव. खरे सांगायचे तर त्याच्याविषयीच्या त्या अफवांवर माझा चटकन विश्वास बसला नाही आणि त्याच्या विमानतळाला एकदा भेट देण्याचे मी ठरविले. मी जेव्हा त्याला भेटलो तेव्हा नित्याची हवाई झुंज देऊन कमालीच्या थकल्याभागल्या अवस्थेत तो आपल्या लढाऊ विमानामधून बाहेर पडत होता.

त्या माणसाने भोगलेल्या दिव्याला लिहून काढण्यासाठी त्याच्या साथीदारानी त्याच्याविषयी सांगितलेल्या गोष्टी व खुद्द त्याने सांगितलेल्या हकीकती यांचा मी वापर केला. युद्धानंतर ते साहित्य ह्या पुस्तकासाठी आधार म्हणून उपयोगी पडले. युद्धाच्या अखेरी वरिष्ठ लेफ्टनंट अलेक्सेई मारेस्येवने शत्रूची आठ विमाने पाडली. 'सोविएत संघाचा वीर' हा किताब व सुवर्ण तारा त्याला बहाल करण्यात आले. सोविएत संघात हे पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर आणि नंतर ४० पेक्षा जास्त देशांमध्ये ते प्रकाशित झाल्यानंतर, त्यातील प्रसंगांच्या सत्यतेविषयी माझ्या अनेक समव्यावसायिकांनी, विशेषत: पश्चिमेतील, शंका व्यक्त केल्याचे मी ऐकले. दुसऱ्या महायुद्धात

लढलेला एक सुप्रसिद्ध अमेरिकन वैमानिक मला म्हणाला: "पायांविना विमान उडवणं अशक्य आहे, अगदी अशक्य आहे, त्याहून लढणं अशक्य आहे आणि त्याहूनही हवाई लढाया जिंकणं अशक्य आहे." युद्धवीरांच्या प्रतिनिधीमंडळाबरोबर मी न्यूयॉर्कला गेलो होतो तेव्हा हा संवाद घडला. आणि ह्या पुस्तकाचा नायक त्या प्रतिनिधींमध्ये होता, तेव्हा अमेरिकन वैमानिकाला ही कहाणी स्वीकारावी लागली.

आमच्या नाविक हवाई दलाचे वैमानिक कप्तान सोकोलोव यांच्याशी माझी ओळख करून देण्यात आली होती. त्यानीसुद्धा पायांविना लढाऊ विमान चालविले होते.

पुढे एका लढाऊ बाँबफेक्या पथकाच्या कमांडरशी माझा परिचय घडला. त्याचा एक पाय कापून काढल्यानंतरही, बाँब हल्ल्यांच्या मोहीमांमध्ये व हवाई झुंजींमध्ये तो आपल्या साथीदारांचे नेतृत्व करीत असे.

माझा मित्र अलेक्सेई मारेस्येव हा माझ्या दृष्टीने नेहमीच आमच्या माणसांच्या वैशिष्टयांचे दर्शन घडवणारा खासा सोविएत माणूस म्हणून राहील.

ह्या पुस्तकाच्या वाचकांना मी सांगू शकतो की, नायक जिवंत आहे आणि छान जगतोय. युद्धानंतर त्याने दोन उच्च शिक्षण संस्थांचा अभ्यासक्रम पूर्ण केला व अखिल-संघ युद्धवीर समितीचा कार्यकारी चिटणीस म्हणून अनेक वर्षांपासून तो काम करीत आहे. आमची अजूनही मैत्री आहे. काही-वेळा आम्ही शांतता-योद्धयांच्या विविध व्यासपीठांमध्ये भाग घेतो, कारण गेल्या युद्धाच्या लष्करी कसोटयांमधून पार पडलेले सर्वजण आता शांततेचे कट्टर लढवय्ये बनले आहेत. ह्याबद्दल मला वाचकांना सांगायचे आहे आणि एका जुन्या रशियन सैनिकाचे व लेखकाचे शुभसंदेश द्यायचे आहेत.

१९७८ बरीस पलेवोय

लेखकाविषयी *

सोविएत संघाचे वीर
अलेक्सेई मारेस्येव

बरीस पलेवोय यांच्याशी १९४३ च्या उन्हाळ्यात माझी ओळख झाली. कूर्स्कच्या फुगीर प्रदेशात तुंबळ रणकंदन पेटले होते आणि माझी रेजिमेंट लढाईत गुंतली होती. दररोज आम्ही अनेक उड्डाणे करीत होतो. अशाच एका उड्डाणानंतर एके संध्याकाळी मी थकलाभागला, भुकेला परतत होतो. कँटीनमध्ये खायला काय मागवायचे याबद्दलचे विचार डोक्यात घोळत होते. विमानाच्या कॉकपिटमधून खाली उतरताना मी पाहिले की, वैमानिकांच्या घोळक्यात एक अनोळखी माणूस उभा होता आणि ते वैमानिक माझ्या दिशेने बोटे दाखवीत होते.

"झालं! आणखी एक वार्ताहर!" माझ्या मनात विचार आला आणि सुस्कारा टाकून मी जास्तीत जास्त वेगाने कँटीनच्या दिशेने जायला आरंभ केला.

पण त्या अनोळखी माणसाने पटकन मला गाठले आणि स्वतःची ओळख करून दिली: "मी बरीस पलेवोय, 'प्रावदा'चा युद्ध वार्ताहर." 'प्रावदा'मध्ये ते नांव वाचल्याचे मला आठवले, पण तो वार्ताहर कशाबद्दल लिहीत असे ते मात्र मुळीच आठवेना. तरीसुद्धा, मला तो एकदम आवडून गेला. तो चटपटीत होता, धाडसी होता, साधा होता व त्याच्या नजरेत स्मित होते. माझ्या खंदकात मी त्याला निमंत्रण दिले आणि आम्ही खूप वेळपर्यंत गप्पा मारल्या. पलेवोयच्या अनेक टिपणवह्या भरल्या, तरीही प्रश्न चालूच होते. आम्ही निरोप घेतला तेव्हा पहाट फुटली होती. जाण्या-पूर्वी ते म्हणाले: "अलेक्सेई, मी लिहीन. नक्की लिहीन. कशा प्रकारे लिहीन ते माहीत नाही, पण लिहीणार नक्की."

सकाळी आम्ही परत रणधुमाळीत गुंतलो. एकापाठोपाठ एक उड्डाणे चालू होती आणि लौकरच मी 'प्रावदा'च्या वार्ताहराला विसरून गेलो. नेमके सांगायचे तर वर्तमानपत्रांमधून त्याचे नांव अधूनमधून मी वाचत होतो. आणि तो ज्या लोकांविषयी लिहायचा ती माणसे मला आवडत होती. पण वृत्तपत्रांच्या पानांवरच ह्या भेटी घडत होत्या.

१९४७ मध्ये एके दिवशी, नेमकी तारीख मला आठवत नाही, मी रेडिओचे बटण फिरविले आणि कार्यक्रमाची अखेर करणाऱ्या निवेदकाचे शब्द ऐकले: "बरीस पलेवोय यांच्या 'एका अस्सल माणसाची कहाणी'चा पुढील भाग उद्या नऊ वाजता आपण ऐकू शकाल." माझ्या मन:चक्षूसमोर रात्रभर माझ्या खंदकात राहिलेल्या काळ्या केसांच्या वार्ताहराची प्रतिमा तात्काळ उभी राहिली. दुसऱ्या दिवशी सकाळी न विसरता नऊ वाजता रेडिओ ऐकण्याचे मी ठरविले. माझ्या कानांवर माझा विश्वासच बसेना. पलेवोयनी माझ्याबद्दल लिहिले होते.

त्याच संध्याकाळी त्यांच्या घरी मी त्यांना भेटायला गेलो. लेखक म्हणाले की युद्धादरम्यान त्यांनी माझा खूप शोध घेतला, पण मी त्यांना सापडलो नव्हतो. विजयाची वाटचाल आम्ही भिन्न मार्गांनी केली होती.

त्या संध्याकाळपासून बरीस पलेवोय यांच्याशी माझ्या निकट मैत्रीचा आरंभ झाला. दुर्दैवाने आमच्या भेटी क्वचित होत राहिल्या—फक्त परिषदां-मध्ये, सभांमध्ये आणि काही वेळा आमच्या घरांमध्ये.

१९७८ साली बरीस पलेवोय यांना ७० वर्षे पूर्ण झाली. सोविएत साहित्यक्षेत्रात पन्नासाहून जास्त वर्षे ते सेवा करीत आहेत. पण विश्रांती घेण्याचा विचार त्यांच्या स्वप्नातसुद्धा येत नाही. म्हणून अत्यंत धांदल-गडबडीचा व्यवसाय त्यांनी स्वत:साठी निवडला. पत्रकाराचा व्यवसाय. मी चुकीचे बोललो नाही: ते आहेत लेखक, पण जगतात आणि काम करतात एखाद्या पत्रकाराप्रमाणे. नेहमी भ्रमंती, नेहमी शोध, नेहमी लेख-नाच्या तयारीत. बरीस पलेवोय यांच्या लेखणीमधून 'सोने', 'दूर पिछा-डीवर', 'डॉक्टर वेरा', 'ओसाड किनाऱ्यावर' ह्या कादंबऱ्या उतरल्या आहेत. शिवाय दीर्घ कथा, रणांगणावरील टिपणे, कथा, लेख इत्यादींचा समावेश असलेली २० पेक्षा जास्त पुस्तके त्यांच्या खाती जमा आहेत. 'यूनस्त' ह्या केंद्रीय युवक नियतकालिकाचे पलेवोय मुख्य संपादक आहेत.

मी साहित्यिक नाही याचा खेद वाटतो. तसा असतो तर महान पितृ-भूमीरक्षक युद्धातील एका निर्भय सैनिकाबद्दल आणि "कष्टाळू वार्ताहरा"बद्दल मी नक्की एक पुस्तक लिहिले असते. अनन्यसाधारण सोविएत लेखक आणि पत्रकार, माझे एक उत्तम मित्र आणि विश्वासू साथी, एक अस्सल माणूस—बरीस पलेवोय—यांच्याबद्दल एक पुस्तक लिहिले असते.

१९६८-१९७८

एका अस्सल
माणसाची कहाणी

भाग पहिला

१

तारे अजूनही तेजस्वी, थंड प्रकाशात चमकत होते, पण पूर्वेकडील आकाशात एव्हाना अंधुक पहाट फुटली होती. झाडे हळूहळू अंधारामधून बाहेर पडली. अचानक ताज्या वाऱ्याची एक जोरदार झुळूक त्यांच्या शेंड्यां-मधून वाहात गेली आणि सारे जंगल मोठ्या प्रतिध्वनींनी दुमदुमले. शतका-नुशतके उभ्या असलेल्या देवदाराच्या झाडांनी एकमेकांना अधीऱ्या, दबत्या आवाजात साद घातली. त्यांच्या खुदबळलेल्या फांद्यांवरून कोरड्या हिमाची भुकटी सळसळत भळाभळा खाली ओघळली.

वारा जेवढ्या अचानकपणे आला होता तेवढ्याच अचानकपणे नाहीसा झाला. झाडे पुन्हा एकदा आपल्या गोठलेल्या सुस्तीत बुडून गेली. मग पहाटेच्या आगमनाची वर्दी देणारे सर्व जंगलचे आवाज उमटू लागले. जवळ-च्या उघड्या मैदानात भुकेल्या लांडग्यांची गुरगुर सुरू झाली; सावध कोल्हेकुई ऐकू येऊ लागली; नुकत्याच जाग्या झालेल्या सुतार पक्ष्याची पहिली अनिश्चित टोक-टोक सुरू झाली. स्तब्ध जंगलात त्याची टोक-टोक एवढी नादमय वाटत होती की, झाडाच्या बुंध्यावर तो टोक-टोक करीत नसून व्हायोलिनच्या तारा छेडतोय असा भास होत होता.

पुन्हा देवदाराच्या भरगच्च शेंड्यांमधून घूं घूं आवाज करीत वाऱ्याचे झोत गेले. आता उजळलेल्या आकाशात शेवटचे तारे हळूच विझून गेले. खुद्द आकाश संकोचले होते व दाट बनले होते असे भासत होते. जंगलाने रात्रीच्या अंधाराचे शेवटचे अवशेष झटकून टाकले व आपले हिरवे वैभव दिमाखाने मिरवीत ते उभे राहिले. देवदारांच्या कुरळ्या डोक्यांना व सुरूच्या निमुळत्या सुळक्यांना आलेल्या गुलाबी झाकेवरून सूर्य उगवल्याचे समजत होते. दिवस चकचकीत असणार व हवा छान कोरडी चुरचुरीत गोठलेली असणार याची ग्वाही मिळत होती.

एव्हाना चांगलेच उजाडले होते. रात्रीच्या वेळी खाल्लेले भक्ष्य पच-विण्यासाठी लांडगे दाट जंगलात गुडुप झाले. वर्फावर आपले धूर्त, नागमोडी ठसे सोडून कोल्हासुद्धा उघड्या मैदानातून निघून गेला. ते प्राचीन अरण्य

धीम्या, अखंड नादाने घुमत होते. ह्या अरण्यामधून वाहणाऱ्या करुण, चिंतायुक्त दीर्घ एकसुरी आवाजाच्या लाटांमध्ये अधूनमधून केवळ एखाद्या पक्ष्याची खुसपूस, सुताराची टोक-टोक, फांद्यांवरून बागडणाऱ्या पिवळ्या छोटया पक्ष्यांची आनंदी किलबिल, चास पक्ष्यांची कोरडी, हावरट वटवट थोडी विविधता आणत होती.

आल्डरच्या झाडाच्या फांदीवर आपली धारदार काळी चोच साफ करीत एक नीलकण्ठ पक्षी बसला होता. अचानक त्याने मान उंचावून आवाज ऐकला व झेप घेण्याच्या पवित्र्यात तो बसला. फांद्यांनी करकर आवाज करीत सावधगिरीचा इशारा दिला. खालच्या झुडुपांमधून कुणीतरी धिप्पाड आणि मजबूत पुढे सरकत होते. झुडुपे सळसळली, कोवळ्या देव-दारांचे शेंडे अस्वस्थपणे हिंदकळले व चुरचुरीत बर्फ• चुरडल्याचा आवाज ऐकू आला. आपली बाणासारखी शेपटी पुढे काढून कर्कश्य आवाज करीत नीलकण्ठ पक्षी वेगाने उडून गेला.

हिमाच्छादित देवदारांमधून एक लांबट तपकिरी तोंड डोकावले. त्याच्या माथ्यावर दोन भलीमोठी शिंगे होती. घाबरल्या डोळ्यांनी सपाट मैदान चाचपले. गुलाबी, मखमाली नाकपुड्या थरथरत होत्या. त्यांच्यामधून गरम, वाफाळ श्वासाचे लोट बाहेर पडत होते.

ते म्हातारे सांबर देवदारांमध्ये एखाद्या पुतळ्याप्रमाणे उभे होते. फक्त त्याच्या पाठीवरील लवदार त्वचा घाबरून थरथरत होती. त्याचे कान भेदरून ताठ उभे होते, प्रत्येक आवाज ऐकत होते. त्यांचे ऐकणे एवढे तिखट होते की, देवदाराच्या बुंध्यात पोखरणाऱ्या भुंग्याचा आवाजही त्यांना ऐकू येत होता. पण ह्या संवेदनाक्षम कानांनाही जंगलामध्ये फक्त पक्ष्यांची किलबिल, सुताराची टोक-टोक व देवदारांच्या शेंड्यांची सळसळ, यांच्या-व्यतिरिक्त काहीही आवाज ऐकू येत नव्हते.

सांबराच्या कानांनी त्याला सर्व काही ठीक असल्याचा दिलासा दिला, तरी त्याच्या नाकाने त्याला धोक्याचा इशारा दिला. वितळणाऱ्या वर्फाच्या ताज्या वासामध्ये त्या दाट जंगलाला अपरिचित असे कुजके, उग्र, अमंगळ दुर्गंध मिसळले होते. झगमगीत पांढऱ्या वर्फाच्या चुरचुरीत पृष्ठभागावर काळ्या आकृती पडल्याचे सांबराच्या खिन्न, काळ्या डोळ्यांना दिसले. सांबर एकदम स्तब्ध झाले, त्याचे सारे स्नायू ताठरले व दाट झाडीत पळून जाण्याचा त्याने पवित्रा घेतला. पण वर्फावरील आकृती निःचेष्ट, एकमेकां-

लगत पडल्या होत्या. काही आकृती एकमेकांच्या अंगांवर पडल्या होत्या. तशा खूप आकृती तेथे पडल्या होत्या, पण एकही आकृती हालचाल करीत नव्हती, अथवा अनघ शांततेला विघडवीत नव्हती. त्यांच्या शेजारी, हिम-खंडांमधून विचित्र राक्षसांच्या उंच आकृती दिसत होत्या व त्यांच्यामधून कुजट, अमंगळ दर्प येत होते.

छोटया मोकळया मैदानात उभे राहून ते सांबर भेदरल्या डोळयांनी टकमका पहात होते. ह्या निश्चेष्ट आणि बाह्यत: निरुपद्रवी भासणाऱ्या माणसांच्या कळपाला काय झाले होते याचे आकलन त्या सांबराला होत नव्हते.

वरून उमटलेल्या एका आवाजाने सांबर दचकले. त्याच्या पाठीवरील कातडी पुन्हा थरारली आणि त्याच्या पाठीमागील पायांचे स्नायू अधिकच ताठरले.

पण हा आवाजही अपायकारी ठरला नाही. उमलत्या भोजाच्या झाडाच्या पानांमध्ये घिरटया घालणाऱ्या किडयांच्या मंद गुणगुणीसारखा तो आवाज भासत होता. त्याच्यात अधूनमधून, सायंकाळच्या वेळी दलदली-मधून ओरडणाऱ्या पावशा पक्ष्याच्या कर्कश्य, तुटक आवाजासारखा आवाज मिसळत होता.

मग ते किडे नजरेच्या टप्प्यात आले. चमकत्या पंखांनी त्यांचा निळया, गोठल्या आकाशात नाच चालू होता. रातकिडयांची कर्कश्य किरकिर पुन:-पुन्हा वर ऐकू येत होती. एका किडयाने पंख पसरून जमिनीकडे झेप घेतली. बाकीच्यांनी निळया आकाशात आपला नाच चालू ठेवला होता. सांबराने आपले स्नायू शिथिल केले, ते उघडया मैदानात शिरले व आकाशाकडे सावध कटाक्ष टाकीत चुरचुरीत बर्फ जिभेने चाटू लागले. अचानक त्या नाचणाऱ्या झुंडीमधून आणखी एक किडा वेगळा झाला व आपल्यामागे केसाळ शेपटी सोडीत त्याने सरळ सपाट मैदानात सूर मारला. त्या किडयाचा आकार अचानक एवढा मोठा झाला, एवढया वेगाने तो किडा प्रचंड बनला, की सांबराने जंगलात पहिली उडी मारली न मारली तोच शरदामध्ये एकदम कोसळणाऱ्या वादळी पावसासारखा गडगडाट करीत काहीतरी अवाढव्य असे झाडांच्या शेंडयांवर कोसळले आणि कडकडाट करीत जमि-नीवर आदळले. त्या आवाजाने सबंध जंगल निनादले. तो आवाज कण्हल्या-

प्रमाणे होता व त्याचा प्रतिध्वनी झाडांमधून पसरत गेला. जंगलच्या दाटीत घुसणाऱ्या त्या सांबरालासुद्धा त्या प्रतिध्वनीने गाठले.

देवदारांच्या हिरव्या गहिराईमध्ये तो प्रतिध्वनी विरला. पडणाऱ्या विमानामुळे झाडांच्या शेंड्यांवरून उधळलेले कोरडे हिमकण चमचमत, तरंगत खाली येत होते. पुन्हा एकदा सर्वव्यापी दाट शांतता पसरली. ह्या शांततेत माणसाचे कण्हणे आणि एका अस्वलाच्या पंजांखाली बर्फाचे चुरडणे अगदी स्पष्ट ऐकू येत होते. नुकत्याच झालेल्या अपरिचित आवाजांमुळे ते अस्वल जागे झाले होते व दाट झाडीतून बाहेर पडून उघड्या मैदानाकडे आले होते.

अस्वल खूप धिप्पाड, केसाळ आणि म्हातारे होते. त्याच्या खपाटीला गेलेल्या पोटावर विस्कटलेल्या केसांचे तपकिरी पुंजके बनले होते. त्याच्या खवाटावर लांब केस लोंबत होते. शरदाच्या मोसमापासून ह्या प्रदेशांमध्ये युद्ध पेटले होते. पूर्वी क्वचित कधीतरी जंगल अधिकारी आणि शिकारी ह्या घनदाट जंगलात येत असत. पण अशा ह्या दाट अरण्यातही युद्ध घुसले होते. आपल्या हिवाळी झोपेची पूर्वतयारी करणाऱ्या ह्या अस्वलाला शरदामध्येच आसपास झालेल्या युद्धाच्या दणदणाटाने त्याच्या गुंफेमधून बाहेर काढले होते. आता ते भुकेले वेडेपिसे बनून सर्वत्र जंगलभर भटकत होते. त्याला अजीबात विश्रांती नसल्याने ते चिडलेले होते.

उघड्या मैदानाच्या टोकाशी, थोड्या वेळापूर्वी जेथे सांबर उभे होते त्याच जागी अस्वल येऊन थांबले. सांबराचे ताजे, तोंडाला पाणी आणणाऱ्या वासाचे ठसे त्याने हुंगले. जोरजोराने व हपापलेपणाने त्याने श्वासाचे फूत्कार टाकले व कान टवकारून ऐकले. सांबर निघून गेले होते, पण ते जेथे होते त्यापासून जवळच कोठेतरी काही आवाज निघत असलेले अस्वलाने ऐकले. कुठलातरी जिवंत आणि कदाचित दुबळा प्राणी ते आवाज करीत होता. अस्वलाच्या अंगावरील केस ताठ झाले. त्याने आपला जबडा ताणला. पुन्हा एकदा उघड्या मैदानाच्या टोकाच्या बाजूने तो करुण, जेमतेम ऐकू येणारा आवाज उमटला.

आपले मऊ पंजे सावकाशपणे, सावधपणे टाकीत अस्वल बर्फामध्ये अर्धवट गाडल्या गेलेल्या चेतनाहीन मानवी आकृतीकडे निघाले. अस्वलाच्या पंजांखाली वजनामुळे कडक, कोरडा बर्फ तडकत होता.

वैमानिक अलेक्सेई मेरेस्येव दुहेरी "चिमट्यां"मध्ये सापडला होता. हवाई झुंजीत असे घडणे सर्वांत वाईट. त्याचा सगळा दारूगोळा संपला आणि चार जर्मन विमानांनी त्याला घेरले. चकविण्याची किंवा मार्ग बदलण्याची संधीच जर्मनांनी त्याला दिली नाही व आपल्या तळाकडे त्यांनी जबरीने त्याला चालविले होते.

ही हकीकत अशी घडली. शत्रूच्या विमानतळावर हल्ला करण्यासाठी गेलेल्या "इल्" विमानांना संरक्षण देण्यासाठी लेफ्टनंट मेरेस्येव याच्या नेतृत्वाखाली लढाऊ विमाने गेली होती. ती धाडसी मोहीम यशस्वी झाली होती. पायदळ ज्यांना "उडते रणगाडे" म्हणून ओळखायचे त्या "श्तूर्माविकां"नी अगदी देवदाराच्या शेंड्यांना घासेपर्यंत खालून उड्डाण करीत गुपचूप शत्रूचा विमानतळ गाठला होता. त्या तळावर अनेक "युंकर" जातीची प्रचंड वाहतूक विमाने ओळीने उभी होती. भुरकट-निळ्या देवदारांच्या जंगलामागून श्तूर्माविकांनी अचानक विमानतळावर झेपा घेतल्या व अवजड वाहतूक विमानांवर मशिनगन, तोफा, अग्निबाण यांचा मारा केला. हल्ल्याच्या क्षेत्रावर आपल्या चार विमानांसह मेरेस्येव पहारा करीत होता. खाली तळावर धावणाऱ्या माणसांच्या काळ्या आकृती त्याला स्पष्ट दिसत होत्या. घट्ट थिजलेल्या बर्फावरून वाहतूक विमाने अवजडपणे सरपटत होती. श्तूर्माविक पुनःपुन्हा हल्ले चढवीत होती. त्यांच्या आगीच्या वर्षावाला चुकवीत "युंकरां"चे वैमानिक आपल्या विमानांना धावपट्टीवर ओढून आणीत होते व आकाशात उड्डाण करीत होते.

ह्या क्षणाला अलेक्सेईने महाघातक चूक केली. हल्ल्याच्या क्षेत्राचे घट्ट रक्षण करण्याऐवजी, वैमानिकांच्या भाषेतील "सहज सावजाची भूल" त्याला पडली. त्याने आपल्या विमानाचा सूर धरला व जमिनीवरून नुकत्याच सावकाश वर उडालेल्या अवजड वाहतूक विमानावर झेप घेतली. त्या रंगीबेरंगी, काटकोनी, पन्हळीदार ॲल्युमिनियमच्या धूडात आपल्या मशिनगनमधून लांबलचक फैर झाडण्यात त्याला मनस्वी आनंद वाटला होता. त्याला एवढा आत्मविश्वास होता, की शत्रूचे विमान जमिनीवर कोसळलेले पाहण्याचीसुद्धा त्याने तसदी घेतली नाही. विमानतळाच्या दुसऱ्या बाजूने दुसरी "युंकर" आकाशात झेपावली. अलेक्सेई त्यांच्या मागे गेला,

पण त्याचा हल्ला यशस्वी झाला नाही. सावकाश हवेत चढणाऱ्या शत्रूच्या विमानाच्या वरच्या बाजूने त्याच्या ट्रेसर काडतूसांची फैर उडाली. तो झटकन मागे फिरला आणि त्याने पुन्हा हल्ला केला. त्याचा नेम परत चुकला. पुनच त्याने शत्रूला गाठले व यावेळी मात्र त्याच्या रुंद, सिगाराच्या आकाराच्या शरीरात त्वेषाने अनेक फैरी मारून जंगलावर त्याने त्याला पाडले. "युंकरा"ला पाडल्यानंतर, अथांग जंगलाच्या विस्कटलेल्या हिरव्या सागरामधून जेथे धुराचे काळे लोट उमटत होते तेथे त्याने विजयोन्मादाने दोन गिरक्या मारल्या व परत आपले विमान शत्रूच्या विमानतळाकडे फिरविले.

पण तो तेथवर पोहोचला नाही. त्याची तीन विमाने शत्रूच्या नऊ "मेस्सेर" बरोबर झुंजत असलेली त्याच्या दृष्टीस पडली. श्तूर्मोविक्रांचा हल्ला परतवून लावण्यासाठी जर्मन विमानतळाच्या कमांडरने त्यांना बोलाविले होते हे स्पष्ट होते. तीनास एक असे प्रमाण असूनही, श्तूर्मोविकांपासून शत्रूला दूर ठेवण्यासाठी ते तिघे वैमानिक जर्मनांवर बेधडक तुटून पडत होते. काळा ग्राउस पक्षी जसा जखमी झाल्याची बतावणी करीत शिकाऱ्यांना हूल देऊन आपल्या पिलांपासून दूर दूर नेतो, तशी ती तीन विमाने शत्रूला हूल देऊन दूर दूर नेत होती.

सहज सावजाची आपल्याला भूल पडली याची अलेक्सेईला शरम वाटली. शिरस्त्राणाखाली आपले गाल शरमेने भाजत असल्याचे त्याला जाणवले. त्याने स्वतःचे लक्ष्य निवडले व दातओठ खात वेगाने झुंजीकडे तो निघाला. त्याने निवडलेले लक्ष्य म्हणजे एक "मेस्सेर" विमान होते. इतरांपासून ते थोडेसे अलग होते व तेसुद्धा आपले सावज शोधीत होते हे स्पष्ट होते. आपल्या विमानाकडून जास्तीत जास्त वेग पिळून अलेक्सेईने शत्रूच्या बगलेवर झेप मारली. युद्धकलेच्या सर्व नियमांना अंमलात आणून त्याने जर्मनावर हल्ला चढविला. त्याने चाप दाबला तेव्हा त्याच्या माशीवरील जाळयासारख्या क्रूसामध्ये शत्रूच्या विमानाचे भुरकट शरीर स्पष्ट दिसले होते. पण शत्रूचे विमान अंजीबात अपाय न होता निसटले. अलेक्सेईचा नेम चुकणे शक्य नव्हते. लक्ष्य जवळ होते आणि माशीवर स्पष्ट दिसले होते. "दारूगोळा!" अलेक्सेईने तर्क केला आणि तात्काळ त्याच्या पाठीमधून थंड शहारा गेला. चाचणी घेण्यासाठी त्याने पुन्हा चापाचे बटण दाबले, पण मशिनगन थाड थाड उडताना प्रत्येक वैमानिकाच्या सबंध शरीराला जे कंप जाणवत असतात

ते त्याला जाणवले नाही. काडतूसे संपली होती. "वाहतूक" विमानांच्या पाठलागात त्याने आपला सगळा दारूगोळा संपविला होता.

पण शत्रूला ते माहीत नव्हते! झुंजणाऱ्यांमध्ये किमान संख्यात्मक प्रमाण सुधारण्याच्या हेतूने झुंजीत भाग घेण्याचे अलेक्सेईने ठरविले. पण त्याचा गैरसमज झाला होता. ज्या लढाऊ विमानावर त्याने अयशस्वी हल्ला चढविला होता त्याचा वैमानिक अनुभवी आणि उत्तम निरीक्षक होता. आपल्या प्रतिस्पर्ध्याचा दारूगोळा संपल्याचे त्या जर्मनाला समजले व तात्काळ त्याने आपल्या सहकाऱ्यांना आदेश दिला. चार "मेस्सेर" इतरांपासून अलग झाली आणि त्यांनी अलेक्सेईला वेढले. दोन बगलांना दोघे, एक वर आणि एक खाली. ट्रेसर काडतूसांच्या फैरी उडवून त्यांनी त्याला आपल्या मनाप्रमाणे न्यायला सुरुवात केली. स्वच्छ निळया आकाशात ट्रेसर काडतूसांच्या रेषा स्पष्ट दिसत होत्या. दुहेरी "चिमटयात" त्यांनी त्याला धरले होते.

याआधी काही दिवसांपूर्वी अलेक्सेईने ऐकले होते की, प्रख्यात जर्मन "रिख्तहॉफेन" हवाई डिव्हिजन पश्चिमेकडून ह्या स्ताराया रूस्सा प्रदेशात आली होती. फॅसिस्ट राईखमधील हुकमी एक्के ह्या डिव्हिजनमध्ये होते व खुद्द गोअरिंगच्या आश्रयाखाली ही डिव्हिजन होती. ह्या हवाई लांडग्यांच्या पंजात आपण सापडलो आहोत, स्वतःच्या विमानतळाकडे आपल्याला जबरदस्तीने नेण्याचा त्यांचा प्रयत्न चाललाय, याची अलेक्सेईला जाणीव झाली. त्याला बळाने उतरवून कैदी म्हणून नेण्याचा त्यांचा इरादा त्याला समजला. अशा गोष्टी घडल्या होत्या. अलेक्सेईने स्वतःच अशी घटना एकदा पाहिली होती. त्याचा मित्र सोविएत संघाचा वीर हे पदक मिळालेला आंद्रेई देग्त्यारेन्को याच्या अख्त्यारामधील लढाऊ उड्डाणात असा एक जर्मन टेहळया वैमानिक त्यांच्या विमानतळापर्यंत आणण्यात आला होता व त्याला जबरदस्तीने खाली उतरायला भाग पाडले होते.

त्या जर्मन कैद्याचा लांबट, राखेसारखा पांढरा फटफटीत चेहरा व त्याची लटपटती पावले अलेक्सेईच्या डोळयांसमोर उभी राहिली. "कैदी म्हणून जायचं? कधीही नाही! त्यांची ही युक्ती सफल होऊ देणार नाही!" त्याने निर्धार केला.

पण खूप प्रयत्न करूनही त्याला निसटणे जमेना. जर्मन त्याला ज्या मार्गाने जायला भाग पाडत होते त्या मार्गापासून तो जरासा बाजूला झाला, की मशिनगनच्या फैरी उडवून ते त्याचा रस्ता अडवीत होते. अलेक्सेईच्या

डोळयांसमोर पुन्हा त्या जर्मन कैद्याची आकृती दिसली. त्याचा वेडावाकडा झालेला चेहरा व थरथरणारा जबडा दिसला. कोसळणाऱ्या जनावराची भीती त्या चेहऱ्यावर उमटली होती.

मेरेस्येवने आपले दात गच्च आवळले, आपल्या इंजिनाचा वाफेचा खटका ओढता येईल तेवढा ओढला व उभा पवित्रा घेऊन त्याला जमिनीवर दाबू पाहणाऱ्या जर्मन विमानाच्या खाली सूर मारला. शत्रूच्या विमानाखालून तो निसटला, पण जर्मन वैमानिकाने वेळीच चाप दाबला. अलेक्सेईच्या इंजिनाचा ताल चुकू लागला व अधूनमधून त्याचा ठोका पडेना. मरणांतिक ताप भरल्याप्रमाणे सबंध विमान थरथरत होते.

"माझ्या विमानाला मार बसलाय!" अलेक्सेईने पांढऱ्या ढगाच्या जंजाळात बुडी मारली व आपला पाठलाग करणाऱ्यांना चकवा दिला. पण पुढे काय करायचे? घायाळ विमानाचे हादरे त्याला सबंध शरीरभर जाणवत होते. ह्यानी झालेल्या त्याच्या विमानाच्या त्या मरणयातना नव्हत्या, तर जणू त्याच्या स्वतःच्या शरीरातील तापामुळे तो थरथर कापत होता.

इंजिनाला कोठे धक्का बसला होता? विमान हवेत किती वेळपर्यंत राहू शकणार होते? इंधनाच्या टाक्यांचा स्फोट झाला असता का? अलेक्सेईने ह्या प्रश्नांचा विचार जेवढा केला त्यापेक्षा अधिक प्रकर्षाने त्याला हे प्रश्न जाणवले होते. त्याला जाणवत होते की, जणू एव्हाना वात पेटविलेल्या सुरुंगावर तो बसला होता. त्याने आपले विमान मागे वळविले आणि आपल्या स्वतःच्या आघाडीची वाट धरली. तशीच वेळ आली तर स्वतःच्या माणसांकडून आपल्या अवशेषांचे दफन व्हावे, असा त्याचा हेतू होता.

उत्कटबिंदू अचानक आला. इंजिन थांबले. जणू उंच कडयावरून निसटावे त्याप्रमाणे विमान जमिनीवर घसरले. त्याच्याखाली जंगल होते. असीम महासागराच्या भुरकट-हिरव्या लाटांप्रमाणे डोलणारे... "तरीही मी कैदी म्हणून जाणार नाही!" विमानाच्या पंख्याखाली सर्वांत जवळची झाडे वेगाने निकट आली तेव्हा वैमानिकाच्या मनात हाच विचार चमकला. एखाद्या जंगली श्वापदाप्रमाणे जंगलाने त्याच्यावर झडप घातली तेव्हा अंतः-प्रेरणेने त्याने झटकन वाफेचा खटका बंद केला. कानठळया बसविणारा आदळण्याचा आवाज झाला आणि क्षणात सर्व नाहीसे झाले. जणू त्याने आणि त्याच्या विमानाने काळयाभोर, दाट पाण्यात सूर मारला होता.

खाली कोसळत असताना देवदारांच्या शेंडयांना विमान घासले गेले

होते. त्यामुळे पडण्याचा जोर कमी झाला होता. अनेक झाडांना पाडीत विमानाच्या ठिकऱ्या उडाल्या. पण त्याआधी क्षणभर, अलेक्सेई वैमानिकाच्या जागेमधून बाहेर फेकला गेला आणि रुंद फांद्यांच्या एका सनातन सुरूच्या झाडावर पडला. त्या झाडाच्या फांद्यांवरून घसरत बुंध्याच्या तळाशी जमा झालेल्या बर्फाच्या प्रचंड ढिगाऱ्यावर तो कोसळला. त्यामुळे त्याचे प्राण वाचले.

बेशुद्ध आणि नि:चेष्ट अवस्थेत अलेक्सेई किती वेळपर्यंत तेथे पडला होता हे त्याला आठवत नव्हते. अस्पष्ट मानवी सावल्या, इमारतींच्या रूपरेषा आणि अतर्क्य यंत्रे त्याच्या नजरेसमोरून वेगाने सरकली. ज्या प्रचंड वेगाने ही दृश्ये त्याच्या समोरून गेली त्यामुळे त्याच्या सबंध शरीरामधून एक मंद, कुरतडणारी वेदना उमटली. मग त्या गोंधळामधून काहीतरी मोठी आणि अनिश्चित आकाराची उबदार आकृती उमटली. त्या आकृतीने त्याच्या चेहऱ्यावर गरम, दुर्गंधीयुक्त श्वासाचा भपकारा सोडला. ह्या आकृतीपासून लोळत लोळत दूर जाण्याचा त्याने प्रयत्न केला, पण त्याचे शरीर बर्फात घट्ट रुतून बसल्याचे त्याला जाणवले. अज्ञात धोका आपल्यावर घोटाळत आहे याची जाणीव होताच त्याने उठण्याचा एकदम जोरदार प्रयत्न केला. तात्काळ त्याला आपल्या फुफ्फुसांमध्ये थंडगार गोठलेली हवा गेल्याचे जाणवले, त्याच्या गालांना गार बर्फ घासले गेले व सबंध शरीरात नव्हे तर आता त्याच्या पायांमध्ये तीव्र वेदना उमटली.

"मी जिवंत आहे!" त्याच्या मनात झर्रकन विचार येऊन गेला. त्याने वर उठायचा प्रयत्न केला, पण कुणाच्यातरी पावलांखाली बर्फ चुरडल्याचा आणि मोठमोठ्यांदा श्वासोच्छवास केल्याचा आवाज त्याने ऐकला. "जर्मन!" त्याने ताबडतोब विचार केला. डोळे उघडण्याची, उडी मारून उभे राहण्याची आणि स्वसंरक्षण करण्याची ऊर्मी त्याने मोठ्या कष्टाने दाबली. "कैदी! शेवटी कैदी! आता काय करू?"

त्याला आठवले की, त्याच्या पिस्तूलाच्या पिशवीचा तुटलेला पट्टा शिवून देण्याची तयारी आदल्याच दिवशी त्याच्या हरहुन्नरी मेकॅनिक यूराने दाखविली होती. पण त्याने ते नाकारले होते. परिणामी, त्याच्या वैमानिकाच्या पोषाखामधील मांडीवरच्या खिशात त्याला आपले पिस्तूल बाळगावे लागत होते. आता ते पिस्तूल बाहेर काढण्यासाठी त्याला कुशीवर वळावे लागणार होते. पण तसे केले असते तर शत्रूचे त्याच्याकडे हमखास लक्ष

वेधले असते. तो तोंडावर पालथा पडलेला होता. आपल्या मांडीशी त्याला पिस्तूलाचा ठळक आकार जाणवला. पण तो निपचित पडून राहिला. कदाचित शत्रू त्याला मृत समजेल व दूर निघून जाईल.

जर्मन त्याच्यापाशी चालत आला. अगदी विचित्रपणे त्याने सुस्कारा टाकला. मग बर्फ चुरडीत परत त्याच्यापाशी आला. त्याच्या तोंडामधून येणारा घाण वास अलेक्सेईला परत जाणवला. तेथे एकच जर्मन होता हे आता त्याला माहीत झाले. म्हणजे सुटून जाण्याची त्याला संधी होती. जर त्याच्यावर त्याने नीट लक्ष ठेवले, अचानक उडी मारून तो उठला व शत्रूने पिस्तूलाला हात घालण्यापूर्वीच त्याने त्याची नरडी धरली तर... पण हे अत्यंत काळजीपूर्वक आणि कमालीच्या अचूकपणे करणे भाग होते.

आपला पवित्रा न बदलताच, अलेक्सेईने सावकाशपणे आपले डोळे उघडले. आपल्या झुकलेल्या पापण्यांमधून त्याने जर्मन पाहिला नाही, तर एक तपकिरी, केसाळ पट्टा पाहिला. त्याने आपले डोळे अधिक सताड उघडले आणि तात्काळ पुन्हा घट्ट मिटले. त्याच्या पुढ्यात एक मोठे, हडकुळे, केसाळ अस्वल आपल्या खवाटच्यांवर बसले होते.

३

सूर्यप्रकाशात चमकणाऱ्या निळसर बर्फामधून जेमतेम बाहेर आलेल्या त्या निश्चेष्ट मानवी आकृतीशेजारी केवळ जंगली जनावराला शोभेल अशा शांतपणे ते अस्वल बसले होते.

त्याच्या घाणेरड्या नाकपुड्या मंदपणे थरथरत होत्या. त्याच्या अर्धवट उघड्या जबड्यामधून जुनाट, पिवळे, पण अजूनही भक्कम असलेले सुळे दिसत होते. त्याच्या तोंडामधून दाट लाळेची सुरेख तार लोंबत होती. वाऱ्यामुळे त्या लाळेच्या तारेला झोके मिळत होते.

हिवाळी झोप त्याच्यापासून छिनावून घेतली गेल्यामुळे ते अस्वल भुकेले आणि चिडलेले होते. पण अस्वले शिळे मांस खात नाहीत. पेट्रोलचा जोरदार भपकारा येणाऱ्या त्या निपचित देहाला हुंगल्यानंतर, त्या अस्वलाने सावकाशपणे मोकळ्या जागेत एक फेरी मारली. तेथे चुरचुरीत बर्फात तसेच अनेक मानवी देह पडले होते. पण कण्हण्याच्या आवाजाने व सळसळीमुळे ते अस्वल परत अलेक्सेईच्या शरीरापाशी आले.

अशा रीतीने ते अस्वल आता अलेक्सेईशेजारी बसून होते. शिळ्या मांसाविषयी वाटणाऱ्या तिटकाऱ्याबरोबर त्याची जळजळती भूक संघर्ष करीत होती. भुकेचा वरचष्मा होऊ लागला होता. त्या जनावराने सुस्कारा टाकला, ते उठले, आपल्या पंजाने तो मानवी देह वळविला आणि नख्या हवाई पोषाखात खुपसल्या. पण कापड टिकून राहिले. अस्वल हलकेच गुरगुरले. त्या क्षणाला डोळे उघडण्याची, कुशीवर वळण्याची, ओरडण्याची व आपल्या छातीवर चढलेल्या त्या अवजड धूडाला ढकलून दूर करण्याची प्रबळ इच्छा दाबून धरण्यासाठी अलेक्सेईला बरेच सायास पडले. त्याचे संपूर्ण शरीर कणखर आणि निकराचा बचावात्मक संघर्ष करू पहात होते. त्याने हळूच आणि दिसणार नाही अशा बेताने आपल्या खिशात हात सरकवला, पिस्तूलाची मूठ चाचपली, कट्ट आवाज होऊ नये म्हणून खटका बंद केला व हळूच अलगदपणे ते बाहेर काढू लागला.

तो पशू त्याच्या हवाई पोषाखाशी अधिक रागाने झोंबला. कणखर कातडे पिंजले, पण अजूनही टिकून राहिले. अस्वलाने पिसाळून आरोळी ठोकली, हवाई पोषाख दातात धरला व पोषाखाच्या अस्तरामधून देहाला लचका मारायचा प्रयत्न केला. निर्धारपूर्वक अखेरचा प्रयत्न करून अलेक्सेईने वेदनेची किंचाळी दाबली आणि ज्या क्षणाला अस्वलाने त्याला बर्फामधून बाहेर खेचले त्याच क्षणाला त्याने पिस्तूल वर उचलून चाप दाबला.

पिस्तूलाच्या बाराचे प्रतिध्वनी घुमले.

नीलकण्ठ पक्ष्याने आपले पंख फडफडविले व तो झटकन उडून गेला. थरथरलेल्या फांद्यांवरून कोरड्या बर्फाची भुकटी भुळभुळ सांडली. अस्वलाने सावकाशपणे आपले सावज सोडले. अलेक्सेई बर्फात मागे पडला. त्याने आपले डोळे मात्र अस्वलावर खिळवून ठेवले होते. अस्वल आपल्या खवाटचांवर खाली बसत होते. त्याच्या काळ्या पुवाळ डोळ्यांमध्ये आश्चर्य उमटले होते. त्याच्या सुळ्यांमधून दाट, काळसर लाल रक्ताची धार वाहात होती व बर्फावर ठिपकत होती. त्याने एक घोगरी, भयानक आरोळी मारली. आपल्या मागील पायांवर ते धूड कसेबसे उभे राहिले व अलेक्सेईने दुसरी गोळी झाडण्यापूर्वीच खाली कोसळले. निळसर बर्फ हळूहळू किरमिजी बनला. जेव्हा तो बर्फ वितळला तेव्हा अस्वलाच्या डोक्यापाशी हलकीशी वाफ उमटली. ते जनावर मेले होते.

अलेक्सेई एवढा वेळपर्यंत जो ताण सहन करीत होता तो ताण अचानक सुटला. पुन्हा एकदा त्याला पायांमध्ये धारदार, जळती वेदना जाणवली. तो बर्फावर कोसळला आणि त्याची शुद्ध हरपली.

जेव्हा तो शुद्धीवर आला तेव्हा सूर्य चांगलाच माथ्यावर चढला होता. देवदारांच्या दाट शेंड्यांना भेदून त्याच्या किरणांनी बर्फाला चमकत्या प्रकाशाने उजळून टाकले होते. सावलीमधील बर्फ आता फिकट निळा दिसत नव्हता. त्याला दाट निळाई आली होती.

"अस्वलांचं मला स्वप्न पडलं काय?" अलेक्सेईच्या मनात पहिला विचार आला.

अस्वलाचे तपकिरी, केसाळ, विस्कळीत प्रेत शेजारीच निळसर बर्फावर पडले होते. जंगलात आवाज घुमत होते. सुतार पक्षी अखंडपणे टोक-टोक आवाज करीत होता. फांद्यांवरून आनंदाने बागडताना पिवळ्या छात्यांचे छोटे चपळ पक्षी किलबिल करीत होते.

"मी जिवंत आहे, जिवंत आहे, जिवंत आहे!" अलेक्सेईने स्वतःलाच पुनःपुन्हा बजाविले. प्रत्येक वेळी मरणाच्या धोक्यामधून पार पडल्यानंतर, आपण जिवंत असल्याची प्रखर, जादूभरी, उन्मादक संवेदना माणसाला जाणवल्यानंतर जे वाटते ते अलेक्सेईला वाटले.

ह्या संवेदनेच्या उत्साहात तो झटकन पायांवर उभा राहिला, पण तात्काळ वेदनेचा चीत्कार काढीत अस्वलाच्या मढ्यावर कोसळला. त्याच्या पायातील वेदना सबंध शरीरभर पसरली. जणू दगडाची जाती गरगर फिरत दळत असावीत असा आवाज त्याच्या डोक्यात भरला होता व त्यामुळे त्याच्या मेंदूत धक्के बसत होते. कुणीतरी आपल्या बोटांनी जोराने दाबावे तसे त्याचे डोळे दुखत होते. क्षणात त्याला भोवतालच्या सर्व गोष्टी ठळक आणि स्पष्ट दिसायच्या, सूर्याच्या किरणांच्या थंड, पिवळसर प्रकाशात न्हायलेल्या दिसायच्या. तर दुसऱ्याच क्षणी भुरकट, चमचमत्या बुरख्याआड सर्व नाहीसे व्हायचे.

"छेः, हे फारच वाईट! मी पडलो तेव्हा डोक्याला जोराचा धक्का बसला असावा. आणि माझ्या पायांमध्ये काहीतरी गडबड झालीय," अलेक्सेई-च्या मनात विचार आला.

आपल्या हातांच्या कोपऱ्यांवर स्वतःला उंचावून त्याने जंगलाच्या किनारी-पलिकडील विस्तीर्ण मैदानाकडे चकित नजरेने पाहिले. पार क्षितिजापर्यंत

त्या मैदानाचा विस्तार पसरला होता व क्षितिजापाशी दुसऱ्या दूरच्या जंगलाचे भुरकट अर्धवर्तुळ उमटले होते.

शरदामध्ये, किंवा कदाचित हिवाळयाच्या आरंभी, ह्या जंगलाची किनार सोविएत सेनेच्या तुकडीची बचावाची फळी होती हे स्पष्ट दिसत होते. त्या तुकडीने कदाचित फार काळपर्यंत जरी ही फळी लढविली नसली, तरी निग्रहाने, अगदी मरणापर्यंत शत्रूला प्रतिकार केला होता. हिमवादळांनी बर्फाळ कापसाचा थर पसरून धरतीच्या जखमा झाकून टाकल्या होत्या. पण ह्या थराखालून अद्यापही नजरेला खंदकांच्या रांगेच्या खुणा दिसत होत्या; मशिनगनच्या मोर्चांची उध्वस्त टेकाडे दिसत होती; जंगलाच्या टोकाशी उध्वस्त झालेल्या, शेंडे छाटलेल्या अथवा चेंदामेंदा झालेल्या झाडांच्या पायांपर्यंत तोफगोळयांमुळे पडलेले अगणित लहान-मोठे खड्डे दिसत होते. ह्या छिन्नभिन्न मैदानावर ठिकठिकाणी अनेक रणगाडयांचे ठिपके विखुरले होते. माशाच्या खवल्यांप्रमाणे चित्रविचित्र रंगांचे पट्टे त्यांच्यावर रंगविलेले होते. बर्फावर ते थिजून उभे होते. ते सर्व रणगाडे विचित्र राक्षसांच्या मुडद्यांप्रमाणे भासत होते. विशेषत: अगदी शेवटच्या टोकाचा रणगाडा बाँबमुळे अथवा सुरुंगामुळे एका बाजूला कलंडला होता व त्याच्या तोफेची लांब नळी तोंडामधून जीभ बाहेर काढावी तशी जमिनीशी लटकली होती. सबंध मैदानभर, उथळ खंदकांपुढील बांधांवर, रणगाडयांजवळ, जंगलाच्या किनारीशी, सोविएत आणि जर्मन सैनिकांची प्रेते पडली होती. त्या प्रेतांची संख्या एवढी प्रचंड होती की, काही ठिकाणी त्यांचे एकमेकांवर ढीग निर्माण झाले होते. आणि हिवाळयाच्या सीमारेषेवर, अवघे काही महिने आधी, लढाईच्या धुमाळीत मृत्यूने त्यांच्यावर प्रहार केला होता त्याच अवस्थेत थिजून ती प्रेते पडली होती.

येथे प्रखर आणि अटीतटीची लढाई झाली होती हे ह्या गोष्टींनी अलेक्सेईला सांगितले. शत्रूला थोपवून धरायचे आणि त्याला पलिकडे जाऊ द्यायचे नाही, एवढेच ध्यानात धरून व बाकीचे सर्व काही विसरून आपले बांधव येथे लढले, हे ह्या गोष्टींनी अलेक्सेईला सांगितले. थोडयाशा अंतरावर, जंगलाच्या टोकाशी, तोफगोळयाने शेंडा छाटल्या गेलेल्या एका जाडजूड देवदाराच्या पायथ्याशी, कवटया फुटलेल्या आणि चेहरे चेंदामेंदा झालेल्या जर्मन सैनिकांची प्रेते पडली होती. त्या देवदाराच्या फुटलेल्या बुंध्यामधून आता पिवळा, पारदर्शी चीक पाझरत होता. मध्यभागी, एका

शत्रू-सैनिकाच्या प्रेतावर, गोल चेहऱ्याच्या व मोठ्या डोक्याच्या एका तरुणाचे शरीर आडवे पसरले होते. त्याच्या अंगात लष्करी कोट नव्हता; फक्त फाटक्या कॉलरचा लष्करी कुडता होता. त्याच्या शेजारीच मोडलेल्या बागनेटाची आणि पिंजलेल्या रक्तलांच्छित दांड्याची रायफल पडली होती.

आणखी पुढे, जंगलाकडे जाणाऱ्या रस्त्याजवळ एका कोवळ्या, वाळूने माखलेल्या सुरूच्या झाडाच्या पायथ्याशी, स्फोटाने पडलेल्या खड्ड्यात, काळसर वर्णाच्या एका उझ्बेक सैनिकाचा देह पडला होता. त्याचा लंब-वर्तुळाकार चेहरा जुन्या हस्तीदंतामधून कोरल्यासारखा भासत होता. त्याच्या पाठीशी, सुरूच्या झाडाच्या फांद्यांखाली ग्रेनेड व्यवस्थित रचून ठेवलेले होते. खुद्द त्या उझ्बेकाच्या मृत, वर उंचावलेल्या हाती एक ग्रेनेड धरलेला होता. जणू तो फेकण्यापूर्वी त्याने आकाशाकडे एकदा नजर टाकली होती आणि त्याच पवित्र्यात तो स्तब्ध झाला होता.

आणखी थोडे पुढे, जंगलालगतच्या रस्त्यावर, चित्रविचित्र रंगांच्या रणगाड्यांशेजारी, स्फोटांमुळे पडलेल्या खड्ड्यांच्या कडेशी, काही जुन्या झाडांच्या खोडांशी – सर्वत्र प्रेते पडली होती. दुलईदार जाकीटांमधली आणि विजारींमधली, फिकट हिरव्या सदऱ्यांमधली आणि थंडीमुळे कानांवर कोनदार टोप्या ओढलेली. वाकलेल्या गुडघ्यांची, उंचावलेल्या हनुवट्यांची आणि मेणचट चेहऱ्यांची. बर्फखंडांमधून डोकावणारी ही प्रेते कोल्ह्यांनी कुरतडली होती; नीलकण्ठ पक्ष्यांनी आणि डोंबकावळ्यांनी त्यांना चोची मारल्या होत्या.

उघड्या मैदानावर अनेक डोंबकावळे सावकाशपणे घिरट्या घालीत होते. अचानक अलेक्सेईला एका शोकपूर्ण, पण भव्य चित्राची आठवण झाली. "ईगोरची लढाई" अशा शीर्षकाचे ते चित्र एका थोर रशियन कलाकाराच्या कुंचल्यामधून उतरले होते व इतिहासाच्या शालेय पुस्तकात त्याचे छायाचित्र छापलेले होते.

"त्यांच्यासारखाच मीही इथं पडलेला असतो," त्याच्या मनात विचार आला आणि जिवंत असल्याची जाणीव त्याच्या सर्वांगातून पुन्हा उसळली. त्याने स्वतःला गदगदा हलविले. डोक्यात जात्यांच्या दळणाचा आवाज अजूनही घुमत होता. त्याची पावले भाजत होती आणि पूर्वीपेक्षाही जास्त ठणकत होती. तो अस्वलाच्या मढ्यावर बसला होता. कोरडा बर्फ त्या मढ्यावर विखुरला गेल्यामुळे ते आता थंड झाले होते व त्याला रुपेरी छटा

आली होती. आता काय करावे, कोठे जावे आणि आपल्या युद्धआघाडीच्या पुढच्या रेषेपर्यंत कसे पोहचावे, याचा तो विचार करू लागला.

आपल्या विमानातून तो बाहेर फेकला गेला तेव्हा त्याची नकाशाची केस हरवली होती. पण जाण्याचा मार्ग तो आपल्या डोळयांसमोर ठळकपणे उभा करू शकत होता. श्तूर्माविकांनी हल्ला चढवलेला जर्मन विमानतळ युद्धआघाडीच्या पुढच्या रेषेच्या पश्चिमेस सुमारे साठ किलोमीटर अंतरावर होता. हवाई लढाईमध्ये त्याच्या माणसांनी शत्रूला विमानतळापासून पूर्वेस सुमारे वीस किलोमीटरपर्यंत नेले होते आणि दुहेरी "चिमट्यां" मधून निसटल्यानंतर तो आणखी थोडासा पूर्वेकडे आला असावा. म्हणजे युद्ध-आघाडीच्या पुढील मोर्चांपासून सुमारे पस्तीस किलोमीटर अंतरावर तो पडला असावा. हे ठिकाण पुढील जर्मन डिव्हिजनांच्या खूप पिछाडीस होते. काळे अरण्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रचंड जंगलपट्ट्यात कोठेतरी तो होता. नजीकच्या जर्मन तळांवर छोट्या धाडी घालण्यासाठी येणाऱ्या बाँब-फेक्या व श्तूर्माविक विमानांना संरक्षण देण्यासाठी ह्या जंगलपट्ट्यावरून त्याने अनेकदा उड्डाण केले होते. आकाशामधून हे जंगल त्याला नेहमी अथांग हिरव्या सागराप्रमाणे भासायचे. स्वच्छ हवेत ते देवदारांच्या हिंदकळत्या शेंड्यांमुळे डोलताना दिसायचे, तर वाईट हवेत त्याच्याभोवती पातळ, भुरकट धुके लपेटलेले असायचे. अशा वेळी, पृष्ठभागावर छोट्या छोट्या लाटा उमटणाऱ्या पाण्याच्या तलम, भयाण गाळासारखे ते दिसायचे.

ह्या महाअरण्याच्या मध्यभागी तो पडला होता ह्या वस्तुस्थितीला चांगली आणि वाईट अशा दोन्ही बाजू होत्या. चांगली बाजू म्हणजे येथे त्याला जर्मन वाटेत आडवे येण्याची शक्यता नव्हती, कारण सर्वसाधारणपणे ते रस्त्यांवर आणि गावांमधून वावरत. वाईट बाजू म्हणजे त्याचा मार्ग लांब नसला तरी खूप अवघड होता. त्याला दाट झाडोऱ्यामधून पुढे घुसावे लागणार होते व मानवी मदत मिळण्याची, आडोसा लाभण्याची, पावाचा तुकडा अगर कपभर गरम पेय मिळण्याची सुतराम शक्यता नव्हती. त्याची पावले... त्याला कोण उचलून नेणार? चालणे त्याला शक्य होणार का? ...

अस्वलाच्या मढ्यावरून तो सावकाशपणे उठला. पावलांपासून सुरू होणारी व तेथून सबंध शरीरभर धावणारी तीव्र वेदना पुन्हा त्याला जाण-वली. यातनेची अस्फुट किंचाळी त्याच्या ओठांमधून निसटली व तो पुन्हा

खाली बसला. आपले केसाळ बूट पायांमधून काढण्याचा त्याने प्रयत्न केला, पण ते घट्ट बसले होते. प्रत्येक वेळी खेचल्यानंतर तो विव्हळत होता. दात गच्च आवळून आणि डोळे घट्ट मिटून त्याने दोन्ही हातांनी खूप जोर लावला व एक बूट पायातून उपसून काढला. तात्काळ त्याची शुद्ध हरपली. जेव्हा तो शुद्धीवर आला तेव्हा पायाभोवतालचे कापड त्याने काळजीपूर्वक सोडले. पाय सुजला होता व एका मोठ्या, काळयानिळया जखमेसारखा दिसत होता. प्रत्येक सांध्यात जळती वेदना होत होती. आपला पाय त्याने बर्फावर टेकविला आणि वेदना काहीशी शमली. पुन्हा त्याच निकराच्या प्रयत्नाने, जणू स्वतःचा एक दात उपटून काढावा त्याप्रमाणे त्याने दुसरा बूटही पायातून खेचून काढला.

त्याची दोन्ही पावले वाया गेली होती. आपल्या विमानामधून जेव्हा तो बाहेर फेकला गेला होता तेव्हा कशालातरी त्याचे पाय आपटले होते व टाचेच्या आणि अंगठ्यांच्या हाडांचा चुरा झाला होता. एरवी, सर्वसामान्य परिस्थितीत, अशा भयानक अवस्थेत असताना, स्वतःच्या पायांवर उभे राहण्याचे धारिष्ट अर्थातच त्याने कधीही केले नसते. पण ह्या निबिड जंगलात, शत्रूच्या पिछाडीला, तो एकटा होता. येथे माणसाची भेट होणे म्हणजे सुटका नव्हती, तर ती मृत्यूशी गाठ होती. तेव्हा सोयीस्कर रस्त्यांना अथवा माणसांच्या वस्तीला शोधण्याचा प्रयत्न न करता, त्या अरण्यामधूनच पूर्वेकडे सरकत जाण्याचा त्याने निर्णय घेतला. कोणत्याही परिस्थितीत त्याला पुढे सरकणे भागच होते.

निर्धाराने तो अस्वलाच्या मढ्यावरून उठला. त्याच्या तोंडून एक चीत्कार उमटला. त्याने आपले दात घट्ट आवळले व पहिले पाऊल टाकले. क्षणभर तो उभा राहिला, दुसरा पाय त्याने कष्टाने बर्फातून बाहेर खेचला व आणखी एक पाऊल टाकले. त्याच्या डोक्यात आवाजांचा गोंगाट माजला होता. घळ हिंदकळली आणि तरंगत गेली.

ताणामुळे आणि वेदनेमुळे आपण अधिक क्षीण होत चाललो आहोत असे अलेक्सेईला जाणवले. ओठ चावीत तो पुढे सरकत राहिला. मोडून पडलेल्या रणगाड्यापलिकडून जाणाऱ्या, ग्रेनेड हाती धरलेल्या मृत उझ्बेकापलिकडून जाणाऱ्या, दाट जंगलात पूर्वेच्या दिशेने जाणाऱ्या जंगलवाटेपर्यंत तो पोहोचला. मऊ बर्फावर लंगडत जाणे तेवढेसे वाईट नव्हते, पण वाऱ्यामुळे कठीण बनलेल्या, बर्फ माखलेल्या त्या वाटेच्या टेंगळासारख्या पृष्ठभा-

गावर ज्या क्षणी त्याचे पाऊल टेकले त्या क्षणी पायामधील वेदना एवढी तीव्र बनली, की आणखी एक पाऊल पुढे टाकण्याची हिंमत न होऊन तो थांबला. पाय वेडेवाकडे फाकवून तो उभा होता. त्याच्या सर्वांगाला जणू वाऱ्यामुळे झोके बसत होते. अचानक त्याच्या डोळयांसमोर भुरकट धुके उमटले. ती वाट, देवदाराची झाडे, त्यांचे भुरकट शेंडे, त्यांच्यामधील आकाशाचा निळसर लांबट पट्टा हे सर्व अदृश्य झाले... तो आपल्या विमानतळावर उभा होता. शेजारी त्याचे लढाऊ विमान उभे होते. दाढी न केलेल्या व सदैव चेहऱ्यावर काजळी माखलेल्या मेकॅनिक लंबू यूराचे दात व डोळे चमकत होते. यूरा त्याला वैमानिकाच्या जागेकडे येण्याची खूण करीत होता. जणू त्याला म्हणायचे होते: "विमान तय्यार आहे! चला उड्डाणाला! ..." अलेक्सेईने विमानाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले, पण जमीन हिंदकळली, जणू लालबुंद तापलेल्या धातूच्या थाळीवर पाय पडावा तशी भाजल्याची वेदना त्याला झाली. जमिनीचा हा तापलेला पट्टा उडी मारून ओलांडून विमानाच्या पंख्यावर जाण्याचा त्याने प्रयत्न केला. पण धोटचाच्या आकाराच्या विमानाच्या थंड सांगाड्यावर तो आदळला. सांगाड्याची बाजू सपाट आणि चकचकीत नव्हती, तर देवदाराची साल चिकटवावी त्याप्रमाणे खरबरीत होती हे जाणवून त्याला आश्चर्य वाटले... पण तेथे मुळी लढाऊ विमानच नव्हते! वाटेवर उभे राहून झाडाच्या बुंध्याला तो कुरवाळीत होता.

"आभास? डोक्याला' बसलेल्या धक्क्यामुळे माझा मनावरचा ताबा उडत चाललाय!" अलेक्सेईच्या मनात आले. "ह्या वाटेनं जाणं फार हालाचं होईल. बाजूनं जावं काय? पण त्यामुळं वेग मंदावेल..." तो बर्फावर खाली बसला आणि पुन्हा मघाच्याच निर्धाराने त्याने आपल्या पायां-मधील केसाळ बूट उपसून काढले. आपल्या दातांनी आणि नखांनी बुटांचा वरचा भाग फाडून काढून आपल्या मोडलेल्या पावलांना ते सोयीस्कर बसतील असे त्याने बुटांना बनविले. स्वतःजवळच्या अंगोरा वूलनच्या मोठ्या, पिसार मफलरचे फाडून पट्टे केले आणि त्या पट्ट्यांना पायांभोवती गुंडाळून पुन्हा बूट पायात चढविले.

आता चालणे अधिक सोपे झाले होते. पण त्याला चालणे म्हणणे योग्य नाही; चालणे नव्हे तर पुढे सरकणे; काळजीपूर्वक पुढे सरकणे. चवडे टेकवायचे आणि पावले उंच उचलायची. दलदलीमधून जाताना माणूस

चालतो त्याप्रमाणे. काही पावले टाकली म्हणजे वेदनेने व अतिश्रमांमुळे त्याला चक्कर येत होती. त्याला थांबणे भाग पडे. डोळे मिटून झाडाच्या बुंध्याला तो टेकायचा अथवा विश्रांती घेण्यासाठी वर्फाच्या ढिगाऱ्यावर खाली बसायचा. आपल्या नसांमधील रक्ताची तीव्र ठणक त्याला जाणवत रहायची.

अशा रीतीने कित्येक तासपर्यंत तो पुढे सरकत राहिला. पण जेव्हा त्याने मागे पाहण्यासाठी मान वळवली तेव्हा अजूनही त्याला जंगलाच्या टोकाला छेदणारा तो सूर्यप्रकाशित रस्ता आणि तेथे पडलेला तो मृत उझबेक बर्फावरील छोटया काळया डागासारखा दिसला. अलेक्सेई कमालीचा निराश झाला. तो निराश झाला होता तरी घाबरला नव्हता. अधिक वेगाने पुढे जाण्याची त्यामुळे त्याला इच्छा झाली. बर्फाच्या ढिगावरून तो उठला, त्याने आपले दात घट्ट आवळले आणि तो पुढे निघाला. आता तो जवळची उद्दिष्टे समोर ठेवू लागला. त्यांच्यावर मन एकाग्र करू लागला. एका देवदारापासून दुसऱ्या देवदारापर्यंत, एका खुंटापासून दुसऱ्या खुंटापर्यंत, एका टेकाडापासून दुसऱ्या टेकाडापर्यंत. असे पुढे जात असताना त्या निर्जन जंगलवाटेच्या ताज्या बर्फावर तो आपल्या माघारी नागमोडी, वेडेवाकडे ठसे उमटवीत गेला. एखाद्या घायाळ जनावराचे ठसे उमटावेत तसे!

४

अशा रीतीने सायंकाळपर्यंत तो पुढे जात राहिला. त्याच्या पाठीमागे कुठेतरी मावळणाऱ्या सूर्याने जेव्हा आपली थंडगार, लालसर किरणे झाडांच्या शेंडयांवर टाकली व जंगलामध्ये भुरकट सावल्या दाट बनू लागल्या, तेव्हा तो एका खोलगट जागी आला. त्या ठिकाणी सदापर्णी झाडांची दाटी माजली होती. तेथील दृश्य त्याच्या नजरेसमोर उभे झाले तेव्हा जणू त्याच्या पाठीवरून कुणीतरी थंडगार ओला टॉवेल फिरवावा त्याप्रमाणे तो शहारला. त्याच्या पोलादी शिरस्त्राणाखालील केस ताठ उभे राहिले.

मोकळया जागेवर लढाई माजली होती तेव्हा ह्या खोलगट जागी वैद्यकीय पथकाने आपला तळ टाकला होता, हे स्पष्ट दिसत होते. जखमींना येथे आणण्यात येत होते व देवदारांच्या डहाळयांवर निजविले जात होते. आणि इथे झुडुपांच्या आडोशात अजूनही ते तसेच पडून होते. काही अर्धवट

गाडलेल्या अवस्थेत, तर काही बर्फात पूर्ण गाडले गेलेले! पहिल्याच दृष्टि-क्षेपात समजत होते की, आपल्या जखमांपायी ते मेले नव्हते. कुणीतरी सफ़ाईने सुरा चालवून त्यांचे गळे कापले होते आणि ते सगळे सारख्याच तऱ्हेने पडले होते. जणू मागे काय चालले ते पाहण्यासाठी त्यांची डोकी वळलेली होती आणि येथेही ह्या भयप्रद दृश्याचा खुलासा उपलब्ध होता. एका देवदाराच्या झाडाखाली, एका सोविएत लष्करी माणसाच्या बर्फाने झाकल्या गेलेल्या देहाशेजारी एक नर्स कमरेएवढ्या बर्फाच्या ढिगात बसली होती. केसाळ टोपी घातलेल्या व टोपीच्या कानांच्या झोलांना बांधून घेतलेल्या त्या छोट्या, कृश मुलीने त्या सैनिकाचे मस्तक आपल्या मांडीवर धरले होते. तिच्या खांद्यामध्ये एका लखलखीत कट्यारीची मूठ रुतलेली दिसत होती. जंवळच एस्‌एस्‌च्या काळ्या गणवेषामधील एका फॅसिस्टाचे व रक्ताचे डाग पडलेले बँडेज कपाळाला बांधलेल्या एका सोविएत सैनिकाचे, अशी दोन प्रेते पडली होती. त्या दोघांनी एकमेकांच्या गळ्यांना मरणमिठी घातली होती. अलेक्सेईने तात्काळ तर्क केला की, काळ्या पोषाखातील माणसाने जखमी लोकांचे खून केले होते व तो नर्सच्या पाठीत कट्यार खुपसत असतानाच, अद्याप जिवंत असलेला सोविएत सैनिक त्याच्यावर धावून गेला होता आणि आपल्या बोटांमध्ये उरलेल्या सर्व शक्तीनिशी त्याने त्या फॅसिस्टाची नरडी आवळली होती.

आणि हिमवादळाने त्या सर्वांना गाडून टाकले होते. आपल्या शरीराचा आडोसा देऊन जखमी सैनिकाचे संरक्षण करणारी केसाळ टोपीमधील ती कृश मुलगी आणि तिच्या पायांशी पडलेले एकमेकांचा गळा धरलेले ते दोघे—एक खुनी व दुसरा त्यांचा बदला घेणारा. त्या मुलीच्या पायांमध्ये रुंद पॅडचे गुडघ्यांपर्यंतचे जुने लष्करी बूट होते.

स्तंभित होऊन काही क्षणपर्यंत अलेक्सेई तेथे उभा राहिला. मग लंगडत लंगडत नर्सपाशी गेला व तिच्या खांद्यामधील कट्यार त्याने उपसून बाहेर काढली. प्राचीन जर्मन तलवारीच्या धर्तीचा तो एस्‌एस् खंजीर होता. त्याच्या शिसवी मुठीवर एस्‌एस्‌चे चांदीचे प्रतीक कोरलेले होते. त्याच्या गंजलेल्या पात्यावर «Alles für Deutschland»* असे कोरलेले शब्द ओळखू येत होते. खंजीराचे चामड्याचे म्यान अलेक्सेईने त्या जर्मनाच्या

*सर्व काही जर्मन भूमीसाठी.

अंगावरून काढून घेतले. आपल्या प्रवासात त्याला शस्त्राची जरूरी पडली असती. मग त्याने बर्फाखाली दडलेली कडक, गोठलेली ताडपत्री खणून बाहेर काढली, हळुवारपणे ताडपत्रीने त्या नर्सचे शरीर झाकले व देवदाराच्या काही डहाळ्या त्यावर ठेवल्या...

एवढे घडेपर्यंत संध्याकाळ झाली. झाडांमधील प्रकाशाचे पट्टे विरले. त्या खोलगट जागेला दाट आणि गोठलेल्या अंधाराने वेढून टाकले. येथे सारे काही शांत होते, पण झाडांच्या शेंड्यांमधून संध्याकाळचा वारा वहात होता आणि एका क्षणी जंगल शांतविणारे अंगाई गीत गात होते, तर दुसऱ्या क्षणाला चिंतेने आणि भीतीने भरलेले गाणे गात होते. कोरडे चुरचुरीत हिमकण त्या खोलगट जागी वाऱ्याबरोबर वहात येत होते. आता ते डोळ्यांना दिसत नसले तरी त्यांचा सळसळ आवाज येत होता व चेहऱ्याला ते झोंबत होते.

वोल्गा प्रदेशाच्या स्तेपभूमीत कामीशीन येथे अलेक्सेईचा जन्म झाला होता. तो शहरवासी असल्यामुळे जंगलात रात्री काढण्याचा त्याला अनुभव नव्हता. रात्रीची तयारी करण्याची, अथवा आगटी पेटविण्याची तसदी त्याने घेतली नव्हती. दाट अंधाराचे मनावर दडपण आल्यामुळे व मोडलेल्या पायातील अतितीव्र वेदनेमुळे, शेकोटी पेटवायला सर्पण गोळा करण्याचे त्राण त्याच्या अंगी राहिले नव्हते. एका कोवळ्या देवदाराच्या बुंध्याजवळच्या दाट झुडुपांमध्ये तो रांगत गेला, झाडाखाली बसला. पाठीला पोक काढून त्याने आपल्या गुडघ्यांच्या जुडीवर डोके टेकले. पायांना त्याने हातांची मिठी घातली होती. स्वतःच्याच श्वासाने ऊब आणीत, त्या नीरव शांततेचा व विश्रांतीचा आनंद अनुभवीत तो स्तब्ध बसून राहिला.

त्याने आपल्या पिस्तूलाचा घोडा ओढून ठेवला होता, पण अरण्यातील त्या पहिल्या रात्री पिस्तूलाचा वापर करणे त्याला जमले असते अथवा नाही याबद्दल शंका आहे. तो अगदी डाराडूर झोपला. ना त्याने देवदारांची अखंड सळसळ ऐकली, ना रस्त्यालगत कुठेतरी असलेल्या घुबडाची घूं घूं ऐकली, ना दूरवरून येणारी लांडग्यांची ओरड ऐकली. त्याला घट्टपणे गुरफटून टाकणाऱ्या दाट, अभेद्य अंधाराला भरून टाकणारे अरण्यातील कोणतेही आवाज त्याला ऐकू आले नाही.

पहिले पहाटकिरण फुटताच जणू कुणी गदगदा हलवून जागे करावे

त्याप्रमाणे तो दचकून उठला. गोठल्या अंधारात झाडांच्या अस्पष्ट छाया झुलत होत्या. त्याला काय झाले होते आणि तो कुठे होता याची त्याला केवळ जागे झाल्यानंतर आठवण झाली. ज्या निष्काळजीपणे त्याने जंगलात रात्र घालविली होती, त्याची त्याला आता एकदम भीती वाटली. त्याच्या केसाळ अस्तराच्या हवाई पोषाखामध्ये कडक थंडी घुसली होती व पार त्याच्या हाडांपर्यंत खुपसत होती. हिवताप झाल्याप्रमाणे त्याला हुडहुडी भरली होती. त्याच्या पावलांची अवस्था सर्वांत वाईट होती. वेदना आता जास्तच वाढली होती व या क्षणाला विश्रांती घेत असूनही पायांमध्ये जबरदस्त ठणका बसल्या होत्या. उभे राहण्याचा नुसता विचारदेखील त्याच्या छातीत धडकी भरवीत होता. पण आदल्या दिवशी ज्या निर्धाराने त्याने आपल्या पायांमधील बूट खस्सदिशी उपसले होते, त्याच निर्धाराने शरीराला झटका देऊन तो उठला. वेळ बहुमोल होता.

अलेक्सेईला ज्या यातना सहन कराव्या लागत होत्या, त्यांच्यामध्ये आणखी भुकेच्या यातनेची भर पडली. आदल्या दिवशी त्याने त्या नर्सच्या शरीराला ताडपत्रीने झाकले होते तेव्हा त्या नर्सशेजारी कॅन्व्हासची एक रेड क्रॉस थैली पडलेली त्याने पाहिली होती. कुठल्यातरी छोट्या प्राण्याने एव्हाना त्या पिशवीला कुरतडले होते व त्या कुरतडल्या जागेमधून पावाचे तुकडे सांडलेले दिसत होते. आदल्या दिवशी अलेक्सेईने ह्या थैलीकडे मुळीच लक्ष दिले नव्हते. पण आता मात्र त्याने ती थैली उघडली. थैलीत अनेक मलमपट्ट्या होत्या, मांसाचा एक मोठा डबा होता, पत्रांची जुडी होती व मागील बाजूस रोड चेहऱ्याच्या म्हाताऱ्या बाईचे छायाचित्र चिकटविलेला एक छोटा आरसा होता. त्या थैलीत पावही होता हे उघड होते, पण त्यावर पक्ष्यांनी व प्राण्यांनी एव्हाना ताव मारला होता. अलेक्सेईने आपल्या हवाई पोषाखाच्या खिशात मांसाचा डबा ठेवला, बँडेजांच्या पट्ट्या कोंबल्या. तो स्वतःशीच पुटपुटला: "धन्यवाद, लाडके!" त्या तरुण नर्सच्या पायांवरील वाऱ्याने उडालेली ताडपत्री त्याने परत नीट पांघरली आणि सावकाशपणे पूर्वेचा रस्ता धरला. झाडांच्या फांद्यांच्या जाळीमागे त्या दिशेला एव्हाना नारिंगी ज्वाला पेटली होती.

आता त्याच्यापाशी एक किलोग्राम मांसाचा डबा होता. दररोज फक्त एकदा दुपारच्या वेळी मांस खाण्याचे त्याने ठरविले.

५

प्रत्येक पाऊल टाकताना होणारी असह्य वेदना विसरण्यासाठी अलेक्सेईने आपल्या मार्गाचा विचार करायला व हिशेब करायला आरंभ केला. जर त्याने दररोज दहा ते बारा किलोमीटर अंतर कापले, तर आपल्या इच्छित मुक्कामी पोहोचायला त्याला तीन किंवा फार तर चार दिवस लागले असते. "ठीक आहे! आता दहा ते बारा किलोमीटर म्हणजे काय? एक किलोमीटर म्हणजे दोन हजार पावलं! याचा अर्थ दहा किलोमीटर म्हणजे वीस हजार पावलं! पण ही खूप आहेत, कारण दर पाच-सहाशे पावलांनंतर मला विश्रांती घ्यावी लागेल..."

वाट चालणे सोपे व्हावे म्हणून आदल्या दिवशी अलेक्सेईने आपल्यासमोर विशिष्ट दृश्य लक्ष्य धरले होते; देवदाराचे झाड, झाडाचा खुंट, किंवा रस्त्यामधील खड्डा, इ. आणि हे प्रत्येक लक्ष्य म्हणजे थांबण्याची जागा असे ठरवून मार्गक्रमण केले होते. आता त्याने आकड्यांचे लक्ष्य धरले – विशिष्ट पावले चालत जायची. एका दमात हजार पावले चालत जायचे – म्हणजे अर्धा किलोमीटर – आणि अगदी घड्याळ लावून फक्त पाच मिनिटे विश्रांती घ्यायची, असे त्याने ठरविले. त्याने गणित केले की, सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत मोठ्या कष्टाने तो दहा किलोमीटर अंतर कापू शकेल.

पण पहिली हजार पावले किती कठीण होती! वेदनेवरील लक्ष उडावे म्हणून त्याने पावले मोजण्याचा प्रयत्न केला, पण पाचशेपर्यंत मोजल्यानंतर त्याचा आकडा चुकला व पुढे तर जळत्या, ठणकत्या वेदनेशिवाय दुसरा कुठलाच विचार त्याच्या मनामध्ये येईना. तरीही त्याने ती हजार पावले पूर्ण केली. खाली बसण्याचे त्राण न राहिल्याने तो बर्फात पालथा पडला. आधाशीपणे त्याने बर्फ चाटला, आपले तापलेले कपाळ त्याने बर्फावर दाबले. त्या हिमस्पर्शाचा आनंद केवळ अवर्णनीय होता.

तो शहारला आणि त्याने घड्याळाकडे पाहिले. ठरवून दिलेल्या पाच मिनिटांच्या शेवटच्या सेकंदांवरून सेकंद काटा पुढे सरकत होता. त्या सरकणाऱ्या काट्याकडे त्याने घाबरून पाहिले. जणू काही त्या फेरीच्या अखेरी काहीतरी भयंकर घडण्याची तो अपेक्षा करीत होता. पण ज्या क्षणाला काटा साठ आकड्यावर पोहोचला त्याच क्षणाला मोठ्यांदा विव्हळत अलेक्सेई आपल्या पायांवर उभा झाला व पुढे निघाला.

माध्यान्हीपर्यंत, जेव्हा देवदारांच्या दाट शाखांमधून भेदून येणाऱ्या सूर्यकिरणांनी जंगलच्या निमअंधारात चमचमत्या सुरेख रेषा उजळल्या होत्या, आणि राळेचा व वितळल्या बर्फाचा उग्र दर्प सबंध जंगल भरून टाकीत होता, तेव्हापर्यंत अलेक्सेईने अशा फक्त चार मजला पूर्ण केल्या होत्या. शेवटच्या मजलीच्या अखेरी तो बर्फावर कोसळला तेव्हा अवघ्या हाताच्या अंतरावर असलेल्या एका प्रचंड भोजवृक्षाच्या बुंध्यापर्यंत सरपटत जाण्याचीसुद्धा शक्ती त्याच्या अंगी उरली नव्हती. खूप वेळपर्यंत तो तेथे तसाच मान खाली घालून बसून राहिला. कशाचाही विचार न करता, काहीही न ऐकता आणि न पाहता. पोटातील भुकेची आगसुद्धा त्याला जाणवत नव्हती.

त्याने खोल श्वास घेतला, आपल्या तोंडात बर्फाच्या चार चिमटी टाकल्या आणि देहाला बांधून टाकणाऱ्या ग्लानीला झटकून त्याने आपल्या खिशामधून तो मांसाचा हवाबंद गंजका डबा बाहेर काढला आणि खंजीराने त्याचे झाकण उघडले. थिजलेल्या, बेचव चरबीचा एक तुकडा त्याने आपल्या तोंडात टाकला. त्याला तो गिळण्याची इच्छा होती, पण चरबी तोंडात विरघळली. तात्काळ त्याच्या पोटात एवढी भूक उसळली, की तो डबा बाजूला करणे त्याला अशक्य ठरले. मग काहीतरी गिळायला हवे म्हणून तो बर्फच खाऊ लागला.

पुढे चालायला सुरुवात करण्यापूर्वी त्याने एका सदापर्णी झाडाला तोडून चालण्याच्या दोन काठ्या बनविल्या. ह्या काठ्यांवर भार देत तो चालू लागला, पण दर पावलागणिक चालणे अधिकाधिक अवघड बनत होते.

६

...त्या दाट अरण्यामधील अलेक्सेईच्या पीडादायी वाटचालीच्या तिसऱ्या दिवशी एक अनपेक्षित घटना घडली. तोपर्यंत त्याला एकही मानवी खूण आढळली नव्हती.

सूर्याच्या पहिल्या किरणांबरोबर तो जागा झाला. थंडीमुळे व अंगात ताप भरल्यामुळे त्याचे शरीर कापत होते. आपल्या हवाई पोषाखाच्या खिशात त्याला एक सिगारेट लायटर सापडला. रायफलच्या रिकाम्या काडतूसापासून त्याच्या मेकॅनिकने तो लायटर बनविला होता व स्मरणभेट म्हणून अलेक्सेईला दिला होता. ह्या लायटरची अलेक्सेईला अजीबात आठवण

राहिली नव्हती. अन्यथा त्याने शेकोटी पेटविली असती आणि तशी शेकोटी पेटविणे आवश्यक होते. ज्या सुरूच्या झाडाखाली तो झोपला होता त्या झाडाच्या काही वाळक्या, शेवाळल्या फांद्या त्याने तोडल्या, त्यांच्यावर त्याने देवदाराची टोकदार पाने पसरली व त्यांना आग लावली. भुरकट धुरामधून चटपटत्या, पिवळया ज्वाला उसळल्या. कोरडे, राळयुक्त लाकूड चटकन आणि कडाकडा पेटले. ज्वाला देवदाराच्या टोकदार पानांपर्यंत पोहोचल्या आणि वारा लागताच स्स आवाज करीत अधिक जोराने भड-कल्या.

कडकड आवाज करीत शेकोटी पेटली होती. तिच्यामधून उबदार धग मिळत होती. अलेक्सेई एकदम सुखावला. आपल्या हवाई पोषाखाची वरची साखळी ओढून त्याने शर्टाच्या खिशामधून काही फाटकी-तुटकी पत्रे बाहेर काढली. ती सर्व पत्रे एकाच हस्ताक्षरामधील होती. त्यातील एका पत्रातून, एका सडपातळ मुलीचा फोटो त्याने काढला. फुलाफुलांच्या फ्रॉकमधील ती मुलगी आपले पाय आत ओढून गवतावर बसली होती. त्या फोटोकडे काही वेळ टक लावून तो पहात राहिला. मग त्याने परत सेलोफेन त्या फोटो-भोवती गुंडाळले, फोटो लिफाफ्यात ठेवला. तो लिफाफा क्षणभर त्याने विचारमग्न होऊन तसाच हातात धरला आणि नंतर परत खिशात टाकला.

"काही हरकत नाही, सारं काही ठीक होईल," तो म्हणाला. त्या मुलीला उद्देशून तो हे बोलला अथवा स्वत:ला उद्देशून बोलला, हे सांगणे कठीण आहे. विचारात गढून तो परत म्हणाला: "काही हरकत नाही..."

आता सवयीच्या हालचालीने पायातील बूट त्याने उपसले, वूलन मफ-लरच्या पट्ट्या सोडल्या व आपली पावले बारकाईने तपासली. पावलांना आणखीच सूज चढली होती व अंगठे वेडेवाकडे पसरले होते. फुगलेल्या रबरी पिशव्यांप्रमाणे पाय दिसत होते आणि आदल्या दिवसापेक्षा त्यांना अधिक काळसर रंग चढला होता.

अलेक्सेईने सुस्कारा टाकला, विझत्या आगीकडे निरोपाचा कटाक्ष फेकला व गोठलेल्या हिमावर काठ्या टेकवून त्यांच्यावर भार देत तो मोठ्या कष्टाने उभा राहिला. ओठ चावून धरीत त्याची पुढची वाटचाल सुरू झाली. काहीवेळा तर त्याची जवळ जवळ शुद्ध हरपायची. अरण्यामधील ध्वनींची आता त्याला एवढी सवय झाली होती, की ते त्याला ऐकूच येईनासे झाले होते. पण अचानकपणे दूरवरून मोटारींच्या इंजिनांची घरघर

येत असल्याचे त्याने ऐकले. प्रथम त्याला वाटले की, अशक्तपणामुळे आपल्याला हा आभास होत असावा. पण आता घरघरीचे आवाज अधिक मोठ्याने ऐकू येऊ लागले. ते जर्मन होते हे स्पष्ट होते व ते त्याच्याच दिशेने चालले होते. तात्काळ अलेक्सेईच्या पोटात भीतीचा खड्डा पडला.

पण ह्या भीतीने त्याला ताकद दिली. आपल्या थकलेपणाचा व पायांमधील वेदनांचा त्याला विसर पडला. जंगलरस्त्यापासून तो बाजूला सरला आणि सुरूच्या झाडांच्या दाटीत घुसला. त्या दाटीत सरपटत जाऊन तो बर्फावर खाली पडला. रस्त्यावरून तो दिसणे अवघड होते, तरी त्याला मात्र रस्ता स्पष्ट दिसत होता. माध्यान्हीचा सूर्य एव्हाना सुरूच्या झाडांच्या शेंड्यांच्या टोकदार कुंपणावर आला होता व त्याच्या प्रकाशाने अलेक्सेई-समोरची वाट उजळलेली होती.

आवाज अधिक जवळ आले. जी वाट सोडून आपण आलो आहोत त्या वाटेवर आपल्या पावलांच्या खुणा स्पष्ट उमटल्याची आठवण अलेक्सेईला झाली. पण आता अधिक दूर जाण्याचा प्रयत्न करण्यास उशीर झाला होता. सर्वांत पुढील वाहनाच्या इंजिनाचा आवाज खूप जवळ ऐकू येत होता. अलेक्सेई बर्फालगत आणखी चिकटला. एक चपटी, पाचरीच्या आकाराची, पांढरा रंग दिलेली चिलखती गाडी त्याने फांद्यांमधून पाहिली. झोकांड्या खात, साखळ्यांची खळखळ आवाज करीत, अलेक्सेई रस्त्यावर जेथून बाजूला वळला होता त्या खुणेपाशी ती गाडी येत होती. अलेक्सेईने आपला श्वास रोखून धरला. चिलखती गाडी पुढे सरकली. तिच्या पाठोपाठ हरकामी गाडी होती. तिच्या ड्रायव्हरशेजारी कुणीतरी उंच टोकदार टोपीमधील व्यक्ती बसली होती. त्या व्यक्तीने आपले नाक आपल्या तपकिरी केसाळ कॉलरमध्ये खोल खुपसले होते. तिच्यामागे भुरकट रंगाच्या लष्करी मोठ्या कोटांमधील आणि पोलादी शिरस्त्राणांमधील अनेक मशिनगनधारी सैनिक उंच बाकड्यांवर बसले होते. गाडीच्या गतीबरोबर त्यांना झोके बसत होते. अधिक मोठ्या आकाराची हरकामी गाडी त्या ताफ्याच्या अखेरीस होती. तिचे इंजिन जोराजोराने घरघराट करीत होते व तिची पट्टेरी चाके खळखळत होती. तिच्यामध्ये सुमारे पंधरा जर्मन ओळीने बसले होते.

अलेक्सेई आणखी खाली दबला. वाहने एवढी जवळ आली होती की त्यांच्यामधून बाहेर पडणाऱ्या गरम वाफा त्याच्या चेहऱ्याला झोंबत होत्या. आपल्या मानेवरील केस ताठ झाल्याचे आणि आपल्या स्नायूंचे घट्ट चेंडूमध्ये

रूपांतर झाल्याचे त्याला जाणवले. पण वाहने पुढे गेली, त्यांच्यामधून बाहेर पडलेल्या वाफांचा वास नाहीसा झाला आणि लौकरच इंजिनांचे आवाज अस्पष्ट झाले.

सर्व शांत झाल्यानंतर अलेक्सेई परत रस्त्यावर आला. तेथे वाहनांच्या पट्ट्यांच्या खुणा स्पष्ट उमटल्या होत्या. त्याच खुणांचा माग धरून तो पूर्वेकडे निघाला. त्याच मोजक्या मजली मारीत, तेवढीच ठरीव विश्रांती घेत आणि दिवसाच्या वाटचालीचा अर्धा भाग पूर्ण केल्यानंतर पूर्वीप्रमाणेच ठरीव प्रमाणात खाणे खाऊन तो पुढे चालला होता. पण आता तो जंगलच्या प्राण्याप्रमाणे अत्यंत सावधपणे जात होता. किंचितशी सळसळ होताच त्याचे दक्ष कान टवकारत होते; आसपास जणू एक मोठा आणि धोकादायी पशू दडून बसला आहे याची जाणीव असल्यागत त्याची नजर चौफेर भिरभिरत होती.

तो वैमानिक असल्यामुळे त्याला हवेत लढण्याची सवय झाली होती. जमिनीवर शत्रूला समोर पाहण्याची त्याची ही पहिलीच खेप होती. आता तो शत्रूच्या खुणा पहात चालला होता आणि सूडाच्या समाधानाने हसत होता. शत्रूचा येथील मुक्काम चांगला झालेला दिसत नव्हता. त्याने काबीज केलेल्या भूमीवर त्याला आराम लाभला नव्हता, आतिथ्य मिळाले नव्हते. गेल्या तीन दिवसात मानवी अस्तित्वाचा पुसटही मागमूस न दिसलेल्या ह्या निबिड अरण्यातसुद्धा शत्रूच्या अधिकाऱ्याला एवढ्या कडेकोट बंदोबस्तामध्ये प्रवास करावा लागत होता.

"काही हरकत नाही, सारं काही ठीक होईल!" स्वतःला हुरूप आणण्यासाठी अलेक्सेई म्हणाला. एक एक पाऊल तो पुढे सरकत होता. आपल्या पायांमधील वेदना अधिकाधिक तीव्र होत चालली होती व तो स्वतः शक्ती गमावीत चालला होता, हे विसरण्याचा त्याचा प्रयत्न चालला होता. सुरूच्या झाडाची कोवळी साल चघळून गिळली तरी आता त्याच्या पोटाची भूक भागेनाशी झाली होती. भोजाच्या कडवट कळ्या भूक शमवीत नव्हत्या. तोंडात च्युईंग गमप्रमाणे ताणली जाणारी कोवळ्या लिंबोणीच्या झाडाची नाजुक व चिकट साल खाऊन इतःपर तो आपल्या जठराग्नीला फसवू शकत नव्हता.

अंधार पडेपर्यंत त्याने जेमतेम पाच मजली पार पाडल्या होत्या. रात्रीच्या वेळी, जमिनीवर अर्धवट कुजून पडलेल्या एका प्रचंड भोजाच्या झाडाच्या

बुंध्याभोवती देवदाराच्या डहाळयांचा व कोरडया झाडोऱ्याचा एक मोठा ढीग त्याने रचला आणि टोलेजंग शेकोटी पेटविली. हा झाडाचा बुंधा जेव्हा मंदपणे धुमसत, पेटत होता तेव्हा त्याच्या सुखद ऊबेमध्ये अलेक्सेईने भुईवर मस्त ताणून दिली. जिवंत ऊबेची त्याला रात्रभर जाणीव राहिली. अंतःप्रेरणेने तो अधूनमधून जागा होई, ओंडक्याच्या कडांना चाटणाऱ्या विझत जाणाऱ्या ज्वालांना पुन्हा पेटते राखण्यासाठी खुरटा झाडोरा आगीत टाकी.

मध्यरात्रीला हिमवादळ सुरू झाले. डोक्यावरील देवदाराची झाडे मोठ-मोठे झोके घेत होती, सळसळत होती, भीतीदायकरीत्या कडकड आवाज करीत कण्हत होती. बोचऱ्या हिमाचे ढग जमिनीवर सरपटत जात होते. धुमसत्या, चमकत्या आगीभोवती सळसळता अंधार भिरभिरत होता. पण हिमवादळाचा अलेक्सेईवर मुळीच परिणाम झाला नाही. त्या आगीच्या ऊबे-मध्ये तो अगदी निश्चित आणि निवांत झोपेत गुरफटला होता. शेकोटीच्या जाळाने त्याचे जंगलच्या श्वापदांपासून रक्षण केले. आणि अशा रात्री जर्म-नांची भीती बाळगण्याचे मुळीच कारण नव्हते. हिमवादळ चालू असताना दाट जंगलात घुसण्याची त्यांच्यात हिंमत नव्हती. असे असले तरी, धुरकट ऊबेमध्ये त्याचे थकले शरीर विश्रांती घेत होते तेव्हा जंगलनिवासींच्या धोक्याच्या इशाऱ्यांना सरावलेले त्याचे कान मात्र सावधपणे प्रत्येक आवाज टिपत होते. पहाटेच्या जरा आधी, जेव्हा हिमवादळ शमले होते आणि आता शांत झालेल्या भूमीवर पांढरे दाट धुके ओठंगले होते, तेव्हा अलेक्सेईला वाटले की, सळसळणाऱ्या देवदारांच्या व भुळूभुळू सांडणाऱ्या हिमकणांच्या आवाजापलिकडे त्याने दूरवर चाललेल्या लढाईचे आवाज ऐकले. स्फोटांचे, मशिनगनच्या फैरींचे आणि रायफलींच्या बारांचे आवाज ऐकू येत होते.

"युद्धआघाडी एवढी जवळ असू शकेल? एवढ्या लौकर?"

७

सकाळी वाऱ्याने धुके उधळून लावले होते, रात्रीमध्ये जंगल रुपेरी बनले होते. सूर्यप्रकाशात ते चकचकीत आणि थिजलेले दिसत होते. आणि ह्या अचानक बदलाचा जणू आनंद व्यक्त करण्यासाठी पक्षीगण किलबिलत

होते, वसंताच्या चाहुलीचे गाणी गाऊन स्वागत करीत होते. अशा वेळी खूप कान टवकारूनही अलेक्सेईला लढाईचे आवाज ऐकू येत नव्हते. ना रायफलीचे बार ना तोफखान्याचा गडगडाट.

उन्हामध्ये स्फटिकासारखे चमचमणारे हिमकण झाडांवरून टपटप खाली पडत होते. त्यांच्या पांढऱ्या, धुरकट धारा वाहात होत्या. अधूनमधून वाफेच्या पाण्याचे जड जड थेंब टपकन आवाज करीत हिमावर कोसळत होते. वसंत आला होता! आपले आगमन एवढ्या जोरदारपणे आणि ठामपणे त्याने प्रथमच घोषित केले होते.

डब्यात शिल्लक राहिलेल्या मांसाचे चरबीयुक्त थराचे किरकोळ अवशेष सकाळीच खाण्याचा निर्णय अलेक्सेईने घेतला. कारण तसे केले नाही तर उठण्याचीही ताकद अंगी येणार नाही असे त्याला वाटले. आपल्या तर्जनीने त्याने डबा खरवडून चाटूनपुसून खाल्ला. डब्याच्या कातरलेल्या कडांवर त्याच्या हाताला काही ठिकाणी कापले. एवढे करूनही डब्यात आणखी काही चरबी उरली होती असे त्याला वाटत राहिले. त्याने डब्यात बर्फ भरला. विझणाऱ्या शेकोटीवरील पांढरी राख झटकली आणि धगधगत्या निखाऱ्यांवर डबा ठेवला. नंतर ते किंचित मांसाच्या वासाचे गरम पाणी मोठ्या चवीने घुटके घेत तो प्यायला. हे काम संपल्यानंतर तो डबा त्याने आपल्या खिशात टाकला. चहा करण्यासाठी त्या डब्याचा तो उपयोग करणार होता. गरम चहा प्यायचा! हा मोठा सुखद शोध होता आणि पुन्हा वाटचाल सुरू करताना ह्या विचाराने त्याला थोडा हुरूप चढला.

पण एक नवी निराशा त्याची वाट पहात होती. हिमवादळाने रस्ता पुसून टाकला होता व सगळीकडे उतरत्या हिमखंडांचे अडथळे पडले होते. सतत एकसारख्या निळसर तिरपीमुळे अलेक्सेईच्या डोळ्यांना अंधेरी येत होती. अद्याप न थिजलेल्या, भुसभुशीत बर्फात त्याचे पाय खोल रुतत होते आणि मोठ्या कष्टाने तो त्यातून पाऊल उचलत होता. त्याच्या काठ्याही त्याला फारशी मदत करीत नव्हत्या, कारण त्यासुद्धा बर्फात खोल बुडत होत्या.

माध्यान्हीला झाडांखालील सावल्या जेव्हा काळ्या बनल्या आणि सूर्य झाडांच्या माथ्यांवर आला, त्या दरम्यान अलेक्सेईने जेमतेम पंधराशे पावलांचे अंतर कापले होते. तो एवढा थकला होता की, प्रत्येक पुढचे पाऊल टाकताना त्याला विलक्षण निर्धार करावा लागत होता. त्याला घेरी येत

होती. त्याच्या पावलांखालील जमीन निसटत होती. वारंवार तो खाली पडत होता, वर्फखंडावर क्षणभर निपचित पडून रहात होता; मग चुर-चुरीत बर्फावर कपाळ दाबून उठत होता आणि आणखी काही पावले चालत होता. झोपावे, निपचित पडावे आणि सर्व काही विसरून जावे, एकही स्नायू हलवू नये, अशी त्याला तीव्र इच्छा होत होती. त्याला कशाचीही पर्वा वाटेनाशी झाली होती. तो थांबे. झोकांड्या खात बधीरपणे उभा राही. मग वेदना होईपर्यंत आपले ओठ तो चावी आणि अंगी शक्ती गोळा करून काही पावले तो चाले. आपली पावले आपल्या शरीराबरोबर ओढायला त्याला फार कष्ट पडत.

सरतेशेवटी त्याला जाणवले की, त्यापुढे जाणे त्याला शक्य नव्हते; पृथ्वीवरील कोणतीही शक्ती त्याला त्या जागेपासून पुढे सरकवू शकत नव्हती; आत्ता जर तो खाली बसला तर पुन्हा कधीही उठून उभा राहू शकणार नव्हता. आपल्याभोवती त्याने आसावल्या नजरेने कटाक्ष टाकला. रस्त्याच्या कडेला एक कोवळा, वळसेदार देवदार उभा होता. आपल्या शक्तीचा शेवटचा औंस गोळा करून अलेक्सेईने त्या झाडाकडे पाऊल टाकले व त्यावर आपले शरीर झोकून दिले. फांद्यांच्या फाटयावर त्याची हनुवटी टेकली. त्याच्या मोडलेल्या पायांवरील काही बोजा त्यामुळे कमी झाला व त्याला थोडे बरे वाटले. लवचिक फांद्यांवर झुकून त्या अवस्थेत विश्रांतीचा आनंद त्याने उपभोगला. झाडाच्या फांद्यांच्या फाटयामध्ये आपली हनुवटी तशीच ठेवून, अधिक आराम मिळविण्याच्या उद्देशाने त्याने प्रथम एक पाय सरळ केला व नंतर दुसराही पाय ताणला. आता त्याच्या शरीराचे त्याच्या पायांवरील वजन संपूर्ण नाहीसे झाले व बर्फामधून आपली पावले तो सहज वर उचलू शकला. एक विलक्षण नामी कल्पना त्याच्या डोक्यात चमकली.

"खरंच की! हे छोटं झाड तोडणं अगदी सोपं होईल. हा फाटा कायम ठेवून बाकीच्या फांद्या तोडायच्या, दांडा पुढं करून फाट्यावर हनुवटी टेकवायची, अंगाचं सारं वजन त्याच्यावर टाकायचं आणि आत्ता पाय पुढं टाकतो तसे पाय पुढं टाकायचे. अशी चाल खूप सावकाश होईल. पण सावकाश चाल झाली तरी मी एवढा दमणार नाही आणि जमिनीवरचं बर्फ घट्ट व्हायची वाट न पाहता मी पुढं सरकू शकेन!"

आपल्या गुडघ्यांवर बसून त्याने आपल्या खंजीराने ते कोवळे झाड तोडले, त्याच्या फांद्या छाटून टाकल्या; त्या कुबडीभोवती आपला रुमाल व बँडे-

जांचे कापड त्याने गुंडाळले व तात्काळ तो निघाला. झाडाचा दांडा तो पुढे टाकायचा, फाट्यावर हात व हनुवटी टेकायचा, प्रथम एक पाय पुढे ठेवायचा, नंतर दुसरा पाय पुढे टाकायचा. पुन्हा दांडा पुढे टाकायचा व दोन पावले पुढे सरकायचा. अशा रीतीने त्याची वाटचाल सुरू झाली. पावाले मोजत त्याने आपल्यासाठी प्रगतीचा नवा वेग निश्चित केला.

अशा चमत्कारीक रीतीने घनदाट अरण्यामधून माणूस गोगलगायीच्या गतीने बर्फावरून फिरताना पाहणे तिऱ्हाईताला विचित्र वाटले असते यात काही शंका नाही. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत अलेक्सेई जेमतेम पाच किलोमीटर अंतर काटत होता. ह्या त्याच्या वाटचालीला फक्त नीलकण्ठ पक्षी साक्षी होते. ह्या विचित्र, तीन पायांच्या गबाळ्या प्राण्याचा संपूर्ण निरुपद्रवीपणा त्यांना खात्रीपूर्वक पटल्यामुळे, हा प्राणी जवळ आला तरी ते पक्षी उडून दूर जात नव्हते. उलट नाखुषीने त्याच्या वाटेमधून उड्या मारीत बाजूला होत, आपल्या माना पुढे काढीत व आपल्या काळया, चौकस, मण्यांसारख्या डोळयांनी उपहासपूर्वक त्याच्याकडे टक लावून पहात.

८

अशा रीतीने त्या फाटा असलेल्या काठीच्या साहाय्याने बर्फमाखल्या रस्त्यावरून उड्या मारीत, लंगडत तो दोन दिवस चालला होता, एव्हाना त्याचे पाय चांगलेच बधीर झाले होते आणि त्यांना काहीही संवेदना जाणवत नव्हती. पण दर पावलागणिक त्याच्या शरीरात मात्र वेदनांचे झटके येत होते. आता भुकेच्या यातनांनी त्याचे कळवळणे थांबले. त्याच्या पोटात येणाऱ्या आकड्या आणि चरचर कापणाऱ्या वेदना यांच्या जागी आता सतत मंद ठणक बसली. जणू त्याचे रिकामे पोट कठीण बनले होते व त्याच्या पाठीशी आतल्या बाजूला वळून चिकटून बसले होते.

आपल्या विश्रांतीच्या वेळांमध्ये अलेक्सेई आपल्या खंजीराने कोवळया देवदारांच्या साली ओरबाडून खात होता. भोजाच्या आणि लिंबोणीच्या कळया खात होता. तसेच बर्फाखालचे मऊ, हिरवे शेवाळे खणून काढीत होता व रात्रीच्या वेळी आपल्या उघड्यावरील मुक्कामांमध्ये पाण्यात शिजवून ते शेवाळे तो खात होता. जमिनीच्या बर्फ वितळलेल्या पट्ट्यांवर तो बिलबेरीची पाने गोळा करीत होता. त्या पानांना उकळून "चहा" पिणे

हा त्याचा एक आनंद होता. तो गरम द्रव त्याच्या सबंध शरीरात एक उबदार धग आणि काही प्रमाणात तृप्तीचा आभासही निर्माण करी. धुराचा आणि पानांचा वास येणारे ते गरम मिश्रण घुटके घेत प्यायले म्हणजे त्याला शांत वाटे. आपला प्रवास त्याला तेवढा अनंत आणि भयानक वाटेनासा होई.

आपल्या सहाव्या मुक्कामात तो पुन्हा एकदा विशाल पसरलेल्या सुरूच्या झाडाच्या हिरव्या तंबूखाली पहुडला. एका जुन्या, चिकाळ झाडाच्या खुंटा-भोवती त्याने शेकोटी पेटविली. तो खुंट धुमसत राहील आणि सबंध रात्र उष्णता देईल असा त्याचा अंदाज होता. अजून उजेड होता. सुरूच्या अगदी शेंडचालगतच्या फांद्यांवर एक अदृश्य खार उद्योगात गढलेली होती. सुरूची शंकूसारखी कठीण फळे सोलून ती रिकामी टरफले जमिनीवर टाकीत होती. अलेक्सेईचे मन आता सतत खाण्यावर एकवटलेले असल्यामुळे, त्या खारीला शंकूदार फळांमध्ये काय सापडते याचे तो नवल करीत होता. त्याने एक फळ उचलले, त्याची खवलेदार साल काढली आणि आत त्याला बाजरीच्या दाण्याएवढ्या आकाराची दुपंखी बी मिळाली. त्याने ती बी तोंडात टाकली व दातांमध्ये चिरडली. सेदारच्या तेलाची मधुर चव त्याला जाणवली.

भोवताली पडलेली सुरूची आणखी काही फळे त्याने गोळा केली, आगीत आणखी थोडा झाडोरा टाकला व त्या धगीवर ती फळे धरली. उष्णतेने जेव्हा त्या फळांची कवचे फुटली तेव्हा त्याने बिया आपल्या हातां-मध्ये चोळल्या, त्यांची पंखदार टरफले फुंकून उडविली आणि छोटे दाणे तोंडात टाकले.

जंगलात मंद आवाज घुमत होते. चिकाळ खुंट धुमसत होता व त्यातून हलकासा सुवासिक धूर उमटत होता. अलेक्सेईला धूपाची आठवण झाली. छोटया ज्वाला फडफडत होत्या. मध्येच त्या भडकायच्या तर मध्येच मलूल पडायच्या. त्यामुळे सोनेरी देवदारांचे आणि रुपेरी भोजांचे बुंधे प्रकाशाच्या वर्तुळात चमकायचे व परत गुणगुणत्या अंधारात नाहीसे व्हायचे.

अलेक्सेईने आगीत आणखी थोडया काटक्या टाकल्या आणि आणखी थोडी फळे सोलली. सेदारच्या तेलाच्या वासाने त्याला लहानपणीचा एक खूप पूर्वी विसरून गेलेला प्रसंग आठवला... परिचित वस्तूंनी दाटलेली एक छोटी खोली. छताला टांगलेल्या दिव्याखालचे टेबल. सणासुदीचा

पोषाख केलेली त्याची आई चर्चमधील संध्याकाळच्या प्रार्थनेनंतर नुकतीच परतलेली. तिने कपाटामधून कागदी पिशवी काढली व शेंगांचे दाणे एका भांड्यात ओतले. सारे कुटुंब टेबलाभोवती बसले – आई, आजी, त्याचे दोन भाऊ आणि तो स्वतः, सर्वांत धाकटा – व दाणे सोलून खाण्याची सणाची चैन सुरू झाली. कुणीही चकार शब्द उच्चारला नाही. आजी आपल्या केसामधील पिनच्या मदतीने कवचांमधील गर काढीत होती. आई-सुद्धा तेच करीत होती. अत्यंत कसबाने ती दातांमध्ये कवचे फोडीत होती, आतील गर काढीत होती व टेबलावर मध्यभागी गोळा करीत होती. जेव्हा ढीग बराच मोठा जमला तेव्हा तिने हाताच्या तळव्यावर ते गर घेतले आणि एका मुलाच्या उघड्या तोंडात घातले. त्या सुदैवी मुलाच्या ओठांना तिचा हाताचा स्पर्श जाणवला. तो खरबरीत, कष्टांनी शिणलेला हात होता. पण सण असल्यामुळे त्याला सुगंधी साबणाचा वास येत होता.

कामीशीन... बालपण! गावाच्या वेशीपाशी उभ्या असलेल्या त्या छोट्या घरात राहणे खूप सुखाचे होते! .. पण इथे, जंगलच्या आवाजां-मध्ये, तुमचा चेहरा भाजून निघतोय, तर चावरी थंडी पाठीला झोंबतेय. अंधारात घुबडाचे घूत्कार चालू आहेत. कोल्हेकुई ऐकू येतेय. विझत चाल-लेल्या निखाऱ्यांपाशी एक भुकेला, जखमी व शरीराने शिणलेला माणूस ह्या घनदाट अरण्यात अगदी एकटा, अंगाची मुटकुळी करून विचार करीत बसलाय. त्याच्यापुढे अंधारात एक अज्ञात रस्ता पसरलाय... अनपेक्षित धोक्यांनी आणि संकटांनी परिपूर्ण भरलेला.

"काही हरकत नाही, सारं काही ठीक होईल!" तो माणूस अचानक उद्‌गारला. कसल्यातरी दूरच्या विचारामुळे त्याच्या तडकलेल्या ओठांवर उमटलेले स्मित आगीच्या शेवटच्या लाल शलाकेत एखाद्याला दिसले असते.

९

हिमवादळाच्या रात्री दूरच्या लढाईचे आवाज कोठून येत होते ते अलेक्सेईला सातव्या दिवशी समजले.

तो कमालीचा थकला होता. विश्रांती घेण्यासाठी दर क्षणाला थांबत होता. बर्फ वितळत चाललेल्या जंगलवाटेवरून तो स्वतःला कसाबसा ढकलत नेत होता. आता वसंताचे स्मित दुरून दिसत नव्हते, तर ह्या निबिड अरण्यात

उबदार, जोरदार वाऱ्यांबरोबर त्याचे साक्षात आगमन झाले होते. तेजस्वी सूर्यकिरण फांद्यांना भेदून टेकाडांवरील बर्फाला स्पर्श करीत होते, सायंकाळी डोंबकावळ्यांची करुण ओरड सुरू झाली होती, रस्त्यांवरच्या आता तपकिरी दिसणाऱ्या टेंगळांवर पक्षी बागडत होते, वितळणाऱ्या बर्फा-मुळे खड्ड्यांमध्ये डबकी निर्माण झाली होती आणि त्या उग्र, उन्मादक वासामुळे प्रत्येक सजीव गोष्ट आनंदाने बेभान होत होती.

वर्षाचा हा काळ अलेक्सेईला आपल्या लहानपणापासून आवडत होता. आणि आताही जरी तो भिजलेल्या केसाळ बुटांमधले आपले दुखरे पाय डबक्यांमधून फरफटत चालला होता, भुकेला होता, वेदनेमुळे आणि थकव्या-मुळे घेरी येऊन पडत होता, डबक्यांना, पाणचट बर्फाला आणि सुरुवातीच्या चिखलाला शिव्याशाप घालीत होता, तरी वसंताचा ओलसर उन्मादक सुगंध तो हपापलेपणाने हुंगत होता. आता डबक्यांमधून वाट काढणे त्याने थांबविले. तो ठेचकाळत होता, खाली पडत होता, उठत होता, आपल्या काठीवर सारा भार टाकीत होता, झोकांड्या खात होता व पुन्हा ताकद एकवटत होता, मग शक्य तितक्या पुढे काठी टाकीत होता व सावकाश गतीने पूर्वेच्या दिशेने जात राहिला होता.

जंगलची वाट जेथे एकदम डावीकडे वळत होती तेथे तो अचानक खिळून उभा राहिला. रस्ता जेथे अगदी अरुंद झाला होता व दोन्ही बाजूंनी कोवळ्या देवदारांची खूप दाटी होती अशा स्थळी त्याने जर्मन मोटारी पाहिल्या. काही दिवसांपूर्वी हीच वाहने त्याला दिसली होती. दोन प्रचंड देवदारांनी त्यांचा रस्ता अडविला होता. ह्या झाडांना चिकटूनच ती पाचरीच्या आका-राची चिलखती गाडी उभी होती. आता तिचा रंग पांढऱ्या पट्ट्यांचा राहिला नव्हता, तर गंजका लाल झाला होता. तिचे टायर जळून गेल्यामुळे चाकांच्या थाळ्यांवर ती खाली उभी होती. तिचे छप्पर बर्फावर झाडाखाली पडले होते व प्रचंड अळंबीसारखे दिसत होते. चिलखती गाडीशेजारी तीन प्रेते पडली होती. त्या लोकांच्या अंगात आखूड, काळे, मेणचट सदरे होते व कापडी शिरस्त्राणे होती.

दोन सर्वसंचारी गाड्यासुद्धा गंजक्या तांबूस रंगाच्या बनल्या होत्या. त्या जळून खाक झाल्या होत्या. त्यांचे सांगाडे चिलखती गाडीच्या मागेच वितळत्या बर्फात उभे होते. वाफा, राख आणि जळके लाकूड यांमुळे तो बर्फ काळसर झाला होता. रस्त्याच्या कडेला, झुडुपांमध्ये, खड्ड्यांमध्ये,

सर्वत्र जर्मन सैनिकांची प्रेते पडली होती. घाबरून ते पळाले होते, दर झाडामागून, दर झुडुपामागून मृत्यूने त्यांच्यावर प्रहार केला होता हे स्पष्ट दिसत होते. हिमवादळाने मृत्यूला हिमाच्या पडद्यामागे झाकले होते आणि काय घडत होते याची जाणीव न होताच ते सैनिक मेले होते. अधिकाऱ्याने विजारविहीन शरीर झाडाला बांधलेले होते. गडद काळ्या कॉलरच्या त्याच्या हिरव्या सदऱ्याला टाचणीने कागदाचा एक कपटा खोचलेला होता व त्यावर लिहिले होते: "ज्यासाठी तू आलास ते तुला मिळालं" आणि ह्या अक्षरांखाली दुसऱ्या हस्ताक्षरात पेन्सिलीने खरडले होते – "कुत्र्या!"

काहीतरी खायला मिळते का ते पाहण्यासाठी अलेक्सेईने लढाईचे हे स्थळ धुंडाळले. पण त्याला फक्त शिळ्या पावाचा तुकडा मिळाला. बर्फात तो तुडविला गेला होता व पाखरांनी त्याला चोची मारलेल्या होत्या. तात्काळ त्याने तो तुकडा तोंडात घातला आणि रायच्या पावाचा आंबूस वास हावरेपणाने हुंगला. तो संपूर्ण तुकडा तोंडात टाकावा व सुगंधी, लिबलिबीत पाव खूप खूप चघळावा असे त्याला वाटले. पण ती इच्छा त्याने दाबली आणि पावाचे तीन तुकडे केले; दोन तुकडे त्याने मांडीवरच्या खिशात खोलवर सरकवले व तिसऱ्याचे बारीक बारीक तुकडे बनवून प्रत्येक तुकडा मिठाईप्रमाणे चोखायला सुरुवात केली. त्यापासून जास्तीत जास्त सुख घेण्याचा त्याचा प्रयत्न चालला होता.

पुन्हा एकदा तो लढाईच्या स्थळी गेला आणि त्याला एक कल्पना सुचली: "आसपास कुठेतरी पार्तीझान* असले पाहिजेत. झुडुपांमधला आणि झाडांभोवतालचा पाणथळ बर्फ त्यांनी तुडविला असणार!" कदाचित त्यांनी त्याला एव्हाना प्रेतांमधून भटकताना पाहिले असेल आणि सुरूच्या झाडाच्या शेंड्यावरून अथवा एखाद्या झुडुपामागून एखादा पार्तीझान टेहळ्या त्याला पहात असेल? अलेक्सेईने आपल्या तोंडाभोवती हातांचे पंजे गोल धरले आणि सर्व शक्तीनिशी तो ओरडला:

"ओ ऽ हो! पार्तीझानहो! पार्तीझानहो!"

आपला आवाज एवढा मंद आणि क्षीण उमटला याचे त्याला फार

---

*दुसऱ्या महायुद्धात सोविएत संघात "पार्तीझान" हा शब्द एवढा प्रचलित बनला की, गनिमी सैनिक असा त्याचा अनुवाद करणे इष्ट वाटत नाही. म्हणून मूळ रशियन शब्द तसाच ठेवलाय. –अनु.

आश्चर्य वाटले. त्यापेक्षा जंगलाच्या पोकळीतून झाडांच्या बुंध्यांना आपटून आलेले त्याचे प्रतिध्वनी अधिक मोठे भासले.

"पार्तीझानहो! पा ऽ र्तीझानहो ऽऽ!" तो पुनःपुन्हा हाका मारीत होता. चूप पडलेल्या शत्रूच्या प्रेतांमध्ये काळ्या, तेलकट बर्फावर बसून तो ओरडत होता.

उत्तर ऐकण्यासाठी त्याने कान टवकारले. त्याचा आवाज घोगरा बनला होता आणि फाटत होता. आता त्याला जाणवले की, आपली कामगिरी आटोपून व विजयचिन्हे गोळा करून पार्तीझान केव्हाच तेथून निघून गेले होते. ह्या निर्जन जंगलात राहून खरेच त्यांना काय उपयोग होता? पण तरीही तो हाका मारीत राहिला. काही चमत्कार घडेल अशी त्याला आशा वाटत होती. ज्या पार्तीझानांबद्दल त्याने खूप ऐकले होते. ती दाढीवाली माणसे अचानक झुडुपांमागून येऊन त्याच्यासमोर उभी ठाकतील, त्याला आपल्या सांगाती घेऊन जातील आणि कोणतीही चिंता न करता बिनधास्तपणे तो एक दिवस किंवा निदान एक तास तरी विश्रांती घेऊ शकेल, अशी त्याला आशा वाटत होती.

फक्त अरण्यातील घुमणाऱ्या प्रतिध्वनींनी उत्तर दिले. पण देवदारांच्या गहन मधुर गुंजारवापेक्षा अधिक मोठ्या आवाजात बसके आणि वेगवान असे थाड थाड ध्वनी त्याला ऐकू आले. ज्या एकतानतेने तो कान लावून बसला होता त्या परिस्थितीत निदान त्याला तसे ध्वनी ऐकल्याचा भास झाला. कधी ते धूम् धडाड आवाज स्पष्ट ऐकू येत, तर कधी अगदी अस्पष्ट. ह्या निर्मनुष्य जंगलामध्ये जणू दुरून कुणी मैत्रीची साद घातलेली ऐकू यावी तसा तो दचकला. आपल्या कानांवर त्याचा विश्वास बसेना. आपली मान लांबवून खूप वेळपर्यंत तो कानात जीव आणून ऐकत राहिला.

नाही! त्याची चूक झाली नव्हती! पूर्वेकडून दमट वारा वाहात होता आणि आपल्याबरोबर तोफखान्याच्या गडगडाटाचे दूरचे आवाज तो वारा वाहून आणीत होता. गेल्या काही महिन्यात जेव्हा उभय पक्ष आपापल्या मोर्चांमध्ये भक्कम बंदोबस्तात बसले होते व केवळ एकमेकांना सतावण्यासाठी अधूनमधून तोफा उडवीत होते तेव्हा जसे आवाज त्याने ऐकले होते तसे हे आवाज नव्हते. ही गोलंदाजी वेगात आणि तीव्रपणे चालू होती. जणू कुणी फरसबंदी दगडांची गाडी भडाभडा ओतत होते,

अथवा ओकच्या लाकडाच्या उलटचा पिंपाच्या तळावर दणादणा बुक्क्या मारीत होते, असा हे आवाज ऐकून भास होत होता.

अर्थात! ते तोफांचे तुंबळ द्वंद्व युद्ध चालू होते. आवाजांवरून तर्क करता युद्धआघाडी कुठेतरी दहा किलोमीटर अंतरावर होती. काहीतरी गंभीर प्रकार तेथे घडत होता. कुणीतरी निकराचा हल्ला चढवीत होते आणि कुणीतरी तेवढ्याच निकराने प्रतिकार करीत होते. अलेक्सेईच्या गालां-वरून आनंदाचे अश्रू ओघळले.

त्याने आपली नजर सतत पूर्वेकडे वळविली होती. मात्र आत्ता ज्या स्थळी तो उभा होता तेथून रस्ता एकदम विरुद्ध दिशेला वळला होता आणि त्याच्या पुढ्यात हिमाचा गालीचा पसरला होता. पण ते आवाहक आवाज त्याला पूर्वेकडून ऐकू आले होते. पार्तीझानांचे काळपट ठसे त्या दिशेला गेलेले होते. त्या जंगलापलिकडे कुठेतरी ही जंगलची शूर माणसे रहात होती.

अलेक्सेई स्वतःशी पुटपुटला: "काही हरकत नाही बंधूंनो, सारं काही ठीक होईल!" त्याने जोमाने काठी पुढे टाकली, तिच्यावर आपली हनुवटी टेकविली आणि तिच्यावर आपला सारा भार टाकून त्याने बर्फात एक पाय टाकला, मग दुसरे पाऊल टाकले व रस्त्यापासून तो वळला. तो मोठ्या कष्टाने, पण निर्धाराने पुढे जात होता.

१०

त्या दिवशी तो बर्फावरून धड दीडशे पावलेसुद्धा पुढे जाऊ शकला नव्हता. संध्याकाळ झाल्यामुळे थांबणे त्याला भाग पडले. पुन्हा त्याने जुन्या झाडाचा एक खुंट शोधून काढला, त्याच्या भोवती वाळक्या काटक्यांचा ढीग गोळा केला, आपला काडतूसापासून बनविलेला लायटर बाहेर काढला आणि त्याच्या छोटया पोलादी चाकाला त्याने एक झटका दिला. पुन्हा एकदा त्याने लायटरचे चाक झटकले आणि एकदम त्याच्या अंगातून थंड शहारा गेला—लायटरमधील इंधन संपले होते! त्याने तो लायटर हलविला, त्याच्यात फुंकरी मारल्या, पण व्यर्थ. रात्र पडली. लायटरच्या गारगोटीच्या खड्यामधून उडणाऱ्या स्फुल्लिंगांनी त्याच्या चेहऱ्याभोवतालचा अंधार क्षणा-पुरता दुभंगत होता. गारगोटीचा खडा पूर्ण झिजेपर्यंत तो लायटरचे चाक फिरवीत राहिला. पण आग पेटविण्यात त्याला यश आले नाही.

शेवटी कोवळ्या देवदारांच्या दाटीत चाचपडत, वाट काढीत जाऊन बसणे त्याला भाग पडले. आपल्या गुडघ्यांवर हनुवटी टेकवून आणि गुडघ्यां-भोवती हातांचा विळखा घालून, अंगाची मुटकुळी करून जंगलामधील सळसळ ऐकत तो मुकाट बसून राहिला. त्या रात्री तो निराशेने पुरता खचून गेला असता, पण त्या निद्रिस्त जंगलात तोफांचे आवाज अधिकच ठळकपणे ऐकू येत होते. गोळीबाराचे आवाज आणि तोफगोळ्यांचे प्रदीर्घ स्फोट यांच्यामधील स्पष्ट फरक आपल्याला समजू शकतोय असे त्याला भासत होते.

सकाळी तो जागा झाला तेव्हा भीती आणि दु:खाच्या भावनांनी त्याला पुरते ग्रासले होते. तात्काळ त्याने स्वत:ला प्रश्न केला: "काय होते ते? वाईट स्वप्न?" त्याला आठवले: सिगरेट लायटर. सूर्याच्या प्रेमळ किरणांनी त्याला ऊब आली. भोवतालचा पाणथळ बर्फ, झाडांचे बुंधे, देवदाराची टोकदार पाने ह्या सर्व गोष्टी पाहून त्याला थोडे बरे वाटले. त्याच्यावर कोसळलेल्या संकटाची त्याला तेवढी गंभीरता वाटेनाशी झाली. पण त्याहूनही वाईट गोष्ट घडली. आपली पायांभोवतालची हातांची बधीर मिठी त्याने सोडली व त्याला आढळले की, त्याला उठून उभे राहता येत नव्हते. उठण्याच्या अनेक प्रयत्नांमध्ये शेवटी त्याची काठी तुटली व एखाद्या भरलेल्या गोणीसारखा धप्पदिशी तो जमिनीवर आदळला. आपल्या सुज-लेल्या अवयवांना विश्रांती देण्यासाठी तो लोळत पाठीवर उताणा झाला. देवदारांच्या शाखांमधून त्याने अनंत निळ्या आकाशाकडे नजर टाकली. कुरळ्या सोनेरी कडांचे पांढरे मऊ मऊ ढग वेगाने पळत होते. हळूहळू त्याचे शरीर ठिकाणावर आले, पण त्याच्या पायांना मात्र काहीतरी झाले होते. क्षणभरही त्याच्या शरीराचा भार वाहण्याची त्याच्या पायांची तयारी नव्हती. देवदाराच्या झाडाचा आधार घेऊन वर उठण्याचा त्याने आणखी एकदा प्रयत्न केला. शेवटी वर उठण्यात त्याला यश आले. पण झाडापाशी आपले पाय आणण्याचा त्याने प्रयत्न करताच तो थकव्यामुळे खाली कोसळला. त्याच्या पायात एक भयानक, नवी कळ उमटली.

ही अखेर होती काय? ह्या देवदारांखाली त्याचा नाश होणार होता काय? त्याचा मागमूस कुणाला समजणार नव्हता, त्याचे दफन कुणी करणार नव्हते आणि जंगलातील पशूंकडून त्याच्या देहाची विल्हेवाट लागणार होती काय? आत्यंतिक थकव्यामुळे तो भुईला खिळला होता. पण दूरवर तोफा

गडगडल्या. तेथे लढाई चालू होती आणि त्याची स्वतःची माणसे तेथे होती. हे शेवटचे आठ किंवा दहा किलोमीटर अंतर पार करण्यासाठी ताकद एकवटण्यास तो असमर्थ ठरणार होता काय?

तोफांच्या गडगडाटाने त्याच्यात नवे धैर्य आणले. तो गडगडाट त्याला संतत हाका मारीत होता आणि त्याने त्या हाकांना ओ दिली. दूरवरच्या लढाईच्या आवाजांनी भारून जाऊन अंत:प्रेरणेने तो एखाद्या जनावराप्रमाणे आपल्या हाता-पायांवर पुढे सरकला. मग त्याच्या लक्षात आले की, काठीचा आधार घेऊन लंगडत चालण्यापेक्षा असे हाता-पायांवर जनावराप्रमाणे जाणे अधिक सुलभ होते. आता शरीराचे ओझे पडत नसल्यामुळे त्याच्या पायांच्या वेदना कमी झाल्या. आपल्या हाता-पायांवर तो अधिक वेगाने पुढे सरकू शकत होता. आत्यंतिक आनंदापायी गळा दाटून आल्याची भावना पुन्हा एकदा त्याने अनुभवली. जणू काही कुणा अतिनिराश झालेल्या आणि अशा अतर्क्य पद्धतीने पुढे जाण्याबद्दल संशय व्यक्त करणाऱ्या माणसाला उत्तेजन द्यावे तशा थाटात तो मोठ्यांदा म्हणाला:

"काही हरकत नाही बेटा, आता सारं काही ठीक होईल!"

आपली अशी एक मजल पूर्ण केल्यानंतर अलेक्सेईने आपले गोठलेले हात काखांमध्ये धरले व त्यांना ऊब आणली. मग एका कोवळ्या देवदारापाशी तो सरपटत गेला. त्या झाडाच्या सालीचे त्याने दोन चौकोनी तुकडे कापून काढले. मग बुंध्यापासून सालीच्या अनेक लांब पट्ट्या हातांनी ओरबाडून काढल्या. ह्या उद्योगात त्याच्या हातांची नखे कुरतडली गेली. नंतर त्याने केसाळ बुटांच्या आत गुंडाळलेले वूलन मफलरचे तुकडे सोडविले आणि त्यांना हातांभोवती बांधले. आपल्या पंजावर त्याने सालीचे तुकडे ठेवले, त्यांना बुंध्याच्या सालीच्या पट्ट्यांनी गच्च बांधले व मग सबंध हातावर ड्रेसिंग कापडाचे बँडेज बांधले. अशा रीतीने त्याने आपल्या उजव्या हातावर छान गुबगुबीत हातमोजा बनविला. पण डाव्या हातावर बँडेज बांधण्याचे काम दातांनी करावे लागल्यामुळे डावा हातमोजा तेवढा सुखदायी बनला नाही. तरीही आता त्याच्या हातांना "बूट" मिळाले होते. अलेक्सेई पुढे निघाला. आता त्याची "चाल" खूपच सोपी झाली होती. पुढच्या टप्प्याला त्याने आपल्या गुडघ्यांभोवतीही झाडाच्या साली गुंडाळल्या.

माध्यान्हीच्या दरम्यान वातावरण चांगलेच उबदार झाले होते व आपल्या हातांवर त्याने बरीच "पावले" वाटचाल केली होती. तोफांचे आवाज

जेथून येत होते त्या जागेपासून नजीकच्या अंतरावर तो पोहोचला होता या कारणाने असेल, अथवा ध्वनीच्या एखाद्या आभासामुळे असेल, पण ते तोफांचे आवाज अधिक मोठ्यांदा ऐकू येत होते. आता एवढे गरम होत होते की, अलेक्सेईने आपल्या हवाई पोषाखाची साखळी उघडली होती.

शेवाळयाचा थर बसलेल्या दलदलीच्या प्रदेशावरून तो रांगत चालला होता तेव्हा वितळणाऱ्या बर्फामधून हिरवे पुंजके डोकावताना त्याला दिसले. नशीबाने आणखी एक देणगी त्याच्यासाठी राखून ठेवली होती. त्या पांढुरक्या, मऊ ओलसर शेवाळयावर दुर्मीळ, टोकदार, चकचकीत पानांच्या वनस्पतीचे सुरेख देठ उभे असलेले त्याने पाहिले. त्या वनस्पतीच्या वरच्या बाजूला शेंदरी रंगाच्या, किंचित चिरडलेल्या क्रॅनबेरी होत्या. अलेक्सेईने आपले डोके त्या फळांच्या झुपक्यावर झुकविले व दलदलीचा कुबट वास येणाऱ्या उबदार, मखमाली शेवाळयावरील बेरी आपल्या ओठांनी तोडून खायला सुरुवात केली.

क्रॅनबेरींना मधुर आंबट चव होती. गेल्या काही दिवसांमध्ये प्रथमच अलेक्सेई खाण्यायोग्य असा पदार्थ खात होता. त्यामुळे त्याच्या पोटात कळा आल्या. पण त्या कळा नाहीशा होईपर्यंत वाट पाहण्याइतपत त्याच्या मनाचा धीर उरला नव्हता. ह्या झुपक्यापासून त्या झुपक्यापर्यंत तो एखाद्या अस्वला-सारखा झेपावत होता आणि आपल्या जिभेने व ओठांनी मधुर-आंबट फळे तोडत होता. अशा रीतीने त्याने फळांच्या अनेक झुपक्यांचा फडशा पाडला. त्याच्या ओल्या बुटांमध्ये पाणी शिरत होते, त्याच्या पायांमध्ये जळती वेदना ठणकत होती, त्याला खूप थकवा आला होता – ह्या साऱ्या साऱ्या गोष्टींचा त्याला यावेळी विसर पडला होता. त्याला फक्त तोंडात मधुर-आंबट चव जाणवत होती व पोटात एक आल्हादक जडपण जाणवत होते. त्याला उलटी झाली. पण तरीही, त्याला मोह आवरेना व पुन्हा तो फळे तोडू लागला. त्याने स्वतः बनविलेली "पादत्राणे" आपल्या हातांमधून काढून टाकली व मांसाच्या जुन्या डबड्यात त्याने बेरी भरल्या. आपल्या शिरस्त्राणामध्येही त्याने बेरी भरून घेतल्या. फितीच्या साह्याने त्याने शिरस्त्राण आपल्या कमरपट्ट्याला बांधले आणि तो पुढे सरपटत निघाला. त्याच्या सबंध शरीरभर एक सुस्ती पसरत होती. पण तिच्यावर मात करून तो निग्रहाने पुढची वाटचाल रांगू लागला.

त्या रात्री त्याने सुरूच्या एका जुन्या झाडाखाली मुक्काम ठोकला. बेरीची फळे त्याने खाल्ली व झाडाची साल आणि सुरूच्या फळांच्या बिया चघळल्या. मग तो कुशीवर झोपला. पण त्याची झोप सावध होती. अंधारात कुणीतरी आवाज न करता आपल्यापाशी सरपटत येत आहे, असा अनेक वेळा त्याला भास झाला. त्याने आपले डोळे उघडले व कान एवढे टवकारले की, शेवटी त्याच्या कानांमध्ये गुणगुण आवाज सुरू झाला. हातात पिस्तूल धरून तो स्तब्ध बसून राहिला. सुरूचे एखादे फळ पडत होते, रात्रीच्या वेळी घट्ट बनलेला बर्फ तडकत होता आणि बर्फाखालून वाहणाऱ्या पाण्याच्या छोटया ओहळांची मंद खळखळ ऐकू येत होती. ह्या प्रत्येक आवाज़ासरशी तो दचकत होता.

शेवटी पहाटेपूर्वी त्याला डोळा लागला. तो जागा झाला तेव्हा बरेच उजाडले होते. ज्या झाडाखाली तो झोपला होता त्याभोवती कोल्ह्याच्या पंजांचे नागमोडी ठसे उमटलेले त्याने पाहिले. त्या पंजांच्या ठशांमधून त्याच्या फरफटत गेलेल्या शेपटीचे लांब पट्टेही उमटलेले होते.

"अच्छा, ह्यामुळं मला झोप येत नव्हती!" अलेक्सेई स्वतःशी उद्गारला. ठशांवरून स्पष्ट दिसत होते की, कोल्हा चोरपावलांनी घिरटया मारीत होता, दबा धरून बसला होता व पुन्हा त्याने घिरटया घातल्या होत्या. एक अस्वस्थ करणारा विचार अलेक्सेईच्या मनात चमकून गेला. शिकारी म्हणतात की, माणसाच्या आगामी मरणाची चाहूल ह्या धूर्त जनावराला लागते आणि ते त्या माणसाचा पाठलाग सुरू करते. ह्या चाहुलीमुळे तर हे श्वापद त्याच्या वासावर आले नव्हते ना?

"छी:! कसला मूर्खपणा! सारं काही ठीक होईल," स्वतःला हुरूप आणण्यासाठी तो उद्‌गारला. पुन्हा तो हाता-पायांवर रांगू लागला. जास्तीत जास्त वेगाने त्या अमंगळ जागेपासून दूर जाण्यासाठी तो भराभरा सरपटू लागला.

त्या दिवशी त्याला नशीबाने आणखी एकदा हात दिला. सदापर्णीच्या सुगंधी झुडुपामध्ये भुरकट रंगाच्या बेरी तो आपल्या ओठांनी तोडून खात होता. तेवढ्यात खाली पडलेल्या पानांचा एक विचित्र ढीग त्याच्या नजरेला पडला. त्याने आपल्या हाताने त्या ढिगाला स्पर्श केला. पण तो ढीग घट्ट तसाच राहिला. त्याने पाने बाजूला सारायला सुरुवात केली, तोच त्याच्या बोटाला एकदम काहीतरी टोचले. तेथे साळिंदर बसले होते हे तात्काळ

त्याच्या ध्यानात आले. त्या दाट झुडुपामध्ये ते मोठं, म्हातारे साळिंदर हिवाळी झोपेसाठी येऊन बसले होते. ऊब आणण्यासाठी त्या साळिंदराने स्वत:ला शारदीय पानगळीमध्ये लपेटून घेतले होते. अलेक्सेई मनस्वी आनंदाने बेभान झाला. त्या खडतर प्रवासात एखादे जनावर अथवा एखादा पक्षी मारून खाण्याचे स्वप्न तो सतत पहात होता. एखाद्या नीलकण्ठ पक्ष्यावर अथवा सशावर किती वेळा त्याने आपले पिस्तूल रोखले होते, पण प्रत्येक वेळी त्याने गोळी झाडण्याचा मोह मोठ्या कष्टाने आवरला होता. कारण त्याच्यापाशी फक्त तीन काडतूसे शिल्लक होती—दोन शत्रूसाठी आणि वेळ पडली तर एक स्वत:साठी. पिस्तूल न वापरण्यासाठी त्याला निग्रह करावा लागला होता. धोका पत्करणे त्याला परवडणार नव्हते.

आणि आता लुसलुशीत मांस आयते त्याच्या हाती पडले होते! सर्व-साधारण समजुतीनुसार, साळिंदर हा अस्वच्छ प्राणी आहे ही आठवण करण्या-साठी न थांबता त्याने वेगाने उरलेली पाने बाजूला सारली. साळिंदर तसेच अंगाची गुंडाळी करून झोपून होते. अलेक्सेईने आपल्या खंजीराने साळिंदराला ठार मारले, त्याचे शरीर उलगडले, त्याचे काटेरी कवच व पोटाकडील पिवळट त्वचा कशीबशी फाडून काढली, त्याच्या मांसाचे बारीक बारीक तुकडे केले व हाडांभोवतीचे घट्ट, उबदार, चिवट मांस तो आपल्या दातांनी आधाशीपणे ओरबाडू लागला. त्याने त्या साळिंदराचा अगदी चट्टामट्टा केला. त्याची छोटी हाडेसुद्धा त्याने चावून चावून लगदा करून खाल्ली. एवढे सगळे झाल्यानंतर त्याला त्या मांसाच्या किळसवाण्या वासाची जाणीव झाली. पण सबंध शरीराला एक तृप्तता देणाऱ्या सुखद संवेदनेपुढे त्या वासाची काय मातब्बरी?

प्रत्येक हाड त्याने पुन्हा निरखले व चोखून काढले. उबदारपणा आणि विश्रांतीचा आनंद अनुभवीत तो बर्फावर पडून राहिला. झुडुपांमधून जर त्याला सावध कोल्हेकुई ऐकू आली नसती तर कदाचित त्याला झोप लागली असती. अलेक्सेईने कान टवकारले आणि अचानकपणे पूर्वेकडून सतत येणाऱ्या तोफांच्या गडगडाटाव्यतिरिक्त मशिनगनचा कडकडाट त्याला स्पष्ट ऐकू आला.

त्याने थकवा दूर झटकला. कोल्ह्याचा आणि विश्रांतीच्या गरजेचा त्याला विसर पडला व दाट जंगलात तो पुन्हा रांगू लागला.

११

ज्या दलदलीच्या प्रदेशातून तो रांगत आला होता त्या पलिकडे एक सपाट मैदान होते व त्या उघड्या मैदानातून बर्फ-वाऱ्याने झिजलेल्या खांबांची दुहेरी रांग गेली होती. त्या खांबांना घायपातीच्या आणि वाळुंजीच्या पट्ट्या बांधल्या होत्या व त्यांचे खुंट जमिनीत पुरलेले होते.

त्या खांबांच्या दरम्यान काही काही ठिकाणी बर्फामधून न मळलेल्या वाटेच्या चाकोऱ्या डोकावीत होत्या. आसपास मनुष्यवस्ती असली पाहिजे! अलेक्सेईचे अंतःकरण उचंबळले. ह्या अतिदूरच्या ठिकाणी जर्मन पोहोचण्याची शक्यता फार कमी होती. पण जरी जर्मन येथे आले असले तरी आसपास कुठेतरी अलेक्सेईची आपली माणसे हमखास असणार होती व अर्थात त्यांनी ह्या जखमी माणसाला निवारा दिला असता आणि सर्व तऱ्हांनी मदत केली असती.

आपल्या भटकंतीची लौकरच अखेर होणार ह्या जाणीवेने, अजीबात विश्रांती न घेता अलेक्सेई पुढे पुढे जात राहिला. तो रांगत होता, श्वास घेण्यासाठी धापा टाकीत होता, बर्फात तोंडावर पडत होता, अतिताणामुळे बेशुद्ध पडत होता. टेकाडाच्या माथ्यावर जाण्याची त्याला घाई झाली होती. तेथून खेडे दिसेल, त्याच्या आसऱ्याचे ठिकाण दिसेल, अशी त्याची खात्री होती. वस्तीपर्यंत पोहोचण्याच्या कल्पनेने त्याचे मन एवढे एकाग्र बनले होते, की ह्या कुंपणाव्यतिरिक्त आणि बर्फामधून जास्त जास्त ठळकपणे डोकावणाऱ्या वाटेव्यतिरिक्त, जवळपास मनुष्यवस्ती असल्याच्या दुसऱ्या कोणत्याही खुणा दिसत नव्हत्या, हे त्याच्या लक्षातच आले नाही.

सरतेशेवटी तो टेकाडावर पोहोचला. धापा टाकीत अलेक्सेईने नजर वर उचलली आणि समोरचे भयानक दृश्य पाहताच तात्काळ नजर खाली वळविली.

अगदी अलिकडेपर्यंत ह्या ठिकाणी जंगलामधील एक छोटे खेडे होते यात काही संदेह नव्हता. जळलेल्या घरांच्या बर्फामाखल्या अवशेषांवरून डोकावणाऱ्या धुरांड्यांच्या दोन विषम रांगांवरून त्या खेड्याची रूपरेषा सहज समजत होती. काही थोड्या बागा, कुडाची कुंपणे आणि खिडक्यांजवळ वाढलेली अॅशची झाडे, एवढ्याच गोष्टी त्याला दिसल्या. आगीने जळून गेलेले त्यांचे खुंट आता बर्फाबाहेर डोकावत होते. जंगलच्या रिकाम्या जागी

झाडांचे खुंट जसे दिसतात तशा त्या भकास, बर्फमाखल्या मैदानावर धुरांडी उभी होती. त्यांच्या मध्यभागी अगदी विचित्र दिसणारा एका विहीरीचा रहाट डोकावत होता. त्याला एक जुनी, लोखंडी पट्ट्यांची लाकडी बादली अडकवलेली होती व वाऱ्याबरोबर ती बादली गंजलेल्या साखळीवर सावकाशपणे हेलकावे खात होती. खेड्याच्या वेशीपाशी हिरव्या कुंपणाने वेढलेली एक बाग होती व तेथे एक सुंदर कमान होती. त्या कमानीखालचे दार गंजलेल्या बिजागऱ्यांवर करकर आवाज करीत मंदपणे झोके घेत होते.

आसमंतात चिटपाखरू नव्हते. एकही आवाज येत नव्हता अथवा धुराची एकही रेषा उमटत नव्हती. अगदी निर्जन वाळवंट. जिवंत माणूस रहात असल्याची एकही खूण तेथे दिसत नव्हती. एक ससा मात्र अलेक्सेईची चाहूल लागल्याने झुडुपातून बाहेर आला व आपल्या मागील तंगड्या गंमतीदारपणे झाडीत त्याने सरळ खेड्याच्या दिशेने धूम ठोकली. दिंडी दरवाजापाशी तो थांबला, तेथे बसून त्याने पुढचे पंजे वर उचलले व कान टवकारला. पण त्याच्या पाठोपाठ हा मोठा, विचित्र प्राणी रांगत सरपटत पुढे येत असलेला पाहताच पुन्हा तो जळक्या, ओसाड बागांच्या कडाकडांनी धूम पळाला.

अलेक्सेई यांत्रिकपणे पुढे सरकत होता. त्याच्या दाढी वाढलेल्या गालांवरून मोठमोठी आसवे ओघळत होती व बर्फात पडत होती. क्षणापूर्वी ससा ज्या दारापाशी थांबला होता तेथे तो थांबला. दारावर एक तुटकी पाटी लोंबकळत होती व त्या पाटीवर "देत्स्की*..." एवढीच अक्षरे होती. ह्या हिरव्या कुंपणामागे बालवाडीचे नेटके आवार उभे होते हा तर्क करणे अवघड नव्हते. खेड्यातील सुताराने बनविलेली काही सखल बाकेही तेथे होती. मुलांच्या प्रेमाखातर त्याने ती बाके काचेने तासून गुळगुळीत बनविलेली होती. अलेक्सेईने ते उघडे दार लोटले, रांगत तो एका बाकापाशी गेला. त्याला त्या बाकावर बसायचे होते, पण त्याच्या शरीराला आडव्या अवस्थेत राहण्याची एवढी सवय झाली होती, की तो आपले शरीर ताठ करून सरळ बसू शकेना. शेवटी जेव्हा तो बसला तेव्हा त्याचा पाठीचा सबंध कणा दुखत होता. विश्रांती घेण्याच्या इराद्याने त्याने आपल्या शरीराची अर्धी कमान केली व एखाद्या थकलेल्या जनावराप्रमाणे तो बर्फावर आडवा झाला.

त्याचे अंत:करण जड आणि उदास बनले होते.

---

*देत्स्की साद – रशियन भाषेत "बालवाडी" – अनु.

बाकाभोवतालचा बर्फ वितळत होता. त्यातून काळी जमीन दिसत होती. तिच्यातून उबदार वाफ वेलांट्या घेत, थरथरत हवेत विरून जाताना दिसत होती. अलेक्सेईने मूठभर ओली, उबदार माती हातात घेतली. वंगणाप्रमाणे त्याच्या बोटांमधून तिचे ओघळ वाहू लागले. तिला शेणाचा, गोठ्याचा आणि घराचा वास येत होता.

येथे माणसे राहिली होती. कोणे एके काळी, फार फार पूर्वी, जमिनीचा हा पट्टा त्यांनी काळ्या अरण्यापासून जिंकून घेतला होता. ह्या जमिनीला नांगरले होते, लाकडी फाळांनी तिची मशागत केली होती, तिला खतपाणी घातले होते. अरण्याविरुद्ध आणि अरण्यातील श्वापदांविरुद्ध त्यांना सतत कठीण संघर्ष करावा लागला होता. पुढील पीक येईपर्यंत हाता-तोंडांची गाठ घालण्यासाठी सतत चिंता करावी लागली होती. सोविएत राजवटीत येथे सामुदायिक शेत स्थापन झाले होते व अधिक चांगल्या आयुष्याची स्वप्ने ही माणसे पाहू लागली होती. शेतीची यंत्रे आली आणि त्यांच्याबरोबर समाधानही नांदू लागले. खेड्यातील सुतारांनी बालोद्यान बांधले. संध्याकाळच्या वेळी ह्या बागेत गुलाबी गालांची मुले बागडताना पाहून खेड्यातील पुरुषांनी ठरविले असावे की, आता एक क्लब आणि एक वाचनालय बांधायची वेळ झाली होती. हिवाळ्यात बाहेर हिमवादळ घोंघावत असताना उबदार जागी संध्याकाळचा वेळ घालविण्यासाठी त्यांना जागा लाभली असती. ह्या घनदाट जंगलाच्या गाभ्यात वसलेल्या खेड्यात वीज आणण्याची स्वप्ने त्यांनी पाहिली असणार... पण आता येथे भयाण, निर्जन जंगलाविना दुसरे काहीही नव्हते. जंगलची चिरंतन, अभंग शांतता येथे नांदत होती...

या विषयावर अलेक्सेई जेवढा जास्त विचार करीत राहिला तेंवढे त्याचे मन अधिक क्रियाशील बनले. सपाट, कोरड्या स्तेपमधील वोल्गा नदीकिनारीचे धुळकट कामीशीन गाव त्याच्या नजरेसमोर उभे राहिले. उन्हाळ्यात आणि शरदात स्तेपचे जोरदार वारे गावात धुळीचे आणि वाळूचे लोट उठवायचे. ती धूळ आणि वाळू हाता-तोंडांना झोंबायची, घरांमध्ये घुसायची, बंद खिडक्यांमधून पाझरायची, डोळ्यांना आंधळे करायची व दातांमध्ये कचकचा वाजायची. स्तेपमधील ह्या वाळूच्या लोटांना "कामीशीनचा पाऊस" म्हणत. ह्या वाळूला थोपविण्याचे आणि स्वच्छ, विशुद्ध हवेत राहण्याचे स्वप्न कामीशीनचे लोक अनेक पिढ्या पहात आले होते. पण हे स्वप्न केवळ समाजसत्तावादी देशात वास्तवात उतरले होते. लोकांनी एकत्र

जमून विचारविनिमय केला होता व वाऱ्याविरुद्ध आणि वाळूविरुद्ध मोहीम उघडली होती. दर शनिवारी गावातील सारे लोक टिकाव, फावडी, कुऱ्हाडी घेऊन बाहेर पडत आणि लौकरच गावाच्या पूर्वीच्या रिकाम्या चौकात एक उद्यान उभे झाले. अरुंद रस्त्यांच्या दुतर्फा कोवळी चिनाराची झाडे डोलू लागली. जणू काही स्वतःच्या घरातील खिडकीच्या चौकटीमधील फुलांच्या कुंड्यांना पाणी घालावे अशा काळजीने लोकांनी ह्या झाडांना खत-पाणी घालून वाढविले. वसंतामध्ये ह्या झाडांच्या बोडक्या फांद्यांना कोंब फुटले आणि त्यांनी हिरवी वस्त्रे ल्यायली तेव्हा गावामधील लहान-थोरांना किती मनस्वी आनंद झाला होता ह्याची अलेक्सेईला आठवण झाली... अचानक त्याने मनाशी दुसरे चित्र उभे केले: त्याच्या कामीशीनमध्ये रस्त्यांवर जर्मन फिरत होते! लोकांनी प्रेमाने जोपासलेली झाडे ते जर्मन आपल्या सर्पणासाठी तोडत होते. त्याचे जन्मगाव धुरामध्ये गुरफटले होते आणि जेथे त्याचे घर होते, जेथे तो लहानाचा मोठा झाला, जेथे त्याची आई राहिली होती, तेथे एक उघडेबोडके, काजळलेले राक्षसी धुरांडे उभे होते—येथे होते तसे!

वेदनेने आणि दुःखाने त्याचे काळीज विदीर्ण झाले.

"त्यांना अधिक पुढं जाऊ देता कामा नये! आमच्या शरीरांमध्ये धुगधुगी उरलीय तोवर आम्ही त्यांच्याशी लढलं पाहिजे! त्या जंगलच्या उघड्या मैदानात शत्रूंच्या शरीरांवर पडलेला तो रशियन सैनिक लढला तसं!"

झाडांच्या पांढुरक्या शेंड्यांना सूर्य एव्हाना स्पर्श करीत होता.

एकेकाळी खेडेगावचा जेथे रस्ता होता त्या ठिकाणी अलेक्सेई रांगत आला. राखेच्या ढिगांमधून प्रेतांची दुर्गंधी येत होती. जंगलापेक्षा ते खेडे अधिक भकास भासत होते. एकदम एका विचित्र आवाजामुळे अलेक्सेई सावध झाला. रस्त्याच्या अगदी शेवटच्या टोकाला, राखेच्या ढिगापाशी त्याला एक कुत्रा दिसला. तो एक सामान्य, केसाळ, पसरट कानांचा घरात पाळलेला कुत्रा होता. तो हळूच गुरगुरत होता, आपल्या पंजांमध्ये त्याने मांसाचा एक घसघशीत तुकडा धरला होता. अलेक्सेई नजरेला पडताच ह्या कुत्र्याने फिस्कारून दात विचकले होते. वस्तुतः एरवी हा अत्यंत गरीब प्राणी. गृहिणींच्या सतत शिव्या खाण्याची ह्याला सवय. लहान मुलांचा आवडता. पण आता त्याच्या डोळ्यांमध्ये चिडीचा एवढा भयानक अंगार जळत होता, की अलेक्सेईच्या पाठीमधून भीतीचा थंड शहारा गेला. त्याने आपला "हात-मोजा" बाजूला फेकला व पिस्तूलाला हात घातला. तो कुत्रा आता हिंस्र

श्वापद बनला होता. अनेक क्षण माणूस आणि कुत्रा एकमेकांकडे नजरा रोखून पहात राहिले. मग त्या कुत्र्याला कसलीतरी आठवण झाली असावी, कारण त्याने आपला जबडा खाली केला, अपराधीपणे शेपूट हलविली, मांसाचा तुकडा पटकन तोंडात धरला व दोन्ही पायांमध्ये शेपूट घालून राखेच्या ढिगामागे तो पसार झाला.

इथून दूर! शक्य तितक्या लौकर इथून दूर! प्रकाशाच्या शेवटच्या किरणांचा फायदा घेऊन, इतर कोणताही रस्ता न निवडता, सरळ बर्फावरून रांगत अलेक्सेई जंगलात घुसला. आता जेथून तोफांचे गडगडाट स्पष्ट ऐकू येत होते त्या दिशेला आपोआपच तो वळला. एखाद्या चुंबकाप्रमाणे ते आवाज त्याला आकर्षित करीत होते. त्या आवाजांच्या जेवढा अधिक जवळ तो जात होता, तेवढे त्यांचे आकर्षण जास्त वाढत होते.

१२

अशा रीतीने आणखी दोन-तीन दिवस अलेक्सेई रांगत चालला होता. काळाचे भान त्याला राहिले नव्हते. यांत्रिक प्रयत्नांच्या अखंड साखळीमध्ये सर्व काही मिसळून गेले होते. काही वेळा झोप किंवा श्रम त्याला घेरत. रांगत असताना त्याला झोप लागायची. पण पूर्वेची ओढ एवढी विलक्षण होती की, त्या श्रमिष्ट अवस्थेतही हळू हळू तो रांगत रहायचा व शेवटी त्याची एखाद्या झाडाशी अथवा झुडुपाशी टक्कर घडायची, किंवा त्याचा हात घसरून तो वितळणाऱ्या बर्फावर तोंडघशी पडायचा. एखाद्या केंद्रित प्रकाशाप्रमाणे त्याची सारी निर्धारशक्ती, त्याचे सारे संदिग्ध विचार एकाच जागी एकवटले होते: रांगत पुढे जायचे, सतत फिरते रहायचे, वाट्टेल ते करून पुढे सरकत रहायचे!

आणखी एखादे साळिंदर सापडेल ह्या आशेने वाटेत तो प्रत्येक झुडूप तपासून पहात होता. बर्फाखाली सापडणाऱ्या बेरी व शेवाळे एवढेच त्याचे अन्न होते. एकदा रानात त्याला मुंग्यांचे प्रचंड वारूळ आडवे आले. पावसाने धुवून निघालेल्या गवताच्या गंजीसारखे ते वारूळ दिसत होते. मुंग्या अजून झोपलेल्या होत्या व त्यांची वस्ती मृतवत भासत होती. अलेक्सेईने त्या मऊ गंजीत हात खुपसला व मुंग्या घट्ट चिकटलेला एक बचका ओढून काढला. ह्या कीटकांना तो मोठ्या चवीने खाऊ लागला. त्याच्या कोरड्या, तडकले-

ल्या तोंडात त्याला ही आंबट चव छान वाटली. त्याने पुन:पुन्हा त्या वारूळा-वर हाताने बचके मारले. शेवटी ह्या अनपेक्षित आक्रमणामुळे सर्व मुंग्या जाग्या झाल्या.

त्या छोटचा कीटकांनी मोठ्या त्वेषाने प्रतिकार केला. अलेक्सेईच्या हाताला, ओठांना, जिभेला त्यांनी कडकडून चावे घेतले. त्याच्या हवाई पोषाखात मुंग्या घुसल्या व त्याच्या शरीराला कडाडून डसल्या. पण ती जळती वेदना अलेक्सेईला आल्हादक वाटत होती. त्या आम्लाची चव त्याला टॉनिकसारखी वाटली. त्याला तहान लागली. मातीच्या ढेकळांमधून गढूळ रंगाचा एक ओहळ वाहात असलेला त्याने पाहिला. पाणी पिण्यासाठी तो त्या ओहळावर ओणवा झाला, पण ताडकन मागे सरला – त्या गडद पाण्यात निळ्या आकाशाचे प्रतिबिंब पडले होते व त्यातून एक अनोळखी, भयानक चेहरा त्याच्याकडे डोकावून पहात होता. काळ्या कातडीच्या एका सापळ्याचा तो चेहरा होता व त्याच्यावर अस्वच्छ, कुरळे दाढीचे खुंट होते. खोल खळग्यांमधून मोठे, गोल, जंगली श्वापदासारखे चकाकणारे डोळे रोखून पहात होते व कपाळावर केसांच्या झिंज्या लोंबत होत्या.

"हा मी तर नव्हे?" अलेक्सेईने स्वत:ला प्रश्न केला. पुन्हा पाण्यात पाहण्याची भीती वाटल्यामुळे तो पाणी प्यायला नाही. त्याऐवजी त्याने आपल्या तोंडात थोडा बर्फ टाकला व त्याच प्रभावी चुंबकामुळे आकर्षित होऊन तो पूर्वेकडे रांगू लागला.

त्या रात्री आपल्या उघड्यावरील मुक्कामासाठी त्याने बॉंबस्फोटाने पडलेले एक मोठे विवर निवडले. स्फोटासरशी उडालेली पिवळी वाळू त्या विवराच्या कडेभोवती बांधाप्रमाणे पडली होती. विवराचा तळ खूप शांत आणि आरामशीर असल्याचे त्याला आढळले. विवरात वारा येत नव्हता, मात्र बांधावरची वाळू सळसळ करीत किंचित प्रमाणात विवरात पडत होती. विवरामधून आकाशातील तारे नेहमीपेक्षा जास्त तेजस्वी भासत होते व अलेक्सेईच्या डोक्यावर ओठंगल्यासारखे दिसत होते. त्या ताऱ्यांखाली मागे-पुढे झुलणारी देवदाराची एक झुपकेदार फांदी फडके धरलेल्या एखाद्या हाता-सारखी वाटत होती व तो हात जणू चमकणाऱ्या दिव्यांना घासूनपुसून लख्ख करीत होता. पहाटेपूर्वी थंडी पडली. जंगलावर ओलसर धुके ओठंगले. वाऱ्याची दिशा बदलली. आता तो उत्तरेकडून वाहात होता आणि धुक्याचे बर्फात रूपांतर करीत होता. सरतेशेवटी मंद, उशीरा आलेला सूर्यप्रकाश

फांद्यांना छेदून खाली आला तेव्हा दाट धुकेही जमिनीवर उतरले. हळूहळू ते धुके विरून गेले आणि जमिनीवर सर्वत्र निसरडा बर्फाचा थर साचला. आता डोक्यावरची झाडाची फांदी फडके धरलेल्या हातासारखी दिसत नव्हती, तर एखाद्या सुंदर बिलोरी काचेच्या झुंबरासारखी भासत होती. त्या झुंबराला लटकलेले छोटे, सप्तरंगी लोलक वाऱ्याबरोबर नाजुक किणकिण करीत होते.

अलेक्सेई जागा झाला तेव्हा त्याला कमालीचा थकवा जाणवला. आपल्या हवाई पोषाखाच्या छातीवरील खिशातील देवदाराची साठवून ठेवलेली सालसुद्धा त्याने चघळली नाही. जमिनीपासून आपले शरीर त्याने मोठ्या कष्टाने विलग केले. जणू त्याचे अंग रात्रीच्या वेळी जमिनीला चिकटले होते. आपले कपडे, आपली दाढी व आपल्या मिशा यांवरील बर्फ न झटकताच त्यानें विवराच्या एका बाजूने वर चढण्याचा प्रयत्न केला. पण रात्रीच्या वेळी वाळू गोठून गेली होती आणि आता त्याचे हात त्या वाळूवरून निसटू लागले. पुन:पुन्हा त्याने बाहेर पडण्याचा प्रयत्न केला, पण प्रत्येक वेळी तो तळाशी घसरून पडला. त्याचे प्रयत्न जास्त जास्त दुबळे होत गेले. शेवटी आपल्याला दुसऱ्या कुणाच्या मदतीविना ह्या विवरातून बाहेर पडणे अशक्य आहे ह्या भयानक जाणीवेने तो विलक्षण हादरला. ह्या विचारासरशी निसरड्या कडेवरून वर चढण्याचा आणखी एक प्रयत्न करण्यास तो उद्युक्त झाला, पण त्याने किंचित वर आपले शरीर उचलले न उचलले तोच पुन्हा तो खाली कोसळला. आता तो कमालीचा दमला होता व हताश बनला होता.

"हीच अखेर! आता काही फरक पडणार नांही!"

विवराच्या तळाशी त्याने आपल्या अंगाची मुरकुंडी केली. त्याच्या सबंध शरीरभर एक गुंगी पसरत होती. आपला निर्धार ह्या गुंगीपायी कमी होत आहे आणि लुळा पडत आहे याची भयानक जाणीव त्याच्या मनाला होत होती. विमनस्कपणे त्याने आपल्या लष्करी कुडत्याच्या खिशातून चिंध्या झालेली पत्रे बाहेर काढली, पण ती पत्रे वाचायचे त्राण त्याच्यात राहिले नव्हते. कुरणामध्ये गवतावर रंगीबेरंगी फ्रॉकमध्ये बसलेल्या त्या मुलीचा फोटो त्याने सेलोफेनच्या आवरणातून बाहेर काढला. खेदाने स्मित करीत त्याने त्या फोटोतील मुलीला विचारले:

"खरंच हा आपला अखेरचा निरोप काय?"—

एकदम तो दचकला आणि आपल्या हातातील फोटोकडे खिळून पहात

राहिला. वरच्या बाजूला, जंगलामध्ये, थंड गोठलेल्या वातावरणात परिचित आवाज ऐकल्याचा त्याला भास झाला.

अंगातील आळस त्याने एकदम झटकून टाकला. तसा तो आवाज काही विशेष नव्हता. तो आवाज इतका मंद होता की, हिममाखल्या झाडांच्या शेंड्यांच्या सळसळीपासून त्या आवाजाला वेगळे ओळखून काढणे जंगलच्या प्राण्याच्या अतिसंवेदनक्षम कानालासुद्धा कठीण गेले असते. पण त्या आवाजात एक विशिष्ट शीळेचा स्वर होता. आणि त्यामुळे अलेक्सेईने बिनचूकपणे ओळखले की तो "इल्-१६" जातीच्या विमानाचा आवाज होता. ह्याच प्रकारच्या विमानातून तो उड्डाण करीत होता.

इंजिनाची घरघर जवळ येऊ लागली, त्या घरघरीचा आवाज वाढला. विमान हवेत खाली-वर झोकांडत होते त्याप्रमाणे कधी शीळ ऐकू येत होती, तर कधी कण्हल्यासारखा आवाज येत होता. सरतेशेवटी, वर उंच भुरकट आकाशात एक छोटा, हळू सरकत जाणारा क्रूस ढगांमधून आतबाहेर करताना अलेक्सेईने पाहिला. त्या विमानाच्या पंख्यांवरील लाल तारे एव्हाना त्याला दिसत होते. नेमक्या त्याच्या डोक्यावर विमानाने एक कोलांटी मारली तेव्हा ते सूर्यप्रकाशात एकदम चमकले व तिरपा सूर मारीत दूर उडत निघून गेले. लौकरच त्याच्या इंजिनाची घरघर विरून गेली व पुन्हा एकदा हिममाखल्या झाडांच्या फांद्यांची सळसळ सुरू झाली. पण तरीही, त्यानंतर कितीतरी वेळपर्यंत अलेक्सेईच्या कानांमध्ये तो सूक्ष्म, शीळेसारखा आवाज घुमत होता.

आपण वैमानिकाच्या जागी बसलो आहोत अशी त्याने मनाशी कल्पना केली. माणसाला सिगारेट ओढून संपवायला जेवढा वेळ लागेल, त्याच्या आधीच तो आपल्या जंगलातील विमानतळाकडे परतला असता. कोण होते त्या विमानात? कदाचित सकाळच्या टेहळणीवर बाहेर पडलेला तो आंद्रेई देगत्यारेन्को होता. शत्रूशी गाठ पडेल अशी आशा बाळगून तो ह्या उड्डाणांच्या वेळी खूप उंचावर जायचा... देगत्यारेन्को... विमान... सहकारी...

अलेक्सेईच्या अंगात पुन्हा एकदा शक्तीची नवी लाट संचारून गेली व त्याने विवराच्या बर्फाळ कडेवर नजर टाकली. "अशा रीतीनं मी कधीही बाहेर पडणार नाही," तो स्वतःशी म्हणाला. "पण इथं नुसतं पडून मरणाची वाट पाहणंही शक्य नाही!" त्याने म्यानातून खंजीर बाहेर काढला आणि विमनस्कपणे, बर्फाळ कडेवर पाय ठेवण्यासाठी तो दुबळेपणाने खोदू लागला. आपल्या नखांनी गोठलेली वाळू खरवडून काढू लागला. नखे तुटे-

पर्यंत आणि बोटे रक्तबंबाळ होईपर्यंत तो खरवडत राहिला. मग मुळीच न
थांबता जोरजोराने खंजीराचे घाव मारीत राहिला. नंतर त्या खाचांना
आपल्या हातांनी आणि गुडघ्यांनी चिकटत, सरकत सरकत तो वरच्या बांधा-
पर्यंत आला. त्या बांधावर आडवे होऊन त्याने एक लोळण घेतली असती,
की तो वाचला असता. पण त्याचा पाय घसरला आणि तो परत खाली
गेला. बर्फावर त्याचा चेहरा थाडदिशी आपटला व त्याला जोरदार वेदना
झाल्या. त्याला मोठी जखम झाली होती, पण विमानाच्या इंजिनाची घरघर
अजूनही त्याच्या कानांमध्ये घुमत होती. तो पुन्हा वर चढला आणि पुन्हा
तळाशी खाली पडला. मग त्याने परत एकदा आपण पाडलेल्या खाचा
बारकाईने निरखल्या, त्यांना अधिक खोल बनविले, वरच्या खाचांच्या कडा
जास्त टोकदार केल्या. हे काम संपविल्यानंतर पुन्हा तो वर चढू लागला.
त्याची ताकद संपत चालली होती, पण तरीही नेटाने तो जोर लावून वर
चढत होता.

अत्यंत कष्टाने त्याने वाळूच्या बांधावर आपले शरीर झोकून दिले व
अगतिकपणे तो जमिनीवर गडगडत गेला. मग ज्या दिशेला विमान उडत
गेले होते त्या दिशेला तो रांगू लागला. त्याच दिशेने सूर्य जंगलावर उगविला
होता, बर्फाला फस्त करणारे धुके त्याने उधळून लावले होते आणि बर्फाच्या
थराला स्फटिकासारखे चमकत ठेवले होते.

१३

पण रांगणे त्याला अतिकठीण वाटू लागले. त्याच्या हाताचे दंड थरथर
कापू लागले व शरीराचे ओझे सहन न होऊन तो खाली पालथा कोसळू
लागला. वितळत्या बर्फात अनेकदा त्याचा चेहरा आपटला. जणू पृथ्वीचे
गुरुत्वाकर्षण प्रचंड प्रमाणात वाढले होते, त्याला प्रतिकार करणे अशक्य
होते, असे भासू लागले. स्वस्थ पडून किमान अर्धा तास तरी विश्रांती घ्यावी
असे अलेक्सेईला वाटत होते. पण पुढे जाण्याच्या निर्धाराने आज झपाटले-
पणात रूपांतर झाले होते. तो सतत रांगत होता, त्याला तहान-भुकेचे भान
राहिले नव्हते. तोफखान्याच्या आणि मशिनगनच्या भडिमाराचा आवाज
सोडून त्याला दुसरे काहीही ऐकू येत नव्हते, दुसरे काहीही दिसत नव्हते.

जेव्हा त्याच्या हातांचे दंड त्याला आधार देण्यास असमर्थ ठरले तेव्हा

आपल्या कोपरांवर रांगण्याचा त्याने प्रयत्न केला. पण असे रांगणे फार विचित्र होऊ लागले, म्हणून तो पालथा पडला आणि कोपरांचा तरफांसारखा वापर करून लोळत जाण्याचा त्याने प्रयत्न केला. असे करणे शक्य असल्याचे त्याला आढळले. रांगण्यापेक्षा लोळत, गडगडत जाणे अधिक सोपे होते व त्यासाठी फारसे श्रमही लागत नव्हते. पण त्यामुळे त्याला चक्कर मात्र येऊ लागली व वारंवार त्याची शुद्ध हरपू लागली. त्याला सारखे थांबावे लागे व जमीन, आकाश आणि जंगल गरगर फिरण्याची थांबेपर्यंत वाट पहावी लागे.

झाडे आता विरळ होऊ लागली व अधून मधून मोकळ्या जागा दृष्टीस पडू लागल्या. तेथील झाडे तोडलेली होती. हिवाळी रस्त्यांच्या चाकोऱ्या दिसल्या. आपल्या माणसांपर्यंत आपण पोहोचू अथवा नाही याचा इतःपर अलेक्सेई विचार करीत नव्हता. पण अंगात हलण्याची शक्ती असेतोवर लोळत पुढे जाण्याचा त्याने निर्धार केला होता. त्याने आपल्या सर्व क्षीण स्नायूंना अतीव ताण दिल्यामुळे त्याची शुद्ध हरपली, तरीही त्याचे हात व शरीर यांत्रिकपणे ह्या अवघड हालचाली करीत राहिले आणि पूर्वेकडे, तोफांच्या आवाजाच्या दिशेने, तो गडबडा लोळत चालला.

ती रात्र कशी घालविली अथवा दुसऱ्या दिवशी सकाळी त्याने किती प्रगती केली ते अलेक्सेईला आठवत नव्हते. अर्धवट भ्रमिष्ट अवस्थेत सारे काही मिसळून गेले होते. फक्त वाटेत आलेल्या अडथळ्यांची त्याला अंधुक आठवण राहिली होती: पाडलेल्या देवदाराच्या झाडाच्या सोनेरी बुंध्यामधून पाझरणारा पोवळ्याच्या रंगाचा चीक; ओंडक्यांचा एक ढीग; सर्वत्र पसरले-ला लाकडाचा भुस्सा आणि लाकडाचे तुकडे; छेद गेलेल्या ठिकाणी वर्षांची वर्तुळे स्पष्ट दाखविणारा झाडाचा खुंट.

एका आगळ्या आवाजामुळे तो आपल्या अर्धवट भ्रमिष्टावस्थेमधून बाहेर पडला. एकदम उठून बसत त्याने सभोवार नजर टाकली. चकचकीत ऊन पडलेल्या जंगलातील एका रिकाम्या जागी आपण बसलो असल्याचे त्याला आढळून आले. तेथे पाडून ठेवलेली झाडे विखुरली होती, पण अद्याप त्यांना कापून ओंडके बनविलेले नव्हते. एका बाजूला मात्र सर्पणाची लाकडे व्यवस्थित रचून ठेवलेली होती. माध्यान्हीचा सूर्य आकाशात चमकत होता. झाडांच्या चीकाचा, तापलेल्या शंक्वाकृती फळांचा व दमट बर्फाचा उग्र वास हवेत दरवळत होता. अद्याप बर्फ न वितळलेल्या भूमीपासून खूप उंचीवर एक चंडोल साध्या गीतामध्ये आपला जीव ओतत होता.

अज्ञात धोक्याच्या जाणीवेने अलेक्सेईने त्या रिकाम्या जागेभोवती नजर फिरविली. त्या जागी झाडे नुकतीच तोडलेली होती असे वाटत होते. झाडांवरील न छाटलेल्या फांद्या अजून ताज्या आणि हिरव्या होत्या. कापलेल्या जागांमधून मधासारखा चीक अजून गळत होता. आसपास पडलेल्या ढलप्यांमधून आणि हिरव्या सालींमधून ताजा वास दरवळत होता. म्हणजे त्या जागी माणसांचा वावर होता. कदाचित जर्मन आपल्या खंदकांसाठी आणि मोर्चांसाठी येथे ओंडके कापीत होते? तसे असेल तर त्याने लौकरात लौकर तेथून पोबारा करणे भाग होते, कारण लाकूडतोडे कोणत्याही क्षणी येणे शक्य होते. पण त्याच्या शरीराला मंद, अवजड ठणकेने बधीर करून टाकले होते. जागेवरून तसूभर हलण्याची ताकद त्याच्या अंगात उरली नव्हती.

रांगत पुढे जावे काय? जंगलामध्ये त्याने घालविलेल्या गेल्या काही दिवसांमधील आयुष्यात एक प्रकारचा सावधपणा त्याच्या अंगी बाणला होता व त्या संवेदनेपायी तो दक्ष राहिला. त्याला काहीही दिसत नव्हते, पण कुणीतरी अगदी जवळ वावरत होते आणि त्याच्यावर नजर ठेवून होते, असे त्याला जाणवत होते. कोण होते ते? जंगलात शांततेचे साम्राज्य नांदत होते. त्या मोकळ्या जागेवर आक.शामध्ये चंडोल पक्षी गात होता, सुतार पक्ष्याची पोकळ ठोक ठोक ऐकू येत होती, पाडलेल्या झाडांच्या फांद्यांवरून छोटे पिवळे पक्षी एकमेकांकडे भराऱ्या मारीत होते व रागारागाने एकमेकांवर चिवचिवत होते. पण तरीही अलेक्सेईच्या शरीराचा अणुरेणू त्याला ग्वाही देत होता, की त्याच्यावर कुणीतरी पाळत ठेवून होते.

एक फांदी काडकन तुटली. त्याने सभोवती पाहिले. देवदारांच्या कोवळ्या झाडांचे कुरळे शेंडे वाऱ्याबरोबर डुलत होते. पण काही फांद्या त्या डुलण्याशी ताल धरीत नसल्याचे त्याला दिसले. त्या ठिकाणाहून खालच्या आवाजातील अस्वस्थ कुजबूज येत असल्याचे त्याला भासले. ती कुजबूज माणसांची होती. कुत्रा सामोरा आला तेव्हा जसा त्याच्या पाठीतून थंड शहारा गेला होता तसा शहारा परत त्याच्या पाठीमधून गेला.

आपल्या हवाई पोषाखाच्या वरच्या खिशामधून त्याने चटकन पिस्तूल बाहेर काढले. त्या पिस्तूलाला एव्हाना गंज चढला होता व त्याचा खटका ओढायला त्याला दोन्ही हात वापरावे लागले. पिस्तुलाच्या खट्ट आवाजाने झाडांमध्ये दडून बसलेली व्यक्ती दचकली असावी. अनेक झाडांचे शेंडे जोरात





हलले. जणू कुणीतरी त्यांना खेटून धावले होते. पण परत सर्व काही शांत झाले.

"कोण होते? माणूस की जनावर?" अलेक्सेईने स्वतःला प्रश्न केला. आणि त्याला भास झाला की, झाडांच्या दाटीतही कुणीतरी विचारीत होते: "तो माणूस आहे का?" तो त्याच्या कल्पनेचा खेळ होता, का खरेच कुणी त्या झाडांआडून रशियन भाषेत बोलल्याचे त्याने ऐकले होते? होय, रशियन! आणि ते शब्द रशियनमध्ये होते हे जाणवल्यामुळे त्याला एवढा वेडा हर्ष झाला की, मित्र अथवा शत्रू तेथे आहे याचा विचार करण्यास न थांबता त्याने विजयी आरोळी ठोकली, आपल्या पायांवर तो उठला आणि जेथून आवाज आला होता त्या स्थळी त्याने झेपावण्याचा प्रयत्न केला, पण जणू काही उन्मळून पडावे त्याप्रमाणे तात्काळ खाली कोसळला. त्याच्या हातातील पिस्तूल खाली बर्फावर पडले...

१४

उठण्याचा अयशस्वी प्रयत्न केल्यानंतर अलेक्सेई बेशुद्ध पडला. पण नजीकच्या धोक्याच्या जाणीवेने तो ताबडतोब शुद्धीवर आला. देवदारांमागे माणसे लपली होती, त्याच्यावर पाळत ठेवून होती व एकमेकांशी कुजबुजत होती यात काही संशय नव्हता.

आपल्या हातांचा टेकू करून तो उठला. बर्फावरचे पिस्तूल त्याने उचलले, पण समोरच्या माणसांना न दिसेल अशा बेताने जमिनीलगत धरले. धोक्यामुळे त्याच्या मनाची भ्रमिष्ट अवस्था एकदम नाहीशी झाली होती. त्याचे मन आता अचूकपणे काम करीत होते. कोण होती ही माणसे? सर्पणाची लाकडे फोडण्यासाठी जर्मनांनी सक्तीने कामाला लावलेले लाकूडतोडे? किंवा कदाचित रशियन? त्याच्याप्रमाणेच शत्रूने घेरलेले आणि जर्मनांची फळी तोडून स्वतःच्या माणसांकडे जाण्याचा प्रयत्न करणारे? अथवा ह्या परिसरात राहणारे शेतकरी? "माणूस!" असा कुणाचा तरी स्पष्ट उद्‌गार तर त्याने ऐकला होता.

रांगण्यामुळे बधीर बनलेल्या त्याच्या हातातील पिस्तूल थरथर कापत होते. पण झुंजण्याची त्याची तयारी होती व उरलेल्या तीन काडतूसांचा चांगला उपयोग करण्याचा त्याचा इरादा होता...

नेमक्या त्याच क्षणाला एक उत्तेजित बालिश आवाज झाडीमागून उमटला :

"ए! कोण तू? डॉईच? फेश्र्तेएन?"

ह्या अनोळखी शब्दांमुळे अलेक्सेई सावध बनला. पण बोलणारी व्यक्ती निःसंशयरीत्या रशियन होती, निःसंदिग्धरीत्या लहान मूल होती.

"तू इथं काय करतोस?" दुसऱ्या बालिश आवाजाने पृच्छा केली.

"आणि तुम्ही कोण आहात?" अलेक्सेईने उलट प्रश्न केला. तो बोलायचा एकदम थांबला कारण स्वतःच्या आवाजातील मंदपणाचे व क्षीणपणाचे त्याला आश्चर्य वाटले.

त्याच्या प्रश्नामुळे झाडांमागे मोठी खळबळ माजलेली दिसली, कारण तेथे जे कुणी होते त्यांनी खूप वेळपर्यंत सल्लामसलत केली. त्यांची चर्चा चालू असताना जोरजोरात हातवारेही चालू असावेत, कारण फांद्यांना जोरदार हेलकावे बसत होते.

"थापा मारू नको. तू आम्हाला फसवू शकणार नाहीस! जर्मनाला मी कित्येक मैल दूर अंतरावरून ओळखतो. तू डॉईच आहेस?"

"तुम्ही कोण आहात?"

"तुला काय करायची ही माहिती? निख्त फेश्र्तेएन..."

"मी रशियन आहे."

"खोटं बोलतो आहेस. माझे डोळे फुटलेले नाहीत. तू फॅसिस्ट आहेस."

"मी रशियन आहे, रशियन! वैमानिक. जर्मनांनी माझं विमान पाडलं."

अलेक्सेईने आता सर्व सावधपणा झुगारून दिला. झाडांमागे त्याची स्वतःची माणसे होती, रशियन माणसे होती, सोविएत माणसे होती अशी त्याची खात्री पटली होती. त्या माणसांचा त्याच्यावर विश्वास बसत नव्हता. हे स्वाभाविक होते. युद्ध माणसाला सावध वागायला शिकविते. ह्या आगळ्या प्रवासाला सुरुवात केल्यानंतर प्रथमच त्याला स्वतःच्या शरीरातील बळ संपूर्ण नाहीसे झाल्यासारखे वाटले. आपल्याला हात-पाय हलविणे शक्य नाही, हालचाल करणे अथवा स्वतःचे संरक्षण करणे शक्य नाही असे जाणवले. त्याच्या गालांच्या काळपट खळग्यांवर अश्रू ओघळले.

"अरे, तो रडतोय बघ!" झाडांमागून आवाज आला. "ए, तू का रडतोस?"

"मी रशियन आहे. तुमच्यासारखाच रशियन. वैमानिक."

"कुठल्या विमानतळावरचा ?"

"पण तुम्ही कोण ?"

"तुला काय करायच्यात चौकशा ? उत्तर दे."

"मोचालोव विमानतळावरचा. तुम्ही मला मदत का करत नाही ? बाहेर या ! च्यायला..."

झाडांमागे पुन्हा एकदा जोरदार सल्लामसलत कुजबुजत्या आवाजांमध्ये झाली. अलेक्सेईने स्पष्टपणे ऐकले:

"ऐकलंस ? तो मोचालोव विमानतळावरचा आहे असं म्हणतोय... कदाचित तो खरं सांगत असावा... आणि तो रडतोय..." मग एक आरोळी आली: "ए वैमानिका ! तुझं पिस्तूल खाली टाक ! तू पिस्तूल टाकलं नाहीस तर आम्ही बाहेर येणार नाही ! इथून पळून जाऊ !"

अलेक्सेईने पिस्तूल दूर फेकले. फांद्या विलग झाल्या आणि दोन लहान मुले हातात हात घालून सावधपणे अलेक्सेईपाशी आली. एखाद्या दक्ष, चौकस, कोणत्याही क्षणी धूम ठोकण्याच्या तयारीत असलेल्या छोट्या, पिवळ्या पक्ष्यांच्या जोडीप्रमाणे ती मुले दिसत होती. त्यांच्यातल्या मोठ्या मुलाने हातात कुऱ्हाड धरली होती. तो हडकुळा होता, त्याचे डोळे निळे होते आणि केस आंबाडीसारखे होते. धाकटा तांबडकेशा होता, त्याच्या तोंडावर ठिपके होते. त्याच्या डोळ्यांमध्ये जणू कुतूहल मावत नव्हते. मोठ्याच्या मागे पाऊलभर अंतर जाऊन तो हळूच म्हणाला:

"तो रडतोय. खरंच तो रडतोय. आणि किती लुकडा आहे बघ ! नुसता हाडांचा सापळा !"

मोठा मुलगा हातात तशीच कुऱ्हाड धरून अलेक्सेईपाशी आला. आपल्या प्रचंड नमदी बुटाने त्याने पिस्तूल आणखी दूर उडविले. तो बूट बहुधा त्याच्या वडिलांचा असावा. तो म्हणाला:

"तू वैमानिक आहेस असं म्हणतोस. तुझ्यापाशी काही ओळखपत्रं आहेत ? पाहू दे आम्हाला !"

"इथं कोण आहेत ? आपली माणसं, का जर्मन ?" नकळत स्मित करीत हलक्या आवाजात अलेक्सेईने विचारले.

"इथं जंगलात राहून मला कसं समजणार ? कुणीही मला काही खबर देत नाही," मोठ्या मुलाने धूर्तपणे उत्तर दिले.

आपल्या सदऱ्याच्या खिशातून आपले ओळखपत्र बाहेर काढून दाखवि-

ण्याविना अलेक्सेईपाशी दुसरा पर्याय उरला नाही. लाल सेनेच्या अधिकाऱ्याचे तारांकित ओळखपत्र दृष्टीस पडताच त्या मुलांवर जादूसारखा परिणाम घडला. जर्मनांच्या कबजात काही काळ राहिल्यामुळे त्यांचे हरवलेले बालपण, त्यांचा स्वतःचा लाडका सोविएत वैमानिक दिसल्यामुळे जणू अचानक परतले होते.

"होय, होय, आपलीच माणसं इथं आहेत. गेले तीन दिवस ती इथं आहेत."

"तुम्ही एवढे हडकुळे का?"

"...आपल्या माणसांनी त्यांची अशी छान चंपी केली! इथं फार जोरात लढाई झाली. खूप माणसं मेली! खूपच!"

"...धूम पळाले लेकाचे! त्यांना पळताना पाहून गंमत वाटली. त्यांच्यातल्या एकानं न्हाणीघरातल्या टबाला घोडा जुंपला आणि त्यात बसून तो पळाला. दोघे जखमी झाले होते तरी एकानं घोड्याच्या शेपटीला धरलं होतं, तर दुसरा सरदाराच्या ऐटीत घोड्यावर बसून गेला. तुम्ही पहायला हवं होतं त्यांना!

...त्यांनी तुमचं विमान कुठं पाडलं?"

थोडा वेळ बडबड केल्यानंतर ती मुले कामाला लागली. तेथून सुमारे पाच किलोमीटर अंतरावर ती रहात होती, असे त्यांनी सांगितले. अलेक्सेई एवढा अशक्त बनला होता की, आपल्या पाठीवर अधिक आरामशीरपणे पडून राहण्यासाठी कूस वळविणेही त्याला जमत नव्हते. त्या मुलांच्या भाषेत, "जर्मन लाकूडतोड छावणी" मधून सर्पण गोळा करण्यासाठी त्यांनी बरोबर एक घसरगाडी आणली होती. पण अलेक्सेईला वाहून नेण्यास ती घसरगाडी खूपच लहान होती. शिवाय, चाकोरीच्या वाटा नसलेल्या बर्फावरून त्याला ओढून नेणे त्या मुलांच्या ताकदीपलिकडील काम होते. मोठ्या मुलाचे नांव सेर्योन्का होते आणि त्याच्या धाकट्या भावाचे फेद्का. जास्तीत जास्त वेगाने खेड्यापर्यंत पळत जाऊन मदत घेऊन ये असे सेर्योन्काने फेद्काला सांगितले व अलेक्सेईचे जर्मनांपासून संरक्षण करण्याचे निमित्त सांगून तो तेथेच राहिला. प्रत्यक्षात मात्र त्याने तसे करण्याचे कारण, मनोमनी अलेक्सेईवर त्याचा विश्वास बसला नव्हता. "काही नेम नाही," त्याने स्वतःशी विचार केला होता. "हे फॅसिस्ट मोठे धूर्त आहेत. मरणाचं सोंग आणू शकतात आणि सोविएत सैनिकांची ओळखपत्रंही मिळवतात..." पण हळूहळू त्याची भीती विरली व तो मोकळेपणाने बोलू लागला.

देवदारांच्या टोकदार पानांच्या मऊ बिछान्यावर डोळे अर्धवट मिटून, त्या मुलाची बडबड अर्धवट ऐकत अलेक्सेई स्वस्थ पडून होता. त्याच्या शरीरामध्ये एकदम सुस्त शिथिलता पसरली होती व त्या मुलाचे फक्त काही शब्दच त्याच्या कानांपर्यंत पोहोचत होते. त्या शब्दांचा अर्थ जरी त्याला समजत नव्हता, तरी आपल्या मायभाषेचे ध्वनी ऐकण्यात त्याला अपार सुख होत होते. प्लावनी खेड्यातील लोकांवर कोणती आपत्ती कोसळली होती तिची हकीकत त्याला नंतर समजली.

जंगले आणि तळी असलेल्या ह्या प्रदेशात जर्मन गेल्या ऑक्टोबरातच घुसले होते. त्यावेळी भोजाची पाने पिवळ्या रंगात चमकत होती आणि ॲस्पची पाने लालभडक आगीसारखी बनली होती. प्लावनीच्या जवळच्या परिसरात लढाई झाली नव्हती. खेड्याच्या पश्चिमेस सुमारे तीस किलोमीटरवर प्रभावी रणगाडादळ अग्रभागी असलेल्या जर्मन फौजा येऊन ठेपल्या होत्या. सोविएत सेनेने घाईघाईने उभारलेली बचावाची फळी जर्मनांनी मोडून काढली होती व मुख्य रस्त्यापासून दूर असलेल्या तळयामागे लपलेल्या प्लावनी खेड्याजवळून ते पूर्वेकडे चालले होते. बोलोगोये नांवाचे मोठे रेल्वे जंक्शन काबीज करायचे व पश्चिम आणि वायव्य आघाड्यांना तोडायचे, असा त्यांचा बेत होता. कालीनिन प्रदेशामधील सर्व लोकांनी—नगरवासी, शेतकरी, स्त्रिया, म्हातारे, मुले, सर्व वयांच्या आणि सर्व व्यवसायांच्या लोकांनी—सबंध उन्हाळाभर व शरदाच्या मोसमात रात्रंदिवस राबून, पावसाची आणि ऊन्हाची पर्वा न करता, डास-चिलटांना न जुमानता, दलदलीला व दूषित पिण्याच्या पाण्याला न घाबरता, खंदक खणले होते, संरक्षणाचे मोर्चे उभारण्यास मदत केली होती. ही बचावाची फळी दक्षिणेकडून उत्तरेपर्यंत शेकडो किलोमीटर अंतर पसरली होती. जंगल, दलदल, तळ्यांचे किनारे, लहान-मोठ्या नद्यांचे व ओढ्यांचे तीर, यांच्यामधून ही संरक्षण फळी उभी होती.

ही संरक्षण फळी उभारणाऱ्यांना अतोनात हाल सोसावे लागले. पण त्यांचे कष्ट वाया गेले नव्हते. जर्मनांनी पहिल्या झपाट्यात काही फळ्या जरी फोडल्या, तरी त्यांना शेवटच्या फळीशी पायबंद बसला. लढाईचे रूप बदलले. बोलोगोयेपर्यंत मुसंडी मारून जाण्यात जर्मन अयशस्वी ठरले. दक्षिणेकडे अधिक दूरवर आपल्या हल्ल्याचा दाब त्यांना वाढवावा लागला व ह्या क्षेत्रात त्यांनी बचावात्मक फळी उभारली.

प्लावनीचे शेतकरी आपल्या वालुकामय, चिकणमातीवर पुरेसे पीक काढू शकत नव्हते व जंगलातील तळ्यांमध्ये मासेमारी करून त्यांना अन्नातील तूट भरून काढावी लागत होती. युद्धाचे संकट प्रत्यक्ष आपल्यावर न येता शेजारून निघून गेले याचा त्यांना आनंद झाला होता. जर्मनांच्या हुकुमांनुसार त्यांनी आपल्या सामुदायिक शेताच्या अध्यक्षाला गावप्रमुख असे नवे नांव दिले, पण सामुदायिक शेताचे काम मात्र तसेच पुढे चालू ठेवले. सोविएत भूमीला फॅसिस्ट कायमचे तुडवीत राहणार नाहीत आणि युद्धाचे वादळ शमून जाईपर्यंत आपल्या दूरच्या निवांत खेड्यात शांतपणे जगता येईल अशी त्यांना आशा वाटत होती. पण राखाडी गणवेषांमधील जर्मनांनंतर काळ्या गणवेषांमधील जर्मन आले. त्यांच्या टोप्यांवर कवटीचे आणि एकमेकांना छेदणाऱ्या दोन हाडांचे चित्र होते. जर्मनीत कायम काम करण्यासाठी पंधरा स्वयंसेवकांना चोवीस तासांच्या आत धाडावे अथवा कडक शासन केले जाईल, असा हुकूम प्लावनीच्या रहिवाशांना देण्यात आला. खेड्याच्या एका टोकाला असलेल्या सामुदायिक शेताच्या कचेरीच्या इमारतीत स्वयंसेवकांनी जमावयाचे होते. त्यांनी स्वतःबरोबर अंतर्वस्त्रांची एक जोडी, एक चमचा, एक सुरी, एक काटा व दहा दिवस पुरेल एवढा शिधा घ्यायचा होता. पण नेमून दिलेल्या वेळी तेथे कुणीही फिरकले नाही. आज्ञेबरहुकूम कुणी येईल अशी काळ्या पोषाखातील जर्मनांना मुळीच आशा नव्हती, हे मात्र सांगितले पाहिजे. खेड्याला धडा शिकविण्यासाठी त्यांनी सामुदायिक शेताच्या अध्यक्षाला, म्हणजे आताच्या गावप्रमुखाला पकडले. तसेच बालवाडीच्या प्रमुख वेरोनिका ग्रिगोऱ्येवना, सामुदायिक शेताच्या दोन पथकप्रमुखांना व हाती सापडलेल्या आणखी दहा शेतकऱ्यांनाही जर्मनांनी पकडले आणि सर्वांना गोळ्या घातल्या. त्यांची प्रेते पुरायची नाहीत अशी त्यांनी गावकऱ्यांना ताकीद दिली व दुसऱ्या दिवशी नेमून दिलेल्या वेळी जर स्वयंसेवक हजर झाले नाहीत तर सबंध गावाची तशीच विल्हेवाट लावण्यात येईल असा दम भरला.

पुन्हा कुणीही आले नाही. दुसऱ्या दिवशी एस्‌एस् सॉन्देरकमान्डोमधील हिटलरी अनुयायी गावात फिरले तेव्हा प्रत्येक घर ओसाड पडल्याचे त्यांना आढळले. लहान-थोर यांपैकी कुणीही नव्हते. वर्षानुवर्षांच्या कष्टांनी जमा केलेली आपली चीजवस्तू टाकून, आपली भूमी सोडून आणि जवळ जवळ सारी गुरेढोरे टाकून, गावातील माणसे आपला मागमूसही न ठेवता रातोरात नाहीशी झाली होती. त्या भागात रात्रीच्या वेळी पडणाऱ्या धुक्याचा आडोसा

त्यांच्या पथ्यावर पडला होता. अठरा किलोमीटर दूर असलेल्यां, जंगलाच्या गाभ्यातील एक जुन्या मोकळया जागी खेड्यातील एकूण एक माणसे गेली. वसती करण्यासाटी तेथे त्यांनी निवारे खोदले. नंतर पार्तीझानांमध्ये सामील होण्यासाटी पुरुष निघून गेले व वसंतापर्यंत तग धरून राहण्यासाठी बायका-मुले तेथेच थांबली.

सॉन्देरकमान्डोनी निर्जन खेडे जाळून भस्मसात केले. त्या भागातील बहुतेक खेड्यांची त्यांनी अशीच वासलात लावली होती. मृतपट्टा असे त्यांनी त्या प्रदेशाला नांव दिले होते.

"माझे वडील सामुदायिक शेताचे अध्यक्ष होते. त्यांना गावप्रमुख म्हणून ते हाक मारायचे," सेर्योन्का म्हणाला. जणू भिंतीच्या दुसऱ्या बाजूने यावेत तसे त्याचे शब्द अलेक्सेईच्या मेंदूपर्यंत पोहोचले. "जर्मनांनी माझ्या वडलांना ठार मारलं. माझ्या मोठ्या भावालाही ठार मारलं. तो अधू होता. त्याला फक्त एकच हात होता. झोडपणीच्या वेळी त्याचा हात चिरडला होता आणि कापून काढावा लागला होता. सोळा माणसांना त्यांनी ठार मारलं... मी स्वतः पाहिलं. जर्मनांनी आम्हा सर्वांना जबरीनं गोळा करून ते पहायला लावलं. माझे वडील त्यांच्यावर ओरडत होते, त्यांना शिव्या देत होते. 'तुम्हाला याचा जाब द्यावा लागेल हरामखोरांनो! ह्या कृत्याबद्दल तुम्हाला रक्ताची आसवं गाळावी लागतील!' असं माझ्या वडलांनी जर्मनांना बजावलं!"

सोनेरी केसांच्या, मोठ्या, कष्टी आणि थकलेल्या डोळयांच्या ह्या मुलाचे बोलणे ऐकत असताना आपल्या अंगातून एक विलक्षण संवेदना थरारत गेल्याचे अलेक्सेईला जाणवले. दाट धुक्यात जणू तो तरंगत होता. अमानुष ताण सहन केलेले त्याचे शरीर आता अजिंक्य थकव्याने घेरले होते. साधे हाताचे बोट हलविणेही त्याला अशक्य झाले. अवघ्या दोन तासांपूर्वी आपण पुढे सरकत चाललो होतो यावर त्याचा स्वतःचाच विश्वास बसेना.

"तर मग तुम्ही जंगलात राहता?" जवळ जवळ ऐकू न येणाऱ्या आवाजात त्याने त्या मुलाला विचारले. झोपेच्या गुंगीमधून अलेक्सेई स्वतःला मोठ्या कष्टाने मुक्त करू पहात होता.

"हो! आम्ही आता तिघं आहोत. फेद्‌का, आई आणि मी. मला एक बहीण होती—न्यूश्का तिचं नांव. हिवाळयात ती वारली. तिला सबंध अंगाला सूज आली आणि ती मेली. माझा एक धाकटा भाऊसुद्धा मेला.

आता आम्ही तिघं उरलोय... जर्मन परत येत नाहीत ना? तुम्हाला काय वाटतं? माझ्या आईचे वडील, माझे आजोबा, आता आमचे अध्यक्ष आहेत. ते म्हणतात, जर्मन परत येणार नाहीत. 'स्मशानातून मेलेली माणसं परत येत नाहीत,' असं म्हणतात. पण माझी आई खूप घाबरलेली आहे. तिला पळून जावंसं वाटतं. जर्मन कदाचित परत येतील असं म्हणते... ते बघा! आजोबा आणि फेद्का आले!"

मोकळया जागेच्या टोकाशी तांबडकेशा फेद्का उभा होता आणि अलेक्सेई-कडे बोट करून दाखवीत होता. त्याच्या शेजारी एक उंच, गोल खांद्यांचा म्हातारा माणूस हातमागावर विणलेल्या फिकट तपकिरी फाटक्या कोटात उभा होता. त्याने कोटावर कमरेभोवती दोरी बांधली होती व जर्मन अधिका-ऱ्याची उंच टोकदार टोपी डोक्यावर घातली होती.

मुले ह्या माणसाला मिखाईल आजोबा म्हणून हाक मारीत होती. खेड्यातील घरांमध्ये साध्यासुध्या तसबिरींवर रेखाटलेल्या संत निकोलसप्रमाणे मिखाईल आजोबांचा चेहरा प्रेमळ, दयाळू होता. त्यांचे डोळे लहान मुला-प्रमाणे नितळ, तेजस्वी होते. मऊशार, विरळ, लांब रूळणारी रुपेरी दाढी होती. वेगवेगळ्या रंगांची ठिगळे लावलेला एक जुना मेंढकातडी कोट त्यांनी अलेक्सेईच्या अंगाभोवती गुंडाळला. अलेक्सेईचे क्षीण सापळयासारखे शरीर उचलून तो कोट त्याला गुंडाळीत असताना भाबड्या आश्चर्याने ते पुटपुटत होते:

"बिच्चारा! असा कसा वाळून गेलास! देवा रे देवा, नुसता हाडांचा सापळा! ह्या युद्धानं लोकांची काय दशा करून टाकलीय! कठीण आहे सारंच!"

एखाद्या नवजात अर्भकाची काळजी घ्यावी तशा हळुवारपणे त्यांनी अलेक्सेईला घसरगाडीवर ठेवले. त्याच्या अंगाभोवती दोरी बांधली. मग क्षणभर त्यांनी विचार केला, आपल्या अंगातील कोट काढला व अलेक्सेईच्या डोक्याखाली उशी म्हणून गुंडाळून ठेवला. नंतर पोत्यापासून बनविलेल्या लगामाला त्यांनी स्वतःला जुंपले व लगामाची एकेक दोरी मुलांच्या हातीं देऊन ते म्हणाले: "देव आपलं रक्षण करो!" वितळत जाणाऱ्या बर्फावरून ती घसरगाडी ओढण्यास त्या तिघांनी आरंभ केला. गाडीच्या धावपट्ट्यांना बर्फ चिकटत होता, त्याचा आवाज होत होता, त्यांच्या पायांखालून बर्फ सरकत होता.

त्यानंतरचे दोन-तीन दिवस अलेक्सेई जणू दाट, गरम धुक्यात गुरफटला होता. त्या धुक्यामधून भोवताली घडणाऱ्या घडामोडींचे केवळ एक अस्पष्ट चित्र त्याला दिसत होते. वास्तव आणि भ्रमामधील आभास यांची सरमिसळ झाली होती. पुढे बराच काळ गेल्यानंतर केवळ तो सर्व घडामोडींची संगतवार जुळणी करू शकला.

निबिड अरण्यात खोलवर ती निर्वासित माणसे रहात होती. त्यांच्या जमिनीत खोदलेल्या निवाऱ्यांवर देवदारांच्या डहाळया पसरलेल्या होत्या. त्या डहाळयांवर अजूनही हिमाचे थर साचलेले होते व त्यामुळे आतील लपण्याच्या जागा मुळीच ओळखू येत नव्हत्या. त्यांच्यामधून उमटणारा धूर थेट जमिनीमधून येत असल्यासारखे वाटत होते. अलेक्सेईचे तेथे आगमन झाले त्या दिवशी वारा पडलेला होता. धूर शेवाळयाला चिकटला होता आणि झाडांभोवती त्याचे विळखे पसरले होते. त्यामुळे अलेक्सेईला वाटले होते की, विझणाऱ्या वणव्याचा त्या जागेला वेढा पडला होता.

अचानकपणे त्या स्थळी टपकलेल्या एका सोविएत वैमानिकाला मिखाईल आजोबा आणीत आहेत आणि फेद्काच्या बातमीनुसार तो वैमानिक म्हणजे नुसता "हाडांचा सापळा" आहे, असे समजल्यानंतर, त्या भूमीगत वस्ती-मधील सर्व रहिवाशी—मुख्यतः बायका, मुले आणि काही म्हातारे पुरुष—त्या वैमानिकाच्या स्वागताला धावून गेले. झाडांमधून जेव्हा "त्रोयका"* दिसली, तेव्हा बायका तिच्या दिशेने पुढे धावल्या. मुलांनीही तेथे दाटी केली. मुलांना दूर पिटाळीत बायकांनी त्या घसरगाडीला भूमीगत निवाऱ्यां-पर्यंत सोबत केली. त्या रडत होत्या, विव्हळत होत्या. त्या सगळया बायकां-च्या अंगावरील वस्त्रांची लक्तरे झाली होती व सगळया सारख्याच म्हाताऱ्या दिसत होत्या. निवाऱ्यांमधील धुराने आणि काजळीने त्यांचे चेहरे काळवंडले होते. त्यांच्या काळसर त्वचेच्या पार्श्वभूमीवर चमकणाऱ्या त्यांच्या तेजस्वी डोळयांवरून व पांढऱ्या दातांवरूनच केवळ तरुण आणि म्हाताऱ्या बायकां-मधील भेद ओळखणे शक्य होते.

---

* त्रोयका—तीन घोडे जुंपलेली रशियन घसरगाडी—अनु.

"बायकांनो, तुम्ही कशाला गोळा झाला आहात इथं? हा काय खेळ आहे?" मिखाईल आजोबा रागाने गरजले. "इथून सगळ्या चालत्या व्हा पाहू! काय मेंढरांसारख्या आहेत ह्या बायका! छी:!"

बायकांच्या घोळक्यांमधून येणारे आवाज अलेक्सेई ऐकत होता:

"बाई ग, किती बारीक आहे! अगदी हाडांचा सापळा! अजीबात हालचाल नाही त्याची! जिवंत आहे का?"

"तो बेशुद्ध आहे. काय झालंय त्याला? बाई ग, किती हडकुळा!"

मग आश्चर्योद्‌गार थांबले. हा वैमानिक किती अज्ञात आणि भयानक अनुभवांमधून गेला असावा, ह्या विचारासरशी त्या बायका एकदम गप्प झाल्या. जंगलाच्या टोकापासून ते निवाऱ्याच्या ठिकाणापर्यंत घसरगाडी ओढून आणली जात होती तेव्हा अलेक्सेईला कुणाच्या निवाऱ्यात ठेवायचे ह्यावरून त्या बायकांमध्ये वाद जुंपला.

"माझी जागा कोरडी आहे. नुसती वाळूच वाळू. हवासुद्धा खूप... माझ्यापाशी स्टोव्हसुद्धा आहे," आनंदी डोळ्यांची, गोल चेहऱ्याची एक छोटी बाई म्हणाली. एखाद्या लहान नीग्रो मुलाप्रमाणे तिच्या डोळ्यांचे पांढरे पटल चमकत होते.

"स्टोव्ह आहे म्हणे! पण किती माणसं तुम्ही राहता तिथं? नुसत्या वासानं स्वर्गांत पाठवणी होईल एखाद्याची! मिखाईल, त्याला माझ्या घरात ठेवा. सोविएत सैन्यात माझी तीन मुलं आहेत. आणि माझ्यापाशी थोडं पीठ उरलंय. त्याला मी चांगलं खाऊ-पिऊ घालीन!"

"नाही नाही! माझ्या घरात ठेवा. माझ्यापाशी खूप जागा आहे. आम्ही दोघीच आहोत. मोकळी जागा खूप आहे. तुला काय त्याला खायला घालायचं असेल ते आणत जा. तो कुठं खातो त्यानं काय फरक पडायचाय! वस्यूशा आणि मी त्याची उत्तम काळजी घेऊ याची खात्री बाळगा. माझ्यापाशी काही गोडे मासे आणि अळंब्या आहेत... माशाचे आणि अळंब्यांचे सार मी त्याला खाऊ घालीन..."

"त्याचा एक पाय थडग्यात असताना तुझ्या माशाच्या सारानं काय होणार? आजोबा, त्याला आमच्याकडे ठेवा. आमच्यापाशी गाय आहे आणि आम्ही त्याला दूध पाजू शकू!"

पण मिखाईल आजोबांनी घसरगाडी थेट आपल्या निवाऱ्यापाशी ओढत नेली. त्या भूमीगत खेड्याच्या मध्यभागी त्यांचा निवारा होता.

...अलेक्सेईला आठवत होते की, जमिनीमध्ये खोदलेल्या एका छोटचा, निरुंद गुंफेत एका फळीवर तो निजून होता. भिंतीमध्ये एक लुकलुकता धूर ओकणारा दिवा फडफडत होता व त्याच्यामधून सतत ठिणग्या उडत होत्या. त्या दिव्याच्या उजेडात त्याला गुंफेमधील टेबल दिसत होते. जर्मन सुरुंगांच्या खोक्यांच्या फळ्यांपासून ते बनविलेले होते. जमिनीत पुरलेल्या एका खुंटावर ते टेबल उभे होते आणि अनेक तासलेले ओंडके टेबलाभोवती स्टुलांसारखे बसण्यासाठी वापरण्यात येत होते. काळा रुमाल बांधलेली आणि म्हाताऱ्या बाईचे कपडे घातलेली एक छोटी आकृती टेबलावर झुकली होती. ती होती वार्वारा. मिखाईल आजोबांची सर्वांत धाकटी सूनबाई. तिच्या शेजारी विरळ, पांढऱ्या झुलपांचे मिखाईल आजोबा उभे होते.

अलेक्सेई गवती गादीवर आडवा पडला होता. अजूनही ठिगळांचा मेंढकातडी कोट त्याच्या अंगाभोवती गुंडाळलेला होता. त्याला एक आल्हादक, आंबटसर, घरगुती वास येत होता... दगड मारून चेचल्याप्रमाणे जरी त्याचे शरीर ठणकत होते आणि तापलेल्या विटा ठेवल्याप्रमाणे पावले भाजत होती, तरी असे स्तब्ध पडून राहणे त्याला खूप सुखद वाटत होते. तो सुरक्षित होता, त्याला हालचाल करण्याची, अगर विचार करण्याची, अथवा सतत सावध राहण्याची गरज नव्हती, ही कल्पनासुद्धा त्याला सुखवीत होती.

गुंफेच्या कोपऱ्यातील शेकोटीमधून निघणाऱ्या धुराचे नागमोडी थर छतापर्यंत ओठंगले होते. तो केवळ धूरच नव्हे, तर तेथील टेबल, सतत काहीतरी कामात गुंतलेल्या मिखाईल आजोबांचे रुपेरी डोके आणि वार्वाराची कृश आकृतीसुद्धा तरंगत होती, झुलत होती व विरून जात होती असा अलेक्सेईला भास होत होता. त्याने डोळे मिटून घेतले. पोत्याचे अस्तर लावलेला गुंफेचा दरवाजा उघडला गेला व गार वाऱ्याचा झोत आला तेव्हा तो जागा झाला. एक बाई टेबलापाशी उभी होती. तिने टेबलावर एक पिशवी ठेवली होती व त्या पिशवीवर आपले हात टेकविले होते. जणू ती पिशवी परत नेण्याचा ती विचार करीत होती, असे वाटत होते. एक उसासा टाकून ती वार्वाराला म्हणाली :

"लढाईच्या आधीपासून माझ्यापाशी पीठ होतं. माझ्या कोस्त्यून्कासाठी आत्तापर्यंत राखून ठेवलं होतं. पण त्याला आता कशाचीच गरज नाही. हे घे आणि तुझ्या पाहुण्यासाठी रांध. लहान मुलांना खूप चांगलं असतं आणि त्याला अशा अन्नाचीच जरूरी आहे."

मागे वळून ती बाहेर निघून गेली. तिच्या दुःखाचा गुंफेतील प्रत्येकावर परिणाम झाला. नंतर आणखी कुणी गोठवलेले मासे आणले, कुणी दगडी चुलीवर भाजलेली धिरडी आणली. ताज्या भाजलेल्या पावाचा आंबूस, गरम वास गुंफेत दरवळला.

सेर्योन्का आणि फेद्‌का आले. एखाद्या मोठ्या शेतकऱ्याप्रमाणे सेर्योन्काने डोक्यावरची टोपी उतरवीत गंभीरपणे म्हटले: "नमस्ते," आणि साखरेचे दोन खडे टेबलावर ठेवले. त्या साखरेला तंबाखूचे आणि भुशाचे कण चिकटलेले होते.

"आईनं पाठवलीय. साखर तुम्हाला चांगली. खा!" तो म्हणाला आणि मिखाईलकडे वळून चटपटीतपणे बोलला: "आम्ही परत जुन्या जागी गेलो होतो. एक लोखंडी भांडं, दोन धडधाकट फावडी आणि एक कुऱ्हाडीचं पातं एवढ्या गोष्टी मिळाल्या. त्या उपयोगी पडतील."

दरम्यान, आपल्या भावामागे उभा असलेला फेद्‌का टेबलावरील साखरेकडे हावऱ्या डोळ्यांनी पहात होता व तोंडाला सुटलेले पाणी सूं सूं आवाज करीत गिळत होता.

या सर्व गोष्टींवर नंतर अलेक्सेईने शांतपणे विचार केला तेव्हा ह्या भेटवस्तूंची महती त्याला पूर्णतः पटली. त्या खेड्यातील सुमारे एक-तृतीयांश रहिवासी त्या हिवाळ्यात उपासमारीपायी मेले होते. एक-दोन मृत्यू झाले नाहीत असे एकही कुटुंब तेथे नव्हते.

"अगं बायकांनो, तुम्ही किती लाख मोलाच्या आहात! अलेक्सेई, ऐकलंस का रे? मी म्हणतो की, रशियन बाई अमोल आहे. तुम्ही नुसता तिच्या काळजाला हात घालायचा, ती आपल्या जवळचा शेवटचा सुतळीचा तोडा काढून तुम्हाला देईल. वेळ पडली तर स्वतःचा बळी देईल. आपल्या बायका ह्या अशा आहेत. खरं आहे का नाही?" अलेक्सेईसाठी आणलेल्या भेटी स्वीकारताना मिखाईल आजोबा म्हणत. मग ते पुन्हा हातातले काम सुरू करीत: जू, घोड्याचा लगाम अथवा झिजलेल्या नमदी बुटांची दुरुस्ती. "आणि कामातसुद्धा आपल्या बायका पुरुषांच्या मुळीच मागं नाहीत. खरं सांगायचं तर एक-दोन नव्या गोष्टी त्याच आम्हाला शिकवू शकतील: पण त्यांच्या जिभा मला आवडत नाहीत! ह्या बायका माझा काळ ठरणार, मी सांगून ठेवतो, त्याच माझा काळ ठरणार! माझी अनीस्या मेली तेव्हा स्वतःशी म्हटलं: 'परमेश्वरा, बरं झालं बाबा! आता मला थोडी शांती

लाभेल!' पण असा विचार मनात आणल्याबद्दल देवानं मला शिक्षा केली बघ! सैन्यात न घेतलेले आमचे सगळे पुरुष जर्मनांविरुद्ध लढायला पार्तीझा-नांमध्ये सामील झाले. आणि मी करंटा माझ्या पापाची फळं भोगायला इथं बायकांचा कमांडर झालोय! मेंढ्यांच्या कळपातल्या बकऱ्यासारखा!"

ह्या जंगलच्या वसाहतीमधील अनेक गोष्टी पाहून अलेक्सेई चकित झाला होता. प्लावनी खेड्यातील रहिवाशांची घरे, त्यांची मालमत्ता, त्यांची शेतीची अवजारे, गुरे, घरगुती भांडी आणि कपडे जर्मनांनी लुटले होते. थोडक्यात म्हणजे प्लावनीच्या रहिवाशांच्या अनेक पिढ्यांच्या कष्टांची कमाई जर्मनांनी लुटली होती व ही माणसे सध्या जंगलात अतिशय हालांमध्ये रहात होती. जर्मन त्यांना हुडकून काढतील अशा सतत धास्तीत वावरत होती. थंडीत त्यांची उपासमार होत होती आणि त्यांना कष्ट होत होते. पण सामुदायिक शेत भंगले नव्हते. उलट, युद्धाच्या महासंकटामुळे माणसे अधिक जवळ सांधली गेली होती. जमिनीमध्ये राहण्याची भुयारेसुद्धा त्यांनी सामुदा-यिकरीत्या खणली होती व त्या भुयारांमध्ये वाट्टेल तसे न जाता, शेतावर ज्या पथकांमधून ती काम करीत होती त्यांनुसार रहायला गेली होती. मिखाईल आजोबांचा जावई मारला गेल्यानंतर सामुदायिक शेताच्या अध्यक्ष-पदाची सूत्रे त्यांनी आपल्या हाती घेतली होती व त्या जंगलात ते सामुदायिक शेताच्या सर्व नियमांचे निष्ठेने काटेकोर पालन करीत होते. आता त्यांच्या मार्गदर्शनाखाली ते गुंफा-खेडे त्या निबिड अरण्यात वसंताच्या मोसमाची तयारी करण्यात गुंतले होते. वेगवेगळी पथके कामाला लागली होती.

उपासमार होत होती तरीही, खेड्यामधून पळून येताना किसान महिलांनी जे काही धान्य बरोबर आणले होते ते सर्वच्या सर्व त्यांनी सामुदा-यिक भुयारात प्रामाणिकपणे आणून ओतले होते. जर्मनांपासून वाचविलेल्या गायींच्या वासरांची खूप काळजी घेण्यात येत होती. लोक उपास सहन करीत होते, पण सामुदायिक मालकीच्या गुरांची त्यांनी कत्तल केली नाही. खेड्या-तील पोरांनी आपले जीव धोक्यात घातले होते, आपल्या जुन्या, जळक्या खेड्यात जाऊन राखेच्या ढिगाऱ्यांमधून नांगराचे फाळ शोधून आणले होते. आगीच्या धगीमुळे ते फाळ निळे पडले होते. त्या फाळांना त्यांनी गुंफा-खेड्यात आणले होते व लाकडी मुठी बसविल्या. वासंतिक नांगरणीला गायींचा वापर करण्यासाठी बायकांनी पोती शिवून जोखडे बनवली. बायकांची

पथके आळीपाळीने तळ्यात मासे धरीत होती व हिवाळयात सबंध खेड्याला अन्न पुरवीत होती.

मिखाईल आजोबा जरी "आपल्या बायकां" बद्दल कुरकुर करीत आणि त्यांच्यावर ओरडत, सामुदायिक शेताशी संबंधित एखाद्या गोष्टीविषयी – जिचा आशय अलेक्सेईला समजत नसे – त्या बायका जेव्हा त्यांच्या गुंफेत येऊन तावातावाने भांडू लागत तेव्हा जरी ते आपल्या कानांवर हात ठेवीत, जेव्हा त्यांची सहनशक्ती संपे तेव्हा जरी ते त्या बायकांवर आपल्या तारस्वरात खेकसत, तरी त्या बायकांचे महत्त्व ते मनोमन जाणून होते. आपल्या मूक श्रोत्याच्या नम्रपणाचा फायदा घेऊन ते आपल्या "बायकांच्या टोळी"ची आकाश फाटेपर्यंत त्याच्यापाशी स्तुती करीत.

"लाडक्या अलेक्सेई, काय झालं पहा," ते म्हणत. "बाई आपल्या वस्तूला नेहमी दोन्ही हातांनी घट्ट धरून ठेवणार. होय की नाही? असं ती का वागते? ती चिक्कू असते म्हणून? मुळीच नाही. ती असं करते कारण ती वस्तू तिला प्रिय असते. ती मुलांना खाऊ घालत असते. तू काहीही म्हण, पण बाईच खरं घर चालवते. आता इथं काय झालं ऐक. आम्ही कसं जगतोय ते तू पाहतोसच. प्रत्येक घास आम्ही मोजतोय. आमची उपासमार होतेय. जानेवारीमधली गोष्ट. पार्तीझानांची एक टोळी अचानक उगवली. ती आमच्या गावातली माणसं नव्हती. आमची माणसं तिकडं ओलेनिनपाशी लढताहेत असं आम्ही ऐकलं. ही माणसं रेल्वेतली होती, आमच्या ओळखीची नव्हती. ती आमच्याकडे आली: 'आम्ही उपासमारीनं मरतोय' म्हणे! मग काय घडलं असं वाटतं तुला? ह्या बायकांची स्वत:ची मुलं जरी उपासापायी सुजली होती, चालायचे त्राण त्यांच्या अंगी राहिले नव्हते, तरी दुसऱ्या दिवशी ह्या बायकांनी त्या माणसांच्या थैल्या अन्नानं भरून दिल्या. आता बोल! मी जर मोठा सेनापती असतो तर, जर्मनांना आपण लाथ मारून हाकलून लावल्यानंतर, माझ्या उत्तम उत्तम शिपाई-गड्यांना मी एकत्र गोळा केलं असतं आणि बाईसमोर रांगेत उभं करून ह्या रशियन बाईला मानवंदना द्यायला सांगितलं असतं. समजलं?.."

म्हाताऱ्याच्या बडबडीचा अलेक्सेईवर अंगाई गीतासारखा परिणाम व्हायचा व म्हातारबाबा बडबडत असताना अनेकदा तो एक छोटी डुलकी काढायचा. काही वेळा मात्र अलेक्सेईला आपल्या खिशामधून पत्रे व त्या मुलीचा फोटो बाहेर काढून मिखाईल आजोबांना दाखविण्याची ऊर्मी यायची,

पण हलण्याची ताकद त्याच्या अंगी नव्हती. पण मिखाईल आजोबा जेव्हा जेव्हा आपल्या बायकांचे कौतुक करू लागत तेव्हा तेव्हा आपल्या सदऱ्याच्या खिशामधून त्या पत्रांची ऊब अलेक्सेईला जाणवायची.

मिखाईल आजोबांची गप्प राहणारी व सदैव काहीतरी कामात गुंतलेली सूनबाईसुद्धा टेबलाशी बसत असे.

आरंभी अलेक्सेईला ती म्हातारी बाई वाटली होती, आजोबांची बायको वाटली होती. पण नंतर त्याला दिसले की, तिचे वय वीस-बावीसपेक्षा जास्त नव्हते. ती चपळ होती, डौलदार होती आणि सुंदर होती. जेव्हा जेव्हा ती त्याच्याकडे भेदरलेला, चिंतायुक्त कटाक्ष टाकी, तेव्हा तेव्हा ती एक थरथरता उसासा सोडे असे त्याच्या ध्यानात आले होते. जणू ती घशाशी आलेला आवंढा गिळून टाकायची. काही वेळा, रात्रीच्या प्रहरी, दिवा जळून संपायचा आणि गुंफेमध्ये धुरकट अंधार पसरायचा तेव्हा रातकिडा किरकिर गाणे सुरू करायचा. मिखाईल आजोबांना हा रातकिडा जळक्या खेड्यात सापडला होता आणि घरच्यासारखे वाटावे म्हणून एका जळक्या भांड्याबरोबर ते ह्या रातकिड्यालाही आपल्या बाहीत घेऊन आले होते. अशा वेळी शेजारच्या फळीवर कुणीतरी हळूच रडत आहे आणि रडण्याचा आवाज दाबण्यासाठी उशी तोंडात कोंबते आहे, असे अलेक्सेईला वाटायचे.

१६

मिखाईल आजोबांकडे अलेक्सेईचा मुक्काम पडून तीन दिवस झाले होते. तिसऱ्या दिवशी म्हातारबाबा ठाम स्वरात अलेक्सेईला म्हणाले:

"अलेक्सेई, तू उवांनी बुजबुजला आहेस! ह्या उवा शेणकिड्यांपेक्षा वाईट असतात! आणि तुझं तुला खाजवणंही जड जातंय. तेव्हा आता मी तुला चांगली घसघशीत आंघोळ घालतो. कसं? वाफावल्या पाण्याची आंघोळ! छान वाटेल. तुझं अंग धुवून काढतो आणि तुझ्या हाडांना वाफेचा थोडा शेक देतो. जे काही तू सोसलं आहेस त्याला जरा उतारा मिळेल. काय म्हणणं आहे तुझं? बरोबर सांगतोय ना मी?"

मिखाईल आजोबा अलेक्सेईच्या आंघोळीची तयारी करू लागले. कोपऱ्यातील शेकोटीत त्यांनी एवढा जाळ पेटविला की, शेकोटीचे दगड तापून तडकू लागले. भुयाराबाहेरही आणखी एक मोठा जाळ पेटविण्यात आला.

तेथे एक मोठा दगड तापवीत ठेवला होता. वार्याने लाकडाचा जुना टब पाण्याने भरला. जमिनीवर पिवळे गवत पसरण्यात आले. मिखाईल आजोबा केवळ चड्डीत उघड्या अंगाने वावरत होते. एका छोट्या लाकडी बादलीत त्यांनी चटकन काहीतरी अल्कली मिसळले. अंग घासण्यासाठी तागाच्या चटईचा एक तुकडा त्यांनी फाडून काढला. भुयार जेव्हा खूप तापले व छतावरून थंड पाण्याचे थेंब ठिपकू लागले तेव्हा म्हातारबाबा घाईघाईने बाहेर गेले व लोखंडी पत्र्याच्या तुकड्यावर लालबुंद तापलेला दगड घेऊन आले. टबात त्यांनी तो दगड टाकला. वाफेचा एक प्रचंड लोट स्स आवाज करीत छताला जाऊन भिडला. मग तो वाफेचा ढग मोडला व सबंध भुयारात त्याच्या कुरळ्या रेषा पसरल्या. त्या धुंदकारल्या वातावरणात काहीही स्पष्ट दिसत नव्हते, पण म्हातारबाबांचे चपळ हात आपल्या अंगावरील कपडे झरझर उतरवीत असल्याचे अलेक्सेईला जाणवले.

वार्या आपल्या सासरेबुवांना मदत करीत होती. गरम होत असल्यामुळे तिनेही आपल्या अंगातील गोधडीचा कोट आणि डोईवरचा रुमाल बाजूला काढून टाकला होता. आत्तापर्यंत तिच्या विरविरलेल्या रुमालाआड तिच्या जाड वेण्या दडून बसलेल्या होत्या. पण रुमालाचे बंधन सुटताच तिच्या भरघोस वेण्या पाठीवर रूळू लागल्या. क्षणात त्या धार्मिक म्हातारीचे एका सडपातळ, मोठ्या डोळ्यांच्या चपळ तरुणीत रूपांतर झाले. हा कायापालट एवढा अनपेक्षित होता, की आत्तापर्यंत तिच्याकडे अजीबात लक्ष न देणाऱ्या अलेक्सेईला स्वतःच्या नागडेपणाची लाज वाटली.

"अलेक्सेई, पोरा, काही हरकत नाही," मिखाईल आजोबांनी त्याला धीर देत म्हटले. "काही इलाज नाही. तुला आम्ही आंघोळ घालणे अगदी आवश्यक आहे. मी असं ऐकलंय की, फिन्लंडात बायका आणि पुरुष एकत्र आंघोळ करतात म्हणे! काय! हे खरं नाही? मग मला खोटं सांगितलं असावं. पण आत्ता इथं वार्या म्हणजे इस्पितळातल्या एखाद्या नर्सप्रमाणं आहे. जखमी सैनिकाची शुश्रूषा करणारी. तेव्हा तिची लाज बाळगायचं काही कारण नाही. वार्या, ह्याच्या अंगातला सदरा मी काढीपर्यंत ह्याला धरून ठेव. अरे देवा! कुजून याचे तुकडे पडताहेत!"

त्या तरुणीच्या मोठ्या, काळ्या डोळ्यांमध्ये भीती उमटलेली अलेक्सेईने पाहिली. अपघात झाल्यानंतर प्रथमच त्याने स्वतःचे शरीर वाफेच्या तरंगत्या पडद्याआडून पाहिले. सोनेरी गवतावर एक त्वचा पांघरलेला मानवी हाडांचा





सापळा पडला होता. त्याच्या गुडघ्याच्या वाट्या, टोकदार माकडहाड, खपाटीला गेलेले पोट व ठसठशीत बरगड्या अगदी उठून दिसत होत्या.

म्हाताऱ्याने बादलीमधील अल्कली पाणी ढवळले. त्या भुरकट, तेलकट द्रवामध्ये तागाचा स्पंज बुचकळला आणि अलेक्सेईच्या शरीराला घासण्यासाठी हात वर उचलला. गरम वाफेमधून त्याला गवतावर पडलेले अलेक्सेईचे कृश शरीर दिसले व त्याचा हात तसाच अधांतरी थबकला.

"अरे बापरे!" मिखाईल आजोबा उद्गारले. "अलेक्सेई, तुझी अवस्था अगदी भयानक आहे रे! फारच भयानक! गड्या, तू जर्मनांच्या तावडीतून निसटलास खरा, पण..."

आणि अलेक्सेईच्या पाठीला आधार देऊन उभ्या असलेल्या वार्याकडे एकदम वळून रागाने ते खेकसले:.

"ए सटवे, नागड्या पुरुषाकडं अशी टक लावून पहात काय बसलीस? ओठ कशाला चावतेस स्वतःचे? छीः, तुम्ही सगळ्या बायका सारख्याच! अरे अलेक्सेई, आत्ता या क्षणाला तू कशाचाही विचार करू नकोस. काही चिंता करू नकोस. आम्ही तुला मृत्यूच्या तावडीत देणार नाही. तुझी शुश्रूषा करून पुन्हा तुला धट्टाकट्टा बनवू. मी वचन देतो तुला!"

एखाद्या लहान मुलाला आंघोळ घालावी त्याप्रमाणे अत्यंत काळजीपूर्वकपणे आणि झटपट रीतीने मिखाईल आजोबांनी अलेक्सेईचे अंग अल्कली पाण्याने धुवून काढले. अलेक्सेईला कुशीवर वळवून त्याच्या अंगावर पाणी ओतले, खसाखसा त्याचे शरीर चोळले. अलेक्सेईच्या बरगड्यांवरून त्यांचे हात निसटत होते व पाण्याचा चुबुक चुबुक आवाज येत होता. वार्या मुकाटपणे त्यांना मदत करीत होती.

वस्तुतः तिला रागे भरण्याचे म्हातारबाबांना काही एक कारण नव्हते. तिच्या हातांमध्ये विकल होऊन पडलेल्या भयानक, लुकड्या शरीराकडे ती मुळीच पहात नव्हती. उलट त्या शरीरापासून आपले डोळे दुसरीकडे वळविण्याचा तिचा प्रयत्न चालला होता. पण वाफेमधून नकळतपणे तिची नजर अलेक्सेईच्या पायावर गेली व तिच्या डोळ्यांमध्ये एकदम भीतीची चमक उमटली. तिचे मन कल्पना करू लागले की, हा वैमानिक म्हणजे अचानक, अज्ञातातून तिच्या घरात टपकलेला कुणी अनोळखी नव्हता, तर तिचा स्वतःचा मीषा होता! हा अनपेक्षित पाहुणा नव्हता, तर तिचा स्वतःचा नवरा होता! रुंद खांद्यांच्या, तोंडावर मोठे, चकचकीत ठिपके असलेल्या,

प्रचंड भक्कम हातांच्या ह्या माणसाबरोबर तो वसंताचा अवघा एक मोसम राहिली होती आणि फॅसिस्ट राक्षसांनी त्याची आता अशी दशा करून टाकली होती. ती आपल्या मीषाचे निर्जीव शरीर आपल्या हातांमध्ये धरून उभी होती! भीतीने तिच्यावर पगडा बसविला, तिचे डोके गरगरू लागले. केवळ आपले ओठ चावूनच ती स्वतःचा तोल कसाबसा सावरू शकत होती.

...नंतर एका पातळ, पट्ट्यापट्ट्यांच्या गादीवर अलेक्सेई निजला होता. त्याच्या अंगात मिखाईल आजोबांचा एक लांब, खूप ठिगळे लावलेला, पण स्वच्छ व मऊ असा सदरा घातलेला होता. अलेक्सेईला सबंध शरीरभर एक ताजेपणा जाणवत होता, एक नवा जोम आल्यासारखे वाटत होते. चुलीवरील छताच्या भोकामधून सगळी वाफ विरून गेली होती. वार्याने अलेक्सेईला बिलबेरीच्या फळांचा गरम, धुरकट चहा प्यायला दिला. दोन पोरांनी आणून दिलेल्या साखरेच्या दोन खड्यांचे वार्याने बारीक बारीक तुकडे केले होते व भोजाच्या पांढऱ्या सालीवर ती साखर ठेवून अलेक्सेईला देऊ केली होती. चहा-साखर यांचा समाचार घेऊन अलेक्सेई झोपी गेला. अपघातात सापडल्यानंतर एवढी गाढ आणि स्वप्नविहीन झोप त्याला प्रथमच लागली होती.

मोठ्या आवाजातील संभाषणामुळे त्याला जाग आली. भुयारात अंधार दाटला होता. मिणमिणता दिवा जेमतेम धुमसत होता. त्या धुरकट अंधारात, मिखाईल आजोबांचा चिरका, वरच्या पट्टीतील आवाज त्याच्या कानी पडला:

"अगदी जातिवंत बाई आहेस! कुठं गेली तुझी अक्कल? त्या माणसाच्या तोंडात अठरा दिवस बाजरीचा दाणासुद्धा गेलेला नाही आणि तू हे काय घट्ट उकडलेलं घेऊन आलीस?... ही घट्ट उकडलेली अंडी त्याला ठार मारतील!" मग त्यांच्या आवाजात एकदम विनवणी आली: "आत्ता त्याला अंड्यांची गरज नाही. वासिलिसा, आत्ता त्याला काय आवश्यक आहे माहीत आहे? कोंबडीचं छानदार कढण! ते खाल्लं तर त्याच्यात नव्यानं जीव येईल. तेव्हा तू जर तुझी पार्तीझान्का आणून दिलीस तर... कसं?"

पण एका म्हातारीच्या भेदरलेल्या कर्कश्य आवाजाने मिखाईल आजोबांचे बोलणे मध्येच तोडले:

"मी मुळीच देणार नाही! मुळी मुळी नाही! थेरड्या सैताना, उगीच माझ्यापाशी मागू नकोस! काही उपयोग होणार नाही. पुन्हा ह्या

विषयावर माझ्याशी बोलू नकोस! माझी पार्तीझान्का देऊ?... कोंबडीचं कढण म्हणे!... बघ, लोकांनी काय काय आणून ठेवलंय इथं! एवढ्या गोष्टीत एखादं लग्नसुद्धा साजरं होईल!"

"वासिलिसा, अशी बायकी तऱ्हेची भाषा करायला तुला लाज वाटली पाहिजे!" म्हातारबाबांचा चिरका आवाज परत आला. "तुझे दोन मुलगे युद्धात लढताहेत आणि तरी तू असं मूर्खासारखं बोलतेस! हा माणूस आपल्या लोकांसाठी पांगळा झाला, आपलं रक्त त्यानं सांडलंय..."

"नको मला त्याचं रक्त! माझी मुलं माझ्यासाठी आपलं रक्त सांडताहेत! तुम्ही मागून काही उपयोग नाही. मी म्हणाले ना... मी मुळीच देणार नाही!"

एक वयस्क, म्हातारी आकृती दारापाशी तरंगत गेली. तिने दार उघडताच एक वासंतिक प्रकाशकिरण एकदम भुयारात घुसला. अलेक्सेईचे डोळे एकदम दिपले. त्याने डोळे गच्च मिटून घेतले व वेदनेचा एक चीत्कार त्याच्या तोंडून उमटला. म्हातारबाबा चटकन त्याच्यापाशी आले:

"अलेक्सेई, तू झोपलेला नव्हतास? आमचं बोलणं तू ऐकलंस? होय ना? पण तिला दूषणं देऊ नकोस. तिच्या शब्दांसाठी तिला दोषी ठरवू नकोस. शब्द म्हणजे कवच. त्यातला गाभा म्हणजे आवाज. कोंबडीचं तिला अप्रूप आहे असं वाटतं? मुळीच नाही रे अल्योशा! जर्मनांनी तिचं सबंध कुटुंब निपटून काढलं! दहा माणसांचं मोठ्ठं कुटुंब! तिचा सर्वांत मोठा मुलगा कर्नल आहे. जर्मनांना हे समजलं आणि वासिलिसा सोडून सबंध कुटुंबाला त्यांनी एकाच वेळी खड्डयात लोटलं. त्यांचं घर जाळून टाकलं. अशा वयात बाईनं एकाकी पडणं म्हणजे काय ते तू समजू शकतोस. तिच्यापाशी फक्त एक कोंबडी उरलीय. अल्योशा, तिची ही कोंबडी मोठी चलाख आहे. जर्मनांनी पहिल्याच आठवडयात गावातल्या सगळ्या कोंबडयांचा आणि बदकांचा फडशा पाडला होता. ह्या जर्मनांना कोंबडया-बदकं फार आवडतात. पण ही कोंबडी त्यांच्या तावडीतून निसटली! तुला सांगतो, ही साधीसुधी कोंबडी नाही. सर्कसमध्ये छान काम करील. अंगणात फॅसिस्ट आला रे आला, की पोटमाळ्यावर जाऊन लपून बसायची. अगदी हूं की चूं न करता! पण आपल्यापैकी कुणी माणसं आली तर मुळीच ढुंकून न पाहता ऐटीत फिरत रहायची. माणसांमधला फरक तिला कसा समजायचा देव जाणे!

तर सबंध खेड्यात शिल्लक उरलेली ती एकच कोंबडी! तिच्या धूर्तपणाला पाहून आम्ही तिला पार्तीझान्का असं नांव ठेवलंय."

मेरेस्येव डोळे उघडे ठेवून झोपला होता. जंगलात त्याला ही सवय लागली होती. त्याच्या गप्प राहण्यामुळे मिखाईल आजोबा अस्वस्थ बनले असावे. भुयारात काहीतरी खुडबूड करीत व टेबलाशी बसून नवा उद्योग हाती घेत त्यांनी पुन्हा त्याच विषयावर बोलणे चालू केले:

"अलेक्सेई, त्या बाईला दोष देऊ नकोस! माझ्या मित्रा, तिला समजून घ्यायचा प्रयत्न कर. प्रचंड अरण्यामधल्या एखाद्या जुन्या भोजवृक्षासारखी ती होती. चारी बाजूंनी वाऱ्यापासून संरक्षण मिळालेली. पण आता तिची अवस्था जंगलातल्या उघड्या जागेवरच्या जुन्या, कुजक्या खोडासारखी बनलीय. ती कोंबडी एवढं एकच तिचं सांत्वन आहे. अरे तू बोलत का नाहीस? झोपलास? बरं बरं, झोप."

अलेक्सेई झोपला होता आणि नव्हताही. पावाच्या आंबट वासाने, शेतकऱ्याच्या जुन्या घरातील वासाने घमघमणाऱ्या मेंढकातडी कोटात गुरफटून तो पडला होता. रातकिड्याची मंद किरकिर त्याला ऐकू येत होती, पण बोट हलविण्याची सुद्धा त्याला इच्छा होत नव्हती. आपल्या शरीरात जणू हाडेच नाहीत, तर केवळ उबदार कापूस भरलाय व त्यातून रक्ताचे स्पंदन चालू आहे, असे त्याला भासत होते. त्याचा मोडलेला, सुजलेला पाय भाजत होता, तीव्र कुरतडणाऱ्या वेदनेने ठणकत होता. पण कूस वळविण्याचे अगर किंचित हालचाल करण्याचेही त्राण त्याच्यात नव्हते.

त्या अर्धवट बेशुद्ध अवस्थेत अलेक्सेईला आपल्या भोवतालच्या जीवनाची तुकड्या-तुकड्यांनी जाणीव होत होती. जणू ते प्रत्यक्ष आयुष्य नव्हते, तर पडद्यावरील सिनेमामधील अद्भुत, विसंगत दृश्यांची मालिका होती.

वसंत आला होता. निर्वासित खेडे अत्यंत अवघड दिवसांमधून पार पडत होते. खेड्यातील रहिवासी आपला शेवटचा शिधा खात होते. हा धान्यसाठा त्यांनी पूर्वी जमिनीत पुरून ठेवलेला होता व आता रात्रीच्या वेळी गुपचूप जळक्या, भग्न खेड्यात जाऊन त्यांनी तो उकरून काढला होता आणि जंगलात आणला होता. जमिनीवरील बर्फ वितळत होते. घाईघाईने बांधलेले भूमीगत निवारे "अश्रू ढाळत" होते. भिंतींवरून आणि छतांवरून पाणी ठिपकत होते. भूमीगत खेड्याच्या पश्चिमेस ओलेनिन जंगलात चाललेल्या गनिमी लढायांमध्ये गुंतलेले पुरुष रात्रीच्या वेळी पूर्वी एकटच्या-

दुकट्याने येऊन आपल्या माणसांना भेटत होते. पण आता युद्धआघाडीने त्यांना तोडले होते. त्यांच्याकडून काहीही बातमी मिळत नव्हती. त्यामुळे आधीच खडतर बनलेले बायकांचे नशीब आणखीच वाईट झाले होते. आता वसंताचा मोसम सुरू झाला होता, बर्फ वितळत होता आणि पीकपेरणी करण्याचा व भाजीचे वाफे बनविण्याचा विचार करणे त्यांना भाग होते.

बायका चिंतांनी ग्रासलेल्या होत्या व चिडचिड्या बनल्या होत्या. आजोबांच्या भुयारात वारंवार कडाक्याची भांडणे पेटत होती, आरोप-प्रत्यारोप घडत होते. अशा वेळी खऱ्या आणि काल्पनिक अशा आपल्या सर्व नव्या-जुन्या गाऱ्हाण्यांची यादी बायका वाचत. काहीवेळा नुसताच गोंगाट होई. पण संतापलेल्या बायकांच्या आरडाओरडीच्या कल्लोळात धूर्त म्हातारबाबांनी त्यांच्या सामुदायिक शेतासंबंधी एखादी विधायक सूचना करण्याचा अवकाश, की सारी भांडणे तात्काळ विलयाला जात. म्हातारबाबा म्हणायचे : "जमिनीवरचं बर्फ वितळलं किंवा नाही ते जुन्या खेड्यात जाऊन कुणीतरी पाहण्याची वेळ झाली नाही का?" अथवा, "आता वारं छान सुटलंय. मला वाटतं, बियाणं थोडं वाळवावं. जमिनीतल्या कोठारात ते ओल्या मातीमुळं दमट बनलंय!" आणि अशा उद्‌गारांसरशी बायका आपली भांडणे विसरून जुटीने कामाला लागायच्या.

एक दिवस आजोबा मोठ्या प्रसन्नपणे भुयारात आले. पण तरीही त्यांचा चेहरा काहीसा अस्वस्थ होता. गवताचे हिरवे पाते त्यांनी स्वतःबरोबर आणले होते. आपल्या घट्टे पडलेल्या तळहातावर त्यांनी ते गवताचे पाते ठेवले आणि अलेक्सेईला दाखविले :

"हे बघ," ते म्हणाले. "मी आत्ताच शेतांमधनं आलो. जमिनीवरचं बर्फ वितळतंय आणि परमेश्वरकृपेनं हिवाळी पीक दिसू लागलंय. खूप बर्फ पडलं होतं. वासंतिक पीक आम्हाला जरी मिळालं नाही, तरी हिवाळी पीक आमची भाकरी भागवील. आता जाऊन बायकांना सांगतो. बिचाऱ्यांना खूप आनंद होईल!"

नीलकण्ठ पक्ष्यांच्या एखाद्या थव्याप्रमाणं भुयाराबाहेर बायकांची किलबिल चालू होती. शेतामधून आणलेल्या गवताच्या हिरव्या पात्याने त्यांना नवी आशा दिली होती. संध्याकाळच्या सुमारास आपले हात चोळीत आजोबा आत आले व म्हणाले :

"अलेक्सेई, माझ्या लांब केसवाल्या मंत्रिमंडळानं काय ठरवलं असं

वाटतं तुला? तुला सांगतो, काही वाईट नाही. जिथं पेरणी अवघड आहे अशा दरीत एक पथक नांगरणी करील. नांगराला गायींना जुंपणार आहेत. अर्थात गायी तशा फारशा उपयोगी पडत नाहीत म्हणा नांगरणीला. सबंध कळपामधून सहा गायी आमच्यापाशी उरल्या आहेत. दुसरं पथक वरचं शेत हातात घेईल. ते जास्त कोरडं आहे. तिथं फावड्यांनी आणि कुदळींनी खणतील. आपले भाजीचे वाफे आपण असे खणतो की नाही? तिसरं पथक टेकडीवर जाईल. तिथं वाळूची जमीन आहे. तिच्यात आम्ही बटाटे लावू. ते सोपं काम आहे. लहान पोरांना आणि जास्त दुबळ्या बायकांना आम्ही त्या कामावर पाठवू. लौकरच आम्हाला सरकारकडून मदत मिळेल. पण जरी तशी मदत नाही मिळाली तरी आम्ही आमचं भागवून घेऊ. सारं काम आमचं आम्ही करू. जमीन अजीबात वाया जाणार नाही त्याची खात्री देतो मी तुला. फॅसिस्टांना इथून हाकलून लावल्याबद्दल आपल्या माणसांचे आभारी आहोत. आता आम्हाला जगणं शक्य होईल. आम्ही फार चिवट माणसं आहोत. कितीही अवघड संकट आलं तरी त्याला तोंड द्यायची आमच्यात हिंमत आहे!"

बराच वेळपर्यंत आजोबांना झोप लागेना. आपल्या गवती बिछान्यावर ते सारखे कूस बदलत होते, खोकत होते, अंग खाजवीत होते व कण्हत होते. अनेक वेळा उठून ते पाण्याच्या बादलीपाशी गेले. लोटा बादलीत बुडवून घटाघटा पाणी प्यायले. सरतेशेवटी त्यांना राहवेना तेव्हा उठून त्यांनी मिणमिणता दिवा पेटविला. अर्धवट शुद्धीच्या अवस्थेत, उघडे डोळे ठेवून पडलेल्या अलेक्सेईला स्पर्श करीत ते म्हणाले:

"झोपलायस का रे अलेक्सेई? मी इथं पडून राहिलोय आणि विचार करतोय सारखा! जुन्या खेड्यात तिथं चौकात एक ओकचं झाड आहे. सुमारे तीस वर्षांपूर्वी पहिल्या महायुद्धाच्या वेळी, जेव्हा निकोलाय सिंहासनावर होता तेव्हा ह्या ओकच्या झाडावर वीज कोसळली होती, त्याचा शेंडा जळून गेला होता. पण झाड मोठं भक्कम होतं, त्याची मूळं खोल रुजलेली होती आणि त्यात भरपूर ताकद होती. त्याच्या जोमदार जीवनरसाला वर चढता येईना तेव्हा बाजूला फांद्या फुटल्या आणि आता पहा कसा डेरेदार बनलाय तो ओक! आमच्या प्लावनी गावाचं असंच आहे... फक्त सूर्य तळपत रहावा आणि जमीन सुपीक असावी! बंधू अलेक्सेई, आपल्या सोविएत सरकारच्या मदतीनं अवघ्या पाच वर्षांत पुन्हा व्यवस्थित बस्तान बसवू

आपण! आम्ही चिकट माणसं आहोत यात काही शंका नाही. मात्र युद्ध लौकर संपावं. आपण शत्रूचा धुव्वा उडवू आणि नंतर सगळेजण एकत्र होऊन कामाला लागू. काय वाटतं तुला?"

त्या रात्री अलेक्सेईची प्रकृती फार बिघडली.

आजोबांनी घातलेल्या आंघोळीचा अलेक्सेईवर उत्तेजक परिणाम झाला होता व आपल्या गुंगीतून तो जागा झाला होता. आपल्या श्रमांची आणि थकव्याची आता त्याला अधिकच जाणीव होऊ लागली. पायांमधील वेदना तीव्रपणे जाणवू लागल्या. आपल्या गादीवर तापाने फणफणत तो तडफडत होता, कण्हत होता, करकरा दात खात होता, कुणाला तरी हाका मारीत होता, कुणाला शिव्या घालीत होता, कुणापाशी काही तरी मागण्या करीत होता.

वार्या सबंध रात्र त्याच्यापाशी पाय दुमडून बसून होती. आपल्या गुडघ्यांवर तिने आपली हनुवटी टेकली होती व तिचे टप्पोरे, गोल, कष्टी डोळे समोर टक लावून पहात होते. अलेक्सेईच्या कपाळावर आणि छातीवर थंड पाण्याच्या घड्या ती वारंवार बदलत होती. झोपेत तो अंगावरील मेंढकातडी कोट सतत फेकून देत होता व ती पुन:पुन्हा त्याच्या अंगावर तो कोट पांघरीत होती. युद्धाच्या वाऱ्यात भिरकावल्या गेलेल्या आपल्या नवऱ्याविषयी सारा वेळ ती विचार करीत होती.

पहाटेच्या पहिल्या किरणाबरोबर म्हातारबाबा उठले. त्यांनी अलेक्सेईकडे नजर टाकली. आता अलेक्सेई शांत झोपला होता. वार्याला कुजबुजत्या आवाजात काही तरी सांगून मिखाईल आजोबा प्रवासाला सज्ज झाले. आपले नमदी बूट त्यांनी पावसाळी रबरी बुटांमध्ये खुपसले. मोटारीच्या टायरपासून त्यांनी हे पावसाळी रबरी बूट स्वत:च बनविले होते. आपल्या कोटाभोवती तागाचा पट्टा त्यांनी गच्च आवळून बांधला, हाताने घासून गुळगुळीत झालेली सदापर्णीची काठी घेतली. आपल्या दूरच्या प्रवासांना ते नेहमी ह्या काठीला सोबतीला घेत.

अलेक्सेईशी चकार शब्द न बोलता ते बाहेर निघून गेले.

१७

मेरेस्येव अशा परिस्थितीत होता की, आपला घरमालक केव्हा गेला ते त्याला मुळीच समजले नाही. दुसरा सबंध दिवस तो बेशुद्धीत होता. केवळ

तिसऱ्या दिवशी माध्यान्हीच्या सुमाराला तो शुद्धीवर आला. आकाशात सूर्य तळपत होता आणि चुलीमधील धुराच्या थरांना भेदून सूर्यकिरण थेट अलेक्सेई-च्या पावलांपर्यंत पोहोचले होते. त्यामुळे भुयारातील अंधार नाहीसा होण्या-ऐवजी अधिक दाट वाटत होता.

भुयारात कुणीही नव्हते. दारामधून वार्याचा घोगरा, खालच्या स्वरातील आवाज ऐकू येत होता. अर्थातच नेहमीप्रमाणे ती काहीतरी काम करण्यात गुंतली होती व ह्या जंगलभागात लोकप्रिय असलेले एक जुने गाणे स्वतःशी गुणगुणत होती. एक एकाकी ॲशचे झाड काही अंतरावर उभ्या असलेल्या एकाकी ओकच्या झाडाकडे जाण्यासाठी झुरते आहे, असा त्या गाण्याचा आशय होता.

अलेक्सेईने हे गाणे पूर्वी अनेकदा ऐकले होते. विमानतळाची जागा सपाट आणि स्वच्छ करण्यासाठी आलेल्या आसपासच्या खेड्यांमधील मुलींचे आनंदी गट हे गाणे गात. हे धीमे आणि करुण गीत त्याला आवडले होते. मात्र पूर्वी त्याने गीतामधील शब्दांकडे कधी ध्यान दिले नव्हते आणि सैनिकी आयुष्याच्या गडबडीत ते शब्द आपला कसलाही ठसा न उमटवता त्याच्या मनामधून निसटून गेले होते. पण आत्ता ह्या टप्पोऱ्या डोळयांच्या तरुणीच्या ओठांमधून अशा नाजुक भावनेने उमटले आणि स्त्रीमनाची हुरहुर त्यांच्या-मधून केवळ काव्यात्म नव्हे तर एवढ्या वास्तवतेने उमटली, की गीताची गहिराई अलेक्सेईला तात्काळ जाणवली. वार्या, म्हणजेच ॲशचे झाड, आपल्या ओकच्या झाडासाठी किती झुरत होते हे त्याला कळले.

...एकाकी ओकच्या शेजारी
नव्हते राहणे ॲशच्या नशीबी.
बिचाऱ्या पोरक्या ॲशला,
सदा एकटेच झुलणे कपाळी...

वार्या गात होती आणि तिच्या आवाजात खऱ्या अश्रूंचा कडवटपणा जाणवत होता. जेव्हा तिने गाणे थांबविले तेव्हा तिचे चित्र अलेक्सेईच्या मनासमोर उभे राहिले. वासंतिक उन्हात बाहेर झाडांखाली ती बसली होती व तिचे टप्पोरे, आसावलेले डोळे अश्रूंनी डबडबलेले होते, असे दृश्य त्याच्या मनःचक्षूंसमोर उभे राहिले. त्याला घशात काहीतरी अडकल्यासारखे वाटले व ती जुनी पत्रे पाहण्याची दुर्दम्य इच्छा झाली. त्या पत्रांमधील मजकूर

एव्हाना त्याला तोंडपाठ होता. त्याच्या सदऱ्याच्या खिशामधील ती पाहण्याची, कुरणात बसलेल्या त्या सडपातळ मुलीचा फोटो पाहण्याची, त्याला अनावर इच्छा झाली. सदऱ्याच्या खिशापर्यंत आपला हात वर नेण्याचा त्याने प्रयत्न केला, पण अगतिकपणे त्याचा हात परत गादीवर पडला. इंद्रधनुष्यी रंगाच्या वर्तुळांचे ठिपके असलेल्या त्या भुरकट अंधारातील सर्व गोष्टी पुन्हा तरंगल्या. त्या अंधारात खुपसण्याचे विचित्र आवाज ऐकल्याचा त्याला भास होत राहिला. थोड्या वेळानंतर दोन मानवी आवाज त्याला ऐकू आले--एक वार्याचा आणि दुसरा, त्या म्हातारीचा. हे दोन्ही आवाज त्याला परिचित झाले होते. त्या खालच्या आवाजांमध्ये बोलत होत्या.

"तो काही खात नाही?"

"नाही. त्याला खाववत नाही. काल त्यानं धिरड्याचा अगदी लहान तुकडा खाल्ला, पण लगेच त्याला उलटी झाली. तसलं अन्न त्याला मानवत नाही. थोडं दूध मात्र तो घेतो, म्हणून आम्ही त्याला दूधच देतो."

"हे बघ, मी थोडं कढण आणलंय... कदाचित त्या बिचाऱ्या पोराला कढण आवडेल..."

"वासिलिसा मावशी!" वार्या एकदम उद्‌गारली. "म्हणजे तुम्ही खरंच..."

"होय, हे कोंबडीचं कढण आहे. तुला एवढं आश्चर्य कशाचं वाटलं? काही विशेष घडलं नाही. त्याला जागा कर. कदाचित खाईल थोडं!"

अलेक्सेईने त्यांचे हे संभाषण ऐकले, पण त्याने आपले डोळे उघडायच्या आतच वार्याने धावत येऊन त्याला गदगदा हलविले व आनंदाने ती ओरडली:

"अलेक्सेई पेत्रोविच! अलेक्सेई पेत्रोविच! जागे व्हा! वासिलिसा आजी तुमच्यासाठी कोंबडीचं कढण घेऊन आलीय! जागे व्हा!"

दाराजवळच्या भिंतीत अडकवलेला दिवा फडफड करीत अधिक तेजाने जळू लागला. त्या थरथरत्या धुरकट प्रकाशात अलेक्सेईने एका वाकलेल्या, बाकदार नाकाच्या, सुरकुत्या पडलेल्या धूर्त चेहऱ्याच्या म्हातारीला पाहिले. कसल्यातरी मोठ्या वस्तूभोवतालचे फडके उलगडण्यात टेबलापाशी ती गुंतली होती. प्रथम तिने तरटाचा तुकडा बाजूला केला, मग जुना कोट काढला, नंतर कागदाचा ताव दूर सारला आणि शेवटी एक छोटे लोखंडी भांडे दिसले. भुयारामध्ये क्षणात कोंबडीच्या कढणाचा खमंग वास दरवळला. केवळ त्या वासामुळे अलेक्सेईच्या रिकाम्या पोटात आचके आले.

वासिलिसा आजीच्या सुरकुतल्या चेहऱ्यावरचा कठोर व धूर्त भाव कायम होता.

"हे मी तुझ्यासाठी घेऊन आलेय," ती म्हणाली "कृपा करून नाकारू नकोस. खा आणि चांगला बरा हो. देवाची कृपा असेल तर कदाचित हे खाऊन तू बरा होशील."

ह्या म्हाताऱ्या बाईच्या कुटुंबाची दुःखद हकीकत, पार्तीझान्का नांवाच्या तिच्या कोंबडीची हकीकत, अलेक्सेईला आठवली. त्याच्या डोळयांमधून आसवांच्या धारा वाहू लागल्या. ती म्हातारी, वार्या, खमंग वास पसरविणारे टेबलावरचे ते वाफावणारे लोखंडी भांडे—अशा सर्व गोष्टी त्याला पुसट, तरंगत्या दिसू लागल्या. म्हातारीचे ताठरलेले डोळे त्याच्याकडे अतीव कळवळयाने पहात असल्याचे त्याने बघितले.

म्हातारी दाराकडे जायला निघाली तेव्हा तो कसेबसे पुटपुटला: "आजी, तुमचे खूप उपकार आहेत माझ्यावर!"

ती दारापाशी पोहोचली तेव्हा तिचा आवाज त्याला ऐकू आला: "उपकाराची भाषा करू नकोस. कशासाठी माझे उपकार मानायचे? माझी मुलंसुद्धा युद्धात आहेत. कदाचित दुसरं कुणीतरी त्यांना कढण खाऊ घालील. खा बाबा. तू लौकर बरा झालास म्हणजे सगळं मिळालं!"

"आजी!" अलेक्सेईने वर उठायचा प्रयत्न केला, पण वार्याने त्याला आवरले व हळूच परत गादीवर निजविले.

"शांत पडून रहा बघू! आणि हे थोडं कढण खा." जर्मन सैनिक वापरीत असलेल्या टिनच्या डब्याच्या झाकणात कढण घालून तिने ते त्याच्यासमोर धरले. कढणामधून खमंग वाफ उमटत होती. अचानक डोळयात आलेले अश्रू लपविण्यासाठी तिने आपला चेहरा बाजूला वळविला. "घ्या थोडं," ती पुन्हा म्हणाली.

"मिखाईल आजोबा कुठं आहेत?"

"बाहेर गेलेत. काही कामासाठी. विभागीय समिती कुठं आहे ते शोधून काढायला. ते लौकर परतायचे नाहीत. पण तुम्ही हे कढण घ्या. घ्या म्हणते ना!"

अगदी नाकाखाली एक भला मोठा, तुकडे उडालेला, काळामुळे काळवंडलेला लाकडी चमचा अलेक्सेईला दिसला. त्या लाकडी चमच्यात पिवळसर रंगाचे कढण होते.

पहिल्या काही चमच्यांनंतर त्याच्या पोटातील भूक एकदम कडाडली. तो एवढा अधाशी बनला की, त्याच्या पोटात जोरदार कळा आल्या. पण तरीही त्याने फक्त दहा चमचे कढण घेतले व कोंबडीच्या नाजुक, पांढुरक्या मांसाचे थोडे तुकडे खाल्ले. त्याचे पोट जरी अधिकाधिक मागणी करीत होते, तरी सध्याच्या अवस्थेत आणखी एक जादा चमचा आपल्याला विषासारखा घातक ठरेल ही जाणीव मनी बाळगून निर्धाराने त्याने अन्न दूर सारले.

आजीने बनविलेल्या कढणाने चमत्कार केले. अलेक्सेईला खरीखुरी, गाढ आरोग्यदायी झोप लागली. नेहमीसारखी थकव्याची गुंगी नव्हे. तो जागा झाला, त्याने आणखी थोडे खाल्ले आणि तो पुन्हा झोपी गेला. आता चुलीमधील धूर त्याला जागे करू शकत नव्हता, बायकांची बडबड अथवा वार्याच्या हाताचा स्पर्श त्याची झोपमोड करू शकत नव्हते. तो जिवंत आहे याची खात्री करून घेण्यासाठी वार्या मात्र अधूनमधून त्याच्या शरीराला हाताने चाचपून पहात होती, त्याच्या छातीवर आपले कान टेकून त्याच्या काळजाचे ठोके ऐकत होती.

तो जिवंत होता. त्याचा श्वास नियमित आणि खोलपणे चालू होता. बाकीचा दिवस आणि सबंध रात्र तो झोपला. पृथ्वीवरील कोणतीही शक्ती जणू त्याला जागे करू शकणार नाही, अशी त्याला गाढ झोप लागली होती.

दुसऱ्या दिवशी भल्या सकाळीच, जंगलातील नेहमीच्या आवाजांव्यतिरिक्त, एक दूरवरची एकसुरी घरघर अस्पष्ट ऐकू येऊ लागली. अलेक्सेई दचकला. उशीवरून त्याने आपले डोके वर उचलले व खूप लक्षपूर्वक तो ऐकू लागला.

एक बेभान, अदम्य आनंदाची लहर त्याच्या सर्व शरीरभर पसरली. तो निपचित पडून राहिला. त्याचे डोळे अस्वस्थपणे चमकत होते. चुलीमधील थंडावणाऱ्या दगडांचे तडकण्याचे आवाज त्याला ऐकू येत होते. रात्रभर किरकिर करण्याचे काम करून दमलेल्या रातकिड्याचा मंद आवाज, भुयाराबाहेरील जुन्या देवदारांची शांत व नियमित सळसळ त्याला ऐकू येत होती. एवढेच नव्हे तर दाराबाहेरील वासंतिक ओलाव्याच्या टपोऱ्या थेंबांचा टपटप आवाजही तो ऐकत होता. पण ह्या सर्व आवाजांपलिकडे ती सतत घरघर स्पष्टपणे वेगळी ऐकू येत होती. "यू-२" विमानाच्या इंजिनाचा तो आवाज असावा, असा अलेक्सेईने तर्क केला. कधी तो आवाज एकदम मोठा होई,

तर कधी बारीक. पण संपूर्ण नाहीसा मात्र झाला नाही. अलेक्सेईने आपला श्वास रोखून धरला. विमान आसपास कुठेतरी आले होते, जंगलावर घिरट्या मारीत होते, हे स्पष्ट होते. एक तर ते विमान टेहळणी करीत होते, अथवा खाली उतरण्यासाठी जागा शोधीत होते.

"वार्या! वार्या!" आपल्या हातांच्या कोपरांवर उठण्याचा प्रयत्न करीत अलेक्सेईने हाका मारल्या.

पण वार्या भुयारात नव्हती. बाहेर बायकांचे उत्तेजित आवाज व पावलांची पळापळ ऐकू येत होती. तेथे काहीतरी घडत होते.

क्षणभरासाठी भुयाराचे दार उघडले गेले व फेद्काचा ठिपकेदार चेहरा आत डोकावला.

"वार्या मावशी! वार्या मावशी!" पोरगा ओरडला व उत्तेजित सुरात पुढे म्हणाला: "विमान! आपल्या डोक्यावर घिरट्या घालतंय!" आणि अलेक्सेईने एक शब्द उच्चारायच्या आधीच तो नाहीसा झाला.

मोठ्या कष्टाने अलेक्सेई उठून बसला. त्याच्या काळजाची धडधड, कपाळामधील थाड थाड उडणारी धमनी आणि दुखावलेल्या पायांमधील वेदना, यांमुळे त्याच्या सबंध देहातून झटके जात होते. विमानाच्या घिरट्या त्याने मोजल्या: एक, दोन, तीन... उत्तेजित मन:स्थिती असह्य होऊन तो परत गादीवर आडवा पडला व गाढ, आरोग्यदायी अशा झोपेत त्याने पुन्हा वेगाने व अनावरपणे डुबी मारली.

एका तरुण, खणखणीत, घुमणाऱ्या खर्ज आवाजाने त्याला जाग आणली. कुठल्याही गानवृंदामधून त्याने हा आवाज वेगळा ओळखून काढला असता. लढाऊ विमानदलात असा आवाज असलेली केवळ एकच व्यक्ती होती: स्क्वाड्रन कमांडर आंद्रेई देगत्यारेन्को.

अलेक्सेईने डोळे उघडले, पण त्याला भासले की अजूनही तो झोपेत होता आणि स्वप्नामध्ये त्याला आपला मित्र दिसत होता. रुंद, खडबडीत, प्रेमळ चेहऱ्याचा आंद्रेई देगत्यारेन्को आपण स्वप्नात पहात आहोत असे त्याला वाटत होते. देगत्यारेन्कोच्या गालांची उंच वर आलेली हाडे, त्याच्या कपाळावरील जखमेचा भला मोठा वण, फिकट रंगाचे त्याचे डोळे व तशाच फिकट आणि रंगहीन पापण्या अलेक्सेईला स्पष्ट दिसत होत्या. आंद्रेईचे शत्रू त्याच्या पापण्यांना "डुकराच्या पापण्या" असे म्हणत. धुरकट अर्धवट अंधारामधून फिकट निळ्या डोळ्यांची जोडी कुतूहलाने डोकावली.

"आजोबा, दाखवा पाहू तुमची लूट!" युक्रेनी हेलाचा देगत्यारेन्कोचा आवाज गरजला.

समोरचे दृश्य विरले नाही. तो खरोखरीच देगत्यारेन्को होता. ह्या दाट अरण्याच्या मध्यभागी वसलेल्या भूमीगत खेड्यात त्याची भेट होणे ही अतर्क्य वाटणारी गोष्ट असली तरी खरी होती. त्याची रुंद खांद्यांची उंच आकृती समोर उभी होती आणि सदऱ्याच्या कॉलरचे बटण त्याने नेहमीप्रमाणे मोकळे टाकलेले होते. त्याने आपल्या हाती शिरस्त्राण धरले होते. त्या शिरस्त्राणाच्या रेडिओफोनच्या तारा लोंबत होत्या. त्याच्या हातात आणखी काही पाकीटे व पार्सले होती. त्याच्या पाठीशी दिवा जळत होता व त्याचे सोनेरी, आखूड कापलेले ताठ केस तेजोवलयाप्रमाणे चमकत होते.

देगत्यारेन्कोच्या पाठीमागून मिखाईल आजोबांचा फिकट, श्रमलेला चेहरा डोकावला. त्यांचे डोळे उत्तेजित मन:स्थितीमुळे विस्फारलेले होते. त्यांच्या शेजारी इस्पितळामधील नर्स उभी होती. ती चपट्या नाकाची, उद्धट वागणारी ल्येनोचका होती. त्या अंधारात ती खूप उत्सुकतेने डोकावून पहात होती. तिच्या बगलेत रेड क्रॉसची कॅन्व्हास थैली होती व काही वेगळीच दिसणारी फुले छातीशी तिने गच्च धरली होती.

प्रत्येकजण गप्प उभा होता. अंधारामुळे बावचळलेला देगत्यारेन्को इकडे-तिकडे गोंधळून पहात होता. एकदोनदा त्याची नजर अलेक्सेईच्या चेहऱ्यावरून निर्विकारपणे फिरली. ह्या जागी आपला जिवलग मित्र अचानक उगवेल हा विचार अलेक्सेईला पटत नव्हता. हे सारेच तापाच्या भ्रमातील स्वप्न ठरेल ह्या धास्तीने त्याचे अंग थरथर कापत होते.

"बाई ग, तुम्हाला दिसले नाहीत का ते? हे इथंच तर आहेत," मेरेस्येवच्या अंगावरील मेंढकातडी कोट ओढून बाजूला करीत वार्या पुटपुटली.

अलेक्सेईच्या चेहऱ्याकडे पुन्हा एकदा देगत्यारेन्कोने गोंधळलेला कटाक्ष फेकला.

"आंद्रेई!" आपल्या हाताच्या कोपरांवर उठण्याचा प्रयत्न करीत मेरेस्येवने क्षीणपणे हाक मारली.

आंद्रेईने चकित होऊन त्याच्याकडे पाहिले. त्याला आपली भीती लपविणे जमले नाही.

"आंद्रेई! तू मला ओळखलं नाहीस?" मेरेस्येवने हलक्या आवाजात विचारले. आपले सर्वांग कापत असल्याचे त्याला जाणवत होते.

काळपट, करपलेल्या कातडीखालील त्या जिवंत सापळयाकडे आंद्रेईने आणखी एक क्षणभर टक लावून पाहिले. आपल्या मित्राच्या पूर्वीच्या आनंदी चेहऱ्यावरील खुणा शोधण्याचा त्याने प्रयत्न केला. अलेक्सेईच्या फक्त प्रचंड आणि गोल डोळयांमध्ये त्याला परिचित असा प्रांजल व निर्धारित मेरेस्येव सापडला. त्याच्या हातातील शिरस्त्राण खाली पडले. त्याच्या हातामधील पाकीटे-पुडकी घरंगळली व जमिनीवर सफरचंदे, संत्री आणि बिस्कीटे विखुरली.

"ल्योश्का? तू?" भावनातिरेकाने त्याचा आवाज गुदमरला. त्याच्या लांब, रंगहीन पापण्या खाली झुकल्या. "ल्योश्का! ल्योश्का!" तो पुन्हा ओरडला. एखाद्या लहान बाळाला उचलावे तसे त्याने अलेक्सेईचे दुबळे शरीर वर उचलले आणि छातीशी धरून तो सारखा म्हणत राहिला: "ल्योश्का! ल्योश्का!"

त्याने अलेक्सेईला क्षणभर आपल्या हातांवर आडवे धरले आणि त्याच्याकडे टक लावून पाहिले. तो खरेच आपला मित्र होता याची त्याने खात्री पटवून घेतली व परत छातीशी धरले.

"होय होय! तूच! ल्योश्का! लेका, खरंच तूच आहेस!"

त्याच्या बळकट, अस्वली मिठीमधून अलेक्सेईचे शरीर सोडवून घेण्याचा वार्यांने आणि नर्सने प्रयत्न केला. "कृपा करून त्यांना सोडा! आधीच काही जीव राहिलेला नाही शरीरात!" रागाने वार्या पुटपुटली.

"त्यांना उत्तेजित होणं चांगलं नाही! खाली ठेवा." घाईघाईने नर्स म्हणाली.

हे काळपट, वाळलेले अतिशय हलके शरीर खरोखरीच अलेक्सेई मेरेस्येव याचे होते याची शेवटी आंद्रेईला खात्री पटली होती. त्याचा हा मित्र, त्याचा हा साथी, लढाईत मेला अशी सबंध हवाई तुकडीची एव्हाना समजूत झाली होती; पण मेरेस्येव जिवंत होता! आंद्रेईने मेरेस्येवला बिछान्यावर ठेवले, स्वतःचे डोके गच्च आवळून घेतले व एक जोरदार विजयी आरोळी ठोकली. त्याने अलेक्सेईचे खांदे पकडले, त्याचे आनंदाने चमकणारे खोबणीत गेलेले डोळे निरखून पाहिले व तो ओरडला.

"जिवंत आहे! कमाल आहे! सैताना, तू चक्क जिवंत आहेस! एवढे दिवस होतास तरी कुठं? तुला काय झालं होतं?"

पण छोटया चणीच्या चपटया नाकाच्या त्या गुबगुबीत नर्सने ठामपणे उत्तेजित आंद्रेईला बिछान्यापासून दूर ढकलले. हवाई तुकडीतील ह्या लेफ्ट-

नंटच्या हुद्द्यावरील नर्सला कुणीही तिच्या हुद्द्याच्या नांवाने हाक मारीत नसे. सारेजण तिला ल्येनोचका म्हणत किंवा "वैद्यक शास्त्राची सिस्टर" म्हणत. असे चमत्कारिक नांव पडायला तीच प्रथम कारणीभूत झाली होती. आपल्या वरिष्ठांना आरंभी तिने स्वतःची अशीच ओळख करून दिलेली होती. ही ल्येनोचका एकाच वेळी सर्व लेफ्टनंटांच्या प्रेमात होती. आंद्रेई देगत्यारेन्कोला ठामपणे बाजूला सारीत ती कडक आवाजात म्हणाली : .

"तवारीश * कप्तान, पेशंटला स्वस्थ पडू दे!"

आदल्या दिवशी प्रादेशिक केंद्रातून आणण्यात आलेला फुलांचा गुच्छ तिने टेबलावर भिरकावून दिला, कारण ती फुले ह्या स्थळी अनाठायी होती. झटपट तिने थैली उघडली व आजारी माणसाला तपासायला आरंभ केला. आपली बोथट बोटे अलेक्सेईच्या पायांवर आपटीत तिने त्याला विचारले :

"इथं दुखतंय? इथं? आणि इथं?"

अलेक्सेईने प्रथमच आपल्या पायांवर व्यवस्थित नजर टाकली होती. पावले कमालीची सुजली होती व जवळ जवळ काळीठिक्कर पडली होती. त्यांना किंचित स्पर्श झाला तरी विजेचा धक्का बसावा तशा वेदना सबंध शरीरामधून जात होत्या. अंगठ्यांची टोके पाहून ल्येनोचका चिंतेत पडली. अंगठे काळे पडले होते व त्यांच्यात कसलीच संवेदना उरली नव्हती.

मिखाईल आजोबा आणि देगत्यारेन्को टेबलाशी बसले. प्रसंग साजरा करण्यासाठी वैमानिकाच्या बाटलीमधून ते हळूच घुटका मारीत होते. हळू हळू दोघे जोरदार संभाषणात गुरफटले. अलेक्सेई कसा सापडला त्याची हकीकत मिखाईल आजोबा आपल्या चिरक्या, उंच आवाजात सांगू लागले. अर्थात ही कहाणी ते काही पहिल्यांदाच सांगत नव्हते.

"आमच्या पोरांना तो जंगलातल्या उघड्या जागी सापडला. जर्मनांनी आपली भुयारं बांधण्यासाठी लाकडं तोडली होती आणि ढलप्या गोळा करायला पोरांच्या आईनं, म्हणजे माझ्या मुलीनं, पोरांना तिकडं धाडलं होतं. तर असा तो त्यांना सापडला! 'अरे! तिथं काय गंमत दिसतेय रे?' एकजण दुसऱ्याला म्हणाला. प्रथम त्यांना वाटलं की एखादं जखमी अस्वल गडाबडा लोळतंय! म्हणून पोरं ढुंगणाला पाय लावून पळत सुटली. पण कुतूहल त्यांना स्वस्थ बसू देईना आणि ती परत तिथं गेली. 'असलं कसलं अस्वल हे?

---

* "कॉम्रेड"ला रशियन शब्द — अनु.

असं गडबडा लोळतंय का? त्याच्यात काहीतरी गंमत आहे!' असले सतराशे साठ विचार त्यांच्या डोक्यात आले. त्यांनी पाहिलं की, ही गंमत गडबडा लोळत होती आणि कण्हत होती."

"लोळत होता म्हणजे?" आपली सिगारेट केस मिखाईल आजोबांपुढे धरीत शंकित स्वरात देगत्यारेन्कोने विचारले. "धूम्रपान करता?"

आजोबांनी केसमधून एक सिगारेट घेतली, आपल्या खिशातून वर्तमानपत्राची घडी काढून एक पट्टी टरकावली, सिगारेटमधील तंबाखू काढून त्या पट्टीवर पसरली, तिची सुरळी बनविली व तिला पेटवून एक जोरदार झुरका मारला.

"धूम्रपान करतो का? अर्थात, करतो!" आणखी एक दम मारून ते म्हणाले. "मात्र जर्मन इथं आल्यापासून मला तंबाखूचं दर्शन झालेलं नाही. शेवाळं आणि सुकी पानं ओढतो... आता तो कसा लोळत होता ते त्यालाच विचार. मी ते पाहिलं नाही. पोरं म्हणाली की, तो पोटावरून पाठीवर जायचा आणि पाठीवरून पोटावर. हाता-पायांवर रांगायची ताकद त्याच्यात राहिली नव्हती. असा आहे हा पठ्ठा!"

देगत्यारेन्को मधून मधून झटकन उडी मारून उठायचा व आपल्या मित्रावर नजर टाकायचा. नर्सने बरोबर आणलेल्या लष्करी कांबळयांमध्ये बायका अलेक्सेईला गुंडाळीत होत्या.

"अरे पोरा, बैस स्वस्थ! फडकी गुंडाळणं हे पुरुषाचं काम नाही!" आजोबा आंद्रेईला म्हणाले. "मी तुला काय सांगतो ते ऐक. आणि तुझ्या एखाद्या वरिष्ठाला हे सांगायला विसरू नको. ह्या माणसानं फार फार मोठा पराक्रम बजावलाय. आत्ता त्याची अवस्था तू पाहतो आहेस. आम्ही सगळी माणसं, संपूर्ण सामुदायिक शेत, आख्खा आठवडाभर त्याची शुश्रूषा करतोय, पण अजूनही करंगळीभरसुद्धा त्याला हलता येत नाहीय! पण आमचं जंगल आणि दलदलीचा भाग रांगत यायची त्याच्यात ताकद होती. असं करू शकणारी माणसं फार थोडी. ऐक पोरा, पुढं ऐक..."

म्हातारबाबा देगत्यारेन्कोच्या कानाकडे झुकले. त्यांच्या मऊ, पिसार दाढीने त्याला गुदगुल्या केल्या. अगदी दबत्या आवाजात ते म्हणाले:

"तो मरणार नाही अशी आशा करतो. काय वाटतं तुला? जर्मनांपासून तो निसटला, पण यमाच्या तावडीतून तुम्ही याला सोडवाल? नुसती हाडं आणि चामडी! कसा तो रांगत राहिला देवच जाणे! आपल्या माणसांपर्यंत

पोचायची फार जोरदार ओढ असावी त्याच्या मनात. होय की नाही? बेशुद्धीत सारखा बरळत होता: 'विमानतळ', 'विमानतळ!' आणखीही काही शब्द बोलायचा. ओल्गा हे नांवही त्यानं घेतलं. ह्या नांवाची मुलगी तुमच्यात आहे काय? कदाचित त्याच्या बायकोचं नांव असेल. ऐकतोस ना रे माझं बोलणं? ए वैमानिका, मी काय म्हणालो ते ऐकलंस का?"

पण देगत्यारेन्कोचे त्यांच्या बोलण्याकडे लक्ष नव्हते. अगदी सर्वसामान्य दिसणारा आपला साथी गोठलेल्या आणि मोडलेल्या पायांनी कसा रांगत असेल याचे चित्र तो स्वतःच्या मनःचक्षूंसमोर उभे करीत होता. शत्रूपासून दूर जाण्यासाठी, आपल्या माणसांपाशी पोहोचण्यासाठी, वितळत्या बर्फामधून, जंगलातून आणि दलदलीतून अलेक्सेई कसा रांगला असेल, कसा लोळत लोळत पुढे गेला असेल, ते दृश्य तो कल्पनेने रंगवीत होता. लढाऊ वैमानिकाच्या पेशामुळे धोक्याची भीती त्याला राहिली नव्हती. खाईत उडी घालताना मृत्यूचा विचार त्याच्या मनाला कधीही शिवत नसे. उलट एक रोमांचकारी आनंद तो अनुभवायचा. पण एकाकी माणसाने दाट अरण्यात हे दिव्य करणे म्हणजे...

"कधी सापडला तुम्हाला तो?"

"कधी?" म्हातारबाबा ओठातल्या ओठात हिशेब करू लागले. उघडच्या केसमधून त्यांनी आणखी एक सिगारेट घेतली. "केव्हा बरं? अरे हो! बरोब्बर एक आठवड्यापूर्वी!"

देगत्यारेन्कोने मनाशी तारखांची जुळणी केली आणि हिशेब केला की, अलेक्सेई मेरेस्येव अठरा दिवस सरपटत होता. एका जखमी माणसाने एवढा सारा वेळ अन्नाविना रांगणे हे अतर्क्य भासत होते.

आंद्रेईने म्हातारबाबांना घट्ट मिठी मारीत म्हटले: "आजोबा, तुमचे खूप खूप उपकार झाले!"

"बोलून दाखवू नकोस बाबा! माझे उपकार मानण्यासारखं मी काहीही केलेले नाही. उपकार म्हणे! अरे मी कोण? अनोळखी? परका?" आपल्या हातावर गाल टेकून दुःखी विचारात गुरफटून उभ्या असलेल्या आपल्या सुनेवर ते रागाने खेकसले... "तो शिधा गोळा कर जमिनीवरचा! असल्या दुर्मीळ वस्तू जमिनीवर फेकायला काय मस्ती आलीय?... उपकार झाले म्हणे!..."

दरम्यान ल्येनोचकाने मेरेस्येवची प्रवासाची तयारी पूर्ण केली होती.

"ठीक, ठीक, तवारीश सीनियर लेफ्टनंट." ती भरभर बोलत होती. पिशवीतून हिरवे वाटाणे भळभळा सांडावेत तसे शब्द तिच्या तोंडातून ओघळत होते. "आता मॉस्कोत ते लोक चुटकीसरशी तुम्हाला तुमच्या पायांवर उभे करतील. मॉस्को खूप मोठं शहर आहे. होय ना? तुमच्यापेक्षा वाईट केसेस त्यांनी बऱ्या केल्यात!"

तिचा कृत्रिम उत्साह पाहून आणि एका चुटकीसरशी मेरेस्येव आपल्या पायांवर उभा राहील असे वारंवार उच्चारलेले तिचे शब्द ऐकून देगत्यारेन्कोने मनाशी तर्काने जाणले, की अलेक्सेईची अवस्था खूपच वाईट असल्याचे तिला त्याच्या तपासणीत आढळून आले होते. "टिटवीसारखी टिवटिव करतेय लेकाची!" तो स्वत:शी गुरगुरला व "वैद्यक शास्त्राच्या सिस्टर" कडे पाहून त्याने कपाळाला आठ्या घातल्या. अचानक त्याला आठवण झाली की, हवाई पथकात ह्या मुलीचे बोलणे कुणीच फारसे गंभीरपणे ऐकून घेत नव्हते. उलट गंमतीने प्रत्येकजण म्हणायचा की, फक्त प्रेमाच्याच औषधाने फार तर एखाद्याला बरे करू शकली असती. ह्या आठवणीने देगत्यारेन्कोचे स्वत:चे काहीसे सांत्वन झाले.

ब्लँकेटांमध्ये गुंडाळलेल्या अलेक्सेईचे फक्त डोके तेवढे उघडे दिसत होते. प्राचीन इतिहासाच्या शाळेच्या क्रमिक पुस्तकातील चित्रांमधील ईजिप्तच्या फॅराहोच्या मढ्याचे चित्र देगत्यारेन्कोला आठवले. त्याने अलेक्सेईच्या गालांवरून आपला भला मोठा पंजा प्रेमाने फिरविला. अलेक्सेईच्या गालांवर जाड, राठ तांबूस केसांच्या खुंटांचे जंगल माजले होते.

"काळजी करू नकोस अलेक्सेई! लौकरच तू पुन्हा आपल्या पायांवर उभा राहशील. तुला मॉस्कोला पाठवण्याचे हुकूम आम्हाला मिळालेत. तिथं छान इस्पितळ आहे! सगळे प्राध्यापक उपचाराला आहेत! आणि नर्सेस तर–" त्याने आपली जीभ गालांमध्ये घोळविली, ल्येनोचकाला डोळा मारला–"त्या नर्सेस तर मेलेल्या माणसाला चालायला लावतात! तू आणि मी पुन्हा एकदा एकत्र उड्डाणं करू..." देगत्यारेन्कोला येथे एकदम जाणीव झाली की, ल्येनोचकाप्रमाणे तोसुद्धा उसन्या अवसानाने, शुष्क आनंदाने, बोलायचा प्रयत्न करीत होता. आपल्या मित्राच्या गालांवरून हात फिरविताना अचानक त्याला हातांखाली ओलसरपणा जाणवला. "स्ट्रेचर कुठं आहे?" त्याने रागाने चौकशी केली. "त्याला बाहेर घेऊन जाऊ या. इथं वेळ काढण्यात काय अर्थ?"

म्हातारबाबांच्या मदतीने त्यांनी ब्लँकेटांमध्ये गुंडाळलेल्या अलेक्सेईला हळुवारपणे स्ट्रेचरवर ठेवले. वार्याने त्याच्या वस्तू गोळा केल्या व एका बोचक्यात बांधून दिल्या.

जर्मन खंजीर वार्या गाठोड्यात खुपसून ठेवीत होती, तेवढ्यात अलेक्सेईने तिला थोपविले व तो म्हणाला: "आजोबा! माझी आठवण म्हणून हा खंजीर तुमच्यापाशी ठेवा!" आपल्या काटकसरी सवयींनुसार, मिखाईल आजोबांनी हा खंजीर अनेकदा कुतूहलाने न्याहाळला होता, त्याला साफ केले होते, धार काढली होती व त्याच्या पात्यावरून आपला अंगठा फिरवून पाहिला होता.

"धन्यवाद पोरा! फार छान पोलाद आहे. आणि बघ! त्याच्यावर काहीतरी कोरलंय, पण आपल्या भाषेत नाही." देगत्यारेन्कोला खंजीर दाखवीत मिखाईल आजोबा म्हणाले. देगत्यारेन्कोने ते कोरलेले शब्द वाचले व त्यांचा अनुवाद सांगितला: «Alles für Deutschland» – "सर्व काही जर्मनीसाठी."

"सर्व काही जर्मनीसाठी", अलेक्सेईने पुनरुच्चार केला आणि तो खंजीर कसा मिळविला होता याची त्याला आठवण झाली.

"म्हातारबाबा, चला लौकर! उचला त्याला!" स्ट्रेचरच्या एका बाजूच्या मुठी पकडत देगत्यारेन्को ओरडला.

स्ट्रेचरला हिंदोळे बसत होते. भुयाराच्या अरुंद दरवाजामधून मोठ्या कष्टाने तो बाहेर निघाला. जाताना भिंतींना तो घासला गेल्यामुळे बरीच माती खाली पडली.

भुयारात गर्दी केलेले सारे लोक अलेक्सेईला निरोप द्यायला बाहेर धावले. एकटी वार्या मागे राहिली. तिने सावकाशपणे दिवा मंद केला. मानवी शरीर झोपल्याची खूण अजूनही स्पष्टपणे बाळगणाऱ्या पट्टेरी गादीपाशी ती गेली व हळुवारपणे तिने त्या गादीला थोपटले. घाईत विसरल्या गेलेल्या फुलांच्या गुच्छाकडे तिची नजर वळली. उष्णतागृहात जोपासलेल्या फिकट जांभळ्या फुलांच्या अनेक डहाळ्या... फिकट आणि मलूल... थंड, ओलसर भुयारांमध्ये हिवाळा काढल्यानंतर तशाच फिकट आणि मलूल दिसणाऱ्या ह्या निर्वासित खेड्यातील रहिवाशांसारख्या. वार्याने ती फुले उचलली, त्यांचा वासंतिक गंध हळूच हुंगला. सभोवतालच्या जळक्या वासांमध्ये आणि काजळीमध्ये त्या फुलांचा वास अगदी मंद जाणवत होता. वार्याने फळीवर आपला देह झोकून दिला व ती ढसढसा रडू लागली.

१८

प्लावनी खेड्यामध्ये उपस्थित असलेले सर्व लोक आपल्या अनपेक्षित पाहुण्याला निरोप देण्यासाठी एकत्र जमले. जंगलामागील एका छोटया, लांबट तळयावर विमान उतरले होते. त्या तळयाचे बर्फ कडांना जरी वितळू लागले होते तरी मध्यभागी अजून घट्ट व भक्कम होते. त्या तळयाकडे जाणारे रस्ते नव्हते, फक्त एक पाऊलवाट होती. एका तासापूर्वी मिखाईल आजोबा, देगत्यारेन्को आणि ल्येनोचका यांनी मऊ बर्फामधून तुडविलेल्या पाऊलवाटेवरून लोकांचा घोळका तळयाकडे निघाला होता. सर्वांच्या पुढे सेर्योन्का आणि फेद्का चालत होते. सेर्योन्का गंभीर होता, तर फेद्का उत्साहाने मुसमुसत होता. जंगलात वैमानिकाला प्रथम शोधून काढल्याबद्दल सेर्योन्का हक्काने स्ट्रेचरपुढून चालला होता. त्याच्या पायात त्याच्या ठार झालेल्या वडिलांचे भलेमोठे नमदी बूट होते. बर्फामधून मोठ्या कष्टाने पाय उपशीत तो चालत होता. काळवंडल्या तोंडांच्या, पांढरे दात चमकणाऱ्या व अत्यंत फाटकेतुटके कपडे ल्यायलेल्या इतर मुलांना दाटत होता. देगत्यारेन्को आणि आजोबा तालबद्ध पावले टाकीत स्ट्रेचर वाहून नेत होते, तर त्यांच्या शेजारून ल्येनोचका न तुडवल्या बर्फावरून चालत होती. कधी अलेक्सेईच्या अंगावरील ब्लँकेट ती नीट करीत होती, तर कधी आपला मफलर त्याच्या डोक्याभोवती गुंडाळीत होती. स्ट्रेचरमागून बायका, मुली आणि म्हाताऱ्या लोकांचा तांडा वडवड करीत चालला होता.

आरंभी, बर्फावरील परावर्तित प्रकाशाने अलेक्सेईचे डोळे दिपले. वासंतिक उन्हाची तिरीप त्याच्या डोळयांना एवढी खुपली की, त्याला डोळे गच्च मिटून घ्यावे लागले. त्याला जवळ जवळ घेरीच आली. किंचित पापण्या उचलून त्याने आपल्या डोळयांना प्रकाशाची सवय करून घेतली व नंतर सभोवार पाहिले. भूमीगत खेड्याचे चित्र त्याच्यासमोर उलगडले गेले.

कुठेही नजर टाकली तरी एखाद्या भिंतीप्रमाणे दिसणारे ते जुने अरण्य उभे होते. झाडांचे शेंडे वर अगदी एकमेकांना भिडले होते व त्यामुळे जमिनीवर काहीसा अंधार पडला होता. त्या रानात वेगवेगळी झाडे होती. भोजाची अजून उघडीबोडकी दिसणारी झाडे सोनेरी बुंध्यांच्या देवदारांशेजारी उभी होती. आणि त्यांच्यात अधूनमधून सुरूच्या झाडांचे काळपट, टोकदार शेंडे डोकावीत होते. भोजाच्या झाडांचे शेंडे हवेत गोठलेल्या धुराप्रमाणे भासत होते.

ह्या झाडांखाली, जेथे फार पूर्वीपासून बर्फ तुडविलेला होता, अशा जागी भुयारे होती. जमिनीवरून आणि आकाशातून शत्रूला ती दिसणार नाहीत, अशा जागी हे भूमीगत खेडे होते. शेकडो वर्षे वयाच्या जुन्या सुरूच्या झाडांच्या फांद्यांवर बाळलेणी वाळत होती. देवदारांच्या तुटक्या बुंध्यांवर भांडी व घडे वाळविले जात होते. एका जुन्या सुरूच्या बुंध्याभोवती भुरकट शेवाळयाच्या दाढ्या लोंबत होत्या. खरे म्हणजे त्याच्या पिळदार मुळांशेजारी एखादे हिंस्र श्वापद स्वस्थ पडलेले असायचे. पण सध्या तेथे मळकट चिंध्यांची बाहुली पडली होती व तिच्या चपटया तोंडावर ठळक पेन्सिलीने नाक, डोळे रेखाटलेले होते.

त्या शेवाळी गालिचा अंथरलेल्या "रस्त्या"वरून लोकांचा जमाव स्ट्रेचरमागून संथपणे चालला होता.

खुल्या हवेत आरंभी अलेक्सेईच्या मनात स्वाभाविक, प्राणीसुलभ आनंद उचंबळून आला. पण त्याचे तात्काळ मधुर, मूक विषण्णतेमध्ये रूपांतर घडले.

ल्येनोचकाने आपल्या छोटया हातरुमालाने अलेक्सेईच्या चेहऱ्यावरील अश्रू पुसले. त्या अश्रूंचा तिने आपल्या परीने अर्थ लावला व स्ट्रेचर वाहून नेणाऱ्यांना हळू चालण्यास विनंती केली.

"छे: छे:! लौकर चला! आणखी वेगानं चला!" मेरेस्येव घाई करीत म्हणाला.

ते फारच हळू जात होते असे त्याला भासत होते. तेथून जाणे शक्य होणार नाही, त्याची वाट न पाहता मॉस्कोचे विमान उडून जाईल आणि रुग्णालयापर्यंत आपण कधीच पोहोचणार नाही, अशी भीती त्याला वाटत होती. स्ट्रेचर वाहून नेणाऱ्यांच्या जलद गतीमुळे होणाऱ्या वेदनांनी तो विव्हळत होता, तरीही सारखा म्हणत होता: "लौकर! आणखी वेगानं!" मिखाईल आजोबा धापा टाकीत होते हे तो ऐकत होता. त्यांचे पाय लटपटत होते हे तो पहात होता, तरीही तो घाई करीत होता. म्हातार-बाबांच्या जागी दोन बायकांनी स्ट्रेचर धरला. ल्येनोचकाच्या विरुद्ध बाजूने मिखाईल आजोबा बर्फ तुडवीत चालू लागले. आपले घामेजले टक्कल, आपला लालबुंद चेहरा व आपली सुरकुतली मान आपल्या लष्करी अधिकाऱ्याच्या टोपीने पुशीत ते समाधानाने पुटपुटले:

"आम्हाला पिटाळतोस! घाई करायला लावतोस! .. बरोबर, अलेक्सेई, तुझं अगदी बरोबर आहे! पळव त्यांना! माणूस जेव्हा घाईत असतो

तेव्हा त्याच्यात जीव असल्याचं समजतं! काळीज भक्कम धडधडत असल्याची खात्री पटते! ए गड्या, बरोबर आहे ना माझं? ... इस्पितळातून आम्हाला पत्र पाठव. पत्ता ध्यानात ठेव: कालीनिन प्रदेश, बोलोगोये विभाग, प्लावनी नांवाचं भावी खेडं! काय? हो हो, भावी खेडं असंच मी म्हटलं. चिंता करू नकोस. पत्र पोचेल आमच्यापाशी. विसरू नकोस. आणि हा पत्ता अगदी बरोबर आहे!"

स्ट्रेचर जेव्हा विमानात उचलून ठेवण्यात आला आणि विमानाच्या पेट्रोलचा उग्र दर्प अलेक्सेईच्या नाकपुड्यांना झोंबला तेव्हा पुन्हा एकदा त्याला आनंदाने उचंबळून आले. रांध्याचे झाकण त्याच्या डोक्यावरून ओढून घेण्यात आले. त्याला निरोप द्यायला आलेली माणसे हात हलवीत होती हे त्याला दिसले नाही. बाकदार नाकाची, भुरकट रुमालात एखाद्या रागीट डोमकावळ्यासारखी दिसणारी, विमानाच्या पंख्यामुळे निर्माण झालेल्या भीतीशी व वाऱ्याशी झगडणारी ती छोट्या चणीची म्हातारी नेटाने पुढे सरली व एव्हाना वैमानिकाच्या जागी बसलेल्या देगत्यारेन्कोच्या हाती तिने उरलेल्या कोंबडीचे पुडके दिले, ते अलेक्सेईने पाहिले नाही. मिखाईल आजोबा विमानाभोवती चकरा मारीत होते, बायकांवर खेकसत होते व मुलांना विमानापासून दूर हाकलीत होते, ते त्याने पाहिले नाही. आणि वाऱ्याने जेव्हा त्यांची टोपी उडविली व बर्फावरून फरफटत नेली तेव्हा विरळ रुपेरी झुलुपांचे त्यांचे टक्कल चांगलेच चमकत होते आणि खेड्यातील साध्या तसबिरीमध्ये दिसणाऱ्या संत निकोलससारखा त्यांच्या अवतार दिसत होता. जाणाऱ्या विमानाला ते हात हलवून निरोप देत होते. बायकांच्या त्या चित्रविचित्र जमावात तो एकटाच पुरुष होता.

तळ्याच्या पृष्ठभागावरून गचके खात विमानाला पळवीत देगत्यारेन्कोने जमावाच्या डोक्यावर उड्डाण केले. तळ्याच्या उंच, चढ्या किनाऱ्याचा आडोसा घेत, बर्फाला विमानाची चाके जवळ जवळ घासतच तो उडाला व जंगलच्या बेटापलिकडे नाहीसा झाला. हवेत बेफिकीर वागण्याबद्दल वरिष्ठां-कडून अनेकदा कानपिचक्या मिळालेला हा हवाई तुकडीतील बेरड यावेळी मात्र सावधपणे उड्डाण करीत होता. तो खरे म्हणजे उडत नव्हता, तर जमिनीशी सरपटतच चालला होता. छोट्या नद्यांच्या प्रवाहाला धरून, तळ्यांच्या किनाऱ्यांचा आडोसा घेऊन, तो जात होता. अलेक्सेईला काहीही दिसत नव्हते आणि काहीही ऐकू येत नव्हते. पेट्रोलच्या व वंगणाच्या परिचित

वासामुळे आणि उड्डाण करण्याच्या आनंदी जाणीवेमुळे, त्याची शुद्ध हरपली होती. मॉस्कोहून आधीच येऊन थांबलेल्या रेड क्रॉसच्या आणीबाणीच्या विमानात त्याला ठेवण्यासाठी जेव्हा विमानतळावर देगत्यारेन्कोच्या विमानातून स्ट्रेचर खाली उतरविण्यात येत होता, तेव्हाच तो शुद्धीवर आला.

१९

तो स्वतःच्या विमानतळावर आला तेव्हा ती अत्यंत धांदलीची वेळ होती, त्या घाईगर्दीच्या वसंताच्या मोसमात, तो विमानतळ दररोज आपल्या कमाल क्षमतेने काम करीत होता.

इंजिनांची घरघर क्षणभरही थांबत नव्हती. इंधन घेण्यासाठी एक स्क्वाड्रन विमानतळावर उतरले रे उतरले की, दुसरे स्क्वाड्रन हवेत झेपावत होते. वैमानिकांपासून ते पेट्रोल–टँक ड्रायव्हर आणि स्टोअरकीपरांपर्यंत प्रत्येकजण, दमून खाली कोसळेपर्यंत काम करीत होता. चीफ ऑफ स्टाफचा ओरडून ओरडून आवाजच गेला होता व आता केवळ घोगऱ्या, अस्पष्ट आवाजातच तो बोलू शकत होता.

एवढी प्रचंड घाईगर्दी असली व एकूण तणाव असला, तरीही प्रत्येकजण मेरेस्येवच्या आगमनाची आतुरतेने वाट पहात होता.

"अजून तो आला नाही का?" पेट्रोल भरण्यासाठी विमान ओढून नेण्यापूर्वीच इंजिनांच्या घरघराटीपेक्षा आवाज चढवून वैमानिक मंडळी मेकॅनिकांना विचारीत होती.

"काही बातमी ऐकली का त्याच्याबद्दल?" जमिनीत पुरलेल्या टाक्यांकडे आपल्या गाड्या नेणारे "पेट्रोल-वाहक" पृच्छा करीत होते.

हवाई पथकाच्या रेड क्रॉस विमानाचे परिचित आवाज जंगलाच्या दिशेने ऐकू येतात अथवा नाही ते ऐकण्यासाठी प्रत्येकाने आपले कान टवकारलेले होते.

अलेक्सेई जेव्हा शुद्धीवर आला तेव्हा एका लवचीक, झुलत्या स्ट्रेचरवर आपण पडलो आहोत असे त्याला आढळून आले. परिचित चेहऱ्यांचे कडे दाटीवाटीने भोवती उभे असल्याचे त्याने पाहिले. त्याने आपले डोळे पूर्ण उघडले. जमावामधून आनंदोद्‌गार उमटले. अगदी स्ट्रेचरजवळ विंग कमांडरचा उमदा, निश्चल चेहरा त्याला दिसला. त्या चेहऱ्यावर संयमित स्मित

होते. त्याच्या शेजारी चीफ ऑफ स्टाफचा तांबडाबुंद, घामाने थबथबलेला चेहरा अलेक्सेईला दिसला. त्यापलिकडे बटालियनच्या व्यवस्थापन पथकाच्या कमांडरचा गोल, गुबगुबीत, फिकट चेहरा त्याने पाहिला. ह्या कमांडरच्या औपचारिक आणि कद्रू वृत्तीचा अलेक्सेईला तिटकारा वाटत असे. कितीतरी परिचित चेहरे दिसत होते. स्ट्रेचरची पुढची बाजू यूराने धरली होती. अलेक्सेईकडे पाहण्यासाठी तो मान वळवून मागे नजर टाकी तेव्हा प्रत्येक वेळी त्याचे पाऊल अडखळत होते. त्याच्या शेजारून लाल केसांची एक छोटी पोरगी घाईघाईने चालत होती. हवामान केंद्राची ती सार्जंट होती. काही कारणाने तिचा त्याच्यावर राग होता, अशी पूर्वी अलेक्सेईची समजूत होती. त्याच्या नजरेआड राहण्याचा ती प्रयत्न करीत होती. त्याच्याकडे छपून पाहताना तिच्या डोळयांमध्ये एक वेगळाच भाव उमटत होता. गंमतीने तो तिला "हवामान सार्जंट" म्हणून हाक मारायचा. तिच्यापाशी अडखळत, धावत कूकूश्किन आला. आपल्या माणूसघाण्या सवयींमुळे हा बुटका, पिवळट, अप्रसन्न चेहऱ्याचा माणूस सबंध स्क्वाड्रनमध्ये अप्रिय होता. तोसुद्धा स्मित करीत होता आणि यूराच्या प्रचंड ढांगांबरोबर आपला वेग राखण्याचा प्रयत्न करीत होता. मेरेस्येवला आठवले की, उड्डाणाच्या जरा आधी, कूकूश्किनने पूर्वीचे कर्ज न फेडल्याबद्दल अनेक लोकांच्या देखत त्याने कूकूश्किनची टवाळी केली होती व सूडवादी वृत्तीचा कूकूश्किन त्याबद्दल त्याला कधीही क्षमा करणार नाही, अशी त्याची खात्री होती. पण आत्ता कूकूश्किन स्ट्रेचर-शेजारून धावत होता, काळजीपूर्वक स्ट्रेचरला सावरीत होता, बघ्यांनी धक्के मारू नयेत म्हणून त्यांना आपल्या हातांच्या कोपरांनी मागे सारीत होता.

आपल्याला एवढे मित्र असतील याची अलेक्सेईला कधीच कल्पना नव्हती. माणसे स्वतःचे खरेखुरे दर्शन घडवितात तेव्हा अशी वागतात! काही विशिष्ट कारणापायी त्याला घाबरणाऱ्या "हवामान सार्जंट"बद्दल आता त्याला दया वाटली. बटालियनच्या व्यवस्थापन पथकाच्या कमांडरसमोर त्याला लाज वाटली, कारण ह्या कमांडरच्या कंजूषपणाबद्दल अलेक्सेईने डिव्हिजनमध्ये अनेक विनोद प्रसृत केले होते. आपण कूकूश्किनची क्षमा मागावी आणि तो एवढा काही वाईट व माणूसघाणा नाही, असे सर्वांना सांगावेसे त्याला वाटले. एवढ्या सर्व कष्टांमधून पार पडल्यानंतर सरतेशेवटी आपण आपल्या स्वतःच्या कुटुंबाच्या घरी आलो, असे अलेक्सेईला वाटले. त्याच्या परतीचा प्रत्येकाला मनापासून आनंद झाला होता.

भोजाच्या झाडांच्या एका बोडक्या जंगलाच्या टोकाशी झाकून उभ्या केलेल्या रुपेरी रंगाच्या रेड क्रॉस विमानापाशी त्याला काळजीपूर्वक रीतीने विमानतळावरून वाहून नेण्यात आले. विमानाचे इंजिन मेकॅनिक एव्हाना सुरू करीत होते.

"कॉम्रेड मेजर," अचानक विंग कमांडरना उद्देशून मेरेस्येव म्हणाला. जास्तीत जास्त मोठ्या आवाजात व शक्य तितक्या आत्मविश्वासपूर्वक बोलण्याचा तो प्रयत्न करीत होता.

कमांडर नेहमीच्या गूढ, सस्मित चेहऱ्याने अलेक्सेईपाशी खाली वाकले.

"कॉम्रेड मेजर... मॉस्कोला न जाता तुमच्याबरोबर इथंच रहायची मला परवानगी द्या..."

ऐकण्यात अडथळा आणणारे आपल्या डोक्यावरील शिरस्त्राण कमांडरनी हाती घेतले.

"मला मॉस्कोला जायचं नाही. मला इथंच वैद्यकीय बटालियनमध्ये रहायचंय..." मेजरनी आपला केसाळ हातमोजा ओढून काढला, ब्लँकेटाखालील अलेक्सेईचा हात चाचपून पकडला व ते म्हणाले:

"अरे भल्या माणसा, तुझ्यावर खूप गंभीर उपचार करण्याची गरज आहे."

अलेक्सेईने जोरजोरात मान हलविली. त्याला येथे खूप छान आणि निवांत वाटत होते. ज्या अनुभवांमधून तो गेला होता ते अनुभव आता त्याला भयानक वाटत नव्हते, किंवा पायांमधील वेदनेची तीव्रताही आता त्याला तेवढी पीडादायक वाटत नव्हती.

"तो काय म्हणतोय?" चीफ ऑफ स्टाफनी घोगऱ्या आवाजात चौकशी केली.

"त्याला इथं आपल्यावरोबर रहायची इच्छा आहे." स्मित करीत कमांडर उत्तरले.

त्या क्षणाला त्यांचे स्मित नेहमीप्रमाणे गूढ नव्हते, तर त्यात स्नेहाची व खिन्नतेची छटा होती.

"मूर्ख आहे! साहसी! 'पिओनेर्स्कीया प्रावदा'साठी एक आदर्श नमुना!" चीफ ऑफ स्टाफ म्हणाले. "खुद्द सेनापतींच्या हुकूमावरून त्याच्यासाठी मॉस्कोहून विमान पाठवून ते त्याचा गौरव करताहेत आणि हा... काय मत आहे तुमचं याच्याबद्दल?..."

यावर उत्तर द्यावे आणि आपण साहसवादी नाही असे सांगावेसे मेरेस्येवला वाटत होते. विघाड झालेले विमान नाइलाजाने खाली उतरवीत असताना पूर्वी एकदा त्याचा पाय मुरगळला होता तेव्हा शुश्रूषा तळावरील ह्या तंबूत त्याने काही दिवस काढले होते आणि मॉस्कोतील रुग्णालयामधील अज्ञात सोयींपेक्षा इथे परिचित वातावरणात आपण अधिक लौकर बरे होऊ, अशी त्याची मनोमन खात्री पटली होती. चीफ ऑफ स्टाफना कोणत्या शब्दात बोचरे उत्तर द्यायचे त्या शब्दांची जुळणीही त्याने मनामध्ये केली होती, पण ते शब्द त्याने उच्चारण्यापूर्वीच धोक्याचा भोंगा वाजू लागला.

प्रत्येकाचा चेहरा तात्काळ गंभीर बनला व जो तो आपापल्या कामाला लागला. मेजरनी भराभरा थोडक्या शब्दात हुकूम सोडले व माणसे मुंग्यांप्रमाणे लगबग हालचाली करू लागली. जंगलाच्या कडेला आडोशात उभ्या असलेल्या विमानांकडे काही लोक धावले तर विमानतळाच्या कडेशी एका छोटया टेकाडाप्रमाणे ठळक उठून दिसणाऱ्या कमांड पोस्टकडे काहीजण धावले. काही लोक जंगलात लपवून ठेवलेल्या यंत्रांकडे पळाले. आकाशात धुराची ठळक रेषा उमटलेली अलेक्सेईने पाहिली. अनेक शेपटांच्या अग्निबाणाची ती भुरकट धूररेषा सावकाशपणे विरत जात होती. त्याचा अर्थ त्याला समजला: "सावध रहा!" त्याच्या काळजाचे ठोके धाडधाड पडू लागले, त्याच्या नाकपुडया थरथरू लागल्या. धोक्याच्या क्षणी नेहमी त्याला जाणवणारा थंड शहारा त्याच्या पाठीमधून झणझणत गेला.

सावधगिरीचा इशारा देणारा भोंगा वाजला तेव्हा विमानतळावरील त्या धांदलीत ल्येनोचकाला, मेकॅनिक यूराला व "हवामान सार्जंट"ला विशेष कामगिरी अशी कुठलीच नव्हती. त्यांनी झटकन स्ट्रेचर उचलला व जंगलाच्या कडेच्या सर्वात जवळच्या ठिकाणाकडे तिघांनीही धाव घेतली. शक्यतो एकसारखी पावले टाकण्याचा त्यांचा प्रयत्न चालला होता, पण धांदलीत तसे करणे अर्थातच त्यांना जमत नव्हते.

अलेक्सेई विव्हळला. ती तिघे आता पळण्याऐवजी चालू लागली. दूरवर विमानविरोधी स्वयंचलित तोफा एव्हाना धडधडू लागल्या होत्या. धावपट्टीवर विमाने एका पाठोपाठ एक सरपटत येत होती व आकाशात झेपावत होती. त्यांच्या इंजिनांच्या परिचित आवाजाहून वेगळी अशी अनियमित, हेलकावणारी घरघराट लौकरच जंगलाच्या दिशेने ऐकू येऊ लागली. लागलीच अलेक्सेईचे स्नायू आपोआप ताणलेल्या स्प्रिंगांप्रमाणे आवळले गेले. आपण लढाऊ विमा-

नातील वैमानिकाच्या जागी बसलो आहोत आणि शत्रूशी सामना करायला वेगाने धावून जात आहोत, अशी कल्पना स्ट्रेचरला बांधलेल्या ह्या माणसाच्या मनात चमकून गेली.

अरुंद फटीत स्ट्रेचर जाईना. अलेक्सेईला आपल्या हातांवर धरून खाली नेण्याचा यूराचा आणि दोन मुलींचा विचार होता. पण अलेक्सेईने त्यांना विरोध केला. जंगलकिनारी, एका मोठ्या, धिप्पाड भोजवृक्षाखाली स्ट्रेचर ठेवण्याची त्याने आज्ञा केली. तेथे पडून राहून त्याने ज्या घडामोडी पाहिल्या त्या एखाद्या अवजड स्वप्नातील वेगवान घटनांप्रमाणे घडल्या. जमिनीवरून हवाई लढाई पाहण्याच्या संधी वैमानिकांना क्वचितच मिळतात. युद्धाच्या पहिल्या दिवसापासून लढणाऱ्या मेरेस्येवने जमिनीवर राहून हवाई झुंज कधीच पाहिली नव्हती. हवाई लढाईत विद्युत्‌वेगांची त्याला सवय झालेली. पण आता जमिनीवरून ती हवाई झुंज एवढी मंद आणि बिनअपायकारी भासत होती, की तो चकित झाला. जुन्या, चपट्या नाकांच्या लढाऊ विमानांच्या हालचाली किती बेंगरूळ दिसत होत्या! वरून ऐकू येणारा त्यांच्या मशिन-गनचा खडखडाट किती क्षुल्लक भासत होता! एखाद्या शिवणयंत्राच्या घरघरी-सारखा, अथवा सुती कापड फाडताना होतो तसा टर्रर्र आवाज ऐकू येत होता.

बाणाच्या उलट्या टोकाच्या रचनेत बारा जर्मन बाँबफेकी विमाने विमानतळाच्या डोक्यावरून उडत गेली आणि उंच आकाशात तेजस्वी सूर्य-किरणांमध्ये नाहीशी झाली. उन्हामुळे ढगांच्या कडा एवढ्या चकाकत होत्या की, त्यांची तिरीप डोळ्यांना खुपत होती. त्या ढगांमागून इंजिनांचा मंद आवाज चिलटांच्या गुणगुणीसारखा भासत होता. जंगलामधील विमानविरोधी तोफा आता अधिक चेवाने आकाशात आग ओतू लागल्या. त्यांच्या फुटणाऱ्या तोफगोळ्यांमधून निघणारा धूर आकाशात झुपकेदार पिवळ्या फुलांच्या बियां-सारखा दिसत होता. पण लढाऊ विमानाच्या क्वचित चमकणाऱ्या पंखांशिवाय दुसरे काहीही दिसत नव्हते. चिलटांच्या गुणगुणीत टर्रर्र, टर्रर्र, टर्रर्र असा कापड फाडल्यासारखा आवाज वारंवार ऐकू येऊ लागला होता. चकाकत्या सूर्यकिरणांमध्ये लढाई पेटली होती. पण हवाई लढाईत भाग घेणाऱ्यांना ती झुंज जेवढी थरारक वाटत होती तेवढी जमिनीवरून पाहणाऱ्यांना मुळीच वाटत नव्हती. त्यामुळे अलेक्सेईला तो सर्व प्रकार अगदी क्षुल्लक आणि नीरस भासला. त्याच्या मनाने त्या हवाई झुंजीचा थरार अनुभवला नाही.

एवढेच नव्हे तर वरून एक कर्कश्य आवाज मोठा मोठा होत गेला आणि कुंचला झटकल्यानंतर खाली पडणाऱ्या काळ्या थेंबांप्रमाणे वेगाने आकार मोठा होत गेलेले लांबुळके बाँब भराभरा खाली आले, तरीही अलेक्सेई मुळीच घाबरला नाही. उलट ते बाँब कोठे पडतात हे पाहण्यासाठी त्याने आपले डोके किंचित उंचावले.

या क्षणाला "हवामान सार्जंट" चे वागणे पाहून अलेक्सेई चकित झाला. खाली कोसळणाऱ्या बाँबचे कर्कश्य आवाज टिपेला पोहोचले होते तेव्हा कमरेइतक्या उंच खंदकात उभी असलेली व नेहमीप्रमाणे अलेक्सेईकडे चोरून कटाक्ष फेकणारी ही मुलगी एकदम उडी मारून खंदकाबाहेर आली व स्ट्रेचरच्या दिशेने धावली. धपकन जमिनीवर पडून तिने आपल्या शरीराने अलेक्सेईचे शरीर झाकले. भीतीने आणि अस्वस्थ मनःस्थितीमुळे ती थरथर कापत होती.

क्षणभर त्याने स्वतःच्या अगदी डोळयांजवळ तो उन्हात करपलेला, अगदी बालिश असा चेहरा पाहिला. त्या चेहऱ्यावरील ओठ लोभस होते आणि बसक्या नाकावरील त्वचा सोलली गेली होती. जंगलात कोठेतरी स्फोटाचा प्रचंड आवाज झाला व त्या पाठोपाठ अगदी जवळ दुसरा, तिसरा आणि चौथा स्फोट झाला. पाचवा स्फोट एवढा भयानक होता, की जमीन थरथरून हादरली. अलेक्सेई ज्या झाडाखाली निजला होता त्या झाडाचा शेंडा बाँबच्या कपचामुळे तुटला व कडकड आवाज करीत खाली कोसळला. त्या मुलीचा फिकट, घाबरलेला चेहरा त्याने पुन्हा एकदा पाहिला. तिच्या थंड गालाचा स्पर्श त्याच्या गालाला जाणवला. दोन बाँबच्या स्फोटांदरम्यानच्या वेळात ही घाबरलेली मुलगी पुटपुटली :

"लाडक्या! लाडक्या! ..."

बाँबची आणखी एक माळ जमिनीवर कोसळली व प्रचंड स्फोटांनी आसमंत हादरला. जणू झाडे मुळांपासून उन्मळून विमानतळाच्या धावपट्टीवर फेकली गेली. गोठलेल्या मातीची भलीमोठी ढेकळे आकाशात उंच उडाली व धप्प आवाज करीत परत खाली कोसळली. हवेत तपकिरी, तिखट धुराचा पट्टा तरंगत राहिला. त्याला लसणीसारखा वास येत होता.

जेव्हा धूर विरून गेला तेव्हा आसपास सारे काही शांत झाले होते. हवाई लढाईचे आवाज जंगलामागून क्वचितच ऐकू येत होते. ती मुलगी एव्हाना उडी मारून सरळ उभी राहिली होती. एरवी फिकट दिसणारे तिचे

गाल मात्र आत्ता लालबुंद झाले होते. ती कमालीची लाजली होती व अगदी रडायच्या बेतात होती. अलेक्सेईपासून दूर आपली नजर वळवून दिलगीर स्वरात ती म्हणाली :

"मी तुम्हाला अपाय तर केला नाही ना? देवा रे देवा, किती मूर्ख आहे मी! मला क्षमा करा!"

"आता क्षमा मागून काही उपयोग नाही," यूरा गरजला. आपल्या मित्राचे रक्षण करण्यासाठी आपण धावलो नाही, तर ही हवामान केंद्राची मुलगी धावली, या वस्तुस्थितीची त्याला शरम वाटली होती.

कुरकुरत त्याने आपल्या कोटावरील वाळू झटकली. आपल्या डोक्याची मागील बाजू खाजवीत त्याने तुटलेल्या भोजवृक्षाकडे आश्चर्याने नजर टाकली. तुटलेल्या बुंध्यामधून पारदर्शी चीक उतू जात होता. जखमी झाडाचा हा चीक उन्हात चमकत होता. झाडाच्या शेवाळया सालीवरून त्याची धार ओघळत होती व अश्रूंप्रमाणे नितळ, पारदर्शी थेंब जमिनीवर टपटप पडत होते.

"पहा! झाड रडतंय!" ल्येनोचका म्हणाली. ऐन धोक्याच्या काळातही तिने आपला धीट कुतूहलाचा स्वभाव सोडला नव्हता.

"तूसुद्धा तशीच रडशील!" दुर्मुखलेपणाने यूरा उत्तरला. "चला, खेळ संपलाय! ॲम्ब्युलन्स विमानाला काही इजा झाली नसावी अशी आशा करू या!"

"इथं वसंत आलाय!" मेरेस्येव म्हणाला. तुटक्या झाडावर, जमिनीवर टपटप गळणाऱ्या चमकत्या पारदर्शी चीकावर त्याची नजर भिरभिर फिरत होती. आपल्या मापापेक्षा मोठा ओव्हरकोट घातलेल्या, चपटचा नाकाच्या "हवामान सार्जंट" कडे त्याने टक लावून पाहिले. तिचे खरे नांवसुद्धा त्याला माहीत नव्हते.

त्या दोन मुली मागील बाजूस व यूरा पुढे अशा थाटात ते तिघेजण अलेक्सेईला स्ट्रेचरवरून विमानाकडे घेऊन जात होते. बॉंबस्फोटांनी पडलेल्या खड्ड्यांमधून अजूनही धूर उमटत होता व वितळणाऱ्या बर्फाचे पाणी त्यांमधून झिरपत होते. त्या खड्ड्यांना टाळून नागमोडी चालीने ते तिघे चालत होते. जाडयाभरडया ओव्हरकोटाच्या बाहीमधून बाहेर आलेल्या व स्ट्रेचरची मूठ घट्ट पकडलेल्या त्या छोटया, बळकट हाताकडे अलेक्सेई कुतूहलाने तिरपे कटाक्ष टाकीत होता. तिला काय झाले होते? अथवा भीतीच्या भरात ते शब्द ऐकल्याचा त्याला भास झाला होता?

तो दिवस अलेक्सेई मेरेस्येवच्या दृष्टीने अनेक अरिष्टसूचक घडामोडींनी भरलेला होता. रुपेरी रेड क्रॉस विमान एव्हाना दिसू लागले होते. बाँबच्या कपच्याने वा स्फोटांमुळे विमानाला काही धक्का पोहोचला अथवा नाही, याची पाहणी करीत त्या विमानाभोवती मान हलवीत फिरणारा मेकॅनिक दृष्टीपथात आला होता. या दरम्यान लढाऊ विमाने एका पाठोपाठ एक आपल्या तळावर परतू लागली होती. नेहमीप्रमाणे गोल चक्कर न मारता ती सरळ खाली उतरत होती व जंगलाच्या किनारी तात्काळ त्यांना आडोशाला नेण्यात येत होते.

लौकरच आकाशात सर्व काही शांत झाले. विमानतळ मोकळा झाला आणि जंगलातील इंजिनांची घरघर थांबली. पण माणसे अजूनही कमांड पोस्टपाशी उभी होती व डोळयांवर हाताचा आडोसा धरून उन्हाची तिरीप चुकवीत आकाश न्याहाळीत होती.

"नऊ नंबर आलं नाही! कूकूश्किन कुठंतरी अडकला!" यूरा म्हणाला.

नेहमी असमाधानाचा भाव चेहऱ्यावर बाळगणाऱ्या कूकूश्किनचा छोटा, पिवळट चेहरा अलेक्सेईला आठवला. त्या सकाळी किती काळजीपूर्वक त्याने स्ट्रेचरला हातभार लावला होता तेही अलेक्सेईला आठवले. त्याला... धांदलीच्या दिवसात वैमानिकाच्या दृष्टीने अत्यंत सामान्य असणारा हा विचार आता मात्र विमानतळाच्या जीवनामधून वगळल्या गेलेल्या अलेक्सेईला अंगावर शहारा उमटवून गेला.

त्याच क्षणाला त्यांना विमानाच्या इंजिनाची घरघर ऐकू आली.

यूराने आनंदाने आरोळी ठोकत उडी मारली:

"तो पहा आला!"

कमांड पोस्टवरील माणसांमध्ये चलबिचल झाली. काहीतरी घडले होते. "नऊ नंबर" उतरले नाही, तर विमानतळावर मोठ्या वर्तुळात घिरट्या घालू लागले. डोक्यावरून ते उडत असताना अलेक्सेईने पाहिले की, त्याच्या पंख्याचा काही भाग तुटून पडला होता व त्याहून वाईट म्हणजे पोटाखाली फक्त एकच "पाय" दिसत होता. दोन लाल अग्निबाण हवेत एका पाठोपाठ उडाले. कूकूश्किन परत घिरट्या मारू लागला. घरटे उध्वस्त झाल्यामुळे कोठे उतरायचे ते न समजल्यामुळे घिरट्या घालणाऱ्या पक्ष्याप्रमाणे त्याचे विमान भासत होते.

"एका मिनिटात तो बाहेर उडी मारील! त्याचं इंधन संपलंय. शेवटच्या

थेंबांवर तो उडतोय!" आपल्या घड्याळावर डोळे खिळवून यूरा अस्पष्टपणे म्हणाला.

जेव्हा विमान उतरविणे अशक्य ठरते अशा प्रसंगी अतिउंचीवर विमानाला नेऊन नंतर विमानातून खाली उडी मारायची वैमानिकांना परवानगी असते. कदाचित "नऊ नंबर"ला तसा हुकूम मिळाला होता, पण तरीही हट्टाने तो घिरट्या मारीत होता .

विमानाकडे आणि आपल्या मनगटावरील घड्याळाकडे यूरा आळीपाळीने नजरा टाकीत होता. इंजिन मंदावले असे जेव्हा त्याला वाटले तेव्हा तो उकीडवा बसला व त्याने मान फिरविली. "विमान वाचवण्याचा तो विचार करतोय काय?" तेथे हजर असलेला प्रत्येक माणूस स्वतःशी म्हणत होता: "भल्या माणसा, मार उडी!"

शेपटीवर "१" आकडा लिहिलेले एक लढाऊ विमान हवेत उडाले व पहिल्याच झटक्यात कुशलपणे घायाळ "नऊ नंबर"पाशी आले. ज्या थंडपणे कुशलतेने विमान हाताळले जात होते त्यावरून अलेक्सेईने तर्क बांधला की, खुद्द विंग कमांडर विमान चालवीत होता. कूकूश्किनचा रेडिओ सेट बिघडला असावा अथवा वैमानिकाचे डोके काम करीत नसावे असे समजून विंग कमांडर मदत करण्यासाठी धावला होता हे उघड होते. "मी करतो तसे कर" असा इशारा आपल्या पंखांनी त्याने दिला व बाजूला वळून तो वर चढला. कूकूश्किनने विमान वळवावे आणि बाहेर उडी टाकावी, असा त्याने हुकूम दिला होता. पण त्याच क्षणाला कूकूश्किनने इंजिन कमी केले होते व जमिनीवर उतरण्याची तयारी केली होती. मोडक्या पंखाचे त्याचे विमान थेट अलेक्सेईच्या डोक्यावरून जोरात खाली आले व त्याने तात्काळ जमीन गाठली. एकदम ते डावीकडे कलंडले, आपल्या शाबूत "पाया" वर उतरले. एका चाकावर थोडे अंतर पळत गेले, त्याने वेग कमी केला, मग उजवीकडे कलंडले आणि आपल्या धडक्या पंखाने जमिनीला स्पर्श करून त्याने गिरकी मारली. बर्फाचे लोटच्या लोट वर उसळले.

बर्फाचे ढग परत जमिनीवर बसले तेव्हा मोडक्या विमानापाशी कसली तरी काळी आकृती पडली होती. ह्या काळ्या आकृतीपाशी माणसे पळत आली. भोंगा वाजवीत ॲम्ब्युलन्स मोटारही तिकडे धावली.

"त्यानं त्याचं विमान वाचवलं! कूकूश्किन असा माणूस आहे तर! असं वागायला तो केव्हा शिकला?" स्ट्रेचरवर पडलेल्या मेरेस्येवच्या मनात हे विचार आले व त्याला आपल्या साथीदाराचा हेवा वाटला.

आत्तापर्यंत सर्वांना न आवडणाऱ्या, पण काही क्षणांपूर्वीच आपले शौर्य आणि वैमानिकी कसब सिद्ध करणाऱ्या ह्या छोट्या चणीच्या माणसापाशी सर्व बळ एकवटून धावत जाण्याची ऊर्मी अलेक्सेईच्या मनात उसळली. पण त्याला स्ट्रेचरला जखडलेले होते आणि मरणांतिक तीव्र वेदनेने तो बंधनात पडला होता. मानसिक ताण कमी होताच पायातील ठणका परत तीव्रतेने जाणवू लागल्या होत्या.

ह्या सर्व घडामोडी अवघ्या तासाभरात घडल्या होत्या. पण त्या एवढ्या असंख्य आणि जलद घडल्या होत्या, की त्यांचे तात्काळ मनात विश्लेषण करणे अलेक्सेईला शक्य झाले नाही. पण रेड क्रॉस विमानाच्या खास कप्प्यांमध्ये जेव्हा त्याचा स्ट्रेचर घट्ट बसविण्यात आला आणि "हवामान सार्जंट"च्या निश्चल नजरेला त्याने पुन्हा पाहिले, तेव्हा कुठे बाँबहल्ल्याच्या वेळी ह्या मुलीच्या फिकुटल्या ओठांमधून निसटलेल्या त्या शब्दांचा खरा अर्थ त्याच्या ध्यानात आला. ह्या सुरेख आत्मत्यागी मुलीचे नांवसुद्धा माहीत नसल्याच्या विचारापायी तो शरमिंदा झाला.

"कॉम्रेड सार्जंट," तिच्याकडे कृतज्ञ डोळ्यांनी पहात त्याने हळूच हाक मारली.

इंजिनाच्या घरघराटीमध्ये त्याचे शब्द तिला ऐकू आले अथवा नाही याबद्दल शंका आहे. पण ती पुढे झाली व एक छोटे पुडके त्याच्या हाती देत म्हणाली :

"कॉम्रेड सीनियर लेफ्टनंट, ही तुमच्यासाठी पत्रं आहेत. मी ती राखून ठेवली होती, कारण तुम्ही जिवंत होता आणि परत याल अशी माझी खात्री होती. मला ते माहीत होतं, जाणवलं होतं."

पत्रांचा छोटा जुडगा तिने त्याच्या छातीवर ठेवला. त्यातील अनेक पत्रे त्याच्या आईकडून आलेली होती. त्रिकोणी घड्या केलेली, वेड्यावाकड्या अक्षरात लिहिलेली आपल्या आईची पत्रे त्याने ओळखली. आणि दुसरी परिचित लिफाफ्यांमध्ये होती. ही लिफाफ्यांमधील पत्रे तो नेहमी आपल्या सदऱ्याच्या खिशात ठेवत असे. हे लिफाफे पाहताच त्याचा चेहरा उजळला. ब्लँकेटामधून आपला हात मोकळा करण्यासाठी त्याने हालचाल केली.

"एखाद्या मुलीकडून आलीत वाटतं?" खिन्नपणे "हवामान सार्जंट" ने विचारले व ती पुन्हा लाजली. तिच्या डोळ्यांमध्ये आसवे तरारली व तिच्या लांबट, ब्राँझच्या रंगाच्या पापण्या एकमेकींना चिकटल्या.

स्फोटांच्या वेळी ऐकलेले ते शब्द म्हणजे भास नव्हता याबद्दल आता मेरेस्येवची खात्री पटली व ही जाणीव झाल्यामुळे सत्य सांगायचे धाडस त्याला झाले नाही.

"माझ्या विवाहित वहिणीची ही पत्रं आहेत. आता तिचं आडनांव वेगळं आहे," तो उत्तरला. पण त्याला स्वत:चीच किळस आली होती.

इंजिनाच्या घरघराटात माणसे मोठमोठ्या आवाजात बोलत होती. बाजूचे दार उघडले आणि सर्जन विमानात आले. ह्या अनोळखी माणसाने ओव्हरकोटावर पांढरा झगा चढविला होता.

"इथं एव्हाना एक पेशंट हजर आहे वाटतं? छान!" मेरेस्येवकडे पहात ते म्हणाले "त्या दुसऱ्याला पण आत आणा! एका मिनिटात आम्ही इथून निघू. बाईसाहेब, तुम्ही इथं काय करताहात?" यूरामागे लपण्याचा प्रयत्न करणाऱ्या "हवामान सार्जंट" कडे वाफेने धूसर बनलेल्या आपल्या चष्म्यामधून रोखून पहात त्यांनी पृच्छा केली. "कृपा करून जा. आम्ही मिनिटभरात निघू. अरे! तो स्ट्रेचर आत ठेवा!"

"लिहा, कृपा करून लिहा! मी वाट पाहीन!" त्या मुलीचे अस्पष्ट शब्द अलेक्सेईने ऐकले.

यूराच्या मदतीने सर्जननी विमानात एक स्ट्रेचर उचलून आणला. त्या स्ट्रेचरवर हळू आवाजात कुणीतरी कण्हत होते. तो स्ट्रेचर कप्प्यांमध्ये घट्ट बसविला जात असताना त्याच्यावरील चादर गळून पडली आणि वेदनेने वेडावाकडा बनलेला कूकूश्किनचा चेहरा अलेक्सेईला दिसला. सर्जननी आपले हात चोळले. केबिनमध्ये एकवार नजर टाकली व मेरेस्येवच्या पोटावर थोपटीत ते म्हणाले:

"छान! सुरेख! तरुण माणसा, तुम्हाला सोबत द्यायला आणखी एक प्रवासी आहे. काय? आता जे आमच्याबरोबर येणार नाहीत त्यांनी कृपया विमानाबाहेर जावं! सार्जंटच्या फिती लावलेली ती लॉरेली गेली का? छान! चला, निघा आता!..."

यूरा जायला नाखूष दिसला. शेवटी सर्जननी त्याला बाहेर ढकलले. दार बंद करण्यात आले. विमान हादरले, सुरू झाले, दुडक्या चालीने पळाले आणि शांतपणे व सुरळीतपणे त्याने हवेत झेप घेतली. इंजिनांचा तालबद्ध आवाज येऊ लागला. भिंतींचा आधार धरीत मेरेस्येवपाशी सर्जन गेले.

"कसे काय आहात?" त्यांनी चौकशी केली. "तुमची नाडी बघू दे."

त्यांनी चौकसपणे मेरेस्येवकडं पाहिले, आपली मान हलविली आणि ते पुटपुटले: "हॅं! भक्कम गडी आहे!" मग मेरेस्येवला उद्देशून ते म्हणाले: "तुमच्या साहसांच्या कथा तुमचे मित्र सांगतात, त्यांवर विश्वास ठेवणं कठीण आहे. अगदी अतर्क्य! जॅक लंडनच्या गोष्टीसारखं!"

ते आपल्या खुर्चीत धपकन बसले. अधिक आरामशीरपणे त्यांनी आसन जमविले. एकदम त्यांचे अंग ढिले पडले आणि ते गाढ झोपले. इत:पर तरुण नसलेला हा फिकट चेहऱ्याचा माणूस अती दमला होता हे स्पष्ट होते.

"जॅक लंडनच्या गोष्टीसारखं," मेरेस्येवच्या मनात विचार आला. आपल्या बालपणीच्या, फार फार जुन्या आठवणी त्याच्या मनात आल्या: पाय गोठून बधीर झालेला, वाळवंटातून सरपटत जाणारा माणूस व त्याचा पाठलाग करणारा आजारी आणि भुकेला लांडगा यांची गोष्ट. इंजिनांच्या सतत घरघरीमुळे अलेक्सेईची तंद्री लागली. सर्व काही तरंगू लागले, वस्तूंच्या बाह्य रेषा पुसट बनल्या, भुरकट अंधारात सर्व काही विरघळू लागले. झोप लागता लागता एक विचित्र विचार अलेक्सेईच्या मनात चमकून गेला: तेथे युद्ध नव्हते, बाँबवर्षाव नव्हते; पायांमध्ये सतत कुरतडणारी छळवादी वेदना नव्हती; मॉस्कोला वेगाने जाणारे विमान नव्हते. ह्या सर्व गोष्टी केवळ अतिदूरच्या कामीशिन गांवी त्याच्या बालपणी त्याने वाचलेल्या एका अद्भुत पुस्तकात सामावल्या होत्या.

भाग दुसरा

१

अलेक्सेई मेरेस्येव आणि लेफ्टनंट कॉन्स्तन्तिन कूकूश्किन यांना सेनादलाच्या सरसेनानींच्या विनंतीवरून मॉस्कोतील ज्या इस्पितळात ठेवले होते त्या इस्पितळाची भव्यता आपल्या मित्रापाशी वर्णन करून सांगताना आंद्रेई देगत्यारेन्को आणि ल्येनोचका यांनी मुळीच अतिशयोक्ती केली नव्हती. युद्धापूर्वी येथे एका इन्स्टिटयूटचे क्लिनिक होते व आजारपणानंतर अथवा जखमी झाल्यानंतर लोकांची प्रकृती लौकरात लौकर सुधारावी म्हणून नवनव्या पद्धतींचा शोध लावण्याचे कार्य एक नामवंत सोविएत शास्त्रज्ञ येथे करीत होता. ह्या इन्स्टिटयूटच्या ठाम प्रस्थापित परंपरा होत्या आणि तिची ख्याती जगभर पसरलेली होती.

युद्ध पेटले तेव्हा त्या शास्त्रज्ञाने क्लिनिकचे इस्पितळात रूपांतर केले व जखमी लष्करी अधिकाऱ्यांवर येथे उपचार करण्यात येऊ लागले. त्या काळी विज्ञानाला ज्ञात असलेली प्रत्येक उपचारपद्धती रुग्णांसाठी उपलब्ध करून देण्याचे पूर्वीचे कार्य इस्पितळाने पुढे चालू ठेवले. मॉस्कोबाहेर चाललेल्या लढायांनी एवढे प्रखर रूप धारण केले की, जखमींची संख्या अतोनात वाढली व क्लिनिकमध्ये जेवढया खाटांची सोय होती तिच्या चौपट खाटा टाकणे भाग पडले. सर्व पूरक दालनांचे – भेटीला येणाऱ्यांचे दालन, वाचन आणि मनोरंजन दालने, कर्मचाऱ्यांच्या खोल्या व भोजनदालने – वॉर्डांमध्ये रूपांतर करण्यात आले. खुद्द त्या शास्त्रज्ञाने आपल्या प्रयोगशाळेजवळची स्वतःची अभ्यासिका देऊन टाकली व कामावरच्या परिचारिकेसाठी असलेल्या छोटया खोलीत स्वतःच्या पुस्तकांसह मुक्काम टाकला. एवढे करूनही, अनेकदा व्हरांडयांमध्ये खाटा टाकणे भाग पडत होते.

तेथील चकचकीत पांढऱ्याशुभ्र भिंती जणू वैद्यक मंदिराच्या पवित्र शांततेला राखण्यासाठी घडविल्या होत्या असे भासायचे. आता त्या भिंतींपलिकडून आजाऱ्यांचे कण्हणे, विव्हळणे आणि घोरणे ऐकू येत होते. भ्रमात असणाऱ्यांचे बरळणे ऐकू येत होते. युद्धाच्या कोंदट उग्र दर्पांनी – रक्तलांच्छित बँडेजे, चिघळलेल्या जखमा, जिवंत माणसांचे सडणारे मांस यांच्या दर्पांनी –

ती जागा पुरेपूर भरून गेली होती. कितीही स्वच्छ हवा खेळविली तरी काही उपयोग होत नव्हता. त्या शास्त्रज्ञाने स्वतः आरेखन करून रुग्णांसाठी जास्तीत जास्त आरामशीर खाटा मुद्दाम बनवून घेतलेल्या होत्या. आता त्या खास बनावटीच्या खाटांशेजारी घडीच्या कँप-खाटाही उभ्या होत्या. भांड्यांची कमतरता भासत होती. क्लिनिकमध्ये असलेल्या चिनी मातीच्या सुंदर पात्रां-बरोबर टेंगळे आलेली ॲल्युमिनियमची भांडीही वापरण्यात येत होती. जवळच झालेल्या बॉबस्फोटाच्या हादऱ्याने इटालियन धर्तीच्या प्रचंड खिडक्यांची काच खळखळा फुटून गेली होती व आता त्या काचेच्या जागी प्लायवूडचे बोर्ड ठोकलेले होते. पाण्याचीही तूट जाणवत होती. गॅसचा पुरवठा वारंवार थांबत होता आणि जुन्या-पुराण्या स्पिरिट-स्टोव्हांवर उपकरणे उकळून निर्जंतुक करावी लागत होती. पण जखमींचा ओघ थांबत नव्हता. विमानांमधून, मोटारींमधून, आगगाड्यांमधून वाढत्या संख्येने जखमींना आणले जात होते. आणि आमच्या चढाईच्या सामर्थ्याच्या प्रमाणात त्यांची संख्या वाढत होती.

अशी परिस्थिती असूनही, इस्पितळामधील सर्व कर्मचारी – अगदी तेथील प्रमुख, सन्मानित शास्त्रज्ञ व सर्वोच्च सोविएतचे सदस्य यांच्यापासून तहत वॉर्डातील मोलकरणी, पोर्टर वगैरे सर्वांपर्यंत – आपल्या इन्स्टिटयूटच्या प्रस्थापित नियमांनुसार काम करण्याची पराकाष्ठा करीत होते. वस्तुतः ही सर्व माणसे खूप थकलेली होती, अनेकदा त्यांना अर्धपोटी काम करावे लागत होते, संपूर्ण रात्रभर विश्रांती मिळणे त्यांना दुरापास्त झाले होते, पण तरीही रुग्णसेवेचा आपला उच्च दर्जा कायम टिकविण्यासाठी ती झटत होती. वॉर्डामधील बायका काही वेळा अजीबात विश्रांती न घेता लागोपाठ तीन-तीन पाळ्या काम करीत होत्या. फुरसतीच्या प्रत्येक क्षणाचा फायदा घेऊन खोल्या स्वच्छ करीत होत्या, धूत होत्या, घासून-पुसून काढीत होत्या. कृश शरीराच्या, एकदम वयस्क बनलेल्या, थकव्यामुळे पाय लटपटत असले-ल्या परिचारिका अजूनही पूर्वीप्रमाणे कामावर हजर होताना पांढऱ्या, कडक खळ घातलेल्या झग्यांना परिधान करून येत होत्या. डॉक्टरांच्या सर्व सूचना अत्यंत काटेकोरपणे अंमलात आणत होत्या. कुणाही पेशंटच्या बिछान्यावरील चादरीवर छोटासा डाग आढळला तरी हाऊस सर्जन संबंधित व्यक्तींची कडक कानउघाडणी करीत होते. भिंती, नक्षीदार चपटे कठडे, दारांच्या मुठी संपूर्ण स्वच्छ आहेत याची खात्री करून घेण्यासाठी आपल्या हातरुमालांनी

घासून पहात होते. आणि दिवसामधून दोनदा, ठरीव वेळांना, इस्पितळाचे प्रमुख येत व वॉर्डांमधून फिरून पाहणी करीत. उंच अंगकाठीचा, लालबुंद चेहऱ्याचा, भव्य कपाळावर पांढरे केस उभे असलेला, काळया मिशांचा, रुबाबदार पांढुरक्या दाढीचा हा अत्यंत कडक शिस्तीचा माणूस युद्धापूर्वीच्या प्रथेप्रमाणे आजही नियमितपणे दिवसातून दोनदा वॉर्डांची पाहणी करायला येत होता. त्यांच्या पाटोपाठ कडक खळीचे झगे परिधान केलेल्या हाऊस सर्जनांचा व साहाय्यकांचा घोळका फिरायचा. इस्पितळ-प्रमुख नव्या पेशंटांची केस-कार्डे लक्षपूर्वक न्याहाळीत आणि गंभीर केसेसबाबत सल्ला देत.

त्या धांदलीच्या दिवसांमध्ये त्यांना इस्पितळाच्या बाहेरही प्रचंड कामाचा डोंगर उपसावा लागत होता, पण विश्रांती आणि झोप यांचा त्याग करून, स्वतः निर्माण केलेल्या इन्स्टिटयूटला भेट देण्यासाठी ते नेहमी सवड काढीत होते. कुणी कामात कुचराई केलेली आढळली तर इस्पितळाच्या कर्मचाऱ्याला तेथल्या तेथे ते फैलावर घेत. प्रकाशबंदी असलेल्या युद्धकालीन मॉस्कोतसुद्धा क्लिनिकने आपले काम चोख आदर्शाने चालविले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. हिटलर-गोअरिंग आदी मंडळींना त्यांचा हा प्रतिटोला होता. युद्धकालीन अडचणींची सबब ऐकून घेण्यास ते साफ नकार देत. कामचुकार आणि ढिल्या मंडळींना हाकलून लावले पाहिजे व परिस्थिती कठीण असतानाच इस्पितळात काटेकोर सुव्यवस्था असणे आवश्यक होते, असे त्यांचे मत होते. आपल्या फेरीला ते एवढ्या नियमितपणे व अचूक वेळी येत, की वॉर्डातल्या बायका ते दिसताच पूर्वीप्रमाणेच घड्याळांच्या वेळा ठीक करीत. हवाई हल्ल्यांनीसुद्धा त्यांच्या ह्या नियमित परिक्रमात खंड पडला नव्हता. त्यांच्या अशा ह्या वागण्यामुळे चमत्कार घडविण्यास कर्मचाऱ्यांना प्रेरणा मिळत होती आणि अतर्क्य अडचणींच्या परिस्थितीतही ते क्लिनिकमध्ये युद्धपूर्व सुव्यवस्था राखत होते.

या इस्पितळ-प्रमुखांना आपण वासिली वासिल्येविच अशा नांवाने संबोधू. तर हे वासिली वासिल्येविच आपल्या सकाळच्या फेरीच्या वेळी एके दिवशी तिसऱ्या मजल्यावरील जिन्याच्या कठड्यापाशी उभ्या ठेवलेल्या दोन खाटांपाशी येऊन ठेपले.

"हे काय प्रदर्शन मांडलंय?" ते गरजले आणि आपल्या केसाळ भुवयांखालून त्यांनी हाऊस सर्जनकडे एवढा प्रखर रागीट कटाक्ष टाकला, की उंच बांध्याचे, गोल खांद्यांचे, वयस्कतेकडे झुकलेले, भव्या व्यक्तिमत्वाचे हाऊस

सर्जन एखाद्या शाळकरी मुलाप्रमाणं एकदम दक्ष पवित्र्यात उभे राहिले व म्हणाले :

"कालच रात्री आलेत... वैमानिक आहेत. ह्याची मांडी आणि उजवा हात मोडलाय. बाकी अवस्था ठीक. पण ही मात्र गंभीर केस आहे–" डोळे मिटून निःस्तब्ध पडलेल्या नेमके वय सांगणे कठीण असलेल्या रोड आकृतीकडे त्यांनी बोट दाखविले. "पायाच्या धुरींचं फ्रॅक्चर, दोन पावलात गँग्रीन आणि मुख्य म्हणजे अमाप थकवा. अर्थात माझा विश्वास बसत नाही, पण ज्या मेडिकल ऑफिसरनं ह्यांना इथं आणलं तो सांगत होता की, पावलं मोडलेला हा पेशंट जर्मन पिछाडीतून अठरा दिवस रांगत होता. अर्थात ही अतिशयोक्ती असावी..."

हाऊस सर्जनचे न ऐकता वासिली वासिल्येविच यांनी ब्लँकेट दूर केले. छातीवर हातांची आडवी घडी घालून अलेक्सेई मेरेस्येव निजला होता. ताज्या स्वच्छ पांढऱ्या सदऱ्याच्या आणि चादरीच्या पार्श्वभूमीवर त्याचे काळपट त्वचेचे हात ठळक उठून दिसत होते. त्याची शरीराची अस्थिरचना सहज समजत होती. प्राध्यापक वासिली वासिल्येविच यांनी हळुवारपणे ब्लँकेट परत पांघरले आणि हाऊस सर्जनचे बोलणे अडवून ते गुरगुरले:

"हे इथं का पडलेत?"

"कॉरीडॉरमध्ये आणखी जागा नाही. तुम्हीच..."

"तुम्हीच! तुम्हीच! बेचाळीसचं काय?"

"तो कर्नलांचा वॉर्ड आहे."

"कर्नलांचा!" प्राध्यापक उसळून ओरडले." कोणत्या मूर्खानं ही कल्पना शोधून काढली?"

"पण आम्हाला सांगण्यात आलं होतं: 'सोविएत संघाचा वीर ह्या किताबाच्या मानकऱ्यांसाठी राखीव जागा ठेवा!'"

"वीर! वीर!! या युद्धात सगळेच वीर आहेत! आणि तुम्ही मला शिकवण्याचा प्रयत्न का करताहात? इथं प्रमुख कोण आहे? ह्या माणसांना तात्काळ बेचाळीसमध्ये ठेवा. म्हणे 'कर्नलांचा वॉर्ड!' एकेक मूर्ख शोध लावताहेत!"

काहीशा दबलेल्या लवाजम्यासह ते पुढे निघून गेले, पण लौकरच परत आले. मेरेस्येवच्या बिछान्याशी वाकून, वेगवेगळ्या जंतुनाशकांच्या वापराने त्वचा सोललेला आपला गुबगुबीत हात हलकेच त्याच्या खांद्यावर ठेवून त्यांनी विचारले :

"जर्मन पिछाडीतून दोन आठवडेपर्यंत तू सरपटत चालला होतास हे खरं आहे?"

"मला गँग्रीन झालंय?" खोल आवाजात मेरेस्येवने उलट विचारले.

दरवाजापाशी थांबलेल्या आपल्या बरोबरीच्या मंडळींकडे प्राध्यापकमहाशयांनी एक रागीट कटाक्ष टाकला. मग, दु:ख आणि चिंता व्यक्त करणाऱ्या त्या वैमानिकाच्या मोठ्या काळ्या डोळ्यांमध्ये थेट नजर भिडविली व निर्भीडपणे ते म्हणाले:

"तुझ्यासारख्या माणसाला फसवणं हे पाप ठरेल. होय, तुला गँग्रीन झालंय. पण मान ताठ ठेव. जशा कुठल्याही संपूर्ण निराश परिस्थिती नसतात, तसे कोणतेही असाध्य रोग नाहीत. समजलं? ठीक!"

त्यांची उंच आकृती झपझप पावले टाकीत निघून गेली व लौकरच, कॉरीडॉरच्या काचेच्या दाराआडून त्यांच्या रागीट आवाजाचे अस्पष्ट सूर कानी आले.

"गंमतीदार म्हातारा आहे," आपल्या जडावल्या डोळ्यांनी प्राध्यापकांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात मेरेस्येव म्हणाला.

"वेडपट आहे. ऐकलंस त्याचं बोलणं? नाटक करतोय आपल्याशी!" वाकडे स्मित करीत कूकूश्किन म्हणाला. "आपल्यासारख्या सामान्यांना कर्नलांच्या वॉर्डात राहण्याचा मान देताहेत!"

"गँग्रीन!" मेरेस्येव अस्फुटपणे उद्गारला. खेदाने त्याने परत तोच शब्द उच्चारला: "गँग्रीन!!"

२

तथाकथित कर्नलांचा वॉर्ड दुसऱ्या मजल्यावर कॉरीडॉरच्या अखेरीस होता. त्याच्या खिडक्या दक्षिणेस आणि पूर्वेस होत्या. त्यामुळे सारा दिवस सूर्यप्रकाश चमकत असे. सूर्याची किरणे एका खाटेपासून दुसऱ्या खाटेपर्यंत सावकाशपणे सरकत जात. वॉर्ड लहान होता. तुळतुळीत लाकडी तक्तपोशीवरील काळपट पट्टे पाहून लक्षात येई की, पूर्वी येथे फक्त दोन खाटा होत्या, दोन खाटांशेजारची कपाटे होती व मध्यभागी एक गोल मेज होते. आता त्या खोलीत चार खाटा होत्या. एका खाटेवर बँडेजांमध्ये गुंडाळलेला एक जखमी माणूस पडला होता. नव्याने जन्मलेल्या, कपड्यांमध्ये गुंडाळलेल्या

लहान बाळाप्रमाणे तो दिसत होता. तो आपल्या पाठीवर निजला होता व बँडेजांमधल्या फटींमधून भकास, निश्चल डोळ्यांनी छताकडे टक लावून पहात होता. अलेक्सेईशेजारच्या खाटेवर सुरकुतल्या, देवीचे वण पडलेल्या, सैनिकी चेहऱ्याचा माणूस निजला होता. त्याला विरळ, सोनेरी मिशा होत्या. तो कमालीचा बडबड्या, उत्साही होता व दुसऱ्यांना मदत करण्यास सदैव तयार असे.

इस्पितळातील लोकांची लौकर मैत्री जमते. संध्याकाळपर्यंत अलेक्सेईला माहीत झाले होते की, देवीचे वण चेहऱ्यावर असलेला माणूस सैबेरियातील होता, एका सामुदायिक शेताचा तो अध्यक्ष होता, चांगला शिकारी होता व सैन्यात उत्तम नेमबाज रायफल सैनिक होता. येल्नाजवळच्या सुप्रसिद्ध लढायांपासून सैबेरियन डिव्हिजनमध्ये त्याची सैनिकी कारकीर्द सुरू झाली होती. त्याच्याबरोबर त्याचे दोन मुलगे व जावईसुद्धा सैन्यात दाखल झाले होते. त्याच्या भाषेत सांगायचे म्हणजे त्याने लढायला आरंभ केल्यापासून सत्तर फॅसिस्टांना त्याने "वेचले" होते. तो माणूस 'सोविएत संघाचा वीर' ह्या किताबाचा मानकरी होता आणि त्याने जेव्हा अलेक्सेईला आपले नांव सांगितले तेव्हा ह्या सामान्य भासणाऱ्या व्यक्तीकडे त्याने कुतूहलाने पाहिले. ते नांव सैन्यात त्या वेळी फार प्रसिद्ध बनले होते आणि प्रमुख वृत्तपत्रांमधून त्याच्यावर संपादकीय लेखही छापून आले होते. इस्पितळामधील प्रत्येकजण – परिचारिका, हाऊस सर्जन आणि खुद्द वासिली वासिल्येविच – ह्या व्यक्तीला आदरपूर्वक स्तेपान इवानोविच म्हणून संबोधत असे.

संपूर्ण बँडेजांमध्ये गुंडाळलेला वॉर्डातील चौथा निवासी मात्र सबंध दिवसभरात स्वतःसंबंधी अवाक्षराने बोलला नव्हता. पण जगातील सर्व काही माहीत असलेल्या स्तेपान इवानोविच यांनी हळू आवाजात त्याची कहाणी अलेक्सेईला ऐकवली होती. त्या बँडेजधारी माणसाचे नांव होते ग्रिगोरी ग्वोझ्देव. रणगाडादळात तो लेफ्टनंट होता आणि तोसुद्धा 'सोविएत संघाचा वीर' किताबाचा मानकरी होता. रणगाडा विद्यालयातून तो पदवीधर झाला होता व अगदी आरंभापासून युद्धात लढत होता. सीमेवर, ब्रेस्त-लितोव्स्क गढीच्या आसपास कुठेतरी तो पहिली झुंज लढला होता. ब्येलोस्तोकजवळच्या सुप्रसिद्ध रणगाडा-लढाईत त्याचा रणगाडा मोडून पडला. पण तात्काळ तो दुसऱ्या रणगाड्यात चढून बसला. त्या दुसऱ्या रणगाड्याचा कमांडर ठार झाला होता. उरलेल्या रणगाडा पथकाबरोबर त्याने मिन्स्ककडे माघार घेणाऱ्या

सैनिकांना सांगाती घेतले होते. बूगवरील लढाईत तो जखमी झाला आणि त्याने आपला दुसरा रणगाडा गमावला. पण कमांडर ठार झालेल्या आणखी एका रणगाड्यात तो चढला व कंपनीचे नेतृत्व त्याने पत्करले. नंतर त्याला आढळले की, ते शत्रूच्या पिछाडीला होते. तेव्हा तीन रणगाड्यांचे त्याने फिरते पथक बनविले व जवळ जवळ महिनाभर जर्मनांच्या पिछाडीस त्याने शत्रूच्या वाहतूक पथकांना व शिपायांना हैराण केले. नुकत्या घडून गेलेल्या लढायांच्या ठिकाणी तो आपला इंधनाचा, दारूगोळ्याचा व सुट्या यंत्रभागांचा साठा जमा करायचा. हमरस्त्यांच्या कडांच्या हिरव्या पोकळ्यांमध्ये, जंगलांमध्ये आणि दलदलींमध्ये, हरतऱ्हेचे रणगाडे भरपूर संख्येने मोडून पडलेले आढळत.

दोरोगोबूझजवळच्या एका खेड्यातील तो मूळ रहिवासी होता. कमांडरच्या रणगाड्यामधील बिनतारी यंत्रावर रणगाडा सैनिकांना नियमितपणे सोविएत माहिती खात्यातर्फे लढाईसंबंधीच्या बातम्या मिळत असत. जेव्हा त्याला समजले की, त्याच्या जन्मगावापाशी लढाई जाऊन पोहोचली होती, तेव्हा स्वतःला आवरणे त्याला अशक्य ठरले व आपले तीन रणगाडे उडवून लावून, आपल्याबरोबर उरलेल्या आठ माणसांसह जंगलांमधून तो वाट काढू लागला.

युद्धाला तोंड फुटण्याच्या जरा आधी, ग्वोझ्देव सुटीवर आपल्या छोट्या खेड्यात गेला होता. विस्तीर्ण कुरणांमधून नागमोडी वळणांनी वाहणाऱ्या एका छोट्या नदीच्या तीरावर त्याचे खेडे वसलेले होते. त्याची आई खेड्यामधील शाळेत शिक्षिका होती व वडील वयोवृद्ध कृषितज्ज्ञ होते. कामकरी लोकांच्या प्रतिनिधींच्या प्रादेशिक सोविएतचे ते सदस्यही होते. ग्वोझ्देवची आई गंभीर आजारी पडली म्हणून त्याच्या वडिलांनी तार करून त्याला घरी बोलावून घेतले होते.

शाळेजवळची लाकडी ओंडक्यांची बैठी खोली ग्वोझ्देवला आठवत होती. एका जुन्या कोचावर त्याच्या आईचा कृश देह विकल होऊन पडला होता. जुन्या पद्धतीचे जाकीट अंगात घातलेले त्याचे वडील त्याच्या आईच्या कोचाशेजारी खोकत आणि चिंतायुक्त मुद्रेने आपली आखूड, पांढरी दाढी कुरवाळीत उभे होते. तसेच, त्याच्या आईशी खूप मिळत्याजुळत्या असलेल्या, काळ्याभोर केसांच्या त्याच्या तीन छोट्या बहिणीही उभ्या होत्या. सडपातळ बांध्याची, निळ्या डोळ्यांची गावची डॉक्टर – झेन्या – त्याला आठवत होती.

घोडागाडीतून त्याच्याबरोबर ती रेल्वे स्टेशनपर्यंत त्याला निरोप द्यायला आली होती. दररोज पत्र लिहिण्याचे त्याने तिला आश्वासन दिले होते. श्वेतरशियाच्या तुडविलेल्या शेतांमधून व जळून गेलेल्या ओसाड खेड्यांमधून तो एखाद्या हिंस्त्र श्वापदाप्रमाणे चोरपावलांनी चालला होता. शहरे आणि हमरस्ते टाळीत होता. आपल्या जन्मगावी काय परिस्थिती झाली असेल याबद्दल व्यथित अंत:करणाने तर्क बांधीत होता. आपली घरची माणसे शत्रूच्या तावडीतून निसटली असतील अथवा नाही आणि जर निसटली नसतील तर त्यांचे काय झाले असेल, ह्याबद्दलच्या विचारांनी त्याचे डोके भणभणलेले होते.

आपल्या जन्मगावी गेल्यानंतर त्याच्या जे दृष्टीस पडले ते त्याच्या अत्यंत वाईट अपेक्षांहूनही भयंकर होते. त्याला ना आपले घर आढळले, ना नातलग, ना झेन्या, ना खुद्द खेडे! एक अर्धवट वेडसर म्हातारी टाचांचे नृत्य करावे तशी पायांची हालचाल करीत होती, स्वत:शीच पुटपुटत होती आणि जळून गेलेल्या अवशेषांमध्ये एका चुलाण्यावर काहीतरी शिजवीत होती. तिच्याकडून त्याला समजले की, जर्मन सैनिक जेव्हा गावाजवळ येत होते तेव्हा शाळेतील शिक्षिका एवढी आजारी होती की, कृषितज्ज्ञ आणि त्याच्या मुली त्या शिक्षिकेला दूर घेऊन जायला धजावले नाही. कामकरी लोकांच्या प्रतिनिधींच्या प्रादेशिक सोविएतचा सदस्य आणि त्याचे कुटुंब खेड्यातच राहिले असल्याचे जर्मनांना आढळले. त्यांनी सबंध कुटुंबाला पकडले, त्याच रात्री घराबाहेरच्या भोजाच्या झाडावर त्यांना फासांवर टांगले व घर जाळून टाकले. म्हातारीने ग्वोझ्देवला हेही सांगितले की, ग्वोझ्देव कुटुंबासाठी रदबदली करायला झेन्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे गेली होती, पण झेन्याने त्याची शय्यासोबत करावी म्हणून त्या अधिकाऱ्याने दीर्घ काळपर्यंत तिचा छळ केला. प्रत्यक्ष काय घडले ते म्हातारीला ठाऊक नव्हते, पण तो अधिकारी जेथे रहात होता तेथून झेन्याचा मृत देह दुसऱ्या दिवशी बाहेर नेण्यात आला व दोन दिवसपर्यंत तिचे शव नदीकिनारी उघड्यावर पडून होते. अवघ्या पाच दिवसांपूर्वी जर्मनांनी सबंध खेडे जाळून टाकले, कारण सामुदायिक शेताच्या तबेल्यामध्ये उभ्या असलेल्या त्यांच्या इंधनाच्या टाक्यांना कुणीतरी आग लावली होती.

त्या म्हातारीने ग्वोझ्देवला त्याच्या घराच्या जळक्या अवशेषांपाशी नेले आणि त्याला भोजाचे झाड दाखविले. त्याच्या लहानपणी त्या भोजाच्या

भक्कम फांदीवर त्याचा झोपाळा लटकत असायचा. आता तो वृक्ष झडला होता व जळक्या फांदीवर पाच दोरांची टोके वाऱ्याबरोबर लोंबत होती. पावले सरपटत आणि स्वतःशीच प्रार्थना पुटपुटत ती म्हातारी ग्वोझ्देवला नदीकिनारी घेऊन गेली आणि झेन्याचा देह कोठे ठेवला होता ती जागा तिने दाखविली. ह्याच झेन्याला रोज पत्र लिहिण्याचे ग्वोझ्देवने वचन दिले होते आणि आपली वचनपूर्ती करायला त्याला कधी सवडच सापडली नव्हती. सळसळणाऱ्या लव्हाळयांमध्ये तो काही वेळ उभा राहिला आणि नंतर जंगलात त्याची वाट पाहणाऱ्या त्याच्या साथीदारांकडे परतला. तो एकही शब्द बोलला नाही अथवा त्याने एकही अश्रू ढाळला नाही.

जूनअखेरी जनरल कोनेव यांच्या चढाईच्या वेळी, ग्रिगोरी ग्वोझ्देव आणि त्याचे सहकारी यांना जर्मन फळी फोडण्यात यश आले. ऑगस्टमध्ये त्याला 'टी-३४' बनावटीचा नवा रणगाडा देण्यात आला आणि हिवाळया-पूर्वीच, 'ज्याच्या पराक्रमाला मर्यादा नाही असा पुरुष' म्हणून सबंध बटालियनमध्ये त्याची कीर्ती पसरली. अतर्क्य वाटतील, पण तरीही ज्या खऱ्या होत्या अशा गोष्टी त्याच्याबद्दल सांगण्यात व छापण्यात येऊ लागल्या. एके रात्री त्याला टेहळणीसाठी पाठविण्यात आले होते, तर भरवेगात तो जर्मन फळीमध्ये घुसला. त्यांनी सुरुंग पेरलेले क्षेत्र त्याने सुरक्षितपणे ओलांडले. आपल्या तोफा उडवून शत्रूमध्ये घबराट माजवीत सोविएत सैन्याने अर्ध्या वेढलेल्या खेडयाला पार करीत, दुसऱ्या बाजूच्या आपल्या फळीला जाऊन तो मिळाला. त्याच्या ह्या कृत्याने अर्थातच शत्रूच्या सैनिकांमध्ये प्रचंड गोंधळ माजला. दुसऱ्या एका प्रसंगी, जर्मनांच्या पिछाडीला आपल्या फिरत्या गटाबरोबर कारवाया करीत असताना, जर्मन वाहतूक तांडयावर त्याने अचानक छापा घातला होता व आपल्या रणगाडयांच्या पट्ट्यांखाली जर्मनांच्या घोडयांना आणि गाडयांना त्याने चिरडून टाकले होते.

हिवाळयामध्ये एका छोटया रणगाडा पथकाचे नेतृत्व पत्करून, रझेव-जवळच्या एका तटबंदीवजा खेडयातील राखीव फौजेवर त्याने हल्ला चढविला होता. त्या खेडयात शत्रूच्या एका छोटया कार्यकारी गटाचे मुख्य ठाणे होते. त्याचे रणगाडे बचावक्षेत्र ओलांडून जात असताना खेडयाच्या सीमेपाशी त्याच्या स्वतःच्या रणगाडयावर ज्वालाग्राही द्रवाची वाटली येऊन आपटली होती. काजळीने भरलेल्या, कोंडून टाकणाऱ्या ज्वालांनी रणगाडयाला वेढले.

पण आतील माणसे लढत राहिली. एखाद्या प्रचंड पेटत्या मशालीसारखा तो रणगाडा खेड्यात घुसला. त्याच्या सर्व तोफा-बंदुका आग ओकत होत्या. धावत्या जर्मन सैनिकांचा पाठलाग करून तो रणगाडा त्यांना चिरडून टाकीत होता. ग्वोझ्देवबरोबरची माणसे पूर्वी त्याच्याबरोबर शत्रूच्या पिछाडीला लढलेली होती. रणगाड्याची इंधन-टाकी अथवा रणगाड्यातील दारूगोळा पेटून कोणत्याही क्षणी स्फोट होण्याची शक्यता होती, याची त्या सर्वांना जाणीव होती. धुराने ते घुसमटले होते, लाल तापलेल्या रणगाड्याच्या पत्र्याचे त्यांना चटके बसत होते. त्यांच्या अंगावरील कपडे एव्हाना आगीने धुमसू लागले होते, पण तरीही ते लढत राहिले. एक मोठा तोफगोळा रणगाड्यांच्या पट्टेरी चाकांखालीच फुटला व रणगाडा उलटला. त्या स्फोटाच्या जोरामुळे अथवा त्याने उडविलेल्या वाळूच्या आणि बर्फाच्या लोटांमुळे ज्वाला विझल्या. ग्वोझ्देवला रणगाड्यामधून बाहेर काढण्यात आले. त्याला भाजल्याच्या भयानक जखमा झाल्या होत्या. रणगाड्याच्या मनोऱ्याखालील गोलंदाजाच्या मृत शरीराशेजारी तो आढळला. गोलंदाज मेल्यानंतर ग्वोझ्देवने त्याचे काम पुढे चालू ठेवले होते.

दोन महिनेपर्यंत हा रणगाडाचालक जीवनमृत्यूच्या सीमेवर हेलकावत होता. बरे होण्याच्या कोणत्याही आशा त्याला नव्हत्या. त्याला कशातही रस वाटत नव्हता आणि काही वेळा तर दिवसचे दिवस तोंडातून चकार शब्द तो काढत नसे. भयानक घायाळ झालेल्या माणसांचे जग सर्वसाधारणपणे त्यांच्या इस्पितळातील वॉर्डच्या चार भिंतींमध्ये मर्यादित झालेले असते. कुठेतरी त्या भिंतींपलिकडे युद्धाची धुमश्चक्री चालू असते. लहान-मोठ्या महत्त्वाच्या घटना घडत असतात. आवेग कळसाला पोहोचलेला असतो व प्रत्येक दिवस प्रत्येक माणसाच्या काळजावर एक ताजी खूण उमटवून जात असतो. पण बाहेरच्या जगातील जीवनाला "भयानक घायाळांच्या" वॉर्डात प्रवेश करायची परवानगी नसते. इस्पितळाच्या भिंतींपलिकडील वादळाचे केवळ अस्पष्ट, अंधुक प्रतिध्वनी तेथपर्यंत पोहोचतात. एखादी पेंगुळली, धूळ बसलेली माशी उन्हाने तापलेल्या खिडकीच्या तावदानावर अवतरली, ही वॉर्डमध्ये महत्त्वाची घटना ठरते. वॉर्डची प्रमुख नर्स क्लावदिया मिखाइलोवना त्या दिवशी संध्याकाळी थेट इस्पितळातून नाट्यगृहाकडे जाण्याच्या इराद्याने नवे, उंच टाचांचे बूट घालून आलेली असते, ही मोठी बातमी ठरते. प्रत्येकाला

वीट आलेल्या जर्दाळूच्या जेलीऐवजी जेवणाअखेरी शिजवलेल्या मनुका देण्यात आल्या, हा संभाषणाचा विषय ठरतो.

"अत्यंत घायाळ" माणसाला त्याच्या प्रदीर्घ छळवादी इस्पितळवासात सर्वांत जास्त त्रास कशाचा होत असेल तर तो त्याच्या जखमेचा. त्या जखमेवर त्याचे सर्व विचार एकवटलेले असतात. ह्या जखमेने त्याला योद्धयांच्या रांगेमधून ओढून इस्पितळात आणलेले असते. युद्धाच्या खडतर आयुष्यामधून खेचून ह्या मऊ आणि आरामशीर बिछान्यावर आणून निजवलेले असते. पण ज्या क्षणी त्याला ह्या बिछान्यावर ठेवण्यात येते त्या क्षणापासून तो त्याचा तिरस्कार करू लागलेला असतो. तो झोपी जातो तेव्हा त्याच्या मनात आपल्या जखमेविषयी, सूजेविषयी अथवा फ्रॅक्चरविषयीचे विचार असतात. ती जखम तो झोपेतही पहात असतो आणि ज्या क्षणी तो जागा होतो त्या क्षणी त्याला पहावेसे वाटते – सूज उतरली का? जखमेचे चिघळणे गेले का? ताप कमी आहे की जास्त आहे? आणि सावध कानाला जशी रात्रीच्या वेळेची प्रत्येक सळसळ खूप मोठ्यांदा ऐकू येऊ लागते, तशी एखाद्याची स्वतःच्या दुबळेपणाविषयीची मनाची सतत एकाग्रता त्याच्या जखमेच्या वेदना अधिक तीव्र करते. लढाईत शांतपणे मृत्यूला सामोरे गेलेले अत्यंत खंबीर आणि निर्धारी पुरुषदेखील पुढे पुढे डॉक्टरांच्या आवाजाचा सूर धडधडत्या काळजाने ऐकू लागतात, डॉक्टरांच्या चेहऱ्यावरील भाव धपापत्या मनाने टिपत आपल्या आजाराच्या भवितव्याविषयी तर्क बांधू लागतात.

कूकूश्किन सतत कुरकुर आणि तक्रार करीत होता. त्याला वाटत होते की, त्याच्या सापळी योग्य बांधल्या नव्हत्या, त्या खूपच घट्ट आवळल्या होत्या आणि त्याच्या परिणामी हाडांचे सांधे पुन्हा ठीक बसणार नव्हते व कदाचित परत मोडले असते. ग्रीशा ग्वोझ्देव विषण्ण ग्लानीत बुडाला होता आणि काहीच बोलत नव्हता. पण त्याच्या बँडेजांना बदलताना नर्स क्लावदिया मिखाइलोवना जेव्हा त्याच्या जखमांमध्ये व्हॅसेलिन भरायची तेव्हा आपल्या भाजलेल्या शरीराकडे व चिंध्या झालेल्या त्वचेकडे तो किती अधीरेपणाने पहायचा ते अगदी सहज दिसून यायचे. सर्जनांनी केलेल्या सल्लामसलती तो अगदी एकाग्रपणे कान देऊन ऐकायचा. त्या वॉर्डात एकटे स्तेपान इवानोविच असे होते की, ते इकडेतिकडे हलू शकत होते. अर्थात पार कमरेपर्यंत वाकून त्यांना चालावे लागत होते ही गोष्ट खरी. खाटेच्या लोखंडी कडांना धरून चालताना सतत ते त्यांना तोंडघशी पाडणाऱ्या "मूर्ख

बाँबला" शिव्याशाप मोजायचे व जोरदार धक्क्याने झालेल्या "हरामखोर सायटिका"च्या दुखण्याच्या नांवाने बोटे मोडायचे.

मेरेस्येव आपल्या भावना लपविण्याचा खूप प्रयत्न करायचा. सर्जन एकमेकांमध्ये काय बोलतात त्यात आपल्याला मुळीच स्वारस्य नाही असा बहाणा करायचा. पण विद्युत उपचारांसाठी दरवेळी जेव्हा त्याच्या पावलां-वरील पट्टया उलगडत आणि ती अमंगळ सूज सावकाशपणे पण सातत्याने पायाच्या शिरदळीवरून वर चढत चाललेली त्याच्या दृष्टीस पडे, तेव्हा भयाने त्याचे डोळे विस्फारत.

तो अस्वस्थ आणि कष्टी बनला. बरोबरीच्या पेशंटने एखादा वेडावाकडा विनोद केला, बिछान्यावरील चादरीला एखादी सुरकुती पडलेली दिसली, अगर वॉर्डातील म्हाताऱ्या बाईच्या हातून झाडूची काठी निसटली, तर तात्काळ त्याच्या संतापाचा पारा वर चढायचा. तो राग दाबून टाकणे त्याला खूप जड जायचे. मात्र इस्पितळातील उत्तम, काटेकोर व हळू हळू वाढवीत नेलेल्या अन्नामुळे त्याची प्रकृती लौकरच सुधारली होती. पूर्वी बँडेजांना बदलते वेळी अथवा त्याला विद्युत उपचार देते वेळी त्याचे हडकुळे, अस्थिपंजर शरीर पाहताच वैद्यक विषयाच्या विद्यार्थिनींच्या नजरा भयभीत होत. पण आता तसे घडेनासे झाले. पण त्याचे शरीर जेवढे बलिष्ठ बनू लागले तेवढी त्याच्या पावलांची अवस्था अधिक वाईट झाली. सूज आता पायाच्या शिरदळीवर पूर्ण चढली होती व घोटयाकडे जात होती. अंगठे अगदी पुरते संवेदनाहीन बनले होते. सर्जन त्या अंगटयांना सुया टोचत, खूप खोल मांसात त्या सुयांना खुपसत, पण अलेक्सेईला वेदना जाणवत नव्हती. पसरत जाणाऱ्या सूजेला आवर घालण्यात त्यांना एका नव्या पद्ध-तीमुळे यश आले. "ब्लॉकेड" असे विचित्र नांव त्या उपचार पद्धतीला होते. मात्र पावलांमधील वेदना कमालीची वाढली. ती सहन करणे अगदी अशक्य ठरले. दिवसा आपल्या उशीत तोंड खुपसून अलेक्सेई गप्प पडून रहायचा. रात्री क्लावदिया मिखाइलोवना त्याला मॉर्फिया देई.

सर्जन मंडळी आपल्या चर्चांमध्ये वारंवार "कापून काढण्या"चा भयानक उल्लेख करू लागली. वासिली वासिल्येविच काही वेळा मेरेस्येवच्या खाटेपाशी थांबत आणि चौकशी करीत :

"रांगणाऱ्याची प्रकृती आज कशी आहे? कापून काढू या का? एक झटका आणि बस्स!"

अलेक्सेईचे शरीर थंडगार पडायचे व त्याला हुडहुडी भरायची. तोंडातून आरोळी उमटू नये म्हणून तो आपले दात गच्च आवळून धरायचा व फक्त नकारार्थी मान हलवायचा. तेव्हा प्राध्यापक गुरगुरायचे :

"ठीक आहे तर. कर सहन. तुझा प्रश्न आहे. याचा काय उपयोग होती पाहू," असे म्हणून ते एखादी नवी उपचारयोजना लिहून द्यायचे.

त्यांच्या मागचे दार बंद होई, त्यांच्या पावलांचा कॉरीडॉरमधील आवाज विरून जाई, पण मेरेस्येव आपल्या बिछान्यात डोळे मिटून पडून राही. "माझे पाय, माझे पाय, माझे पाय..." त्याला पायांविना जगावे लागणार होते का? त्याच्या जन्मग्रामी कामीशिनमध्ये होडी वल्हविण्याचे काम करणाऱ्या म्हाताऱ्या आर्काशाप्रमाणे लाकडी पाय बसविलेला पांगळा माणूस तो होणार होता का? नदीवर आंघोळीला जाताना किनाऱ्यावर पाय सोडवून ठेवायचा आणि त्या म्हाताऱ्याप्रमाणे माकडासारखे पाण्यात रांगत शिरायचे?

आणखी एका परिस्थितीमुळे ह्या कडवट आठवणींना अधिकच धार चढली होती. इस्पितळात आल्यानंतर पहिल्याच दिवशी त्याने कामीशिनची पत्रे वाचली होती. त्रिकोणी, छोटचा घडयांची त्याच्या आईची पत्रे नेहमीप्रमाणे त्रोटक होती. पत्रांमधील निम्मा मजकूर नातेवाईकांच्या शुभेच्छांनी भरलेला होता, सर्व ठीक असल्याच्या आश्वासनांनी भरलेला होता व आल्योशाने तिची काळजी करू नये असे म्हटलेले होते. आणि बाकीच्या अर्ध्या पत्रात त्याने स्वतःची काळजी घ्यावी म्हणून विनवण्या केलेल्या होत्या; थंडीची बाधा होऊ देऊ नये, पाय ओले ठेवू नये, धोक्यात जीव घालू नये आणि जर्मनांच्या कावेबाजपणापासून – ज्याबद्दल तिने आपल्या शेजारणींकडून खूप काही ऐकले होते – सावध रहावे, अशा सूचना त्यात होत्या. ह्या सर्व पत्रांमधील आशय सारखाच होता. मात्र एका पत्रात तिने कळविले होते की, जरी ती स्वतः भाविक नसली तरीही जर कुणी वर खरोखरीच अस्तित्वात असेल तर अशा विचाराने, त्याच्यासाठी चर्चमध्ये प्रार्थना करण्यास तिने शेजारणीला सांगितले होते. दुसऱ्या एका पत्रात तिने त्याच्या इतर भावांविषयी चिंता व्यक्त केली होती. ते दक्षिणेत कुठेतरी लढत होते आणि फारा दिवसात त्यांच्याकडून पत्रे आलेली नव्हती. शेवटच्या पत्रात तिने म्हटले होते की, वोल्गाच्या वासंतिक पुराच्या वेळी तिचे सर्व मुलगे घरी परतल्याचे स्वप्न तिला पडले होते. आपल्या वडिलांबरोबर – जे जिवंत नव्हते – मच्छीमारी मोहीम यशस्वीरीत्या संपवून ते परत आले होते आणि तिने

त्यांच्यासाठी त्यांचा आवडता व्याझीगा पीरोग* बनविला होता असे स्वप्नात तिने पाहिले होते. तिच्या शेजारणींनी ह्या स्वप्नाचा असा अर्थ लावला होता की, तिचा एक तरी मुलगा युद्धावरून नक्की घरी परतणार होता. म्हणून अलेक्सेईने आपल्या वरिष्ठांची परवानगी घेऊन निदान एका दिवसापुरते तरी घरी यावे, अशी तिने मनधरणी केली होती.

टप्पोऱ्या, गोल, शाळकरी मुलीच्या हस्ताक्षरात पत्ता लिहिलेले निळे लिफाफे त्याच्याबरोबर कारखान्याच्या उमेदवार विद्यालयात शिकणाऱ्या एका मुलीकडून आले होते. तिचे नाव होते ओल्गा. आता ती कामीशीनमधील लाकूड कापणी गिरणीत तंत्रज्ञ म्हणून काम करीत होती. याच ठिकाणी पूर्वी तो धातू कामगार होता, टर्नर म्हणून काम करीत होता. ही मुलगी म्हणजे केवळ त्याची बालमैत्रीण नव्हती. तिच्या पत्रांना त्याच्या दृष्टीने आगळे महत्त्व होते. प्रत्येक पत्र तो अनेकदा वाचत होता, पुनःपुन्हा ती पत्रे चाळत होता, अत्यंत साध्या शब्दांमागे काही मजेदार, लपलेला अर्थ शोधू पहात होता, यात आश्चर्य असे काहीच नव्हते. मात्र त्या पत्रांमधून तो नेमके काय हुडकत होता ते त्याचे त्यालाच अद्याप उमगलेले नव्हते.

तिने लिहिले होते की, ती अगदी आकंठ कामात बुडाली होती, घरी जाण्या-येण्यात वेळ वाया जाऊ नये म्हणून रात्रीची कचेरीतच झोपत होती. आता अलेक्सेई कदाचित लाकूड कापण्याची गिरणी ओळखणार नाही इतके बदल तेथे घडले होते व सध्या तेथे काय तयार होत होते हे त्याला समजले तर आनंदाने तो वेडा होईल, असे तिने पत्रात म्हटले होते. जाता जाता तिने नमूद केले होते की, क्वचित मिळणाऱ्या सुटीच्या दिवशी – असा दिवस महिन्यातून जेमतेम एकदाच लाभत होता – ती त्याच्या आईला भेटायला जात होती, आपल्या मोठ्या मुलांकडची काहीच बातमी नसल्यामुळे म्हातारी चिंतेत होती, तिचे दिवस फार कष्टात जात होते आणि अलिकडे तिची प्रकृतीही ढासळली होती. अलेक्सेईने आपल्या आईला अधिक वारंवार आणि अधिक तपशीलवार पत्रे लिहावी, आता कदाचित तोच तिचा एकमेव आनंद असल्यामुळे स्वतःविषयी वाईट बातम्या कळवून तिला बेचैन करू नये, असे ओल्गाने विनविले होते.

ओल्गाच्या पत्रांची अनेक पारायणे केल्यावर अलेक्सेईच्या लक्षात आले

---

*स्टर्जन माशाचा मणका भरून केलेला एक पदार्थ – अनु.



की, त्याच्या आईने युक्तीने त्याला आपल्या स्वप्नाविषयी कळविले होते. आईला त्याच्या भेटीची खूप उत्कंठा लागली होती, तिच्या सर्व आशा-आकांक्षा त्याच्यावर केंद्रित झाल्या होत्या याची त्याला जाणीव झाली. आपल्या आईला व ओल्गाला त्याने जर स्वतःच्या पायांविषयी कळविले तर त्यांना किती भयानक धक्का बसेल, हेही त्याला जाणवले. काय करावे याबाबत खूप वेळपर्यंत त्याने विचार केला. पण सत्य लिहून कळविण्याचे धाडस त्याला झाले नाही. सत्य काही काळ थोपवून ठेवण्याचे त्याने ठरविले आणि आपण ठीक असल्याचे व शांतता क्षेत्रात आपली बदली झाल्याचे कळविण्याचा निश्चय केला. पत्त्यामधील बदलाचा खुलासा करण्यासाठी आणि तो खुलासा पटावा म्हणून त्याने लिहिले की, एका खास कामगिरीसाठी पिछाडीवर त्याची नेमणूक झाली होती व या ठिकाणी त्याला बराच काळ रहावे लागणार होते.

आता त्याच्या खाटेशेजारी उभे राहून विचारविनिमय करताना सर्जन मंडळी जेव्हा वारंवार पाय "कापून काढण्याची" भाषा करू लागली तेव्हा भीतीने त्याला पुरते घेरले. कामीशीनला एक पांगळा म्हणून तो कसा परतणार होता? आपले लाकडी पाय तो ओल्गाला कसे दाखविणार होता? युद्धआघाडीवर आपली दुसरी मुले गमावलेल्या आणि त्याची, आपल्या शेवटच्या मुलाच्या घरी परतण्याची वाट पाहणाऱ्या त्याच्या आईला केवढा भयानक धक्का बसणार होता? वॉर्डातील उदास, दडपून टाकणाऱ्या शांततेमध्ये पडून राहताना त्याच्या मनात अशा विचारांचा कल्लोळ उसळत होता. अधून मधून कूकूश्किनच्या चळवळया देहाखाली कुरकुरणाऱ्या गादीच्या स्प्रिंगांचा आवाज होई, गप्प पडून राहिलेल्या रणगाडाचालकाचे सुस्कारे ऐकू येत, दिवसाचा सारा वेळ खिडकीशी उभे राहून स्तेपान इवानोविच खिडकीच्या तावदानांवर बोटांनी टिचक्या मारीत रहात.

"कापून काढायचे? नाही. दुसरं काहीही चालेल, पण ते नको. त्यापेक्षा मरणं खूप चांगलं... किती भयानक, शहारे आणणारे शब्द 'कापून काढायचे!' कट्यार खुपसल्यासारखं वाटतं! कापायचे? कधीही नाही! तसं घडून चालणार नाही!" अलेक्सेईच्या मनात येई. ह्या भयानक शब्दांनी त्याच्या स्वप्नात महाप्रचंड पोलादी कोळ्याचा आकार धारण केला होता आणि आपल्या टोकदार, वाकडया नांग्या तो कोळी त्याच्या शरीरात जोरात खुपसत होता.

३

बेचाळीस नंबरच्या वॉर्डात एक आठवडापर्यंत चार पेशंट राहिले. पण एक दिवस क्लावदिया मिखाइलोवना सचिंत मुद्रेने दोन ऑर्डर्लीबरोबर वॉर्डात आली व यापुढे थोडे दाटीने रहावे लागेल असे तिने रुग्णांना सांगितले. स्तेपान इवानोविच यांची खाट पार खिडकीपर्यंत सरकविण्यात आली. ह्या बदलावर ते बेहद्द खूष झाले. कूकूश्किनची खाट स्तेपान इवानोविच यांच्या जवळच्या कोपऱ्यात सरकविण्यात आली व त्या जागी स्प्रिंगांची मऊ गादी असलेली एक सखल खाट टाकण्यात आली.

या गोष्टीचा कूकूश्किनला जोरदार राग आला. त्याचा चेहरा पांढरा-फटक पडला. खाटेजवळच्या कपाटावर त्याने दाणदिशी मूठ आपटली व उंच, चिरक्या आवाजात नर्सचा, इस्पितळाचा आणि वासिली वासिल्येविच यांचाही उद्धार केला. या गोष्टीविषयी वर कुणापाशी तरी तक्रार करण्याची धमकी त्याने घातली. त्याचा रागाचा पारा एवढा चढला होता की, बिचाऱ्या क्लावदिया मिखाइलोवनावर तो चंबू फेकायला निघाला होता. आपल्या काळयाभोर डोळयांनी त्याच्याकडे रागीट कटाक्ष फेकीत अलेक्सेईने जर त्याला जोरात खाली खेचले नसते तर त्याने नक्की तो चंबू क्लावदिया मिखाइ-लोवनावर भिरकावला असता.

नेमक्या त्याच क्षणाला पाचव्या पेशंटला आत आणण्यात आले.

तो खूप वजनदार असावा, कारण स्ट्रेचर वाहून आणणाऱ्यांच्या पावलां-च्या तालाबरोबर स्ट्रेचरचा करकर आवाज येत होता व स्ट्रेचर खूप खाली वाकला होता. एक गोल, तुळतुळीत तासलेले डोके उशीवर लडबडत होते. रुंद, सुजलेला, पिवळट चेहरा निर्जीव भासत होता. पूर्ण, फिकट ओठांवर यातनांचा भाव स्थिरावला होता.

नवा पेशंट बेशुद्ध होता असे दिसत होते. पण स्ट्रेचर खाली ठेवला जाताच त्याने आपले डोळे उघडले, हाताच्या एका कोपरावर टेकून तो किंचित उठला, सबंध वॉर्डात त्याने कुतूहलाने नजर टाकली, काही कारणा-स्तव स्तेपान इवानोविचना डोळा मारला व तो जोरात खोकला. त्या डोळा मारण्यात जणू त्याला म्हणायचे होते: "कसं काय आयुष्य आहे? फारसं वाईट नाही ना?" त्यांच्या प्रचंड शरीराचा बराच चेंदामेंदा झाला होता हे उघड होते व त्याला खूप वेदना होत होत्या. काही कारणामुळे मेरेस्येवला

प्रथमदर्शनी ही प्रचंड फुगलेली आकृती मुळीच आवडली नव्हती. दोन ऑर्ड-र्लींनी, दोन वॉर्ड मोलकरणींनी व नर्सने मिळून ते धूड जेव्हा स्ट्रेचरवरून उचलून खाटेवर टाकले तेव्हा अलेक्सेईने काहीशा नाराजीनेच ह्या नव्या व्यक्तीकडे पाहिले होते. ह्या नव्या पेशंटच्या ताठ, ओंडक्यासारख्या पायांना त्या लोकांनी, वेडावाकडा हिसका दिला तेव्हा त्याचा चेहरा एकदम पांढरा-फटक पडला होता, त्यावर घामाचे थेंब फुटले होते आणि वेदनेपायी ओठांना मुरड पडली होती, हे अलेक्सेईने पाहिले होते. पण पेशंटने तोंडातून मुळीच आवाज काढला नाही. त्याने फक्त आपले दात कराकरा चावले.

बिछान्यावर स्थानापन्न होताक्षणीच त्याने आपल्या ब्लँकेटावरील चादरीचा दुमडलेला कोपरा सरळ केला, स्वत:बरोबर आणलेला वह्या-पुस्तकांचा गठ्ठा जवळच्या कपाटाच्या वरच्या फळीवर व्यवस्थित रचला, खालच्या फळीवर टूथ-पेस्ट, ब्रश, यू-दी-कोलन, दाढीचे सामान व साबणाची डबी ह्या वस्तू नीट मांडल्या. आपल्या ह्या कामावर त्याने एकदा चौकस नजर फिरविली. त्याला एकदम घरच्यासारखे वाटले आणि मग भरदार, खणखणीत आवाजात तो म्हणाला :

"मंडळी, आपण एकमेकांची ओळख करून घेऊ या. रेजिमेंट कमिस्सार सेम्योन वोरोब्योव. शांत. धूम्रपान करत नाही. कृपा करून मला तुमच्यात सामावून घ्या."

आपल्या सह-निवासींकडे त्यांनी शांतपणे निरखून पाहिले. त्यांच्या चौकस, बारीक सोनेरी डोळयांचा तीक्ष्ण कटाक्ष मेरेस्येवने झेलला.

"मी तुमच्यात फार काळ असणार नाही. इतरांबद्दल मला माहीत नाही. पण इथं पडून रहायला माझ्यापाशी फारसा वेळ नाही. माझे शिपाई माझी वाट पाहताहेत. बर्फ संपला आणि रस्ते कोरडे झाले, की मी निघालो! 'आम्ही लाल सेनेतलं घोडदळ आहोत' काय?" ते बडबडत होते. त्यांच्या आनंदी गडगडणाऱ्या खर्ज आवाजाने सारा वॉर्ड भरून गेला होता.

"आमच्यापैकी कुणीच इथं फार काळ रहायला आलेला नाही. बर्फ फुटला रे फुटला, की आम्ही सगळे जाऊ–पाय पहिल्यांदा–पन्नास नंबरच्या वॉर्डात," तुटकपणे कूकूश्किन म्हणाला व त्याने झटकन भिंतीकडे तोंड वळविले.

इस्पितळात पन्नास नंबरचा मुळी वॉर्डच नव्हता. प्रेतागाराला पेशंटांनी ठेवलेले ते नांव होते. कमिस्सारना हे आधीच ठाऊक होते अथवा नव्हते

याबद्दल शंका आहे, पण त्या विनोदातील दुष्ट अर्थ तात्काळ त्यांच्या ध्यानात आला. पण त्यांनी अपमान वाटून घेतला नाही. केवळ आश्चर्याने त्यांनी कूकूश्किनकडे नजर टाकली व विचारले :

"मित्रा, तुझं वय किती? अरे पांढरी दाढीवाल्या, तू जरा लौकरच म्हातारा झालेला दिसतोस!"

४

वॉर्ड नंबर बेचाळीसमधील नव्या पेशंटला त्याचे सह-निवासी "कमिस्सार" ह्या नांवाने आपापसात संबोधू लागले होते. कमिस्सारांच्या आगमनापासून वॉर्डमधील सबंध जीवन बदलून गेले. ह्या प्रचंड वजनाच्या आणि गंभीर-रीत्या घायाळ झालेल्या माणसाने वॉर्डात प्रवेश केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी सर्वांशी मैत्री जमविली. पुढे एकदा स्तेपान इवानोविच यांनी म्हटले की, "प्रत्येकाच्या अंतःकरणाची किल्ली शोधणे" कमिस्सारना जमले होते.

स्तेपान इवानोविच यांच्याबरोबर घोड्यांविषयी आणि शिकारींविषयी कमिस्सार मनसोक्त गप्पा मारीत. दोघांनाही ह्या विषयांचा नाद होता व दोघेही ह्या विषयांमध्ये निष्णात होते. युद्धाविषयी तत्त्वज्ञानपर दृष्टिकोनातून बोलण्याची आवड असलेल्या मेरेस्येवबरोबर, विमानांचा, रणगाड्यांचा आणि घोडदळाचा वापर करण्याच्या वर्तमानकालीन पद्धतींबाबत ते जोरजो-राने चर्चा करीत व मोठ्या तावातावाने सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत की, विमाने आणि रणगाडे खूप उपयुक्त आहेत हे खरे असले तरीही, घोडा हा प्राणी कालबाह्य झाला नव्हता. घोड्याचा वापर अजूनही उपयुक्त ठरेल व रणगाड्यांचे आणि विमानांचे पाठबळ असलेले घोडदळ जर सुसज्ज असेल, जुन्या कमांडरांना मदत करायला जर धीट आणि बुद्धिमान तरुण अधिकारी मोठ्या संख्येने प्रशिक्षित करण्यात आले, तर आपले घोडदळ अजूनही जगाला चकित करू शकेल, असा त्यांचा दावा होता. गप्प राहणाऱ्या रणगाडाचाल-काशी बोलायलासुद्धा त्यांनी विषय शोधून काढले. असे आढळून आले की, कमिस्सारांची डिव्हिजन यार्त्सेवो येथे लढली होती व नंतर जनरल कोनेव यांच्या दूखोवश्चिना येथील प्रतिहल्ल्यात तिने भाग घेतला होता, त्याच प्रति-हल्ल्यात ग्वोझ्देवने आणि त्याच्या सहकाऱ्यांनी जर्मन फळीत मुसंडी मारली होती. त्या दोघांना माहीत असलेल्या खेड्यांची जंत्री कमिस्सार मोठ्या

उत्साहाने आठवून सांगत. जर्मनांची त्यांनी कुठे कुठे आणि कशी भंबेरी उडविली ते रसभरीत वर्णन करून सांगत. रणगाडाचालक अजूनही गप्प रहायचा, पण त्याच्याशी कमिस्सार बोलू लागले म्हणजे पूर्वीप्रमाणे भिंतीकडे तोंड फिरवून पाठ दाखविणे आता त्याने बंद केले. बँडेजांमुळे त्याचा चेहरा दिसत नसे, पण संमतीदर्शक मान तो हलवीत असे. कमिस्सारनी कूकूश्किनला बुद्धिबळ खेळण्याचे आमंत्रण देताच त्याचा त्यांच्यावरील राग पळाला. बुद्धिबळाचा पट कूकूश्किनच्या बिछान्यावर ठेवण्यात आला आणि कमिस्सार आपल्या बिछान्यावर डोळे मिटून पडून "डाव न पाहता" त्याच्याशी खेळले. तरीही त्यांनी कुरकुऱ्या, तक्रारखोर लेफ्टनंटचा धोधो पराभव केला आणि त्यामुळे कूकूश्किनला कमिस्सारांविषयी विलक्षण आदर वाटू लागला.

सकाळच्या वेळी मोलकरणीने वॉर्डाच्या खिडक्या उघडल्या म्हणजे त्या आजाऱ्यांच्या खोलीतील दडपून टाकणारी शांतता रस्त्यावरील अनेक आवाजांच्या आक्रमणाने भंगून जायची व मॉस्कोतील वसंताच्या मोसमाची ताजी, ओलसर वाऱ्याची झुळूक यायची. कमिस्सारांच्या वॉर्डातील आगमनाचा असाच त्या ताज्या वासंतिक झुळूकेसारखा परिणाम घडला होता. ही संजीवनी निर्माण करण्यासाठी कमिस्सारना मुळीच सायास पडले नव्हते. त्यांच्यात जीवनासक्ती तुडुंब भरलेली होती. उत्साहाने ते सदैव मुसमुसलेले होते. जखमेच्या वेदना ते पार विसरून जात, अथवा त्या वेदना विसरण्याची त्यांनी स्वत:ला जबरदस्तीने सवय लावून घेतली होती.

सकाळी जागे झाल्यानंतर बिछान्यावर बसून त्यांचा व्यायाम चाले. आपल्या डोक्यावर हात वर ताणून ते आपल्या शरीराला उजवी-डावीकडे झुकवीत, तालबद्ध रीतीने कमरेला आणि मानेला व्यायाम देत. तोंड धुण्यासाठी पाणी आणण्यात येई तेव्हा जास्तीत जास्त थंड पाण्याचा ते आग्रह धरीत व बराच वेळपर्यंत तोंडावर पाण्याचे सपकारे मारीत रहात आणि खळखळून चुळा भरीत. स्वत:ला टॉवेलने ते एवढे खसाखसा चोळत, की त्यांचे सुजलेले शरीर लालबुंद होऊन जाई. त्यांना पाहून इतर पेशंटांना त्यांच्यासारखेच करण्याची इच्छा होई. वर्तमानपत्रे आणली म्हणजे नर्सच्या हातामधून ते अधीरपणे त्यांना खेचून घेत आणि सोविएत माहिती विभागाची निवेदने घाईघाईने वाचून काढत. नंतर वेगवेगळ्या आघाड्यांवरील युद्धवार्ताहरांच्या बातम्या शांतपणे वाचत. त्यांची वाचन करण्याची स्वत:ची एक खास तऱ्हा होती. तिला "क्रियाशील वाचन" असे म्हणता येईल.

एखादी बातमी त्यांना आवडली तर तो परिच्छेद हलक्या आवाजात ते पुन्हा वाचून काढत, "शाब्बास" असे पुटपुटत व त्या परिच्छेदावर खूण करत. किंवा अचानक त्यांच्या तोंडून उद्‌गार उमटायचा: "हरामखोर, खोटं लिहितोय! मी बीयरच्या बाटलीची पैज लावून सांगतो, त्या ठिकाणाच्या जवळपाससुद्धा हा गेला नव्हता. पाजी! आणि तरीही लिहितोय!" एका युद्धवार्ताहराने एकदा एवढे काही कल्पनारंजित लिहिले होते की, कमिस्सार त्याच्यावर जाम भडकले. तात्काळ त्यांनी त्या वृत्तपत्राला पोस्टकार्ड लिहून रागीट भाषेत कळविले की, अशा गोष्टी युद्धात घडत नसतात आणि घडणे शक्य नसते व ह्या "बेफाम खोटारड्या" बातमीदारावर काही बंधन घालावे अशी त्यांनी विनंती केली. एखादे वेळी एखादी बातमी त्यांना विचारमग्न करी. डोळे उघडे ठेवूनच ते उशीवर मागे कलंडत आणि विचारात हरवून जात. किंवा आपल्या घोडदळ पथकाविषयी काही रंजक गोष्ट सांगत. त्यांच्यावर विश्वास ठेवला असता तर त्या घोडदळ पथकातील प्रत्येक माणूस पराक्रमी होता, "कमालीचा शूर पोरगा" होता. मग ते पुन्हा वाचनात गढून जात. गंमत म्हणजे त्यांचे हे शेरे, ही काव्यात्मक विषयांतरे, त्यांच्या श्रोत्यांचे चित्त विचलित करीत नसत. उलट, ते काय वाचत हे समजण्यास त्यांना मदतच होत असे.

जेवण आणि वैद्यकीय उपचार यांच्या दरम्यान रोज दोन तास ते जर्मन भाषेचा अभ्यास करीत. जर्मन शब्द पाठ करीत, वाक्यरचना करीत आणि काही वेळा परकी शब्दांच्या ध्वनींमुळे अचानक प्रभावीत होऊन ते म्हणत:

"मंडळी, जर्मनमध्ये कोंबडीच्या पिल्लाला काय म्हणतात ठाऊक आहे?

Küchelchen ऐकायला कसं छान वाटतं. काहीतरी छोटं पिसारलेलं, नाजुक आहे अशी जाणीव हा शब्द देतो. आणि 'छोटी घंटा' म्हणजे काय माहीत आहे? Glückling ह्या शब्दात एक मधुर नाद आहे की नाही?"

एक दिवस स्तेपान इवानोविचनी न राहवून विचारले:

"कॉम्रेड कमिस्सार, तुम्हाला जर्मन भाषा कशासाठी शिकावीशी वाटते? तुम्ही निष्कारण स्वतःला शिणवून घेत आहात. त्यापेक्षा तुम्ही आपली ताकद वाचवली तर..."

कमिस्सारनी त्या म्हाताऱ्या सैनिकाकडे एक धूर्त कटाक्ष टाकीत म्हटले:

"हात् तुमची पांढरी दाढीवाले! ही काय रशियन माणसाची जगण्याची रीत झाली? बर्लिनला मी पोहोचल्यानंतर तिथल्या पोरींशी कोणत्या भाषेत बोलणार? रशियनमध्ये?"

कमिस्सारांच्या बिछान्याच्या कडेशी बसलेल्या स्तेपान इवानोविचना साहजिकच उत्तर द्यावेसे वाटले होते की, सध्या तरी युद्धाची धुमश्चक्री मॉस्कोच्या जवळच चालू आहे आणि जर्मन पोरींपर्यंत पोहोचायला अजून खूप लांबचा पल्ला गाठायचा आहे. पण कमिस्सारांच्या आवाजात असा काही आनंदयुक्त आत्मविश्वास उमटला होता, की स्तेपान इवानोविच फक्त खाकरले व अत्यंत गंभीरपणे उत्तरले:

"नाही, नाही. अर्थातच रशियनमधून नाही! पण तरीही कॉम्रेड कमिस्सार, ज्या काही यातनांमधून तुम्ही पार पडला आहात त्या पाहता तुम्ही स्वतःची काळजी घेतली पाहिजे."

"अति लाडावलेला घोडाच सर्वांत प्रथम खाली पडतो, हे तुम्हाला माहीत आहे ना? पांढरी दाढीवाले, तुम्ही मला वदसल्ला देत आहात!"

वॉर्डातील एकाही पेशंटला दाढी नव्हती, पण तरीही काही कारणास्तव कमिस्सार त्या सर्वांना "पांढरी दाढीवाले" म्हणत. हा शब्द ते अशा काही लकबीने उच्चारीत, की ऐकणाऱ्याला त्याचा मुळीच अपमान वाटत नसे. उलट त्यात एक प्रेमळ विनोदाची छटा होती आणि पेशंटांना तो शब्द ऐकून बरेच वाटे.

कमिस्सारांच्या अक्षय आनंदी स्वभावाचा थांग लावण्यासाठी, दिवसचे दिवस अलेक्सेई त्यांचे बारकाईने निरीक्षण करीत होता. कमिस्सार अत्यंत पीडादायी यातनांमधून जात होते यात काही संदेह नव्हता. ज्या क्षणी त्यांना झोप लागायची आणि त्यांचा स्वतःवरील ताबा सुटायचा त्या क्षणी ते कण्हू लागत, तळमळू लागत, दात कराकरा चावू लागत. त्यांचा चेहरा वेदनांमुळे वेडावाकडा होई. कदाचित त्यांना ह्याची जाणीव होती, म्हणून दिवसा न झोपण्याचा ते प्रयत्न करीत, काही ना काही उद्योगात गुंतून रहात. पण जागे असताना ते नेहमी शांत आणि नरम असत. जणू काही त्यांना कसल्याही वेदनेचा त्रास नाही, असे भासायचे. सर्जन मंडळींबरोबर ते आरामात गप्पा मारीत. त्यांच्या शरीराच्या जखमी भागांवर सर्जन जेव्हा स्पर्श करून तपासणी करीत तेव्हा विनोद करीत. फक्त त्यांचा हात ज्या तऱ्हेने चादरीचे टोक चुरगाळून घट्ट पकडे आणि त्यांच्या नाकावर

घामाचे थेंब जेव्हा तरारून उठत, तेव्हाच समजायचे की, हे सारे सहन करायला त्यांना किती विलक्षण ताण पडत होता. हा माणूस एवढी भयानक वेदना दावू कशी शकतो आणि एवढी ताकद, एवढा आनंद, एवढा जोम कसा एकवटतो, याचे अलेक्सेईला कोडे पडले होते. त्याला हे कोडे सोडविण्याची अधिकच उत्सुकता लागली होती याचे कारण, त्याला वाढत्या प्रमाणात औषधाचा डोस पाजूनही आता रात्रीच्या वेळी झोपणे त्याला अशक्य ठरले होते. काहीवेळा तर सबंध रात्र रात्र तो टक्क उघडे डोळे ठेवून पडत होता व कण्हण्याचा आवाज दावण्यासाठी तोंडात ब्लँकेटचा बोळा कोंबत होता.

"कापायचे" हा अमंगळ शब्द तपासणीच्या वेळी सर्जनांच्या तोंडून वारंवार ऐकू येऊ लागला होता. तो भयानक दिवस जवळ येत चाललाय याची जाणीव अलेक्सेईला झाली व पायांशिवाय जगण्यात काही अर्थ नव्हता, असे त्याने मनाशी ठरविले.

५

आणि तो दिवस उगवला. नित्याच्या आपल्या एका भेटीत वासिली वासिल्येविच बराच वेळपर्यंत अलेक्सेईच्या काळया-निळया पडलेल्या व पूर्णपणे बधीर झालेल्या पायांवर ठोकत राहिले. मग एकदम ते ताठ उभे झाले आणि अलेक्सेईच्या नजरेला सरळ नजर भिडवून म्हणाले: "त्यांना तोडून टाकणं अत्यावश्यक आहे!" अलेक्सेई पांढराफटक पडला. त्याने एखादा शब्द उच्चारायच्या आतच प्राध्यापक कडक आवाजात पुन्हा म्हणाले: "त्यांना तोडून टाकणं अत्यावश्यक आहे! यावर आता एकही शब्द उच्चारायचा नाही, समजलं? नाही तर तुझा अवतार संपला! समजला माझ्या बोलण्याचा अर्थ?"

आपल्या बरोबरीच्या माणसांकडे साधा कटाक्षही न टाकता ते वॉर्डाबाहेर ताडताड निघून गेले. वॉर्डात एक दडपून टाकणारी शांतता पसरली. मेरेस्येव दगडासारख्या मुद्रेने व सताड डोळे विस्फारून पडला होता. जणू धुक्यातून दिसावेत तसे त्या म्हाताऱ्या नावाड्याचे विद्रूप, काळे-निळे थोटे पाय त्याच्या नजरेसमोर भिरभिरत होते. तो नावाडी एखाद्या माकडाप्रमाणे रांगत-सरपटत नदीत शिरल्याचे दृश्य परत एकदा त्याच्या दृष्टीसमोर उभे राहिले.

"अलेक्सेई," कमिस्सारनी हळूच त्याला हाक मारली.

"काय?" खोल विमनस्क आवाजात अलेक्सेईने ओ दिली.

"बेटा, तुला हे केलंच पाहिजे."

त्या क्षणाला अलेक्सेईला भासले की, नावाडी नव्हे तर तो स्वत: थोटचा पायांवर रांगत होता आणि त्याची प्रेयसी, त्याची ओल्या, वाळवंटी नदीकिनारी रंगीबेरंगी फ्रॉकमध्ये उभी होती. तिचा फ्रॉक वाऱ्याने किंचित उडत होता, ती रसरशीत आणि सुंदर दिसत होती, त्याच्याकडे एकटक पहात होती व आपले ओठ चावत होती. असे घडणार होते! त्याला जोरजोराने हुंदके येऊ लागले. आपले तोंड उशीत लपवून तो मूक रडू लागला. त्याची पाठ हुंदक्यांमुळे गदगदा हलत होती. वॉर्डमधील प्रत्येकाच्या काळजाला ही गोष्ट भिडली. खाकरत-कण्हत स्तेपान इवानोविच आपल्या खाटेवरून उठले, आपला अंगरखा त्यांनी अंगात चढविला व स्लीपर्स घातलेली पावले सरपटत, खाटेच्या लोखंडी गजांना पकडत ते अलेक्सेईच्या बिछान्याकडे धडपडत-लंगडत निघाले. पण कमिस्सारनी बोटाने दटावले: "मध्ये ढवळाढवळ करू नका. त्याला पोटभर रडू दे."

आणि अलेक्सेईला त्यानंतर खरोखरीच हलके वाटले. लौकरच तो शांत झाला. प्रदीर्घ काळपर्यंत छळणाऱ्या एखाद्या प्रश्नाचा अखेरीस निर्णय लागला म्हणजे माणसाला जी सुटकेची जाणीव होते, ती जाणीव त्याला झाली होती. ऑपरेशन थिएटरमध्ये त्याला नेण्यासाठी संध्याकाळी ऑर्डर्ली आले त्या वेळेपर्यंत त्याने तोंडातून चकार शब्द काढला नाही. त्या चकचकीत, डोळे दिपविणाऱ्या शल्य-दालनातही त्याने हूं की चूं केले नाही. एवढेच नव्हे तर त्याला जेव्हा सांगण्यात आले की, त्याला निद्रेचे इंजेक्शन देऊन शस्त्रक्रिया करण्याइतपत त्याच्या हृदयाची अवस्था ठीक नसल्यामुळे केवळ स्थानिक बधीरता आणूनच शल्यकर्म उरकण्यात येणार होते, तेव्हाही त्याने फक्त मानेनेच संमती दिली. शस्त्रक्रिया चालू असताना तो कण्हला नाही व किंचाळला नाही. ती शस्त्रक्रिया साधी असूनही खुद्द वासिली वासिल्येविच करीत होते. नेहमीप्रमाणे ते परिचारिकांवर आणि साहाय्यकांवर खेकसत होते. अलेक्सेईची नाडी पाहणाऱ्या साहाय्यकाकडे त्यांनी अनेकदा चिंतेचे कटाक्ष टाकले होते.

हाडे करवतीने कापली जात होती तेव्हा वेदना महाभयंकर होती. पण आता अलेक्सेईला वेदना सहन करण्याची सवय झाली होती. पांढरे झगे

घातलेली व पांढऱ्या जाळीने आपले चेहरे झाकलेली माणसे त्याच्या पायांशी काय करीत होती ते त्याला समजत नव्हते. पण त्याला परत वॉर्डाकडे नेऊ लागले तेव्हा मात्र त्याची शुद्ध हरपली होती.

तो शुद्धीवर आला तेव्हा प्रथम त्याच्या नजरेस पडला तो क्लावदिया मिखाईलोवनाचा सहानुभूतीने भरलेला चेहरा. आश्चर्य म्हणजे त्याला काहीच आठवत नव्हते आणि ही देखणी, प्रेमळ स्वभावाची, सोनेरी केसांची बाई एवढी चिंताक्रांत व चौकसपणे त्याच्याकडे का पहात होती, तेच त्याला उमगेना. त्याने डोळे उघडलेले पाहताच तिचा चेहरा उजळला व ब्लँकेटा-खालील त्याचा हात तिने हळूच दाबला.

"तुम्ही अगदी कमाल केलीत," ती म्हणाली आणि चटकन त्याची नाडी पाहण्यासाठी तिने त्याचे मनगट पकडले.

"कशाबद्दल बोलते ही?" अलेक्सेई नवल करीत होता. मग त्याला पायांमध्ये पूर्वीपेक्षा वरच्या जागी वेदना जाणवली. ही परिचित जळती वेदना नव्हती. टरटरा फाडून टाकणारी पूर्वीची ठसठसती वेदना नव्हती. तर त्याच्या गुडघ्यांखाली शिरा गच्च आवळून बांधाव्या त्याप्रमाणे एक मंद वेदना जाणवत होती. ब्लँकेटच्या घड्यांवरून अचानक त्याच्या ध्यानात आले की त्याचे शरीर पूर्वीपेक्षा आखूड बनले होते आणि त्याच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला: चकचकती पांढरी खोली, वासिली वासिल्येविच यांचे चिडके गुरगुरणे, एनॅमलच्या बादलीत ऐकू येणारे काहीतरी फेकल्याचे बद्द आवाज. "एवढ्यात संपलं?" विमनस्कपणे तो आश्चर्य करीत राहिला आणि बळेच स्मित करीत नर्सला म्हणाला:

"मी थोडा आखूड झालोय असं दिसतंय!"

ते कडवट स्मित होते. स्मितापेक्षा त्याने चेहरा वाकडा केला होता असे म्हणणे जास्त योग्य ठरले असते. क्लावदिया मिखाइलोवनाने हळुवारपणे त्याच्या डोक्यावरील केस सरळ केले आणि ती म्हणाली:

"दु:ख करू नका लाडक्या, आता तुम्हाला खूप बरं वाटेल."

"हो. स्वत:च ओझं कमी झालं!"

"असं बोलू नका! पण तुम्ही खरंच फार छान वागलात! कुणी आरडाओरडा करतात, कुणा कुणाला तर पट्ट्यांनी बांधावं लागतं. पण तुम्ही चकार शब्द काढला नाहीत. छी:, काय भयानक आहे हे युद्ध!"

त्यासरशी कमिस्सारांचा रागीट आवाज त्या संधिप्रकाशात ऐकू आला:

"आता तुमचं विव्हळणं बंद करा! नर्स, त्याला ही पत्रं द्या. काही माणसं वेटी नशीबवान असतात. मला त्यांचा हेवा वाटतो. एकदम एवढी पत्रं मिळणं म्हणजे मजाच आहे!"

कमिस्सारनी पत्रांचा एक जुडगा मेरेस्येवला दिला. अलेक्सेईच्या हवाई तुकडीमधून ती पत्रे आली होती. त्यांच्यावर तारखा वेगवेगळ्या होत्या, पण का कुणास ठाऊक ही सर्व पत्रे एकदम आली. पाय कापलेला अलेक्सेई आता आपल्या मित्रांची पत्रें वाचत होता. त्याच्यापासून खूप दूर असलेल्या, असंख्य धोक्यांनी आणि साहसांनी भरलेल्या आयुष्याची माहिती ती पत्रे त्याला सांगत होती. ते आयुष्य आता अलेक्सेईला कायमचे पारखे झाले होते. त्याच्या तुकडीमधील लहान-मोठ्या बातम्या त्याने अधीरपणे वाचल्या: कोअरच्या मुख्य ठाण्यावरील राजकीय अधिकाऱ्याने तुकडीची लाल ध्वजेच्या किताबासाठी शिफारस झालेली सांगितली; इवानचुकला एकदम दोन पारितोषिके मिळाली होती; याशीन शिकारीवर गेला होता तेव्हा त्याने मारलेल्या कोल्ह्याला शेपूटच नव्हती; स्त्योपा रोस्तोवला हिरडीला गळू झाले व त्यामुळे त्याचे ल्येनोचकाबरोबरचे प्रेम-प्रकरण फसले—ह्या सर्व बातम्या अलेक्सेईला सारख्याच रंजक वाटत होत्या. क्षणात त्याचे मन त्याला जंगलात लपलेल्या विमानतळाकडे घेऊन गेले. त्या घातकी धावपट्टीला वैमानिक शिव्याशाप मोजत, पण आता मात्र अलेक्सेईला ते पृथ्वीवरील सर्वोत्तम स्थळ वाटत होते.

पत्रांमधील मजकुरात तो एवढा गुंगला होता, की त्या पत्रांवरील तारखा वेगवेगळ्या असल्याचे त्याच्या लक्षातच आले नाही. तसेच कमिस्सार नर्सकडे पाहून डोळे मिचकावीत होते ते त्याने पाहिले नाही, अथवा त्यांचे हलक्या आवाजातील नर्सबरोबरचे बोलणे त्याने ऐकले नाही. कमिस्सार नर्सला म्हणत होते: "पाहिलंत, तुमच्या त्या सगळ्या औषधांपेक्षा माझं औषधच जास्त गुणकारी आहे." वस्तुतः ही सगळी कमिस्सारांची पूर्वनियोजित कारवाई होती. केव्हा ना केव्हा पांगळे होण्याच्या दुःखाचा धक्का अलेक्सेईला सहन करावा लागणार हे त्यांनी जाणले होते. त्याचा तो धक्का सौम्य करावा म्हणून आधीपासूनच त्यांनी अलेक्सेईला येणारी काही पत्रे स्वतःपाशी लपवून ठेवली होती आणि आता शस्त्रक्रिया संपल्यानंतर अलेक्सेईला ती पत्रे देऊन त्याच्या आवडत्या विमानतळाच्या वातावरणात गुंगवून टाकले होते. कमिस्सार हे जुने अनुभवी सैनिक होते. घाईघाईने आणि

निष्काळजीपणे खरडलेल्या ह्या कागदी कपटयांचे मूल्य ते चांगले जाणून होते. युद्धआघाडीवर हे कपटे काही वेळा अन्नापेक्षा अथवा औषधापेक्षाही जास्त मौल्यवान ठरतात.

आंद्रेई देगत्यारेन्कोचे पत्र त्याच्याचसारखे साधे आणि रांगडे होते. त्या पत्रात छोटया, तिरप्या अक्षरात लिहिलेली आणि उद्‌गारचिन्हांनी भरलेली लहानशी चिठी सामावली होती:

"कॉम्रेड सीनियर लेफ्टनंट! तुम्ही तुमचं वचन पाळत नाही हे काही चांगलं नाही!!! विंगमध्ये तुमचा वारंवार उल्लेख होतो, मी खोटं सांगत नाही, सगळेजण सारखं तुमच्यावद्दलच बोलत असतात. थोडयाच वेळापूर्वी विंग कमांडर जेवणाच्या खोलीत म्हणाले: 'हा अलेक्सेई मेरेस्येव, खरा मर्द पुरुष आहे!!!' अशा रीतीनं ते बोलतात तेव्हा फक्त सर्वांत उत्तमां-विषयी बोलतात हे तुम्हाला चांगलं ठाऊक आहे. **लौकर परत या, प्रत्येक-जण तुमची वाट पाहतोय!!!** भोजनखोलीमधल्या जाडया ल्योल्यानं तुम्हाला निरोप दिलाय की, आता ती पुन्हा कधी वाद घालणार नाही आणि जेवणाच्या वेळी मुख्य पदार्थ तुम्हाला तीन-तीनदा वाढील. त्याबद्दल तिची नोकरी गेली तरी ती पर्वा करणार नाही. पण तरीही तुम्ही आपलं वचन पाळत नाही हे फार वाईट!!! तुम्ही इतरांना पत्रं लिहिलीत, पण मला नाही लिहिलं. मला त्याचं खूप वाईट वाटलं, म्हणून मी स्वतंत्र पत्र पाठवत नाही. पण मला एक स्वतंत्र पत्र लिहा ना–आणि तुम्ही कसे आहात ते कळवा... तुमची सारी सारी खबर कळवा!.."

ह्या गंमतीदार चिठीच्या शेवटी सही होती: "हवामान सार्जंट." मेरेस्येवने स्वतःशी स्मित केले. त्याच्या नजरेने पुन्हा शब्द वाचले: "लौकर परत या, प्रत्येकजण तुमची वाट पाहतोय." ह्या शब्दांना अधोरेखित केलेले होते. तो आपल्या बिछान्यातून उठला. एखादा माणूस आपले खिसे चाचपतो आणि एखादा महत्त्वाचा दस्तऐवज हरवला असे त्याच्या ध्यानात येते, त्याप्रमाणे त्याने त्याच्या पायांच्या जागी चाचपले. त्याच्या हाताला रिकामी जागा लागली.

केवळ त्या क्षणाला त्याला आपल्या हानीची तीव्रता पूर्णत्वाने जाणवली. विंगमध्ये, हवाई दलात, युद्धआघाडीवर, तो कधीही परतणार नाही. विमान चालवीत हवाई लढाईत तो पुन्हा कधीही भाग घेणार नाही. पुन्हा **कधीही नाही!** आता तो अपंग बनला होता. त्याच्या आवडत्या उद्योगा-

पासून वंचित झाला होता. एकाच जागी खिळला होता. घरात ओझे बनला होता. जीवनात नकोसा होता. आणि हे असे त्याच्या आयुष्याची अखेर होईपर्यंत चालणार होते.

६

शस्त्रक्रियेनंतर बहुतेक माणसांच्या बाबतीत सर्वसाधारणपणे जी अत्यंत वाईट गोष्ट घडते ती अलेक्सेई मेरेस्येव याच्याबाबतीत घडली. तो एकलकोंडा बनला. त्याने तक्रार केली नाही, तो रडला नाही. तो कधी चिडका वागला नाही. फक्त गप्प राहिला.

दिवसचे दिवस तो स्तब्धपणे उताणा पडून होता. छताला पडलेल्या नागमोडी चीरेवर आपले डोळे रोखून तो गप्प पडायचा. खोलीतील सह-निवासी त्याच्याशी काही बोलले तर "होय" अथवा "नाही" एवढ्या शब्दांपुरतीच त्याची उत्तरे मर्यादित असायची. अनेकदा त्याची ही उत्तरे संदर्भाला धरून नसत. मग तो पुन्हा गप्प व्हायचा आणि छताच्या गिलाव्यावरील काळ्या तड्याकडे टक लावायचा. जणू काही तेथे प्राचीन आलेख कोरलेला होता आणि त्याचा अर्थ लावण्यात त्याला मनस्वी आनंद मिळत होता. डॉक्टरांच्या सर्व सूचना तो आज्ञाधारकपणे अंमलात आणत होता. त्याला लिहून दिलेली सर्व औषधे घेत होता. विमनस्कपणे, निरुत्साहाने जेवत होता व पुन्हा उताणा पडत होता.

"ए पांढरी दाढीवाल्या!" कमिस्सारनी हाक दिली. "एवढा कशाचा विचार करतोस?"

अलेक्सेईने आपले डोके कमिस्सारांच्या दिशेने वळविले. त्याने अशा काही शून्य नजरेने त्यांना पाहिले की, जणू तो त्यांना पहातच नव्हता.

"मी तुला विचारतोय, कशाचा विचार करतो आहेस?"

"कशाचाच नाही."

एक दिवस वासिली वासिल्येविच वॉर्डात आले व आपल्या नेहमीच्या आस्थेवाईकपणे त्यांनी त्याला विचारले:

"काय रांगणाऱ्या वीरा, जिवंत आहेस का? कसं काय चाललंय? तू खराच वीर आहेस बरं का! तोंडातून हूं का चूं आवाज काढला नाहीस. त्या जर्मनांपासून लांब पळण्यासाठी अठरा दिवस तू हाता-पायांवर रांगत

होतास या गोष्टीवर माझा आता विश्वास बसला. तू आयुष्यात जेवढे बटाटे खाल्ले असशील त्यांच्यापेक्षा जास्त माणसांवर मी शस्त्रक्रिया केल्या आहेत. पण तुझ्यासारख्या माणसावर कधी शस्त्रक्रिया केली नव्हती." प्राध्यापकांनी आपले हात चोळले. ते लाल झाले होते व त्यांच्यावरील त्वचा सोललेली होती. त्यांची बोटांची नखे कुरतडलेली होती. "अरे, तू कपाळाला आठ्या का घालतो आहेस? बघा, मी याची स्तुती करतोय आणि हा कपाळाला आठ्या घालतोय! हे बघ, मेडिकल कोअरमध्ये मी लेफ्टनंट-जनरल आहे. मी तुला हसायचा हुकूम देतोय!"

मेरेस्येवने मोठ्या कष्टाने ओठ विलग करून भकास स्मित आपल्या चेहऱ्यावर झळकविले. त्याच्या मनात विचार आला: "अशी अखेर होणार आहे असं जर मला आधी माहीत असतं तर रांगण्याची तसदीच मी घेतली नसती. माझ्यापाशी पिस्तूलात तीन काडतुसं शिल्लक होती."

एका रंजक लढाईचे युद्ध-वार्ताहराने केलेले वर्णन कमिस्सारनी एका वर्तमानपत्रात वाचले. सहा सोविएत लढाऊ विमानांनी बावीस जर्मन विमानांशी झुंज दिली होती. आठ शत्रू-विमानांना पाडले होते व स्वतःचे एक विमान गमावले होते. कमिस्सारनी हे वृत्त अशा काही उत्साहात वाचून दाखविले की, ऐकणाऱ्याला वाटले असते: हा पराक्रम त्यांना अज्ञात असलेल्या वैमानिकांनी गाजविला नव्हता, तर त्यांच्या स्वतःच्या शूर घोडदळ सैनिकांनी गाजविला होता. हे कसे घडले असेल याबद्दल प्रत्येकाने चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला व वादविवाद सुरू झाला तेव्हा कूकूश्किनसुद्धा त्यात उत्साहाने सामील झाला होता. पण अलेक्सेई मात्र पडल्या पडल्या विचार करीत होता: "सुदैवी आहेत बेटे! उड्डाणं करताहेत, लढताहेत. पण मी मात्र आकाशात पुन्हा कधीच उडणार नाही."

सोविएत माहिती विभागाची निवेदने हळू हळू त्रोटक बनू लागली. आणखी एक दणका देण्यासाठी सोविएत सेनेच्या पिछाडीला प्रचंड सामर्थ्य एकवटण्यात येत असल्याची सर्व चिन्हे स्पष्ट दिसत होती. हा दणका कोठे मारण्यात येईल आणि जर्मनांवर त्याचा काय परिणाम घडेल याबाबत कमिस्सार व स्तेपान इवानोविच यांच्यात गंभीर चर्चा घडत होती. अगदी अलिकडे अलिकडेपर्यंत अलेक्सेई अशा चर्चांमध्ये मोठ्या हिरीरीने भाग घेत असे. पण आता अशा चर्चा न ऐकण्याचा तो प्रयत्न करी. नजीकच्या काळात प्रचंड आणि कदाचित निर्णायक स्वरूपाच्या लढाया होणार असल्याचे त्यालाही

जाणवले होते. पण आपले सहकारी आणि वेगाने प्रकृती सुधारत असलेला कूकूश्किनसुद्धा त्या लढायांमध्ये भाग घेऊ शकतील व आपण मात्र पिछाडीला असे कुजत पडणार हा विचार त्याला असह्य व्हायचा. म्हणून कमिस्सार जेव्हा वर्तमानपत्र वाचत अथवा युद्धाविषयी संभाषण सुरू होई, तेव्हा काहीही दिसू नये व ऐकू येऊ नये म्हणून अलेक्सेई डोक्यावरून पांघरूण ओढून घ्यायचा आणि आपले गाल उशीवर चोळायचा. नकळतपणे त्याच्या मनात मार्क्सिम गोर्कीच्या 'बहिरीससाण्याचे गाणे'मधील परिचित ओळ घुमत रहायची: "जे सरपटायला जन्मलेत ते उडू शकत नाहीत!"

क्लावदिया मिखाइलोवनाने पिसार वाळुंजीच्या काही डहाळया आणल्या. त्या कठीण, युद्धकालीन अडथळे उभारलेल्या मॉस्कोत ह्या वाळुंजी त्यांना कशा मिळाल्या कोण जाणे! प्रत्येक खाटेजवळच्या टेबलावरील ग्लासात त्यांनी एकेक डहाळी ठेवली. त्या तांबूस देठांच्या डहाळया आणि पांढरी, भुरभुरीत बोंडे ताज्या वासाने घमघमत होती. जणू वॉर्ड क्रमांक बेचाळीस-मध्ये वसंत फुलला होता. त्या दिवशी प्रत्येकाला खूप आनंद आणि उत्साह वाटला. गप्प राहणारा रणगाडाचालकसुद्धा आपल्या बँडेजांमधून काही शब्द पुटपुटला.

अलेक्सेई पडल्या पडल्या विचार करीत होता: कामीशिनमध्ये चकचकीत फरसबंदी दगडांच्या रस्त्याच्या कडेला चिखलभरल्या पादपथांवरून पाण्याचे खळखळ ओहोळ वाहात आहेत. गरम होणाऱ्या मातीचा, ताज्या ओलसर-पणाचा आणि घोड्याच्या लीदीचा वास सुटला आहे. अशा एका दिवशी तो आणि ओल्या (ओल्गा या नांवाचे लाडके रशियन रूप—अनु.) वोल्गाच्या उंच किनाऱ्यावर उभे होते. नदीच्या असीम पात्रामधून बर्फखंड संथपणे वाहात होते. एक गंभीर शांतता नांदत होती. चंडोलांच्या रुपेरी घंटानादां-सारख्या लकेरींनीच केवळ ती शांतता भंगत होती. असे भासत होते की, प्रवाहाबरोबर बर्फ वाहात जात नव्हता, तर तो स्वतः आणि ओल्या निः-शब्दपणे वाहात होती व उसळत्या, खळाळत्या नदीला भेटायला जात होती. एक शब्दही न उच्चारता ती दोघे तेथे उभी होती. भावी सुखाची स्वप्ने पाहण्यात रंगून गेली होती. त्या आनंदात त्यांचा जीव एवढा घुसमटला होता की, वसंताच्या मुक्त झुळुका वाहणाऱ्या वोल्गाच्या उंच तटी त्यांना श्वास घेणे जड जात होते. आता ती स्वप्ने प्रत्यक्षात कधीही आकारणार नव्हती. ओल्गा त्याच्याकडे पाठ फिरवील. आणि जरी तिने तसे केले

नाही तरी तिचा हा स्वार्थत्याग तो स्वीकारू शकणार आहे का? तो लाकडी पायांवर लंगडत जात असताना, तिच्यासारख्या देखण्या, डौलदार तरुणीला आपल्याबरोबर फिरायला घेऊन जाणार आहे का? ... आपल्या बिछान्याजवळून वसंताचा तो भाबडा अग्रदूत दूर नेण्याची त्याने नर्सला विनंती केली.

वाळुंजीची डहाळी तेथून काढून टाकण्यात आली, पण त्याची मात्र स्वतःच्या मनातील कडवट विचारांपासून सुटका होईना : त्याचे पाय गमावले गेले हे समजल्यानंतर ओल्या काय म्हणेल? ती त्याला सोडून जाईल काय? त्याच्या जीवनामधून नाहीशी होईल काय? ह्या विचाराला तो स्वीकारू शकला नाही! ती तशी नाही. ती त्याला टाकणार नाही! त्याच्याकडे पाठ फिरवणार नाही! पण मग अधिकच वाईट घडेल. त्याने डोळयांपुढे चित्र उभे केले : उदात्त विचारांपायी तिने त्याच्यासारख्या लंगड्या माणसाशी विवाह केला; उच्च तांत्रिक शिक्षण घेण्याचे स्वतःचे स्वप्न त्याच्यापायी सोडून दिले व स्वतःच्या, पांगळया नवऱ्याच्या आणि कदाचित मुलांच्याही उदरनिर्वाहासाठी कचेरीच्या रटाळ चाकोरीत स्वतःला अडकवून घेतले!

अशा त्यागाचा स्वीकार करण्याचा त्याला अधिकार होता का? अद्याप ते एकमेकांशी बंधनाने जखडलेले नव्हते. त्यांचा वाङ्निश्चय झाला होता, पण अद्यांप नवरा आणि बायको असे नाते जडले नव्हते. त्याचे तिच्यावर प्रेम होते, खूप खूप प्रेम होते. म्हणूनच त्याने निर्णय घेतला की, तिच्या त्यागाचा स्वीकार करण्याचा त्याला अधिकार नव्हता. एकाच घावात तात्काळ त्यांचे संबंध त्याने स्वतःच तोडणे आवश्यक होते. त्यामुळे तिची केवळ ओझे लादलेल्या भविष्यकाळापासून सुटका झाली असती एवढेच नव्हे, तर सध्याच्या पेचप्रसंगाच्या छळवादापासूनही ती मुक्त झाली असती.

पण कामीशिनच्या टपाल कचेरीचा शिक्का असलेले एक पत्र आले आणि ह्या सर्व निर्णयांना त्याने उधळून लावले. ओल्याकडून ते पत्र आले होते आणि त्या पत्रातील प्रत्येक ओळीमधून चिंता पाझरत होती. जणू काही आगामी दुश्चिन्हाची तिला चाहूल लागली होती व म्हणून तिने लिहिले होते की, त्याचे काहीही बरे-वाईट घडले तरी ती त्याच्याबरोबरच सदैव राहणार आहे; ती केवळ त्याच्याचसाठी जगत होती, फुरसतीचा प्रत्येक क्षण त्याच्याविषयीच्या विचारांनीच मन भरून टाकीत होता; आणि हे विचारच तिचे युद्धकालीन खडतर जीवन सुसह्य करीत होते; लाकूड

कापण्याच्या गिरणीतील निद्राविहीन रात्रींना सोबत करीत होते; सुटीच्या दिवशी रात्रं-दिवस खंदक खणताना आणि अर्धपोटी जीवन जगताना त्याच्याविषयीचे विचारच तिला मदत करीत होते. "कुत्र्याला शेजारी घेऊन झाडाच्या बुंध्यावर बसलेला हसऱ्या मुद्रेचा तुझा शेवटचा छोटा फोटो सदैव माझ्याबरोबर असतो. माझ्या आईनं दिलेल्या लॉकेटमध्ये मी तो ठेवलाय आणि ते लॉकेट मी नेहमी गळ्यात घालते. जेव्हा खूप निराश वाटतं तेव्हा लॉकेट उघडून तुला पाहते... जोपर्यंत आपण एकमेकांवर प्रेम करतोय तोपर्यंत कशालाही भ्यायचं कारण नाही असं मला वाटतं." तिने पुढे असेही लिहिले होते की, अलिकडे त्याच्या आईला त्याच्याविषयी जास्त काळजी वाटत होती. त्याने आपल्या आईला वारंवार पत्रे लिहावीत, पण वाईट बातम्या कळवून बेचैन करू नये, असे तिने विनविले होते.

ही घरची पत्रे म्हणजे त्याच्या दृष्टीने नेहमी एक आनंददायी प्रसंग असायची. युद्धआघाडीवरील खडतर जीवनात त्याच्या काळजाला ही पत्रे मायेची ऊब द्यायची. पण आता प्रथमच ही पत्रे त्याला आनंद देत नव्हती. त्यांनी त्याचे अंतःकरण अधिक जड केले आणि त्याने जो एक गोंधळ केला त्याचा खूप त्रास नंतर त्याला भोगावा लागला. त्याचे पाय कापले होते हे घरी लिहून कळविण्याचे धाडस त्याला झाले नाही.

फक्त हवामान केंद्रावरील मुलीला मात्र त्याने आपल्या दुर्दैवाविषयी आणि आनंदहीन विचारांविषयी तपशीलवार लिहिले. त्यांची जुजबी ओळख होती व त्यामुळे ह्या गोष्टींविषयी तिला सांगणे अधिक सोपे होते. तिचे नांव माहीत नसल्यामुळे आपली पत्रे तो अशा पत्त्यावर पाठवी: "युद्धआघाडीवरील टपाल कचेरी: अमुक अमुक हवामान केंद्र, 'हवामान सार्जंट'साठी." युद्धआघाडीवर पत्रांना केवढे मौल्यवान समजले जाते हे त्याला माहीत होते आणि ह्या विचित्र पत्त्याची पत्रे आज ना उद्या नक्की पोहोचतील असा त्याचा विश्वास होता. आणि जरी ही पत्रे पोहोचली नसती तरी त्याचे त्याला दुःख नव्हते, कारण आपल्या भावनांना वाट मोकळी करून देणे एवढाच त्याचा त्यामागील हेतू होता.

इस्पितळातील एकसूरी जीवन कडू विचार करीत अलेक्सेई मेरेस्येव घालवीत होता. त्याच्या कणखर लोखंडासारख्या प्रकृतीने कुशल शस्त्रक्रिया जरी पेलली होती आणि त्याच्या जखमा चटकन भरून आल्या होत्या, तरी तो खूपच अशक्त झाला होता त्याची अशक्तता नाहीशी करण्यासाठी

शक्य ते सर्व उपाय योजले जात होते, पण तरीही तो खंगत चालल्याचे व प्रतिदिनी अधिक झुरत चालल्याचे प्रत्येकाला स्पष्ट दिसत होते.

७

दरम्यान बाहेर वसंताला फुलवा येत होता.

आयोडिनच्या वासाने घमघमणाऱ्या बेचाळीस नंबरच्या वॉर्डातही वसंत जबरदस्तीने घुसला होता. तो खिडकीमधून आत आला होता. वितळणाऱ्या बर्फाचा थंड, ओलसर श्वास त्याने आपल्याबरोबर आणला होता. चिमण्या उत्तेजित होऊन चिवचिवत होत्या. रस्त्याच्या कोपऱ्याशी वळण घेताना ट्रामगाडयांचे कर्णे आनंदाने वाजत होते. बर्फापासून मुक्त झालेल्या अस्फाल्ट-वर लोकांचा पदरव ठळक ऐकू येत होता. सायंकाळी ॲकॉर्डियनच्या मंद, एकसूरी नादलहरी ऐकू येत होत्या. खोलीच्या एका बाजूच्या खिडकीमधून वसंत डोकावत होता. त्या खिडकीमधून चिनाराची उन्हात न्हालेली फांदी दिसायची. त्या फांदीवर पिवळसर डिंकाने माखलेल्या लांबट कळ्या फुगीर बनत होत्या. क्लावदिया मिखाइलोवनाच्या प्रेमळ, फिकट चेहऱ्यावरील सोनेरी ठिपक्यांच्या रूपानेही वसंताने वॉर्डात प्रवेश केला होता. कोणतीही पावडर ते ठिपके झाकण्यास असमर्थ ठरली होती व बिचारी नर्स हैराण झाली होती. खिडक्यांच्या बाहेरील कमानींच्या पत्र्यांवर बाष्पाचे टप्पोरे थेंब सतत टपटप आवाज करीत होते व त्यांच्यामार्फतही वसंताचा मोसम लोकांचे स्वतःकडे लक्ष वेधून घेत होता. नेहमीप्रमाणे वसंताने लोकांच्या काळजांना मृदु बनविले आणि त्यांच्या स्वप्नांना जाग आणली.

"स्तेपान इवानोविच, हातात बंदूक घेऊन एखाद्या जंगलच्या मोकळ्या जागेत जायला आत्ता किती मजा येईल नाही?" कमिस्सार आसावल्या मनाने स्वप्नरंजनात मग्न होत म्हणाले. "खोपटयात पहाटेच्या वेळी पडून रहायचं... शिकारीची वाट पहात... यापेक्षा आणखी सुंदर ते काय? गुलाबी पहाट... चुरचुरीत आणि किंचित गोठलेलं वातावरण... आणि तुम्ही तिथं बसला आहात! एकदम – ग्ल, ग्ल, ग्ल आणि पंखांचा फड-फडाट...ठो – ठो – ठो... तुमच्या डोक्यावर ते उतरतं... शेपूट पंख्या-सारखी पसरलेली... मग दुसरं, तिसरं..."

स्तेपान इवानोविचनी एक मोठा सुस्कारा टाकला आणि तोंडाला पाणी

सुटल्याप्रमाणे स्स स्स आवाज केला. पण कमिस्सारांचे स्वप्नरंजन चालूच होते :

"मग छानशी शेकोटी पेटवायची, जमिनीवर केप अंथरायची, धुरकट चवीचा मस्त सुगंधी चहा बनवायचा आणि अंगाच्या स्नायू न् स्नायूत ऊब यावी म्हणून वोदकाचा एक घोट मारायचा! काय? प्रामाणिक कष्ट केल्यानंतर..."

"कॉम्रेड कमिस्सार, नका बुवा बोलू त्याविषयी!" स्तेपान इवानोविच म्हणाले." आमच्या भागात ह्या दिवसात कोणती शिकार मिळते ठाऊक आहे? पाईक माशांची! तुमचा विश्वास बसणार नाही, पण हे खरं आहे. तुम्ही कधी ऐकलं नाही याबद्दल? खूप मजा येते आणि चार पैसेही कमावता येतात. तळ्यावरचा बर्फ फुटला रे फुटला, नदीला पूर लोटला, की पाईक मासे किनाऱ्यांवर गर्दी करतात. वसंताच्या महापुराच्या पाण्याबरोबर गवतात आणि शेवाळयात घुसतात. गवतात राहून ते अंडी घालतात. किनाऱ्यानं चालताना लाकडाचे ओंडके बुडाल्यासारखं दिसतं, पण ते पाईक असतात. मग बंदुकीनं त्यांना टिपायचं. तुम्हाला खरं सांगतो, काही वेळा तर एवढे मासे मिळतात, की त्यांना भरून न्यायला जवळची पिशवी अपुरी पडते..."

मग शिकाऱ्यांच्या आठवणींची देवघेव सुरू होई. नकळतपणे संभाषणाचा ओघ युद्धाकडे वळायचा आणि डिव्हिजनमध्ये अथवा कंपनीत या घटकेला काय चालले असावे, हिवाळयात बनविलेले भूमीगत आसरे आता "रडत" असतील काय, किंवा तटबंद्या "थरथर कापत" असतील काय, पश्चिमेत अस्फाल्ट रस्त्यांची सवय झालेल्या जर्मनांची परिस्थिती काय असेल, वगैरे विषयांवर त्यांचे तर्क-कुतर्क बांधणे चालू होई.

जेवणानंतर ते चिमण्यांना खाऊ घालीत. हा मनोरंजनाचा प्रकार स्तेपान इवानोविच यांनी शोधून काढला होता. स्वस्थ बसून राहणे त्यांना जमत नसे. आपल्या बारीक, अस्वस्थ हातांनी काहीतरी उद्योग करण्यात ते सदैव गढलेले असत. एक दिवस त्यांनी सुचविले की, जेवणानंतर उरलेले खरकटे खिडकीबाहेरच्या चौकटीवर पक्ष्यांना खाण्यासाठी ठेवावे. ही परंपराच बनली व केवळ खरकटे अन्न ते पक्ष्यांना चारीत नसत, तर मुद्दाम पावाचे तुकडे राखून ठेवीत आणि त्यांचा चुरा करून पाखरांना देत. स्तेपान इवानोविच यांच्या भाषेत सांगायचे तर, चिमण्यांच्या आख्ख्या कळपाला

"रेशनच्या यादीवर नोंदणे" त्यामुळे शक्य झाले होते. पावाच्या मोठ्या तुकड्याला छोटे, चिवचिवणारे पक्षी चोची मारीत ते पाहण्यात वॉर्ड-निवासींना अमाप आनंद लाभायचा. पावाच्या तुकड्यांसाठी भांडणे करून, खिडकीच्या चौकटीत पसरलेले कण गट्ट करून ते पक्षी चिनाराच्या फांदीवर जाऊन बसत. आपल्या चोचींनी स्वतःला ते साफसूफ करीत, पंखांची फडफड करीत आणि इतर उद्योगांसाठी भर्रर्र उडून जात. चिमण्यांना खाऊ घालणे ही सर्वांची फावल्या वेळातील आवडती करमणूक बनली. काही पक्ष्यांना पेशंट ओळखू लागले व त्यांनी त्या ओळखू येणाऱ्या पाखरांना नांवेही ठेवली. त्या पाखरांमध्ये सर्वांत आवडता होता एक शेपूट तुटलेला, उद्धट, चपळ छोटा चिमणा. त्याच्या भांडखोर सवयींपायी बहुधा त्याने आपली शेपूट गमावली असावी. स्तेपान इवानोविचनी त्याला नांव ठेवले होते : "सबमशिनगनवाला."

आश्चर्याची बाब म्हणजे ह्या छोट्या, गोंगाट करणाऱ्या प्राण्यांबरोबरील मनोरंजनापायी, रणगाडाचालक आपल्या घुम्या स्वभावातून बाहेर पडला. कमरेपर्यंत खाली वाकलेले, कुबड्यांना आधार घेऊन चालणारे स्तेपान इवानोविच रेडिएटरपाशी जाऊन हवेसाठी छोटी खिडकी उघडण्याचा प्रयत्न करीत होते, तेव्हा तो विमनस्कपणे आणि नीरस दृष्टीने प्रथम त्यांच्याकडे पहात होता. पण दुसऱ्या दिवशी खिडकीपाशी चिमण्या आल्या तेव्हा त्या धिंगाणा घालणाऱ्या छोट्या प्राण्यांना नीट पाहता यावे म्हणून रणगाडा-चालक चक्क स्वतःच्या बिछान्यात उठून बसला. बसताना होणाऱ्या वेदनां-पायी त्याचा चेहरा वाकडा झाला होता, तरीही त्याने कळ सोसली. त्या-नंतरच्या दिवशी तर त्याने आपल्या जेवणामधून 'पाय' पक्वान्नाचा भला मोठा तुकडा राखून ठेवला. खिडकीशी गलबला करणाऱ्या भिकाऱ्यांना इस्पितळातील हे पक्वान्न आवडेल असे त्याला वाटले असावे. एक दिवस "सबमशिनगनवाला" उगवला नाही, तेव्हा कूकूश्किनने निष्कर्ष काढला, की मांजराने त्याला गट्ट केले असावे व त्याला योग्य तीच शिक्षा मिळाली. एरवी दुर्मुखला राहणारा रणगाडाचालक भडकला आणि तो कूकूश्किनला "कुरकुऱ्या" म्हणाला. दुसऱ्या दिवशी शेपूटतुटका चिमणा जेव्हा खिडकीत अवतरला, चिवचिवाट करीत खिडकीच्या तावदानाशी जेव्हा तो उर्मटपणे झोंबला व आपली मान लांबवून, आपले उर्मट, मणीदार डोळे विजयी

मुद्रेने जेव्हा त्याने चमकावले, तेव्हा रणगाडाचालक खो खो हसत सुटला. अनेक महिन्यांनंतर त्याचे ते पहिले हास्य होते.

थोड्या काळानंतर ग्वोझ्देव पूर्ण उल्हसित बनला. तो अत्यंत आनंदी, बडबड्या आणि समंजस असल्याचे आढळले, तेव्हा प्रत्येकजण चकित झाला. अर्थात ही करामत कमिस्सारांची होती, कारण स्तेपान इवानोविच म्हणत त्याप्रमाणे प्रत्येकाच्या काळजाची चावी शोधून काढण्यात कमिस्सार पटाईत होते. रणगाडाचालक ग्वोझ्देवला त्यांनी असा माणसात परत आणला.

क्लावदिया मिखाइलोवना जेव्हा दारात उभी राहून, चेहऱ्यावर रहस्यमय भाव आणून, हात मागे धरून, आपल्या चकाकत्या डोळ्यांनी वॉर्डातील प्रत्येकाकडे न्याहाळून बघायची आणि विचारायची: "आज कोण नाच करणार?"... तो क्षण बेचाळीस नंबरच्या वॉर्डात सर्वांत आनंदाचा असायचा.

त्याचा अर्थ टपाल आलेले असायचा. सुदैवी मंडळींना त्यांची पत्रे देण्यापूर्वी क्लावदिया मिखाइलोवना त्यांना बिछान्यातल्या बिछान्यात का होईना, पण नाचासमान थोडया हालचाली करायला लावायची. अनेकदा कमिस्सारना हा नाच करावा लागे, कारण काही काही वेळा त्यांना एकाच टपाली दहा दहा पत्रे मिळायची. त्यांच्या डिव्हिजनकडून, पिछाडीकडून, सहकारी अधिकाऱ्यांकडून, साध्या शिपायांकडून त्यांना पत्रे यायची. जुन्या काळची ओळख राखून, किंवा आपल्या नवऱ्यांची कमिस्सारनी कानउघाडणी करावी म्हणून, त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांच्या बायकाही कमिस्सारांना पत्रे लिहीत. त्यांचे जे सहकारी अधिकारी लढाईत ठार झाले होते त्यांच्या विधवा कमिस्सारांना पत्रे लिहून सल्ला मागत अथवा घरगुती व्यवस्था लावण्यात मदत मागत. कझाखस्तानातील एका बालवीर मुलीकडूनही त्यांना पत्र यायचे. लढाईत ठार झालेल्या एका रेजिमेंट कमांडरची ती मुलगी होती. त्या मुलीचे नांव कमिस्सारांना कधीही आठवायचे नाही. पण ते सर्व पत्रे मन लावून वाचायचे आणि सर्वांना आठवणीने उत्तरे लिहायचे. अमूक एका कमांडरच्या पत्नीला मदत करावी, असे ते संबंधित उच्च अधिकाऱ्यांना लिहीत. "हाताबाहेर गेलेल्या" कुणाच्या तरी नवऱ्याला ते कानपिचक्या देत. आघाडीवर असलेल्या एका कमांडरचे कुटुंब ज्या घरात रहात असे त्या घराच्या व्यवस्थापकाला तंबी देत की, त्या घरात तात्काळ चुलाणा बसविला नाही तर त्याची "मुंडी मुरगाळून" टाकण्यात येईल.

आणि जिचे अवघड नांव त्यांना आठवत नसे त्या कझाखस्तानातील मुलीला दुसऱ्या तिमाहीत व्याकरणात वाईट मार्क मिळाल्याबद्दल तिची खरडपट्टी काढत.

स्तेपान इवानोविच यांचाही युद्धआघाडीशी आणि पिछाडीशी जोरदार पत्रव्यवहार चाले. यशस्वी नेमबाज असणाऱ्या त्यांच्या मुलांकडून त्यांना पत्रे येत. त्याचप्रमाणे, सामुदायिक शेतावर पथक-प्रमुख म्हणून काम करणाऱ्या त्यांच्या मुलीकडूनही पत्रे येत. तिच्या पत्रांमध्ये सर्व नातेवाईकांच्या आणि ओळखीच्या लोकांचे असंख्य नमस्कार असत. शिवाय अशी माहितीही दिलेली असे की, नव्या उभारणी कामांवर सामुदायिक शेतांकडून अमूक इतकी माणसे पाठविण्यात आली तरीही, अमूक अमूक योजना लक्ष्यापेक्षा इतक्या इतक्या जास्त टक्क्यांनी पूर्ण झाल्या होत्या. स्तेपान इवानोविच ही पत्रे मिळताक्षणीच सबंध वॉर्डाला मोठमोठ्यांदा आनंदाने वाचून दाखवीत. वॉर्डातील माणसांना, वॉर्डात काम करणाऱ्या सर्व बायांना, परिचारिकांना आणि पिवळट खप्पड चेहऱ्याच्या हाऊस-सर्जनला — अशा सर्वांना ते आपल्या घरच्या घडामोडींविषयी नेमाने माहिती पुरवीत.

सबंध वॉर्डाशी जणू वैर धरलेल्या माणूसघाण्या कूकूश्किनलासुद्धा त्याच्या आईकडून पत्रे येत. बार्नाऊलच्या आसपास कुठेतरी ती रहात होती. नर्सच्या हातून तो पत्र हिसकावून घेई, वॉर्डातील सर्वजण झोपेपर्यंत वाट पाही आणि नंतर हलक्या आवाजात ते पत्र वाचत असे. त्या वेळी त्याचा कठोर चेहरा सौम्य बनायचा व त्याच्या स्वभावाशी पूर्णतः विसंगत असा मृदु आणि गंभीर भाव त्याच्या चेहऱ्यावर तरळत असायचा. त्याची आई खेड्यात डॉक्टर होती आणि त्याचे तिच्यावर खूप प्रेम होते. पण का कुणास ठाऊक, त्याला आपल्या भावनाप्रधानतेची लाज वाटत असे आणि हा हळवेपणा लपविण्याचा तो आटोकाट प्रयत्न करीत असे.

वॉर्डात जेव्हा वातम्यांची ही देवघेव जोरजोरात चालायची तेव्हा तिच्या आनंदात सहभागी न होणारा एकटा रणगाडाचालक होता. तो अशा वेळी अधिकच खिन्न बनायचा, भिंतीकडे चेहरा वळवायचा आणि डोक्यावरून पांघरूण ओढून घ्यायचा. त्याला पत्र लिहिणारे असे कुणी उरले नव्हते. वॉर्डात जेवढी अधिक पत्रे येत, तेवढे त्याचे एकलेपण त्याला जास्त तीव्रतेने जाणवे. पण एक दिवस क्लावदिया मिखाइलोवना दारापाशी आली तेव्हा तिचा चेहरा नेहमीपेक्षा जास्त आनंदाने उजळलेला होता. कमिस्सारांची नजर टाळीत ती घाईघाईने म्हणाली :

"आज कोण नाच करणार?"

तिने रणगाडाचालकाच्या खाटेकडे कटाक्ष टाकला आणि तिच्या प्रेमळ चेहऱ्यावर रुंद स्मित उजळले. काहीतरी विशेष घडल्याचे प्रत्येकाच्या ध्यानात आले. वॉर्डातील वातावरण अपेक्षेने ताणले गेले.

"लेफ्टनंट ग्वोझ्देव, आता नाच करायची तुमची पाळी. चला, पाऊल टाका."

ग्वोझ्देव दचकला, झटकन वळला आणि त्याच्या बँडेजच्या फटींमधून त्याचे डोळे चमकल्याचे मेरेस्येवने पाहिले. पण ग्वोझ्देवने तात्काळ स्वतःला सावरले. आपल्या कंपित आवाजात शक्यतो बेपर्वाईची छटा आणण्याचा प्रयत्न करीत तो म्हणाला:

"चूक झालीय. पुढच्या वॉर्डात दुसरा एखादा ग्वोझ्देव असेल." पण नर्सने आपल्या हातात उंच, झेंड्याप्रमाणे धरलेल्या तीन पत्रांकडे त्याचे डोळे उत्सुकतेने, आधाशीपणे पहात होते.

"नाही! काहीही चूक नाही," नर्स म्हणाली. "पहा! 'लेफ्टनंट ग्रि. मि. ग्वोझ्देव,' आणि वॉर्डाचा नंबरसुद्धा पहा: बेचाळीस! झाली खात्री?"

ब्लँकेटाखालून बँडेजधारी हात झटकन बाहेर आला. लेफ्टनंटने एक पत्र तोंडात धरले आणि लिफाफा कसाबसा फाडला तेव्हा तो हात थरथर कापत होता. उत्तेजित मनःस्थितीमुळे त्याचे डोळे चकाकत होते. विलक्षण घडले होते! एकाच विद्यापीठात असलेल्या वैद्यकशास्त्राच्या एकाच वर्गात शिकणाऱ्या तीन मैत्रिणींनी भिन्न अक्षरांमध्ये आणि भिन्न शब्दांमध्ये जवळ जवळ सारख्याच आशयाची तीन पत्रे लिहिली होती. पराक्रमी रणगाडा-चालक लेफ्टनंट ग्वोझ्देव जखमी होऊन मॉस्कोतील इस्पितळात पडल्याचे त्यांना समजले होते व त्याच्याशी पत्रमैत्री करण्याचे त्या मुलींनी ठरविले होते. त्यांनी लिहिले होते की त्यांच्या औद्धत्याचा लेफ्टनंटला जर राग आला नसेल, तर तो त्यांना पत्र लिहून आपली खुशाली कळवील काय? त्यांपैकी आन्यूता नांवाच्या एकीने विचारले होते की, त्याला ती काही मदत करू शकत होती काय? त्याला काही पुस्तके हवी होती काय? त्याला जर कसली गरज भासली तर निःसंकोचपणे त्याने तिला कळवावे असे तिने लिहिले होते.

सबंध दिवसभर ग्वोझ्देव ती पत्रे पुन्हा पुन्हा उलटसुलट पहात होता,

त्यांवरील पत्ते वाचत होता आणि हस्ताक्षरे निरखून पहात होता. अर्थात, अशा तऱ्हेचा पत्रव्यवहार चालतो याची त्याला कल्पना होती. अशा एका अज्ञात व्यक्तीशी त्याने पूर्वी पत्रव्यवहार केला होता. सणाच्या निमित्ताने भेट म्हणून आलेल्या लोकरी हातमोजांच्या अंगठ्यात त्याला त्यावेळी एक चिठी सापडली होती. पण ती चिठी लिहिणाऱ्या व्यक्तीने – एका मध्यम-वयीन बाईने – आपल्या चार मुलांसह आपले छायाचित्र पाठवून सोबत एक गंमतीदार पत्र लिहिले होते, तेव्हा तो पत्रव्यवहार आपोआपच थांबला होता. यावेळी मामला वेगळा होता. त्याला एकाच गोष्टीचे आश्चर्य वाटत होते आणि तो गोंधळात पडला होता, कारण ह्या पत्रांचे आगमन पूर्णतया अनपेक्षित होते आणि ती पत्रे एकत्र आली होती. आणखी एक गोष्ट त्याच्या लक्षात येत नव्हती: त्याच्या युद्धामधील कामगिऱ्यांची माहिती ह्या वैद्यक-शास्त्राच्या मुलींना कशी समजली होती? सबंध वॉर्डला याचे आश्चर्य वाटत होते आणि कमिस्सारना तर फारच आश्चर्य वाटले होते. पण कमिस्सारांचे स्तेपान इवानोविच व नर्सबरोबर झालेले नेत्रसंकेत मेरेस्येवने टिपले होते. ह्या सर्व प्रकरणाच्या बुडाशी कमिस्सारच असावेत, असा अलेक्सेईने तर्क बांधला.

ते काहीही असले तरी दुसऱ्या दिवशी सकाळी ग्वोझ्देवने कमिस्सारांपाशी लिहिण्याचे काही कागद मागितले आणि उजव्या हाताचे बँडेज परवानगी न मागताच सोडून संध्याकाळपर्यंत तो पत्रे लिहीत बसला. त्याने अनेक वेळा अक्षरे खोडली, नव्या ओळी लिहिल्या, मनास न आलेल्या पत्राचा चोळामोळा करून नवे पत्र लिहिले. सरतेशेवटी, आपल्या अज्ञात पत्रकर्त्यांना त्याने उत्तरे लिहिली.

दोन मुलींनी लौकरच पत्रव्यवहार थांबविला. पण प्रेमळ अंतःकरणाची आन्यूता मात्र त्या तिघींच्या वतीने पत्रे लिहीत राहिली. ग्वोझ्देव हा मूळचा माणसांशी संपर्क राखणाऱ्या स्वभावाचा होता. त्यामुळे, विद्यापीठातील वैद्यक विभागाच्या तिसऱ्या वर्षाच्या वर्गात काय काय चालले होते, जीव-शास्त्र हा किती रोमांचक विषय होता आणि जैव रसायनशास्त्र किती नीरस होते, प्राध्यापकांचा आवाज किती छान होता आणि विषयाची मांडणी ते किती छान करीत होते, अमूक अमूक लेक्चरर किती कंटाळवाणा होता, गेल्या रविवारी स्वेच्छेने श्रमदान करताना सामान वाहून नेणाऱ्या ट्राम-गाड्यांमध्ये विद्यार्थ्यांनी किती सर्पण भरले, तळावरील इस्पितळातील काम

आणि अभ्यास यांचा मेळ घालणे किती अवघड जात होते, एक मूर्ख विद्यार्थिनी "भाव" खाते, वगैरे वगैरे इत्थंभूत बातम्या आता सबंध वॉर्डाला ऐकायला मिळू लागल्या.

ग्वोझ्देव केवळ बोलू लागला होता असे नाही, तर तो फुलूही लागला होता. लौकरच त्याची प्रकृती बरी होण्याच्या मार्गाला लागली.

कूकूश्किनचे सापळे काढण्यात आले. स्तेपान इवानोविच कुबड्यांशिवाय चालायला शिकत होते आणि एव्हाना बरेचसे ताठपणे वावरत होते. आता ते दिवसाचा सगळा वेळ खिडकीपाशी घालवीत व "विस्तृत जगातील" घडामोडी पहात बसत. फक्त कमिस्सारांची आणि मेरेस्येवची प्रकृती अधिकाधिक बिघडत चालली होती. विशेषतः कमिस्सारांची तब्येत खूपच ढासळली होती. आता सकाळचा व्यायाम करणे त्यांना जमत नव्हते. त्यांच्या सबंध शरीराला एक अमंगळ, पिवळसर आणि जवळ जवळ पारदर्शी अशी सूज आली होती. आपले हात वाकवायला त्यांना कष्ट पडत होते आणि हातात पेन्सिल अथवा चमचा धरणेही त्यांना इतःपर अशक्य ठरले होते.

सकाळच्या वेळी वॉर्डातील मोलकरीण त्यांचे अंग पुसून स्वच्छ करायची आणि त्यांना न्याहरी भरवायची. तीव्र वेदनांपायी नव्हे तर ह्या अगतिकतेपायी ते खूप निराश होत व त्यांच्या मनाला त्रास होई, हे स्पष्टपणे दिसून यायचे. पण ते नाउमेद झाले नाहीत. त्यांचा खर्ज आवाज पूर्वीप्रमाणेच वॉर्डात घुमत होता. आपल्या पूर्वीच्या उत्साहानेच ते वर्तमानपत्रे वाचत होते आणि जर्मनचा अभ्यासही त्यांनी चालू ठेवला होता. पण वाचताना हातात पुस्तके धरणे आता त्यांना जमत नव्हते. म्हणून स्तेपान इवानोविचनी पुस्तक ठेवण्यासाठी तारेचा एक स्टँड बनविला आणि कमिस्सारांच्या बिछान्यापाशी बसविला. स्तेपान इवानोविच कमिस्सारांच्या बिछान्याच्या कडेशी बसत आणि त्यांच्यासाठी पुस्तकाची पाने उलटत. सकाळच्या वेळी, वर्तमानपत्रे येण्याच्या आधी, शेवटचे निवेदन काय होते याची कमिस्सार नर्सपाशी चौकशी करीत. रेडिओवर काय बातम्या सांगितल्या, हवा कशी होती, मॉस्कोत कसली चर्चा ऐकू येते, इत्यादी चौकशा ते नर्सपाशी करीत. आपल्या बिछान्यापाशी रेडिओचे कनेक्शन बसविण्याची परवानगी त्यांनी वासिली वासिल्येविच यांच्याकडून मिळविली.

त्यांचे शरीर जेवढे अधिक दुबळे बनत होते तेवढी त्यांची वृत्ती अधिक

कणखर बनत होती, असे भासत होते. त्यांना येणारी असंख्य पत्रे अथक उत्साहाने वाचण्याचे व पत्रांना उत्तरे देण्याचे काम त्यांनी चालू ठेवले होते. कूकूश्किन आणि ग्वोझ्देव यांना ते आळीपाळीने आपले लेखनिक बनवीत. एक दिवस काही उपचार घेतल्यानंतर मेरेस्येव डुलकी काढत होता. अचानक कमिस्सारांच्या गडगडाटी खर्ज आवाजाने त्याला जाग आली.

कमिस्सारांसमोरील तारेच्या स्टँडवर डिव्हिजनच्या वर्तमानपत्राची एक प्रत पडली होती. "बरोबर नेण्यास मनाई आहे" असा शिक्का त्यावर असूनही कुणीतरी कमिस्सारना ते वर्तमानपत्र नियमितपणे पाठवीत होते.

"बचावाचा पवित्रा घेतला असताना त्यांची डोकी फिरलीत की काय?" ते गरजले. "क्रावत्सोव नोकरशहा? ग्रीशा, तावडतोब लिहून घे."

ग्वोझ्देव लेखणी सरसावून बसला व कमिस्सार त्याला तोंडी मजकूर सांगू लागले. सेनेच्या लष्करी मंडळाच्या सदस्याला खरमरीत पत्र पाठविण्यात आले. एका चांगल्या आणि उत्साही अधिकाऱ्याची निष्कारण नालस्ती करणाऱ्या पत्रकाराला आवर घालावा, असे त्या पत्रात म्हटले होते. नर्सपाशी ते पत्र पोस्टात टाकायला दिल्यानंतरही "खर्डेघाशांना" शिव्या देण्याचा त्यांचा उद्योग चालूच होता. आपल्या उशीवरून डोके वळविणेही ज्या माणसाला अवघड जात होते, त्या माणसाच्या तोंडून एवढे आवेशाचे उद्गार बाहेर पडताना पाहून एखाद्याला आश्चर्य वाटले असते.

त्या संध्याकाळी अधिक महत्त्वाचे असे काही घडले. त्या निवांत वेळी दिवे अजून पेटले नव्हते आणि खोलीच्या कोपऱ्यांमध्ये संध्याछाया दाटू लागल्या होत्या तेव्हा स्तेपान इवानोविच खिडकीपाशी बसून नदीतीराकडे टक लावून पहात होते. कॅन्व्हासचे एप्रन कमरेला बांधलेल्या काही बायका नदीवरील बर्फ फोडत होत्या. बर्फाला पडलेल्या एका काळ्या, चौकोनी भोकाच्या कडेवर त्या बायका पहारीने प्रहार करून बर्फाचे लांब तुकडे फोडत होत्या, एक-दोन दणके मारून त्या लांबट पट्ट्यांचे तुकडे करीत होत्या व नंतर होडीच्या आकड्यांच्या मदतीने त्या तुकड्यांना पाण्याबाहेर ओढून लाकडी फळ्यांवर टाकत होत्या. बर्फाचे ठोकळे एका ओळीत पडले होते. खालच्या बाजूस हिरवट आणि पारदर्शी, तर वरच्या बाजूस पिवळट आणि चुरा झालेले. नदीकिनाऱ्याला लगटून घसरगाड्यांची एक लांबच लांब माळ फिरत होती आणि किनाऱ्यावर बर्फ फोडला जात होता. कान झाकणारी टोपी घातलेला, गोधड्यांची विजार आणि तसलाच कोट चढ-

विलेला, कोटाच्या कमरपट्ट्यात कुऱ्हाड लटकावलेला एक म्हातारा घोड्यांना बर्फाच्या ठोकळ्यांपाशी नेत होता व बर्फाचे ठोकळे घसरगाड्यांमध्ये भरण्याचे काम बायका करीत होत्या.

स्तेपान इवानोविच यांच्या अनुभवी नजरेला चटकन दिसून आले की, बर्फ फोडण्याचे काम एका सामुदायिक शेताचे पथक करीत होते, पण त्या कामात योग्य संयोजन नव्हते. कामावर माणसे खूप झाली होती आणि ती एकमेकांच्या वाटेत अडथळा निर्माण करीत होती. स्तेपान इवानोविच यांच्या व्यवहारी मनात तात्काळ कामाची योजना तयार झाली. मनातल्या मनात त्यांनी त्या पथकाची तीन गटांमध्ये विभागणी केली: विनासायास बर्फाच्या ठोकळ्यांना पाण्यातून बाहेर ओढून काढण्यासाठी. मग प्रत्येक गटाला त्यांनी एक विशिष्ट भाग नेमून दिला आणि सबंध पथकाला बिदागी म्हणून एक रक्कम देण्याऐवजी, बर्फाचे ठोकळे ओढून आणण्याच्या संख्येनुसार प्रत्येक गटाला स्वतंत्रपणे मोबदला देण्याचे ठरविले. एक क्रियाशील, गोल चेहऱ्याची, गुलाबी गालांची तरुणी त्यांना त्या पथकात दिसली आणि त्यांनी मनातल्या मनात तिला सुचविले की, त्या गटांमध्ये श्रमस्पर्धेला तिने चालना द्यावी... आपल्या विचारांमध्ये ते एवढे गढून गेले की, एक घोडा त्या बर्फाच्या मोठ्या भोकाच्या कडेपाशी गेला व त्याचे मागील पाय घसरून तो पाण्यात पडला हे त्यांनी पाहिलेच नाही. घसरगाडीच्या वजनामुळे तो घोडा अजून बर्फावर राहिला होता, पण प्रवाहाचा वेग त्या घोड्याला बर्फाखाली ओढू लागला होता. कुऱ्हाडवाला म्हातारा अगतिकपणे धडपडत होता... एकदा घसरगाडीची पट्टी ओढत होता, तर एकदा घोड्याचा लगाम खेचत होता.

स्तेपान इवानोविच यांच्या तोंडून भयसूचक उद्‌गार उमटला आणि त्यांनी जोरात आरोळी ठोकली: "घोडा बुडतोय!"

कमिस्सार धडपडत आपल्या हातांच्या कोपऱ्यांवर उठले आणि खिडकीच्या चौकटीवर आपली छाती टेकवून त्यांनी बाहेर नजर टाकली. एवढी हालचाल करताना त्यांना अपार कष्ट पडले होते व वेदनेमुळे त्यांचा चेहरा पांढरा-फिका पडला होता. ते पुटपुटले: "मूर्ख लेकाचा! समजत नाही त्याला? पट्टे!... पट्टे तोड! घोडा स्वतःच बाहेर पडेल. छे: छे:! जनावराला ठार मारणार तो!"

स्तेपान इवानोविच कसेबसे खिडकीच्या चौकटीत वर चढले. घोडा बुडत होता. खळबळते पाणी एव्हाना त्याच्या अंगाला सपकारे मारू लागले

होते, पण तो घोडा बाहेर पडण्याचा निकराने यत्न करीत होता. बर्फाच्या कडेमध्ये आपले लोखंडी नाल ठोकलेले खूर रुतवू पहात होता.

"पट्टे तोडून टाक!" कमिस्सार ओरडले. जणू नदीवरच्या म्हाताऱ्याला त्यांचे शब्द ऐकू जाणार होते.

स्तेपान इवानोविच यांनी आपल्या हातांचा कर्णा बनविला व कमिस्सा-रांचा सल्ला छोटया उघडया खिडकीच्या तावदानामधून त्यांनी रस्त्या-पलिकडे ओरडून सांगितला:

"ए म्हाताऱ्या! पट्टे तोडून टाक! तुझ्या कमरपट्टयात कुऱ्हाड आहे... त्या कुऱ्हाडीनं काढण्या तोड! घाल घाव!"

म्हाताऱ्याने त्यांचे ओरडणे ऐकले. त्याला ते आकाशवाणीच भासले. त्याने कमरपट्टयातून कुऱ्हाड उपसली आणि दोन घावात काढण्या तोडल्या. जोखडामधून मुक्त झाल्याक्षणी घोडा धडपडत बर्फावर चढला आणि बर्फाच्या भोकापासून दूरवर धापा टाकीत उभा राहिला. एखाद्या कुत्र्याप्रमाणे अंग झटकून त्याने पाणी निथळून टाकले.

"याचा अर्थ काय?" याच क्षणाला एका आवाजाने पृच्छा केली.

झग्याची बटणे न लावलेले आणि डोक्यावर नेहमीची पांढरी टोपी न घातलेले वासिली वासिल्येविच दारात उभे होते. ते कमालीचे संतापले होते, पाय आपटीत होते व कोणताही खुलासा ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. वॉर्डातील माणसांची डोकी फिरली होती, त्या सर्वांना ते तिथून हाकून लावणार होते असे त्यांनी सांगितले व प्रत्यक्षात काय घडले होते त्याची चौकशीसुद्धा न करता धापा टाकीत, प्रत्येकाची खरडपट्टी काढीत ते निघून गेले. काही क्षणांनंतर क्लावदिया मिखाइलोवना वॉर्डात आली. तिचा चेहरा अश्रूंनी माखला होता व ती कमालीची अस्वस्थ दिसत होती. वासिली वासिल्येविच यांनी नुकतीच तिची कडक हजेरी घेतली होती. पण तेवढयात तिचे कमिस्सारांच्या पांढऱ्याफिक्कट, निर्जीव चेहऱ्याकडे लक्ष गेले. डोळे मिटून ते अचेतन पडले होते. ती चटकन त्यांच्यापाशी धावली.

संध्याकाळी कमिस्सारांची प्रकृती जास्त बिघडली. त्यांना कापराचे इंजेक्शन देण्यात आले. त्यांना प्राणवायू देण्यात आला. पण खूप काळपर्यंत ते बेशुद्धीत राहिले. जेव्हा ते शुद्धीवर आले तेव्हा त्यांच्या शेजारी प्राणवा-यूची पिशवी धरून उभ्या असलेल्या क्लावदिया मिखाइलोवनाकडे पाहून स्मित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

"घाबरू नको नर्स. तोंडावरच्या ठिपक्यांना घालविण्यासाठी सैतान जे काही वापरतात ते घेऊन मी तुझ्यासाठी नरकातूनसुद्धा परत येईन."

आपल्या दुर्बलतेविरुद्ध प्रखर झुंज देताना हा प्रचंड, सामर्थ्यवान पुरुष प्रतिदिनी क्षीण होत चाललेला पाहणे फार भयंकर होते.

८

उलटणाऱ्या दर दिवसागणिक मेरेस्येवसुद्धा अधिकाधिक क्षीण होत चालला होता. आपल्या मनामधील दु:ख आता तो केवळ "हवामान सार्जंट" जवळ व्यक्त करीत होता. तिला लिहिलेल्या पुढील पत्रात त्याने म्हटले होते की, बहुधा जिवंतपणी तो इस्पितळातून बाहेर पडणार नव्हता आणि एका परीने ते उत्तमच होते, कारण पायांविना वैमानिक म्हणजे पंख नसलेला पक्षीच! तो जिवंत राहून अन्न टिपू शकतो, पण कधीच उडू शकत नाही! पंखहीन पक्षी म्हणून जगण्याची त्याची इच्छा नव्हती आणि अत्यंत वाईटातल्या वाईट घटनेला – मरणाला – त्याची तयारी होती. मात्र ते लौकरात लौकर यावे एवढीच त्याची इच्छा होती. असे लिहिणे खरे म्हणजे क्रूरपणाचे होते, कारण त्यांच्या पत्रव्यवहाराच्या दरम्यान त्या मुलीने कबुली दिली होती की, आता बऱ्याच काळापासून "कॉम्रेड सीनियर लेफ्टनंट" बाबतीत ती मनाने अलिप्त नव्हती आणि त्याच्यावर ही जबरदस्त आपत्ती कोसळली नसती तर कदाचित तिने आपले गुपित कधीच उघड केले नसते.

"तिला लग्न करायचंय. पुरुषांचा भाव सध्या फार वधारलाय. एखाद्याला पाय आहेत अथवा नाहीत याची तिला मुळीच फिकीर नसणार. त्याला चांगली पेन्शन मिळते एवढंच ती पाहणार," नेहमीप्रमाणे खात्रीलायक सुरात कूकूश्किनने आपले मत व्यक्त केले.

पण डोक्यावर मृत्यू भिरभिरत होता तेव्हा आपल्या चेहऱ्याला भिडलेला तिचा फिकट चेहरा अलेक्सेईला आठवत होता आणि कूकूश्किन म्हणत होता तसे प्रत्यक्षात नव्हते याची त्याला जाणीव होती. आपले दु:खद कबुलीजबाब वाचून त्या मुलीच्या अंत:करणाला घरे पडतात हेही त्याला ठाऊक होते. "हवामान सार्जंट"चे साधे नांवदेखील त्याला माहीत नव्हते. पण तरीही आपली मनातील दु:खे तिच्यापाशी व्यक्त करण्याचे त्याने चालू ठेवले.

प्रत्येकाच्या काळजाला उघडू शकणारी किल्ली शोधण्यात कमिस्सार

यशस्वी ठरले होते. पण मेरेस्येवच्या काळजाचा कप्पा उघडणारी किल्ल त्यांना अद्याप गवसली नव्हती. ज्या दिवशी मेरेस्येववर शस्त्रक्रिया झाल त्याच दिवशी वॉर्डात अस्त्रोवस्कीची 'अग्निदिव्य' कादंबरी अवतरली. त्य पुस्तकाचे मोठ्यांदा वाचन करण्यात आले. हे वाचन आपल्यासाठी चाल होते याची अलेक्सेईला जाणीव झाली, पण त्या कहाणीने त्याच्या मनाल फुंकर बसू शकली नाही. पावेल कोर्चागिन हा त्याचा बालपणीचा एव आवडता नायक होता. "पण कोर्चागिन वैमानिक नव्हता" असा विचा आता अलेक्सेईच्या मनात उमटला. "त्याला 'आकाशाची ओढ' माहीत होती काय? देशातील सर्व स्त्री-पुरुष जेव्हा लढताहेत, लेथपर्यंत उंची पुरत नाही म्हणून खोक्यांवर उभे राहून शेंबडी पोरेसुद्धा तोफगोळे बनवीत आहेत, अशा काळात बिछान्यावर पडून अस्त्रोवस्कीने आपली पुस्तके लिहिली नव्हती!"

थोडक्यात सांगायचे तर ह्या प्रसंगी ते पुस्तक-वाचन यशस्वी ठरले नाही. तेव्हा कमिस्सारनी बगलेमधून हालचाल केली. अर्धांगवायूने पाय निकामे होऊनही एक सार्वजनिक महत्त्वाचे पद सांभाळणाऱ्या एका माणसा-विषयीची हकीकत त्यांनी सहजपणे सांगायला सुरुवात केली. जगात घड-णाऱ्या प्रत्येक गोष्टीविषयी स्तेपान इवानोविचना भलताच रस वाटायचा. त्यांनी कमिस्सारांची गोष्ट ऐकताच प्रचंड आश्चर्य व्यक्त केले आणि त्यांना आठवण झाली की, ते ज्या भागामधून आले होते तेथे केवळ एकच हात असलेला डॉक्टर होता; पण सबंध विभागात सर्वोत्तम डॉक्टर म्हणून त्याची ख्याती होती, तो घोड्यावर बसायचा, शिकारीची त्याला आवड होती आणि बंदूक इतकी सफाईदारपणे हाताळायचा, की खारीच्या डोळ्या-वरसुद्धा अचूक नेम मारायचा. तेव्हा कमिस्सारना दिवंगत अकादमीशिअन विल्यम्स यांची आठवण झाली. अकादमीशिअनांशी कमिस्सारांचा वैयक्तिक परिचय होता. विल्यम्स यांचे अर्धे शरीर अर्धांगाने लुळे पडलेले होते, त्यांना फक्त एकाच हाताचा वापर करता येई आणि तरीही शेतकी संस्थेच्या कामाचे ते संचालन करीत होते व फार मोठ्या प्रमाणावर संशोधनकार्य चालवीत होते.

मेरेस्येवने ही हकीकत ऐकून स्मित केले. पाय नसताना विचार करणे, बोलणे, लिहिणे, हुकूम देणे, लोकांना आजारमुक्त करणे आणि शिकारीला जाणेसुद्धा शक्य होते. पण तो वैमानिक होता, जन्मजात वैमानिक होता,

अगदी लहानपणापासून तो वैमानिक होता! सर्व वोल्गा प्रदेशात प्रसिद्ध असणाऱ्या मोठमोठ्या पट्ट्यांच्या कलिंगडांच्या शेताची राखण करीत असताना एके दिवशी त्याने विमानाचा आवाज ऐकला होता आणि नंतर ते छोटे रुपेरी चिलटासारखे दिसणारे विमान त्याने आकाशात उडताना पाहिले होते. सूर्यप्रकाशात त्याचे दुहेरी पंखे चकाकत होते. धुळकट स्तेप प्रदेशावर अगदी संथपणे तरंगत स्तालिनग्रादच्या दिशेने कोठेतरी ते जात होते.

त्या क्षणापासून वैमानिक बनण्याचे त्याचे स्वप्न कधीही लोपले नाही. शाळेमध्ये धडे शिकत असताना आणि नंतर कारखान्यात लेथवर काम करीत असताना, त्याचे मन ह्या स्वप्नानेच भारलेले होते. रात्रीच्या वेळी सर्वजण झोपले म्हणजे त्याच्या स्वप्नरंजनाला उधाण यायचे. अशा वेळी प्रसिद्ध वैमानिक ल्यापीदेवस्कीबरोबर तो चेल्यूस्किन मोहीम शोधून काढायचा व तिच्यातील लोकांची सुटका करायचा, वदोप्यानोव नांवाच्या दुसऱ्या प्रसिद्ध वैमानिकाबरोबर अवजड विमान उत्तर ध्रुवाच्या कठीण बर्फावर उतरवायचा आणि च्कालोवच्या संगतीने ध्रुव प्रदेशामधून अमेरिकेला जाणारा अद्याप न शोधलेला हवाई मार्ग धुंडाळून काढायचा.

कम्युनिस्ट युवक संघाने त्याला अतिपूर्वेत धाडले आणि तैगामध्ये कम्सा-मोल्स्क-ना-अमूरे (अमूर नदीकिनारीचे कम्सामोल्स्क–अनु.) नामक युव-कांची नगरी उभारण्यात त्याने हातभार लावला. पण त्या अतिदूरच्या स्थळीही त्याने आपले वैमानिक बनण्याचे स्वप्न सांगाती नेले होते. त्या नगरीच्या उभारणीत भाग घेणाऱ्या युवक-युवतींमध्ये त्याच्याचप्रमाणे विमा-नोड्डुणाचे स्वप्न पाहणारे लोक त्याला आढळले. त्या दिवसांमध्ये केवळ नकाशांवर अस्तित्वात असलेला विमान क्लब ह्या तरुण मंडळींनी त्या नगरीत स्वतःच्या हातांनी उभारला या गोष्टीवर विश्वास ठेवणे अवघड होते. पण तसे त्यांनी खरोखरीच केले. सायंकाळच्या वेळी प्रचंड उभारणी प्रकल्पाभोवती धुके दाटायचे, बांधणीकार आपापल्या बराकींमध्ये स्वतःला बंद करून घ्यायचे व बाहेर प्रचंड घोळक्यांनी गुणगुण करणाऱ्या डासांच्या आणि चिलटांच्या थव्यांना पळवून लावण्यासाठी दारांबाहेर ओलसर डहाळ्या पेटवून धूर करायचे. अशा रीतीने जेव्हा सर्व बांधणीकार दिवसभराच्या श्रमांनंतर विश्रांती घेत असत, त्या वेळी विमान क्लबाचे सदस्य अलेक्सेई-च्या नेतृत्वाखाली कामावर निघायचे. डासांना व चिलटांना दूर राखण्यासाठी ते आपल्या अंगांना रॉकेल फासायचे व कुऱ्हाडी, फावडी, टिकाव घेऊन

तैगात जायचे. तेथे झाडे पाडून, बुंधे उखडून, जमीन सपाट करून तैगामध्ये विमानाची धावपट्टी बनविण्याचे काम त्यांनी केले. निबिड अरण्यात श्रमून त्यांनी अनेक किलोमीटरचा विमानतळ बनविला.

ह्या विमानतळावरूनच अलेक्सेईने पहिले विमानोड्डाण केले होते. आपल्या बालपणीचे स्वप्न शेवटी त्याने प्रत्यक्षात उतरविले होते.

नंतर त्याने सैन्याच्या हवाई विद्यालयात अभ्यास केला होता व तो स्वतः प्रशिक्षक बनला होता. ह्या विद्यालयात तो असतानाच युद्ध पेटले होते. विद्यालयाच्या अधिकाऱ्यांना न जुमानता त्याने आपली नोकरी सोडली होती व तो सैन्यात दाखल झाला होता. त्याच्या जीवनाचे पूर्ण उद्दिष्ट, त्याच्या सर्व आवडी, त्याचे आनंद, त्याच्या भावी योजना, त्याच्या सगळ्या यशःसिद्धी हवाई जीवनाशी निगडित होत्या.

आणि तरीही ही माणसे त्याला विल्यम्स यांची गोष्ट सांगत होती.

"पण विल्यम्स वैमानिक नव्हते," अलेक्सेई म्हणाला आणि त्याने भिंतीकडे तोंड वळविले.


तरीही त्याच्या काळजाचा कप्पा "उघडण्याचे" प्रयत्न कमिस्सारनी सोडले नाही. एक दिवस अलेक्सेई आपल्या नेहमीच्या गुंगीत असताना कमिस्सारांचे शब्द त्याच्या कानांवर पडले:

"ल्योशा! हे वाच. तुझ्याबद्दल आहे."

एव्हाना ते मासिक स्तेपान इवानोविच मेरेस्येवकडे घेऊन निघाले होते. पेन्सिलीची खूण केलेला एक छोटा लेख त्यात होता. आपले नांव शोधण्यासाठी अलेक्सेईने पानावर धावती नजर फिरविली, पण त्याला ते आढळले नाही. पहिल्या महायुद्धातील रशियन वैमानिकांसंबंधी तो लेख होता. छान टोके वळविलेल्या छोट्या मिशांच्या एका तरुण लष्करी अधिकाऱ्याचा अज्ञात चेहरा त्या मासिकाच्या पानावरून अलेक्सेईकडे टक लावून पहात होता. त्याच्या टोपीवर एका बाजूला पांढरा तुरा होता.

"वाच, वाच, तो लेख तुझ्यासाठीच लिहिलाय," कमिस्सारांनी आग्रह केला.

मेरेस्येवने लेख वाचला. रशियन हवाई दलातील वैमानिक लेफ्टनंट वालेरीयन अरकाद्येविच कार्पोविच याच्यासंबंधी तो लेख होता. शत्रूच्या आघाडीवरून उड्डाण करीत असताना त्याच्या पायात जर्मन "डमडम" गोळी घुसली होती. पायाच्या चिंध्या होऊनही त्याने आपले "फार्मान" विमान शत्रूप्रदेश



ओलांडून सुरक्षितपणे स्वतःच्या तळावर परत आणले होते. त्याचा पाय कापण्यात आला, तरी त्या तरुण अधिकाऱ्याची सैन्यातच राहण्याची इच्छा होती. त्याने स्वतःच्या आरेखनांनुसार एक कृत्रिम पाय बनवून घेतला. प्रदीर्घ काळपर्यंत त्याने चिकाटीने सराव केला व युद्धाच्या अखेरीस तो सैन्यात परतला. हवाई दलाच्या विद्यालयात इन्स्पेक्टर म्हणून त्याची नेमणूक झाली होती व लेखात नमूद केल्याप्रमाणे, "आपल्या विमानातून उड्डाण करण्याचा धोका" काही वेळा त्याने पत्करला होता. त्याला अधिकाऱ्यांचे सेंट जॉर्ज क्रॉस पदक बहाल करण्यात आले होते व विमान कोसळून अपघातात ठार होईपर्यंत त्याने हवाई दलात यशस्वी सेवा बजाविली होती.

मेरेस्येवने तो लेख तीनदा वाचला. किंचित थकलेला, पणं निर्धारी चेहऱ्याचा तो सडपातळ लेफ्टनंट त्याच्याकडे पाहून किंचित ताणलेले, पण उमदे स्मित करीत होता. दरम्यान सबंध वॉर्ड अलेक्सेईकडे रोखून पहात होता. त्याने आपल्या केसांमधून बोटे फिरविली. मासिकावर आपली नजर तशीच ठेवून त्याने बिछान्याशेजारील कपाटातील पेन्सिल चाचपून घेतली व लेखाभोवती ठळक रेघा मारून एक चौकोन आखला.

"वाचलास?" धूर्त नजरेने पहात कमिस्सारनी विचारले. अलेक्सेई गप्प राहिला. त्याची नजर अजूनही लेखातील ओळींवरून फिरत होती. "मग, काय म्हणणं आहे तुझं?"

"त्यानं एकच पाय गमावला होता."

"पण तू सोविएत वैमानिक आहेस!"

"तो 'फार्मान' उडवत होता. ते काही खास विमान नव्हतं. असंच सटरफटर बनावटीचं. उडवायला अगदी सोपं. तंत्राची किंवा वेगाची गरज नव्हती."

"पण तू सोविएत वैमानिक आहेस!" कमिस्सार पुन्हा आग्रहाने म्हणाले.

"सोविएत वैमानिक," यांत्रिकपणे अलेक्सेईने ते शब्द परत उच्चारले. अजूनही त्याची नजर लेखावर खिळलेली होती. मग अंतर्यामीच्या प्रकाशाने त्याचा चेहरा उजळला. त्याने आपल्या जोडीच्या प्रत्येक पेशंटकडे आळीपाळीने नजर टाकली. त्याच्या डोळयांमध्ये आनंद आणि आश्चर्य काठोकाठ भरले होते.

त्या रात्री अलेक्सेई ते मासिक आपल्या उशीखाली घालून झोपला.

त्याला आठवण झाली की, लहानपणीसुद्धा, फळीवर आपल्या भावांबरोबर बिछान्यात शिरताना, याच पद्धतीने तो आपले मळकट चिंध्यांचे अस्वल आपल्या उशीखाली दडवून झोपत असे. एका जुन्या मखमली जाकीटापासून त्याच्या आईने ते अस्वल खास त्याच्यासाठी बनविलेले होते. ही आठवण येताच तो मोठ्यांदा हसला.

त्या रात्री त्याला अजीबात झोप लागली नाही. सारा वॉर्ड गाढ निद्रेत गुरफटला होता. ग्वोझ्देव आपल्या बिछान्यात जोरात कुशींवर वळत होता, तेव्हा त्याच्या गादीच्या स्प्रिंगा करकरत होत्या. स्तेपान इवानोविच घोरत होते तेव्हा त्यांच्या नाकामधून शिटी वाजत होती. जणू त्यांची आतील फुफ्फुसे बाहेर फुटून येऊ पहात होती. कमिस्सार अधूनमधून कूस पालटत होते व त्यांच्या दाबल्या दातांमधून हलकासा कण्हण्याचा आवाज उमटत होता. पण अलेक्सेईला यांपैकी एकही आवाज ऐकू येत नव्हता. काही वेळाच्या अंतराने तो आपल्या उशीखालून मासिक बाहेर ओढून काढत होता आणि रात्रीच्या दिव्याच्या उजेडात लेफ्टनंटच्या हसऱ्या चेहऱ्याकडे टक लावून पहात होता. "तुला खूप कठीण गेलं, पण त्यातून वाट काढणं तुला जमलं," अलेक्सेईच्या मनात विचार आला. "माझं काम दहापट कठीण आहे, पण पाहशील की मीसुद्धा वाट काढीन!"

मध्यरात्री कमिस्सार अचानक निःचेष्ट पडले. अलेक्सेई आपल्या हातांच्या कोपरांवर उंचावला आणि त्याने कमिस्सारांचा फिकट व शांत चेहरा पाहिला. जणू ते श्वासोच्छ्वास करीतच नव्हते. अलेक्सेईने पटकन घंटी वाजविली. क्लावदिया मिखाइलोवना धावतच वॉर्डात आली. तिच्या डोक्यावर रुमाल नव्हता, तिचे डोळे झोपाळलेले होते आणि तिची वेणी पाठीवर लोंबत होती. काही क्षणांनंतर हाऊस सर्जनना बोलाविण्यात आले. त्यांनी कमिस्सारांची नाडी तपासली, त्यांना कापराचे इंजेक्शन दिले आणि प्राणवायूची पिशवी त्यांच्या तोंडाला लावली. सुमारे एक तासभर हाऊस सर्जन आणि नर्स पेशंटभोवती खटपट करीत होते, पण काही उपयोग होत नव्हता. सरतेशेवटी कमिस्सारनी डोळे उघडले. क्लावदिया मिखाइलोवनाकडे पाहून अगदी पुसट, क्षीण स्मित करीत ते हळूच म्हणाले:

"काही कारण नसताना मी हा त्रास दिला त्याबद्दल माफ कर. मी नरकापर्यंत पोचलो नाही, त्यामुळं तुझ्या ठिपक्यांसाठी औषध आणायचं

राहून गेलं. तेव्हा त्या ठिपक्यांना सहन करणं तुला भाग आहे. काही इलाज नाही त्याला!"

त्यांच्या ह्या थट्टेमुळे प्रत्येकाने सुटकेचा निःश्वास टाकला. तो माणूस एखाद्या भक्कम ओक वृक्षासारखा होता आणि असे एखादे वादळ कदाचित तो सहन करू शकला असता. हाऊस सर्जन वॉर्डमधून निघून गेले. त्यांच्या बुटांचा आवाज हळू हळू विरत गेला. वॉर्डातील बायाही निघून गेल्या. फक्त क्लावदिया मिखाइलोवना तेथे राहिली. ती कमिस्सारांच्या बिछान्याच्या कडेशी बसून होती. पेशंट परत निद्राधीन झाले. एकटा मेरेस्येव नुसते डोळे मिटून पडला होता. आपल्या विमानाच्या पायंड्यांना पट्ट्यांच्या साहाय्याने का होईना, पण कृत्रिम पाय कसे जोडता येतील याचा तो विचार करीत होता. विमान क्लबातील शिक्षकाचे बोलणे त्याला आठवले. यादवी युद्धात लढणाऱ्या एका वैमानिकाचे पाय आखूड होते, तेव्हा त्याच्या विमानाच्या पायंड्यांना लाकडाचे छोटे ठोकळे जोडण्यात आले होते, अशी हकीकत शिक्षकाने सांगितली होती.

"मित्रा, मी तुझ्याइतकाच चांगला होईन," छायाचित्रातील कार्पोविचला तो आश्वासन देत होता. "मी उड्डाण करीन" हे शब्द त्याच्या मनात आनंदाने घुमत होते आणि त्याची झोप पळवून लावत होते. डोळे मिटून तो स्वस्थ पडून होता. त्याच्याकडे पाहणाऱ्याला वाटले असते की, तो गाढ झोपेत होता व झोपेतच हसत होता.

तेथे पडल्या पडल्या त्याने जे संभाषण ऐकले ते पुढे अनेक कठीण क्षणी त्याला आठवले होते.

"तुम्ही असं कशाला वागता? एवढ्या वेदना होत असताना हसणं आणि विनोद करणं भयंकर आहे असं मला वाटतं. तुम्ही ज्या यातनांमधून जात आहात त्यांचा नुसता विचार केला तरी माझं काळीज गोठतं. वेगळ्या स्वतंत्र वॉर्डात तुम्ही का जात नाही?"

प्रेमळ, सुंदर आणि बाह्यतः निर्विकार भासणारी नर्स क्लावदिया मिखाइलोवना हे बोलत नव्हती, तर एक निष्ठावंत स्त्री गाऱ्हाणे मांडत होती. तिच्या आवाजातून दुःखाची आणि आणखी कसलीतरी भावना व्यक्त होत होती. मेरेस्येवने डोळे उघडले. रात्रीच्या दिव्यावर रुमाल टाकून त्याचा प्रकाश आणखी मंद केलेला होता. पण त्या अतिमंद प्रकाशामध्येही त्याने कमिस्सारांचा फिकट, सुजलेला चेहरा पाहिला. उशीच्या पार्श्वभूमीवर

कमिस्सारांचे प्रेमळ, चकाकते डोळे व नर्सचा तिरपा चेहरा त्याने पाहिला. तिच्या डोक्याच्या मागे पडणाऱ्या प्रकाशामुळे तिच्या मऊ, सोनेरी केसांभोवती एक वलय निर्माण झाले होते. आपण असे पाहणे योग्य नव्हे याची मेरेस्येवला जाणीव होती, तरीही त्याची नजर तिच्यापासून दूर ढळत नव्हती.

"ए छोटद्या नर्सबाई, तू रडायचं नाही हं! आम्ही तुला थोडं ब्रोमाईड देऊ का?" जणू एखाद्या लहान मुलीशी बोलावे तसे कमिस्सार तिच्याशी बोलत होते.

"बघा! परत थट्टा सुरू केलीत! काय भयंकर माणूस आहात! एखाद्यानं रडणं आवश्यक असताना हसणं, स्वतःचं अंग वेदनांनी विंधून निघत असताना दुसऱ्यांचं सांत्वन करणं, हे अगदी राक्षसी आहे. माझ्या लाडक्या भल्या माणसा, असं पुन्हा वागू नकोस! ऐकलंस का?"

तिने मान खाली घातली व मूकपणे ती रडत राहिली. तिच्या कृश, पांढरा झगा घातलेल्या थरथरत्या खांद्यांकडे कमिस्सार विषण्ण, प्रेमळ नजरेने पहात राहिले.

"लाडके, आता खूप खूप उशीर झालाय," ते म्हणाले. "माझ्या खाजगी बाबींमध्ये आयुष्यात मला नेहमीच अक्षम्य उशीर झालाय. इतर उद्योगांमध्येच मी सदैव अडकून राहिलो. आणि आता तर मला एकूणच उशीर झालाय असं वाटतं."

कमिस्सारनी सुस्कारा टाकला. नर्सने डोके वर उचलले आणि अश्रुभरल्या डोळ्यांनी त्यांच्याकडे अधीर अपेक्षेने पाहिले. त्यांनी स्मित केले, परत एकदा सुस्कारा सोडला व आपल्या नेहमीच्या किंचित विनोदी पद्धतीने ते पुढे बोलू लागले:

"ऐक माझ्या हुषार छोटद्या पोरी! ही गोष्ट मला नुकतीच आठवली. खूप खूप काळापूर्वी, यादवी युद्धात, तुर्कस्तानात ही गोष्ट घडली. हो! बस्माचींच्या* पाठलागात घोडदळाचं एक स्क्वाड्रन एवढं दौडत राहिलं की, वैराण वाळवंटात दूर गेल्याचं कुणाच्या ध्यानातच आलं नाही. ते वाळवंट एवढं ओसाड होतं की, घोडे एकामागून एक पटापट मरू लागले. ते रशियन घोडे होते आणि वाळवंटाची त्यांना सवय नव्हती. त्यामुळं आमच्या घोडदळाचं पायदळात रूपांतर झालं. सर्व सामानसुमान टाकून द्यायचं आणि

---

*बस्माची – मध्य आशियातील प्रतिक्रांतिकारक. – अनु.

बरोबर फक्त शस्त्रं घेऊन सर्वांत जवळचं मोठं शहर गाठायचं, असं स्क्वाड्रन कमांडरनी ठरवलं. ते शहर एकशे साठ किलोमीटर दूर होतं आणि आम्हाला उघड्या वाळवंटाला पायी तुडवत जायचं होतं. छोटुकल्या पोरी, ह्या परिस्थितीची तू कल्पना करू शकतेस? आम्ही तीन दिवस सतत चालत होतो. सूर्य भाजत होता. आमच्यापाशी पाण्याचा टिपूस नव्हता. तोंड एवढी सुकली होती की कातडीला तडे पडले. वातावरणात वाळूच वाळू भरलेली. आमच्या पायांखाली वाळू रगडली जात होती, दातांमध्ये वाळू चरचरत होती, डोळ्यांमध्ये वाळू खुपत होती, घशांमध्ये वाळू उडून जात होती. मी तुला सांगतो, ते सारं फार फार भयंकर होतं. जर एखादा माणूस अडखळून पडला तर तो तोंडावर पालथा पडायचा आणि परत उठून उभं राहणं त्याला अशक्य ठरायचं. आमच्यात एक कमिस्सार होता—याकोव पावलोविच वोलोदिन नांवाचा. त्याच्याकडं नजर टाकली की, थुलथुलीत अंगाचा बुद्धिजीवी माणूस आहे असं पटकन समजायचं. तो इतिहासकार होता. पण कट्टर बोल्शेविक. सर्वांत प्रथम तो खाली कोसळेल असं एखाद्याला वाटलं असतं, पण तो चालत राहिला. एवढंच नव्हे तर इतरांना उत्तेजन देत राहिला. 'आता फारसं अंतर राहिलं नाही. लौकरच आपण तिथं पोहोचू,' असं वारंवार सांगत होता. कुणी खाली आडवा झाला तर तो त्याच्यावर सरळ पिस्तूल रोखून म्हणायचा: 'ऊठ, नाही तर मी गोळी झाडीन!'

"चौथ्या दिवशी आम्ही शहरापासून फक्त सुमारे पंधरा किलोमीटर अंतरावर होतो. पण माणसं संपूर्ण थकून गेलीं होती. जणू झिंगल्याप्रमाणं धडपडत आम्ही चालत होतो आणि एखाद्या जखमी जनावराप्रमाणं आमचे नागमोडी ठसे वाळूवर माघारी उमटले होते. अचानक कमिस्सारनी गाणं म्हणायला सुरुवात केली. त्याचा आवाज कमालीचा बारीक होता आणि त्यानं सुरू केलेलं गाणंही फालतू होतं. जुन्या सेनेत ते गात असत. पण आम्ही सर्वांनी सूर मिसळला आणि ते गाणं म्हटलं. मी हुकूम दिला: 'रांगेत चला!' आणि माणसं तालात पावलं टाकत चालू लागली. तुझा विश्वास बसणार नाही, पण वाटचाल सोपी बनली.

"ह्या गाण्यानंतर आम्ही आणखी एक गाणं गायलो. मग तिसरं गाणं म्हटलं. छोट्या पोरी, ह्या प्रसंगाची तू कल्पना करू शकतेस? आम्ही कोरड पडलेल्या, तडकलेल्या तोंडांनी गाणी म्हणत होतो. डोक्यावर ऊन

रणरणत होतं! आम्हाला माहीत असलेली सगळी गाणी आम्ही गायलो आणि सरतेशेवटी आम्ही शहरात पोचलो! वाळवंटात एकाही माणसाला मागं न सोडता... काय वाटतं तुला?"

"त्या कमिस्सारचं काय झालं?"

"त्याचं काय व्हायचंय? तो छान जिवंत आहे. पुराणवस्तुशास्त्राचा प्राध्यापक आहे. इतिहासपूर्व काळातल्या वस्त्या खणून काढतो. मात्र त्या वाटचालीत त्याला आपल्या आवाजाचं मोल द्यावं लागलं एवढं खरं! आता तो घोगऱ्या, दबत्या आवाजात बोलतो. पण त्याला आवाजाची गरजच काय?.. बरं, आज रात्री आणखी गोष्टी नाही सांगणार. जा बाळे, अस्सल घोडदळ सैनिक या नात्यानं मी तुला वचन देतो की, आज रात्री पुन्हा काही मी मरणार नाही."

सरतेशेवटी मेरेस्येवला गाढ झोप लागली. त्याला एका विचित्र वाळवंटाचे स्वप्न पडत होते. तडकलेली, खताळलेली तोंडे गाण्याचे सूर गात होती आणि कमिस्सार वोलोदिन स्वप्नात काही कारणाने कमिस्सार वोरोब्योव यांच्यासारखा दिसत होता.

तो खूप उशीरा जागा झाला. सूर्याची किरणे एव्हाना वॉर्डाच्या मध्यभागी खेळत होती. याचा अर्थ एव्हाना दुपार झाली होती. अलेक्सेई झोपेतून जागा झाला तेव्हा त्याच्या अंतःकरणात आनंदी भावना होती. स्वप्न? कसले स्वप्न? झोपेत हातात गच्च धरून ठेवलेल्या मासिकाकडे त्याचे लक्ष गेले. चुरगळलेल्या पानावरून लेफ्टनंट कार्पोविच अजूनही ते ताणलेले, उमदे स्मित करीत होता. मेरेस्येवने काळजीपूर्वक मासिक सरळ केले व लेफ्टनंटच्या छायाचित्राकडे पाहून डोळा मारला.

कमिस्सार एव्हाना साफसूफ होऊन बसले होते आणि सस्मित चेहऱ्याने अलेक्सेईकडे पहात होते.

"ए, त्याला डोळा कशाला मारतोस?" खुषीच्या स्वरात त्यांनी विचारले.

"मी उड्डाण करणार!" अलेक्सेई उत्तरला.

"कसं? त्याचा फक्त एक पाय गेला होता. पण तुझे दोन्ही पाय गेलेत!"

"पण मी सोविएत आहे, रशियन!" अलेक्सेईने प्रतिसाद दिला.

हे शब्द त्याने अशा थाटात उच्चारले होते की, लेफ्टनंट कार्पोविचपेक्षा

अधिक गुण मिळवून तो विमान चालविणार, याची हमी त्यांच्यामधून सूचित झाली होती.

वॉर्डमधील बाईने आणून दिलेले जेवणाचे सर्व पदार्थ त्याने खाल्ले. आपल्या रिकाम्या बशीकडे त्याने आश्चर्याने पाहिले होते व पुन्हा पदार्थ मागून घेतले होते. त्याला एक वेगळीच हुरहूर जाणवत होती. तो गात होता, त्याने शीळ घालण्याचा प्रयत्न केला आणि स्वतःशीच मोठ्या आवाजात तो वाद घालत होता. प्राध्यापक जेव्हा नेहमीच्या फेरीवर आले तेव्हा त्यांच्या खास आपुलकीचा अलेक्सेईने फायदा घेतला व आपली प्रकृती लौकर सुधारण्यासाठी काय करावे याबाबत त्याने त्यांच्यावर अनेक प्रश्नांची सरबत्ती केली. त्याने जास्त खाल्ले पाहिजे आणि जास्त झोप घेतली पाहिजे, असे प्राध्यापक म्हणाले. त्यानंतर, जेवणाच्या वेळी अलेक्सेईने मुख्य पदार्थ दोनदा मागितला व चार कटलेटना बळेच मटकावले. जेवणानंतर तो झोपू शकला नाही, तरीही दीड तास नुसते डोळे मिटून पडला.

सुख माणसाला अहंकारी, आत्मकेंद्री बनविते. अलेक्सेई जेव्हा प्राध्यापकांवर प्रश्नांचा भडिमार करीत होता तेव्हा वॉर्डातील इतरांच्या ध्यानात जी गोष्ट आली होती ती त्याच्या लक्षात मात्र आली नव्हती. वासिली वासिल्येविच नेहमीप्रमाणे अगदी ठरल्या वेळी आले होते. उन्हाचा कवडसा वॉर्डाची फरशी सावकाशपणे ओलांडून जेव्हा तक्तपोशीचा तुकडा उखडून पडलेल्या जागी स्पर्श करी, त्या क्षणाला बरोब्बर वासिली वासिल्येविच यांचे वॉर्डात आगमन होत असे. प्राध्यापक नेहमीप्रमाणे दक्ष होते, पण आज ते काहीसे विमनस्क दिसत होते. वॉर्डातील लोकांनी आजवर कधी त्यांना असे हरवलेल्या मनःस्थितीत पाहिले नव्हते. आज प्राध्यापक नेहमीप्रमाणे ओरडले-खेकसले नाही. त्यांच्या लालसर डोळयांच्या कडांजवळील शिरा सतत थाडथाड उडत होत्या. संध्याकाळच्या फेरीच्या वेळी तर ते एकदम वाळलेले आणि खूप म्हातारे झाल्यासारखे दिसले. दाराच्या मुठीवर साफ करण्याचे फडके विसरल्याबद्दल वॉर्डातील बाईला त्यांनी खालच्या आवाजात समज दिली, कमिस्सारांच्या तापाची नोंद पाहिली, त्यांना काही औषध सांगितले व मूकपणे ते बाहेर निघून गेले. त्यांच्या बरोबरीचा लवाजमाही तसाच गप्प आणि अस्वस्थ दिसत होता. दारात उंबरठ्यापाशी प्राध्यापक अडखळले आणि वेळीच कुणी त्यांना आधार दिला नसता तर ते नक्की पडले असते. ह्या उंच, धिप्पाड, घोगऱ्या आवाजाच्या, बुलंद

शिस्तीच्या माणसाने एवढे गप्प आणि लीन वागणे अगदी चमत्कारिक दिसत होते. वॉर्ड बेचाळीसमधील माणसे त्यांच्याकडे चकित डोळ्यांनी पहात होती. ह्या धिप्पाड, प्रेमळ मनाच्या माणसावर ते सर्वजण प्रेम करू लागले होते आणि त्याच्यातील हा बदल त्यांना बेचैन करून गेला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांना कारण समजले. वासिली वासिल्येविच यांचा एकुलता एक पुत्र, ज्याचे नांवसुद्धा वासिली वासिल्येविच असेच होते, पश्चिम आघाडीवर ठार झाला होता. तोसुद्धा वैद्यकीय क्षेत्रात काम करणारा होता, एक शास्त्रज्ञ म्हणून त्याने फार मोठ्या अपेक्षा निर्माण केल्या होत्या, आपल्या वडिलांचा तो अभिमानाचा आणि आनंदाचा विषय होता. नेहमीच्या ठराविक वेळेला आज प्राध्यापक इस्पितळाच्या फेरीला येतील अथवा नाही, याची सारे इस्पितळ श्वास रोधून वाट पहात होते. वॉर्ड बेचाळीसमधील प्रत्येकजण उन्हाच्या कवडशाची मंद गती निरखून पहात होता. सरतेशेवटी कवडशाने तुटलेल्या तक्तपोशीच्या जागी स्पर्श केला आणि सर्वांनी एकमेकांकडे कटाक्ष टाकले. जणू त्यांना म्हणायचे होते की, वासिली वासिल्येविच आज येत नाहीत. पण त्याच क्षणाला परिचित अवजड चाल आणि सोबतीची अनेक पावले, यांचा आवाज कॉरिडॉरमधून ऐकू आला. प्राध्यापक आज कालच्यापेक्षा जरा जास्त बरे दिसत होते. मात्र त्यांचे डोळे लालभडक दिसत होते; त्यांच्या पापण्या व त्यांचे नाक यांना खूप सर्दी झाली म्हणजे येते तशी सूज आली होती. कमिस्सारांच्या तापाच्या नोंदीचा तक्ता त्यांनी टेबलावरून उचलला तेव्हा त्यांचा गुबगुबीत, सालटी निघालेला हात मात्र चांगलाच थरथर कापत असलेला सर्वांना दिसला. पण ते नेहमीप्रमाणे जोमाने व चटपट काम करीत होते. मात्र त्यांचा आडदांडपणा आणि खटचाळपणा लोपला होता.

जणू काही सामायिक करार केल्याप्रमाणे, जखमी आणि आजारी रुग्णांनी त्या दिवशी वासिली वासिल्येविच यांना हरतऱ्हेने खूष ठेवण्यासाठी एकमेकांशी स्पर्धा केली. प्रत्येकाने त्यांना खात्रीपूर्वक सांगितले की, तब्येतीत आराम पडला होता. अगदी गंभीर आजारी लोकांनीही तक्रारी केल्या नाही व आपण बरे होण्याच्या वाटेवर आहोत असा भास निर्माण केला. इस्पित-ळातील व्यवस्थेची प्रत्येकाने तोंड फाटेपर्यंत स्तुती केली आणि वेगवेगळ्या उपचारांच्या अद्भुत गुणांची ग्वाही दिली. एका फार मोठ्या आणि सामा-यिक दुःखाने एकत्र आलेले ते मित्रकुटुंब होते.

त्या सकाळी एवढ्या अफाट यशगाथा आपल्याला का भेटत होत्या याबद्दल वॉर्डांमधून जात असताना वासिली वासिल्येविच मनाशी नवल करीत होते.

पण खरोखरीच त्यांना आश्चर्य वाटले होते? कदाचित हा भाबडा, मूक कट त्यांना समजला होता. आणि जर त्यांना तो समजला होता, तर त्यांना झालेली भयानक, कधीही भरून न येणारी जखम सहन करणे त्यामुळे कदाचित थोडे सोपे झाले होते.

९

पूर्वेकडील खिडकीबाहेरच्या चिनाराच्या फांदीला एव्हाना छोटी, फिकट पिवळी, चिकट पाने फुटली होती. त्या पानांच्या खाली तांबडी, गोंडेदार वाळुंजीची फुले लोंबत होती. ही फुले लठ्ठ सुरवंटांसारखी भासत होती. सकाळच्या वेळी पाने उन्हात चमकायची. जणू तेलकट कागदापासून ती बनविली होती असे वाटायचे. त्यांचा उग्र, खारट ताजा वास सुटायचा. वॉर्डाच्या खिडकीच्या छोट्या, उघड्या तावदानामधून हा वास आत घुसायचा व वॉर्डातील इस्पितळी वासावर मात करायचा.

स्तेपान इवानोविच यांच्या औदार्यामुळे गुबगुबीत बनलेल्या चिमण्यांच्या उद्धटपणाला तर आता सीमाच राहिली नव्हती. "सवमशिनगनवाल्याला" वसंताच्या उत्सवानिमित्त नवी शेपूट फुटली होती व तो पूर्वीपेक्षा अधिक दांडगट बनला होता. सकाळच्या वेळी खिडकीच्या चौकटीत पक्षी एवढा प्रचंड कलकलाट करायचे की, वॉर्ड स्वच्छ करणाऱ्या बाईचा संयम सुटायचा. रागाने पुटपुटत ती खिडकीच्या चौकटीत चढायची आणि उघड्या तावदानामधून हात बाहेर घालून फडक्याने त्या पक्ष्यांना उडवून लावायची.

मस्क्वा नदीवरचे बर्फ नाहीसे झाले होते. थोड्याशा खळबळाटी काळानंतर नदी शांत झाली होती. तिने परत एकदा स्वतःला किनाऱ्यांच्या मर्यादेत सामावून घेतले होते. जहाजांसाठी, मालवाहू पडावांसाठी आणि नदीतील ट्रामगाड्यांसाठी आपली प्रचंड पाठ तिने आज्ञाधारकपणे देऊ केली होती. त्या अवघड दिवसांमध्ये, राजधानीमधील मोटार वाहतूक विस्कळीत झाल्यामुळे, ह्या नदीतील ट्रामगाड्या खूप उपयुक्त ठरत होत्या. वासंतिक पुरामध्ये बेचाळीस नंबरच्या वॉर्डातील कुणीतरी "वाहून जाणार" अशी

कूकूश्किनची निराश भविष्यवाणी खोटी ठरली होती. कमिस्सार सोडून प्रत्येकाची प्रकृती सुधारत होती आणि इस्पितळातून मुक्तता केव्हा घडणार या विषयाभोवतीच वॉर्डमधील संभाषण मुख्यतः फिरत होते.

सर्वप्रथम स्तेपान इवानोविच यांनी वॉर्ड सोडले. त्यांच्या मुक्तीच्या आदल्या दिवशी ते सबंध इस्पितळभर फिरत होते. आनंद, चिंता, हुरहूर अशा संमिश्र भावनांचा कल्लोळ त्यांच्या मनात उसळला होता. क्षणभरही स्वस्थ बसणे त्यांना अशक्य झाले होते. कॉरीडॉरमधील पेशंटांशी गप्पा मारून ते वॉर्डात परत येत, खिडकीपाशी बसत, पावापासून काहीतरी वस्तू बनवू पहात, मग एकदम उडी मारून उठत आणि परत वॉर्डाबाहेर जात. अखेरीस जेव्हा संध्याकाळ झाली, संध्या-प्रकाश जेव्हा पसरला, तेव्हा मात्र ते खिडकीच्या चौकटीत चढून बसले. खोल विचारात ते गढून गेले. अधून-मधून उसासे सोडू लागले, घसा खाकरू लागले. ह्या वेळेला पेशंट आपापले विविध उपचार घेत असत. वॉर्डात फक्त आणखी दोन पेशंट होते: स्तेपान इवानोविचना शांतपणे निरखून पाहणारे कमिस्सार आणि झोपण्याचा आटो-काट प्रयत्न करणारा मेरेस्येव.

शांततेचे साम्राज्य नांदत होते. अचानक कमिस्सारनी आपले डोके स्तेपान इवानोविच यांच्या दिशेने वळविले. मावळत्या सूर्याच्या शेवटच्या किरणांच्या उजेडात स्तेपान इवानोविच यांच्या तिरप्या चेहऱ्याच्या बाह्य रेषा ठळक दिसत होत्या. कमिस्सार जेमतेम ऐकू जाईल अशा आवाजात म्हणाले:

"आत्ता खेड्यात संधिप्रकाश पसरला असणार. अगदी शांत, शांत असेल सगळं. बर्फ वितळणाऱ्या जमिनीचा, दमट शेणाचा आणि जळक्या लाकडांच्या धुराचा वास सुटला असणार. गाय गोठ्यात वैरणीच्या बिछान्यावर खूर आपटतेय... ती बेचैन झालीय, ती व्यायचा काळ झालाय. वसंताचा मोसम... शेतांमध्ये शेण पसरणं बायकांना जमलं असेल की नाही कुणास ठाऊक! बियाण्याचं आणि नांगराचं काय? सगळं काही ठीक झालं असेल असं वाटतं?"

स्मित करणाऱ्या कमिस्सारांकडे स्तेपान इवानोविचनी आश्चर्यापेक्षा काहीशा भयाने पाहिले असे मेरेस्येवला भासले. स्तेपान इवानोविच कमिस्सार-ना म्हणाले:

"लोकांच्या मनात चाललेले विचार असे ओळखून काढणारे तुम्ही

जादूगार आहात कॉम्रेड रेजिमेंट कमिस्सार... खरं आहे, बायका खूप व्यवहारी आहेत. पण तसं असलं तरी आमच्याविना त्या कसा काय कारभार चालवत असतील कोण जाणे! .."

पुन्हा शांतता पसरली. नदीवरील जहाजाने आपला भोंगा वाजविला. त्याचा प्रतिध्वनी पाण्यावरून मजेने गडगडत गेला व ग्रॅनाईटच्या तीरांदरम्यान उमटला.

"युद्ध लौकरच संपेल असं वाटतं तुम्हाला? पीककापणीच्या आधी संपेल?" स्तेपान इवानोविचनी उगाचच दबत्या आवाजात विचारले.

कमिस्सार उत्तरले: "तुम्ही कशाची चिंता करता आहात? तुमच्या वयाच्या माणसांना बोलावत नाहीत. तुम्ही स्वयंसेवक आहात. लढाईचा आपला हिस्सा तुम्ही पूर्ण केलात. जर अर्ज केलात तर तुमची सैन्यातून मुक्ती होईल आणि मग बायकांचं नेतृत्व तुम्हाला पत्करता येईल. पिछाडीलासुद्धा व्यवहारी पुरुषांची गरज आहे, खरं की नाही? ए पांढरी दाढीवाल्या, काय म्हणणं आहे तुझं?"

हे शब्द बोलत असताना कमिस्सारनी त्या म्हाताऱ्या सैनिकाकडे अशा काही प्रेमळपणाने पाहिले, की स्तेपान इवानोविच यांनी उत्साहाने खिडकीच्या चौकटीतून खाली उडी मारली.

"सैन्यातून मुक्त होऊ म्हणता?" ते उद्‌गारले. "मीसुद्धा हाच विचार करतोय. स्वतःशीच मी म्हणत होतो: कमिशनपुढं अर्ज केला तर काय होईल. तसा मी तीन युद्धांमधून गेलोय: साम्राज्यवादी युद्ध, यादवी युद्ध आणि हे थोडंसं. मला वाटतं, एवढं पुरे झालं! कसं? कॉम्रेड रेजिमेंट कमिस्सार, तुमचा काय सल्ला आहे?"

"तुमच्या अर्जात असं म्हणा की, पिछाडीला बायकांना जाऊन मिळायचंय म्हणून तुम्हाला सैन्यातून मुक्ती हवीय! असं म्हणा की, जर्मनांपासून तुमचं रक्षण करायला दुसरे आहेत," स्वतःवर ताबा ठेवणे अशक्य झालेला मेरेस्येव आपल्या बिछान्यामधूनच ओरडला.

स्तेपान इवानोविच यांनी त्याच्याकडे अपराधी दृष्टीने पाहिले. कमिस्सारनी रागाने भुवया वाकड्या करीत म्हटले:

"तुम्हाला काय सल्ला द्यावा ते मला समजत नाही स्तेपान इवानोविच. तुमच्या अंतःकरणालाच हा प्रश्न टाका. तुमचं काळीज रशियन आहे. तुम्हाला जरूर तो सल्ला तेच देईल."

दुसऱ्या दिवशी स्तेपान इवानोविच यांची इस्पितळामधून मुक्तता झाली. निरोप घेण्यासाठी आपल्या वॉर्डात ते लष्करी गणवेषात आले. त्यांची उंची फारशी नव्हती. धुवून धुवून त्यांचा जुना सदरा पांढुरका बनला होता. त्यांनी कमरेला पट्टा घट्ट आवळला होता व सदरा मागील बाजूस एवढा खेचला होता, की पुढील बाजूस सदऱ्यावर एकही चुणी नव्हती. या गण-वेषात ते स्वतःच्या वयापेक्षा किमान पंधरा वर्षांनी तरुण भासत होते. छातीवर 'सोविएत संघाचा वीर' ह्या किताबाचा सोनेरी तारा लटकावला होता. त्याला त्यांनी घासूनपुसून चकचकीत केले होते. शिवाय लेनिन किताब आणि 'पराक्रम' पदक छातीवर झळकत होते. इस्पितळाचा गाऊन त्यांनी आपल्या खांद्यांवर केपप्रमाणे पांघरला होता. त्यांच्या गुडघ्यांपर्यंतच्या जुन्या लष्करी बुटांपासून ते आकडे वळविलेल्या मिशांपर्यंत त्यांचा एकूण थाट पहिल्या महायुद्धात नाताळच्या भेटकार्डांवर रेखाटण्यात येणाऱ्या वीर रशियन सैनिकासारखा होता.

वॉर्डातील आपल्या प्रत्येक सहकाऱ्यासमोर निरोप घेण्यासाठी हा मुरब्बी सैनिक ताठ पवित्र्यात उभा राहिला, प्रत्येकाचा लष्करी हुद्दा बोलून त्याने खाडकन टाचा जुळवून मानवंदना दिली. त्यांचा तो रुबाव पहायला प्रसन्न वाटत होते.

"कॉम्रेड रेजिमेंट कमिस्सार, निरोप घ्यायला आलोय," शेवटच्या खाटेपाशी ते पोहोचले तेव्हा विशेष प्रेमळ आवाजात त्यांनी मानवंदना दिली.

"अच्छा स्त्योपा. तुझा प्रवास सुरक्षित आणि सुखाचा होवो!" कमिस्सार म्हणाले आणि झालेल्या वेदनेला सहन करून त्या जुन्या सैनिकाकडे वळले.

स्तेपान इवानोविच चटकन गुडघ्यांवर खाली बसले, कमिस्सारांचे प्रचंड डोके त्यांनी आपल्या हाती घेतले व रशियन रीतीनुसार त्यांनी एकमेकांचे तीनदा चुंबन घेतले.

"बरे व्हा सेम्योन वासिल्येविच. देव तुम्हाला आरोग्य आणि दीर्घायुष्य देवो. तुमचं काळीज सोन्याचं आहे. आम्हाला तुम्ही वडलांपेक्षा अधिक आहात. जिवंत असेतो मी तुमची आठवण ठेवीन," भावनावश होऊन स्तेपान इवानोविच पुटपुटले.

"जा आता, जा स्तेपान इवानोविच! त्यांनी उत्तेजित होणं चांगलं नाही," सैनिकाच्या बाहीला ओढत क्लावदिया मिखाइलोवना म्हणाली.

"नर्सबाई, तुमच्या प्रेमळपणाबद्दल आणि तुम्ही घेतलेल्या काळजीबद्दल

तुमचा फार फार ऋणाईत आहे," अत्यंत गंभीर स्वरात नर्सला उद्देशून स्तेपान इवानोविच म्हणाले व तिला त्यांनी आदरपूर्वक लवून नमस्कार केला. "तुम्ही खरंच सोविएत देवदूत आहात!"

आता मात्र पुढे काय बोलावे ते न उमजून त्यांचा खूप गोंधळ उडाला व ते दाराशी माघारी गेले.

"कुठल्या पत्त्यावर आम्ही तुम्हाला पत्र पाठवायचं? सैबेरियाच्या?" स्मित करीत कमिस्सारनी विचारले.

"कशाला विचारता कॉम्रेड रेजिमेंट कमिस्सार? सैन्यात सेवा बजावणाऱ्या सैनिकाला कुठं पत्र पाठवायचं ते तुम्हाला माहीत आहे," शरमून स्तेपान इवानोविच उत्तरले आणि यावेळी प्रत्येकाला उद्देशून त्यांनी लवून कुर्निसात केला व दारामागे ते नाहीसे झाले.

त्यानंतर स्तब्धता पसरली आणि वॉर्ड रिकामा रिकामा भासू लागला. मग आपापल्या रेजिमेंटांसंबंधी, साथीदारांसंबंधी आणि आघाडीवर त्यांची वाट पाहणाऱ्या मोटचा मोहीमांसंबंधी त्यांचे संभाषण सुरू झाले. आता सर्वांची प्रकृती सुधारत चालली होती. त्यामुळे ही केवळ स्वप्ने न राहता व्यावहारिक वस्तुस्थिती बनली होती. कूकूश्किन एव्हाना कॉरीडॉरपर्यंत चालू शकत होता. तेथे तो परिचारकांच्या कामामधील उणीवा दाखवीत बसायचा, आजारातून बऱ्या होणाऱ्या इतर रुग्णांना चिडवायचा. त्यांच्यापैकी बऱ्याच जणांशी त्याचे भांडणही व्हायचे. रणगाडाचालकही आता बिछान्यावरून उठून हिंडू-फिरू लागला होता. अनेकदा तो कॉरीडॉरमधील आरशासमोर उभा रहायचा व बँडेज सोडलेल्या आणि जखमा बऱ्या होणाऱ्या आपल्या चेहऱ्याला, मानेला, खांद्यांना निरखायचा. आन्यूताबरोबरचा त्याचा पत्रव्यवहार जेवढा अधिक वाढला, जेवढी तिच्या विद्यापीठीय जीवनाशी त्याची अधिक ओळख झाली, तेवढा आपल्या भाजलेल्या आणि विद्रूप बनलेल्या चेहऱ्याचे तो अधिक चिकित्सकपणे आरशात निरीक्षण करू लागला. संधिप्रकाशात अथवा मंद उजेडाच्या वॉर्डात त्याचा चेहरा तेवढा वाईट दिसत नसे. उलट तो चांगलाच दिसायचा. त्याचे कपाळ उंच होते, नाक अपरे आणि किंचित बाकदार होते; इस्पितळात आल्यानंतर त्याने बारीक काळी मिशी राखली होती. त्याचे ओठ ताजे टवटवीत, निग्रही होते. पण झगझगीत प्रकाशात मात्र त्याच्या चेहऱ्यावरील जखमांचे वण दिसायचे, त्या वणांभोवतालची त्वचा ताणलेली दिसायची.

जेव्हा तो उत्तेजित व्हायचा किंवा स्नानोपचारांनंतर लालबुंद होऊन यायचा, तेव्हा मात्र ह्या जखमांच्या वणांमुळे त्याचा चेहरा हिडीस दिसायचा. अशा क्षणी आरशासमोर स्वतःचा चेहरा पाहताना त्याला अक्षरशः रडू कोसळायचे. त्याचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करीत मेरेस्येव म्हणायचा :

"एवढा उदास कशाला होतोस? तू काही सिनेमात नट बनायला जाणार नाहीस! तुझ्या त्या पोरीचं खरंच तुझ्यावर प्रेम असेल, तर तुझ्या चेहऱ्याबद्दल तिला फारसं काही वाटणार नाही. आणि तसं तिला वाटत असेल तर ती मूर्ख आहे. अशा परिस्थितीत तिची पर्वा करण्याचं तुला मुळीच कारण नाही. उलट चांगला मोकळा होशील तिच्या तावडीतून आणि दुसरी चांगली पोरगी शोधून काढशील."

"सगळ्या बायका सारख्याच," कूकूश्किन मध्येच म्हणाला.

"तुमची आईसुद्धा?" कमिस्सारनी विचारले. त्या वॉर्डात फक्त कूकूश्किनशी औपचारिक संबोधनाने ते बोलत.

ह्या शांत प्रश्नाने कूकूश्किनवर जो परिणाम घडला त्याचे वर्णन करणे कठीण आहे. तो आपल्या बिछान्यात ताडदिशी उठून बसला. त्याचे डोळे संतापाने आग ओकत होते आणि त्याचा चेहरा चादरीपेक्षा पांढराफटक बनत चालला होता.

"आत्ता कसं? म्हणजे जगात काही चांगल्या बायकाही असतात हे तुम्हाला पटलं तर," समझोत्याच्या स्वरात कमिस्सार म्हणाले. "ग्रीशा सुदैवी ठरणार नाही असं का वाटतं तुम्हाला? शोधणाऱ्याला आयुष्यात नेहमीच गवसतं!"

थोडक्यात म्हणजे संपूर्ण वॉर्डात चेतना निर्माण झाली होती. फक्त कमिस्सारांची प्रकृती मात्र सतत ढासळत चालली होती. मॉर्फिन आणि कापूर यांच्या साह्याने त्यांना जिवंत ठेवलेले होते. परिणामी, काही वेळा सबंध दिवसच्या दिवस औषधांच्या अर्धवट गुंगीत ते बिछान्यात तळमळत पडत. स्तेपान इवानोविच यांच्या प्रयाणानंतर ते अधिक वेगाने खंगू लागले. कमिस्सारना जरूर तेव्हा मदत करता यावी ह्या हेतूने मेरेस्येवने आपली कॉट त्यांच्या कॉटच्या नजीक ओढून घेण्याची विनंती केली होती.

ह्या माणसाकडे तो अधिकाधिक ओढला जात होता.

पायांविना आपले जीवन इतर लोकांपेक्षा अधिक खडतर आणि अधिक गुंतागुंतीचे होणार याची अलेक्सेईला जाणीव होती. त्यामुळे ज्या माणसाला

अस्सल जीवन कसे जगायचे ते माहीत होते आणि अधू अवस्थेतही इतर लोकांना जो माणूस चुंबकाप्रमाणे आकर्षित करून घेत होता, त्याच्याकडे अलेक्सेई स्वाभाविकपणे ओढला गेला. आपल्या अर्धवट बेशुद्धीच्या अवस्थेतून कमिस्सार आता क्वचितच बाहेर पडत. पण जेव्हा ते पूर्ण शुद्धीवर असत तेव्हा नेहमीप्रमाणेच वागत.

एके दिवशी संध्याकाळी उशीराची वेळ. इस्पितळातील गडबड विरली होती. खालच्या स्वरांमधील घोरण्याचे, कण्हण्याचे आणि भ्रमात उच्चारलेल्या अस्पष्ट शब्दांचे आवाजच काय ते शांतता भंगत होते. अशा वेळी परिचित अवजड पावलांचे आवाज कॉरीडॉरमधून ऐकू आले. दाराच्या काचेच्या तावदानांमधून मेरेस्येवला मंद प्रकाशित कॉरीडॉर पूर्णपणे दिसत होते. कॉरीडॉरच्या अगदी दुसऱ्या टोकाला, टेबलापाशी बसून अखंडपणे झम्पर विणणारी नर्स तो पाहू शकत होता. कॉरीडॉरच्या टोकाला वासिली वासिल्येविच यांची उंच आकृती उगवली. हात पाठीशी धरून मंदपणे ते चालत होते. नर्स दचकून पटकन उभी राहिली, पण तिरस्काराने हात हलवून त्यांनी तिला गप्प बसविले. त्यांच्या झग्याची बटणे सुटलेली होती, त्यांच्या डोक्यावर टोपी नव्हती व त्यांच्या दाट, पांढऱ्या केसांपैकी काही केस त्यांच्या कपाळावर भुवयांपर्यंत लोंबत होते.

"वास्या येतोय," मेरेस्येव हळूच कमिस्सारना म्हणाला. एका खास प्रकारच्या कृत्रिम पायाचा नवा आराखडा तो कमिस्सारना समजावून सांगत होता.

कसल्यातरी अडथळ्यावर आपटावे त्याप्रमाणे वासिली वासिल्येविच एकदम थबकले. आधारासाठी त्यांनी भिंतीला धरले, तोंडातल्या तोंडात ते काहीतरी पुटपुटले, मग भिंतीपासून दूर झाले व बेचाळीस नंबरच्या वॉर्डात त्यांनी प्रवेश केला. खोलीच्या मध्यभागी उभे राहून ते आपले कपाळ चोळू लागले. जणू काहीतरी आठवण्याचा त्यांचा प्रयत्न चालला होता. त्यांच्या श्वासाला मद्याचा वास येत होता.

"वासिली वासिल्येविच, बसा क्षणभर. संध्याकाळच्या थोड्या शिळोप्याच्या गप्पा मारू," कमिस्सार म्हणाले.

पाय फरफटत प्राध्यापक खाटेकडे चालत गेले. कमिस्सारांच्या बिछान्याच्या कडेशी ते एवढ्या धप्पदिशी बसले, की स्प्रिंगा करकरल्या. आपले कपाळ चोळीत ते बसून राहिले. पूर्वी, आपली फेरी मारताना ते

कमिस्सारांच्या खाटेपाशी थोडे थांवत असत आणि युद्धातील घडामोडीं-विषयी किंचित बोलत असत. इतर पेशंटांपेक्षा कमिस्सारांशी ते वेगळे वागत होते हे स्पष्ट होते. त्यामुळे अशा उशीरा संध्याकाळी कमिस्सारांना ते भेटायला आले यात विशेष असे काहीच नव्हते. पण ह्या दोघा पुरुषांना काहीतरी खाजगी बोलायचे होते असे आत्ता मेरेस्येवला जाणवले, म्हणून त्याने आपले डोळे मिटून घेतले आणि झोपल्याचे सोंग केले.

"आज २९ एप्रिल, त्याचा वाढदिवस. तो छत्तीस वर्षांचा झाला... नव्हे, झाला असता!" हलक्या आवाजात प्राध्यापक म्हणाले.

कमिस्सारनी अत्यंत कष्टाने पांघरुणाखालून आपला मोठा, सुजलेला हात बाहेर काढला व वासिली वासिल्येविच यांच्या हातावर ठेवला. एक अतर्क्य गोष्ट घडली: प्राध्यापकांना रडू फुटले. हा प्रचंड, भक्कम माणूस रडताना पाहणे पीडादायी होते. अलेक्सेईने अनिच्छेने पोक काढले व तोंडावर पांघरुण घेतले.

"युद्ध आघाडीवर जाण्यापूर्वी मला भेटायला तो आला होता," प्राध्यापक पुढे बोलू लागले. "स्वयंसेवक पथकात दाखल झाल्याचं त्यानं मला सांगितलं आणि त्याच्या कामाच्या जागी दुसऱ्या कुणाची तरी नेमणूक करा असं म्हणाला. इथं तो माझ्याबरोबरच काम करत होता. मला त्याच्या बोलण्याचं एवढं आश्चर्य वाटलं, की त्याच्या अंगावर मी खेकसलोच. वैद्यक शास्त्रातल्या कॅंडिडेटनं, एका गुणी शास्त्रज्ञानं हाती रायफल का घ्यावी, हेच मला समजेना. पण तो म्हणाला – प्रत्येक शब्द मला आठवतोय – तो म्हणाला: 'पपा, अशा काही वेळा असतात की वैद्यकशास्त्रातल्या कॅंडिडेटनं, हाती रायफल घेतलीच पाहिजे.' तो असं म्हणाला आणि त्यानं मला पुन्हा विचारलं: 'माझं इथलं काम कोण पत्करतंय?' मी फक्त एक फोन करायचा अवकाश – आणि पुढं काही काही झालं नसतं! समजलं? एका लष्करी इस्पितळातल्या एका विभागाचा तो प्रमुख होता. बरोबर आहे की नाही माझं?"

वासिली वासिल्येविच बोलायचे थांबले. त्यांच्या जोरजोराने होणाऱ्या श्वासाची घरघर ऐकू येत होती. मग ते पुढे बोलू लागले:

"पोरा, असं करू नको. हात दूर कर. हालचाल करणं किती अवघड जातंय तुला हे मला ठाऊक आहे. तर मी सबंध रात्रभर विचार करत



बसून राहिलो. माझ्या ओळखीचा आणखी एक माणूस होता—कोण ते जाणलंच असेल—त्याचा मुलगा लष्करात अधिकारी होता. युद्धाच्या पहिल्याच दिवशी तो ठार झाला. त्या बापानं काय केलं ठाऊक आहे? त्यानं दुसऱ्या मुलाला युद्धावर पाठवलं... लढाऊ वैमानिक म्हणून... युद्धातला सर्वांत धोक्याचा पेशा... मला त्या माणसाची तेव्हा आठवण झाली, माझ्या विचारांची मला लाज वाटली आणि मी फोन केला नाही..."

"त्याचा आत्ता खेद वाटतोय?"

"नाही. ह्याला खेद म्हणता? मी स्वतःला प्रश्न विचारतोय: माझ्या एकुलत्या एक मुलाचा मी खुनी आहे का? आत्ता तो इथं माझ्याबरोबर असता आणि आम्ही दोघेही आपल्या देशासाठी अत्यंत उपयुक्त काम करत राहिलो असतो. त्याच्या अंगी अस्सल गुण होते: जोम, धाडस, बुद्धिमत्ता. सोविएत वैद्यकाचा तो अभिमानविषय बनला असता! जर त्या वेळी मी फोन केला असता..."

"तुम्ही फोन केला नाही याचा खेद वाटतो?"

"काय म्हणायचंय? हं हं... मला माहीत नाही. खरंच मला ठाऊक नाही."

"समजा, हे आत्ता घडलं, तर तुम्ही वेगळं वागाल?"

शांतता पसरली. रुग्णांच्या नियमित श्वसनाचे आवाज ऐकू येत होते. बिछान्याची तालबद्ध करकर ऐकू येत होती. गाढ विचारात मग्न झालेले प्राध्यापक मागे-पुढे डुलत होते हे स्पष्ट होते. खोलीत ऊब निर्माण करणाऱ्या गरम नळांमध्ये कडकड आवाज होत होता.

"काय विचारलं मी?" सहानुभूती आणि समजूतदारपणा यांनी काठोकाठ भरलेल्या आवाजात कमिस्सारनी विचारले.

"मला माहीत नाही... तुमच्या प्रश्नाला माझ्यापाशी तयार उत्तर नाही. मला ठाऊक नाही. पण मला वाटतं की, जर त्या सर्व गोष्टी पुन्हा घडल्या, तर मी परत तसाच वागीन. इतर बापांपेक्षा मी वेगळा नाही... युद्ध ही किती भयानक गोष्ट आहे..."

"आणि माझ्यावर विश्वास ठेवा, वाईट बातमी सहन करणं तुम्हाला जेवढं अवघड आहे तेवढंच इतर बापांनाही अवघड जातं. तेवढंच कठीण जातं!"

वासिली वासिल्येविच खूप वेळपर्यंत गप्प बसून राहिले. त्या मंदपणे

पुढे सरकणाऱ्या क्षणांमध्ये ते कसला विचार करीत होते? त्यांच्या भव्य, सुरकुत्या पडलेल्या कपाळामागे कोणते विचार चालले होते?

"बरोबर आहे तुमचं," सरतेशेवटी ते म्हणाले. "त्यालाही ते सोपं नव्हतं, तरी त्यानं आपल्या दुसऱ्या मुलाला पाठवलं... मित्रा, मी तुझा आभारी आहे. खरंच, त्याबद्दल काहीच करता येण्यासारखं नाही."

बिछान्यावरून ते उठले, कमिस्सारांचा हात हळूच त्यांनी पांघरुणाखाली ठेवला, त्यांच्या अंगाभोवती पांघरुण व्यवस्थित गुंडाळले व खोलीतून ते मुकाट बाहेर गेले. त्या रात्री कमिस्सार यांचा आजार एकदम उलटला. बेशुद्धावस्थेत ते बिछान्यात तळमळत होते, कराकरा दात खात होते, मोठमोठ्याने कण्हत होते. मग एकदम ते गप्प होत आणि त्यांचे शरीर ताठ पसरे. त्यांची अखेर आली होती असे प्रत्येकाला वाटले. वासिली वासिल्येविच आपल्या मुलाच्या मृत्यूनंतर मोठे घर सोडून इस्पितळातच छोट्या खोलीत रहायला आले होते. त्यांनी हुकूम केला की, कमिस्सारांच्या बिछान्याभोवती आडोसा उभा करावा. पेशंटला "वॉर्ड नंबर पन्नास" मध्ये नेण्याची शक्यता होती याचे ते चिन्ह होते.

कापूर आणि प्राणवायू यांच्या मदतीने त्यांनी कमिस्सारांची नाडी पूर्ववत आणली. मगच रात्रीच्या उरलेल्या वेळात थोडी झोप घेण्यासाठी रात्रीचे सर्जन आणि वासिली वासिल्येविच वॉर्ड नंबर बेचाळीसमधून बाहेर पडले. क्लावदिया मिखाइलोवना मात्र अश्रुमाखल्या चिंतायुक्त मुद्रेने आडोशाआड कमिस्सारांपाशी बसून होती. मेरेस्येवला झोप लागेना. भयाने तो विचार करीत पडला होता: "खरंच ही अखेर आहे?" कमिस्सार अजूनही खूप यातनांमध्ये होते. ते भ्रमात होते आणि एकच शब्द ते वारंवार उच्चारत असल्याचे मेरेस्येवला भासत होते:... "द्या... द्या मला..."

कमिस्सारना पाणी पाहिजे असेल अशा समजुतीने क्लावदिया मिखाइलोवना आडोशाबाहेर आली आणि कापऱ्या हातांनी तिने चंबूतील पाणी पेल्यात ओतले.

पण पेशंटला पाणी नको होते. कमिस्सारांच्या दातांशी ग्लास कडकड वाजला व पाणी उशीवर सांडले. पण अजूनही ते तो शब्द उच्चारीत होते. कधी आज्ञार्थी तर कधी विनंतीवजा उच्चारल्या जाणाऱ्या त्या शब्दाचा पहिला भाग नीटसा समजत नव्हता. अचानक मेरेस्येवला त्याचा उलगडा झाला. कमिस्सार म्हणत होते: "...जगू द्या मला..." त्या प्रचंड माणसाच्या देहाचा प्रत्येक कण मृत्यूला दूर सारण्यासाठी झगडत होता.

थोड्या वेळानंतर कमिस्सार शांत झाले आणि त्यांनी आपले डोळे उघडले.

"परमेश्वराची कृपा झाली!" सुटकेचा निःश्वास टाकीत क्लावदिया मिखाइलोवना उद्गारली व तिने आडोशाचा पडदा गुंडाळायला आरंभ केला.

"असूं दे तसाच!" कमिस्सार म्हणाले. "लाडक्या नर्सबाई, त्या पड्याला दूर नेऊ नको. तसं जास्त आरामशीर वाटतं. आणि रडू नकोस... ह्या पृथ्वीवर आधीच खूप दुःख भरलंय... माझ्या सोविएत देवदूता, रडतेस कशाला?... खरंच, तुझ्यासारखे देवदूत आम्हाला त्या ठिकाणाच्या उंबरठ्यावर भेटतात हे केवढं दुर्दैव..."

१०

पूर्वी कधीही अनुभवले नव्हते असे काहीतरी अलेक्सेई अनुभवीत होता.

पायांशिवाय विमान उडवायला शिकणे शक्य होते आणि आपण पुन्हा वैमानिक बनू शकू ह्यावर विश्वास ठेवायला आरंभ केल्याच्या क्षणापासून त्याला विलक्षण जीवनासक्ती निर्माण झाली होती.

आता जीवनात त्याच्यासमोर ध्येय होते. लढाऊ विमान उडविण्याचे. आणि पार्तीझानांपर्यंत रांगत जाताना ज्या मनस्वी निग्रहाने तो वागला होता त्याच मनस्वी निग्रहाने आता तो ह्या नव्या ध्येयाचा पाठपुरावा करू लागला. लहानपणापासूनच त्याला पुढचे पहायची सवय असल्याने, बहुमोल वेळ वाया न घालविता आपले उद्दिष्ट गाठण्यासाठी आपण नेमके काय केले पाहिजे, हे त्याने स्वतःच ठरविले. तेव्हा त्याने सर्वप्रथम आपली प्रकृती लौकर सुधारण्याचा निर्णय घेतला. त्याची उपासमार झाली होती तेव्हा त्याचा जो शक्तीपात झाला होता तो भरून काढण्यासाठी अधिक खाण्याचे व अधिक झोपण्याचे त्याने ठरविले. दुसरे म्हणजे वैमानिकाच्या लढाऊ गुणांना परत आत्मसात करणे आवश्यक होते. त्यासाठी, अंथरुणाला खिळलेला माणूस जे व्यायाम करून शारीरिकदृष्ट्या बळकट बनू शकेल असे व्यायाम करण्याचे त्याने ठरविले. तिसरा सर्वांत महत्त्वाचा आणि अवघड भाग म्हणजे त्याचे जे काही पाय उरले होते त्यांची ताकद व त्यांचा चपळपणा राखण्यासाठी त्याने पायांना सराव ठेवणे आवश्यक होते. आणि कृत्रिम पाय मिळाल्यानंतर त्यांच्या साह्याने विमान उडवायला तो शिकणार होता.

पाय नसलेल्या माणसाला चालणेसुद्धा सोपे नसते. पण मेरेस्येवने विमान चालविण्याचा निर्धार केला होता आणि तेसुद्धा लढाऊ विमान. हवाई झुंजी-मध्ये प्रत्येक गोष्टीचा क्षणा-कणाने हिशोब केला जात असतो व स्वाभाविक प्रतिक्रियेइतक्याच हालचाली एकमेकींशी सुसंगतपणे घडाव्या लागतात. त्यासाठी हातांनी जेवढ्या अचूकपणे, कुशलपणे आणि वेगाने कार्ये घडतात तेवढ्याच अचूकपणे, कुशलपणे व वेगाने पायांकडून कार्ये घडणेही आवश्यक असते. त्याच्या थोटया पायांना जोडलेले लाकडाचे आणि कातड्याचे तुकडे ही कार्ये त्याच्या शरीराच्या सजीव अवयवांप्रमाणे करू शकतील अशा मर्यादेपर्यंत त्याने स्वतःला प्रशिक्षित करणे जरूर होते.

विमानोड्डाणाच्या तंत्राशी परिचित असलेली व्यक्ती ही अशक्य कोटीतील बाब मानील; पण आता अलेक्सेईची खात्री पटली होती की, हे शक्य होते आणि हे शक्य असल्यामुळे तो हमखासपणे त्याला साध्य करणार होता. म्हणून त्याने आपली योजना अंमलात आणायला आरंभ केला. त्याला नेमून दिलेले सर्व उपचार आणि सांगितलेली सर्व औषधे तो कमालीच्या नियमितपणे घेऊ लागला. आपल्या ह्या नियमितपणाचे त्याचे त्यालासुद्धा आश्चर्य वाटले. तो खूप खात असे आणि विशेष भूक नसतानाही नेहमी पुन्हा मागून खात असे. कोणतीही परिस्थिती असो, पण विशिष्ट तासपर्यंत झोपण्याची त्याने स्वतःवर सक्ती करून घेतली. एवढेच नव्हे तर वामकुक्षीचीही त्याने सवय लावून घेतली. वस्तुतः त्याच्या क्रियाशील आणि चळवळ्या स्वभावाला ही वामकुक्षी सुसंगत नव्हती.

खाणे, झोपणे आणि औषधे घेणे ह्यांची स्वतःला सवय लावून घेणे त्याला फारसे ज़ड गेले नाही. पण व्यायाम ही वेगळी बाब होती. पूर्वी नियमितपणे तो जे नेहमीचे व्यायाम करीत असे ते आता पाय नसलेल्या, अंथरुणाला खिळलेल्या माणसाला योग्य नव्हते. म्हणून त्याने व्यायामांचा नवा प्रकार शोधून काढला. आपले हात कमरेवर धरून शरीराला मागे-पुढे वाकविण्याचा, उजवी-डावीकडे झुकविण्याचा व्यायाम तो तासन्तास करू लागला. आपल्या मानेच्या हालचालीसुद्धा तो एवढ्या जोराने आणि उत्साहाने करायचा, की त्याच्या पाठीच्या मणक्याची हाडे कडाकडा वाजायची. त्याचे वॉर्डातील सहनिवासी त्याच्या ह्या व्यायामांची गंमतीने थट्टा करीत. कूकूश्किनने त्याचे उपहासपूर्वक अभिनंदन केले व झ्नामेन्स्की बंधू, लादोमेग आणि इतर प्रसिद्ध शर्यतपटूंच्या नांवाने त्याला संबोधले.

कूकूश्किनला ह्या व्यायामांचा तिटकारा होता. इस्पितळामधील आणखी एक खूळ, असे त्याचे व्यायामांसंबंधी मत बनले होते. अलेक्सेईने आपले व्यायाम सुरू केले की, तात्काळ तो कुरकुरत, धुसफुसत कॉरीडॉरची वाट धरायचा.

अलेक्सेईच्या पायांवरची बँडेजे जेव्हा सोडण्यात आली आणि बिछान्यात अधिक मोकळ्या हालचाली करणे जेव्हा त्याला शक्य झाले, तेव्हा त्याने व्यायामाच्या प्रकारांमध्ये नवी भर घातली. खाटेच्या पायथ्याशी असलेल्या गजांमध्ये तो आपले थोटे पाय सरकवायचा, कमरेवर आपले हात ठेवायचा व सावकाशपणे पुढच्या बाजूला शरीर झुकविता येईल तेवढे झुकवायचा आणि नंतर तसेच मागे वाकवायचा. दररोज त्याने झुकण्याचा वेग कमी करीत नेला आणि "नमस्कारांची" संख्या वाढविली. आपल्या पायांसाठी त्याने अनेक व्यायाम शोधून काढले. आपल्या पाठीवर तो उताणा पडे आणि प्रत्येक पाय आळीपाळीने छातीपर्यंत गुडघा आणून वाकवे व परत सरळ करी. हा व्यायाम त्याने जेव्हा प्रथम केला तेव्हा आपल्यापुढे किती प्रचंड आणि कदाचित अलंघ्य अडचणी उभ्या होत्या याची त्याला जाणीव झाली. नडगीपर्यंत कापलेले पाय ताठ करताना त्याला तीव्र वेदना व्हायची. हालचाली अनियमित आणि बिचकत घडायच्या. तुटलेला पंखा आणि तुटलेले शेपूट घेऊन विमान चालविणे जेवढे अवघड होते, तेवढ्याच त्या हालचाली अवघड होत्या. मानवी शरीराच्या नेहमीच्या अचूक हालचाली आपल्या शरीराकडून आता घडणे शक्य नव्हते, याची अलेक्सेईला जाणीव झाली. जरी त्याचे शरीर भक्कम आणि निरोगी होते तरी लहानपणापासून सराव केलेल्या अवयवांच्या हालचाली पुन्हा तेवढ्या सुसंवादीपणाने आता कधीच घडणे शक्य नव्हते.

पायांचे व्यायाम करताना अलेक्सेईला तीव्र वेदना होत, पण तरीही दररोज तो आदल्या दिवसापेक्षा एक मिनिट अधिक वेळपर्यंत व्यायाम करी. असे काही भयानक क्षण येत की, इच्छा नसतानाही त्याच्या डोळ्यांमध्ये आसवे भरून येत. आपल्या तोंडून विव्हळण्याचा आवाज बाहेर पडू नये म्हणून तो आपले ओठ एवढे गच्च आवळून धरी, की त्यांच्यामधून रक्त ठिपकू लागे. पण तरीही त्याने ह्या व्यायामांची बळजबरीने स्वतःला सवय लावली. प्रथम दिवसातून एक वेळ तो व्यायाम करायचा. नंतर दोन वेळा व्यायाम करू लागला. व्यायामाचा एक टप्पा संपला की अगतिकपणे तो उशीवर पडायचा. ते व्यायाम आपण पुन्हा करू शकू अथवा नाही याबद्दल त्याला शंका वाटायची.

पण व्यायामाची वेळ झाली म्हणजे तो परत कामाला लागायचा. संध्याकाळी तो आपल्या मांड्यांचे आणि पोटऱ्यांचे स्नायू चाचपून पहायचा. व्यायामाच्या आरंभी त्याच्या हाताला जसे थुलथुलीत मांस आणि चरबी जाणवले होते तसे आता जाणवत नाहीत, उलट पूर्वीप्रमाणे त्याचे स्नायू बळकट झाले होते, या गोष्टीची त्याने मनाशी समाधानपूर्वक नोंद घेतली होती.

मेरेस्येवचे सर्व विचार त्याच्या पायांनी व्यापून टाकले होते. काहीवेळा तो खोल विचारांमध्ये गढलेला असायचा, अचानक त्याच्या पायांमध्ये कळ यायची, आपल्या पायांची जागा तो बदलायचा व तेव्हा त्याला आठवण व्हायची की, आता त्याची पावले नव्हती. कुठल्याशा मज्जातंतूच्या विरुद्ध काहीतरी घडल्यामुळे प्रदीर्घ काळपर्यंत, कापलेली पावले अद्याप शरीरा-बरोबर रहात होती. अचानक त्यांना खाज सुटे, दमट हवेत ठणका बसत आणि काही वेळा तर असह्य वेदना सुरू होत. आपल्या पायांशी त्याचे मन एवढे गुंतले होते की, काहीवेळा झोपेत तो स्वतःला जलद हालचाली करताना पहायचा. त्याला स्वप्न पडायचे की, "धोक्याचा इशारा" वाजला होता, आपल्या विमानाकडे तो धावला, पंख्यावर त्याने झेप घेतली, कॉकपिटमध्ये तो चढला आणि यूरा इंजिनावरचे आवरण दूर करीत होता तोवर त्याने आपल्या पायांनी पावंडे चाचपून पाहिले होते. दुसऱ्या एका वेळी त्याला स्वप्न पडले की, तो आणि ओल्गा एकमेकांच्या हातात हात घालून फुलांनी बहरलेल्या स्तेपमधून अनवाणी धावत होते, उबदार आणि ओलसर जमिनी-च्या सुखद स्पर्शाचा आनंद लुटत होते. किती छान होते! पण जागे होणे आणि आपल्याला पाय नाहीत असे आढळणे किती दुःखद होते!

अशा स्वप्नांनंतर काही वेळा अलेक्सेई खिन्न व्हायचा. आपण आपल्या देहाचा निष्कारण छळ करीत आहोत, आपण पुन्हा कधीही विमान उडवू शकणार नाही, असे विचार त्याच्या मनात येऊ लागत. कामीशिनमधील त्या सुरेख मुलीशी जेवढा अधिक काळ त्याचा विरह घडत होता, तेवढी ती त्याला अधिक प्रिय आणि अधिक हवीहवीशी वाटत होती. पण तिच्या-बरोबर स्तेपमध्ये अनवाणी धावणे आता कधीही शक्य होणार नाही, हा विचार त्याला उदास करायचा.

ओल्गाबरोबरचे त्याचे नाते त्याला मुळीच आनंद देत नव्हते. जवळ जवळ दर आठवड्याला क्लावदिया मिखाइलोवना त्याला "नाच" करायला

भाग पाडायची. म्हणजे परिचित गोल, नेटक्या, शाळकरी मुलीच्या हस्ताक्षरात पत्ता लिहिलेले पत्र मिळविण्यासाठी त्याला बिछान्यात शरीराला झटके द्यावे लागत आणि हातांनी टाळ्या वाजवून दाखवाव्या लागत. ही पत्रे अधिकाधिक लांब आणि प्रिय होत चालली होती. जणू युद्धाने खंड पाडलेले ह्या तरुण मुलीचे प्रेम अधिकाधिक परिपक्व बनत चालले होते. त्या पत्रांमधील ओळी तो आतुरतेने आणि चिंतेने वाचायचा, कारण त्यांना प्रतिसाद देण्याचा आपल्याला हक्क नाही ह्याची त्याला जाणीव होती.

लाकूड गिरणीच्या प्रशिक्षण शाळेत शिकत असताना ती दोघे रोमांचक भावनांनी भारलेली होती. मोठ्यांची नक्कल करण्याच्या नादात त्या भावनांनाच ती प्रेम समजत होती. नंतर त्या दोघांची सहा-सात वर्षे ताटातूट झाली होती. प्रथम ओल्गा तंत्रविद्यालयात शिकायला गेली. लाकूड गिरणीत ती मेकॅनिक बनून परतली, तोवर अलेक्सेई गाव सोडून गेला होता आणि हवाई विद्यालयात शिकत होता. युद्ध सुरू होण्याच्या जरा आधी त्यांची परत भेट झाली होती. त्या भेटीसाठी दोघांपैकी कुणीच मुद्दाम प्रयत्न केला नव्हता. किंवहुना ती दोघे एकमेकांना कदाचित विसरूनही गेली होती. त्यांच्या ताटातूटीनंतर पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले होते. एके दिवशी संध्याकाळी अलेक्सेई आपल्या आईबरोबर कुठेतरी रस्त्यावरून चालला होता आणि एक मुलगी त्यांच्या समोरून गेली. त्याने त्या मुलीकडे विशेष लक्ष दिले नाही, पण तिचे घाटदार पाय मात्र त्याच्या लक्षात राहिले.

"त्या मुलीला तू ओळख का दाखवली नाहीस? ती ओल्या होती!" त्याच्या आईने त्या मुलीच्या आडनांवाचा उल्लेख केला व त्याच्या वर्तनाबद्दल तिने नापसंती व्यक्त केली.

अलेक्सेईने मागे वळून पाहिले. ती मुलगीही मागे पाहण्यासाठी वळली होती. त्यांची नजरभेट झाली आणि अलेक्सेईला काळजाचा ठोका चुकल्यासारखे भासले. आपल्या आईला सोडून तो त्या मुलीच्या दिशेने धावला. एका पर्णहीन चिनाराच्या खाली ती मुलगी थांबली होती.

"तू?" तो आश्चर्याने उद्गारला. त्याने तिच्याकडे अशा काही नजरेने पाहिले, जणू दूरदेशाहून आलेली ती दुर्मीळ आणि सुंदर व्यक्ती होती व ह्या निवांत, चिखलभरल्या रस्त्यावर अशा वासंतिक सायंकाळी अचानक ती अवतरली होती.

"आल्योशा ?" ती मुलगीही तशाच चकित आणि अविश्वासाच्या स्वरात उद्‌गारली.

सहा-सात वर्षांच्या वियोगानंतर ती दोघे प्रथमच एकमेकांना पहात होती. डौलदार आणि सडसडीत बांध्याची, सुंदर, गोल, पोरसवदा चेहऱ्याची व नाकाच्या शेंड्यावर काही सोनेरी ठिपके असलेली तरुणी अलेक्सेई समोर पहात होता. आपल्या टपोऱ्या, राखी, चमकत्या डोळ्यांनी ती त्याच्याकडे पहात होती. किंचित कोरलेल्या आणि टोकाला काहीशा झुपकेदार असलेल्या तिच्या भुवयांची थोडी कमान झाली होती. प्रशिक्षण विद्यालयात शेवटच्या वेळी त्यांची भेट झाली होती तेव्हाची आपल्या वडिलांच्या मेणचट जाकीटात बाह्या वर गुंडाळून ऐटीत फिरणारी दणकट, गोल चेहऱ्याची, गुलाबी गालांची, काहीशी धसमुसळी ओल्गा व आत्ताची कमनीय तरुणी यांच्यात फारच कमी साम्य राहिले होते.

अलेक्सेई आपल्या आईला विसरला आणि ह्या तरुणीचे कौतुकाने निरीक्षण करीत उभा राहिला. त्याला जणू भासले की ह्या सगळ्या वर्षांमध्ये तो तिला कधीही विसरला नव्हता, आणि ह्या भेटीची जणू उत्कंठेने वाट पहात होता.

"म्हणजे आता तू अशी आहेस तर!" सरतेशेवटी तो म्हणाला.

"अशी म्हणजे कशी ?" तिने किणकिणणाऱ्या, काहीशा घोगऱ्या आवाजात विचारले. हा आवाजसुद्धा त्या शाळकरी जीवनातील आवाजापेक्षा वेगळा होता.

कोपऱ्यावरून वाऱ्याचा एक झोत आला व चिनाराच्या झाडाच्या पर्णहीन फांद्यांमधून शीळ वाजवीत गेला. त्या तरुणीचा फ्रॉक तिच्या घाटदार पायांना लगटून फडफडला. खळखळून हास्याची लकेर सोडत ती किंचित खाली झुकली व साध्याच, पण डौलदार हालचालीने तिने फ्रॉकचे टोक खाली ओढून धरले.

"ही अशी!" आपले कौतुक आता मुळीच न लपविता अलेक्सेई उत्तरला.

"म्हणजे कशी ?" तिने हसून पुन्हा विचारले.

ह्या दोन तरुण जीवांकडे अलेक्सेईच्या आईने क्षणभर पाहिले, खेदाने ती हसली व आपल्या वाटेने निघून गेली. पण ही दोघे मात्र तेथेच उभे

राहून एकमेकांचे कौतुक करण्यात, जोरजोराने गप्पा मारण्यात गुंतली. "आठवतं तुला? .." "ठाऊक आहे तुला? ..." "कुठं आहे? ..." "त्याचं काय झालं? .." अशा प्रश्नांनी, उद्गारांनी एकमेकांच्या बोलण्यात व्यत्यय आणत होती.

असे खूप वेळपर्यंत गप्पा मारण्यात ती दोघे रमली होती. सरतेशेवटी ओल्गाने नजीकच्या घरांच्या खिडक्यांकडे अलेक्सेईचे लक्ष वेधले. त्या खिडक्यांमधील झाडांच्या कुंड्यांवरून काही चौकस चेहरे दिसत होते.

"तुला वेळ असेल तर नदीकिनाऱ्यावर जाऊ या," ओल्गाने सुचविले. त्यांनी एकमेकांचे हात पकडले. आश्चर्य म्हणजे लहान असताना ही गोष्ट त्यांच्याकडून कधीही घडली नव्हती. आता त्यांना भोवतालच्या जगाचा संपूर्ण विसर पडला होता. नदीकिनारी उभ्या असलेल्या एका उंच टेकडीवर ती दोघे गेली. वोल्गाच्या विशाल पात्राचा भव्य देखावा तेथून दिसत होता. पुराच्या पाण्याबरोबर हिमखंडांची गंभीर मिरवणूक वाहात चालली होती.

त्या घटकेनंतर आईला आपला लाडका मुलगा क्वचितच घरात आढळला. एरवी तो कपड्यांबाबतीत फारसा चोखंदळ नव्हता. पण आता आपल्या विजारीला तो दररोज इस्त्री करीत होता, आपल्या गणवेषाची बटणे खडूने घासून चकचकीत करीत होता, हवाई दलाचे चिन्ह असलेली पांढरी टोकदार टोपी डोक्यावर घालीत होता, दररोज दाढी घोटीत होता व संध्याकाळच्या वेळी आरशासमोर थोडा वेळ मागे-पुढे केल्यानंतर, लाकूड गिरणीच्या दारापाशी ओल्गाला भेटायला जात होता. दिवसासुद्धा अधून मधून तो नाहीसा व्हायचा, हरवल्यासारखा वागायचा आणि त्याला विचारलेल्या प्रश्नांना चुकीची उत्तरे द्यायचा. त्याच्या मनात काय घडत होते याची जाणीव तिच्या मातृहृदयाला झाली होती. समजूतदारपणे तिने मनातल्या मनात त्याला क्षमा केली होती आणि 'म्हातारी आणखी म्हातारी होत जातात, तरुणांनी वाढलं पाहिजे' ही जुनी म्हण आठवून स्वतःचे सांत्वन करीत होती.

त्या तरुण मंडळींनी आपल्या प्रेमाचा एकदाही उच्चार केला नाही. सायंकाळच्या उन्हात चमकणाऱ्या वोल्गाच्या संथ पात्राशेजारी उंच किनाऱ्यावरून भटकंती करून आल्यानंतर, अथवा गावाबाहेर डांबराप्रमाणे दाट आणि काळ्या दिसणाऱ्या कलिंगडांच्या लागवडीच्या पट्ट्यांमधून पायी सहल करून परत येताना दर वेळी अलेक्सेई आपल्या वेगाने संपत जाणाऱ्या सुटीचे

उरलेले दिवस मोजायचा आणि आपले अंत:करण ओल्गापाशी मोकळे करण्याचा निर्धार करायचा. पण परत संध्याकाळ यायची. गिरणीच्या फाटकापाशी तो तिला भेटायचा, तिच्याबरोबर एका छोटचा, दुमजली, लाकडी घरापर्यंत सोबत करायचा. त्या घरात तिने एक छोटी खोली भाड्याने घेतली होती. विमानातील केबिनप्रमाणे ती खोली स्वच्छ आणि चकचकीत होती. आपल्या कपड्याच्या कपाटाच्या उघड्या दरवाजाआड उभे राहून ती कपडे बदलायची तेव्हा तो चिकाटीने वाट पहात थांबायचा. त्या उघड्या दाराआडून डोकावणाऱ्या तिच्या अनावृत हातांच्या कोपऱ्यांपासून, खांद्यांपासून आणि पायांपासून आपली नज़र दुसरीकडे वळविण्याचा प्रयत्न करायचा. मग ती तोंड धुवायला जायची आणि ताज्या, गुलाबी गालांनी परतायची. तिचे केस ओले झालेले असत. कामाच्या दिवशी तिच्या अंगात असणारा पांढरा रेशमी ब्लाऊजच ती नेहमी परिधान करायची.

ती दोघे सिनेमाला जात, सर्कसला जात अथवा बागेत जात. ती कोठे जात होती हे अलेक्सेईच्या दृष्टीने महत्त्वाचे नव्हते. त्याची सिनेमागृहात पडद्याकडे नजर नसे, सर्कसच्या तंबूत तो रिंगणाकडे पहात नसे, अथवा बागेत फिरणाऱ्या लोकांकडे त्याचे लक्ष नसे. त्याचे डोळे फक्त तिला पाहण्यासाठी होते. तिच्याकडे पहात असताना त्याच्या मनामध्ये विचार यायचा: "आता आज मात्र घरी परतताना मी तिला लग्नाची मागणी घातलीच पाहिजे!" पण रस्ता संपायचा आणि त्याचा धीर गळून पडलेला असायचा.

एका रविवारी सकाळी ती दोघे वोल्गाच्या पैलतीरावरील कुरणांमध्ये फिरायला गेली. तिला भेटायला जाताना त्याने पांढरीशुभ्र विजार चढविली होती व खुल्या गळ्याचा सदरा घातला होता. त्याच्या काळसर, रुंद चेहऱ्याला तो सदरा खूप खुलून दिसत होता, असे त्याची आई म्हणाली होती. तो आला तेव्हा ओल्गा तयारच होती. एका मोठ्या रुमालात गुंडाळलेले पुडके तिने त्याच्या हवाली केले व ती दोघे नदीकडे गेली. तेथे आपली होडी घेऊन एक म्हातारा नावाडी बसला होता. पहिल्या महायुद्धात हा माणूस अपंग बनला होता. त्या परिसरातील लहान मुलांचा तो खूप आवडता होता व अलेक्सेई जेव्हा लहान होता तेव्हा नदीतील गोडे मासे वाळूकिनारी पकडण्याची कला ह्या माणसाने अलेक्सेईला शिकविली होती. आपल्या लाकडी पायांवर लंगडत त्याने अवजड होडी पाण्यात लोटली व

झपाझप वल्ही मारायला आरंभ केला. प्रवाहाला तिरपा छेद मारून ती होडी हिंदकळत पलिकडील चकचकीत हिरव्या किनाऱ्याला पोहोचली. ओल्गा होडीच्या मागील टोकाशी बसली होती. ती आपल्याच सुखसमाधीत मग्न होती. आपला एक हात तिने होडीच्या बहाणीवर ठेवला होता व तिची बोटे पाणी कापत होती.

"आर्काशा काका, तुम्ही आम्हाला ओळखलं नाही?" अलेक्सेईने विचारले.

त्या दोन तरुण चेहऱ्यांकडे काहीशा बेफिकीरीने नजर टाकीत नावाडी म्हणाला: "नाही."

"अहो मी आल्योश्का मेरेस्येव. चिमटचानं वाळूकिनारी गोडे मासे पकडायला तुम्ही मला शिकवलं होतं!"

"शक्य आहे. तुझ्यासारखी खूप पोरं इथं खेळत असायची. त्या सगळ्यांची आठवण ठेवणं मला जमत नाही."

होडीने धक्का पार केला. धक्क्यावर लढाऊ जहाजावरील एक छोटी बोट नांगरून पडली होती. तिच्या दर्शनी भागावर 'आव्रोरा'* असे दिमाखदार नांव कोरलेले होते. अलेक्सेई आणि ओल्गा यांची होडी पलिकडे वाळूच्या किनाऱ्यात घुसून थांबली.

"आता ही माझी जागा आहे. नगरपालिकेसाठी काम करायचं मी बंद केलं. स्वतंत्र धंदा करतो. समजलं?" होडीला किनाऱ्यावर चढवायला धक्का देण्यासाठी पाण्यात उतरीत आर्काशा काका म्हणाला. पण त्याचे लाकडी पाय वाळूत रुतले. होडी जड होती आणि तिला सरकविणे त्याला जमेना. "तुम्हाला उड्या टाकल्या पाहिजेत," थंडपणे तो म्हणाला.

"फेरीचे किती पैसे?" अलेक्सेईने विचारले.

"तुमच्या मर्जीवर. तुम्ही एवढे खूष दिसता तेव्हा जरा जास्त पैसे दिले पाहिजेत. पण मी खरंच तुला ओळखलं नाही. तू मला आठवत नाहीस."

होडीतून उडी टाकायची म्हणजे त्यांचे पाय ओले होणार होते. म्हणून पादत्राणे काढावीत असे ओल्गाने सुचविले. नदीच्या ओलसर, उबदार वाळूचा त्यांच्या पावलांना स्पर्श झाला तेव्हा त्यांना एवढा आनंद झाला,

---

*आव्रोरा – (पहाट) – ऑक्टोबर क्रांतीच्या निर्णायक चढाईची पहिली तोफ डागणारी युद्धनौका – अनु.

की लहान मुलांप्रमाणे गवतावर धावायची, उड्या मारायची व गडाबडा लोळायची त्यांना मनस्वी इच्छा झाली.

"पकड मला!" उथळ पाण्यातून वेगाने धावत जात ओल्गा ओरडली. हिरव्या पाचूसारख्या सखल कुरणाकडे धावताना तिचे बळकट, तांबूस-तपकिरी पाय चमकत होते.

अलेक्सेई तिच्या पाठोपाठ धावला. त्याला समोर दुसरे काहीही दिसत नव्हते, फक्त तिच्या रंगीबेरंगी फ्रॉकचा ठिपका दिसत होता. धावताना त्याच्या अनवाणी पायांना रानटी फुलांचे आणि आंबट चुक्याच्या तुऱ्यांचे जोरदार फटकारे बसत होते. आपल्या टाचांखाली मऊ, ओलसर, उन्हात ऊब आलेली माती सरकत असल्याचे त्याला जाणवत होते. ओल्गाला गाठणे ही त्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बाब भासत होती. जणू तिला पकडण्यावर त्यांचे बव्हंश भावी जीवन अवलंबून होते. आत्तापर्यंत मनात साठलेले जे जे तिला सांगण्याचा धीर झाला नव्हता ते ते सर्व ह्या फुलांनी बहरलेल्या कुरणात, गंधित उन्मादक वातावरणात सांगणे सोपे जाणार होते. पण जेव्हा जेव्हा तो तिला गाठायचा आणि हात लांब करायचा तेव्हा तेव्हा ती मांजरीच्या चपळाईने त्याला हूल द्यायची व आनंदाने खळखळून हसत दुसऱ्या दिशेला धावायची.

त्याच्या हाती न सापडण्याचा तिने निश्चय केला होता आणि त्याने तिला पकडले नाही. ती स्वतःच कुरणातून नदीकिनाऱ्याकडे वळली आणि गरम सोनेरी वाळूवर तिने स्वतःला झोकून दिले. तिचा चेहरा लालबुंद झाला होता, तोंड उघडे होते व धपापत्या ऊराने श्वास घेत ती हसत होती. नंतर पांढऱ्या, नक्षत्रांसारख्या डेझीच्या फुलांमध्ये त्याने तिचा फोटो काढला. मग त्यांनी नदीत आंघोळी केल्या व जेव्हा ती कपडे करीत होती आणि पोहण्याचा पोषाख पिळत होती तेव्हा आज्ञाधारकपणे तो झुडुपांमागे जाऊन तोंड फिरवून उभा राहिला.

जेव्हा तिने त्याला हाक मारली तेव्हा ती वाळूवर बसल्याचे त्याने पाहिले. उन्हात करपलेले आपले पाय तिने स्वतःशी ओढून घेतले होते; तलम, हलका फ्रॉक अंगात घातला होता व डोक्याभोवती टॉवेल गुंडाळला होता. गवतावर तिने स्वच्छ, पांढरा रुमाल पसरला. वाऱ्याने तो उडून जाऊ नये म्हणून त्याच्या कोपऱ्यांवर छोटे गोटे ठेवले. नंतर पुडक्यामधील पदार्थ तिने त्या रुमालावर मांडले. कोशिंबीर, गोठवलेले मासे आणि घरी

बनविलेली बिस्कीटें, असे त्यांनी साधे-सुटसुटीत जेवण घेतले. मासे तिने काळजीपूर्वक तेलकट कागदामध्ये गुंडाळून आणले होते. मीठ, मोहरीचा लगदा अशा वस्तूसुद्धा ती विसरली नव्हती. कोल्ड क्रीमच्या छोटचा बाटल्यां-मध्ये या वस्तू भरून तिने आणल्या होत्या. ही चुटुकली पोरगी ज्या कुशल-तेने त्याचा पाहुणचार करीत होती त्यात एक गोडवा होता, भावस्पर्शीपणा होता. अलेक्सेई स्वतःशी म्हणाला: "आता मुळीच अळंटळं करायची नाही.. नक्की ठरलं. आज संध्याकाळी मी हिला लग्नाची मागणी घालणार. ती माझी बायको झालीच पाहिजे असं मी तिला सिद्ध करून दाखवीन, तिची खात्री पटवीन."

वाळूमध्ये पडून त्यांनी ऊन खाल्ले. पुन्हा एकदा पाण्यात डुंबून घेतले. संध्याकाळी ओल्गाच्या खोलीवर पुन्हा भेटण्याचा त्यांनी संकेत केला व दमल्या-भागल्या शरीरांनी, पण आनंदी मनांनी ती दोघे रमतगमत होडीकडे परतली. पण ना तेथे आर्काशाची होडी होती, ना लढाऊ जहाजावरची छोटी बोट. घसा बसेपर्यंत त्यांनी आर्काशाला मोठमोठ्यांदा बराच वेळपर्यंत हाका मारल्या. एव्हाना स्तेपमध्ये सूर्य मावळू लागला होता. तेजस्वी गुलाबी सूर्यकिरणे पलिकडील नदीतीराच्या टेकडीच्या माथ्यावरून घसरत घरांच्या छपरांवर उतरली व शहरामधील आता निःस्तब्ध असलेल्या धुळकट झाडांच्या शेंड्यांवर ती घरंगळली. खिडक्या लालभडक चमकत होत्या. उन्हाळ्यातील ती संध्याकाळ तापलेली आणि निवांत होती. पण गावात काहीतरी घडले होते. सर्वसाधारणपणे यावेळी निर्मनुष्य असणारे रस्ते आज लोकांनी फुलले होते. माणसांनी गच्च भरलेल्या दोन लॉरी भरधाव गेल्या. माणसांचा एक छोटा गट लष्करी थाटात संचलन करीत चालला होता.

"आर्काशा काका दारू पिऊन बेहोष पडला असावा," अलेक्सेईने तर्क केला. "आपल्याला इथंच रात्र काढावी लागली तर?"

"मी तुझ्यावरोबर असते तेव्हा मला कशाचीही भीती वाटत नाही," ओल्गा उत्तरली. आपल्या मोठ्या, चमकत्या डोळ्यांनी तिने त्याच्याकडे पाहिले.

त्याने तिच्याभोवती आपल्या हातांचा विळखा घातला व तिचे चुंबन घेतले. प्रथमच आणि एकदाच त्याने तिचे चुंबन घेतले. वल्ह्यांच्या कड्यांचा आवाज नदीच्या दिशेने ऐकू आला. लोकांनी भरलेली होडी दुसऱ्या तीरा-

कडून जवळ येत होती. आता अलेक्सेईने आणि ओल्गाने त्या होडीकडे काहीशा नाराजीनेच पाहिले. पण तरीही ती दोघे आज्ञाधारकपणे होडीपाशी गेली. जणू आगामी दुश्चिन्हाची त्यांना चाहूल लागली होती.

लोकांनी होडीमधून मुकाटपणे खाली उड्या टाकल्या. सगळ्यांचे पोषाख तर सणासुदीचे होते, पण त्यांचे चेहरे मात्र चिंतेने आणि दुःखाने झाकोळलेले होते. गंभीर चेहऱ्यांचे आणि घाईमध्ये असल्यासारखे दिसणारे पुरुष व रडून रडून लाल डोळे झालेल्या बायका एकही शब्द न बोलता ह्या तरुण जोड-प्याच्या बाजूने निघून गेल्या. काय घडले होते त्याची कल्पना नसलेली ती दोघे होडीमध्ये बसली. त्यांच्या आनंदी चेहऱ्यांकडे न बघताच आर्कीशा काका म्हणाला :

"युद्ध सुरू झालंय... आज सकाळी रेडिओवर सांगितलं."

"युद्ध? कुणाशी?" बसल्या जागेवरून जवळ जवळ उडी मारीत अलेक्सेईने विचारले.

"त्या हलकट फॅसिस्टांशी! आणखी कुणाशी?" रागाने वल्ही ओढत आर्कीशा काका गुरगुरला. "पुरुष माणसं एव्हाना जिल्ह्याच्या लष्करी कमिस्सारीएतकडं गेलीत. सैन्यभरती सुरू झालीय."

अलेक्सेई घरी न जाता थेट लष्करी कमिस्सारीएतकडे गेला आणि रात्री १२:४० च्या आगगाडीत तो बसलासुद्धा. त्याची नेमणूक झालेल्या हवाई दलाच्या तुकडीकडे जायला. आपली कपड्यांची सूटकेस घरून आणायला त्याला जेमतेम वेळ मिळाला आणि ओल्गाचा निरोप घेणेही त्याला शक्य झाले नाही.

त्यांचा पत्रव्यवहार क्वचित घडत होता. त्यांच्या एकमेकांविषयीच्या भावना थंडावल्या होत्या अथवा ती एकमेकांना विसरत चालली होती म्हणून मुळीच नव्हे. उलट त्या गोल, शाळकरी मुलीच्या हस्ताक्षरामधील पत्रांची तो अधीरतेने वाट पहायचा. आपल्या खिशात ती पत्रे ठेवायचा आणि एकटा असला म्हणजे त्या पत्रांची पुनःपुन्हा पारायणे करायचा. जंगलातून जेव्हा रांगत-सरपटत तो जात होता त्या भयंकर काळात ह्याच पत्रांना आपल्या काळजाशी तो धरीत होता, त्यांच्याकडे टक लावून पहात बसत होता. पण ह्या दोन तरुण माणसांचे संबंध इतक्या अचानकपणे आणि अशा अनिश्चित टप्प्याला तुटले होते की, आता एकमेकांना पत्रे लिहिताना त्यांच्यात केवळ जुन्या, चांगल्या मैत्रीचे संबंध राहिले होते. सर्वांत महत्त्वाची,

मोठी गोष्ट बोलायची राहून गेली होती, ह्याचा उल्लेख करायला दोघेही घाबरत होती.

आणि आता तो इस्पितळात पडलेला असताना ओल्गाकडून येणारे प्रत्येक पत्र त्याच्या मनातील गोंधळ अधिकच वाढवीत होते. अचानक ओल्गाने पुढाकार घेतला होता आणि आपल्या पत्रांमधून प्रांजलपणे ती त्याच्याविषयीच्या भावना व्यक्त करीत होती. त्या दिवशी सायंकाळी, त्या विशिष्ट क्षणाला, आर्काशा काका होडी घेऊन आला होता याबद्दलचा खेद आता ती आपल्या पत्रामधून स्पष्ट व्यक्त करीत होती. त्याला पुन:पुन्हा आश्वासन देत होती की, त्याचे काहीही झाले तरी तो तिच्यावर नेहमी विसंबून राहू शकत होता; त्याला विनवीत होती की, घरापासून दूर भटकत असताना त्याने सदैव आठवण ठेवावी की, युद्ध संपल्यानंतर परतण्यासाठी त्याचा हक्काचा असा एक स्वत:चा कोपरा त्याची वाट पहात होता. ही एक नवी, वेगळी ओल्या लिहीत होती असे त्याला भासत होते. जेव्हा जेव्हा तो तिचा फोटो पाही तेव्हा तेव्हा नेहमी त्याच्या मनात येई की, जर वाऱ्याची झुळूक आली तर पिवळ्या फुलातील बियांप्रमाणे ती त्या फुलाफुलांच्या फ्रॉकमधून उडत जाईल. ती पत्रे एका स्त्रीने लिहिलेली होती... एका चांगल्या आणि प्रेम करणाऱ्या स्त्रीने. आपल्या प्रियकराची ती आतुरतेने वाट पहात होती. हा विचार त्याला आनंदी करायचा आणि दु:खीही करायचा. आनंद त्याला नकळत व्हायचा आणि दु:ख व्हायचे, कारण अशा प्रेमाचा आपल्याला अधिकार नाही असे त्याला वाटत होते. आपण पूर्वीसारखे धट्टेकट्टे, जोमदार तरुण राहिलो नाही, तर आर्काशा काकाप्रमाणे अपंग बनलो आहोत, असे तिला लिहायचे धाडस त्याच्याने झाले नव्हते. आपल्या आजारी, म्हाताऱ्या आईला आपल्याविषयीचे सत्य समजले तर तिचा दु:खाने मृत्यू ओढवेल ह्या भीतीने तो आईला खरे कळवू शकत नव्हता. आणि आता ओल्गाची फसवणूक करणेही त्याला प्राप्त झाले होते. त्यामुळे त्याचे प्रत्येक पत्र त्याला अधिकाधिक असत्याच्या जाळ्यात गुंतवीत चालले होते.

वस्तुस्थिती ही अशी असल्यामुळे कामीशिनहून त्याला येणारी पत्रे त्याच्या मनात आनंदाच्या व दु:खाच्या, आशेच्या आणि चिंतेच्या, अशा परस्परविरोधी भावनांची आंदोलने निर्माण करीत होती. ती पत्रे एकाच वेळी त्याला उल्हसित करीत होती आणि त्याचा छळवादही करीत होती. एकदा खोटे सांगितल्यामुळे त्याला दर वेळी नवनव्या खोट्या गोष्टी हुड-

काव्या लागत होत्या. ही खोटेपणाची कला त्याला अवगत नव्हती, म्हणून ओल्गाला त्याने लिहिलेली उत्तरे जास्त जास्त तुटक व कोरडी बनत चालली होती.

त्यापेक्षा "हवामान सार्जंट"ला पत्रे लिहिणे त्याला सोपे जात होते. ती बिचारी साधी, पण निष्ठावंत होती. शस्त्रक्रियेनंतरच्या आत्यंतिक निराशेच्या क्षणी त्याला आपले दुःख कुणापाशी तरी मोकळे करण्याची गरज भासली होती. तेव्हा त्याने तिला एक लांबलचक आणि निराशेने भरलेले पत्र लिहिले होते. त्यानंतर लौकरच त्याला वहीमधून फाडलेल्या पानावर वेड्यावाकड्या अक्षरातील, उद्‌गारचिन्हांची भरपूर पखरण असलेले उत्तर मिळाले होते. बनपावावर शिंपडलेल्या ओव्याप्रमाणे ती उद्‌गारचिन्हे भासत होती व सबंध पानावर अश्रूंचे ठिपके माखलेले होते. तिने लिहिले होते की, जर लष्करी शिस्त आडवी आली नसती तर तिने तात्काळ सर्व काही झुगारून दिले असते आणि येऊन त्याची शुश्रूषा केली असती, त्याच्या दुःखात सहभागी झाली असती. त्याने वारंवार पत्रे लिहावीत अशी तिने विनवणी केली होती. ह्या गोंधळलेल्या पत्रात एवढी भाबडी, अर्धवट बालिश भावना व्यक्त झाली होती, की अलेक्सेई अधिकच कष्टी झाला. तिने जेव्हा ओल्गाची पत्रे त्याच्या हाती दिली होती तेव्हा ओल्गा आपली विवाहित बहीण असल्याची थाप मारल्याबद्दल त्याने स्वतःलाच दूषणे दिली. अशा मुलीला फसविणे केव्हाही योग्य नव्हते. तेव्हा त्याने स्पष्टपणे तिला लिहून कळविले की, कामीशिनमध्ये त्याची एक प्रेयसी होती व आपले दुर्दैव तिला अथवा आपल्या आईला कळविण्याचे धैर्य त्याला झाले नव्हते.

"हवामान सार्जंट"चे त्यावरील उत्तर त्या दिवसात ज्याला अतर्क्य म्हणत अशा वेगाने आले. तिने लिहिले होते की, त्यांच्या विंगला भेट देणाऱ्या एका मेजरबरोबर—जो युद्ध वार्ताहर होता—ती हे पत्र पाठवीत होती. ह्या मेजरने तिचे प्रियाराधन केले होते, पण तो चांगला आणि गंमत्या माणूस असूनही अर्थातच तिने त्याच्याकडे दुर्लक्ष केले होते. एकूण पत्राच्या स्वरूपावरून ती निराश आणि अपमानित झाल्याचे जाणवत होते. तिने आपल्या भावनांना आवर घालण्याचा प्रयत्न केला होता, पण तिला ते जमले नव्हते. त्याचवेळी सत्य न सांगितल्याबद्दल तिने त्याची कानउघाडणी केली होती व आपल्याला मैत्रीण मानावे असे म्हटले होते. ह्या पत्राला ताजा कलम जोडलेला होता, पण तो शाईत न लिहिता पेन्सिलीने

खरडलेला होता. त्या ताज्या कलमात तिने "कॉम्रेड सीनियर लेफ्टनंट"ला आश्वासन दिले होते की, ती त्याची निष्ठावंत मैत्रीण होती आणि सांगितले होते की, जर "ती कामीशिनमधली" त्याच्याशी अप्रामाणिक वागली (पिछाडीच्या बायका कशा वागतात ते तिला ठाऊक होते), अथवा तिचे त्याच्यावरचे प्रेम आटले, अथवा तो अपंग बनल्यामुळे तिने त्याच्यापासून तोंड फिरविले, तर त्याने "हवामान सार्जंट"ला विसरू नये. मात्र त्याने तिला नेहमी अगदी खरे तेच लिहिले पाहिजे. ज्या माणसाने ते पत्र आणले होते त्याने व्यवस्थित बांधलेले एक पार्सलही आणले होते. त्यात पॅराशूट सिल्कपासून बनविलेले अनेक हातरुमाल होते व त्यांच्यावर अलेक्सेईची आद्याक्षरे विणलेली होती. शिवाय विमानाचे चित्र असलेली तंबाखूची एक चंची, एक कंगवा, "माग्नोलिया" यू-द-कलोनची एक बाटली व टॉयलेट साबणाची एक वडी, एवढ्या वस्तू होत्या. त्या कठीण काळात सैन्यात नोकरी करणाऱ्या मुलींच्या दृष्टीने त्या वस्तू किती मौल्यवान होत्या ह्याची अलेक्सेईला जाणीव होती. त्याला माहीत होते की, सणाची भेट म्हणून मिळालेली साबणाची वडी अथवा यू-द-कलोनची बाटली ह्या मुली एखाद्या पवित्र ताईताप्रमाणे जपून ठेवीत. युद्धापूर्वीच्या नागरी जीवनाची आठवण त्यांना होई. ह्या भेटवस्तूंचे मूल्य त्याला माहीत होते. म्हणून त्याने शेजारच्या कपाटाच्या वरच्या फळीवर त्या वस्तू ठेवल्या तेव्हा त्याला आनंदही वाटला होता व शरमही वाटली होती.

आपल्या स्वभावगत वैशिष्ट्य असलेल्या जोमाने आता तो आपल्या पांगळ्या पायांना शिक्षण देत होता. हवाई उड्डाणाची आणि हवाई झुंजींची स्वप्ने पाहात होता. अशा वेळी परस्परविरोधी भावनांच्या कात्रीत त्याच्या मनाची उलघाल चालू होती. दर दिवसागणिक जिच्यावरील त्याचे प्रेम वाढतच चालले होते त्या ओल्गाला पत्रांमधून अर्धसत्ये कळविण्याचे व जिची त्याला फारशी माहिती नव्हती अशा मुलीशी संपूर्ण प्रांजळ वागण्याचे ओझे त्याच्या सदसद्विवेकबुद्धीला इतःपर पेलेनासे झाले होते.

पण जेव्हा त्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरेल, जेव्हा तो परत युद्धसज्ज होईल आणि परत हवाई दलात दाखल होईल, तेव्हाच ओल्गाजवळ आपल्या प्रेमाची कबुली द्यायची, अशी त्याने स्वतःशी गंभीर प्रतिज्ञा केली होती. त्यामुळे आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी अधिक जोमाने प्रयत्न करण्यास त्याला चालना मिळाली होती.

११

एक मे रोजी कमिस्सार वारले.

ते कसे घडले हे कुणालाच समजले नाही. प्रातर्विधी उरकल्यानंतर, त्यांची दाढी करणाऱ्या न्हावीणीला त्यांनी हवेबद्दल विचारले; सणादिवशी मॉस्को कसे दिसतेय अशी पृच्छा केली. रस्त्यांवरून अडथळे दूर करण्यात येत होते हे ऐकून त्यांना आनंद झाला. अशा सुंदर वासंतिक दिवशी मिरवणुका निघणार नव्हत्या याबद्दल त्यांनी हळहळ व्यक्त केली. सणाच्या निमित्ताने तोंडाला पावडर फासून आपल्या चेहऱ्यावरील ठिपके झाकण्याचा शूर प्रयत्न करणाऱ्या क्लावदिया मिखाइलोवनाची त्यांनी थट्टा केली. त्यांची प्रकृती बरी दिसत होती. त्यांनी धोक्याचे वळण पार केले होते व कदाचित ते बरे होण्याच्या मार्गाला लागले होते, अशी प्रत्येकाला आशा वाटू लागली होती.

वृत्तपत्रे वाचणे त्यांना अशक्य झाल्यापासून गेला काही काळ त्यांच्या बिछान्याशेजारी कर्णयंत्रांसह बिनतारी संच होता. बिनतारी संचांचे विशेष ज्ञान असलेल्या ग्वोझ्देवने त्या संचाशी काही खुडबुड केली होती आणि आता सबंध वॉर्डभर बातम्या व गाणी ऐकू येत होती. नऊ वाजता निवेदकाचा आवाज कानी पडला. त्या काळात ह्या निवेदकाचा विशिष्ट आवाज सगळ्या जगाच्या परिचयाचा झाला होता. त्याने संरक्षण खात्याच्या जनकमिस्सारांचे निवेदन वाचून दाखवायला आरंभ केला. प्रत्येकजण गप्प बसून जिवाचे कान करून ऐकत होता. "महान लेनिन यांच्या अजिंक्य ध्वजेखाली – विजयासाठी पुढे चला!" हे शब्द उच्चारले गेल्यानंतरही वॉर्डात शांतता होती.

"कॉम्रेड रेजिमेंट कमिस्सार, मला हे समजावून सांगा..." कूकूश्किनने बोलायला सुरुवात केली व एकदम तो घाबरून ओरडला: "कॉम्रेड कमिस्सार!"

प्रत्येकाने वळून पाहिले. कमिस्सार आपल्या गादीवर सरळ, ताठ आणि निश्चल पडले होते. त्यांचे डोळे छताकडे एका बिंदूवर अचल रोखून पहात होते. त्यांच्या खोल आणि फिकट चेहऱ्यावर एक शांत, पवित्र, दिमाखदार भाव होता.

"ते वारले!" बिछान्याच्या कडेला गुडघ्यांवर खाली बसत कूकूश्किन ओरडला. "वारले!"

गोंधळलेल्या वॉर्ड-बाया धावपळ करू लागल्या. नर्स पळत पळत आली. झगा बांधत बांधतच हाऊस सर्जन दाखल झाले. तापट स्वभावाचा, माणूस-घाणा लेफ्टनंट कूकूश्किन मृताच्या देहावर आडवा पडला होता. तो कुणा-कडेही लक्ष देत नव्हता. ब्लँकेटमध्ये लहान मुलाप्रमाणे तोंड लपवून तो हमसाहमशी रडत होता...

आता अर्ध्या रिकाम्या झालेल्या वॉर्ड नंबर बेचाळीसमध्ये त्या दिवशी संध्याकाळी एक नवा पेशंट आणण्यात आला. मॉस्को संरक्षण डिव्हिजनच्या लढाऊ तुकडीमधील ते मेजर पावेल इवानोविच स्त्रूच्कोव होते. सणाच्या दिवशी मॉस्कोवर प्रचंड हवाई हल्ला चढविण्याची योजना फॅसिस्टांनी आखली होती. पण त्यांच्या बॉंबफेक्या विमानांच्या झुंडींना मध्येच अडविण्यात आले होते व पदसोल्नेचनाया प्रदेशाच्या आसपास कोठेतरी प्रखर झुंजीनंतर त्यांचा पराभव करण्यात आला होता. फक्त एक युंकर विमान पुढे घुसण्यात यशस्वी झाले होते. खूप उंचीवरून त्याने मॉस्कोच्या दिशेने उड्डाण चालू ठेवले होते. सणाच्या उत्सवावर विरजण घालण्यासाठी वाट्टेल ती किंमत मोजून कामगिरी पार पाडण्याचा त्यातील जर्मनांचा इरादा स्पष्ट दिसत होता. लढाईच्या त्या धुमश्चक्रीमध्ये स्त्रूच्कोवने पाहिले की, शत्रूचे बॉंबफेके विमान निसटून जात होते. तात्काळ त्याने त्या युंकरचा पाठलाग धरला. त्या काळात लढाऊ विमान दलांना सज्ज करण्यात येणाऱ्या एका सुरेख सोविएत विमानाला तो चालवीत होता. जमिनीपासून सुमारे सहा किलोमीटर उंचीवर त्याने जर्मन विमानाला गाठले. जर्मन विमान एव्हाना उपनगरांपर्यंत पोहोचले होते. त्याने कुशलतेने आपले विमान शत्रूच्या पाठी घेतले आणि टप्प्यात येताच मशिनगनच्या बटणाला दाबले. त्याने बटण दाबले, पण परिचित कडकडाट ऐकू न आल्याने तो चकित झाला. बटण बिघडले होते.

जर्मन विमान त्याच्या थोडेसे पुढे होते. तो त्या विमानाच्या शेपटाकडील दोन मशिनगनांच्या माऱ्यापासून सुरक्षित अशा पट्ट्यात मधोमध उडत राहिला. त्या स्वच्छ सूर्यप्रकाशित मे दिनाच्या सकाळी मॉस्को शहर क्षितिजावर धुक्यात गुरफटलेल्या भुऱ्या ढिगांसारखे दिसत होते. स्त्रूच्कोवने शत्रूला मर्मी टोला देण्याचे ठरविले. त्याने आपले पट्टे सोडले, वैमानिकाच्या जागेवरील छप्पर मागे सारले आणि जणू उडी मारण्यासाठी आपले स्नायू घट्ट केले. त्या बॉंबर विमानाच्या अगदी पाठोपाठ त्याने आपले विमान ठेवले होते. जणू अदृश्य धाग्याने एकमेकांना बांधल्याप्रमाणे क्षणभर ती

दोन विमाने एकापाठी एक उडत राहिली. स्त्रूच्कोवची प्रत्येक हालचाल लक्षपूर्वक पाहणाऱ्या जर्मन मशिनगनवाल्याचे डोळे त्या युंकरच्या पारदर्शी छपरामधून स्त्रूच्कोवने स्पष्ट पाहिले. त्या सुरक्षित पट्ट्याच्या किंचित बाहेर स्त्रूच्कोवच्या विमानाचा पंखा केव्हा येतो यासाठी तो जर्मन टपून बसला होता. उत्तेजित झालेल्या जर्मनाने आपले शिरस्त्राण खेचून काढले तेव्हा त्याचे सोनेरी, लांब केस त्याच्या कपाळावर लोंबू लागल्याचेही स्त्रूच्कोवने पाहिले. अवजड मशिनगनच्या दोन काळ्या सोंडा सजीव गोष्टीप्रमाणे स्त्रूच्कोवच्या दिशेने संधीची वाट पहात सतत वळवळत होत्या. चोराने अंगावर पिस्तूल रोखलेल्या निःशस्त्र माणसाप्रमाणे क्षणभर स्त्रूच्कोवला वाटले. आणि अशा परिस्थितीत हिंमतवान, निःशस्त्र माणसे जे करतात तेच त्याने केले: त्याने स्वतःला शत्रूवर झोकून दिले. पण आपल्या मुठी वळवून नव्हे. ती गोष्ट त्याने जमिनीवर केली असती. इथे त्याने आपल्या विमानाला पुढे हिसका दिला व आपल्या पंख्याच्या चमकत्या वर्तुळाचा शत्रूच्या शेपटीवर नेम धरला.

टक्करीचा आवाज त्याने ऐकला नाही. त्या जबरदस्त धडकेच्या जोरासरशी पुढच्याच क्षणी तो वर फेकला गेला. आपण हवेत कोलांटचा उड्या मारीत आहोत असे त्याला वाटले. त्याच्या डोक्यावर जमीन चमकली, थांबली आणि मग ती हिरवीगार चमकती जमीन त्याच्या दिशेने वेगाने धावत येऊ लागली. त्याने पॅराशूटची कळ दाबली. पण पॅराशूटच्या दोरात अडकून शुद्ध हरपण्यापूर्वी त्याने आपल्या डोळ्याच्या कोपऱ्यांमधून युंकरचे सिगारच्या आकाराचे धूड शेपटीविना खाली कोसळत असलेले पाहिले. शरदामधील वाऱ्याने भिरकावून दिलेल्या मेपलच्या पानासारखे ते विमान भिरभिरत कोसळत होते. पॅराशूटच्या दोरांना अगतिकपणे लटकणारा स्त्रूच्कोव एका घराच्या छपरावर जोरात आपटला व मॉस्कोतील एका उपनगराच्या उत्सवी रस्त्यावर बेशुद्ध पडला. त्या वस्तीतील रहिवाशांनी त्याची आकाशामधील मुसंडी पाहिली होती. त्यांनी त्याला उचलले व जवळच्याच घरापाशी नेले. नजीकच्या रस्त्यांवर तात्काळ माणसांची एवढी गर्दी जमली की, बोलावून आणलेल्या डॉक्टरना त्या घरापर्यंत पोहोचणे अवघड ठरले. छपरावर आपटल्यामुळे स्त्रूच्कोवच्या गुडघ्यांच्या वाटचांना इजा पोहोचली होती.

"ताज्या बातम्यां"च्या खास वार्तापत्रात मेजर स्त्रूच्कोवच्या पराक्र-

माचा वृत्तांत तावडतोब देण्यात आला होता. राजधानीतील सर्वोत्तम इस्पितळात त्याला घेऊन जाण्यासाठी मॉस्को सोविएतचे अध्यक्ष स्वतः आले होते. आणि जेव्हा स्त्रूच्कोवला वॉर्डात आणण्यात आले तेव्हा त्याच्या पाठोपाठ फुले, फळे, चॉकलेटचे डबे वगैरे घेतलेल्या ऑर्डलींचा ताफा आला होता. मॉस्कोच्या कृतज्ञ रहिवाशांनी त्या सर्व भेटी पाठविल्या होत्या.

स्त्रूच्कोव हा आनंदी आणि मनमिळाऊ असल्याचे आढळून आले. वॉर्डाचा उंबरठा ओलांडून तो आत आला न आला तोच त्याने पेशंटांपाशी चौकशा सुरू केल्या होत्या: "अन्न कसे होते?" "नियम कडक होते का?" "त्या जागी सुंदर परिचारिका आहेत अथवा नाहीत?" आणि त्याच्या गुडघ्यांवर बँडेज बांधण्यात येत होते तेव्हा सैन्याच्या कँटीनच्या नेहमीच्या विषयावर त्याने क्लावदिया मिखाइलोवनाला एक मजेदार गोष्टसुद्धा सांगितली. तिच्या देखणेपणाची त्याने धीटपणे स्तुतीही केली. नर्स जेव्हा वॉर्डातून गेली तेव्हा तिच्या दिशेने डोळा मारून तो म्हणाला:

"छान पोरगी आहे! कडक आहे? मला वाटतं ती तुमच्यांत देवाविषयीची धास्ती घालत असावी, होय ना? पण आपण काही मागं पाय लावून पळणार नाही. तुम्हाला डावपेच शिकवलेत ना? बायका काही किल्ल्यांच्या तटांपेक्षा अभेद्य नसतात आणि सर करता येणार नाही अशी एकही नाही!" आपल्या ह्या कोटीवर तो स्वतःच मोठ्यांदा हसला.

जणू काही इस्पितळात त्याने वर्षभर मुक्काम केला होता अशा थाटात तो वागत होता. सर्वांना पहिल्या नांवाने हाक मारायला त्याने तावडतोब सुरुवात केली. जेव्हा त्याला नाक शिंकरायची इच्छा झाली तेव्हा "हवामान सार्जंट" ने कष्टपूर्वक कशीदाकाम करून मेरेस्येवला पाठविलेल्या पॅराशूट–सिल्कच्या हातरुमालांपैकी एक रुमाल त्याने विनदिक्कत उचलला होता.

"तुझ्या लाडकीकडून?" डोळा मारून त्याने अलेक्सेईला विचारले होते आणि आपल्या उशीखाली तो रुमाल दडविला होता "तुझ्यापाशी खूप आहेत आणि नसले तर तुझी पोरगी नक्की खुषीनं तुला आणखी रुमाल पाठवील!" त्याने पुढे पुस्ती जोडली होती.

त्याच्या उन्हात करपलेल्या गालांवर लाली फुटत होती तरी तो फारसा तरुण दिसत नव्हता. त्याच्या डोळ्यांच्या कोपऱ्यांपासून कानशीलांपर्यंत खोल रेषा उमटलेल्या होत्या. जेथे आपली पडशी तेथेच आपले घर, असे मानणाऱ्या अनुभवी सैनिकाची वृत्ती त्याच्या एकूण वागण्यामधून स्पष्ट

दिसत होती. वॉर्डात त्याने खूपच चेतना आणली आणि हे त्याने अशा खुबीने केले की, कुणीही कसला अपमान वाटून घेतला नाही. प्रत्येकाला त्याने असे भासविले की, तो त्याच्या वर्षानुवर्षे ओळखीचा होता. हा नवागत प्रत्येकाला आवडला. मात्र स्त्रियांबाबतची त्याची उघड आसक्ती मेरेस्येवला कशीशीच वाटली होती. स्त्रूच्कोवने आपल्यातील ही उणीव मुळीच लपविली नव्हती. उलट जरासे निमित्त मिळताच त्या विषयावर तो खूप पाल्हाळ लावायचा.

दुसऱ्या दिवशी कमिस्सारांची प्रेतयात्रा निघाली.

इस्पितळातील आवाराच्या दिशेला असलेल्या खिडकीच्या चौकटीत मेरेस्येव, कूकूश्किन आणि ग्वोझ्देव बसले होते. तोफखान्यातील घोड्यांनी एक अवजड तोफगाडा ओढून आणलेला त्यांनी पाहिला. ब्रास बँडवाले ओळीत उभे राहिले होते. उन्हात त्यांची वाद्ये चकाकत होती. एक लष्करी तुकडी संचलन करीत आत आली. क्लावदिया मिखाइलोवना वॉर्डात आली आणि पेशंटांनी खिडकीपासून दूर व्हावे अशी तिने आज्ञा केली. ती नेहमी-प्रमाणे शांत आणि जोमदार होती. पण बोलताना तिच्या आवाजात कंप असल्याचे मेरेस्येवच्या ध्यानात आले. नव्या पेशंटचा ताप पाहण्यासाठी ती आली होती, पण त्याच क्षणाला अंत्ययात्रेच्या बँडचे पहिले सूर वाजले. नर्स एकदम पांढरीफटक पडली, तिच्या हातून थर्मामीटर खाली पडला आणि पाऱ्याच्या लहान चकचकीत गोळ्या लाकडी फरशीवर घरंगळल्या. हातांनी आपला चेहरा लपवीत क्लावदिया मिखाइलोवना वॉर्डबाहेर पळाली.

"काय झालं तिला? तो तिचा प्रेमिक होता काय?" शोकसंगीताचे सूर जेथून येत होते त्या खिडकीकडे मानेने खुणावून स्त्रूच्कोवने विचारले.

कुणीही त्याला उत्तर दिले नाही.

खिडकीमधून ते सारे वाकून पहात होते. उघडी लाल शवपेटी ठेवलेला तोफगाडा इस्पितळाच्या दरवाजांमधून रस्त्यावर बाहेर पडला. कमिस्सारांच्या देहावर पुष्पचक्रांचा आणि हारांचा खच पडला होता. तोफगाड्यामागे माणसे कमिस्सारांच्या सन्मानाच्या पदकांच्या पेट्या घेऊन चालत होती—एक, दोन, पाच, आठ. खाली माना घालून जनरल चालत होते. त्यांच्यामध्ये वासिली वासिल्येविचही होते. त्यांनीसुद्धा जनरलचा मोठा कोट अंगात घातला होता, पण डोक्यावर टोपी नव्हती. बाकीच्यांपासून थोड्या अंत-रावर, मंदगती संचलन करणाऱ्या सैनिकांच्या पुढे, क्लावदिया मिखाइ-

लोत्रना आली. तिच्या डोक्यावर काहीही नव्हते. पांढऱ्या झग्यामधील तिची आकृती थरथर कापत होती. तिला समोरचे काही दिसत नव्हते हे स्पष्ट जाणवत होते. ती अडखळत चालत होती. दरवाजांपाशी कुणीतरी तिच्या खांद्यांवर कोट पांघरला. पण ती चालत असताना तो कोट तिच्या खांद्यांवरून घसरून जमिनीवर पडला. तिच्या मागून संचलन करीत येणाऱ्या सैनिकांनी तो कोट पायांखाली तुडविला जाऊ नये म्हणून रांग मोडली.

"मंडळी, कोण आहे हा?" मेजरने विचारले.

त्यालासुद्धा खिडकीतून डोकावून पहायचे होते. पण त्याचे पाय सापळ्यात अडकवून ठेवलेले होते.

मिरवणूक दृष्टीआड झाली. शोकसंगीताचे स्वर दूर नदीकिनाऱ्यावरून कोठून तरी येत होते. घरांच्या भिंतींवर त्या संगीताचे हलकेच प्रतिध्वनी ऐकू येत होते. लंगडी दरवान बाई लोखंडी दरवाजे बंद करायला आली तरी बेचाळीस नंबरच्या वॉर्डातील माणसे खिडकीशी उभी राहून कमिस्सारांची अखेरची यात्रा पहात होती.

"तो कोण होता हे तुम्ही मला सांगू शकत नाही का? सगळेच लाकडाचे टोकळे बनलात काय?" खिडकीपाशी डोके उंचावून पाहण्याचा अजूनही प्रयत्न करीत अधीरपणे मेजर उद्गारला.

शेवटी कूकूश्किन शुष्क, चिरक्या आवाजात उत्तरला:

"ही एका अस्सल माणसाची अंत्ययात्रा आहे... एका बोल्शेविकाची!"

"अस्सल माणूस" हे शब्द मेरेस्येवच्या मनात ठसले. त्याहून चांगले वर्णन अशक्य होते. ज्याने नुकताच आपला अखेरचा प्रवास सुरू केला होता त्याच्याप्रमाणे अस्सल माणूस बनण्याच्या महत्त्वाकांक्षेने अलेक्सेई झपाटला.

१२

कमिस्सारांच्या मृत्युबरोबर बेचाळीस नंबरच्या वॉर्डमधील जीवन संपूर्ण बदलून गेले.

इस्पितळातील वॉर्डमध्ये काहीवेळा निर्माण होणारी विषण्ण शांतता आपल्या प्रेमळ शब्दांनी नाहीशी करणारे आता तेथे कुणी राहिले नव्हते. प्रत्येकजण जेव्हा एकदम खिन्न आठवणींमध्ये बुडून जातो आणि प्रत्येकाचे

अंतःकरण जड होत तेव्हा त्या उदास मनःस्थितीमधून सर्वांना आपल्या प्रेमळ शब्दांनी बाहेर काढणारे कुणी नव्हते. विनोदी चुटका सांगून ग्वोझ्देवला त्याच्या उदासीनतेमधून बाहेर काढणारे आता कुणी नव्हते. मेरेस्येवला सल्ला देणारे कुणी नव्हते. कूकूश्किनच्या कुरकुरीला चतुर, पण अपमान वाटणार नाही अशा बोलण्याने बंद करणारे कुणी नव्हते. ह्या सर्व भिन्न व्यक्तिरेखांना एकत्र आणून जोडणारा चुंबक नाहीसा झाला होता.

पण आता ह्या गोष्टींची तेवढी गरजही राहिली नव्हती. वैद्यकीय उपचारांनी आणि काळाने आपापले काम बजाविले होते. सर्व पेशंट वेगाने बरे होत होते आणि त्यांच्या जाण्याची वेळ जसजशी जवळ येत होती तसतसे ते आपल्या आजारांबद्दल कमीकमी बोलत होते. इस्पितळाच्या बाहेर कोणते जीवन त्यांची वाट पहात होते, ते परतल्यानंतर त्यांच्या विशिष्ट तुकड्यांमध्ये त्यांचे कसे स्वागत झाले असते आणि त्यांच्यासमोर कोणती कार्ये पडली होती, याविषयी स्वप्ने पाहण्यात सगळे गुंतले होते. अंगवळणी पडलेल्या लष्करी जीवनाची त्या सर्वांना आस लागली होती. नव्या चढाईमध्ये भाग घेण्याची खुमखुमी कुणालाही स्वस्थ बसू देत नव्हती. युद्धआघाड्यांवर जी शांतता अचानक पसरली होती तिच्यामुळे आगामी वादळाची चाहूल प्रत्येकाला जाणवत होती आणि इस्पितळातून बाहेर पडून आपापल्या तुकडीत परत दाखल होण्यास सारेजण अधीर बनले होते.

इस्पितळामधून बाहेर पडल्यानंतर पुन्हा लष्करी सेवेत सैनिकाने रुजू होण्यात विशेष असे काहीच नव्हते. पण मेरेस्येवच्या दृष्टीने ही समस्या ठरली होती. पायांचा अभाव कसब आणि प्रशिक्षण भरून काढतील का? लढाऊ विमानाच्या कॉकपिटमध्ये तो परत जाऊ शकेल का? वाढत्या उत्साहाने आणि निर्धाराने तो आपल्या ध्येयपूर्तीच्या दिशेने प्रयत्न करीत होता. व्यायामाचा वेळ हळूहळू वाढवीत नेऊन आता तो रोज सकाळ आणि संध्याकाळी दोन तास पायांचे व इतर सर्वसाधारण व्यायाम करीत होता. पण एवढेसुद्धा त्याला पुरेसे वाटत नव्हते. दुपारीसुद्धा व्यायाम घ्यायला त्याने सुरुवात केली. त्याच्याकडे तिरपे कटाक्ष टाकून, किंचित उपहासाच्या आणि गंमतीच्या स्वरात स्त्रूच्कोव नाटकी आविर्भावाने घोषित करायचा:

"नागरिकहो, सैबेरियाच्या जंगलात ज्याला दुसरी तोड नाही असा

महान शामान* अलेक्सेई मेरेस्येव आता आपल्या करामती करून दाखवील. निसर्गातील चमत्कार तुम्ही आता पहाल!"

त्या व्यायामांमध्ये खरोखरीच असा काही मनस्वी जोम होता की, अलेक्सेईचे शामानशी साधर्म्य भासायचे. त्याच्या शरीराचे अखंड मागे पुढे वाकणे, घड्याळ्याच्या लंबकाप्रमाणे ठामपणे आणि नियमितपणे होणाऱ्या त्याच्या मानेच्या व हातांच्या हालचाली पाहणे इतके कठीण होई, की तो अशा व्यायामात गुंतलेला असता त्याच्या वॉर्डातील ज्या सहनिवासींना चालणे शक्य होते ते लोक खोलीमधून बाहेर जात आणि कॉरीडॉरमध्ये वेळ काढत फिरत. बिछान्याला खिळलेला स्त्रूच्कोव आपल्या डोक्यावरून पांघरुण ओढून घेई आणि झोपण्याचा प्रयत्न करी. पाय नसलेला माणूस विमान चालवू शकेल ह्या गोष्टीवर अर्थातच वॉर्डामधील कुणाचाही विश्वास नव्हता. पण आपल्या सोबत्याची चिकाटी पाहून त्यांना त्याच्याविषयी आदर वाटू लागला होता. मात्र थट्टा-विनोद करून ते आपल्या त्याच्याविषयीच्या आदरभावनेला लपवू पहात.

स्त्रूच्कोवच्या गुडघ्यांच्या वाटचांमधील फ्रॅक्चर आरंभी वाटले त्यापेक्षा जास्त गंभीर स्वरूपाचे ठरले होते. त्याच्या जखमा सावकाशपणे भरून येत होत्या. त्याचे पाय अजून सापळ्यांमध्ये अडकवलेले होते. तो बरा होईल याबाबत काही संदेह नव्हता. पण आपल्याला त्रास देणाऱ्या त्या "हरामखोर सांध्यां"ना मेजर सतत शिव्या घालायचा. त्याच्या कुरकुरीला व गुरगुरण्याला हळूहळू संतापाचे रूप येऊ लागले. क्षुल्लक गोष्टींवरून तो एकदम भडकू लागला व प्रत्येकावर आणि प्रत्येक गोष्टीवर तोंडसुख घेऊ लागला. अशा क्षणांना जो कुणी त्याच्याशी युक्तिवाद करण्याचा प्रयत्न करील त्याला तो मारील असे वाटायचे. त्याच्या अशा झटक्यांच्या वेळी मुकाटपणे तिथून निघून जायचे असा वॉर्डमधील इतरांनी आपापसात करार केला होता. "त्याला आपला दारूगोळा संपवू दे" असे ते म्हणत आणि युद्धाने चिडखोर बनलेला त्याचा स्वभाव पूर्ववत आनंदी होईपर्यंत वाट पहात.

आपल्याला संडासात जाऊन धूम्रपान करता येत नाही आणि ऑपरेटिंग रूममधील तांबड्या केसांच्या नर्सला कॉरीडॉरमध्ये जाऊन पाहता येत नाही, म्हणून आपला संयम सुटत चालला आहे असे खुद्द स्त्रूच्कोवचे मत होते.

---

*शामान – उत्तरेकडील व अतिपूर्वेकडील मांत्रिक. –सं.

आपल्या पायांवर नवीन बँडेज बांधून घेत असताना त्या नर्सबरोबर एव्हाना नेत्रपल्लवी झाल्याचा त्याचा दावा होता. त्यात काही सत्यांश असेलही, पण इस्पितळावरून एखादे विमान उडत जाताना मेजरने पाहिले, अथवा एखाद्या नव्या महत्त्वाच्या हवाई लढाईविषयीची बातमी रेडिओमार्फत आणि वर्तमानपत्रांमार्फत मेजरला समजली, म्हणजे त्याला हे संतापाचे झटके येतात असे मेरेस्येवच्या ध्यानात आले होते. मेजरच्या माहितीच्या एखाद्या वैमानिकाने काही मोठी कामगिरी बजावलेली मेजरने ऐकली, म्हणजेसुद्धा त्याची मनःस्थिती नंतर चिडकी बनायची. मेरेस्येवसुद्धा असाच अस्वस्थ होत असे, पण तो बाह्यात्कारी काहीही दाखवीत नसे. स्त्रूच्कोवबरोबर त्याने स्वतःची तुलना केली म्हणजे त्याच्या मनाला विजयी समाधान लाभत असे. "अस्सल माणसा"चा जो आदर्श त्याने आपल्या नजरेसमोर धरला होता, त्याच्या किंचित का होईना, पण अधिक निकट पोहोचल्यासारखे त्याला वाटत होते.

मेजर स्त्रूच्कोव आपल्या मूळ स्वभावाप्रमाणे वागत होता. तो खूप खायचा, मनसोक्त हसायचा. बायकांविषयी बोलायला त्याला आवडायचे. त्याला बायका आवडत असत आणि त्याच वेळी त्याला बायकांविषयी तिट-काराही होता. पिछाडीवरील बायकांविषयी त्याची टीका विशेष तीव्र असायची. त्याचे कारण मात्र कुणाला ठाऊक नव्हते.

स्त्रूच्कोवचे बोलणे मेरेस्येवला आवडत नसे. स्त्रूच्कोव स्त्रियांविषयी बोलू लागला म्हणजे मेरेस्येवच्या नजरेसमोर नेहमी ओल्गाची मूर्ती उभी राही अथवा हवामान केंद्रावरील ती गंमतीदार छोटी मुलगी त्याला दिसू लागे. त्याच्या विंगमध्ये त्या मुलीविषयी बोलले जात असे की, ती पहा-ऱ्यावर असताना व्यवस्थापकीय बटालियनमधील एका उत्साही सार्जंट-मेजरने तिच्याशी जास्त लघळपणा केला तेव्हा तिने बंदुकीच्या दस्त्याने बदडून त्याला पळवून लावले होते व त्या रागाच्या भरात त्याला तिने गोळी घालून जवळ जवळ ठारच मारले असते. ह्या बायकांविषयी स्त्रूच्कोव वाईट मते व्यक्त करीत होता असे अलेक्सेईला वाटायचे. एक दिवस मेजर स्त्रूच्कोव अशाच काही रमणी-कथा सांगत होता. "सगळ्याजणी सारख्याच" आणि "चुटकीसरशी" त्यांच्यापैकी कुणीही पोरगी मिळवता येते, अशा नेहमीच्या विधानांनी त्याने आपल्या गोष्टींचा समारोप केला. त्या दिवशी मेरेस्येवला

संयम राखणे अवघड झाले. त्याने दात एवढ्या जोरात आवळले की त्याची गालफडे पांढरीफटक पडली. त्याने स्त्रूच्कोवला विचारले:

"कुणीही मिळेल?"

"होय, कोणतीही मिळेल!" मेजर थंडपणे उत्तरला.

नेमक्या त्याच क्षणाला क्लावदिया मिखाइलोवना वॉर्डात आली. रुग्णांच्या चेहऱ्यांवरील तणावाचे भाव पाहून तिला आश्चर्य वाटले.

"काय झालंय?" अभावितपणे केसांची बट रुमालाखाली नीट करीत तिने विचारले.

"नर्स, आम्ही आयुष्याबद्दल चर्चा करतोय. विचित्र थेरड्यांसारखी आमची आता अवस्था बनलीय. नुसतं बोलण्यापलिकडं काहीही करायचं नाही," एक चकचकीत स्मित करीत मेजर उत्तरला.

"हीसुद्धा वश होईल?" नर्स निघून गेल्यानंतर मेरेस्येवने रागीट स्वरात स्त्रूच्कोवला विचारले.

"ती काही वेगळ्या धातूची बनलीय असं वाटतं तुला?"

"क्लावदिया मिखाइलोवनाच्या वाटेला जाऊ नका," ग्वोझ्देव कडक आवाजात म्हणाला. "तिला सोविएत देवदूत म्हणून हाक मारणारा 'एक म्हातारा' आमच्या इथं होता."

"कोण पैज लावायला तयार आहे?"

"पैज?" आपले काळे डोळे संतापाने विस्फारीत मेरेस्येव किंचाळला. "पैजेला काय लावतोस?"

"लष्करी अधिकारी पूर्वी म्हणायचे त्याप्रमाणं पिस्तूलाची एक गोळी पैजेला लावू. तू जिंकलास तर मी तुझं निशाण ठरीन आणि मी जिंकलो तर तू माझं निशाण ठरशील," हसत स्त्रूच्कोव म्हणाला व एकूण मामला थट्टेवारी नेण्याचा त्याने प्रयत्न केला.

"पैज लावणार? त्यावर? तू एक सोविएत लष्करी अधिकारी आहेस हे विसरतोस. तू जिंकलास तर माझ्या तोंडावर थुंकू शकतोस." अलेक्सेईने आपले डोळे आकुंचित केले. "पण तुझ्या तोंडावर मी थुंकायची पाळी येणार नाही याची मात्र खबरदारी घे!"

"तुला पैज लावायची नसेल तर लावू नकोस. पण तिच्यावरून भांडण करायचं आपल्याला काही कारण नाही एवढंच मी तुम्हाला सिद्ध करून दाखवीन."

त्या दिवसापासून स्त्रूच्कोवने कटाक्षाने क्लावदिया मिखाइलोवनाची पाठ धरली. विनोदी गोष्टी सांगून तो तिची करमणूक करायचा आणि अशा विनोदी कथा-कथनात तो तरबेज होता. वस्तुतः वैमानिकाने आपली युद्धामधील साहसे कुणाला सांगू नयेत असा एक अलिखित नियम आहे. पण ह्या नियमाला धुडकावून त्याने आपले स्वतःचे खरोखरीच मोठे आणि रंजक अनुभव तिला सांगितले. आपल्या दुर्दैवी कौटुंबिक जीवनाविषयी सुस्कारे टाकीत सांगून आणि आपल्या कडवट एकाकीपणाविषयी तक्रारी करून त्याने तिला ठळक सूचनाही दिल्या. अर्थात वॉर्डमधील प्रत्येकाला माहीत होते की, तो अविवाहित होता आणि त्याला फारशा कौटुंबिक काळज्या नव्हत्या.

क्लावदिया मिखाइलोवना त्याला इतरांपेक्षा थोडा जास्त अनुग्रह दाखवीत होती हे खरे. त्याच्या बिछान्याच्या कडेशी बसून ती त्याच्या साहसकथा ऐकायची आणि तो जणू अभावितपणाचा आव आणून तिचा हात आपल्या हाती धरायचा व ती तो त्याच्या हातातून सोडवून घ्यायची नाही. मेरेस्येवचा संतापाने आतल्या आत तिळपापड व्हायचा. सारा वॉर्ड स्त्रूच्कोववर चिडलेला होता, कारण क्लावदिया मिखाइलोवना ही इतर कोणत्याही स्त्रीपेक्षा मुळीच वेगळी नव्हती असे सिद्ध करण्याच्या हेतूनेच स्त्रूच्कोवचे सारे वागणे चालले होते. त्याने हा गलिच्छ खेळ थांबवावा अशी त्याला गंभीर ताकीद देण्यात आली होती. ह्या बाबतीत हस्तक्षेप करण्याची ठाम तयारी वॉर्डातील माणसे करू लागली होती; पण एवढ्यात परिस्थितीला अचानक वेगळेच वळण मिळाले.

एके संध्याकाळी, कामाची पाळी असताना क्लावदिया मिखाइलोवना वॉर्डात आली. केवळ गप्पा मारण्याचा तिचा उद्देश होता. तिच्या ह्या मनमोकळ्या अनौपचारिक वर्तनामुळे ती पेशंटांमध्ये प्रिय होती. मेजरने एक कहाणी सांगायला आरंभ केला आणि नर्स त्याच्या बिछान्याच्या कडेशी बसली. कसे काय घडले ते कुणाच्याच ध्यानात आले नाही, पण अचानक तिने उडी मारली. प्रत्येकाने चमकून पाहिले. रागाने कपाळाला आठ्या घालून, लालबुंद गाल झालेली नर्स स्त्रूच्कोवकडे रोखून पहात होती. तो शरमल्यासारखा आणि घाबरलेला दिसत होता.

"कॉम्रेड मेजर, तुम्ही जर पेशंट नसता आणि मी नर्स नसते, तर मी तुमच्या मुस्कटात मारली असती!" क्लावदिया मिखाइलोवना म्हणाली.

"माझा तसा मुळीच इरादा नव्हता क्लावदिया मिखाइलोवना, शप्पत... शिवाय त्यात काय एवढं विशेष घडलं? .."

"त्यात काय विशेष?" आता ती त्याच्याकडे संतापाने नव्हे तर तिटकाऱ्याने पहात होती. "ठीक आहे. यावर अधिक बोलण्यासारखं काही नाही. आणि ऐकलंत? तुमच्या मित्रांच्या समक्ष तुम्हाला मी बजावून सांगते, तुमच्या वैद्यकीय गरजेव्यतिरिक्त तुम्ही माझ्याशी कधीही एका अक्षरानं संभाषण करू नका. अच्छा!"

कधी नव्हते एवढ्या जड पावलांनी ती वॉर्डाबाहेर निघून गेली. बाह्यात्कारी शांत राहण्याचा तिचा प्रयत्न उघड जाणवत होता.

क्षणभर वॉर्डात विलक्षण शांतता पसरली. मग अलेक्सेईचे दुष्ट, विजयी हास्य मोठ्यांदा घुमले आणि प्रत्येकजण मेजरवर तुटून पडला.

"काय वच्चंजी, तुमच्या लायकीप्रमाणं तुम्हाला प्रसाद मिळाला ना?"

दुष्ट समाधानाने पहात मेरेस्येवने लटक्या सौजन्याने विचारले:

"मी तुझ्या तोंडावर आत्ता थुंकू की नंतर?"

स्त्रूच्कोव ओशाळला होता, पण तो आपला पराभव मान्य करायला तयार नव्हता. काहीशा डळमळीतपणे तो म्हणाला:

"खरं आहे बुवा. हल्ला परतवला गेला. काही हरकत नाही. आपण पुन्हा प्रयत्न करू."

मध्यरात्रीपर्यंत तो स्वस्थ पडून राहिला. हळूच शीळ वाजवीत आणि काहीवेळा जणू स्वतःच्याच विचारांना उत्तर दिल्याप्रमाणे "खरं आहे बुवा" असे पुटपुटत होता.

ह्या प्रसंगानंतर लौकरच कॉन्स्तन्तिन कूकूश्किन याला इस्पितळातून निरोप मिळाला. जाताना त्याने कोणत्याही भावनांचे प्रदर्शन केले नाही आणि वॉर्डातील सहकाऱ्यांचा निरोप घेताना तो एवढेच म्हणाला की, इस्पितळातील जीवनाला तो अगदी विटला होता. सर्वांचा त्याने निष्काळजीपणाने निरोप घेतला. मात्र नर्सला आणि मेरेस्येवला त्याने विनंती केली की, जर त्याच्या आईकडून काही पत्रे आली तर त्याला ती विंगच्या पत्त्यावर पाठवावीत.

"तुझं कसं काय चालतंय आणि साथींनी तुझं स्वागत कसं केलं ते लिहून कळव," मेरेस्येवने त्याला निरोप देताना म्हटले.

"मी कशासाठी लिहू तुला? तुला काय माझी पर्वा? मी मुळीच लिहिणार नाही. उगाच कागदाची नासाडी व्हायची. तू काही उत्तर पाठवणार नाहीस."

"तुझी मर्जी !"

अर्थात शेवटचा शेरा कूकूश्किनने ऐकला नव्हता. पुन्हा मागे वळून न पाहता तो वॉर्डमधून बाहेर निघून गेला. त्याचप्रमाणे, मागे वळून निरोपाचा कटाक्ष न टाकता तो इस्पितळाच्या दरवाजांमधून चालत रस्त्यावर गेला. नदीकिनाऱ्याने चालत त्याने कोपऱ्यापाशी वळण घेतले. वस्तुत: त्याला चांगली जाणीव होती की, परंपरेला धरून त्याचे माजी वॉर्ड-साथी खिडकीमधून त्याला पहात होते.

असे असले तरी त्याने अलेक्सेईला पत्र लिहिले आणि तेसुद्धा अपेक्षेपेक्षा खूपच लौकर. अत्यंत शुष्क, गद्य शैलीत ते पत्र लिहिलेले होते. स्वत:विषयी त्याने एवढेच लिहिले होते की, त्याला परत आलेला पाहून विंगमधील लोकांना आनंद झाला होता. पण तेवढ्याच परखडपणे त्याने पुढे लिहिले होते की, अलिकडील लढायांमध्ये विंगची जबरदस्त हानी झाली होती व कुणाही अनुभवी माणसाला परत सामावून घेण्यास विंग उत्सुक होती. ठार व जखमींची त्याने यादी दिली होती; मेरेस्येवची विंगमध्ये अजूनही आठवण काढतात असे लिहिले होते. विंग कमांडरची बढती होऊन तो आता लेफ्टनंट-कर्नल बनला होता. मेरेस्येवच्या कसरतींची बातमी ऐकून व हवाई दलात परतण्याचा त्याचा निर्धार ऐकून विंग कमांडर म्हणाला होता: "मेरेस्येव नक्की परत येईल. निर्णयाशी ठाम राहणाऱ्या लोकांपैकी तो एक आहे." आणि यावर उत्तरादाखल चीफ-ऑफ-स्टाफ म्हणाले होते की, अशक्य गोष्ट करणे कुणाला शक्य नाही. विंग कमांडरनी प्रत्युत्तर केले होते की, मेरेस्येवसारख्या माणसांना अशक्य काही नव्हते. त्या पत्रात "हवामान सार्जंट" बद्दलही काही ओळी समाविष्ट असलेल्या पाहून अलेक्सेईला आश्चर्य वाटले. कूकूश्किनने लिहिले होते की, सार्जंटने त्याच्यावर प्रश्नांचा एवढा भडिमार केला की त्याला हुकूम देणे भाग पडले होते: "घूम जाव! आगे कदम!" पत्राच्या अखेरीस कूकूश्किनने लिहिले होते की, विंगमध्ये परतल्याच्या पहिल्याच दिवशी त्याने दोन उड्डाणे केली होती, त्याचे पाय पूर्ण बरे झाले होते आणि थोड्याच दिवसांच्या अवधीत विंगला "ला-५" जातीची विमाने मिळणार होती. ह्या नव्या विमानांची चाचणी आन्द्रेई देगत्यारेन्कोने घेतली होती व तो म्हणाला होता की, ह्या विमानांच्या तुलनेने सर्व प्रकारची जर्मन विमाने म्हणजे अडगळीचे सामान भरलेल्या केवळ पेट्या होती.

उन्हाळा लौकर सुरू झाला होता. त्याच चिनाराच्या फांदीमार्फत तो बेचाळीस नंबरच्या वॉर्डात डोकावला होता. चिनाराची पाने कडक आणि चकचकीत बनली होती. जणू एकमेकांशी कुजबुजल्याप्रमाणे ती पाने जोरजोरात सळसळत. रस्त्यावरील धुळीमुळे संध्याकाळच्या दरम्यान त्या पानांचा तजेला नाहीसा होई. तांबड्या लोंबत्या फुलांचे केव्हाच टवटवीत हिरव्या झुपक्यांमध्ये रूपांतर घडले होते. त्यांना आता धुमारे फुटले होते व पिसासारख्या हलक्या म्हाताऱ्या त्यांच्यामधून उडत होत्या. दुपारी खूप गरम व्हायचे आणि चिनाराच्या ह्या उबदार कापसाची बोंडे सबंध मॉस्को शहरभर उडत रहात. इस्पितळाच्या उघड्या खिडक्यांमधून ती आत घुसत. उबदार झुळुकांबरोबर वाहात आलेल्या म्हाताऱ्यांचे गुलाबी ढीग दारांपाशी आणि कोनाड्यांमध्ये साठत होते.

अशाच एका शीतल, चकचकीत, सोनेरी सकाळी क्लावदिया मिखाइलोवना अत्यंत गंभीर चेहऱ्याने वॉर्डात आली. तिच्याबरोबर एक वयस्क माणूस होता. पोलादी फ्रेमचा चष्मा त्याच्या डोळ्यांवर होता व दोरीने त्याने तो चष्मा आपल्या कानांवर अडकविलेला होता. त्याच्या अंगावर नवा, कडक खळीचा पांढरा झगा असला तरी तो अनुभवी कारागीर होता ही वस्तुस्थिती लपत नव्हती. पांढऱ्या कपड्यात गुंडाळलेले काहीतरी त्याच्या हातात होते. ते गाठोडे त्याने मेरेस्येवच्या बिछान्यापाशी खाली जमिनीवर ठेवले आणि एखाद्या जादुगाराप्रमाणे सावकाशपणे व गंभीरपणे ते गाठोडे उलगडायला आरंभ केला. कातड्याचा करकर आवाज ऐकू येत होता व कमावलेल्या कातड्याचा प्रसन्न, उग्र, कडवट वास सबंध वॉर्डात दरवळला.

गाठोडे संपूर्ण उलगडले गेले तेव्हा नव्या, पिवळ्या रंगाच्या, सुबक बनविलेल्या कृत्रिम पायांची जोडी सर्वांच्या दृष्टीस पडली. मापानुसार बनविलेल्या त्या कृत्रिम पायांवर नवे, तपकिरी रंगाचे लष्करी बूट चढविलेले होते. त्या पायांवर ते बूट इतके चपखल बसले होते की, एखाद्याला ते सजीव, बूट घातलेले पाय वाटले असते.

"आता आणखी एक वरची बुटांची जोडी घेतली म्हणजे तुझ्या लग्नाचा साज पुरा होईल," आपल्या कसबाला चष्म्यावरून कौतुकाने न्याहाळीत

तो कारागीर म्हणाला. "खुद्द वासिली वासिल्येविचनी ऑर्डर दिली होती! ते म्हणाले, 'झूयेव, खऱ्या पायांपेक्षा चांगली जोडी बनव!' ही पहा बनवली! ह्या झूयेवनं बनवलीय. राजाला शोभेल अशी!"

कृत्रिम पाय दृष्टीला पडताच मेरेस्येवचे काळीज गोठले होते. पण त्या पायांची चाचणी घेण्यास तो इतका अधीर झाला होता, कसलीही मदत न घेता चालण्यास तो एवढा उत्सुक बनला होता, की काळीज गलबलण्याची ती भावना लौकरच नाहीशी झाली. ब्लँकेटाखालून त्याने आपले थोटे पाय पुढे केले व कृत्रिम पाय त्यांच्यावर चढविण्याची कारागिराला घाई केली. पण म्हाताऱ्याला घाई आवडली नाही. तो म्हणाला की, क्रांतीपूर्वी, घोडयांच्या शर्यतींमध्ये आपला पाय मोडून घेतलेल्या एका "मोठ्या ड्यूक" साठी त्याने कृत्रिम पाय बनविला होता. त्या कारागिराला आपल्या कामाचा अभिमान वाटत होता व आपल्या मालाचे भरपूर कोडकौतुक करीत गिऱ्हाईकाच्या हाती त्याला सुपूर्द करण्यात त्याला सुख वाटत होते.

आपल्या बाहीने त्याने ते कृत्रिम पाय पुसले. एका पायावरील एक छोटासा डाग आपल्या नखाने खरवडून काढला, त्या जागी तोंडातून वाफ सोडली व आपल्या पांढऱ्याशुभ्र झग्यावर पॉलिश केले. मग जमिनीवर ते पाय उभे केले व सावकाशपणे त्यांचे वेष्टन काढून आपल्या खिशात टाकले.

"चला आजोबा, त्यांना पायात चढवून बघू या!" आपल्या कॉटच्या कडेवर बसत अधीरपणे मेरेस्येव म्हणाला.

आपल्या थोटया, उघडया पायांकडे तो आता तिऱ्हाईताच्या डोळयांनी पहात होता आणि त्याला ते आवडत होते. ते पाय भक्कम आणि पिळदार दिसत होते. सक्तीने अंथरुणात पडून राहिल्यामुळे सर्वसाधारणपणे जमा होणारी थुलथुलीत चरबी त्या पायांवर दिसत नव्हती. उलट खूप वेगात चालणाऱ्या माणसाचे ते भक्कम पाय दिसत होते.

"उगीच काय घाई लावलीयस मघापासून!" करण्यापेक्षा बोलणं लौकर जमतं!" म्हातारा गुरकावला. "वासिली वासिल्येविच म्हणाले होते, 'झूयेव, आयुष्यात कधी बनवली नसशील, अशी पायांची जोडी बनव.' म्हणाले की, 'ह्या लेफ्टनंटला पाय नसतानाही, विमान उडवायची इच्छा आहे.' तर मी अशी जोडी बनवलीय. ही बघ! असे पाय असल्यानंतर तू नुसता चालणारच नाहीस, तर सायकल चालवशील, आणि पोरींबरोबर 'पोल्का' नाचसुद्धा नाचशील... खूप सुबक काम केलंय मी!"



अलेक्सेईचा उजव्या पायाचा खुंट त्याने कृत्रिम पायाच्या मऊ, लोकरी खोवणीत खुपसला, पट्ट्यांनी घट्ट बांधला व किंचित मागे उभे राहून कौतुकाने त्याने आपली जीभ आपल्या गालात फिरविली.

"मस्त बूट आहे! बरोबर बसला? कुठं टोचत नाही ना? माझी खात्रीच आहे. आख्ख्या मॉस्कोत तुला झूयेवसारखा कारागीर मिळणार नाही!"

सुबकपणे त्याने दुसरा पाय मेरेस्येवला जोडला. पण त्याचे पट्टे बांधून पुरे होतात न होतात तोच एकदम झटका मारून मेरेस्येव बिछान्यावरून उठला आणि फरशीवर उभा राहिला. पाठोपाठ धप्प असा आवाज झाला. मेरेस्येवने वेदनेने भरलेली एक किंकाळी फोडली व कॉटशेजारी तक्तपोशीवर तो उभाच्या उभा कोसळला.

म्हातारा कारागीर एवढा चकित झाला की, त्याचा चष्मा सरळ कपाळावर मागे गेला. आपले गिऱ्हाईक एवढे थिल्लर असेल अशी त्याची अपेक्षा नव्हती. मेरेस्येव फरशीवर सुन्न आणि अगतिक होऊन पडला होता. त्याचे बुटांसकटचे कृत्रिम पाय सताड पसरलेले होते. त्याच्या डोळ्यांमध्ये गोंधळ, वेदना आणि भीती यांचे मिश्रण उमटले होते. खरेच तो स्वतःची फसवणूक करून घेत होता का?

क्लावदिया मिखाइलोवनाचे हात आश्चर्याने जुळले गेले. ती झटकन मेरेस्येवपाशी धावली. म्हाताऱ्या कारागिराच्या मदतीने तिने अलेक्सेईला वर उचलले व बिछान्यावर बसविले. गलितगात्र आणि विषण्ण चेहऱ्याने तो बसून राहिला. मूर्तिमंत निराशेचे प्रतीक बनला होता.

"अरे तरुण माणसा, तू असं वागायचं नाही!" म्हातारा कारागीर समजावणीच्या सुरात म्हणाला. "जणू काही ते खरे, सजीव पाय आहेत असं समजून उडी मारलीस! पण असा एकदम निराशही होऊ नकोस. अगदी पहिल्यापासून आता तुला चालायला शिकलं पाहिजे. तू सैनिक आहेस हे तात्पुरतं विसरून जा. तू लहान रांगता बाळ आहेस आणि टप्प्या-टप्प्यानं तुला चालायला शिकलं पाहिजे. प्रथम कुबडचा घेऊन, मग भिंतीचा आधार घेऊन आणि नंतर हातात काठी धरून. असं एकदम सगळं जमायचं नाही. हळू हळू सराव केला पाहिजे. पण तू एकदम उडी मारायला गेलास! ते चांगले पाय असले तरी तुझे स्वतःचे नाहीत. तुझ्या आई-वडलांनी तुला बनवून दिले होते तसले पाय कुणीही तयार करू शकणार नाही!"

ह्या दुर्दैवी उडीनंतर अलेक्सेईचे पाय दुखत राहिले. पण तरीही कृत्रिम पायांचा वापर करण्यास तो अधीर झाला होता. त्याच्यासाठी ॲल्युमिनियमच्या हलक्या वजनाच्या कुबडया मागविण्यात आल्या. त्या कुबडयांची टोके त्याने फरशीवर टेकविली, बगलेत त्यांच्या उशा दावल्या व यावेळी मात्र सावकाशपणे आणि सावधपणे कॉटवरून उतरून तो आपल्या पायांवर उभा राहिला. खरोखरीच नुकते चालायला शिकणाऱ्या लहान बाळाप्रमाणे तो पावले टाकीत होता. आपल्याला चालता येईल अशी मनातून खात्री वाटत असूनही भिंतीचा आधार सोडण्यास घाबरणाऱ्या लहान मुलाप्रमाणे त्याच्या हालचाली घडत होत्या. लहान बाळाच्या छातीभोवती टॉवेल गुंडाळून त्याची आई अगर आजी ज्याप्रमाणे त्याला पहिल्यांदा चालविते, त्याप्रमाणे एका बाजूला क्लावदिया मिखाइलोवना आणि दुसऱ्या बाजूला म्हातारा कारागीर अलेक्सेईला आधार देत होते. कृत्रिम पाय ज्या ठिकाणी बांधले होते त्या जागी अलेक्सेईला एक क्षणभर तीव्र वेदना जाणवली. मग विचकत विचकत त्याने एक कुबडी पुढे टेकविली, नंतर दुसरी कुबडी पुढे सरकविली; त्यांच्यावर शरीराचा भार टाकून एक पाय पुढे आणला व नंतर दुसरा पाय पुढे सरकविला. कातडयाचा करकर आवाज ऐकू आला व त्या पाठोपाठ फरशीवर दोन मोठे ठोके ऐकू आले.

"शाब्बास! चाल पुढं!" म्हातारा कारागीर दबत्या आवाजात उद्गारला.

मेरेस्येवने आणखी काही सावध पावले टाकली. पण ह्या कृत्रिम पायांच्या साह्याने ही पहिली काही पावले चालण्यास त्याला इतके श्रम पडले, की दारापर्यंत जाऊन परत बिछान्यापाशी येईपर्यंत जणू चार जिने पियानो उचलून नेल्याइतका तो दमला. बिछान्यावर त्याने स्वतःला पालथे झोकून दिले. त्याच्या अंगातून घाम निथळत होता आणि वळून पाठीवर उताणे होण्याइतपतही त्राण त्याच्या ठायी राहिले नव्हते.

"काय, आवडले की नाही? ह्या जगात झूयेवसारखा माणूस राहतो याबद्दल तू देवाचे आभार मानले पाहिजेस," पट्टे सोडून अलेक्सेईचे पाय मोकळे करताना म्हातारा फुशारकी मारीत होता. दाबाची सवय नसल्याने अलेक्सेईचे पाय किंचित सुजले होते. "अरे, ह्या पायांच्या मदतीनं तू नुसतं साध्या पद्धतीनं विमान उडवणार नाहीस, तर थेट त्या परमेश्वरापर्यंत उड्डाण करून येशील. फार सुबक काम केलंय मी!"

"आजोबा, मी तुमचा फार फार आभारी आहे. खरंच काम सुबक झालंय," अलेक्सेई पुटपुटला.

कारागीर काही वेळ चुळबुळत उभा राहिला. एखादा प्रश्न विचारावा अथवा न विचारावा, अशी त्याच्या मनात उलघाल होत असावी. किंवा एखादा प्रश्न त्याला विचारला जाईल अशा अपेक्षेने तो थांबला असावा. शेवटी अपेक्षाभंगाचा एक मोठा सुस्कारा टाकून हळूहळू दाराकडे जात तो म्हणाला :

"बरंय, चलतो मी. तुला ते आवडले अशी आशा आहे."

पण तो म्हातारा दाराशी पोहोचण्यापूर्वीच स्त्रूच्कोवने त्याला हाक मारली :

"अहो म्हातारबाबा! हे घ्या आणि "राजाला" शोभणारे पाय बनवल्या-बद्दल घोटभर पिऊन आनंद साजरा करा!" असे म्हणून स्त्रूच्कोवने नोटांचे एक जुडी म्हाताऱ्याच्या हाती दिली.

"धन्यवाद! खरंच, पिऊन साजरा करण्यासारखा प्रसंग आहे!" म्हातारा उत्तरला आणि जणू कारागिराचा एप्रन असल्याप्रमाणे त्याने आपल्या अंगावरील इस्पितळाचा पांढरा झगा वर उचलला व ऐटीत पैसे खिशात सारले. "धन्यवाद! मी नक्की दारू पिईन. तुम्हाला खरं सांगतो, हे पाय बनवताना मी माझं सारं कसब ओतलंय. वासिली वासिल्येविच मला म्हणाले होते : 'झूयेव, ही फार खास बाब आहे. सगळं कसब वापर.' पण झूयेवनं कधी अंग चोरून काम केलंय? तुम्हाला वासिली वासिल्येविच भेटले तर त्यांना सांगा, की तुम्हाला कारागिरी आवडली."

एवढे बोलून म्हातारा खाली झुकला व स्वतःशी पुटपुटत वॉर्डबाहेर निघून गेला. बिछान्याशेजारी फरशीवर उभ्या असलेल्या आपल्या नव्या पायांकडे टक लावून पहात मेरेस्येव पडून राहिला होता. तो त्या पायांकडे जेवढा अधिक पहात होता, तेवढा त्यांचा सुबकपणा व हलकेपणा त्याला अधिकाधिक आवडत होता. त्या पायांचे कसबी डिझाईन त्याला खूष करीत होते. "सायकल चालव, पोल्का नाच, विमान उडव, अगदी थेट परमेश्वरा-पर्यंत! होय, हे सारं मी करीन! नक्की करीन!" त्याच्या मनात विचार आला.

त्या दिवशी त्याने ओल्गाला एक लांबलचक आणि आनंदी पत्र पाठविले. त्या पत्रात त्याने लिहिले होते की, लौकरच त्याला नवीन विमान मिळणार

होते आणि त्याला आशा वाटत होती की, शरदामध्ये अथवा उशीरात उशीर हिवाळ्यामध्ये पिछाडीकडील ह्या नीरस कामामधून मुक्तता करण्याची त्याचं विनंती त्याचे प्रमुख अधिकारी मान्य करतील. पिछाडीवरील ह्या कामाच खूप कंटाळा आल्याचे त्याने पत्रात लिहिले होते. त्याला आघाडीवर त्याच्य विंगमध्ये पाठविण्यात येईल अशी आशा त्याने पत्रात व्यक्त केली होती ; विंगमधील त्याचे साथी त्याला विसरलेले नव्हते, उलट त्याच्या पुनरागमनाचं वाट पहात होते, असेही त्याने लिहिले होते. त्याच्यावर महासंकट कोसळल्या पासून त्याने लिहिलेले हे पहिलेच आनंदी पत्र होते. आपल्या प्रेयसील त्याने लिहिलेले हे असे पहिलेच पत्र होते ज्यात त्याने म्हटले होते की, तो तिच्याबद्दल नेहमी विचार करीत होता आणि तिच्या भेटीची इच्छा सदैव त्याच्या मनात घोळत होती. युद्ध संपल्यानंतर तिला भेटण्याचे आपले वांच्छित स्वप्न पूर्ण होईल आणि जर तिचे मन बदलले नसेल तर तिच्यासह एकत्र घर थाटण्याची आपली इच्छा होती, असे भीत भीत त्याने त्या पत्रात व्यक्त केले होते. त्याने हे पत्र अनेकदा वाचून काढले आणि सरतेशेवटी एक दीर्घ निःश्वास टाकून शेवटच्या ओळी काळजीपूर्वक खोडून टाकल्या.

"हवामान सार्जंट"ला त्याने लिहिलेले पत्र मात्र उत्साहाने आणि आनंदाने थबथबलेले होते. त्या महान दिवसामधील घटनांचे त्याने साग्रसंगीत वर्णन केले होते. कुणाही सम्राटाने आजपर्यंत कधी न घातलेल्या त्या कृत्रिम पायांचे रेखाचित्र त्याने काढले होते ; आपण पहिली पावले कशी टाकली त्याचे वर्णन केले होते ; त्या वटवटचा म्हाताऱ्या कारागिराविषयी तिला माहिती लिहिली होती आणि अलेक्सेई सायकल चालवू शकेल, पोल्का नाचू शकेल व स्वर्गापर्यंत विमानातून उड्डाण करू शकेल, अशी त्याची भविष्यवाणी-ही कळविली होती. "तर विंगमध्ये माझी वाट पहा. नव्या तळावर माझ्यासाठी जागेची सोय करायला कमांडंटला सांग," फरशीवर तिरपा कटाक्ष टाकीत त्याने पत्रात लिहिले होते. जणू कुणीतरी लपवून ठेवलेले असावेत अशा रीतीने ते पाय बिछान्याखालून पुढे डोकावत होते. आपल्याला कुणी पहात नाही अशी अलेक्सेईने सभोवार नजर टाकून खात्री करून घेतली, मग तो खाली वाकला व त्या थंड, चकाकत्या कातड्याला त्याने प्रेमाने कुरवाळले.

बेचाळीस नंबरच्या वॉर्डमध्ये "राजाला शोभतील असे कृत्रिम पाय" अवतीर्ण झाल्याच्या विषयावर जोरजोरात चर्चा घडलेले आणखी एक ठिकाण

होते. ते म्हणजे मॉस्को विद्यापीठातील वैद्यकीय विभागाचा तिसऱ्या वर्षाच्या अभ्यासक्रमाचा वर्ग. त्या वर्गातील संपूर्ण महिला विभागाला—आणि त्यावेळी हा महिला विभाग संख्येने सर्वांत मोठा होता—वॉर्ड नंबर बेचाळीसमधील सर्व बातम्या इत्थंभूत समजत असत. आन्यूताला आपल्या पत्रमित्राचा फार अभिमान होता. बिचारा लेफ्टनंट ग्वोझ्देव. आपल्या पत्रांचे आन्यूता जाहीर वाचन करीत असेल ह्याची त्याला कल्पना नव्हती. त्या पत्रांमधील काही खूप जवळीक व्यक्त करणारे परिच्छेद सोडून आन्यूता त्या पत्रांचे संपूर्ण अथवा अंशतः जाहीर वाचन करीत होती. मात्र हा पत्रव्यवहार जसजसा पुढे चालत राहिला होता तसतशी जवळीक व्यक्त करणाऱ्या परिच्छेदांची संख्या वाढत चालली होती.

वैद्यकीय अभ्यासक्रमाचा तिसऱ्या वर्षाचा संपूर्ण वर्ग शूर ग्रीशा ग्वोझ्देवच्या प्रेमात होता; खवट कूकूश्किनचा राग करीत होता; मेरेस्येवच्या अदम्य स्वभावाचे कौतुक करीत होता; कमिस्सारांचा मृत्यू म्हणजे आपली वैयक्तिक हानी झाली असे त्याने मानले होते. ग्वोझ्देवने आपल्या पत्रांमधून कमिस्सारांची अधून मधून वर्णने केली होती व वैद्यक विषयाचा तिसऱ्या वर्षाचा वर्ग कमिस्सारांच्या प्रेमात पडला होता. त्या प्रचंड, जोमदार माणसाचे देहावसान झाल्याचे वृत्त कळले तेव्हा अनेकांना अश्रू आवरणे कठीण झाले.

इस्पितळ आणि विद्यापीठ यांच्यामधील पत्रांची देवघेव अधिक वारंवार होऊ लागली. तरुण मंडळी त्या काळात टपाल खात्याबद्दल फारशी समाधानी नव्हती आणि त्या काळात पत्रांचे वाटप खूपच मंद गतीने होत असे. दूरच्या ताऱ्यांवरून येणाऱ्या प्रकाशाप्रमाणे आजकालची पत्रे आपल्या उद्दिष्टस्थळी पोहोचतात, असा कमिस्सारांचा एक शेरा ग्वोझ्देवने एका पत्रात नमूद केला होता. एखाद्या माणसाचे आयुष्य विझून जाईल, पण त्याची पत्रे खूप सावकाशपणे प्रवास करीत राहतील आणि खूप पूर्वीच मरून गेलेल्या त्या माणसाच्या जीवनाविषयी त्या पत्रे मिळणाऱ्या व्यक्तीला माहिती वाचायला मिळेल. आन्यूता व्यवहारी आणि हिकमती होती. दळणवळणाची अधिक परिपूर्ण साधने तिने हुडकून काढली. विद्यापीठाच्या क्लिनिकमध्ये आणि वासिली वासिल्येविच यांच्या इस्पितळामध्ये, अशा दोन्ही ठिकाणी काम करणाऱ्या एका वयस्क नर्सला तिने आपला पोस्टमन बनविले.

त्या दिवसापासून बेचाळीस नंबरच्या वॉर्डातील बातम्या विद्यापीठाला

दुसऱ्या अथवा उशीरात उशीरा तिसऱ्या दिवशी समजू लागल्या. त्याच प्रमाणे विद्यापीठाकडूनही बेचाळीस नंबरच्या वॉर्डाला जलद उत्तरे मिळू लागली. मेरेस्येव उड्डाण करू शकेल अथवा नाही असा "राजाला योग्य अशा कृत्रिम पायां"संबंधात वाद माजला. तो वाद यौवनसुलभ आणि कळकळीचा होता व वाद घालणारे दोन्ही पक्ष मेरेस्येवविषयी सहानुभूती बाळगणारे होते. लढाऊ विमान हाताळणे खूप गुंतागुंतीचे असते याची जाणीव असणारे निराशावादी दावा करीत होते की, मेरेस्येव उड्डाण करू शकणार नव्हता. पण आशावाद्यांचा युक्तिवाद होता की, जो माणूस शत्रूच्या तडाख्यातून निसटला, पंधरवडाभर दाट अरण्यामधून कित्येक किलोमीटर सरपटत-रांगत आला, त्याला काहीच अशक्य नव्हते. आपल्या युक्तीवादाला पुष्टी देण्यासाठी इतिहासामधील आणि कादंबऱ्यांमधील उदाहरणांचा आशावादी दाखला देत होते.

ह्या वादात आन्यूताने भाग घेतला नव्हता. तिला अज्ञात असणाऱ्या वैमानिकाच्या कृत्रिम पायांविषयी तिला स्वारस्य वाटत नव्हते. आपल्या फुरसतीच्या दुर्मीळ क्षणांमध्ये ग्वोझ्देवविषयीच्या आपल्या भावनांवर ती विचार करायची. तिच्या त्याच्याविषयीच्या भावना अधिकाधिक गुंतागुंतीच्या बनत चालल्याचे तिला जाणवू लागले होते. ह्या शूर लष्करी अधिकाऱ्याविषयी प्रथम तिने ऐकले होते तेव्हा त्याचे दुःख हलके करण्याच्या केवळ निःस्वार्थ हेतूने तिने त्याला पत्र लिहिले होते. पण पत्रव्यवहारामार्फत त्यांची ओळख जसजशी वाढत गेली, तसतशी देशरक्षक युद्धामधील वीराची अमूर्त आकृती पुसत गेली व तिच्या मनामध्ये एक वास्तव, सजीव तरुणाची मूर्ती वास करू लागली. त्याच्याबद्दल तिला अधिकाधिक आकर्षण वाटू लागले. त्याच्याकडून पत्रे आली नाहीत तर आपण अस्वस्थ आणि दुःखी-कष्टी होतो असे तिच्या ध्यानात आले. ही काहीतरी नवीनच भावना होती. तिचा तिला आनंदही वाटत होता आणि भीतीही वाटत होती. हेच प्रेम होते काय? ज्या पुरुषाला कधीही पाहिले नव्हते ज्याचा आवाज कधी ऐकला नव्हता, ज्याचा केवळ पत्रांमार्फत परिचय घडला होता, अशा पुरुषावर प्रेम जडणे शक्य होते काय? ग्वोझ्देवच्या पत्रांमधून वारंवार असे परिच्छेद उमटू लागले होते जे ती आपल्या सहाध्यायींना वाचून दाखवू शकत नव्हती. शेवटी ग्वोझ्देवने एका पत्रामधून कबुली दिली की तो "पत्रव्यवहारामार्फत प्रेमात पडला होता!" तेव्हा आन्यूतालाही जाणीव झाली की, तीसुद्धा त्याच्या

प्रेमात पडली होती व तिचे प्रेम हे शाळकरी मुलीचे प्रेम नव्हते, तर खरेखुरे प्रेम होते. तिला असे वाटू लागले की, ज्या पत्रांची आता ती अधीरतेने वाट पहात होती ती पत्रे जर यायची थांबली, तर तिच्या दृष्टीने आयुष्याला काही अर्थ उरणार नव्हता.

अशा रीतीने एकमेकांना न भेटताच त्यांनी एकमेकांच्या प्रेमाची कबुली देऊन टाकली होती. पण त्यानंतर ग्वोझ्देवच्या बाबतीत काहीतरी अघटित घडले असावे. त्याची पत्रे घाबरट, अस्वस्थ आणि संदिग्ध बनली. नंतर त्याने धीर करून आन्यूताला स्पष्ट लिहिले की, एकमेकांना न भेटताच प्रेमाची ग्वाही देण्यात त्यांनी चूक केली होती, त्याचा चेहरा किती भयानक विद्रूप बनला होता याची आन्यूताला कदाचित कल्पना नव्हती व त्याने आपला जो जुना फोटो तिला पाठविला होता त्याच्याशी आता त्याचे मुळीच साधर्म्य राहिलेले नव्हते. त्याने लिहिले होते की, तिची प्रतारणा करण्याची त्याची इच्छा नव्हती आणि ती ज्याच्यावर प्रेम करीत होती त्याला प्रत्यक्ष स्वतःच्या डोळयांनी पाहीपर्यंत तिने त्याच्याविषयीच्या आपल्या भावना पत्रांमधून लिहू नयेत, अशी त्याने विनंती केली होती.

हे वाचल्यानंतर आन्यूताला संताप आला आणि भीतीही वाटली. आपल्या खिशामधून तिने त्याचा फोटो बाहेर काढला. सडपातळ, निर्धारी चेहऱ्याचा तरुण, सुरेख-सरळ नाक, छोटीशी मिशी आणि कोरीव जिवणी तिच्याकडे पहात होती. "आणि आता? माझ्या लाडक्या, आता तू कसा रे दिसतोस?" फोटोकडे टक लावून पहात ती पुटपुटली. वैद्यकाची विद्यार्थिनी ह्या नात्याने तिला ठाऊक होते की, भाजल्याच्या जखमा चांगल्या बऱ्या होत नाहीत आणि त्यांचे खोल, ठळक वण राहतात. शरीरशास्त्रीय वस्तुसंग्रहालयात तिने पाहिलेल्या वृकविकाराच्या माणसाच्या चेहऱ्याच्या प्रतिकृतीची तिला अकारणच आठवण झाली. त्या चेहऱ्यावर निळसर भेगा आणि पीटिका होत्या, वेडेवाकडे कुरतडलेले ओठ होते, भुवयांच्या केसांचे विरळ पुंजके होते आणि पापण्यांच्या केसांविना लालभडक पापण्या होत्या. जर तो असा दिसत असला तर? ह्या विचारासरशी तिचा चेहरा भीतीने पांढराफटक पडला. पण तिने मनातल्या मनातच स्वतःची खरडपट्टी काढली. समजा, तो असा दिसत असला तर? म्हणून काय झाले? जळत्या रणगाड्यांमधून तो आमच्या शत्रूंविरुद्ध लढला; तिच्या स्वातंत्र्याचे, तिच्या शिक्षणाच्या हक्काचे, तिच्या अब्रूचे, तिच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी लढला.

तो खरा वीर होता. आपले आयुष्य त्याने अनेकदा धोक्यात घातले होते आणि आता परत युद्धआघाडीवर जाऊन लढण्यासाठी तो तळमळत होता, पुन्हा आपले आयुष्य धोक्यात घालायला उत्सुक होता. पण युद्धात तिने काय केले होते? तिने खंदक खणले होते, हवाई हल्लाविरोधी मोहीमेत काम केले होते व तळावरील इस्पितळात ती काम करीत होती. पण त्याच्या कामगिरीच्या तुलनेत तिचे कार्य काय होते? "ह्या शंका माझ्या मनात आल्या याचाच अर्थ मी त्याच्या लायकीची नव्हे!" ती स्वतःवरच चिडून म्हणाली. आपल्या डोळयांसमोर उभ्या राहिलेल्या त्या विद्रूप चेहऱ्याची प्रतिमा पुसून टाकण्याचा तिने प्रयत्न केला.

तिने त्याला आजवर कधी लिहिले नव्हते असे एक लांबलचक व स्नेहभरे पत्र लिहिले. साहजिकच ग्वोझ्देवला तिच्या मनामधील ह्या हेलकाव्यांचा कधीही पत्ता लागला नाही. त्याने लिहिलेल्या अस्वस्थ पत्राला असे सुरेख उत्तर मिळालेले पाहून तो मनोमनी सुखावला व त्याने त्या पत्राची अनेक पारायणे केली. त्याबाबत त्याने स्त्रूच्कोवलाही सांगितले. त्याची हकीकत ऐकून घेतल्यानंतर स्त्रूच्कोवने त्याला वडीलकीच्या नात्याने म्हटले:

"तुझी हिम्मत दाखव गृहस्था. तुला ती म्हण ठाऊक आहे ना? 'सुंदर मुखडा, पण थंडं काळीज; साधा चेहरा, पण सोन्याचं काळीज.' शिवाय आजघटकेला पुरुषांचा विलक्षण तुटवडा आहे."

तरीही, स्त्रूच्कोवचा हा मनमोकळेपणा ग्वोझ्देवला धीर आणू शकला नाही. इस्पितळातून मुक्त होण्याचा त्याचा दिवस जसजसा अधिक जवळ येऊ लागला, तसतसा तो स्वतःला जास्त जास्त आरशात न्याहाळू लागला. काहीवेळा दुरून ओझरता, तिरपा कटाक्ष टाकून पहायचा, तर काही वेळा चेहरा अगदी आरशाच्या काचेला भिडवायचा. आपल्या वणभरल्या आणि खाचखळगे पडलेल्या चेहऱ्याला तो तासन्तास मसाज करायचा.

त्याच्या विनंतीवरून क्लावदिया मिखाईलोव्हनाने त्याच्यासाठी काही फेस-पावडर आणि क्रीम विकत आणले होते. पण कोणतीही प्रसाधने आपल्या वणांना लपवू शकत नाहीत असे लौकरच त्याच्या ध्यानात आले. रात्रीच्या वेळी सर्वजण झोपले म्हणजे तो हळूच चोरपावलांनी न्हाणीघरात जाई व तेथे घटका घटकापर्यंत चेहऱ्यावरील वणांना मसाज करीत बसे. त्या वणांना पावडर लावी, पुन्हा मसाज करी आणि नंतर आशेने आरशात नजर टाकी.

दूर अंतरावरून तो छान दिसायचा. त्याची आकृती कणखर होती, खांदे रुंद होते, कंबर निमुळती होती व पाय सरळ, पिळदार होते. पण जवळून! त्याच्या गालांवरील आणि हनुवटीवरील लाल वणांना पाहून तो स्वतःच दचकून मागे सरायचा. त्याच्या चेहऱ्याची ताणलेली, फासळलेली त्वचा पाहून तो निराश व्हायचा. "ती हे पाहील तेव्हा तिला काय वाटेल?" तो स्वतःला विचारी. ती भेदरून गेली असती. त्याला पाहताच ती मान फिरवील आणि खांद्याला एक झटका देऊन निघून जाईल. किंवा वाईटात वाईट म्हणजे सौजन्यापोटी ती त्याच्याशी तासभर गप्पा मारील, मग काहीतरी औपचारीक आणि थंड सांगील व – अच्छा! जणू काही असे घडून गेले होते अशा रीतीने विचार करून तो रागाने पांढराफटक पडला.

मग आपल्या गाऊनच्या खिशामधून तो एक फोटो बाहेर काढायचा आणि गोल चेहऱ्याच्या त्या मुलीचे बारकाईने निरीक्षण करायचा. तिच्या उंच कपाळावर तिचे मऊ मऊ केस विंचरून मागे वळविलेले होते; तिचे नाक चपटे, शेंडा वर उचललेले, अस्सल रशियन छापाचे होते; तिचे ओठ नाजुक, बालिश होते. तिच्या वरच्या ओठावर दिसेल न दिसेल असा तीळ होता. ह्या निष्कपट, गोड चेहऱ्यावरील किंचित फुगीर अशी राखी अथवा कदाचित निळसर डोळ्यांची जोडी त्याच्याकडे प्रामाणिकपणे आणि प्रांजलपणे टक लावून पहात होती.

"सांग ना मला कशी आहेस तू? मला पाहून घाबरशील का? दूर पळून जाशील का? माझ्या राक्षसी रूपाकडं डोळेझाक करण्याइतपत तुझ्यात धैर्य राहील का?" त्या फोटोकडे एकटक पहात तो प्रश्न विचारायचा.

दरम्यान कुबड्यांचा टकटक आवाज करीत आणि कातड्याची करकर करीत सीनियर लेफ्टनंट मेरेस्येव त्याच्या जवळून जायचा. वीस वीस वेळा न थकता तो कॉरीडॉरमधून लंगडत फेऱ्या मारायचा. स्वतःच आखून घेतलेल्या कार्यक्रमानुसार, दर दिवशी व्यायामाची वेळ वाढवीत; दररोज सकाळ-संध्याकाळ त्याच्या ह्या चकरा चालायच्या.

"छान माणूस आहे!" ग्वोझ्देव स्वतःशीच मेरेस्येवबद्दल म्हणाला. "खरा चिवट! धैर्य हा शब्द त्याच्या बाबतीत अपुरा ठरतो. एका आठवड्यात कुबड्यांवर चालायला शिकला! काहींना एवढं करायला महिने लागतात. काल त्यानं स्ट्रेचर नाकारला आणि उपचार घ्यायला जिना उतरून गेला, परत स्वतःच चालत आला. त्याच्या डोळ्यांमधून आसवं ओघळत होती,

पण तरीही तो नेट धरून राहिला. एवढंच नाही तर त्याला मदत करू पाहणाऱ्या ऑर्डर्लीवर खेकसला. कुणाची मदत न घेता तो जिन्याच्या टोकाशी पोचला तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरचं स्मित पहायला हवं होतं! जणू एल्ब्रूस शिखर चढल्याचा आनंद त्याला झाला होता."

ग्वोझ्देव आरशापासून दूर सरला. मेरेस्येव कुबडयांच्या साहाय्याने वेगानें लंगडत जात असल्याचे त्याने पाहिले. "पहा तरी याच्याकडं! चक्क पळतोय! त्याचा चेहरा किती सुरेख आहे. भुवईपाशी एक छोटा जखमेचा वण आहे, पण त्यानं त्याच्या देखणेपणाला मुळीच बाधा येत नाही. उलट देखणेपणात त्या वणानं भर पडलीय." जर त्याला, ग्वोझ्देवला, असा चेहरा लाभला असता तर? पायांचे काय एवढे? पाय काही चटकन नजरेला दिसत नाहीत. अर्थात तो चालायला आणि विमान उडवायला नक्की शिकेल! पण तुझा चेहरा! रात्रीच्या वेळी झिंगलेल्या सैतानांनी वाटाणे रगडले असावेत असा दिसणारा हा भुतासारखा चेहरा लपवणार कुठे?

...अलेक्सेई मेरेस्येवची दुपारच्या व्यायामामधील कॉरीडॉरची तेविसावी फेरी चालली होती. त्याच्या सुजलेल्या मांडयांमधील जळती वेदना आणि कुबडयांमुळे दुखणाऱ्या त्याच्या खांद्यांमधील ठणक त्याला सबंध अंगभर जाणवत होती. लंगडत चालताना त्याने तिरपा कटाक्ष टाकला तेव्हा आरशा-समोर उभा राहिलेला रणगाडाचालक त्याला दिसला. "गंमतीदार माणूस आहे!" त्याच्या मनात विचार आला. "आपल्या चेहऱ्याबद्दल एवढी काळजी का करतोय? अर्थात आता तो कधीही सिनेमानट काही व्हायचा नाही! पण हा आहे रणगाडाचालक. ह्याला कोणती गोष्ट थोपवणार? जोवर तुमचं डोकं आणि हात-पाय शाबूत आहेत, तोवर चेहऱ्याची काय मातब्बरी? मात्र खरेखुरे पाय हवेत! असे थोटे पाय नकोत! कृत्रिम पाय कातडयाचे बनवले नसून जणू तापल्या लोखंडाचे बनवले असावेत, अशा माझ्या थोटया पायांना वेदना होताहेत!"

ठक, ठक. कर्र, कर्र. ठक, ठक. कर्र, कर्र.

आपले ओठ गच्च आवळून धरून सीनियर लेफ्टनंट मेरेस्येवने आपले अश्रू आवरण्याचा प्रयत्न केला. पण तरीही अतीव वेदनेने त्याच्या डोळयांमध्ये पाणी तरारले. अत्यंत कष्टाने त्याने कॉरीडॉरमधील एकोणतीसावी फेरी पूर्ण केली व त्या दिवसाचा व्यायाम संपविला.

जूनच्या मध्यास ग्रिगोरी ग्वोझ्देवने इस्पितळ सोडले.

जाण्याआधी एक-दोन दिवस त्याचे अलेक्सेईबरोबर प्रदीर्घ बोलणे झाले. ते दोघेही दुर्दैवाचे शिकार बनले असल्यामुळे आणि त्यांची वैयक्तिक आयुष्ये सारखीच गुंतागुंतीची बनली असल्यामुळे ते दोघे परस्परांच्या अधिक जवळ आले होते. अशा बाबतीत नेहमी घडते त्याप्रमाणे त्यांनी एकमेकांपाशी आपली मने मोकळी केली होती, भविष्याविषयीच्या आपल्या मनांमधील धास्त्या प्रांजलपणे एकमेकांना बोलून दाखविल्या होत्या. आपल्या मनामधील अनेक गोष्टी स्वाभिमानापायी ते इतरांना सांगू शकत नव्हते अशा गोष्टी एकमेकांना सांगून त्यांनी आपल्या अंत:करणांवरील भार हलका केला होता. प्रत्येकाने दुसऱ्याला आपल्या प्रेयसीचा फोटो दाखविला होता.

अलेक्सेईपाशी ओल्गाचा जुना, फिकट बनलेला फोटो होता. वोल्गाच्या दुसऱ्या तीरावर, फुलांनी बहरलेल्या स्तेपमध्ये, त्या सूर्यप्रकाशित जून महिन्यातील दिवशी त्याने तो फोटो स्वत: काढलेला होता. फुलाफुलांच्या छापाचा सुंदर फ्रॉक घातलेली ती सडपातळ तरुणी आपले पाय दुमडून आणि मांडीवर फुले धरून बसलेली होती. त्या डेझीच्या फुलांमध्ये ती स्वत:सुद्धा सकाळच्या दंवात भिजलेल्या डेझीच्या फुलासारखी शुभ्र आणि नितळ दिसत होती. फुलांची रचना करण्यात मग्न असताना तिचे डोके किंचित खाली झुकले होते, तिचे डोळे मंत्रमुग्ध अवस्थेत विस्फारलेले होते. जणू ते सुंदर जग आपल्या आयुष्यात ती प्रथमच पहात होती.

हा फोटो पाहिल्यानंतर रणगाडाचालक ग्वोझ्देवने म्हटले होते की, अशी मुलगी संकटात सापडलेल्या माणसाला सोडून कधीही जायची नाही. पण जर ती तशी सोडून गेलीच तर जहन्नममध्ये जाऊ दे तिला! त्यावरून एवढेच समजून येईल की, चेहरे फसवे असतात. आणि अशा परिस्थितीत तिने त्याला सोडून जाणेच इष्ट ठरेल, कारण ती क्षुद्र होती व क्षुद्र माणसासाठी आपले आयुष्य वाया घालविण्यात काय अर्थ होता?

अलेक्सेईला आन्यूताचा चेहरा आवडला होता आणि नकळतपणे त्याने ग्वोझ्देवचेच विचार, पण आपल्या स्वत:च्या पद्धतीने, ग्वोझ्देवला बोलून दाखविले होते. त्यांच्या ह्या बोलण्यात फारशी सघनता नव्हती आणि त्यामुळे त्यांच्या समस्या सुटण्यासही मदत झालेली नव्हती. पण तरीही दोघांना

बोलल्यानंतर बरे वाटले होते. खूप काळ ठणकणारे गळू फुटल्यानंतर एकदम हलके वाटते तसे!

त्यांनी असे ठरविले होते की, ग्वोझ्देव इस्पितळामधून बाहेर पडला म्हणजे तो आणि आन्यूता वॉर्डाच्या खिडकीसमोरून जाणार होते, मग अलेक्सेईने ग्वोझ्देवला पत्र लिहून आन्यूताविषयीचे आपले मत त्याला कळवायचे होते. आन्यूताने ग्वोझ्देवला फोन केला होता आणि त्याला इस्पितळा-बाहेर भेटायचे कबूल केले होते. याउलट ग्वोझ्देवने अलेक्सेईला पत्र लिहिण्याचे वचन दिले होते. आन्यूताशी त्याची भेट कशी झाली, त्याचा चेहरा पाहिल्या-नंतर तिची प्रतिक्रिया काय घडली आणि त्या दोघांचे पुढे कसे काय चालले होते, वगैरे वृत्तांत तो आपल्या पत्रामधून अलेक्सेईला कळविणार होता. त्यावर अलेक्सेईने ठरविले होते की, जर ग्रीशाच्या सर्व गोष्टी सुरळीत पार पडल्या, तर तो तात्काळ ओल्गाला पत्र लिहिणार होता, स्वतःबद्दलची सर्व खरी हकीकत तिला सांगणार होता. मात्र अजूनही खूप आजारी असलेल्या व अंथरुणाला खिळलेल्या आपल्या आईला काहीही कळवू नये अशी ओल्गाला तो विनंती करणार होता.

रणगाडाचालक इस्पितळ सोडून जाणार होता तेव्हा ते दोघे एवढे अस्वस्थ का बनले होते याचा खुलासा यावरून घडत होता. ते एवढे चिंताक्रांत बनले होते की, एकालाही झोप लागत नव्हती. रात्री दोघेही चोरपावलांनी कॉरीडॉर मध्ये गेले. आरशासमोर उभे राहून आपल्या चेहऱ्यावरील व्रणांना आणखी एकदा मसाज करण्यासाठी ग्वोझ्देव बाहेर गेला आणि कुबड्यांचा आवाज होऊ नये म्हणून त्यांच्या टोकांना फडके गुंडाळून मेरेस्येवने चालण्याचा जादा व्यायाम घेतला.

दहा वाजता क्लावदिया मिखाइलोवना वॉर्डात आली. धूर्त स्मित करीत तिने ग्वोझ्देवला म्हटले की, कुणीतरी त्याला भेटायला आले होते. वाऱ्याच्या झोताबरोबर उडावे त्याप्रमाणे ग्वोझ्देव बिछान्यावरून टुणकन उडी मारून उभा राहिला. तो एवढा लाजला होता की त्याच्या चेहऱ्यावरील व्रण अधिकच ठळकपणे उठून दिसू लागले. घाईघाईने आपल्या वस्तू गोळा करायला त्याने आरंभ केला.

"खूप छान मुलगी आहे आणि अगदी गंभीर दिसते," ग्वोझ्देवची घाईघाईने चाललेली आवराआवर निरखीत नर्स स्मित करून म्हणाली.

ग्वोझ्देवचा चेहरा प्रसन्नतेने उजळला.

"खरंच? आवडली तुम्हाला? ती छान मुलगी आहे ना?" त्याने विचारले आणि त्या उत्तेजित मन:स्थितीत वॉर्डातील सहकाऱ्यांचा निरोप घेण्याचे विसरून तो बाहेर पळाला.

"पोरकट कुठला! हे असलेच लोक नेमके जाळयात अडकतात," मेजर स्त्रूच्कोव गरजला.

ह्या बेफाम वृत्तीच्या माणसाचे गेल्या काही दिवसात काहीतरी बिनसले होते. तो दुर्मुखला बनला होता, काही कारण नसताना त्याला संतापाचे झटके येत होते. आता तो बिछान्यात उठून बसू शकत होता, तेव्हा सबंध दिवसभर खिडकीबाहेर बघत बसायचा. अशा वेळी आपल्या दोन्ही मुठींवर त्याने आपले गाल टेकलेले असत आणि त्याला कुणी काही विचारले तर तो उत्तर द्यायचा नाही.

आपल्या माजी वॉर्ड-निवासीला रस्त्यावर पाहण्यासाठी सगळेजण—दुर्मुखला मेजर, मेरेस्येव आणि दोन नवे पेशंट—खिडकीपाशी वाकून पाहू लागले. दिवस उबदार होता. चकचकीत सोनेरी कडांचे मऊ मऊ लाटां-सारखे ढग आकाशामधून वेगाने सरकत जात होते. त्या ढगांचे आकार सतत वदलत होते. नेमक्या त्या क्षणाला एक छोटा, राखाडी, गुबगुबीत ढग नदीवरून घाईघाईने तरंगत गेला आणि उन्हात चमकणाऱ्या टप्पोऱ्या पावसाच्या थेंबांचा त्याने शिडकावा केला. नदीतटाच्या ग्रॅनाईटच्या भिंती पॉलिश केल्याप्रमाणे चमकत होत्या. अस्फाल्टच्या रस्त्यावर काळे, संगमरवरा-सारखे ठिपके पसरले होते. त्या ठिपक्यांमधून सुरेख ओलसर वाफ बाहेर पडत होती. ह्या प्रसन्न पावसाच्या थेंबांना हातात झेलण्यासाठी खिडकीबाहेर डोके काढण्याचा अनावर मोह होत होता.

"तो येतोय!" मेरेस्येव अस्फुट उद्गारला.

प्रवेशद्वाराजवळची ओकची अवजड दारे सावकाशपणे उघडली गेली आणि दोन माणसे त्यांच्यातून बाहेर पडली. एक होती काहीशी गुबगुबीत तरुणी. तिच्या डोक्यावर कसलेही आच्छादन नव्हते. कपाळापासून तिने आपले केस थेट मागे विंचरले होते. तिच्या अंगात पांढरा ब्लाऊज आणि गडद रंगाचा स्कर्ट होता. तिच्या बरोबर एक तरुण सैनिक होता. तो तरुण सैनिक म्हणजे रणगाडाचालक ग्वोझ्देव होता हे अलेक्सेई सुद्धा चटकन ओळखू शकला नाही. त्या सैनिकाच्या एका हातात त्याची सूटकेस होती आणि दुसऱ्या हातावर त्याचा ओव्हरकोट टाकलेला होता. त्याची झपझप पडणारी पावले

पहायला मोठे छान वाटत होते. आपली ताकद तो अजमावून पाहात होता हे उघड होते. मुक्तपणे वावरायचा त्याला एवढा आनंद झाला होता की, तो पायऱ्या पळत न उतरता तरंगत जात होता असे भासत होते. सोनेरी पावसाच्या बुलंद थेंबांनी डवरलेला आपल्या मैत्रिणीचा हात त्याने हाती घेतला व नदीतटालगत चालत तो वॉर्डच्या खिडकीकडे आला.

त्यांना पाहताना अलेक्सेईचे अंतःकरण आनंदाने उचंबळून आले होते. म्हणजे सर्व काही सुरळीत पार पडले होते! तिचा चेहरा एवढा मोकळा, गोड आणि साधा होता यात काही आश्चर्य नव्हते. अशी मुलगी कधीही पाठ फिरवणार नाही. छे: छे:! अशा मुली संकटात सापडलेल्या पुरुषाला कधीच एकटा टाकीत नाहीत.

ती दोघे खिडकीपाशी येऊन थांबली आणि त्यांनी वर पाहिले. नदीतटाच्या पावसाने धुतलेल्या बांधाशी ते तरुण जोडपे उभे राहिले होते. त्या जोडप्याच्या मागे झिमझिम पावसाच्या तिरप्या रेषा चमकत होत्या. एकदम अलेक्सेईच्या ध्यानात आले की, रणगाडाचालक काहीसा शरमलेला व चिंताक्रांत दिसत होता. आणि फोटोतल्याप्रमाणेच प्रत्यक्षातही सुंदर असलेली आन्यूतासुद्धा चिंताग्रस्त व अवघडलेली दिसत होती. तिचा हात ग्वोझ्देवच्या हातावर लुळेपणाने लोंबत होता . एकूण तिची मनःस्थिती अस्वस्थ आणि अस्थिर जाणवत होती. जणू आपला हात ओढून घेऊन कोणत्याही क्षणी ती पळून जाईल असे वाटत होते.

त्यांनी हात हलविले, खोटी ताणलेली स्मिते चेहऱ्यांवर झळकविली व नदीतटाने पुढे चालत जात वळणाशी अदृश्य झाली. पेशंट मुकाटपणे आपापल्या खाटांपाशी परतले.

"बिचाऱ्या ग्वोझ्देवचा नेम लागलेला दिसत नाही," मेजर म्हणाला. पण क्लावदिया मिखाइलोवनाच्या सँडल्सच्या टाचांचा कॉरीडॉरमध्ये आवाज ऐकताच तो एकदम दचकला आणि त्याने चटकन खिडकीकडे तोंड वळविले.

उरलेला सारा दिवस अलेक्सेई बेचैन होता. त्याने संध्याकाळचा व्यायाम-सुद्धा घेतला नाही व सर्वांच्या आधी तो बिछान्यात येऊन पडला. पण बाकीचे पेशंट गाढ झोपी गेल्यानंतरसुद्धा बराच वेळपर्यंत त्याच्या गादीच्या स्प्रिंगा करकरत होत्या.

दुसऱ्या दिवशी सकाळी नर्स खोलीत आली न आली तोच त्याने पत्रां-बद्दल पृच्छा केली. त्या दिवशी त्याला एकही पत्र आलेले नव्हते. विमनस्क-

पणे त्याने आन्हिके व न्याहरी आटोपली, पण चालण्याचा व्यायाम मात्र नेहमीपेक्षा जास्त वेळ घेतला. आदल्या दिवशी संध्याकाळी मनाच्या दुबळे-पणाला बळी पडून त्याने व्यायाम चुकविला होता. त्याची स्वतःला शिक्षा म्हणून पंधरा फेऱ्या जास्त मारल्या. ह्या अनपेक्षित बहादुरीमुळे त्याला आपल्या चिंता विसरण्यास मदत झाली. फारसे न दमता आपल्या कुबड्यांच्या साह्याने तो मुक्त संचार करू शकत होता असे त्याने सिद्ध केले होते. कॉरीडॉरची लांबी पन्नास मीटर होती. त्याने पंचेचाळीस फेऱ्या मारल्या होत्या. म्हणजे दोन हजार दोनशे पन्नास मीटर अथवा सव्वादोन किलोमीटर तो चालला होता. अधिकाऱ्यांच्या जेवणाच्या मेसपासून ते विमानतळापर्यंतचे हे अंतर होते. त्याने परिचित मार्ग मनानेच डोळ्यांसमोर उभा केला. खेड्या-तील जुन्या चर्चच्या भग्न अवशेषांमागून, जळून गेलेल्या शाळेच्या विटकरी इमारतीपलिकडून, जंगलामधून, कमांडरच्या भुयारापलिकडून आणि "हवामान सार्जंट" जेथे काम करीत होती त्या छोट्या लाकडी खोपटाजवळून तो रस्ता जात होता. काचांची तावदाने फुटलेल्या शाळेच्या खिडक्या भकासपणे रस्त्याकडे पहात, जंगलात सूचिपर्णींच्या फांद्यांखाली इंधनाचे ट्रक लपविलेले असत, हे त्याला आठवले. म्हणजे त्याने चालण्याचा चांगला पल्ला मारला होता. खरेच चांगला!

फेऱ्यांची संख्या शेहेचाळीसपर्यंत वाढविण्याचा – सकाळी २३ आणि संध्या-काळी २३ – निर्णय मेरेस्येवने घेतला. रात्रभर विश्रांती घेतल्यानंतर सकाळी ताजेतवाने असताना कुबड्यांशिवाय चालण्याचे त्याने ठरविले. त्यामुळे खिन्न विचारांपासून त्याचे मन दुसरीकडे वळले, त्याचा उत्साह वाढला व त्याचे मन व्यवहारी विचार करू लागले. संध्याकाळी त्याने अशा काही जोमाने व्यायाम सुरू केला की, त्याला स्वतःला जाणीव होण्याच्या आतच त्याने तीस फेऱ्या पूर्ण केल्या होत्या. नेमक्या त्याच क्षणाला क्लोक-रूममधील कर्मचारी त्याच्यासाठी एक पत्र घेऊन आला. त्या छोट्या लिफाफ्यावर लिहिलेले होते: "सीनियर लेफ्टनंट मेरेस्येव. अत्यंत खाजगी." त्यातील "अत्यंत" शब्दाखाली ठळक रेघ मारलेली होती. अलेक्सेईला त्या पत्राचे दर्शन अशुभ वाटले. पत्राच्या आतमध्येही "अत्यंत खाजगी" असे लिहिले होते व ते शब्द अधोरेखित केलेले होते.

खिडकीच्या चौकटीशी रेलून अलेक्सेईने पत्राचा लिफाफा उघडला व आतील लांबलचक पत्र जेवढे तो पुढे पुढे वाचत गेला तेवढा त्याचा चेहरा





अधिक गंभीर बनला. ग्वोझ्देवने आदल्या रात्री रेल्वे स्टेशनवर ते पत्र लिहिलेले होते. त्याने म्हटले होते की, त्याच्या मनातील कल्पनेप्रमाणेच आन्यूता प्रत्यक्ष दिसायला होती, कदाचित मॉस्कोमधील ती सर्वांत सुंदर मुलगी होती, आपल्या भावाला भेटावे तशी ती त्याला भेटली व त्याला ती पूर्वीपेक्षाही जास्त आवडू लागली होती.

"...पण आपण ज्या विषयावर बोललो होतो, नेमके तसेच घडले. ती खूप चांगली मुलगी आहे. ती चकार शब्दाने काही बोलली नाही अथवा कसलीही सूचकता तिने व्यक्त केली नाही. एखाद्या विटेसारखी ती वागली. पण मी आंधळा नाही. माझ्या विद्रूप चेहऱ्याला पाहून ती घाबरल्याचे मी पाहिले. सारे काही ठीक भासायचे, पण अचानक ती माझ्याकडे रोखून पहात असलेली माझ्या ध्यानात यायचे. त्या नजरेत शरम असायची किंवा भीती असायची, अथवा माझ्याबद्दलची कीव असायची... नक्की काय ते मला नाही सांगता येणार... मला ती आपल्या विद्यापीठात घेऊन गेली. मी गेलो नसतो तर बरे झाले असते. सगळ्या विद्यार्थिनी माझ्या भोवती गोळा झाल्या होत्या आणि माझ्याकडे टक लावून पहात होत्या... तुझा विश्वास बसेल? त्यांना आपणा सर्वांची माहिती होती! आन्यूताने त्यांना आपली सगळी माहिती सांगितलेली होती... ती त्यांच्याकडे अपराधी मुद्रेने पहात असलेली मला जाणवले. जणू तिला म्हणायचे होते: 'ही भयानक गोष्ट इथं आणल्याबद्दल मला क्षमा करा!' पण आल्योशा, महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिने आपल्या भावना लपवायचा प्रयत्न केला. ती माझ्याशी खूप चांगली आणि दयाळूपणाने वागली. सारखी बोलत राहिली होती. जणू थांबायची तिला भीती वाटत होती. मग आम्ही तिच्या घरी गेलो. ती एकटी राहते. तिचे आई-वडील शहर सोडून गेले आहेत. ती प्रतिष्ठित माणसे आहेत हे स्पष्ट आहे. माझ्यासाठी आन्यूताने चहा बनविला. टेबलाशी निकेलच्या किटलीतील माझे प्रतिबिंब पाहून ती उसासे टाकीत होती. उगीच लांबड लागू नये म्हणून मी स्वतःशी विचार केला: 'हे असं काही पुढं चालणार नाही.' मी स्पष्टपणे तिला म्हणालो: 'माझं दर्शन तुला आवडलं नाही हे मला समजलंय. तुझं बरोबर आहे. मला समजू शकतं. मला त्याचा अपमान वाटलेला नाही.' तिचे डोळे आसवांनी डबडबले. पण मी तिला म्हणालो: 'रडू नको. तू चांगली मुलगी आहेस. कुणीही तुझ्या प्रेमात पडेल. कशाला स्वतःच्या आयुष्याला उध्वस्त करतेस?' मग मी तिला सांगितले:

'माझं दिव्य सौंदर्य आता तू पाहतेच आहेस. विचार कर. मी माझ्या तुकडीत परत जातो आणि तिथून माझा पत्ता मी तुला पाठवीन. जर तुझं मन पालटलं नाही तर मला पत्र लिही.' शिवाय मी तिला असेही म्हणालो : 'जे तुला करावंसं वाटत नाही असं काहीही स्वतःहून करू नको. मी आज इथं तर उद्या तिथं. आम्ही युद्ध लढतोय.' अर्थात ती म्हणाली : 'नाही!. नाही!' आणि रडायला लागली. त्याच क्षणाला हवाई हल्ल्याचा इशारा देणारा भोंगा वाजू लागला. ती बाहेर गेली आणि त्या गोंधळाचा फायदा घेऊन मी निसटलो व थेट अधिकाऱ्यांच्या रेजिमेंटकडे गेलो. त्यांनी मला ताबडतोब नेमणूक-पत्र दिले. आता सर्व काही ठीक आहे. माझ्यापाशी आगगाडीचे तिकीट आहे आणि लौकरच मी इथून जाईन. पण आल्योशा, मला तुझ्यापाशी कबूल केले पाहिजे की, पूर्वीपेक्षाही जास्त मी तिच्या प्रेमात पडलो आहे आणि तिच्याविना मी कसा जगू शकेन तेच मला माहीत नाही."

अलेक्सेईने आपल्या मित्राचे पत्र वाचले तेव्हा त्याला आपल्या स्वतः-च्याच भविष्यात डोकावून पाहिल्यासारखे वाटले. त्याच्या बाबतीतही असेच घडणार होते यात काही शंका नव्हती. ओल्गा त्याला दूर लोटणार नव्हती, त्याच्यापासून पाठ फिरविणार नव्हती. तिनेसुद्धा काहीतरी उदात्त त्याग केला असता, त्याच्याशी ती दयाळूपणे वागली असती; डोळ्यांमधून आसू वाहात असतानाही तिने चेहऱ्यावर स्मित राखले असते आणि आपल्या मना-तील नावड दाबून टाकायचा प्रयत्न केला असता.

"छे:, छे:! मला हे असं घडायला नकोय्!" तो उद्‌गारला.

लंगडत लंगडत तो वॉर्डात परतला आणि ओल्गाला पत्र लिहिण्यासाठी टेबलापाशी बसला. एक तुटक, थंड, रोख-ठोक व्यवहारी पत्र लिहिण्याचा त्याचा इरादा होता. खरे सांगण्याची त्याची हिंमत झाली नाही. कशासाठी त्याने खरे लिहायचे? त्याची आई खूप आजारी होती आणि तिच्या दुःखात त्याने आणखी भर कशाला टाकायची? त्याने ओल्गाला लिहिले की, त्यांच्या एकमेकांच्या नात्याविषयी त्याने खूप विचार केला होता व शेवटी तो अशा निष्कर्षाला पोहोचला होता, की तिला वाट पाहणे खूप कठीण जात असावे. युद्ध केव्हा संपेल हे कुणालाच माहीत नव्हते, पण काळ आणि यौवन भरा-भरा सरत होते. युद्ध ही अशी एक गोष्ट आहे, जिच्यात वाट पाहण्याला काहीही अर्थ नव्हता. तो ठार होण्याची शक्यता होती आणि बायको न

ोताच ती विधवा बनली असती. किंवा त्याहूनही वाईट म्हणजे तो युद्धात अपंग बनेल आणि तिला पांगळ्याशी लग्न करावे लागेल. काय त्याचा उपयोग? तिने आपले तारुण्य वाया घालवू नये आणि त्याला लौकरात लौकर विसरून जावे. तिने ह्या पत्राला उत्तर पाठविण्याची गरज नव्हती. तिने पत्राला उत्तर पाठविले नाही तरी त्याचे तो वाईट मानून घेणार नव्हता. तिची परिस्थिती तो समजू शकत होता. पण ते मान्य करायला त्याला कठीण जात होते हे खरे. तरीही त्या मार्गाने जाणे इष्ट होते.

ते पत्र त्याच्या हातांना जणू भाजून काढत होते. मजकुरावर पुन्हा नजरही न फिरविता त्याने चटकन लिफाफा बंद केला व भराभरा लंगडत, उड्या मारीत कॉरीडॉरमधील पाण्याच्या बंबामागील निळ्या टपालपेटीत त्याने ते पत्र टाकले.

वॉर्डात परत येऊन तो टेबलापाशी पुन्हा बसला. कुणाला तो आपले दुःख सांगू शकत होता? अर्थात त्याच्या आईला नव्हे. ग्वोझ्देवला? होय, त्याने सर्व काही समजून घेतले असते. पण तो होता कुठे? युद्धआघाडीकडे जाणाऱ्या असंख्य रस्त्यांच्या जंजाळात त्याला कुठे शोधायचे? त्याच्या तुकडीला लिहायचे? पण रोज युद्धात गुंतलेल्या त्या सुदैवी लोकांना त्याची चिंता करीत बसायला वेळ होता? "हवामान सार्जंट"ला? खरेच, तिने त्याला समजून घेतले असते. त्याने तात्काळ पत्र लिहायला आरंभ केला आणि शब्द भराभरा येऊ लागले. मित्राला मिठी घातल्यानंतर डोळ्यातून भराभरा आसवे ओघळतात त्याप्रमाणे. अचानक एका वाक्याच्या मध्यभागी तो थांबला, क्षणभर त्याने विचार केला, पत्र चुरगाळून टाकले व नंतर फाडून टाकले.

"लेखकाच्या यातनेइतकी दुसरी वाईट यातना नाही," स्त्रूच्कोव आपल्या नेहमीच्या कुचेष्टेच्या स्वरात म्हणाला.

तो बिछान्यात उठून बसला होता व त्याच्या हाती ग्वोझ्देवचे पत्र होते. अलेक्सेईच्या खाटेजवळच्या कपाटामधून त्याने ते पत्र उचलले होते व वाचले होते.

"आज प्रत्येकाला झालंय तरी काय?.. आणि ग्वोझ्देवसुद्धा तसाच! काय मूर्ख तरी! पोरीनं नाकाचा शेंडा वर केला, म्हणून ह्याला रडू कोसळलंय! मानसशास्त्रीय विश्लेषण. हे पत्र मी वाचलं म्हणून तू रागावला तर नाहीस ना? सैनिकांमध्ये गुपितं कसली राखायची?"

अलेक्सेईला स्त्रूच्कोवचा राग आला नव्हता. त्याच्या मनात विचार येत

होता : " उद्या पोस्टमन येईपर्यंत वाट पहावी आणि तो पेटी उघडील तेव्हा ते पत्र परत घ्यावे काय ? "

त्या रात्री अलेक्सेईला नीट झोप लागली नाही. प्रथम त्याला स्वप्न पडले की बर्फाने माखलेल्या एका विमानतळावर तो होता. तेथे विचित्र बनावटीचे " ल-५ " विमान उभे होते. त्या विमानाला चक्क पक्ष्याचे पाय होते. यूरा मेकॅनिक कॉकपिटमध्ये चढला आणि म्हणाला की, अलेक्सेईचे " उड्डाणाचे दिवस संपले आहेत " आणि आता उड्डाण करण्याची त्याची पाळी होती. मग त्याला स्वप्न पडले की, गवताच्या गादीवर तो निजला होता आणि पांढऱ्या सदऱ्यातील व ओल्या विजारीतील मिखाईल आजोबा अलेक्सेईच्या शरीराला वाफेचे स्नान घालीत हसत म्हणत होते : " तुझ्या लग्नाआधी हे असं वाफेचं स्नान केलंच पाहिजे ! " अगदी पहाटेपूर्वी ओल्गा त्याच्या स्वप्नात आली. उपड्या होडीवर ती बसली होती. तिचे वळकट, घाटदार, उन्हात करपलेले पिंगट पाय पाण्यात सोडलेले होते. तिची आकृती सडपातळ आणि तेजस्वी दिसत होती. ऊन लागू नये म्हणून एका हाताचा तिने आपल्या डोळ्यांवर आडोसा धरला होता व हसत हसत दुसऱ्या हाताने ती त्याला स्वतःपाशी येण्याबद्दल खुणावत होती. तो तिच्याकडे पोहत जाऊ लागला, पण पाण्याच्या प्रवाहाला खूप जोर होता. त्या खळवळत्या प्रवाहाने त्याला किनाऱ्यापासून आणि ओल्गापासून दूर नेले. त्याने आपले हात-पाय जोर-जोराने हलविले, अंगातील सारी शक्ती एकवटून तो तिच्या जवळ जवळ जाऊ लागला... वाऱ्यावर उडणाऱ्या तिच्या केसांच्या बटा त्याला दिसू लागल्या होत्या, तिच्या पिंगट पायांवर चमकणारे पाण्याचे थेंब त्याच्या दृष्टीस पडू लागले होते...

आणि त्याला जाग आली. त्याचे मन प्रसन्न होते. डोळे मिटून खूप वेळपर्यंत तो पडून राहिला. ते रम्य स्वप्न पुन्हा दिसेल अशा आशेने त्याने झोपण्याचा प्रयत्न केला. पण तसे फक्त लहानपणी घडते. स्वप्नात पाहिलेल्या त्या कृश, पिंगटवर्णी मुलीमुळे सर्व गोष्टी जणू एकदम उजळून निघाल्या होत्या.

तो चिंता करीत बसणार नव्हता, उदास राहणार नव्हता, तर प्रवाहाच्या विरुद्ध ओल्गाकडे पोहत जाणार होता. सर्व शक्ती एकवटून, काय वाट्टेल ते झाले तरी तो पोहत पोहत तिच्यापाशी पोहोचणार होता. पण त्या पत्राचे काय ? पत्राच्या पेटीपाशी जाऊन पोस्टमनची वाट पाहण्याचा

...। विचार होता. पण तो विचार त्याने बदलला आणि हात उडवीत ... ...शीच म्हणाला : "जाऊं दे. खऱ्या प्रेमाला ते घाबरवणार नाही!" ... त्याचा खऱ्या प्रेमावर विश्वास बसला होता. तो सुखात अथवा दुःखात ..., धडधाकट वा आजारी असला, तो कोणत्याही परिस्थितीत असला ... प्रेम त्याची वाट पहात होते ह्या जाणीवेने त्याला नवे बळ प्राप्त झाले.

त्या सकाळी त्याने कुबड्यांविना चालण्याचा प्रयत्न केला. सावधपणे ... बिछान्यावरून उठला, दोन पायांमध्ये अंतर ठेवून उभा राहिला. आपल्या ...ल्या हातांनी तोल राखण्याचा तो आटोकाट प्रयत्न करीत होता. ...ला धरून त्याने एक पाऊल टाकले. कृत्रिम पायाचे कातडे करकरले. ...च्या शरीराला झोका बसला, पण हातांच्या साहाय्याने त्याने तोल राखला. ...ही भिंतीला धरून त्याने दुसरे पाऊल टाकले. चालणे एवढे कष्टाचे ... अवघड असेल याची त्याला कधी कल्पनाच नव्हती. लहानपणी तो ...काठीवर चालायला शिकला होता. प्रथम तो भिंतीशी पाठ टेकवायचा, ...काठीवर चढायचा आणि मग भिंतीला रेटा देऊन एकेक पाऊल पुढे ...ना. पण त्याच्या शरीराचा तोल जायचा व घोडेकाठीवरून तो खाली ... पडायचा. उपनगरातील गवत वाढलेल्या रस्त्यावर ती घोडेकाठी पडून ...ी. घोडेकाठीवर चालायला शिकणे तितकेसे वाईट नव्हते, कारण ... नाही तर खाली उडी मारता यायची. पण कृत्रिम पाय फेकून उडी ... शक्य नव्हते. जेव्हा त्याने तिसरे पाऊल टाकले तेव्हा त्याच्या शरीराचा ... गेला, त्याचे पाय सरकले व धाडदिशी तो खाली पालथा पडला.

इतर रुग्ण जेव्हा आपापल्या उपचारांसाठी जात व वॉर्डात दुसरे कुणीही ... अशी वेळ अलेक्सेईने आपल्या व्यायामांसाठी निवडलेली होती. त्याने ...साठी हाक मारली नाही. तो भिंतीपर्यंत रांगत गेला आणि भिंतीचा ...र घेऊन हळू हळू आपल्या पायांवर उभा राहिला. पडल्यामुळे दुखणारी ... त्याने चोळली; त्याच्या हाताच्या कोपऱ्याला झालेली जखम आता ... दिसू लागली होती. दात आवळून त्याने भिंतीला रेटा देत आणखी ... पाऊल टाकले. त्याला ही युक्ती जमल्याचे दिसले. त्याचे कृत्रिम पाय ...सामान्य पायांप्रमाणे लवचिक नव्हते, हा फरक होता. त्यांचे गुणधर्म ... त्याच्या परिचयाचे झाले नव्हते. चालण्याच्या प्रक्रियेत आपल्या पायांची ... बदलण्याची सवय अजून त्याला झाली नव्हती. पाऊल टाकताना ...ने वजन टाचेपासून अंगठ्यापर्यंत बदलले पाहिजे, दुसरे पाऊल टाकताना

अंगठ्यापासून टाचेपर्यंत देहाचा भार बदलला पाहिजे, तसेच पाय एकमेकांशी समांतर न राखता कोनात ठेवले पाहिजेत, अंगठे वर ठेवले म्हणजे चालताना देहाचा तोल अधिक राहतो, ह्या गोष्टी त्याला अद्याप अंगवळणी पडल्या नव्हत्या.

माणूस ह्या सगळ्या गोष्टी आपल्या बाळपणात शिकत असतो. आपल्या आईच्या देखरेखीखाली आपल्या छोट्या, दुबळ्या पायांनी पहिली वेडीवाकडी पावले टाकताना हे सर्व शिकत असतो. ह्या सवयी पुढे आयुष्यभर अंगवळणी पडतात व ती एक स्वाभाविक प्रक्रिया बनते. मात्र माणसाला जेव्हा कृत्रिम अवयवांचा वापर करणे भाग पडते तेव्हा लहानपणी अवगत केलेल्या ह्या सवयी साह्यकारी न ठरता उलट त्याच्या हालचालींमध्ये अडथळा आणतात. नव्या सवयी अवगत करायला शिकताना त्याला जुन्या सवयींशी सामना करावा लागतो. पांगळे बनलेल्या अनेक लोकांपैकी ज्यांच्याजवळ पुरेशा निर्धाराचा अभाव आहे असे लोक पुन्हा कधीही चालायला शिकू शकत नाहीत.

मेरेस्येवने स्वतःसमोर उद्दिष्ट ठेवले व ते पूर्ण करण्याचा त्याने निर्धार केला. पहिल्या प्रयत्नातील चूक त्याच्या ध्यानात आली व त्याने पुन्हा प्रयत्न केला. यावेळी त्याने आपल्या कृत्रिम पायाचा अंगठा वर वळविला, टाच टेकली आणि मग साऱ्या शरीराचा भार अंगठ्यावर फेकला. कातडे जोराने करकरले. ज्या क्षणी शरीराचे वजन अंगठ्यावर गेले त्याच क्षणी अलेक्सेईने फरशीवरून दुसरा पाय उचलला आणि पुढे टाकला. फरशीवर टाच आदळली. आता तो भिंतीपासून दूर उभा होता. आपल्या पसरलेल्या हातांवर त्याने शरीराचा तोल सांभाळला होता. पुढचे पाऊल टाकण्याची त्याची हिंमत होत नव्हती. शरीराला झोके देत तो तेथे उभा होता, तोल सांभाळायचा प्रयत्न करीत होता. आपल्या नाकावर घामाचे बिंदू तरारल्याचे त्याला जाणवत होते.

अशा त्या क्षणाला वासिली वासिल्येविच नेमके तेथे आले होते. दाराशी उभे राहून त्यांनी अलेक्सेईला पाहिले, मग पुढे होऊन त्याला त्यांनी बगलेत आधार दिला व ते उद्गारले:

"शाब्बास! चांगली प्रगती आहे. नर्स किंवा ऑर्डर्लीला मदतीला न घेता तू एकटा का आहेस? स्वाभिमान वाटतं... हरकत नाही. प्रत्येक बाबतीत पहिलं पाऊल फार महत्त्वाचं असतं आणि तो सर्वांत अवघड भाग तू पार केला आहेस!"

गाच्या जरा आधी, वासिली वासिल्येविच यांची एका अत्यंत महत्त्वाच्या [illegible] संस्थेच्या प्रमुखपदी नेमणूक झाली होती. ते काम फार मोठे [illegible] आणि त्यात त्यांचा प्रचंड वेळ खर्च होई. इस्पितळातील आपले काम [illegible] त्यांना भाग पडले होते. पण हा जुना अनुभवी माणूस अद्यापही [illegible] होता आणि इस्पितळाचा कारभार आता दुसरे लोक चालवीत [illegible] तरीही वासिली वासिल्येविच दररोज इस्पितळात येत आणि वेळ [illegible] म्हणजे वॉर्डमध्ये फेरी मारून सल्ला देत. मात्र मुलाच्या निधनानंतर [illegible] होते. त्यांचा पूर्वीचा बंडखोर उल्हास नाहीसा झाला होता. [illegible] ते ओरडत नसत, चिडत नसत. त्यांना जी माणसे उत्तम ओळखत [illegible] ती म्हणत की, त्यांचे वय झाल्याचे हे लक्षण होते.

"[illegible] मेरेस्येव, आता हे आपण एकत्र शिकू या," त्यांनी प्रस्ताव मांडला. [illegible] बरोबरीच्या मंडळींकडे वळून ते म्हणाले: "तुम्ही जा पुढं. ही [illegible] नाही. इथं पहात बसण्यासारखं काहीही नाही. माझ्याशिवायच [illegible] पुरं करा." मग पुन्हा मेरेस्येवला उद्देशून ते म्हणाले: "तर पोरा... [illegible] मला, पकड! लाजू नको. मी जनरल आहे आणि तू माझं [illegible] पाहिजे. दोन! बरोब्बर. आता उजवा पाय. छान! डावा! [illegible]!"

[illegible] विख्यात सर्जनने आनंदाने आपले हात चोळले. जणू माणसाला [illegible] शिकविणे म्हणजे त्यांचा कुठलातरी अत्यंत महत्त्वाचा प्रयोग चालला [illegible]! पण त्यांचा स्वभावच असा होता. प्रत्येक गोष्ट ते उत्साहाने करीत [illegible] करताना आपले सर्वस्व तिच्यात ओतीत. मेरेस्येवला त्यांनी सबंध [illegible] लावले. शेवटी पूर्ण थकून अलेक्सेई जेव्हा खुर्चीत धपकन [illegible] दुसरी खुर्ची ओढून घेऊन ते त्याच्याशेजारी बसले व म्हणाले:

"[illegible] मग आपण विमान उडवणार? मला वाटतं, उडवणार! माझ्या [illegible] हात तुटलेल्या माणसांनी आपल्या कंपन्यांचं चढाईत नेतृत्व [illegible], [illegible] घायाळ असताना मशिनगन चालविल्या आहेत, शत्रूच्या [illegible] आपल्या देहांना आडवं टाकून बंद पाडलंय... फक्त [illegible] तेवढी लढत नाहीत." त्यांच्या वृद्ध चेहऱ्यावर एक विषादाची [illegible] आणि उसासा टाकीत ते पुढे म्हणाले: "पण मेलेलेसुद्धा [illegible] त्यांच्या कीर्तीनं. आता तरुण गृहस्था, परत सुरू करू या."

[illegible] दुसरी फेरी मारल्यानंतर जेव्हा अलेक्सेई विश्रांतीसाठी थांबला

तेव्हा प्राध्यापकांनी ग्वोझ्देव पूर्वी ज्या बिछान्यावर होता तिकडे बोट दाखवीत विचारले :

"तो रणगाडावाला कुठं आहे? इथून गेला?"

ग्वोझ्देव बरा झाला आणि परत आपल्या तुकडीत गेला, असे मेरेस्येवने त्यांना सांगितले. एकच उणीव त्याच्या बाबतीत राहिली होती व ती म्हणजे भाजल्याच्या जखमांनी त्याचा चेहरा फार विद्रूप बनविला होता, विशेषत: खालचा भाग.

"त्यानं तुला एव्हाना पत्र लिहिलं तर? पोरी त्याच्यावर प्रेम करत नाहीत म्हणून तो घायाळ आहे असं मला वाटतं. त्याला दाढी-मिशा राखायला सांग. खरंच, मी गंभीरपणं सल्ला देतोय. त्यामुळे त्याचा चेहरा तेवढा वाईट दिसणार नाही आणि पोरी त्याच्यावर फिदा होतील."

एक नर्स धापा टाकीत वॉर्डात आली आणि जन-कमिस्सार मंडळाकडून फोन आल्याचा निरोप तिने वासिली वासिल्येविचना दिला. प्राध्यापक जडपणे उठले. ज्या पद्धतीने त्यांनी आपले गुबगुबीत, सालटी गेलेले पंजे आपल्या गुडघ्यांवर ठेवले आणि तसे करताना पाठ ज्या पद्धतीने वाकविली, त्यावरून गेल्या काही आठवड्यांमध्ये ते एकदम किती म्हातारे झाले होते ते दिसून आले. दारापाशी गेल्यानंतर त्यांनी मागे वळून मेरेस्येवकडे पाहिले व आनंदी सुरात ते म्हणाले.

"तर लिहायला विसरू नको... काय त्याचं नांव... तुझा मित्र... त्याला सांग की मी त्याच्यासाठी दाढी राखायचा उपचार दिलाय. हा उपचार याआधी हमखास गुणकारी ठरलाय... शिवाय महिलावर्गात फार लोकप्रिय!"

त्याच संध्याकाळी, क्लिनिकमधील एक जुना सेवक मेरेस्येवसाठी चालण्याची काठी घेऊन आला. जुन्या शिसवीच्या लाकडाची ही सुबक काठी होती, तिला हस्तीदंती सुरेख मूठ होती व तिच्यावर आद्याक्षरे कोरलेली होती.

"प्राध्यापकांनी तुमच्यासाठी धाडलीय," सेवक म्हणाला. "वासिली वासिल्येविचनी. ही त्यांची स्वत:ची काठी आहे. तुम्हाला भेट म्हणून पाठवलीय. ही काठी घेऊन चाला असं त्यांनी सांगितलंय."

त्या उन्हाळी संध्याकाळी इस्पितळात इतरत्र काही विशेष घडलेले नव्हते. त्यामुळे उजवीकडील, डावीकडील आणि वरच्या मजल्यावरील रुग्णांचीसुद्धा वॉर्ड नंबर बेचाळीसकडे पावले वळली होती: प्राध्यापकांनी दिलेली भेट पहायला. ती काठी खरेच खूप सुरेख होती.

युद्धआघाडीवर वादळापूर्वीची शांतता रखडत होती. स्थानिक महत्त्वाच्या [illegible]ांची व टेहळणी पथकांमधील चकमकींची माहिती वार्तापत्रे देत होती. [illegible] इस्पितळातील रुग्णांची संख्या पूर्वीपेक्षा कमी झाली होती व म्हणून [illegible]ीस नंबरच्या वॉर्डातील मोकळ्या खाटा काढून टाकण्याचा हुकूम [illegible]नी दिला होता. आता वॉर्डात फक्त मेरेस्येव आणि मेजर स्त्रूच्कोव [illegible]. मेरेस्येवची खाट उजव्या बाजूला होती, तर मेजरची खाट डावीकडे, [illegible]राचा देखावा दिसणाऱ्या खिडकीपाशी होती.

[illegible]हळणी पथकांमध्ये चकमकी! मेरेस्येव आणि स्त्रूच्कोव अनुभवी सैनिक [illegible] ही शांतता जितकी अधिक काळ, ही ताणलेली स्तब्धता जेवढी [illegible], तेवढे त्यानंतर येणारे वादळ महाभयानक असणार, ह्याची त्यांना [illegible] होती.

[illegible] दिवस वार्तापत्रामध्ये नेमबाज स्तेपान इवूश्किन ह्या सोविएत संघाच्या [illegible]ाबाच्या मानकऱ्याचा निर्देश होता. ह्या वीराने दक्षिण आघाडीवर [illegible] पंचवीस जर्मन ठार केले होते व एकूण दोनशे शत्रू मारल्याचा [illegible] पूर्ण केला होता. ग्वोझ्देवकडून पत्र आले होते. तो कोठे होता आणि [illegible]ीत होता याचा अर्थातच त्याच्या पत्रात उल्लेख नव्हता. पण आपल्या [illegible] कमांडरच्या–पावेल अलेक्सेयेविच रोतमिस्त्रोवच्या–तुकडीत परत [illegible] आल्याचे त्याने लिहिले होते. आपण आयुष्याबाबत समाधानी आहोत, [illegible]ात तेथे खूप चेरी फळे आहेत, सर्वजण आकंठ चेरी खात आहेत, [illegible] पत्रात म्हटले होते. हे पत्र मिळाल्यानंतर आन्यूताला कळवावे [illegible] अलेक्सेईला विनंती केली होती. त्याने तिलाही पत्र पाठविल्याचे [illegible], पण त्याची पत्रे तिच्यापर्यंत पोहोचत होती अथवा नाही, याची [illegible] वाटत नव्हती.

[illegible] दोन बातम्यांमुळे जाणकार लष्करी माणसाला सहज समजत होते [illegible] कोठेतरी वादळाला तोंड फुटणार होते. अलेक्सेईने आन्यूताला [illegible] पत्र लिहिले व दाढी राखण्याचा प्राध्यापकांचा सल्लाही त्याने [illegible] कळविला. पण त्याला कल्पना होती की, आगामी लढाईच्या धाम-[illegible] ग्वोझ्देव गुंतलेला होता. ही अवस्था प्रत्येक सैनिकाला चिंताक्रांत [illegible], तशीच आनंदीही बनवीत असते. तेव्हा दाढीवाबत अथवा

आन्यूतावाबतही विचार करायला ग्वोझ्देवला सवड सापडत असेल किंवा नाही, याबाबत अलेक्सेई साशंक होता.

वॉर्ड बेचाळीसमध्ये आणखी एक आनंददायी घटना घडली. मेजर पावेल इवानोविच स्त्रूच्कोव यांना सोविएत संघाचे वीर असा किताब बहाल करण्यात आल्याचा हुकूमनामा प्रसिद्ध झाला. पण ह्या आनंदी वार्तेनेंही मेजरची कळी फार काळपर्यंत खुलली नाही. तो पुन्हा निराशेच्या गर्तेत कोसळला व आपल्या फुटलेल्या गुडघ्यांच्या वाटचांना शिव्याशाप मोजू लागला. अशा धामधुमीच्या काळात त्या फुटक्या गुडघ्यांमुळे आपण अंथरुणाला बांधून पडलो आहोत, याचा त्याला राग येत होता. त्याच्या निराश मन:स्थितीचे आणखीही एक कारण होते व ते लपवून ठेवण्याचा तो प्रयत्न करीत होता. पण अलेक्सेईला ते अगदी अनपेक्षितरीत्या समजले.

चालायला शिकणे एवढ्या एकाच गोष्टीवर त्याचे मन केंद्रित झाले होते. त्यामुळे भोवताली काय चालले होते याकडे त्याचे फारसे लक्ष नसे. स्वत:च आखून घेतलेल्या दैनंदिन कार्यक्रमानुसार तो काटेकोरपणे जगत होता. दररोज तीन तास—सकाळी एक तास, दुपारी एक तास आणि संध्याकाळी एक तास—आपल्या कृत्रिम पायांवर कॉरीडॉरमध्ये चालण्याचा सराव तो करीत होता. घड्याळाच्या लंबकाप्रमाणे नियमितपणे फेऱ्या घालणारी निळ्या गाऊनमधील त्याची आकृती आपल्या वॉर्डच्या उघड्या दारांमधून जाताना पाहून व कॉरीडॉरमध्ये घुमणारा त्याच्या कृत्रिम पायांचा प्रतिध्वनी ऐकून, आरंभी आरंभी इतर पेशंट त्याच्यावर कातावले होते. पण नंतर त्यांना ह्याची इतकी सवय झाली की, त्यांच्या दारांसमोरून ही आकृती दिवसाच्या विशिष्ट वेळी न गेली, तरच त्यांना चुकल्या चुकल्यासारखे वाटले असते. आणि खरेच एक दिवशी मेरेस्येवला फ्लू झाला तेव्हा पाय नसलेल्या लेफ्टनंटला काय झाले, अशा विचारणा वेगवेगळ्या वॉर्डांमधून आल्या.

सकाळी अलेक्सेई शारीरिक व्यायाम घ्यायचा आणि नंतर खुर्चीवर बसून, विमान चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या पायांच्या हालचालींचा सराव करायचा. काही वेळा तर चक्कर येईपर्यंत तो हा सराव करायचा. त्याच्या कानात आवाज घुमू लागेपर्यंत, डोळ्यांसमोर हिरवी वर्तुळे चमकू लागेपर्यंत, पायांखालची जमीन एकदम वर उचलल्याचा भास होईपर्यंत तो व्यायाम चालू ठेवायचा. असे घडले म्हणजे नळापाशी जाऊन डोक्यावर

गार पाण्याचा शिडकावा मारायचा व थोडा वेळ स्वस्थ पडून रहायचा चालण्याचा आणि कसरतींचा तास चुकू नये याबद्दल तो दक्ष असे.

त्या दिवशी चक्कर येईपर्यंत चालण्याचा व्यायाम त्याने केला. वॉर्डा परत येताना त्याच्या डोळयांना समोरचे काहीही दिसत नव्हते. कसाबस चाचपडत तो वॉर्डात आला व आपल्या खाटेवर कोसळला. थोडासा तो शुद्धीवर आला तेव्हा वॉर्डात कुणाच्या तरी बोलण्याचे आवाज ऐकू येत असल्याचे त्याला जाणवले. क्लावदिया मिखाइलोवनाचा शांत, उपरोधिक स्वर आणि स्त्रूच्कोवचा उत्तेजित, मनधरणी करणारा आवाज. ती दोघं आपल्या संभाषणात एवढी गुंतली होती की मेरेस्येव वॉर्डात केव्हा आला हे त्यांच्या लक्षातच आले नव्हते.

"माझ्यावर विश्वास ठेव, मी गंभीरपणानं बोलतोय! एवढं समजत नाही तुला? बाई आहेस किंवा नाहीस?"

"अर्थात मी एक स्त्री आहे, पण मला समजत नाही आणि या विषयावर मी गंभीरपणं बोलूच शकणार नाही. शिवाय, तुमच्या गंभीरपणाची मला गरज नाही."

स्त्रूच्कोवचा संयम सुटला आणि तो कर्कश्य सुरात ओरडला:

"च्यायला, माझं तुझ्यावर प्रेम आहे! तू एक स्त्री नाहीस! माझं प्रेम न दिसणारी तू एक लाकडाचा ठोकळा आहेस! समजलं आता?" असं बोलून त्याने तोंड फिरविले व खिडकीच्या तावदानावर तो बोटांनी ताल वाजवू लागला.

नेहमीच्या नर्सच्या सफाईने हलकी, सावध पावले टाकीत क्लावदिया मिखाइलोवना दाराकडे चालत गेली.

"कुठं निघालीस? मला उत्तर देणार नाहीस?"

"त्याबद्दल चर्चा करण्याची ही वेळ नव्हे आणि हे स्थळही नव्हे. मी आता कामावर आहे."

"तू सरळ बोलून का टाकत नाहीस? का माझा छळ करतेस? दे उत्तर!" मेजरच्या आवाजात आता यातनेची छटा होती.

क्लावदिया मिखाइलोवना दारापाशी थांबली. अंधाऱ्या कॉरीडॉरच्या पार्श्वभूमीवर तिची सडपातळ, डौलदार आकृती ठळक उठून दिसत होती. ही शांत दिसणारी, तारुण्य सरलेली नर्स एवढी कमनीय आणि आकर्षक असेल, असे मेरेस्येवला यापूर्वी कधी चुकूनसुद्धा वाटले नव्हते. मान मागे

झुकवून ती दारात उभी होती. जणू उंच चौथऱ्यावरून ती मेजरकडे तुच्छतेने पहात होती.

"ठीक आहे," ती म्हणाली. "देईन मी तुम्हाला उत्तर. माझं तुमच्यावर प्रेम नाही आणि कदाचित कधीही मी तुमच्यावर प्रेम करू शकणार नाही."

ती निघून गेली. मेजरने बिछान्यावर अंग झोकले व उशीत आपले डोके खुपसले. गेल्या काही दिवसांमधील मेजरच्या विचित्र वागणुकीमधील कारण मेरेस्येवला आता समजले. नर्स वॉर्डात आली म्हणजे मेजर चिडचिडा व अस्वस्थ वागायचा, त्याच्या आनंदी वागण्याचे एकदम प्रचंड रागाच्या झटक्यांमध्ये रूपांतर व्हायचे.

खरोखरीच तो मानसिक छळ अनुभवीत असावा. अलेक्सेईला त्याच्याबद्दल वाईट वाटत होते आणि त्याचवेळी आनंदही झाला होता. मेजर जेव्हा आपल्या बिछान्यावरून उठला तेव्हा त्याला चिडविण्याचा आनंद अलेक्सेईने गमावला नाही.

"कॉम्रेड मेजर, आता मी तुमच्या तोंडावर थुंकू शकतो का?"

ह्या शब्दांचा मेजरवर काय परिणाम होईल ह्याची जर त्याला आधी कल्पना असती तर चेष्टेतसुद्धा त्याने त्यांचा उच्चार केला नसता. स्त्रूच्कोव अलेक्सेईच्या खाटेपाशी वेगाने आला व निराश आवाजात ओरडला:

"थूंक! थूंक माझ्या थोबाडावर! तुझं तसं करणं योग्य ठरेल! मी त्याच लायकीचा आहे. पण आता मी काय करू? सांग! शिकव मला! तू आमचं बोलणं ऐकलंस ना?.."

तो बिछान्यावर बसला. आपल्या हातांमध्ये त्याने स्वतःचे डोके गच्च आवळून धरले होते व अंगाला तो मागे-पुढे झोके देत होता.

"मी गंमत करत होतो असं कदाचित तुला वाटेल! पण तसं नव्हतं. मी खरंच मनापासून बोलत होतो. त्या मूर्खेला खरंच मी लग्नाची मागणी घातली!"

संध्याकाळी क्लावदिया मिखाइलोवना वॉर्डात नेहमीच्या फेरीवर आली. नेहमीप्रमाणेच ती शांत, प्रेमळ आणि संयमशील होती. तिला पाहिले म्हणजे माणसाला आराम वाटायचा. मेरेस्येवकडे पाहून तिने स्मित केले आणि मेजरकडेही एक स्मित टाकले. पण मेजरकडे पाहताना तिच्या नजरेत आश्चर्य व भीती यांचे मिश्रण होते.

स्त्रूच्कोव खिडकीशी बसून दातांनी नखं कुरतडीत राहिला. क्लावादया मिखाइलोवनाच्या पावलांचा आवाज कॉरीडॉरमधून जसा विरत गेला तसे त्याने तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहिले. त्याच्या नजरेत रागांचे व कौतुकाचे मिश्रण होते.

"सोविएत देवदूत!" तो गरजला. "कुणा मूर्खानं तिला हें नांव ठेवलं? नर्सच्या झग्यातली सैतान आहे ती!"

कचेरीमधील एक हाडकुळी, मध्यमवयीन नर्स वॉर्डात आली व तिने विचारले:

"मेरेस्येव अलेक्सेई, हा चालणारा पेशंट आहे का?"

"नाही, पळणारा!" स्त्रूच्कोव खेकसला.

"मी इथं विनोदासाठी आलेले नाही," नर्स कठोर आवाजात म्हणाली. "मेरेस्येव अलेक्सेई, सीनियर लेफ्टनंट, फोनवर हवे आहेत!"

"तरुण बाई?" एकदम उत्साहाने स्त्रूच्कोवने विचारले व चिडलेल्या नर्सला डोळा मारला.

"मी तिच्या लग्नाचं सर्टिफिकीट पाहिलं नाही," नर्स फिस्कारली व ताठ्यात वॉर्डमधून तरंगत गेली.

मेरेस्येव बिछान्यावरून झपाट्याने उठला. आपल्या काठीचा मजेने ठकठक आवाज करीत त्याने नर्सला गाठले व अक्षरश: जिन्यावरून पळत तो खाली गेला. सुमारे महिनाभर तो ओल्गाच्या उत्तराची अपेक्षा करीत होता आणि त्याच्या मनात आता विचार चमकून गेला होता: कदाचित ती? पण तसे शक्य नव्हते. अशा काळात स्तालिनग्रादपासून मॉस्कोपर्यंत प्रवास करणे तिला शक्य नव्हते. शिवाय तिने त्याला इस्पितळात कसे शोधले असते? पिछाडीच्या शासकीय कचेरीत तो काम करीत होता आणि प्रत्यक्ष मॉस्कोत नव्हे, तर उपनगरात काम करीत होता, असे त्याने तिला कळविलेले होते. पण त्या क्षणाला कोणत्याही चमत्कारावर विश्वास ठेवण्याची मेरेस्येवची तयारी होती. तो आपल्या कृत्रिम पायांवर प्रथमच पळत होता याचे त्याला स्वत:लाही त्यावेळी भान नव्हते. आपली हातातील काठी तो क्वचितच टेकवीत होता आणि त्याचे बूट वाजत होते: कर्रर, कर्रर, कर्रर..

त्याने रिसीव्हर उचलला आणि एक आल्हादक, भरदार, पण पूर्णतया परका आवाज त्याला ऐकू आला. वॉर्ड नंबर बेचाळीसमधील सीनियर लेफ्टनंट अलेक्सेई पेत्रोविच मेरेस्येव तोच का अशी फोनवरील आवाजाने

पृच्छा केली. त्या प्रश्नात जणू काहीतरी अपमानास्पद होते अशा भावनेने तीक्ष्ण व रागीट स्वरात मेरेस्येव खेकसला :

"हो!"

क्षणभर स्तब्धता पसरली. नंतर थंड आणि ताणलेल्या आवाजात त्याला तसदी दिल्याबद्दल माफी मागण्यात आली. त्याच्या तुटक उत्तरामुळे त्या आवाजात हा बदल घडला होता हे उघड होते. प्रयत्नपूर्वक तो आवाज पुढे म्हणाला :

"मी आन्ना ग्रीबोवा बोलतेय, लेफ्टनंट ग्वोझ्देव यांची मैत्रीण. तुम्ही मला ओळखत नाही."

मेरेस्येवने दोन्ही हातांमध्ये रिसीव्हर पकडला आणि अगदी उंच स्वरात तो ओरडला :

"कोण? आन्यूता? आन्यूता का? मी तुम्हाला उत्तम ओळखतो! ग्रीशानं मला..."

"कुठं आहे तो? काय झालं त्याला? तो इतका अचानक निघून गेला. भोंगा वाजला म्हणून मी खोलीबाहेर गेले. मी प्रथमोपचार तुकडीत काम करते ना! परत आले, तर तो गेलेला! ना चिठी ना पत्ता मागं ठेवलेला... आल्योशा लाडक्या... माफ कर तुला अशी हाक मारते म्हणून... मीसुद्धा तुला छान ओळखते... मला त्याची काळजी लागलीय. तो कुठे आहे आणि एवढा अचानक का निघून गेला ते मला समजून घ्यायचंय..."

आपल्या अंत:करणामधून एक उबदार भावनेची लाट उमटल्याचे अलेक्सेई-ला जाणवले. आपल्या मित्राबद्दल त्याला आनंद झाला होता. तो वेडा गैरसमजूत करून गेला होता. अतिसंवेदनक्षमतेपायी! याचा अर्थ अस्सल मुली सैनिकाच्या अपंगतेला भीत नव्हत्या. याचा अर्थ त्याची काळजी वाहणारी आणि याच तऱ्हेने त्याला भेटू पाहणारी जी कुणी होती, तिच्यावर तो विसंबू शकत होता. हे विचार विद्युल्लतेच्या वेगाने त्याच्या मनात चमकून गेले. दरम्यान रिसीव्हरमध्ये तो ओरडून सांगत होता आणि अतिआनंदापायी त्याचे उच्चार तोतरे बनत होते :

"आन्यूता! सर्व काही ठीक आहे. निष्कारण गैरसमज झाला होता. तो छान आहे आणि पुन्हा आघाडीवर आहे. अर्थात! फील्ड पोस्ट ऑफिस. ४२५३१–वी. तो दाढी वाढवतोय. खरंच, आन्यूता! मस्त दाढी... पार्तीझान राखतात तशी... त्याला ती शोभून दिसते!"

आन्यूताने ग्वोझ्देवच्या दाढीबद्दल नापसंती व्यक्त केली. तो खोटेपणा होता, असे तिचे मत होते. हे ऐकून मेरेस्येवला जास्तच आनंद झाला व तो उत्तरला की, तसे असेल तर ग्रीशा एका क्षणात स्वतःची दाढी छाटून टाकील. दाढीमुळे तो जास्त देखणा दिसतो असे प्रत्येकाला वाटत असले तरीही !

सरतेशेवटी त्यांनी रिसीव्हर खाली ठेवले तेव्हा त्यांची चांगलीच गट्टी जमली होती. इस्पितळ सोडण्यापूर्वी मेरेस्येवने तिला फोन करायचा असे ठरले.

वॉर्डाकडे परत जाताना अलेक्सेईला आठवण झाली की तो टेलिफोनकडे पळत गेला होता. त्याने पुन्हा पळण्याचा प्रयत्न केला, पण जमले नाही. फक्त कृत्रिम पायांच्या सांध्यातून जोरदार कळ निघाली व सबंध शरीरभर घुमली. काही हरकत नव्हती ! आज तो पळू शकत नव्हता, तर उद्या किंवा परवा नक्की पळाला असता ! सारे काही ठीक होणार होते. तो पळू शकणार होता, विमान उडवू शकणार होता, लढू शकणार होता. प्रतिज्ञा करायची त्याला खूप हौस होती, म्हणून त्याने स्वतःशी प्रतिज्ञा केली : पहिल्या हवाई लढाईनंतर, पहिले जर्मन विमान त्याने खाली पाडल्यानंतर, तो ओल्गाला सर्व काही लिहून कळविणार होता ! मग काहीही होवो ! त्याची त्याला पर्वा नव्हती !

भाग तिसरा

१

१९४२चा उन्हाळा ऐन शीगेला पोहोचला होता. सोविएत विमान दलातील अधिकाऱ्याचा पोषाख केलेला एक बांधेसूद तरुण मॉस्कोतील लष्करी इस्पितळाच्या अवजड ओक लाकडाच्या दरवाजांमधून बाहेर पडला. त्याच्या कोटाच्या कॉलरवर सीनियर लेफ्टनंटच्या हुद्द्याच्या फिती लावलेल्या होत्या. एका भक्कम, हस्तीदंती मुठीच्या शिसवी काठीचा आधार घेऊन तो चालत होता. त्याच्याबरोबर पांढऱ्या झग्यातील एक स्त्री होती. पहिल्या महायुद्धाच्या दरम्यान परिचारिका वापरीत तसला रेडक्रॉसचे चिन्ह असलेला रुमाल तिने बांधला होता. तो रुमाल तिच्या प्रेमळ, सुंदर चेहऱ्याला खुलून दिसत होता. ती दोघे पोर्चमध्ये थांबली. वैमानिकाने आपल्या डोक्यावरील चुरगळलेली, रंग विटलेली टोपी काढली आणि त्या नर्सच्या हाताचे चुंबन घ्यायला तो अवघडलेपणाने झुकला. नर्सने त्याचे मस्तक आपल्या दोन्ही हातांमध्ये धरले व त्याच्या कपाळाचे चुंबन घेतले. त्यानंतर तो वैमानिक काहीशा दुडक्या चालीने भराभरा पायऱ्या उतरला व मागे वळून न पाहता इस्पितळाच्या लांबलचक इमारतीला लागून असलेल्या अस्फाल्टच्या नदीतीरावरून चालत गेला.

निळ्या, पिवळ्या आणि तपकिरी पायजम्यांमधील पेशंट खिडक्यांमध्ये उभे राहून हात हलवीत होते. चालण्याच्या काठ्या अथवा कुबड्या उंचावून त्याला निरोपाचे सल्ले ओरडून सांगत होते. त्याने उत्तरादाखल हात हलविला, पण त्या मोठ्या, राखाडी इमारतीपासून लौकरात लौकर दूर जाण्याची त्याला घाई झाली होती हे अगदी स्पष्ट दिसत होते. आपल्या मनातील खळबळ लपविण्यासाठी त्याने खिडक्यांपासून दूर आपले डोके वळविले. विचित्र, चवड्या पावलांवर तो भरभर चालत होता व हातातील काठीवर किंचित टेकत होता. त्याच्या प्रत्येक पावलाबरोबर जर कातड्याची मंद करकर ऐकू आली नसती, तर ह्या बांधेसूद, धिप्पाड, जोमदार माणसाला पाय नाहीत असे कुणाला समजलेही नसते.

इस्पितळामधून मुक्त केल्यानंतर अलेक्सेई मेरेस्येवला मॉस्कोजवळच्या

हवाई दलाच्या सॅनाटोरियममध्ये विश्रांतीसाठी पाठविण्यात आले होते. मेजर स्त्रूच्कोवलाही त्याच ठिकाणी धाडण्यात आले होते. त्यांना सॅनाटोरियममध्ये घेऊन जाण्यासाठी मोटार पाठविण्यात आली होती, पण मेरेस्येवने इस्पितळाच्या अधिकाऱ्यांना सांगितले होते की, त्याचे मॉस्कोत नातेवाईक होते व त्यांना भेटल्याविना तो जाऊ शकत नव्हता. आपली सामानाची थैली त्याने स्त्रूच्कोवबरोबर दिली व विजेवर चालणाऱ्या आगगाडीने संध्याकाळच्या सुमारास सॅनाटोरियममध्ये पोहोचण्याचे आश्वासन देऊन तो पायीच निघाला होता.

मॉस्कोत त्याचे नातेवाईक नव्हते. पण राजधानी पहायची त्याची फार इच्छा होती. कुणाची मदत न घेता आपल्याला किती चालता येते हे त्याला अजमावून पहायचे होते. त्याला अजिबात न ओळखणाऱ्या आणि त्याची पर्वा न करणाऱ्या लोकांच्या गर्दीत मिसळून त्याला वावरायचे होते. त्याने आन्यूताला फोन केला होता व सुमारे बारा वाजण्याच्या सुमाराला ती भेटू शकेल का, अशी विचारणा केली होती. कुठे? पूष्कीनच्या पुतळ्याशेजारी... ग्रॅनाईटच्या कठड्यांनी बांधलेल्या नदीकिनाऱ्याजवळून आता तो चालत होता. मधुर, परिचित गंधाने भरलेली उबदार उन्हाळी हवा तो मनसोक्त पीत होता.

सभोवती सारे किती छान होते!

वाटेत भेटणाऱ्या सर्व बायका त्याला सुंदर दिसत होत्या, हिरवी झाडे कमालीची तेजस्वी भासत होती. हवा एवढी गंधित होती की, मादक पेय प्यायल्याप्रमाणे त्याचे डोके गरगरायला लागले होते. वातावरण अगदी नितळ होते आणि अंतराचे भान तो हरपला. आजपर्यंत केवळ चित्रांमध्ये पाहिलेल्या क्रेमलिनच्या तटबंदीला, महान इवानच्या घंटा-बुरुजाला आणि नदीच्या पाण्यावर ओठंगलेल्या पुलाच्या प्रचंड, सखल कमानीला नुसता हात लांब करताच आपण स्पर्श करू शकू, असे त्याला वाटत होते. शहरभर पसरलेल्या मधुर, मादक गंधाने त्याला आपले बालपण आठवले. तो गंध कोठून येत होता? त्याच्या काळजाची एवढ्या वेगाने धडधड का होत होती? त्याला त्याची आई का आठवत होती? तिचे सध्याचे सुकलेले, वृद्ध रूप नव्हे, तर तरुण, उंच व भव्य केशसंभार असलेले! मॉस्कोत तो तिच्याबरोबर कधीही आलेला नव्हता.

अगदी आत्तापर्यंत मेरेस्येवला राजधानीची ओळख होती केवळ मासिकां-

गधील आणि वर्तमानपत्रांमधील चित्रांमार्फत, पुस्तकांमार्फत. ज्यांनी राजधानीला भेट दिली होती त्यांच्या कथनांमार्फत. झोपलेल्या जगावर मध्यरात्रीचे मंद टोल देणाऱ्या प्राचीन घड्याळामार्फत. सणाच्या दिवशी मिरवणुकांमधून येणारे विविध आवाज प्रक्षेपित करणाऱ्या रेडिओमार्फत. आणि आता ती राजधानी त्याच्यासमोर प्रत्यक्ष पसरलेली होती. उबदार उन्हाळी सूर्यप्रकाशात सुंदर चमकत होती.

. क्रेमलिन भिंतीलगतच्या निर्मनुष्य नदीकिनाऱ्याने तो चालत गेला. विसावा घेण्यासाठी ग्रॅनाईटच्या थंड बांधाला टेकून थांबला. ग्रॅनाईटच्या भिंतीच्या पायथ्याशी लाटांच्या थपडा मारणाऱ्या राखाडी, तेलकट पाण्याकडे टक लावून पहात राहिला. मग लाल चौकाकडे जाणारे टेकाड तो हळू हळू चढू लागला. अस्फाल्टच्या रस्त्यांकडेची आणि चौकांमधील लिंबोणीची झाडे बहरली होती. त्यांच्या मधुर गंधित फुलांच्या झुपक्यांवर भुंगे गुणगुणत होते. येणाऱ्या जाणाऱ्या मोटारींच्या कर्ण्यांकडे, ट्रामगाड्यांच्या खडखडाटाकडे, तापलेल्या अस्फाल्टमधून उमटणाऱ्या, पेट्रोलच्या वाफांनी भरलेल्या चमचमत्या धूसरतेकडे त्यांचे पूर्ण दुर्लक्ष होते.

मॉस्को हे असे होते!

चार महिने इस्पितळात काढल्यानंतर, ह्या उन्हाळ्यातील सौंदर्याने अलेक्सेई एवढा चकित झाला होता की, राजधानी युद्धवेषात होती हे आरंभी त्याच्या लक्षातच आले नाही. हवाई दलाच्या परिभाषेत सांगायचे म्हणजे "पहिल्या क्रमांकाच्या तयारीत" होती. याचा अर्थ शत्रूशी कोणत्याही क्षणी भिडायला सज्ज होती. पुलानजीकचा रुंद रस्ता एका मोठ्या, बेढब अडथळ्याने अडविलेला होता. वाळूने भरलेले लाकडी खोके तेथे ठेवलेले होते. पुलाच्या कोपऱ्यांशी चार जंजीरींसह उभारलेल्या चौकोनी, कॉंक्रीटचे तोफांचे मोर्चे लहान मुलाने टेबलावर मांडलेल्या खेळण्यातील ठोकळ्यांप्रमाणे दिसत होते. लाल चौकाच्या राखाडी पृष्ठभागावर विविध रंगांमध्ये घरे, हिरवळी आणि दुतर्फा झाडीचे रस्ते रंगविलेले होते. गोर्की रस्त्यावरील दुकानांच्या खिडक्यांपाशी वाळूच्या पोत्यांचे ढीग रचलेले होते. गल्ल्या-बोळांमधून रुळांपासून बनविलेली गंजकी "साळिंदरे" पडली होती. तीसुद्धा मुलांनी टाकलेल्या खेळण्यांसारखी भासत होती. युद्धआघाडीवरून आलेल्या व पूर्वी मॉस्को न पाहिलेल्या सैनिकाला यात विशेष असे काहीच वाटत नव्हते. त्याला फक्त आश्चर्य वाटले असते 'तास' वृत्तसंस्थेच्या वार्ताफलकांचे. दुकानांच्या

खिडक्यांना आणि काही घरांच्या दर्शनी भागांना चमत्कारिक रीतीने रंगविण्यात आले होते. त्यांना पाहून नवचित्रकलेची आठवण होत होती.

मेरेस्येव एव्हाना चांगलाच दमला होता. बूट करकर वाजवीत आणि काठीवर पूर्वीपेक्षा जास्त भार देत गोर्की रस्त्यावरून चालला होता. तेथे बाँबस्फोटांचे खड्डे नव्हते, इमारती उध्वस्त नव्हत्या, भगदाडे व फुटक्या खिडक्या नव्हत्या, हे पाहून त्याला आश्चर्य वाटत होते. पश्चिमेकडील एका अतिदूरच्या विमानतळावर काम केल्यामुळे, जवळजवळ दररोज रात्री जर्मन बाँबफेक्या विमानांच्या पूर्वेकडे लाटांमागून लाटा जात असल्याचे आवाज आपल्या भुयारी आसऱ्यात बसून ऐकायची त्याला सवय झाली होती. विमानांच्या एका लाटेचे आवाज दूरवर विरतात न विरतात तोच दुसरी लाट गडगडत यायची. काही वेळा तर सबंध रात्रभर आकाश घरघरत रहायचे. फॅसिस्टांचा मॉस्कोकडे मोर्चा होता हे वैमानिकांना ठाऊक होते आणि मॉस्कोत केवढा अग्निप्रलय माजला असेल याचे चित्र त्यांच्या मन:चक्षूंपुढे यायचे.

आता युद्धकालीन मॉस्कोमधून हिंडताना मेरेस्येव हवाई हल्ल्यांच्या खुणा शोधू पहात होता, पण त्याला एकही अशी खूण आढळली नव्हती. अस्फाल्टचे रस्ते सरळ होते, इमारती ओळीत उभ्या होत्या. कागदांच्या पट्ट्या लावलेल्या खिडक्यासुद्धा काही अपवाद सोडता धडधाकट होत्या. पण युद्ध-आघाडी अगदी नजीक होती आणि नगरवासींच्या चिंताग्रस्त मुद्रांवरून हे समजत होते. त्यांच्यापैकी निम्मे सैनिक होते. त्यांनी गुडघ्यांपर्यंतचे धूळ-माखले बूट पायात घातलेले होते. घामामुळे त्यांचे लष्करी कुडते त्यांच्या खांद्यांना चिप्प चिकटले होते. त्यांच्या पाठीवर थैल्या होत्या. पोचे पडलेल्या मडगार्डच्या आणि ड्रायव्हरसमोरील काचा फुटलेल्या धुळकट लॉरींची एक लांबच लांब रांग एका गल्लीमधून अचानक सूर्यप्रकाशित हमरस्त्यावर आली. त्या खिळखिळया लॉरींमधले सैनिक कुतूहलाने सभोवती नजर टाकीत होते. ट्रॉली-बस, मोटारी, ट्रामगाड्या इत्यादींना मागे टाकून ती लॉरींची रांग पुढे गेली. शत्रू फार दूर नव्हता याची ती जिवंत आठवण होती. आसावल्या नजरेने मेरेस्येव त्या लॉरीपथकाकडे पहात होता. जर त्यांपैकी एखाद्या लॉरीत उडी मारता आली तर तो युद्धआघाडीवर पोहोचेल, संध्याकाळच्या दरम्यान आपल्या विमानतळावर पोहोचेल, असा विचार त्यावेळी त्याच्या मनात येत होता. देगत्यारेन्कोबरोबर ज्या भूमिगत आसऱ्यात तो रहात होता त्याचे चित्र त्याच्या मन:चक्षूंसमोर उभे राहिले. तिपाईवर आधारलेले सूचि-

...च्या ओंडक्यांचे बिछाने, चपटचा काडतुसात बनविलेल्या प्राथमिक दिव्या-... पेट्रोलचा आणि डामराचा व देवदाराचा उग्र दर्प; सकाळच्या प्रहरी ... करण्यात येणाऱ्या इंजिनांचा घरघराट आणि रात्रं-दिवस ऐकू येणारी ...ारांच्या पानांची सळसळ. मेरेस्येवला तो भूगिगत आसरा म्हणजे खरेखुरे, ...ांत, आरामशीर घर वाटायचे! इतर वैमानिक मात्र त्या ठिकाणाला ...शाप मोजत, कारण तेथे ओल होती व डासांची अखंड गुणगुण ...ायची. अलेक्सेईला तेथे जाण्याची घाई झाली होती.

मोठ्या कष्टाने आपले पाय फरफटत तो पूष्कीनच्या पुतळ्याकडे चालला ...ा. वाटेत अनेक ठिकाणी तो विसाव्यासाठी थांवला. दोन्ही हातांनी काठी ... तो तिच्यावर रेलायचा व दुकानांच्या खिडक्यांमधील वस्तू पाहण्याचा ...णा करायचा. पुतळ्याशेजारच्या एका हिरव्या, उन्हात तापलेल्या बाक-...वर बसकण घालून त्याने सुटकेचा एक निःश्वास टाकला. कृत्रिम पायां-... पट्ट्यांमुळे त्याचे पाय दुखत होते, जळजळत होते. आपले दुखरे पाय ... सरळ ताणले. तो दमला होता तरी त्याची आनंदी वृत्ती अद्याप कायम ...ी. तो स्वच्छ उन्हाचा दिवस मोठा प्रसन्न होता. पुतळ्यापलिकडील ...ाच्या कोपऱ्यातील इमारतीच्या छपरावरील आकाश अनंत भासत होते. ...ाच्या मंद झुळुकेबरोबर बुलेवार्दवरील लिंबोणीच्या झाडांचा ताजा, ... सुवास येत होता. ट्रामगाडचा मजेने खडखडत होत्या आणि मुलांचे ...ी खिदळणे ऐकू येत होते. मुले जरी फिकट आणि रोड दिसत असली, ... पुतळ्याच्या पायथ्याजवळील उबदार, कोरडचा वाळूत हुंदडत होती, ...च्या खालच्या अंगास, दोराच्या अडथळयामागे, लष्करी रुबाबदार ... घातलेल्या गुलाबी गालांच्या दोन मुली पहारा देत होत्या. त्यांच्या ... रुपेरी सिगारच्या आकाराचे अडथळयाचे बलून दिसत होते. युद्धातील ... ...रण म्हणजे मॉस्कोच्या आकाशातील रात्रीचा पहारेकरी नव्हे, तर ... संग्रहालयामधून पळून गेलेला एक सुस्वभावी, प्रचंड प्राणी आहे व ... झाडांच्या थंडगार सावलीत तो विसावला आहे, असे मेरेस्येवला वाटत ...

...रेस्येवने आपले डोळे मिटले व सूर्याकडे आपला हसरा चेहरा वळविला.

मुलांनी आरंभी वैमानिकाकडे लक्ष दिले नाही. त्या मुलांना पाहून ...ला बेचाळीस नंबरच्या वॉर्डाच्या खिडकीमध्ये जमणाऱ्या चिमण्यांची ...ण आली. त्या मुलांच्या किलबिलीमध्ये तो अंगभर ऊन खाऊ लागला.

...

रस्त्यावरचा रहदारीचा गोंगाट तो विसरून गेला. पण एक छोटा मुलगा आपल्या खेळातील शत्रूपासून पळता पळता अलेक्सेईच्या पसरलेल्या पायांना अडखळला व वाळूत गडगडत गेला.

क्षणभर त्या मुलाच्या चेहऱ्यावर विलक्षण वेदना उमटली. पण नंतर गोंधळल्याचा भाव उमटला व शेवटी भीतीने त्याचा कबजा घेतला. ते मूल घाबरून ओरडले आणि दूर पळाले. मुलांचा सारा घोळका त्याच्या भोवती जमा झाला. काही वेळपर्यंत ती मुले आपापसात भीतीने कुजबुजत राहिली. अधूनमधून वैमानिकाकडे ती कटाक्षही टाकीत होती. मग सावकाशपणे आणि दबत दबत त्याच्या जवळ गेली.

आपल्याच विचारांमध्ये गढलेल्या अलेक्सेईचे कुठेच ध्यान नव्हते. त्याने डोळे उघडले तेव्हा मुले त्याच्याकडे आश्चर्याने व भीतीने टक लावून पहात असल्याचे त्याला दिसले. तेव्हा कुठे त्या मुलांच्या बोलण्याचा आशय त्याला समजला.

"वितामिन, तू थापा मारतोस! तो खराखुरा वैमानिक आहे. सीनियर लेफ्टनंट," सुमारे दहा वर्षांचा एक फिकट, लुकडा मुलगा गंभीरपणे म्हणाला.

"मी मुळीच थापा मारत नाही!" वितामिनने निषेध नोंदविला. "शप्पत! ते लाकडाचे आहेत! मी सांगतो, ते खरे नाहीत, तर लाकडी आहेत!"

मेरेस्येवला काळजात कुणीतरी सुरी खुपसल्यासारखे वाटले. दिवसाचा तेजस्वीपणा त्याला एकदम काळवंडल्यासारखा वाटला. त्याने डोळे वर उचलले आणि अद्याप त्याच्या पायांकडे पाहणारी मुले त्याच्या नजरेसरशी एकदम मागे सरली.

आपल्या मित्राच्या संशयखोरपणाचा राग आलेला वितामिन त्याला आव्हान देत म्हणाला:

"तुला हवं तर मी त्याला विचारीन. मी भितो असं वाटतं काय? पैज लावणार?"

इतरांपासून तो मुलगा बाजूला झाला व मेरेस्येवकडे सावकाशपणे, सावधपणे सरकत आला. इस्पितळातील खिडकीच्या चौकटीतील "सवमशिन-गनवाल्या" प्रमाणे क्षणात उडी मारून पळून जाण्याच्या पवित्र्यात तो होता. धावरेषेवर पोक काढून उभ्या असलेल्या शर्यतबाजाप्रमाणे ताणल्या अवस्थेत राहण्याचा शेवटी त्या मुलाला कंटाळा आला व त्याने विचारायचे धाडस केले:

"कॉम्रेड सीनियर लेफ्टनंट, तुमचे पाय कोणत्या प्रकारचे आहेत? खरे की लाकडाचे? तुम्ही पांगळे आहात का?"

वैमानिकाचे डोळे अश्रूंनी भरलेले त्या लहान मुलाने पाहिले. मेरेस्येव उडी मारून त्याच्यावर ओरडला असता, सोनेरी अक्षरे कोरलेली आपली गंमतीदार काठी उगारून त्याच्या अंगावर धावला असता, तर त्या मुलाला त्याचे आश्चर्य वाटले नसते. पण हवाई दलातील लेफ्टनंट रडताना पाहणे म्हणजे...! "पांगळा" हा शब्द आपण वापरल्यामुळे ह्या सैनिकाला किती यातना झाल्या हे त्याला समजले नाही, तरी त्याच्या बाल-अंतःकरणाला जाणवले. मुकाटपणे तो आपल्या सोबत्यांच्या घोळक्यात परत गेला. मधाचा आणि तापलेल्या अस्फाल्टचा वास भरलेल्या गरम हवेत जणू वितळून गेल्या-प्रमाणे तो मुलांचा घोळका नाहीसा झाला.

आपल्या नांवाने कुणीतरी हाक मारल्याचे अलेक्सेईने ऐकले. त्याने तात्काळ उडी मारली. आन्यूता त्याच्या पुढ्यात उभी होती. फोटोप्रमाणे ती सुंदर नव्हती तरी त्याने तिला तावडतोब ओळखले. तिचा चेहरा फिकट व थकलेला होता. तिने अंगात सदरा घातला होता व पायात गुडघ्यांपर्यंतचे बूट चढविले होते. तिच्या डोक्यावर एक विटकी टोपी होती. पण हिरवी झाक असलेल्या व किंचित बटबटीत असलेल्या तिच्या डोळयांमध्ये तेजस्वीपणा आणि साधेपणा होता. त्या डोळ्यांमधून मित्रभाव उमटत होता. त्यामुळे ही अनोळखी मुलगी खूप जुन्या ओळखीची होती, जणू लहानपणी एका अंगणात आपण तिच्याबरोबर खेळलो होतो, असेच अलेक्सेईला भासले.

क्षणभर त्या दोघांनी मूकपणे एकमेकांकडे टक लावून पाहिले. शेवटी ती म्हणाली :

"तुझं चित्र मी मनातल्या मनात अगदी वेगळं रेखाटलं होतं!"

"कसं काढलं होतंस माझं चित्र?" आपल्या चेहऱ्यावरील फारसे योग्य नसलेले स्मित पुसण्याचा अयशस्वी प्रयत्न करीत मेरेस्येवने विचारले...

"कसं सांगू? शूर, उंच आणि दणकट. आणि हा असा प्रचंड जबडा! शिवाय अर्थातच तोंडात पाईप... ग्रीशानं तुझ्याबद्दल खूप खूप लिहिलं होतं!"

"तुझा ग्रीशा खरा वीर आहे!" तिचे बोलणे मध्येच तोडीत अलेक्सेई म्हणाला. त्याच सुरात, "तुझा" ह्या शब्दावर जोर देत तो पुढे बोलत राहिला तेव्हा तिचा चेहरा उजळत असल्याचे त्याच्या ध्यानात आले. "तुझा

ग्रीशा अस्सल पुरुष ! मी कुठं त्याच्या पासंगाला पुरणार ? पण तुझा ग्रीशा... मला वाटतं त्यानं तुला स्वतःबद्दल काहीच सांगितलं नाही..."

"आल्योशा, तुला ठाऊक आहे ? मी तुला आल्योशा म्हटलेलं चालेल ना ? त्याच्या पत्रांमुळं मला याच नांवाची सवय झालीय. तुला आत्ता मॉस्कोत दुसरा काही उद्योग नाही ना ? मग माझ्या घरी चल. मी कामावरून आलेय आणि आता सबंध दिवसभर मोकळी आहे. चल ! घरी माझ्यापाशी थोडी वोदका आहे. तुला वोदका आवडते ? मी तुझा थोडया वोदकानं पाहुणचार करते."

क्षणभर, आठवणीच्या कप्प्यामधून अलेक्सेईच्या डोळयांसमोर मेजर स्त्रूच्कोवचा धूर्त चेहरा चमकला. आणि दुष्टाव्याने भरलेले त्याचे शब्द ऐकल्याचा भास झाला : "पाहिलंस ? कसल्या प्रकारची पोरगी आहे पाहिलंस ? एकटी राहते ! वोदका ! हा : हा : !" पण स्त्रूच्कोव एवढा बदनाम झाला होता की, आता त्याच्या कसल्याही बोलण्यावर विश्वास ठेवणे अशक्य होते. संध्याकाळ व्हायला अजून खूप अवकाश होता. जुन्या स्नेह्यांप्रमाणे मजेने गप्पा मारीत ती दोघे बुलेवार्दवरून चालत निघाली. युद्धाच्या आरंभी ग्वोझ्देववर कोणती आपत्ती कोसळली होती तिची हकीकत त्याने सांगितली तेव्हा आपले अश्रू आवरण्यासाठी तिने ओठ गच्च दाबून धरले. ते पाहून मेरेस्येवला बरे वाटले. युद्धआघाडीवरचे ग्वोझ्देवचे पराक्रम त्याने वर्णिले तेव्हा तिचे घारे डोळे चमकले. तिला किता अभिमान वाटत होता त्याचा ! अधिकाधिक तपशील जाणून घेण्याच्या इराद्याने ती प्रश्न करीत होती तेव्हा किती लाजत होती ! काही कारण नसताना ग्वोझ्देवने तिला आपले पगाराचे प्रमाणपत्र पाठविले होते हे सांगताना तिला किती संताप आला होता ! आणि अचानक तो पळाला का होता ? एकही शब्द न बोलता, चिठी न लिहिता किंवा पत्ता न ठेवता ? लष्करी गुपित होतं काय ? पण एखादा माणूस साधा निरोपाचा शब्द न बोलता अथवा न लिहिता जातो, ह्याला लष्करी गपित म्हणतात काय ?

"तो दाढी वाढवतोय ह्या गोष्टीवर तू एवढा भर का दिला होता ?" त्याच्याकडे प्रश्नार्थक कटाक्ष टाकीत आन्यूताने विचारले.

"उगीच काहीतरी बरळलो. त्यात काही विशेष नाही," मेरेस्येवने उडवाउडवी केली.

"नाही, नाही! सांग मला! तू सांगीपर्यंत मी तुला स्वस्थता देणार नाही. तेसुद्धा लष्करी गुपित आहे?"

"अर्थातच नाही! त्याचं काय झालं, आमचे प्राध्यापक वासिली वासिल्येविच... त्यांनी त्याला दाढी वाढवायचा उपचार सांगितला... म्हणजे मुली... म्हणजे मला म्हणायचंय की, एका विशिष्ट मुलीला तो जास्त आवडावा."

"अस्सं! आता मला सारं उमगलं!"

एकदम आन्यूताच्या हिरव्या डोळ्यांमधील प्रकाश नाहीसा झाला. ती वयस्क झाल्यासारखी भासली. तिच्या चेहऱ्यावरील फिकटपणा ठळकपणे जाणवला. आणि जणू सुईने कोरल्याप्रमाणे रेषांचे जाळे तिच्या कपाळावर उमटले, तिच्या डोळ्यांच्या कोपऱ्यांपाशीही रेषांचे जाळे जमले. एकूणच तिच्या त्या जुन्या, विरल्या सदऱ्यात व तांबूस-तपकिरी केसांवरील विटक्या टोपीत, ती पुरती थकली-भागलेली दिसू लागली. फक्त तिचे छोटे, पूर्णाकार, लालचुटुक मुख साक्ष देत होते की, अजून ती तरुण होती, अद्याप तिने जेमतेम विशी गाठली होती. तिच्या मुखावरील अस्पष्ट लव आणि वरच्या ओठावरचा छोटा तीळ तिच्या सौंदर्यात भर घालीत होते.

मॉस्कोत असे घडते की, भव्य घरांच्या सावलीला धरून मोठ्या रुंद रस्त्यावरून तुम्ही चालत असता, त्या रस्त्याच्या कोपऱ्यावर वळता, दहा-बारा पावले चालता व अचानक काळाने अंधुक बनलेल्या छोट्या खिडक्यांच्या एका छोट्या, बैठ्या घरासमोर आपण उभे राहिल्याचे तुम्हाला आढळते. अशा प्रकारच्या एका घरात आन्यूता रहात होती. एका अरुंद जिन्यावरून ती दोघे वर चढली. तेथे वरच्या मजल्यापर्यंत मांजरांचा आणि केरोसीनचा वास पसरला होता. आन्यूताने चावी लावून दार उघडले. छोट्या पॅसेजच्या थंड कोपऱ्यात ठेवलेली खाद्यपदार्थांची पिशवी, टिनची काही भांडी, डबे वगैरेंना ओलांडून ती अंधाऱ्या आणि रित्या स्वयंपाकघरात शिरली; तेथून लहान कॉरीडॉर ओलांडून एका बैठ्या दारापाशी आली. त्याच्या विरुद्ध दिशेच्या दारामधून एका छोट्या, हाडकुळ्या, म्हातारीचे डोके हळूच बाहेर आले.

"आन्ना दानिलोवना, तुमचं एक पत्र आलंय," ती म्हणाली आणि ही तरुण मंडळी खोलीत शिरेपर्यंत त्यांच्याकडे टक लावून पाहिल्यानंतर, नाहीशी झाली.

आन्यूताचे वडील एका इन्स्टिटयूटमध्ये लेक्चरर होते. इन्स्टिटयूट जेव्हा मॉस्कोतून हलविली तेव्हा आन्यूताचे आई-वडीलही तिच्याबरोबर गेले. आता पुराणवस्तूंच्या दुकानाप्रमाणे लिननच्या आच्छादनांखाली झाकलेल्या फर्निचरने ठासलेल्या दोन खोल्यांची देखभाल करणे आन्यूताच्या वाटयाला आले होते. ते फर्निचर, दारावर व खिडक्यांवर टांगलेल्या बोजड झालरी, भिंतीवरील चित्रे, पियानोवरील छोटे पुतळे आणि पुष्पपात्रे, ह्या सर्वांमधून एक कुबट दर्प येत होता.

"ह्या अव्यवस्थितपणाकडं लक्ष देऊ नको. मी इस्पितळात राहते आणि तिथून थेट विद्यापीठात जाते. फक्त अधून-मधून इथं डोकावून जाते," आन्यूता शरमून लाल होत म्हणाली. टेबलावरील केरकचरा तिने टेबल-क्लॉथसकट दूर केला.

ती खोलीबाहेर गेली, परत आत आली व नवे टेबलक्लॉथ पसरून तिने काळजीपूर्वक त्याचे कोपरे नीट केले.

"घरी यायची मला सवड लाभली तरी एवढी दमलेली असते की, जेमतेम कोचापर्यंत देहाला ओढत नेते आणि कपडे न काढताच झोपी जाते. त्यामुळं स्वच्छता करायला पुरेसा वेळच मिळत नाही!"

काही मिनिटांच्या अवधीनंतर विजेवरची किटली गुणगुणत होती. जुने, विटके, चिनी मातीचे प्याले टेबलावर चमकत होते. चिनी मातीच्या एका वशीत रायच्या पावाच्या पातळशा फाका ठेवलेल्या होत्या आणि साखरेच्या भांड्याच्या अगदी तळाशी लहान लहान साखरेचे खडे होते. लोकरी गोंडे लावलेल्या टी-कोझीखाली चहादाणी लपली होती. तीसुद्धा गेल्या शतकामध्ये बनविलेली दिसत होती. चहाचा खोलीभर दरवळणारा सुगंध युद्धपूर्व काळाची आठवण करून देत होता. टेबलाच्या मध्यभागी निळसर झाक असलेली, न उघडलेली एक बाटली उभी होती व तिच्या दोन्ही अंगांना पहारेकऱ्याप्रमाणे पातळ काचेचे दोन मद्यचषक उभे होते.

एका खोल, मखमाली आवरणाच्या आरामखुर्चीत मेरेस्येव बसला होता. हिरव्या मखमाली आच्छादनामधून आतील पेंढा एवढा बाहेर डोकावीत होता, की खुर्चीच्या पाठीशी व बैठकीवर काळजीपूर्वक बांधलेले विणकाम केलेले लोकरी रग त्याला झाकू शकत नव्हते. पण ती आरामखुर्ची बसणाऱ्याला खूप आरामशीर होती. त्यामुळे अलेक्सेई तात्काळ तिच्या पाठीशी टेकला आणि आपले थकलेले, दुखरे पाय त्याने ऐसपैस पसरले.

आन्यूता त्याच्या शेजारी एका बैठ्या स्टुलावर बसली व एखाद्या लहान मुलीप्रमाणे त्याच्या चेहऱ्याकडे पहात तिने पुन्हा ग्वोझ्देवविषयी प्रश्न विचारायला आरंभ केला. अचानक तिला आपल्या घरमालकिणीच्या कर्तव्याची आठवण झाली. स्वतःला दूषणे देत ती उडी मारून उभी झाली व अलेक्सेईला टेबलापाशी खेचत म्हणाली :

"एक ग्लास पिणार? ग्रीशा म्हणाला की, रणगाडासैनिक आणि अर्थात वैमानिकसुद्धा..."

तिने अलेक्सेईकडे एक ग्लास सरकविला. खोलीत तिरप्या पडलेल्या उन्हाच्या किरणांमध्ये वोदकाची निळसर झाक चमकत होती. वोदकाच्या त्या वासामुळे अलेक्सेईला दूर जंगलामधील विमानतळाची, लष्करी अधिकाऱ्यांच्या मेसची आठवण झाली. जेवणाच्या वेळी "इंधनाचे रेशन" वाटप सुरू झाले म्हणजे होणारी आनंदी कुजबूज आठवली. दुसरा ग्लास मोकळा राहिलेला पाहून अलेक्सेईने विचारले :

"तू नाही पिणार?"

"मी पीत नाही," आन्यूता सरळ उत्तरली.

"पण आपण त्याच्यासाठी, ग्रीशासाठी, प्यायलो तर?"

आन्यूताने स्मित केले. शांतपणे तिने आपला ग्लास भरला, त्याच्या निमुळत्या दांड्याला धरले व विचारमग्न होत अलेक्सेईच्या ग्लासाशी ग्लास भिडवून ती म्हणाली :

"त्याच्या यशासाठी!"

तिने ऐटीत ग्लास उंचावला, एका घोटात रिकामा केला व तात्काळ तिला खोकल्याची ढास लागली. तिचा चेहरा लालबुंद बनला व धड श्वास घेणे तिला अवघड झाले.

दीर्घ काळपर्यंत वोदकाची चव न घेतल्यामुळे, मेरेस्येवला ती दारू डोक्यात चढताना जाणवली. त्याच्या सबंध शरीरभर ऊबेची लाट पसरली. त्याने परत ग्लास भरले, पण यावेळी मात्र आन्यूताने निर्धारपूर्वक मानेने नकार दिला.

"छे:, छे:! मी पीत नाही. आत्ता काय झालं ते पाहिलं ना?"

"पण माझ्या यशासाठी तू पिणार नाहीस?" अलेक्सेईने आर्जवाने विचारले. "आन्यूता, मला त्याची किती गरज आहे याची तुला कल्पना नाही!"

तिने त्याच्याकडे गंभीर कटाक्ष टाकला, आपला ग्लास उंचावला, त्याच्याकडे पाहून स्मित करीत मान झुकविली, त्याच्या हाताच्या कोपऱ्याला हळूच दाबले व पुन्हा ग्लास रिता केला. पण पुन्हा तिला ठसका लागला आणि तिची धांदल उडाली.

"काय करतेय मी हे?" अखेरीस श्वास आवरल्यावर ती उद्गारली. "आणि तब्बल चोवीस तास काम केल्यानंतर! आल्योशा, केवळ तुझ्यासाठी मी हे करतेय. तू... ग्रीशानं तुझ्याबद्दल खूप लिहिलंय... मी तुला मनापासून यश चिंतते. तुला यश लाभणार अशी मला खात्री आहे. मी काय बोलते ते ऐकतोस ना? मला खात्री आहे." आणि ती आनंदाने खदखदा हसत सुटली. "पण तू खात नाहीस! थोडा पाव घे. लाजू नको. माझ्यापाशी आणखी आहे. हा कालचा. आजचं रेशन अजून मला मिळालं नाही." कागदासारख्या अगदी पातळ कापलेल्या पावाच्या फाकींची बशी तिने त्याच्या पुढ्यात सरकवली. "ए वेड्या मुला, खा! नाही तर तू झिंगशील! मग मी तुझं काय करू?"

अलेक्सेईने पाव भरलेली बशी दूर सारली. आन्यूताच्या डोळ्यांमध्ये व तिच्या छोट्या, लालचुटुक ओठांकडे सरळ नजर भिडविली. अगदी खालच्या आवाजात तो म्हणाला:

"मी तुझं चुंबन घेतलं तर काय करशील?"

तिने त्याच्याकडे भेदरलेला कटाक्ष टाकला. क्षणात ती भानावर आली. तिच्या डोळ्यांमध्ये राग नव्हता, तर पृच्छा आणि निराशा होती. दूर काही मौल्यवान रत्ने चमकत असावीत अशा तऱ्हेने ते डोळे काही वेळापूर्वी पहात होते, पण रत्ने नसून साधी काच असल्याचे आढळल्यानंतर येणारी निराशा आता त्यांच्यात दाटली होती.

"कदाचित मी तुला इथून हाकलून देईन आणि नंतर ग्रीशाला पत्र लिहून कळवीन की, त्याला माणसांची पारख नाही," थंडपणे ती उत्तरली. पावाची बशी पुन्हा त्याच्यासमोर सारीत ती आग्रहाने म्हणाली: "खा काही-तरी! तुला दारू चढलीय!"

मेरेस्येवचा चेहरा उजळला.

"तुझं तसं करणं अगदी योग्य ठरेल! आभारी आहे तुझा! आमच्या सोविएत सेनेच्या वतीनं मी तुझे आभार मानतोय! आणि ग्रीशाला लिहून मी कळवीन, की त्याला माणसांची चांगली पारख आहे!"

सुमारे तीन वाजेपर्यंत त्यांनी गप्पा मारल्या. खोलीत तिरपे पडलेले धुळकट सूर्यकिरण आता भिंतीवर सरकू लागले होते. अलेक्सेईच्या आगगाडीची वेळ झाली होती. हिरव्या मखमाली खुर्चीमधून खेदाने आणि अनिच्छेने तो उठला. त्याच्या कोटाला खुर्चीतील काही पेंढा चिकटला. आन्यूता त्याला स्टेशनपर्यंत पोहोचवायला गेली. हातात हात घालून ती दोघे चालत होती. विश्रांती घेतल्यामुळे अलेक्सेईची पावले आत्मविश्वासपूर्वक पडत होती. ते पाहून आन्यूता स्वतःशीच प्रश्न करीत होती: "आपल्या मित्राला पाय नाहीत असं ग्रीशानं लिहिलं होतं ते थट्टेनं तर नव्हे?" जखमींची प्राथमिक निवड करून वेगवेगळ्या स्थळी पाठवणी करणाऱ्या तळावरील इस्पितळाबद्दल तिने अलेक्सेईला माहिती सांगितली. सध्या ती व वैद्यकशास्त्राच्या इतर विद्यार्थिनी तेथे काम करीत होत्या. ती म्हणाली की, तेथे काम खूप होते, कारण दररोज दक्षिणेकडून अनेक आगगाड्या जखमींनी भरून येत होत्या. हे जखमी लोक किती शूर होते! आपल्या यातना ते धीराने सोसत! एकदम स्वतःचे बोलणे थांबवून तिने विचारले:

"ग्रीशा दाढी वाढवतोय असं म्हणालास ते खरंच का?" क्षणभर ती गप्प आणि खिन्न झाली. नंतर पुढे म्हणाली: "आता मला सारं उमगलं. माझ्या वडलांना जसं मी सांगितलं तसं तुलाही प्रामाणिकपणं सांगते: प्रथम त्याच्या जखमांचे व्रण बघणं मला सहन झालं नाही. छे:, सहन हा शब्द तिथं योग्य नाही. मी घाबरले, असं म्हणायचंय मला! नाही! तोही शब्द बरोबर नाही. कसं वर्णन करावं ते मला माहीत नाही. मला तू समजू शकशील का? कदाचित माझं तसं वागणं वाईट असेल, पण त्याला काय करणार? म्हणून माझ्यापासून पळून जायचं? किती मूर्ख मुलगा आहे! देवा रे देवा, किती मूर्ख मुलगा! जर त्याला पत्र लिहिलंस तर कळव की, मी दुखावलेय. त्याच्या वागण्यानं मी फार फार दुखावलेय!"

अफाट रेल्वे स्टेशन केवळ लष्करी शिपायांनी भरले होते. काहीजण विशिष्ट कामाच्या निमित्ताने धावपळ करीत होते, तर काही भिंतींलगत आपल्या थैल्यांवर अथवा खाली फरशीवर स्वस्थ बसून होते. त्यांच्या चेहऱ्यांवर चिंता पसरलेली होती, कपाळांवर आठ्या होत्या. एकाच विचाराभोवती त्यांची मने एकवटलेली भासत होती. एकेकाळी हा लोहमार्ग म्हणजे पश्चिम युरोपला सांधणारा मुख्य दुवा होता. शत्रूने आता मॉस्कोपासून सुमारे ऐंशी किलोमीटरवर पश्चिमेकडे हा रस्ता तोडला होता. उरलेल्या छोट्या मार्गावर

फक्त सैनिकांना वाहून नेणाऱ्या आगगाड्या धावत होत्या. राजधानीपासून प्रवास करणारे लोक अवघ्या दोन तासांच्या अवधीत थेट आपापल्या डिव्हिजनां-मध्ये संरक्षक फळीवर हजर होत होते. दर अर्ध्या तासाने विजेवरची आगगाडी उपनगरांमध्ये राहणाऱ्या कामगारांचे थवे फलाटावर आणून ओतीत होती. किसान बायका दूध, फळे, अळंब्या, भाज्या घेऊन येत होत्या. थोडा वेळपर्यंत ही गर्दी रेल्वे स्टेशनावर गलबलाट करायची, पण लौकरच तिचा ओघ चौकातून शहरात जाऊन मिसळायचा व स्टेशनात पुन्हा फक्त लष्करी माणसे उरायची.

मुख्य दालनामध्ये थेट छतापर्यंत ताणलेला सोविएत-जर्मन युद्धआघाडीचा नकाशा लावलेला होता. सोविएत माहिती खात्याचे ताजे वृत्तपत्र हाती धरून लष्करी गणवेषातील एक गुबगुबीत मुलगी पायऱ्यांच्या शिडीवर उभी होती व टाचण्यांनी युद्धरेषा दाखवीत होती.

नकाशाच्या खालच्या भागात टाचण्यांची माळ एकदम उजवीकडे वळली होती. दक्षिणेत जर्मन मुसंडी मारीत होते. ईझ्यूम-बार्वेन्कवो प्रदेशात ते घुसले होते. त्यांच्या सहाव्या सेनेने देशात जोरदार पाचर मारली होती व दॉनच्या निळया रेषेच्या मूळाकडे तिचा रोख होता. त्या मुलीने दॉनच्या रेषेवर दोरी बांधली. तिच्या जवळच वोल्गाच्या जाड धमनीचा वळसा गेला होता. तेथे स्तालिनग्राद मोठ्या वर्तुळात दाखविले होते व त्यावर कामीशिन एका ठिपक्याने दर्शविले होते. दॉनवर शत्रूने पाचर मारली होती व आता ह्या मुख्य धमनीकडे त्याचा रोख होता, तिच्या जवळपास तो पोहोचला होता, हे उघड होते. ती मुलगी शिडीवर उभी राहून नकाशावरील टाचण्याच्या जागा बदलत होती आणि भोवती जमलेला लोकांचा जमाव गंभीरपणे त्या मुलीच्या गुबगुबीत हातांवर लक्ष ठेवून होता. एक तरुण सैनिक नवाकोरा ओव्हरकोट खांद्यावर टाकून घामेजल्या चेहऱ्याने उभा होता. केविलवाण्या आवाजात त्याने मनातील विचार मोठ्यांदा बोलून दाखविले :

“अक्करमाशे पुढं जोरात घुसताहेत... बघा, कसा रेटा लावलाय त्यांनी !”

पांढुरक्या मिशांच्या, उंच आणि सडपातळ बांध्याच्या, रेल्वेकामगाराची गेणचट टोपी डोक्यावर घातलेल्या एका रेल्वेकामगाराने कपाळाला आठ्या घालीत सैनिकाकडे पाहिले व तो गरजला :

“रेटा देताहेत ना? पण तुम्ही त्यांना पुढं घुसू कसं देता? अर्थातच

तुम्ही पाठी फिरवल्यात तर ते पुढं रेटा मारणार! काय पण लढवय्ये तुम्ही! बघा, कुठपर्यंत पोचले आहेत ते! थेट वोल्गापर्यंत!" त्याच्या आवाजातून वेदना आणि दुःख व्यक्त होत होते. एखाद्या बापाने आपल्या मुलाची गंभीर व अक्षम्य गोंधळ केल्याबद्दल खडसावून हजेरी घ्यावी, तसा त्याचा स्वर होता.

सैनिकाने सभोवार अपराधी नजर टाकली आणि खांद्यावरील कोट नीट करीत तो गर्दीमधून बाहेर वाट काढू लागला.

"बरोबर आहे तुमचं! आपण खूप प्रदेश गमावलाय," दुसऱ्या एका माणसाने उसासा टाकला व खेदाने मान हलवीत तो उद्गारला: "एख्!" (छ्या :–अनु.)

तेवढ्यात खेड्यातील शाळा मास्तर अथवा डॉक्टर असलेला कॅन्व्हास कोटातील एक वृद्ध गृहस्थ त्या सैनिकाच्या समर्थनार्थ पुढे सरसावला:

"त्याला कशाला बोल लावता? हा काय त्याचा दोष? त्यांच्यापैकी कितीतरी एव्हाना ठार झालेत! आपल्याला लोटणाऱ्या सेनेची ताकद तरी बघा! आख्खा युरोप आणि तोसुद्धा रणगाड्यांमधून! एकदम कसा थोपवणार हा लोंढा? खरं म्हणजे आपण त्या पोरासमोर गुडघे टेकवून बसलं पाहिजे आणि आपण जिवंत असून मॉस्कोत मोकळेपणी फिरू शकतो याबद्दल त्याचे आभार मानले पाहिजेत. अवघ्या आठवड्याच्या अवधीत फॅसिस्टांनी आपल्या रणगाड्यांखाली किती देश चिरडले ते जरा बघा! पण आपण वर्षाहून जास्त काळ लढतोय आणि अजून प्रतिटोले हाणतोय. त्यांचे किती सैनिक आपण झोपवले! सगळ्या जगानं त्या पोरासमोर नतमस्तक झालं पाहिजे! आणि तुम्ही म्हणताय 'माघार घेतली!'"

"ठाऊक आहे! कृपा करून प्रचार ऐकवू नका! माझ्या मनाला कळतंय सारं, पण काळीज मात्र दुःखानं फुटायच्या बेताला आलंय," तो रेलकामगार खिन्नपणे उत्तरला. "आपली जमीन जर्मन तुडवत आहेत, आपली घरं ते नष्ट करताहेत!"

"तो तिथं आहे?" नकाशाच्या दक्षिण भागाकडे बोट दाखवीत आन्यूताने विचारले.

"होय. आणि तोसुद्धा तिथंच आहे," अलेक्सेई उत्तरला.

अगदी वोल्गाच्या निळ्या वेटोळ्यावर, स्तालिनग्रादच्या वरती, त्याने एक ठिपका पाहिला. त्यावर "कामीशिन" अशी अक्षरे होती. त्याच्या

दृष्टीने तो केवळ नकाशावरील ठिपका नव्हता. त्याच्या डोळ्यांसमोर त्या छोट्या, हिरव्यागार झाडीच्या शहराचे दृश्य उभे झाले. गवताळ उपनगरी रस्ते, सळसळणारी चमकदार धुळकट पानांची चिनारांची झाडे; काठ्यांच्या कुंपणांमागील भाजीच्या वाफ्यांमधून येणारा धुळीचा, बडीशोपेचा आणि अजमोद्याचा वास; कलिंगडांच्या पट्ट्यात कोरड्या जमिनीवर सुकलेल्या पानांवर पसरल्याप्रमाणे भासणारी पट्टेरी कलिंगडे; दवण्याच्या उग्र दर्पाने भरलेला स्तेपमधील वारा; नदीचे अवर्णनीय विशाल, चमकणारे पात्र; डौलदार, राखी डोळ्यांची, पिंगट कांतीची तरुणी व त्याची पांढऱ्या केसांची, धांदरलेली आई...

"दोघंही तिथं आहेत," तो परत म्हणाला.

२

विजेची आगगाडी मॉस्कोच्या उपनगरांमधून वेगाने जात होती. तिची चाके आनंदाने गात होती, तर तिची शिटी रागाने ओरडत होती. मेरेस्येव खिडकीशी लगटून बसला होता. गुळगुळीत दाढी केलेल्या, माक्सिम गोर्की छापाची रुंद टोपी घातलेल्या, काळ्या दोरीला अडकवलेला सोनेरी चापाचा चष्मा वापरणाऱ्या एका म्हाताऱ्या गृहस्थाने त्याला रेटले होते. त्या म्हाताऱ्या गृहस्थाने आपल्या गुडघ्यांमध्ये नांगराचा फाळ, फावडे व चिमटा ह्या वस्तू धरल्या होत्या. त्याने ह्या वस्तूंना काळजीपूर्वक वर्तमानपत्रात गुंडाळले होते व वरती दोरी बांधली होती.

त्या संकटकाळात इतर प्रत्येक माणसाप्रमाणे तो म्हाताराही युद्धाबद्दल विचार करीत होता. मेरेस्येवच्या नाकासमोर जोरजोराने हातवारे करीत मोठी ऐट आणून तो त्याच्या कानात पुटपुटला:

"मी लष्करात नाही म्हणून आपली योजना मला समजत नाही असं समजू नका. मला अगदी पूर्ण कळतंय. शत्रूला वोल्गाच्या स्तेपमध्ये हुलकावत आणायचं, आजकालच्या भाषेत म्हणतात त्याप्रमाणं त्याचा मुख्य तळापासूनचा संबंध ढिला करायचा, मग पश्चिमेकडून आणि उत्तरेकडून त्याचं दळणवळण तोडायचं आणि त्याचा फडशा पाडायचा! हो! आहे. योजना मोठी चतुराईची आहे. आपल्याविरुद्ध फक्त हिटलर नाही, तर सगळ्या युरोपला तो आपल्याविरुद्ध चिथावतोय. सहा देशांविरुद्ध आपण एकाकी लढतोय. एकाकी!

[illegible] अंतराची मदत घेऊन त्यांच्या प्रहाराचा जोर आपण कमी केला [illegible]. [illegible]! हाच एवढा एक तर्कशुद्ध मार्ग आहे. कारण आपले दोस्त [illegible] नसलेत! होय ना? तुम्हाला काय वाटतं?"

"[illegible] काहीतरी फालतू बोलताहात. प्रहार सोसण्यासाठी आपल्या [illegible] वापर करण्याइतकी ती कवडीमोलाची नाही," मेरेस्येव काहीशा [illegible] म्हणाला. हिवाळ्यामध्ये ज्या जळून गेलेल्या निर्मनुष्य खेड्यातून [illegible] गेला होता त्या खेड्याची त्याला अचानक आठवण झाली.

[illegible] तरीही म्हातारा मेरेस्येवच्या कानात गुणगुणत राहिला. तंबाखूचा [illegible] [illegible]च्या कॉफीचा भपकारा त्याच्या तोंडावर सोडत राहिला.

[illegible] खिडकीबाहेर ओणवा झाला. गरम, धुळकट वाऱ्याचे झोत [illegible] तोंडावर बसत होते. भराभरा मागे पडणाऱ्या स्टेशनांकडे तो [illegible] पहात होता. स्टेशनांची हिरवी कुंपणे फिकटलेली होती. भडक [illegible] छोटी दुकाने उभी होती. हिरव्या रायांमधून छोट्या झोपड्या डोकावत [illegible]. [illegible] गेलेल्या ओढ्यांचे किनारे पाचूसारखे चमकत होते. देवदारांचे [illegible] दिसणारे शेंडे मावळतीच्या उन्हात तृणमण्यांसारखे चमकत [illegible] [illegible]पलिकडची विस्तीर्ण निळाई संधिप्रकाशात धूसर बनली होती.

"...तुम्ही लष्करात आहात. होय ना? एक वर्षापेक्षा जास्त काळ [illegible] [illegible]विरुद्ध एकाकी लढतोय. काय वाटतं त्याबद्दल तुम्हाला? [illegible] आपले दोस्त कुठं आहेत? दुसरी आघाडी कुठं आहे? तुम्ही कल्पनेनं [illegible] दृश्य आणा: निःशंक मनानं घाम गाळणाऱ्या माणसावर [illegible] हल्ला चढवतात. पण त्या माणसाचं डोकं ताळ्यावर आहे. तो [illegible] [illegible]रांशी झुंजतो. त्याचं सर्वांग रक्तानं माखलंय, तरीही हाती [illegible] शस्त्र घेऊन तो लढत राहतो. एकाविरुद्ध अनेक. ते सशस्त्र आहेत [illegible] [illegible] काळापासून त्याच्यावर पाळत ठेवून बसले होते. हो! त्या माण-[illegible] [illegible]री ही लढत पाहतात. आपल्या दारांशी उभं राहून ह्या माणसा-[illegible] सहानुभूती व्यक्त करतात, त्याला उत्तेजन देत म्हणतात: 'छान पोरा! [illegible]! चांगलं बडवून काढ!' पण त्याच्या मदतीला मात्र न जाता [illegible] [illegible] आणि धोंडे देऊ करतात आणि म्हणतात: 'हे घे! ह्यांनी [illegible]! जोरात हाण!' पण ते स्वतः मात्र मारामारीत भाग घेत [illegible]. [illegible]! आपले दोस्त असं वागताहेत... सगळे नुसते तसेच आहेत..."

[illegible] मान वळविली आणि त्या म्हाताऱ्याकडे कुतूहलाने पाहिले.

गर्दी दाटलेल्या त्या डब्यामधील इतर अनेक उतारू त्यांच्या दिशेने बघत होते. सर्व बाजूंनी उद्‌गार आले :

"बरोबर आहे त्याचं! आपण एकाकी लढतोय! दुसरी आघाडी कुठं आहे?"

"काही हरकत नाही. आपण कमरा कसू आणि स्वतःच शत्रूला चोपू. अर्थात सगळं संपलं म्हणजे ते दुसरी आघाडी घेऊन येतील यात काही शंका नाही!"

आगगाडी किंचित काळ थांबली. पायजम्यांमधील अनेक जखमी माणसे डब्यात चढली. काहींच्या जवळ कुबड्या होत्या, इतरांपाशी चालण्यासाठी आधार घ्यायच्या काठ्या होत्या. सर्वांपाशी कागदी पिशव्यांमध्ये सूर्यफुलांच्या बिया अथवा बेरी होत्या. एखाद्या सॅनाटोरियममधून ह्या स्थळीच्या बाजारात ते आले असावेत. चापाचा चष्मा लावलेले म्हातारबाबा एकदम ताडकन उठले आणि कुबड्या धरलेल्या, एक पाय बँडेजमध्ये गुंडाळलेल्या तांबड्या केसांच्या एका पोरसवदा सैनिकाला त्यांनी बळेच आपल्या जागेवर बसविले.

"बैस पोरा, बैस इथं!" ते मोठ्यांदा ओरडत म्हणाले. "माझ्याबद्दल काळजी करू नको. मी आता लौकरच उतरणार आहे."

आपले म्हणणे खरे होते हे सिद्ध करण्यासाठी म्हाताऱ्याने आपली बाग-कामाची उपकरणे उचलली व दरवाजाचा रस्ता धरला. जखमी लोकांना जागा करून देण्यासाठी गवळणींनी अंगे चोरून घेतली. एका बाईचा रागीट स्वर मागील दिशेने उमटलेला अलेक्सेईने ऐकला :

"त्याला शरम वाटली पाहिजे! जखमी माणसाला उभं ठेवलंय आणि स्वतः मात्र बसलाय! बिचारा पोरगा चिरडतोय, पण ह्याला त्याची पर्वा नाही! झकास मख्खासारखा बसून राहिलाय! जणू गोळ्या ह्याला कधी स्पर्श करणार नाहीत. आणि विमान दलातला अधिकारी आहे!"

ह्या अनाठायी टोचणीमुळे अलेक्सेई लालबुंद झाला. रागाने त्याच्या नाकपुड्या थरथरल्या... पण उजळ मुद्रेने एकदम उठून उभे रहात तो म्हणाला :

"बैस मित्रा!"

जखमी माणूस दचकला आणि गोंधळून म्हणाला :

"नको नको! आभारी आहे कॉम्रेड सीनियर लेफ्टनंट. मी उभा राहू शकतो. तुम्ही स्वतःला तसदी घेऊ नका. आम्हाला फार लांब जायचं नाही. फक्त दोन स्टेशनं!"

"बसा म्हणून सांगतो ना!" प्रेमळ खंबीरपणे अलेक्सेई म्हणाला. परिस्थितीमधील विनोद त्याला जाणवला.

डब्याच्या एका बाजूला वाट काढीत तो गेला व भिंतीशी टेकून दोन्ही हातांनी काठीचा आधार घेत सस्मित मुद्रेने उभा राहिला. चौकटीचा रुमाल बांधलेल्या ज्या म्हातारीने त्याला टोमणा मारला होता, तिला एव्हाना आपली चूक उमगली होती. तिचा रागीट स्वर पुन्हा ऐकू आला:

"बघा त्यांच्याकडं! ए, टोपीवाली! मारे राजकन्येच्या थाटात बसलीय! त्या काठीवाल्या अंमलदाराला बसायला जागा दे. इकडे ये बाबा अंमलदारा! बैस माझ्या जागेवर. कृपा करून त्याला यायला वाट करून द्या!"

अलेक्सेईने तिचे बोलणे न ऐकल्याचा बहाणा केला. त्याला वाटलेली गंमत निघून गेली होती. त्याच क्षणाला कंडक्टर-बाईने त्याच्या स्टॉपचे नांव घेतले. आगगाडी सावकाश थांबली. लोकांना बाजूला सारीत तो दारापाशी गेला. तेथे तो मघाचा चापाचा चष्मेवाला म्हातारा उभा होता. म्हातार-बाबांनी जणू जुनी ओळख असल्याप्रमाणे त्याच्याकडे पाहून मान डोलावली आणि दबत्या आवाजात विचारले:

"काय वाटतं तुम्हाला? ते दुसरी आघाडी उघडतील?"

"त्यांनी नाही उघडली तरी आपले आपण समर्थ आहोत," लाकडी फलाटावर उतरत अलेक्सेई उत्तरला.

चाकांचा खडखडाट करीत व कर्कश्य भोंगा वाजवीत आगगाडी वळणा-वरून नाहीशी झाली. तिच्यामागे धुळीचा एक पातळसा लोट उमटला. फलाटावर काही थोडे उतारू होते. निवांत, गंधित सायंकालीन वातावरणात फलाट लौकरच गुरफटून गेला. युद्धापूर्वी हे ठिकाण प्रसन्न आणि आरामदायी असावे. स्टेशनला भिडलेल्या देवदारांच्या झाडांचे शेंडे मंद लयीत सळसळत होते. दोन वर्षांपूर्वी, अशा रम्य सायंकाळी, शहरहून परतणारे लोकांचे थवे ह्या स्टेशनात उतरले असणार व जंगलच्या पायवाटांमधून आपापल्या झोपड्यांकडे गेले असणार. त्यात रुबाबदार, हलके-फुलके फ्रॉक घातलेल्या रमणी असतील, किलबिलणारी मुले असतील, खाद्यपदार्थांची पुडकी आणि मदिरेच्या बाटल्या शहरातून घेऊन आलेले, उन्हात पिंगट कातडी बनलेले पुरुष असतील. आत्ता आपल्याबरोबर फाळ, फावडी व बागकामाची इतर हत्यारे घेऊन आलेले काही थोडे उतारू मात्र घाईघाईने फलाट सोडून गंभीर मुद्रांनी जंगलच्या वाटांना लागले. प्रत्येकजण आपापल्या चिंतेत गुरफटलेला

होता. हाती काठी घेतलेल्या एकटा गेरेस्पेव तेवढा गुळहोणी प्रवासी वाटत होता. त्या उन्हाळयातील रम्य संध्येचे सौंदर्य न्याहाळीत तो थोडा वेळ थांबला. गंधित हवा त्याने भरभरून हुंगली. देवदारांच्या फांद्यांमधून घुसून आलेल्या सूर्यकिरणांनी त्याच्या चेहऱ्याला उबदार स्पर्श करताच त्याने डोळे किलकिले केले.

सॅनाटोरियमपर्यंत कसे जायचे ते त्याला मॉस्कोत समजावून सांगण्यात आले होते. आधी माहीत झालेल्या काही थोडचा खुणांवरून, अस्सल सैनिका-प्रमाणे लौकरच त्याने वाट शोधून काढली. स्टेशनपासून सुमारे दहा मिनिटे चालण्याच्या अंतरावर एका रम्य, छोटचा, निवांत सरोवराच्या तीरावर ते ठिकाण होते. क्रांतीपूर्वी, एका रशियन लाखोपतीने तेथे अपूर्व असा ग्रीष्मप्रासाद बांधायचे ठरविले होते. अगदी अपूर्व आणि अभिजात वास्तू बांधण्यासाठी लागेल तेवढा पैसा खर्चावा, असे त्याने आपल्या वास्तुशिल्पज्ञाला सांगितले होते. त्यानुसार त्या वास्तुशिल्पज्ञाने ह्या सरोवराच्या तीरावर ही प्रचंड विटकरी हवेली उभी केली होती. तिला छोटचा, नक्षीदार खिडक्या होत्या, मनोरे होते, सुळके होते; अधांतरी टेकू होते व वळणा-वळणाचे रस्ते होते. ही विचित्र वास्तू वैशिष्टचपूर्ण रशियन निसर्गावर बेढब डागा-सारखी दिसत होती. सरोवराच्या तीरावर लव्हाळी माजली होती. निसर्ग-दृश्य सुंदर होते. निवांत वातावरणात पाण्याची कडा काचेसारखी गुळगुळीत भासत होती. तेथे ॲस्पच्या कोवळया झाडांचा एक पुंजका उभा होता. त्यांची पाने थरथरत होती. ठिपकेदार बुंध्यांचे भोजवृक्ष अधूनमधून झुडुपां-मधून उंच डोकी काढून उभे होते. खुद्द सरोवराभोवती प्राचीन जंगलाची विस्तीर्ण, निळसर, दंतुर चौकट होती. पाण्याच्या शीतल, स्तब्ध, निळसर पृष्ठावर ह्या सर्व गोष्टींचे उलटे प्रतिबिंब पडले होते.

ह्या स्थळाला अनेक प्रसिद्ध चित्रकारांनी दीर्घ मुक्काम केले होते. ह्या जागेचा मालक सबंध रशियाभर त्याच्या आदरातिथ्याबद्दल विख्यात होता. रशियन देखाव्याच्या ताकदवान आणि माफक भव्यतेचे उदाहरण म्हणून असंख्य चित्रांच्या रूपाने ह्या निसर्गदृश्याला पूर्णतः व अंशतः चितारण्यात आले होते. पुढच्या पिढ्यांना आठवण राहण्यासाठी.

आता ह्या प्रासादाचे सोविएत हवाई दलाच्या सॅनाटोरियममध्ये रूपांतर करण्यात आले होते. शांतता काळात हवाई दलाची माणसे ह्या ठिकाणी आपल्या बायका-मुलांसह विश्रांतीला येत होती. आता जखमी वैमानिकांना इस्पितळामधून ह्या ठिकाणी प्रकृती सुधारेपर्यंत रहायला पाठवण्यात येत होते.

वळसेदार, रुंद, दोन्ही बाजूंना भोजाची झाडे असलेल्या अस्फाल्ट रस्त्याने अलेक्सेई ह्या स्थळी आला नाही. स्टेशनपासून सरळ सरोवरापर्यंत येणाऱ्या पायवाटेने जंगलामधून तो आला होता. म्हणजे प्रासादाच्या पिछाडीने तो आला होता व मुख्य प्रवेशद्वाराशी उभ्या असलेल्या दोन गच्च भरलेल्या बसगाड्यांभोवती जमलेल्या मोठ्या, गोंगाट करणाऱ्या जमावात कुणाच्याही नकळत मिसळून गेला होता.

तेथील संभाषणावरून, निरोपाच्या व शुभेच्छांच्या उद्‌गारांवरून अलेक्सेईने तर्क बांधला की, सॅनाटोरियम सोडून युद्धआघाडीवर निघालेल्या वैमानिकांना निरोप देण्यासाठी ती गर्दी तेथे जमली होती. जाणारे वैमानिक एवढे मजेत होते आणि उत्तेजित बनले होते, की जणू ते प्रत्येक ढगामागे मृत्यू लपलेल्या जागी जात नसून आपापल्या शांतताकालीन शिबंदींच्या ठिकाणी जात होते, असे भासत होते. त्यांना निरोप देणाऱ्यांच्या चेहऱ्यांवर खेद आणि अधीरता दिसत होती. अलेक्सेईला त्या भावनेची ओळख होती. दक्षिणेत पेटलेल्या महाप्रचंड लढाईला आरंभ झाल्यापासून त्यालासुद्धा असेच दुर्दम्य आकर्षण वाटत होते. युद्धआघाडीवर परिस्थिती जशी अधिक गंभीर बनली, तशी ही आकर्षणाची भावना जास्त तीव्र झाली होती. लष्करी वर्तुळांमध्ये स्तालिनग्रादचा उल्लेख अद्याप गुपचूप आणि सावधपणे केला जात होता. पण तसा उल्लेख घडला म्हणजे त्या भावनेचे असीम हुरहुरीत रूपांतर व्हायचे व इस्पितळातील सक्तीचे निरुद्योगीपण असह्य बनायचे.

टुमदार बसगाड्यांच्या खिडक्यांमधून उन्हात रापलेले उत्तेजित चेहरे बाहेर डोकावून पहात होते. चट्टयापट्टयांचा पायजमा घातलेला एक बुटका, लंगडा, डोक्यावर टक्कल पडलेला आर्मेनियन त्या बसगाड्यांभोवती लंगडत, उड्या मारीत गडबड करीत होता. आजारानंतर विश्रांती घेणाऱ्यांच्या प्रत्येक गटामध्ये एक चुणचुणीत आणि गंमत्या माणूस हमखास असतो. तशापैकी हा आर्मेनियन दिसत होता. हातातील काठी हलवीत तो निरोपाचे शब्द ओरडला :

"फेद्या ! * फॅसिस्टांना हवेत माझे नमस्कार दे ! चांदण्याच्या स्नानाचा तुझा उपचार पूर्ण करायला तुला सवड न दिल्याबद्दल त्यांना चांगली अद्दल घडव ! फेद्या ! फेद्या ! त्यांना जाणवू दे की, सोविएत हुकमी एक्क्यांना चंद्रस्नान घेऊ न देणं म्हणजे नीचपणा आहे !"

---

* फ्योदर ह्या रशियन नांवाचे लाडके रूप. — अनु.

फेद्या नामक वैमानिक खिडकीमधून बाहेर डोकावला. पिंगट वर्णाच्या चेहऱ्याचा, गोल डोक्याचा, भव्य कपाळावर भलामोठा जखमेचा व्रण असलेला तो एक तरुण होता. त्याने ओरडून सांगितले की, तो आपले कर्तव्य बजावील याची चंद्र समितीने खात्री बाळगावी.

जमावामध्ये हास्याची खसखस पिकली. त्या हास्यकल्लोळातच बसगाड्या सुरू झाल्या व सावकाशपणे फाटकांकडे सरकू लागल्या.

"मस्त शिकार करा! तुमचा प्रवास सुरक्षित होवो!" जमावामधून आवाज उमटत होते.

"फेद्या! फेद्या! तुझ्या पोस्ट ऑफिसचा नंबर आम्हाला लौकरात लौकर कळव! झीनोच्का तुझं काळीज रजिस्टर्ड पोस्टानं परत पाठवील!"

वळणामागे बसगाड्या अदृश्य झाल्या. मावळत्या सूर्यकिरणांमध्ये सोनेरी बनलेली धूळ परत जमिनीवर स्थिरावली. विश्राम घेणारे पट्टेरी पायजम्यांमधील अथवा गाऊनमधील लोक पांगले. बागेत सावकाश फिरू लागले. मेरेस्येव दर्शनी दालनात प्रवेशला. वैमानिकांच्या निळ्या फितींच्या टोप्या क्लोक-रूमच्या आकड्यांना अडकवलेल्या होत्या. कोपऱ्यांमध्ये नऊ खुंट्यांचा खेळ, चेंडू, टेनिसच्या रॅकेट वगैरे गोष्टी पडल्या होत्या. तो लंगडा आर्मेनियन अलेक्सेईला स्वागत कक्षात घेऊन आला. त्याला बारकाईने न्याहाळल्यावर लक्षात येत होते की, त्याचा चेहरा गंभीर, बुद्धीमान होता व त्याचे डोळे सुरेख, टप्पोरे आणि कारुण्याने भरलेले होते. वाटेत जाता जाता त्याने थट्टेत स्वतःची चंद्र समितीचा अध्यक्ष म्हणून ओळख करून दिली. प्रत्येक प्रकारची जखम भरून यायला चंद्रस्नान हा सर्वोत्तम उपचार होता, असे त्याने आग्रहाने प्रतिपादन केले. हे चंद्रस्नान कडक शिस्तीने व व्यवस्थितपणे घेतले पाहिजे असे त्याने बजावून सांगितले. चांदण्यातील सहली त्याने वैयक्तिकरीत्या आयोजित केल्या होत्या, अशीही माहिती त्याने अलेक्सेईला पुरविली. तो अगदी यांत्रिकपणे विनोद करायचा असे भासायचे. मात्र त्याचे डोळे गंभीर रहात व श्रोत्याकडे चौकसपणे न्याहाळून पहात.

स्वागत-कक्षामध्ये मेरेस्येवचे एका पांढऱ्या झग्यातील तरुणीने स्वागत केले. तिचे केस एवढे लाल होते की, तिचे डोके ज्वालांमध्ये वेढल्यासारखे भासायचे.

"मेरेस्येव?" वाचत असलेले पुस्तक बाजूला ठेवीत तिने कडक आवाजात पृच्छा केली. "मेरेस्येव, अलेक्सेई पेत्रोविच?" तिने नव्याने आलेल्या वैमा-

निकाकडे एक चौकस कटाक्ष टाकला व ती पुढे म्हणाली : "माझ्याशी थट्टा करण्याचा प्रयत्न करू नका! मी इथं तुमची नोंद केलीय : 'मेरेस्येव, क्ष इस्पितळातील सीनियर लेफ्टनंट, पाय कापलेले! ..' पण तुम्ही..."

तेव्हा कुठे अलेक्सेईने तिच्या चेहऱ्याकडे पाहिले. सर्व लालकेशा मुलीं-प्रमाणे तिचा चेहरा पांढराशुभ्र होता. लालभडक केसांच्या लोळात तिचा गोल चेहरा जवळ जवळ लपून गेला होता. तिच्या नाजुक त्वचेवर रक्तिमा उमटला. आपल्या तेजस्वी, गोल, धीट डोळयांनी ती अलेक्सेईकडे चकित होऊन पहात होती.

"तरीही, मीच अलेक्सेई मेरेस्येव. हे माझे कागदपत्र... तुमचं नांव ल्योल्या?"

"नाही! का? मी झीना." अलेक्सेईच्या पायांकडे संशयाने पहात ती पुढे म्हणाली : "तुमचे कृत्रिम पाय एवढे चांगले आहेत, की...?"

"अच्छा! म्हणजे फेद्याचं काळीज जिच्यापाशी हरवलं त्या झीनोच्का तुम्हीच?"

"म्हणजे मेजर वर्नाझ्याननं आधीच अफवा सुरू केल्या? शी:! त्या माणसाचा मला मनस्वी राग येतो! प्रत्येकाची तो टवाळी करतो. फेद्याला मी नाचायला शिकवलं. त्यात विशेष असं काहीच नव्हतं! होय की नाही?"

"आणि आता मला नाच शिकवाल! ठीक? वर्नाझ्याननं मला चंद्रस्नान घालण्याचं वचन दिलंय."

त्या तरुणीने अलेक्सेईकडे आणखीच चकित होऊन पाहिले.

"काय म्हणायचंय तुम्हाला? नाचायचं? पाय नसताना? भलतंच! मला वाटतं, तुम्हालाही प्रत्येकाची चेष्टा करायला आवडतं!"

तेवढ्यात मेजर स्त्रूच्कोव खोलीत धावत आला आणि त्याने अलेक्सेईला मिठी घातली.

"झीनोच्का!" तो तिला म्हणाला. "मग ठरलं ना? सीनियर लेफ्टनंट माझ्या खोलीत राहणार!"

इस्पितळात दीर्घ काळ एकत्र राहणारे पुरुष नंतर परत भेटतात तेव्हा त्यांच्यात बंधुत्वाचे नाते निर्माण झालेले असते. मेजरला पाहून अलेक्सेईला एवढा आनंद झाला, की जणू त्यांची वर्षानुवर्षे भेट घडली नव्हती असे पाहणाऱ्याला वाटले असते. स्त्रूच्कोवची सामानाची थैली एव्हाना सॅनाटोरि-

यममध्ये आली होती व तो घरच्याप्रमाणे तेथे वावरू लागला होता. तो प्रत्ये-काला ओळखू लागला होता व प्रत्येकजण त्याला ओळखू लागला होता. एका दिवसाच्या अवधीत त्याने काहींशी मैत्री जमविली होती, तर काहींशी भांडण केले होते.

ज्या छोटया खोलीत ते दोघे राहू लागले होते तिच्या खिडक्या बागेच्या दिशेला होत्या. बागेत उंच, सरळ देवदार वृक्ष होते, बिलबेरीची हिरवी झुडुपे होती, पहाडी प्रदेशातील एक सडपातळ ॲशचे झाड होते. तालवृक्षा-प्रमाणे त्याची नक्षीदार, मोजकीच पाने ओठंगली होती व बेरींचा एकच घसघशीत घोस थेट घरासमोर लोंबत होता.

रात्रीच्या जेवणानंतर अलेक्सेई थेट बिछान्यात शिरला व शीतल चादरीं-मध्ये स्वतःला गुरफटून तात्काळ गाढ झोपला.

त्या रात्री त्याला फार विचित्र, वाईट स्वप्ने पडली. निळसर बर्फ. चांदणे. केसाळ जाळयाप्रमाणे त्याला वेढणारे जंगल. त्याने जाळे तोडायचा प्रयत्न केला, पण बर्फाने त्याचे पाय पकडून धरले. काहीतरी भयानक आपत्ती कोसळणार ह्या जाणीवेने त्याने जोरात धडपड केली, पण त्याचे पाय बर्फात गोठले होते व बर्फामधून पाय वर उचलणे त्याला अशक्य ठरले होते. तो कण्हत होता, तळमळत होता, आळोखे-पिळोखे देत होता, आता तो अरण्यात नव्हता, तर विमानतळावर होता. लंबू मेकॅनिक यूरा एका चमत्कारिक, मऊ आणि पंखविहीन विमानाच्या कॉकपिटमध्ये बसलेला होता. त्याने हात हलविला, तो हसला व त्याने आकाशात झेप घेतली. मिखाईल आजोबांनी अलेक्सेईला एखाद्या लहान बाळाप्रमाणे आपल्या हातांवर घेतले व सांत्वनाच्या सुरात ते म्हणाले: "काही हरकत नाही! आपण छान वाफेची आंघोळ करू. छान वाटेल की नाही?" पण गरम स्नानाऐवजी आजोबांनी त्याला थंड बर्फात ठेवले. अलेक्सेईने वर उठण्याचा खूप प्रयत्न केला, पण बर्फाने त्याला गच्च धरून ठेवले. नव्हे, तो बर्फ नव्हता, तर एका अस्वलाचे गरम धूड त्याच्या अंगावर घोरत पडले होते, त्याला चिरडत होते, घुसमटून टाकीत होते. वैमानिकांनी गच्च भरलेल्या बसगाडया त्याच्याजवळून भराभरा गेल्या. सारेजण आनंदात होते, पण एकानेही त्याला पाहिले नाही. अलेक्सेई त्यांना मदतीसाठी हाक मारू इच्छित होता, त्यांच्याकडे पळत जाऊ पहात होता, निदान हाताने खूण करू पहात होता. पण त्याला ते जमले नाही. त्याने आपले तोंड उघडले, पण केवळ एक घोगरा अस्पष्ट आवाज बाहेर

पडला. त्याचा जीव घुसमटू लागला होता. आपल्या हृदयाची धडधड थांबल्याचे त्याला जाणवले. त्याने एक शेवटचा प्रयत्न केला आणि का कुणास ठाऊक, त्याला झीनोच्काचा चेहरा दिसला. ती हसत होती, तिचे धीट, चौकस डोळे त्याला न्याहाळत होते. तिच्या ज्वालांसारख्या पेटत्या केसांमध्ये तिचा वर्ह्हंश चेहरा लपला होता.

विलक्षण धास्तावल्या मनःस्थितीत अलेक्सेई जागा झाला. शांततेचे साम्राज्य पसरले होते. मेजर हलके घोरत झोपला होता. अंधुक चंद्रकिरण खोलीत फरशीवर पसरला होता. ते भयंकर दिवस त्याला परत का आठवले होते? त्यांच्याबद्दल विचार करण्याचे त्याने जवळ जवळ थांबविले होते. आणि जेव्हा त्यांना तो आठवे तेव्हा त्याला ते खोटे भासत. त्या शीतल, गंधित रजनीच्या झुळुकांबरोबर एक मंद, झोपाळू, तालबद्ध ध्वनी सताड उघड्या चंद्रप्रकाशित खिडकीमधून कोसळत होता. क्षणात तो थरकाप उडवायचा, क्षणात दूरवर विरून जायचा, तर क्षणात टिपेला जाऊन घाबरल्यासारख्या थबकायचा. तो जंगलचा ध्वनी होता.

अलेक्सेई बिछान्यात उठून बसला आणि बराच वेळपर्यंत देवदारांची रहस्यमय सळसळ ऐकत राहिला. एखादी मोहिनी झटकून टाकावी तसे त्याने जोरजोराने डोके हलविले. पुन्हा त्याच्यात खंबीर, आनंदी वृत्ती संचारली. सॅनाटोरियममध्ये त्याचा मुक्काम अठ्ठावीस दिवसपर्यंत राहणार होता. तो विमान उडवू शकेल, लढू शकेल, जगू शकेल, अथवा सदैव सहानुभूतीचे कटाक्ष झेलत आणि ट्रामगाडीत लोकांनी दिलेले आसन स्वीकारीत राहील, याचा निर्णय या अवधीत लागणार होता. म्हणून ह्या प्रदीर्घ आणि तरीही अल्प अशा अठ्ठावीस दिवसांमधील प्रत्येक मिनिट त्याला अस्सल माणूस बनण्यासाठी झगडावे लागणार होते.

पिशाच्चवत चंद्रप्रकाशात आपल्या बिछान्यावर बसून, मेजरच्या घोरण्याच्या पार्श्वध्वनीमध्ये, अलेक्सेईने मनातल्या मनात आपल्या व्यायामांचा कार्यक्रम आखला. त्यात सकाळचे आणि संध्याकाळचे व्यायाम होते, चालणे-धावणे होते, पायांच्या खास सरावाचा समावेश होता. आणि झीनोच्काबरोबर बोलताना त्याच्या मनात चमकलेल्या कल्पनेचे त्याला सर्वांत जास्त आकर्षण वाटले होते; त्याच्या पायांच्या सर्वांगीण विकासाला त्यामुळे फार मदत होणार होती.

नृत्य शिकायचा त्याने निर्णय घेतला.

ऑगस्टमधील एक स्वच्छ, निवांत दुपार. निसर्गातील सर्व गोष्टी चमकत होत्या. गरम हवेमध्ये आगामी शरद ऋतूच्या निश्चित, पण अद्याप दृग्गोचर न होणाऱ्या उदासीनतेच्या खुणा एव्हाना जाणवू लागल्या होत्या. झुडुपांमधून वळणे घेत खळखळत जाणाऱ्या छोट्या ओढ्याच्या वाळवंटी किनाऱ्यावर अनेक वैमानिक सूर्यस्नान घेत होते.

उष्णतेमुळे थकून ते झोपा काढत होते. कधीही न दमणारा बर्नाझ्यान-सुद्धा गप्प बसला होता. अद्याप नीट बऱ्या न झालेल्या आपल्या मोडलेल्या पायावर गरम वाळूचा ढीग रचत होता. एका झुडुपाच्या राखाडी पानांआड ते लपले जात होते, पण त्यांना मात्र ओढ्याच्या वरच्या तीरावरील गवत तुडविलेली पायवाट स्पष्ट दिसत होती. आपल्या पायावर वाळूचा ढीग जमविण्यात दंग असलेल्या बर्नाझ्यानने सहज नजर वर उचलली तेव्हा एक विलक्षण दृश्य त्याला दिसले.

आदल्या दिवशी आलेला नवागत जंगलामधून फक्त पायजमा व बुटांमध्ये बाहेर पडला. त्याने आजूबाजूला पाहिले आणि कुणी दिसत नाही असे आढळताच विचित्र उड्या मारीत धावायला आरंभ केला. धावताना त्याने हातांचे कोपर कमरेला घट्ट चिकटवून धरले होते. सुमारे दोनशे मीटर धावल्यानंतर तो चालू लागला. चालताना त्याला धाप लागली होती आणि घाम फुटला होता. धाप संपल्यानंतर तो पुन्हा धावू लागला. त्याचे शरीर वेगाने धावणाऱ्या घोड्याच्या फऱ्यांप्रमाणे चमकत होते. बर्नाझ्यानने खुणेनेच आपल्या सहकाऱ्यांचे तिकडे लक्ष वेधले व झुडुपाआडून ते त्या नवागताच्या हालचाली निरखू लागले. त्या अगदी साध्या व्यायामांमुळेसुद्धा नवागत धापा टाकत होता, अधूनमधून वेदनेपायी चेहरा वाकडा करीत होता, कण्हत होता, पण तरीही धावत होता.

बर्नाझ्यानचा संयम सुटला व त्याने हाक मारली :

"ए मित्रा! झ्नामेन्स्की बंधूंना चीत करायचा इरादा आहे काय तुझा?"

नवागत एकदम दचकून थांबला. त्याच्या चेहऱ्यावरून थकवा आणि वेदना यांचे भाव एकदम नाहीसे झाले. झुडुपाच्या दिशेने त्याने शांतपणे कटाक्ष टाकला आणि एकही शब्द न बोलता विचित्र दुडक्या चालीने तो परत जंगलात निघून गेला.

"कोण आहे तो? सर्कशीतला कसरतपटु आहे, का वेडा आहे?" गोंधळून वर्नाझ्यानने विचारले.

एक डुलकी काढून नुकत्याच जागे झालेल्या मेजर स्त्रूच्कोवने खुलासा केला :

"त्याला पाय नाहीत. कृत्रिम पायांवर तो सराव करतोय. आपल्या लढाऊ कमांडमध्ये परत जायची इच्छा आहे त्याची!"

हे शब्द ऐकताच त्या सुस्त माणसांवर थंड पाण्याचा फवारा उडाल्यासारखा परिणाम घडला. ताडकन उड्या मारीत ते उठले व एकाच वेळी सारे बोलू लागले. केवळ विचित्र चालीपलिकडे दुसरे काही विशेष न आढळलेल्या माणसाला पाय नाहीत हे समजताच ते चकित झाले होते. लढाऊ विमान उडविण्याची त्याची महत्त्वाकांक्षा त्यांना मूर्खपणाची वाटली, अतर्क्य वाटली, कुचेष्टेची वाटली. अत्यंत क्षुल्लक गोष्टींसाठी हवाई दलामधून कमी केलेल्या लोकांच्या गोष्टी त्यांना आठवल्या. कुणाची हाताची दोन बोटे तुटली म्हणून, कुणाची मन:स्थिती ताणलेली म्हणून अथवा सपाट पावले असल्याची चिन्हे दिसली म्हणूनसुद्धा लोकांना हवाई दलामधून काढून टाकण्यात आलेले होते. सेनादलाच्या इतर कोणत्याही शाखेपेक्षा हवाई दलामध्ये वैमानिकाची शारीरिक क्षमता नेहमी – अगदी युद्धकाळातसुद्धा – सर्वोच्च दर्जाची अपेक्षिण्यात येत होती. शिवाय, लढाऊ विमानासारखे अत्यंत अवघड, संवेदनक्षम यंत्र कृत्रिम पायांच्या साह्याने चालविणे संपूर्ण अशक्य होते, असे त्यांचे मत होते.

मेरेस्येवची कल्पना तऱ्हेवाईक होती यावर त्या सर्वांचे एकमत झाले. पण तरीही तिचे त्यांना आकर्षण वाटले.

"तुमचा मित्र एक तर वाया गेलेला वेडा आहे, किंवा फार थोर माणूस आहे. त्याच्या दरम्यान काही नाही!" वर्नाझ्यानने आपला निष्कर्ष सांगितला.

लढाऊ विमान उडविण्याचे स्वप्न पाहणारा, पाय नसलेला एक माणूस सॅनाटोरियममध्ये होता, ही बातमी क्षणार्धात सर्व वॉर्डमध्ये पसरली. जेवणाच्या वेळेपर्यंत अलेक्सेई हा सर्वांच्या अवधानाचा केंद्रबिंदू बनला होता. मात्र त्याला ह्याची जाणीव झालेली भासत नव्हती. त्याला जे निरखून पहात होते त्यांना दिसत होते की, जेवणाच्या वेळी तो आपल्या शेजाऱ्यांशी गप्पा मारताना मनापासून हसत होता, मनसोक्त खात होता, वाढण्याचे काम करणाऱ्या सुंदर मुलींची ठराविक पद्धतीने स्तुती करीत होता, बागेत आपल्या मित्रांबरोबर फिरत होता, क्रोकी खेळ शिकत होता. एवढेच नव्हे तर

व्हॉलीवॉल खेळण्याचाही त्याने यत्न केला होता. पायाला किंचित झटका देऊन संथपणे चालण्याची त्याची लकब सोडली, तर दुसरे विशेष असे त्याच्यात काहीच आढळत नव्हते. खरे म्हणजे तो अगदीच सर्वसामान्य दिसायचा. प्रत्येकाला लौकरच त्याची सवय झाली आणि कुणीही त्याच्याकडे विशेष लक्ष देईनासा झाला.

सॅनाटोरियममध्ये प्रवेश केल्याच्या दिवशी संध्याकाळी थोड्या उशिरा, झीनोच्काला भेटण्यासाठी अलेक्सेई स्वागत-कक्षात गेला. आपल्या जेवणा-मधून त्याने केकचा तुकडा राखून ठेवला होता व आता एका झुडुपाच्या पानात तो तुकडा गुंडाळून हाती धरला होता. त्याने ऐटबाजपणे तो केकचा तुकडा झीनोच्काला नजर केला व सरळ टेबलावर बैठक ठोकीत त्याने पृच्छा केली की, आपले वचन ती केव्हा पाळणार होती.

"कसलं वचन?" झीनोच्काने आपल्या पेन्सिलीने रंगविलेल्या कमानदार भुवया उंचावत विचारले.

"तुम्ही मला नाच शिकवायचं वचन दिलं होतं झीनोच्का!"

"पण..." तिने विरोध करण्याचा प्रयत्न केला.

"मला सांगण्यात आलंय की, लंगडेसुद्धा नाचायला शिकतात एवढ्या तुम्ही चांगल्या शिक्षिका आहात. सर्वसामान्य माणसं तर केवळ आपले पायच नव्हे तर डोकीसुद्धा गमावून बसतात. त्या फेद्याप्रमाणं! मग केव्हा सुरुवात करायची आपण? मौल्यवान वेळ उगीच गमावायला नको!"

तिला खरोखरीच हा नवागत आवडला होता. त्याला पाय नव्हते, तरीही तिने त्याला नृत्य शिकवावे अशी त्याची इच्छा होती. त्याची इच्छा तिने का पुरी करू नये? तो छान माणूस होता, त्याचे डोळे काळेभोर होते आणि त्याची कांती तजेलदार होती. चारचौघांसारखा तो चालत होता. त्याच्या डोळ्यांमध्ये मिस्कीलता होती. मात्र त्याचबरोबर कारुण्याची किंचित छटाही डोकावायची. झीनोच्काच्या जीवनात नृत्याला फार मोठे स्थान होते. तिला नृत्य खूप आवडायचे आणि ती खरेच नृत्यात कुशल होती... आणि मेरेस्येव खरोखरीच देखणा होता!

थोडक्यात सांगायचे म्हणजे तिने होकार दिला. मॉस्कोतील सकोलनिकी विभागात विख्यात असलेल्या बॉब गोरोखोव नामक निष्णात नृत्य-शिक्षकाने तिला नृत्य शिकविल्याचे तिने अलेक्सेईला सांगितले. याउलट, सबंध मॉस्कोत प्रसिद्ध असलेल्या आणि लष्करी अकादमींमध्ये व विदेश मंत्रालयाच्या क्लबात

नृत्य शिकविणाऱ्या पॉल सूदाकोवस्कींचे बॉब गोरोखोव हे पट्टशिष्य होते. बॉलनृत्यामधील उत्तम परंपरा झीनोच्काने ह्या नामवंतांकडून आत्मसात केलेल्या होत्या व अलेक्सेईलासुद्धा नाच शिकविण्याची तिची तयारी होती. मात्र, खरे पाय नसताना नृत्य करणे त्याला कितपत शक्य होईल याबद्दल तिला शंका होती. त्याला नृत्य शिकविण्याचे कबूल करताना तिने घातलेल्या अटी खूप कडक होत्या: त्याने आज्ञाधारकपणे व मनःपूर्वक शिकले पाहिजे; तिच्या प्रेमात पडायचे नाही, कारण त्यामुळे धड्यांमध्ये व्यत्यय येतो; मुख्य म्हणजे इतर जोडीदारांनी तिला नृत्याचे पाचारण केले तर त्याने मत्सर वाटून घ्यायचा नाही, कारण जर एकाच जोडीदाराबरोबर ती नाचत राहिली, तर आपले नृत्यातील कसब ती गमावून बसेल; शिवाय एकाच जोडीदाराबरोबर चिकटून राहण्यात काही गंमत नव्हती.

काही अनमान न करता मेरेस्येवने तिच्या अटी स्वीकारल्या. झीनोच्काने आपल्या ज्वालेसमान केसांना एक झटका दिला व तेथल्या तेथे आपल्या सुंदर पायांची हालचाल करीत पहिली पावले नाचून दाखविली. एकेकाळी रूस्काया नाचात मेरेस्येव खूप चपळ होता व कामीशिनच्या सार्वजनिक उद्यानात फायर-ब्रिगेडचा बँड वाजत असे तेव्हा जुने नाच नाचण्यात तो पटाईत होता. त्याला तालाचे ज्ञान होते व ही आनंदी नृत्यकला तो चटकन शिकला होता. पण आता अडचण होती ती वेगळीच. आता सजीव, लवचिक, फिरत्या पायांची पावले टाकायची नव्हती, तर पोटऱ्यांना बांधलेल्या चामडी पट्ट्यांना तालात फिरवायला शिकायचे होते. त्या अवजड आणि बोजड कृत्रिम पायांना जिवंतपणा व गती देण्यासाठी अमानुष प्रयत्नांची आवश्यकता होती. अमाप निर्धार पणाला लावणे जरूर होते.

पण त्याने त्या कृत्रिम पायांना आपले ऐकायला भाग पाडले. बॉल-नृत्यामधील प्रत्येक नवा पदन्यास तो शिकला. प्रत्येक नृत्यप्रकार आत्मसात करताना त्याला अत्यानंद होत होता. अशा वेळी तो आपल्या शिक्षिकेला जमिनीवरून वर उचलायचा व स्वतःवरील विजयाच्या आनंदाप्रीत्यर्थ तिला घेऊन गिरक्या मारायचा. त्या अवघड, विविध पदन्यासांना अंमलात आण-ताना त्याला किती प्रचंड यातना होत व नृत्य शिकण्याची केवढी मोठी किंमत तो मोजत होता ह्याची कुणालाही कल्पना नव्हती. त्याच्या नृत्यशिक्षिकेला तर मुळीच नव्हती. बेफिकीरपणाचा आव आणून तो आपल्या सस्मित

चेहऱ्यावरील घाम पुसायचा, तेव्हा वेदनांपायी न आवरलेले डोळ्यांमधील अश्रूही पुसून टाकायचा, हे कुणाच्याही लक्षात आलेले नव्हते.

एक दिवस तो आपल्या खोलीत लंगडत शिरला. खूप दमणूक होऊनही तो आनंदात होता.

"मी नाचायला शिकतोय !" त्याने मेजर स्त्रूच्कोवला अभिमानाने सांगितले. मेजर त्यावेळी खिडकीपाशी विचारमग्न उभा होता. उन्हाळ्यातील दिवस बाहेर शांतपणे मावळत होता. झाडांच्या शेंड्यांवर सूर्याची मावळतीची काही किरणे सोन्यासारखी चमकत असलेली खिडकीमधून दिसत होती.

मेजरने काहीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही.

"आणि मला नक्की नाचता येईल !" मेरेस्येव ठाम स्वरात पुढे म्हणाला. आपले कृत्रिम पाय त्याने बाजूला फेकले व सुटकेचा निःश्वास टाकत नखांनी बधीर पाय जोरजोराने खाजविले.

स्त्रूच्कोवचा चेहरा अजूनही खिडकीकडे वळलेला होता. त्याचे खांदे गदगदत होते व हुंदक्यांप्रमाणे विचित्र आवाज तो काढत होता. मुकाटपणे अलेक्सेई पांघरुणात शिरला. मेजरच्या बाबतीत काहीतरी अघटित घडत होते. यौवन सरलेला हा माणूस अगदी परवापर्यंत बायकांविषयी कुत्सित बोलून, त्यांच्याबद्दलचा दुष्टावा उघडपणे व्यक्त करून इस्पितळातील वॉर्ड-मधल्या लोकांची करमणूक करीत होता, त्यांचा राग ओढवून घेत होता. पण अचानक, एखाद्या शाळकरी मुलाप्रमाणे तो आता प्रेमात पडला होता आणि त्या प्रेमाला सफलता लाभण्याची कसलीच आशा नव्हती. दिवसातून अनेक वेळा तो स्वागत-कक्षात जायचा आणि मॉस्कोत क्लावदिया मिखाइलोव-नाला फोन करायचा. मॉस्कोला जाणाऱ्या प्रत्येक पेशंटबरोबर तो तिच्या-साठी फुले, बिस्कीटे, चॉकलेट आणि लेखी निरोप पाठवायचा. तिला तो लांबलचक पत्रे लिहायचा व परिचित लिफाफा मिळाला म्हणजे तो आनंदी व्हायचा, थट्टा-विनोद करायचा.

पण त्याच्या पुढाकाराला तिने विरोध केला. त्याला कोणतेही उत्तेजन तिने दिले नाही. त्याची तिला मुळीच कणव येत नव्हती. तिने त्याला लिहिले होते की, दुसऱ्या कुणा दिवंगत व्यक्तीवर तिने प्रेम केले होते, त्याच्यासाठी शोक केला होता. मित्रत्वाच्या नात्याने तिने मेजरला सल्ला दिला होता की, त्याने तिचा नाद सोडावा, तिला विसरून जावे, तिच्या-साठी खर्च करू नये अथवा वेळ वाया घालवू नये. अशी स्नेहाची, पण

रोखठोक भाषा प्रेमाच्या बाबतीत फार अपमानकारक होती व त्यामुळे मेजर बिथरला होता.

मुत्सद्दीपणा राखून अलेक्सेई आपल्या बिछान्यात मुकाट पडून राहिला. शेवटी मेजर खिडकीपासून गर्रकन वळला व अलेक्सेईच्या दंडाला धरून गदगदा हलवीत ओरडला:

"काय हवंय तिला? सांग मला, मी कोण आहे? शेतातलं तूस? मी कुरूप आहे, का म्हातारा आहे, का महारोगी? तिच्याजागी दुसरी कुणीही असती... पण बोलून काय उपयोग?"

त्याने स्वतःला आरामखुर्चीत झोकून दिले. आपल्या दोन्ही हातांमध्ये डोके गच्च आवळून तो जोरजोराने मागे-पुढे डोलू लागला, तेव्हा ती खुर्ची करकरू लागली.

"शेवटी ती एक स्त्री आहे की नाही? तिनं माझ्यात निदान थोडा तरी रस दाखवायला हवा होता! स्त्रीरूपी सैतान! माझं प्रेम आहे तिच्यावर! तुला कल्पना नाही त्याची! त्या दुसऱ्या माणसाला तू ओळखत होतास... सांग, कोणत्या दृष्टीनं तो माझ्यापेक्षा वरचढ होता? कशामुळं त्याला ती लाभली? जास्त हुषार होता का? अधिक देखणा? असा कुठला वीर लागून गेला होता तो?"

अलेक्सेईला कमिस्सार वोरोब्योव आठवले. त्यांचा प्रचंड, सूज आलेला देह, उशीवर टेकलेला त्यांचा पिवळट चेहरा, स्त्री-दुःखाच्या चिरंतन रूपात त्यांच्यावर पुतळ्याप्रमाणे ओणवी उभी असलेली स्त्री व वाळवंटामधून वाटचाल करीत गेलेल्या लाल सैनिकांची ती चकित करणारी हकीकत -- ह्या साऱ्या साऱ्या गोष्टी त्याला आठवल्या.

तो म्हणाला: "मेजर, तो एक अस्सल माणूस होता! बोल्शेविक. देव करो आणि आपल्यालासुद्धा त्याच्यासारखं घडवो!"

४

पाय नसलेला वैमानिक नाच शिकतोय ही वरकरणी चमत्कारिक वाटणारी बातमी सबंध सॅनाटोरियमभर पसरली. स्वागत-कक्षामधील आपले काम संपवून झीनोच्का बाहेर येई तेव्हा तिचा विद्यार्थी कॉरीडॉरमध्ये तिची वाट पहात असलेला तिला आढळून येई. कधी तो तिला रानफुलांचा गुच्छ

देई, तर कधी जेवणामधून राखून ठेवलेले चॉकलेट अथवा संत्रे देई. झीनोच्का गंभीरपणे त्याच्या दंडाला धरायची व ते मनोरंजन दालनात जायचे. उन्हाळ्यामध्ये हे दालन ओस पडलेले असे. झीनोच्काच्या निष्ठावंत विद्यार्थ्याने तेथील पत्त्यांचे टेबल व पिंग-पाँगचे टेबल आधीच बाजूला कोपऱ्यात सरकवून ठेवलेले असे. झीनोच्का डौलदारपणे त्याला नवी मुद्रा करून दाखवी. तिचे छोटे, सुंदर पाय फरशीवर जेव्हा अवघड आकृत्या रेखाटीत तेव्हा भुवया आकुंचित करून अलेक्सेई लक्षपूर्वक पहात राही. मग झीनोच्का गंभीर चेहऱ्याने हातांनी टाळ्या वाजवीत आकडे मोजू लागे:

"एक, दोन, तीन – एक, दोन, तीन, उजवीकडे सरक!.. एक, दोन, तीन – एक, दोन, तीन, डावीकडे सरक!.. गिरकी मार! बरोब्बर! एक, दोन, तीन – एक दोन, तीन... आता सर्पाकृती! आपण बरोबर करू या!"

बॉब गोरोखोव अथवा पॉल सूदाकोवस्की यांच्यापैकी एकानेही अद्याप पाय नसलेल्या माणसाला नृत्य शिकविण्याचे काम हाती घेतले नव्हते म्हणून असेल, किंवा हा काळ्याभोर केसांचा व मिस्कील डोळ्यांचा शिष्य तिला आवडला म्हणून असेल, अथवा ह्या दोन्ही कारणांमुळे असेल, पण झीनोच्का आपला संपूर्ण फावला वेळ जीव ओतून हे काम करीत होती एवढे मात्र खरे!

संध्याकाळच्या वेळांना वाळवंटी नदीकाठ, व्हॉलीबालचे मैदान आणि नऊ खुंट्यांच्या खेळाची जागा जेव्हा ओस पडत व नृत्य हे रुग्णांचे आवडते मनोरंजन बनत असे, तेव्हा त्या मौजेत अलेक्सेई न चुकता भाग घेत असे. तो उत्तम नृत्य करायचा, एकही नाच चुकवायचा नाही. त्याला कडक अटी घातल्याबद्दल त्याच्या शिक्षिकेला अनेकदा मनोमन पश्चात्ताप झाला होता. ॲकॉर्डियनच्या सुरावर जोडपी गिरक्या घेत. चेहरा लालबुंद झालेला व उत्तेजित झाल्यामुळे डोळे चमकत असलेला अलेक्सेई सर्व गिरक्या, वळणे घ्यायचा. ज्वालांसमान बटा असलेल्या आपल्या चपळ पायांच्या जोडीदारणीला चपळपणे व सहज भासेल अशा रीतीने नाचवायचा. हा उमदा नर्तक नाच संपल्यानंतर वारंवार खोलीबाहेर जाऊन काय करायचा त्याबद्दल मात्र कुणीच कधीही कसलाही तर्क केला नव्हता.

नृत्यदालनामधून बाहेर पडताना त्याच्या लालबुंद चेहऱ्यावर स्मित असायचे. आपल्या हातरुमालाने तो बेफिकीरपणे वारा घेत असायचा. पण

दारावाहेर जाताच त्याच्या स्मितानी जागा वेदनाभरी मुद्रा घेई. कठड्याला रेलून धडपडत, विव्हळत तो पोर्चच्या पायऱ्या उतरून खाली जायचा आणि दंवभरल्या गवतावर व अजून उबदार असलेल्या जमिनीवर धप्पदिशी अंग टाकायचा. कृत्रिम पायांच्या घट्ट पट्ट्यांमुळे नाचताना झालेल्या वेदनांपायी तो अक्षरशः रडायचा.

पायांना मोकळेपणा मिळावा म्हणून तो पट्टे सोडायचा. पुरेशी विश्रांती झाली म्हणजे परत पट्टे वांधायचा, उडी मारून उठायचा व परत नृत्यदालनाकडे चालत जायचा. कुणाच्याही नकळत तो नृत्यदालनात प्रवेश करायचा. अॅकॉर्डियनवर अखंडपणे संगीत पिळणारा वादक घामाघूम झालेला असे. लाल केसवाली झीनोच्का एव्हाना त्याला गर्दीमध्ये नजरेने शोधत असायची. अलेक्सेई आपल्या पांढऱ्याशुभ्र दंतपक्ती दाखवीत, रुंद स्मित करीत तिच्यापाशी जायचा. ते चपळ, डौलदार जोडपे पुन्हा नृत्याच्या गिरक्या घेऊ लागायचे. आपल्याला सोडून गेल्यावद्दल झीनोच्का त्याची लटकेच हजेरी घेई. तोसुद्धा गंमतीने प्रतिटोमणे मारी व इतर जोडप्यांप्रमाणेच ती दोघे नृत्याच्या गिरक्या घेत.

ह्या कठीण श्रमांच्या नृत्याच्या धड्यांचे फळ लौकरच दिसून आले. अलेक्सेईला आता कृत्रिम पायांचे बंधन कमी कमी जाणवू लागले. ते कृत्रिम पाय जणू त्याच्या खऱ्या पायांवर कलम करून लावल्यासारखे भासू लागले.

अलेक्सेई खूष झाला होता. आता फक्त एकाच गोष्टीने तो चिंतातुर होई—ओल्गाकडून पत्रे येणे बंद झाले होते. ग्वोझ्देवच्या त्याच्या मैत्रिणीबरोबरच्या अप्रिय अनुभवानंतर अलेक्सेईने ओल्गाला ते पत्र पाठवून महिना उलटला होता. आता ते पत्र त्याला घातकी व पूर्ण मूर्खपणाचे वाटत होते. पण त्या पत्राचे अजिबात उत्तर आले नाही. रोज सकाळी तो कसरती व पळण्याचे व्यायाम करी आणि नंतर आपल्याला काही पत्रे आली आहेत अथवा नाहीत याची चौकशी करायला स्वागत-कक्षात जाई. रोजच्या रोज व्यायामात तो शंभर पावलांची वाढ करीत होता. "म" अक्षराच्या कप्प्यात इतर कप्प्यांपेक्षा नेहमी सर्वांत जास्त पत्रे असत, पण त्याच्या नांवाचे मात्र एकही पत्र त्या गठ्ठ्यात त्याला आढळत नसे.

एक दिवस अलेक्सेईचा नृत्याचा धडा चालू होता तेव्हा हॉलच्या खिडकीमधून वर्नाझ्यानचे काळे केसवाले डोके आत डोकावले. त्याच्या हातात त्याची चालण्याची काठी होती व एक पत्र होते. त्याने एखादा शब्द उच्चारण्याच्या

आतच्च अलेक्सेईने पत्र हिसकावून घेतले. त्या पत्रावर शाळकरी मुलीच्या मोठ्या, वळणदार हस्ताक्षरात पत्ता लिहिलेला होता. चकित झालेल्या वर्नाझ्यानला खिडकीपाशी सोडून व संतापलेल्या शिक्षिकेला खोलीच्या मध्यभागी सोडून, अलेक्सेई त्या पत्रासह तेथून विजेच्या वेगाने पसार झाला.

"झीनोच्का, आजकाल हे सगळे एकाच माळेचे मणी आहेत," एखाद्या गावगप्पा करणाऱ्या मावशीच्या स्वरात वर्नाझ्यान म्हणाला. "सगळे एकजात फसवे. त्यांच्यापैकी कुणावरही विश्वास ठेवू नको. पवित्र पाण्यापासून सैतान दूर पळतो तशी त्यांच्यापासून लांब पळ! त्यापेक्षा मला तुझा शिष्य म्हणून घे!" असे बोलून त्याने हॉलमध्ये आपली काठी फेकली आणि धापा टाकीत व विव्हळत तो खिडकीमधून चढून वर आला. झीनोच्का खिन्न आणि गोंधळल्या मनःस्थितीत तेथे उभी होती.

दरम्यान, अलेक्सेई सरोवरापाशी पळाला होता. कुणीतरी मागून धावत येईल आणि त्याचा खजिना लुबाडून घेईल अशी धास्ती वाटल्याप्रमाणे त्याने ते पत्र आपल्या हाती गच्च धरले होते. सळसळणाऱ्या लव्हाळ्यांना बाजूला सारीत, उंच गवताआड पूर्ण झाकल्या गेलेल्या एका शेवाळल्या दगडावर तो बसला. आपल्या थरथरणाऱ्या बोटांमध्ये त्या मौल्यवान पत्राला पकडून तो बारकाईने न्याहाळत होता. त्या पत्रात काय होते? कोणती शिक्षा त्यातून फर्मावण्यात येणार होती? लिफाफा जुना दिसत होता आणि कडांना फाटला होता. आपल्या मुक्कामाला पोहोचण्यापूर्वी तो बराच भटकला असावा. अलेक्सेईने सावधपणे लिफाफ्याची पट्टी फाडली व पत्रामधील शेवटच्या ओळीवर त्याची नजर पडली: "लाडक्या, सदैव तुझी, ओल्या." त्याने एकदम सुटकेचा निःश्वास टाकला. आता त्याने वहीतील ते कागद शांतपणे आपल्या मांडीवर सरळ पसरले. त्यांच्यावर माती फासली गेली होती व मेणाचे डाग पडलेले होते. ओल्या नेहमी खूप व्यवस्थित आणि नीटनेटकी असायची. मग आताच काय झाले होते तिला? मग त्याने पत्रातील घडामोडी वाचल्या तेव्हा त्याचा ऊर अभिमानाने दाटून आला होता व त्याला भीतीही वाटली होती. असे दिसत होते की, सुमारे महिन्यापूर्वी ओल्गाने गिरणी सोडली होती व आता स्तेपमध्ये कोठेतरी इतर मुलींबरोबर आणि कामीशिनच्या बायकांबरोबर रहात होती. तेथे ती इतरांबरोबर रणगाडाविरोधी खंदक खणत होती, "ज्या शहराचं नांव आपणा सर्वांना पूज्य आहे अशा एका मोठ्या शहराभोवती" तटबंदी उभारण्यात भाग घेत होती.



त्या पत्रामध्ये स्तालिनग्रादचा कोठेही उल्लेख नव्हता. पण ह्या "मोठ्या शहरा" विषयी ज्या प्रेमाने, चिंतेने आणि आशेने तिने लिहिले होते, त्यावरून तिला स्तालिनग्राद अभिप्रेत असल्याचे स्पष्ट होते.

तिने लिहिले होते की तिच्यासारखे हजारो स्वयंसेवक स्तेपमध्ये रात्रंदिवस खपत होते, खणत होते, मातीच्या गाड्या वाहून नेत होते, काँक्रीट पसरत होते, बांधकाम करीत होते. एकूण त्या पत्राचा स्वर आनंदी असला तरी काही वाक्यांमधून स्पष्ट जाणवत होते की, स्तेपमध्ये त्या मुलींना आणि बायकांना खडतर आयुष्य जगावे लागत होते. ज्या कामांमध्ये सध्या ती पूर्ण गुंतली होती त्यांची त्याला इत्थंभूत माहिती कळविल्यानंतर मगच तिने त्याच्या प्रश्नाला उत्तर दिले होते. त्याच्या शेवटच्या पत्रामुळे आपण पण दुखावल्याचे तिने रागीट शब्दांमध्ये सांगितले होते. तिला "खंदकांमध्ये" ते पत्र मिळाले होते. युद्धआघाडीवर तो होता आणि तेथे माणसाच्या मनःस्थिती कमालीच्या ताणल्या जातात याची आपल्याला पूर्ण कल्पना आहे, म्हणूनच केवळ तिने त्याला त्या पत्राबद्दल क्षमा केली होती, असे तिने लिहिले होते.

तिने लिहिले होते: "लाडक्या, जे प्रेम त्याग करू शकत नाही ते कसलं प्रेम? लाडक्या, त्यागाविना प्रेम असूच शकत नाही. आणि जर तसं असेल तर माझ्या मते ते मुळी प्रेमच नव्हे. मी आठवडाभर आंघोळ केलेली नाही, आता मी विजारी घालते आणि माझ्या फाटक्या बुटांमधून माझे पायांचे अंगठे बाहेर डोकावताना दिसत आहेत. माझा चेहरा उन्हात एवढा भाजलाय, की त्यावरची सगळी कातडी सोलून निघालीय व तिच्याखाली खरबरीत, काळं निळं दिसतंय. आत्ता या क्षणाला अशा थकल्या-भागल्या, गलिच्छ, ओंगळ्या आणि विद्रूप अवतारात मी तुझ्याकडं आले, तर तू मला हाकलून घालवशील का? अथवा ह्याबद्दल मला दोषी धरशील का? अगदी वेडा मुलगा आहेस तू! तुला काहीही झालं तरी तू एक लक्षात ठेव... मी तुझी वाट पाहतेय... कसाही असलास तरी! मी वारंवार तुझा विचार करते. आणि या "खंदकांमध्ये" मी येईपर्यंत, मला अनेकदा तुझी स्वप्नं पडायची. आता पण आम्ही साऱ्याजणी दमल्यामुळं फळकुटांना अंग टेकताच मुडद्यांसारख्या गाढ गाढ झोपतो. तू ध्यानात ठेव... जोवर मी जिवंत आहे तोवर तुझी छोकरी सदैव वाट पाहतेय... तू कसाही असलास तरी! तू म्हणतोस की, युद्धआघाडीवर तुला काहीतरी होईल; पण ह्या "खंदकांमध्ये" जर

मला काहीतरी झालं, जर मला अपघात झाला आणि मी पांगळी बनले, तर माझा तू त्याग करशील? तुला आठवतं... प्रशिक्षण विद्यालयात शिकताना आपण बीजगणिताचे प्रॉब्लेम पर्याय मांडून सोडवत असू? तर तुझ्या जागी पर्याय म्हणून मला ठेव आणि विचार कर. तसं जर केलंस तर तू जे काही लिहिलंस त्याची तुला शरम वाटेल..."

ह्या पत्रावर खूप वेळपर्यंत विचार करीत मेरेस्येव बसून राहिला. काळयाशार पाण्यात सूर्याचे झगझगीत प्रतिबिंब पडले होते. ऊन भाजून काढत होते. वेत सळसळत होते आणि निळे कीटक लव्हाळयांच्या एका झुपक्यावरून दुसऱ्या झुपक्यावर उड्या मारीत होते. चपळ पाणपक्षी वेतांमध्ये आपल्या लांब, बारीक पायांवर मागे-पुढे धावत होते आणि पाण्याच्या संथ पृष्ठभागावर नक्षी उमटवीत होते. वाळवंटी किनाऱ्याला छोटया लाटा आवाज न करता बिलगत होत्या.

"काय म्हणायचे याला?" अलेक्सेई विचार करीत होता. "वाईटाचे भाकित? शकुनाची जाण?" त्याची आई म्हणत असे: "काळीज भविष्य सांगतं!" किंवा खंदकातील खडतर जीवनामुळे ओल्गाला शहाणपण आले आणि जे तिला सांगायचा त्याला अद्याप धीर झाला नव्हता ते तिने अंतर्ज्ञानाने जाणले? त्याने पुन्हा एकदा पत्र वाचून काढले. तसा काही प्रकार नव्हता. वाईटाची आगामी चाहूल लागल्याचे त्यात चिन्ह नव्हते. त्याने जे काही लिहिले होते त्याला केवळ तिने उत्तर दिले होते. अन् ते उत्तर किती जबरदस्त होते!

अलेक्सेईने सुस्कारा टाकला. सावकाशपणे अंगातील कपडे काढून त्यांचा त्याने दगडावर ढिगारा रचला. ह्या निर्जन जागेची केवळ त्यालाच माहिती होती व येथे तो नेहमी स्नान करायचा. सळसळत्या वेताच्या भिंतीआड हे वाळवंटी भूशिर होते. कृत्रिम पायांचे पट्टे त्याने सोडले व सावकाशपणे तो दगडावरून खाली घसरला. आपल्या उघड्या खुंटांवर वाळूत उभे राहणे त्याला खूप वेदनादायी जात होते, तरीही तो हाता-पायांवर ओणवा गेला नाही. वेदनेने चेहरा वेडावाकडा करीत तो सरोवरात शिरला व थंड, दाट पाण्यात त्याने बुडी मारली. किनाऱ्यापासून काही अंतर तो पोहत गेला व नंतर पाठीवर उताणे होऊन स्तब्ध तरंगत राहिला. निळया, असीम आकाशाकडे त्याने टक लावली. छोटे ढग वेगाने पसार होत होते, एकमेकांवर आदळत होते. तो कुशीवर वळला. पाण्याच्या शीतल, निळया, गुळगुळीत

पाण्यावर किनाऱ्याचे उलटे प्रतिबिंब पडले होते. पिवळी आणि पांढरी पाण-कमळे आपल्या तरंगत्या, गोल पानांमधून डोकावत होती. अचानक त्याला पाण्यावर वाकलेल्या ओल्याचे प्रतिबिंब दिसले. त्याला स्वप्नामध्ये जशी ती दिसायची तशी – फुला-फुलांचा फ्रॉक घातलेली ओल्गा! मात्र तिने पाय मुडपून घेतले नव्हते, तर सरळ खाली सोडले होते. पण ते पाण्यापर्यंत पोहोचत नव्हते... दोन विरूप थोटे पाय पृष्ठभागावर लोंबत होते. हे दृश्य पुसून टाकण्यासाठी त्याने पाण्यावर जोरात चापटी मारली. ओल्गाने सुचविलेली पर्याय पद्धती त्याला साहाय्यक ठरली नव्हती!

५

दक्षिणेतील परिस्थिती अधिकच गंभीर बनली होती. डॉनवरील लढाई-च्या बातम्या देण्याचे वृत्तपत्रांनी केव्हाच बंद केले होते. एक दिवस सोविएत माहिती खात्याच्या निवेदनात डॉनच्या पलिकडील बाजूच्या – वोल्गावरून स्तालिनग्रादला जाणाऱ्या मार्गाच्या – कझाक खेड्यांच्या नांवांचा उल्लेख होता. ह्या भागांशी अपरिचित असणाऱ्यांना ह्या नांवांचे विशेष काही सांगण्यासारखे नव्हते. पण अलेक्सेईचा जन्म तेथे गेला होता. त्याला समजले की, डॉनची संरक्षक फळी फुटली होती आणि युद्ध स्तालिनग्रादच्या वेशींना आता भिडले होते.

स्तालिनग्राद! निवेदनांमध्ये त्या नांवाचा अजून उल्लेख झाला नव्हता, पण प्रत्येकाच्या ओठांवर ते नांव खेळत होते. १९४२ च्या शरदामध्ये त्या नावाचा उच्चार चिंतेने आणि वेदनेच्या भावनेने घडत होता. एका शहराचे नाव म्हणून त्याचा उच्चार होत नसे, तर आपले कुणी जिवाभावाचे मरणां-तिक संकटाच्या तडाख्यात सापडल्याची त्यात खंत असे. ह्या सार्वत्रिक चिंतेचे स्वरूप मेरेस्येवच्या दृष्टीने अधिकच मोठे बनले होते, कारण त्या शहरा-बाहेरील स्तेप मैदानांमध्ये ओल्गा जवळपास कुठेतरी होती. तिच्या नशीबी कोणती संकटे वाढून ठेवली होती हे कुणास माहीत? आता तो दररोज तिला पत्र लिहित होता, पण युद्धआघाडीवरील एखाद्या टपाल कचेरीच्या पत्त्यावर धाडलेल्या त्या पत्रांना काय किंमत होती? माघारीच्या गोंधळात ती पत्रे तिच्यापर्यंत पोहोचणार होती काय? वोल्गाच्या स्तेप प्रदेशात भडक-लेल्या प्रचंड लढायांच्या अग्निप्रलयात ती पत्रे तिच्यापर्यंत सुरक्षितपणे पोहोचणार होती का?

मधमाशांच्या उठलेल्या मोहोळाप्रमाणे वैमानिकांचे सॅनाटोरियम गजबजत होते. नेहमीच्या मनोरंजन प्रकारांना फाटा बसला होता. कुणाचेही आता खेळांमध्ये मन रमत नव्हते. आळशातल्या आळशांसकट प्रत्येकजण सकाळी नेमून दिलेल्या वेळेपेक्षा एक तास आधी उठून बसत होता व सकाळी सात वाजताच्या रेडिओवरील पहिल्या युद्धवार्ता ऐकत होता. वैमानिकांच्या पराक्रमाच्या वार्ता निवेदनामधून प्रसृत झालेल्या ऐकल्या, म्हणजे प्रत्येकजण दुर्मुखला होऊन फिरायचा, परिचारकांचे दोष हुडकून काढायचा, जेवणाविषयी आणि नियमांविषयी तक्रारी करू लागायचा. ते वैमानिक येथे ऊन खात होते, आरशासारख्या स्वच्छ सरोवरानजीकच्या निवांत जंगलात आराम करीत होते व स्तालिनग्रादजवळच्या स्तेपमध्ये लढत नव्हते हा जणू काही सॅनाटोरियमच्या कर्मचाऱ्यांचा दोष होता. सरतेशेवटी विश्रांती घेणारे वैमानिक आपल्या विश्रांतीला कंटाळले व आपापल्या तुकड्यांकडे आपली पाठवणी करावी अशा त्यांनी मागण्या केल्या.

एके दिवशी दुपारच्या उत्तरप्रहरी, हवाई दलाच्या कार्यकारी मंडळाकडून एक कमिशन आले. धुळीने माखलेल्या मोटारीमधून उतरलेल्या अनेक अधिकाऱ्यांच्या गणवेषांवर वैद्यकीय सेनाविभागाची चिन्हे होती. पुढच्या सीटवर खूप जोरात रेलून बसलेला एक धिप्पाड अधिकारी खाली उतरला. ते होते प्रथम दर्जाचे सेना-सर्जन मीरोवोल्स्की. हवाई दलात ते खूप प्रसिद्ध होते व त्यांच्या पितृतुल्य वर्तनामुळे वैमानिकांना ते आवडत असत. रात्री जेवणाच्या वेळी जाहीर करण्यात आले की, ज्यांना आपली आजारपणची रजा रद्द करून आपापल्या तुकड्यांमध्ये तात्काळ जाण्याची इच्छा आहे, अशा स्वयंसेवकांची निवड दुसऱ्या दिवशी सकाळी कमिशनतर्फे करण्यात येईल.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटेच मेरेस्येव उठला. आपले नेहमीचे व्यायाम न करता तो जंगलात गेला व न्याहरीच्या वेळेपर्यंत तेथेच थांबला. प्रत्यक्ष न्याहरीच्या वेळी त्याने काहीच खाल्ले नाही. त्याने न्याहरीला स्पर्श न करता अन्न टाकले म्हणून वेट्रेस त्याला रागे भरली तेव्हा तिच्याशी तो उद्धट वागला. स्त्रूच्कोवने जेव्हा शेरा मारला की, त्याच्या कल्याणासाठी त्याला बोलणाऱ्या मुलीशी त्याने उद्धटपणाने वागण्याचे काही कारण नव्हते, तेव्हा तो ताडकन उठला आणि भोजनदालनातून बाहेर निघून गेला. कॉरीडॉरमध्ये भिंतीवर चिकटविलेले सोविएत माहिती खात्याचे वार्तापत्र वाचत झीना उभी होती. तिच्याशी अभिवादनाचा एक शब्दही न बोलता अलेक्सेई तिच्या

अंगावरून सरळ पुढे निघून गेला. त्याला न पाहिल्याचा तिने बहाणा केला व रागाने केवळ खांदे उडविले. पण तिला खरेच न पाहता तिच्या अंगावरून जेव्हा तो पुढे गेला तेव्हा मात्र ती दुखावली. तिचे डोळे अश्रूंनी भरून आले व न राहवून तिने त्याला हाक मारली. किंचित मान तिरपी करून अलेक्सेई रागाने खेकसला :

"काय पाहिजे आपणाला ?"

"कॉम्रेड सीनियर लेफ्टनंट, तुम्ही..." ती हळूच उद्‌गारली. अति-शरमेपायी तिचा चेहरा एवढा लाल बनला होता की, तिचे गाल तिच्या केसांच्या रंगाशी मिळतेजुळते झाले होते.

अलेक्सेईने एकदम आपला राग आवरला आणि त्याचे सबंध शरीर एकाएकी शिथिल झाल्यासारखे भासले.

"माझ्या भविष्याचा आज निर्णय लागणार आहे," खालच्या आवाजात तो म्हणाला. "मला यश लाभावं अशा शुभेच्छा दे..."

नेहमीपेक्षा जास्त लंगडत तो आपल्या खोलीत गेला व त्याने स्वतःला कोंडून घेतले.

मनोरंजन हॉलमध्ये कमिशन बसले होते. श्वासोच्छ्वास मापक, हाताची पकड मापणारी यंत्रे, नजरेची चाचणी घेणारे तक्ते, वगैरे आपली आयुधे कमिशनने बरोबर आणली होती. सॅनाटोरियममधील सर्व लोक हॉलबाहेर जमले होते. ज्यांना आपली आजारपणची रजा रद्द करायची होती असे लोक — जवळ जवळ सर्व रुग्ण — एका लांबलचक रांगेत उभे झाले होते. पण झीनोच्का तेथे आली, प्रत्येकाला नेमके किती वाजता बोलाविण्यात येईल ते दर्शविणारे चिटोरे तिने प्रत्येकाच्या हाती दिले व त्यांना तेथून पांगायला सांगितले. कमिशनपुढे पहिली काही माणसे जाऊन आल्यानंतर अफवा पसरली की, तपासणी किरकोळ होती आणि कमिशनचे लोक फारसे कडक वागत नव्हते. वोल्गावर अशी प्रचंड लढाई पेटली असताना व अधिकाधिक प्रयत्नांची निकड असताना कमिशन कडक कसे वागणार? पोर्चसमोरील खबळ विटांच्या भिंतीवर आपले पाय सोडून अलेक्सेई बसला होता. कुणी हॉलमधून बाहेर आला म्हणजे फारसे स्वारस्य न दाखविता सहजपणे त्याला तो प्रश्न करायचा :

"कशी काय झाली परीक्षा ?"

"पास झालो!" आपल्या सदऱ्याची बटणे लावीत, अथवा पँटचा पट्टा आवळीत तो माणूस आनंदाने उत्तरायचा.

मेरेस्येवच्या आधी बर्नाझ्यान आत गेला. दाराबाहेरच त्याने आपली काठी ठेवली होती व शरीराला विशेष झोके न देता आणि अपऱ्या पायावर न लंगडण्याचा प्रयत्न करीत तो चालत गेला. त्याला आतमध्ये बराच वेळपर्यंत थांबवून धरण्यात आले. सरतेशेवटी, उघड्या खिडकीमधून रागाचे उद्गार अलेक्सेईच्या कानांवर आले. दार उघडले गेले आणि संतापलेला बर्नाझ्यान जोरात बाहेर आला. अलेक्सेईकडे त्याने एक रागाचा कटाक्ष फेकला व नाकासमोर पहात, ओरडत तो बागेत लंगडत गेला:

"नोकरशहा! छिद्रान्वेषी! विमानविद्येविषयी काय समजतं यांना? विमानं उडवायची म्हणजे काय बॅले नाच करायचा असं वाटतं?.. अपरा पाय म्हणे! ...साले एनिमाची भांडी आणि इंजेक्शनांच्या सुया आहेत नुसते...!"

आपल्या पोटात भीतीने खड्डा पडल्याची अलेक्सेईला जाणीव होती. पण तरीही आनंदी, हसऱ्या चेहऱ्याने खोलीमध्ये तो भराभरा चालत गेला. एका लांबलचक टेबलापाशी कमिशनचे लोक बसले होते. मध्यभागी प्रचंड देहाचे प्रथम दर्जाचे सेना-सर्जन मीरोवोल्स्की बसले होते. बाजूच्या एका टेबलापाशी केस-कार्डांचा ढीग घेऊन झीनोच्का बसली होती. पांढऱ्याशुभ्र, कडक खळीच्या झग्यात ती एखाद्या छोट्या, सुंदर बाहुलीप्रमाणे दिसत होती. तिच्या जाळीदार रुमालामधून तिच्या लाल केसांची एक बट खोडसाळपणे बाहेर डोकावीत होती. अलेक्सेईच्या हाती त्याचे केस-कार्ड देताना तिने हळूच त्याचा हात दाबला.

"तरुण गृहस्था, कमरेपर्यंतचे कपडे काढ बघू," डोळे किलकिले करीत सर्जन म्हणाले.

मेरेस्येवची व्यायामाची मेहनत वाया गेली नव्हती. मेरेस्येवच्या काळसर त्वचेखालील प्रत्येक स्नायू उठून दिसत होता. त्याच्या सुरेख, सुडौल देहाचे सर्जनना भारी कौतुक वाटले.

"डेव्हिडच्या पुतळ्यासाठी तुम्हाला मॉडेल म्हणून निवडायला हरकत नाही," कमिशनमधील एका सदस्याने आपल्या ज्ञानाचे प्रदर्शन केले.

सर्व चाचण्या मेरेस्येव सहज उत्तीर्ण झाला. त्याच्या हाताची पकड ठराविक प्रमाणापेक्षा पन्नास टक्के जास्त होती. श्वासोच्छ्वासाच्या चाचणीत

त्याने दर्शक काटयाला सर्वोच्च मर्यादेपर्यंत वर उडविले. त्याचा रक्तदाब ठीक होता. त्याची मज्जासंस्था उत्तम स्थितीत होती. शेवटी, ताकद अजमावण्याच्या यंत्राची पोलादी मूठ त्याने एवढ्या जोरात खेचली, की त्या यंत्राची स्प्रिंगच तुटली.

आपल्या खुर्चीत जरा ऐसपैस बसत त्यांनी "सीनियर लेफ्टनंट मेरेस्येव अ. पे." याच्या केस-कार्डाच्या वरच्या कोपऱ्यात आपला निर्णय लिहायला आरंभ केला. "वैमानिक?" त्यांनी प्रसन्नपणे विचारले.

"हो."

"लढाऊ?"

"हो."

"ठीक. जा लढायला! तुझ्यासारख्या माणसांची फार फार गरज आहे! .. बरं पण एक सांग, कसली जखम झाली होती?"

अलेक्सेईचा चेहरा पडला. सारे काही फसणार असे त्याला वाटले. सर्जननी त्याचे कार्ड निरखून पाहिले आणि त्यांच्या चेहऱ्यावर कमालीचे आश्चर्य उमटले.

"पाय कापलेले... काय हे? हा कसला मूर्खपणा? ही काहीतरी चूक झाली असावी! होय ना? उत्तर का देत नाही?"

"नाही. कसलीही चूक झालेली नाही," जणू काही वधस्तंभावर चढत असल्याप्रमाणे अलेक्सेई अस्फुट आणि सावकाशपणे म्हणाला.

ह्या कणखर, घडीव देहाच्या, रसरशीत तरुणाकडे सर्जन व कमिशनचे इतर सदस्य संशयाने टक लावून पाहू लागले. हा प्रकार काय आहे याचा कुणालाच उलगडा होत नव्हता.

"विजार वर कर!" अधीऱ्या स्वरात सर्जननी आज्ञा केली.

अलेक्सेईचा चेहरा पांढरा पडला. त्याने झीनोच्काकडे अगतिक कटाक्ष टाकला व सावकाशपणे विजारीची खालची टोके तो वर दुमडू लागला. आपले खोटे पाय उघडे करून तो खिन्नपणे उभा राहिला.

"आमची चेष्टा करण्याचा तुझा इरादा होता काय? किती वेळ वाया घालवलास आमचा! पाय नसतानाही हवाई दलात परत जाण्याचा विचार तर करत नाहीस तू?" सरतेशेवटी सर्जन कडाडले.

"नुसता विचार नव्हे, खरंच मी जाणार आहे," खालच्या आवाजात अलेक्सेई उत्तरला. त्याचे काळेभोर डोळे निग्रहाने चमकत होते. त्यांच्यात एक आवाहन होते.

"पाय नसताना? तू वेडा आहेस."

"होय, पाय नसतानाही मी विमान उडवणार आहे," आता अत्यंत शांतपणे अलेक्सेई उत्तरला. त्याच्या बोलण्यामधील चीड निघून गेली होती. जुन्या धाटणीच्या आपल्या वैमानिकी सदऱ्याच्या खिशामधून त्याने ते व्यवस्थित घडया केलेले कात्रण बाहेर काढले. ते कात्रण सर्जनना दाखवीत तो म्हणाला: "पहा. एक पाय असताना त्यानं विमान उडवलं. मग अजिबात पाय नसताना मी का विमान चालवू शकणार नाही?"

सर्जननी ते कात्रण वाचले. नंतर त्यांनी अलेक्सेईकडे आश्चर्याने आणि आदराने नजर टाकली.

"खरं आहे, पण त्यासाठी तुला खूपच सराव केला पाहिजे. ह्या माणसानं दहा वर्षं सराव केला. कृत्रिम पायांना खऱ्या पायांसारखं वापरायला शिकलं पाहिजे," काहीशा मवाळ आवाजात ते म्हणाले.

ह्या क्षणाला अलेक्सेईला अनपेक्षित कुमक लाभली. झीनोच्का आपल्या टेबलामागून ताडकन उठून उभी राहिली. प्रार्थना करताना हात जोडावेत तशी हातांची जुडी करून, लालबुंद घाबरलेल्या मुद्रेने ती चिवचिवली:

"कॉम्रेड सर्जन, तुम्ही त्याला नाचताना पहायला हवं! दोन्ही पाय असलेल्या इतर कुणाही माणसापेक्षा जास्त छान नाचतो!"

"नाचतो? कमाल आहे!.." कमिशनच्या इतर सदस्यांकडे चकित नजरेने पहात सर्जन उद्‌गारले.

झीनोच्काने सुचविलेली कल्पना अलेक्सेईने आनंदाने उचलून धरली.

"आत्ता काही निर्णय घेऊ नका," तो सर्जनना म्हणाला. "आज रात्री आमच्या नाचाला या आणि मी काय करू शकतो ते पहा!"

दाराकडे परत जाताना अलेक्सेईने आरशात नजर टाकली. कमिशनचे सदस्य एकमेकांशी उत्तेजित होऊन बोलत असलेले त्याला दिसले.

जेवणापूर्वी झीनोच्का अलेक्सेईला बागेच्या एका ओसाड भागात भेटली. तिने त्याला सांगितले की, तो हॉलमधून निघून गेल्यानंतरही बराच वेळपर्यंत कमिशनचे लोक त्याच्याविषयी चर्चा करीत होते, सर्जननी मेरेस्येवची स्तुती केली होती व कदाचित तो खरोखरीच विमान चालवू शकेल, असे उद्‌गार काढले होते. रशियन काय करू शकत नाही? असा सवाल त्यांनी टाकला होता. त्यावर कमिशनचे एक सदस्य म्हणाले होते की, विमानविद्येच्या इतिहासात असे कधी घडले नव्हते. सर्जननी प्रत्युत्तर केले होते की, विमान-

...च्या इतिहासात अनेक गोष्टी घडलेल्या नव्हत्या आणि ह्या युद्धात ...विगत वैमानिकांनी कित्येक नव्या गोष्टींची भर घातली होती.

स्वेच्छेने लढाईवर परत जाणाऱ्यांच्या सन्मानार्थ निरोपाचा नृत्यसमारंभ ...योजित करण्यात आला होता. सुमारे दोनशे लोक जाणार होते. समारंभाची ...यारी जोरदार होती. मॉस्कोहून खास लष्करी बँड मागविण्यात आला ...ता. त्या प्रासादाच्या दालनांमधून संगीताचे प्रतिध्वनी घुमत होते व ...क्षीदार कमानींच्या खिडक्या थरथरत होत्या. घामाने निथळणारे वैमानिक ...खंड नाचत होते. आणि त्या सर्वांत खूप आनंदाने, अत्यंत चपळपणे व ...मदारपणे मेरेस्येव नाचत होता. आपल्या सोनसळी केसांच्या जोडी-दारीणीला घेऊन! त्यांची जोडी अजोड होती.

प्रथम दर्जाचे सेना-सर्जन मीरोवोल्स्की एका उघड्या खिडकीशी बसले ...ते. त्यांच्या समोर थंडगार बीयरचा ग्लास होता. मेरेस्येव आणि त्याची ...केशरासारख्या केसांची जोडीदारीण, यांच्यावर त्यांची नजर सतत खिळून ...हिली होती. ते नुसतेच सर्जन नव्हते तर सेनेतील सर्जन होते आणि कृत्रिम ...व ...च्या पायांमधील भेद त्यांना चांगलाच माहीत होता.

ह्या काळसर वर्णाचा, प्रमाणबद्ध बांध्याचा वैमानिक आपल्या डौलदार, ...च्या चणीच्या जोडीदारीणीला घेऊन नाचत असलेला या क्षणी ते पहात ...ते तेव्हा त्यांच्या मनात वारंवार एकच विचार उमटत होता की, या ...मागे काहीतरी युक्ती असावी. शेवटी टाळ्या वाजविणाऱ्या रसिकांच्या ...ड्याच्या मध्यभागी अलेक्सेई आपल्या मांड्यांवर व गालांवर थापट्या ...मारीत, उंच उड्या घेत "बारीन्या" नाच नाचला आणि घामाने निथळत ...मीरोवोल्स्कींच्या समोर जाऊन उभा राहिला. सर्जननी त्याच्याशी हस्तांदोलन ...करून मूकपणे आपला आदर व्यक्त केला. अलेक्सेई काहीच बोलला नाही. ...पण त्याचे डोळे सर्जनांच्या डोळयांना थेट भिडले होते. सर्जननी उत्तर द्यावे ...अशी विनवणी करीत होते.

शेवटी शेवटी सर्जन त्याला म्हणाले: "तुला एखाद्या तुकडीत नेमण्याचा ...मला अधिकार नाही हे अर्थातच तू जाणतोस. पण कार्यकारी समितीसाठी ...मी तुला एक प्रमाणपत्र देईन. योग्य सराव मिळाल्यास तू विमान चालवू ...शकशील अशी मी शिफारस करीन. कोणत्याही परिस्थितीत मी तुझ्या ...बाजूला राहीन एवढं नक्की!"

मीरोवोल्स्कींनी सॅनाटोरियमच्या प्रमुखांच्या हातात हात अडकविला

व ते हॉलमधून बाहेर गेले. सॅनाटोरियमचे प्रमुखही एक अनुभवी सेना-सर्जन होते. दोघेही चकित झाले होते व अलेक्सेईविषयी त्यांना कमालीचे कौतुक वाटले होते. सोविएत माणसांनी एकदा निर्धार केला म्हणजे ती कोणते चमत्कार घडवू शकतात यावर चर्चा करीत, धूम्रपान करीत ते दोघे सर्जन झोपण्यापूर्वी बराच वेळ बसले होते.

दरम्यान तिकडे संगीताचा दणदणाट चालू होता व उघड्या खिडक्यांमधून बाहेर पडलेल्या प्रकाशात नृत्य करणाऱ्यांच्या सावल्या नाचत होत्या, तेव्हा अलेक्सेईने स्वतःला वरच्या मजल्यावरील न्हाणीघरात कोंडून घेतले होते. थंड पाण्यात आपले पाय बुडवून तो बसला होता. वेदनेपायी त्याने आपले ओठ एवढे गच्च आवळून धरले होते की, त्यांच्यामधून रक्त ठिपकू लागले होते. कृत्रिम पायांच्या जोरदार घर्षणामुळे त्याच्या पायांवर उमटलेल्या लालभडक वळांना आणि जखमांना तो गार पाण्याने धूत होता. अतिवेदनेपायी त्याला घेरी येत होती.

एक तासानंतर जेव्हा मेजर स्त्रूच्कोव खोलीत आला तेव्हा मेरेस्येव पुन्हा ताजातवाना होऊन बसला होता. त्याने स्नान केले होते आणि आपले ओले, वळणदार केस विंचरीत तो आरशासमोर बसला होता.

"झीनोच्का तुला शोधतेय. तिला निरोपाच्या राहुटीला तू नेलं पाहिजेस. मला त्या मुलीबद्दल वाईट वाटतं!" मेजर स्त्रूच्कोव म्हणाला.

"चला, आपण सगळे बरोबर जाऊ या!" मेरेस्येव अधीरपणे म्हणाला. "पावेल इवानोविच, खरंच चल!"

त्याला नाच शिकविण्यापर्यंत कष्ट घेणाऱ्या त्या सुंदर मुलीबरोबर एकांतात फिरण्याचा विचार मेरेस्येवला अस्वस्थ करीत होता. ओल्गाचे पत्र मिळाल्यापासून त्याला झीनोच्काच्या उपस्थितीत अवघडल्यासारखे वाटायला लागले होते. स्त्रूच्कोवने आपल्याबरोबर यावे असा त्याने सारखा हेका धरला. शेवटी कुरकुरत स्त्रूच्कोव त्याच्याबरोबर जायला तयार झाला.

झीनोच्का बाल्कनीत वाट पहात होती. फुलांच्या गुच्छाचे अवशेष तिच्या हाती होते. तिच्या पायांखालची फरशी फुलांच्या देठांनी व पाकळ्यांनी विखुरली होती. अलेक्सेईच्या पावलांचा आवाज ऐकताच ती अधीरपणे पुढे झाली, पण तो एकटा नाही असे पाहताच एकदम ती जणू कोमेजली.

"चला, रानाचा निरोप घ्यायला जाऊ या," शांत स्वरात अलेक्सेईने प्रस्ताव मांडला.

त्यांनी हातात हात गुंफले व दुतर्फा लिंबोणीची झाडे उभी असलेल्या वाटेने ते मुकाटपणे चालू लागले. चांदण्यात न्हालेल्या जमिनीवर त्यांच्या पायांपासून त्यांच्या काळ्याभोर सावल्या त्यांचा पाठलाग करीत होत्या. झाडांमधून पडलेली शरदातील पहिली पाने विखुरलेल्या नाण्यांसारखी दिसत होती. रस्त्याच्या टोकाशी ते पोहोचले व फाटकांमधून बाहेर पडून पांढुरक्या, ओलसर गवतावरून त्यांनी सरोवराची वाट धरली. सरोवराच्या पाण्यावर पांढरी धुक्याची चादर पसरली होती. पांढऱ्या मेंढकातडीसारखे ते धुके भासत होते. जमिनीशी ओठंगलेले धुके त्यांच्या कमरांपर्यंत त्यांना गुरफटून टाकत होते. त्या थंड चंद्रप्रकाशात धुके गूढपणे चमकत होते. हवा दमट होती आणि शरदाचा वास कोंदला होता. क्षणात थंड वातावरण शिरशिरी आणायचे, तर क्षणात उबदार निकटता भासायची. जणू धुक्याच्या सरोवराचे श्वासाचे गरम आणि थंड झरे होते...

"ढगांवर चालणाऱ्या राक्षसांसारखे आपण वाटतोय की नाही?" अलेक्सेई विचारमग्नपणे म्हणाला. झीनोच्काचा बळकट छोटा हात त्याच्या कमराभोवती गच्च आवळलेला होता व त्यामुळे त्याला अस्वस्थ वाटत होते.

"राक्षसांसारखे नाही, तर मूर्खांसारखे! आपले पाय ओले होतील आणि प्रवासात थंडीची बाधा होईल," स्त्रूच्कोव गरजला. आपल्या खिन्न विचारांमध्ये तोसुद्धा गुरफटलेला होता.

"त्याबाबतीत मला तुझ्यापेक्षा एक फायदा आहे. ओले व्हायला मला पाय नाहीत, तेव्हा मला थंडी बाधणार नाही," अलेक्सेई हसत म्हणाला.

"चला, चला लौकर! तिथं आत्ता खूप छान असेल!" धुक्याचे आवरण वेढलेल्या सरोवराकडे त्या दोघांना खेचत झीनोच्का म्हणाली.

चुकीने ते जवळ जवळ पाण्यात चालत गेले होते. थेट पायांपाशी धुक्याच्या ढगांमधून पलिकडे सरोवराचे काळेशार पाणी दिसताच ते चकित होऊन एकदम थबकले. जवळच एका छोटया धक्क्याला एक वल्ह्यांची होडी बांधून ठेवलेली अस्पष्ट दिसत होती. झीनोच्का धुक्यातून वागडत गेली आणि वल्ह्यांची जोडी घेऊन परतली. त्यांनी वल्ही खोबणींमध्ये अडकवली. अलेक्सेईने त्याने वल्ही घेतली व मेजर आणि झीनोच्का होडीच्या टोकाशी बसले. स्तब्ध धुक्यामधून होडी मंदपणे तरंगत जात होती. क्षणात ती धुक्यात बुडी मारायची, तर क्षणात उघड्या पाण्यावर यायची. पाण्याचा काळा, चकचकीत पृष्ठभाग [illegible] चांदण्याने माखून निघाला होता. कुणीही बोलत नव्हते. सर्वजण

आपापल्या विचारांच्या तंद्रीत होते. रात्र निवांत होती. वल्ह्यांमधून निथळणारे पाणी पाऱ्याच्या थेंबांप्रमाणे टपकत होते व पाऱ्याच्या थेंबांसारखेच जड भासत होते. वल्ह्यांच्या खुंट्या हळूच आवाज करीत होत्या, कुठेतरी पक्षी साद घालीत होता. दूरवरून घुबडाचा घूत्कार अस्पष्ट ऐकू येत होता.

"जवळचं युद्ध पेटलेलं आहे यावर] विश्वास ठेवणं कठीण जातं," झीनोच्का हळूच म्हणाली. "कॉम्रेडहो, तुम्ही मला पत्रं लिहाल? अलेक्सेई पेत्रोविच, तुम्ही लिहाल ना मला पत्र? अगदी छोटीशी चिठ्ठी असली तरी चालेल. पत्ता लिहिलेली काही पोस्ट-कार्ड मी तुम्हाला देते. देऊ? तुम्ही फक्त लिहित जा: 'जिवंत आणि छान आहोत.' बस्स! आणि पत्राच्या पेटीत टाका! . ."

"जायचं म्हणून मला किती आनंद झालाय म्हणून सांगू! छी:! रिकामपणाचा वीट आला होता. काम करायला माझे हात नुसते शिवशिवताहेत!" स्त्रूच्कोव म्हणाला.

पुन्हा ते सारे गप्प झाले. होडीच्या दोन्ही अंगांना छोट्या लाटा हळूच आदळत होत्या. होडीच्या आड्याखाली पाणी पेंगुळला आवाज करीत होते, नाळेपासून चमकत्या कोनात पसरत होते. धुके विस्कटून दूर झाले. किनाऱ्यापासून पाण्यावर निळसर चंद्रकिरण पसरला होता. पाणकमळांच्या पानांचे पट्टे त्या प्रकाशात उजळले होते.

"आता आपण गाणं म्हणू या," झीनोच्काने सुचविले आणि उत्तराची वाट न पाहताच तिने ॲशच्या झाडाविषयीचे गाणे म्हणायला आरंभ केला.

पहिले कडवे तिने एकटीने, उदास सुरात म्हटले. पण दुसऱ्या कडव्याला मेजरने आपला सुरेख, गहिरा खर्ज सूर जोडला. यापूर्वी त्याने कधी गाणे म्हटले नव्हते आणि त्याचा एवढा छान, मधुर गाण्याचा आवाज आहे याची अलेक्सेईला अजिबात कल्पना नव्हती. गुळगुळीत पाण्यावर ह्या गाण्याचे सूर निनादू लागले. एक स्त्रीचा आणि एक पुरुषाचा असे दोन दमदार, ताजे आवाज एकमेकांना सुरेख साथ करू लागले. भूमीगत खेड्यामधील टपोऱ्या डोळ्यांची वार्या अलेक्सेईला आठवली. तेथे त्याच्या खोलीच्या खिडकीमधून बाहेर दिसणारे, फळांचा एकमेव घोस लगडलेले ॲशचे सडपातळ झाड त्याला आठवले. मग सर्व काही अदृश्य झाले—सरोवर, सुंदर चांदणे, होडी, गाणारी जोडी—आणि चंदेरी धुक्यात त्याला कामीशिनची मुलगी दिसली. पण फुलांनी बहरलेल्या कुरणात डेझींमध्ये

बगलेली ही ओल्गा नव्हती, तर एक वेगळीच, अपरिचित मुलगी होती. ही थकलेली दिसत होती, तिच्या गालांवर उन्हाचे चटके बसून डाग पडले होते, तिचे ओठ तडकलेले होते. तिच्या अंगातील सदऱ्यावर घामाचे डाग होते, स्तालिनग्रादनजीकच्या स्तेपमध्ये कुठेतरी ती हाती फावडे घेऊन उभी होती.

त्याने वल्ही खाली टाकली व गाण्याच्या शेवटच्या कडव्यात आपला आवाज मिसळविला.

६

दुसऱ्या दिवशी भल्या सकाळीच सॅनाटोरियमच्या फाटकांमधून बसगाड्यांची लांबलचक रांग बाहेर पडली. त्या बसगाड्या जेव्हा अजून पोर्चमध्ये होत्या तेव्हा एका बसच्या फूटबोर्डावर बसून मेजर स्त्रूच्कोवने ॲश झाडा-विषयीचे आपले आवडते गाणे म्हणायला सुरुवात केली होती. इतर बस-गाड्यांमधील लोकांनीही गाण्याला सूर धरला आणि निरोपाच्या शुभेच्छा, वर्नाझ्यानचे विनोद व बसच्या खिडकीमधून झीनोच्काने अलेक्सेईला केलेला निरोपाचा उपदेश, इत्यादी सर्व आवाज गाण्याच्या स्वरांमध्ये लोपून गेले. अत्यंत साध्या पण सूचक शब्दांमधील हे जुने गाणे खरे म्हणजे केव्हाच विसरले गेले होते. पण महान देशरक्षक युद्धात ह्या गाण्याचे पुनरुज्जीवन घडले होते व ते खूप लोकप्रिय बनले होते.

ह्या गाण्याचे गहिरे, मधुर स्वर स्वत:बरोबर वाहून नेत त्या बसगाड्या फाटकांबाहेर पडल्या. गाणे संपले तेव्हा गायक गप्प झाले. त्यानंतर शहराच्या सीमेलगतचे पहिले कारखाने आणि कामगारवसाहती बसच्या खिडक्यां-मधून दिसेपर्यंत कुणी चकार शब्द काढला नाही.

मेजर स्त्रूच्कोव अजूनही आपल्या बसच्या फूटबोर्डावर बसला होता. त्याने सदऱ्याची बटणे उघडी टाकली होती व हसऱ्या चेहऱ्याने तो निसर्ग न्याहाळत होता. तो अत्यंत आनंदी मन:स्थितीत होता. हा सदैव भटकणारा सैनिक पुन्हा एकदा फिरू लागला होता, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात होता. त्यामुळे त्याची भरकटलेली मनोवृत्ती पूर्ववत जाग्यावर आली होती. कोणत्या तुकडीमध्ये त्याची नेमणूक झाली होती हे जरी अद्याप त्याला माहीत नव्हते, तरीही त्याच्या दृष्टीने ती तुकडी म्हणजे त्याचे घर ठरणार होते. मेरेस्येव गप्प बसला होता. त्याचे मन चिंतेने ग्रासले होते. त्याच्या

सर्वांत मोठ्या अडचणी अद्याप पुढेच यायच्या होत्या व त्यांना पार करणे त्याला जमेल अथवा नाही हे कोण सांगू शकणार होते ?

बसमधून उतरताच, रात्रीच्या निवासाची आधी सोयसुद्धा न करता तो तडक मीरोवोल्स्की यांच्याकडे गेला. दुर्दैवाचा पहिला तडाखा त्याला तेथे बसला. अत्यंत कष्टपूर्वक ज्याचे मन त्याने जिंकले होते तो त्याचा हितचिंतक दूर गेला होता. मीरोवोल्स्की काही तातडीच्या कामगिरीसाठी विमानाने दुसरीकडे गेले होते आणि आणखी काही काळपर्यंत परतायचे नव्हते. अलेक्सेई ज्या अधिकाऱ्याशी बोलला होता त्याने त्याला सांगितले होते की, नियमानुसार अर्ज करावा. अलेक्सेईने तात्काळ खिडकीच्या चौकटीत बसून अर्ज लिहिला आणि हडकुळया, थकल्या डोळयांच्या, छोटचा चणीच्या प्रमुख अधिकाऱ्याच्या हाती दिला. आपण शक्य ते सर्व काही करू असे त्या अधिकाऱ्याने अलेक्सेईला आश्वासन दिले आणि दोन दिवसांनंतर भेटण्याचा सल्ला दिला. अलेक्सेईने त्याची मनधरणी केली, याचना केली. एवढेच नव्हे तर त्याला धमकी घालून पाहिली. पण व्यर्थ. आपल्या छोटचा हडकुळया मुठी छातीवर दाबत त्या अधिकाऱ्याने परत एकदा नियम ऐकविले आणि नियमांचे उल्लंघन करण्याची स्वत:मध्ये ताकद नसल्याचे सांगितले. सर्व शक्यता लक्षात घेताही, त्या प्रकरणाचा तात्काळ निर्णय लावण्याचे अधिकार त्याला खरेच नव्हते. तिरस्काराने हात झटकून अलेक्सेई तेथून निघून गेला.

अशा रीतीने एका युद्धकचेरीपासून ते दुसऱ्या युद्धकचेरीपर्यंत त्याच्या भटकंतीचा आरंभ झाला. ज्या घाईत त्याला इस्पितळात आणण्यात आले होते त्या गडबडीत त्याला कपडे, शिधा व पैसे मिळण्याबाबतची प्रमाणपत्रे देण्याचे राहून गेले होते. आणि या क्षणापर्यंत त्यानेही त्या बाबतीत दुर्लक्ष केल्यामुळे आता त्याच्या अडचणींमध्ये आणखीच भर पडली होती. सुटीचे प्रमाणपत्रसुद्धा त्याच्यापाशी नव्हते. ह्या विषयांशी संबंधित प्रमुख अधिकारी दयाळू व मदत करण्यास तत्पर होता आणि अलेक्सेईच्या रेजिमेंटच्या मुख्य ठाण्याला फोन करून आवश्यक ते कागदपत्र तात्काळ मागवून घेण्याचे त्याने आश्वासन दिले होते. पण ह्या सर्व गोष्टी खूप सावकाशपणे घडतात याची मेरेस्येवला जाणीव होती. जेथे पावाचा प्रत्येक किलोग्राम आणि साखरेचा प्रत्येक ग्राम मौल्यवान ठरला होता अशा कठीण युद्धकालीन मॉस्कोमध्ये पैशाविना, निवाऱ्याविना आणि शिध्याविना रहावे लागणार होते, हे अलेक्सेईला समजून चुकले.

त्याने आन्यूताला इस्पितळात फोन केला. तिच्या आवाजावरून त्याने तर्क केला की, तिला कशाची तरी चिंता असावी अथवा ती खूप कामात असावी. पण तो मॉस्कोत आला होता याचा तिला खूप आनंद झाला होता आणि हे काही दिवस त्याने तिच्या घरीच रहावे असा तिने आग्रह केला होता. कारण तिचा मुक्काम इस्पितळात होता आणि अलेक्सेईला एकटयाला तिचे घर वापरता येणार होते.

सॅनाटोरियमने जाणाऱ्या प्रत्येक पेशंटला प्रवासासाठी पाच दिवसांचा कोरडा शिधा दिला होता. त्यामुळे पुन्हा विचारही न करता अलेक्सेईने आन्यूताची सूचना मान्य केली. उंच नव्या इमारतींच्या पाठीमागील आवाराच्या एका दूर कोपऱ्यात अंग मुडपून उभ्या असलेल्या त्या जीर्णशीर्ण व आता परिचित झालेल्या छोटया घराकडे तो गेला. त्याला डोक्यावर निवारा होता आणि खायला थोडे अन्न होते. म्हणजे आता तो वाट पहात थांबू शकत होता. अजूनही मांजरांच्या, रॉकेलच्या आणि दमट ओल्या कपडयांच्या वासाने भरलेला परिचित अंधारा, वाटोळा जिना तो चढून गेला. चाचपून त्याने दार शोधले आणि त्यावर मोठयांदा ठोकले.

दार उघडले गेले, पण संपूर्ण नव्हे. दोन भक्कम साखळयांमधून एक फट तेवढी उघडली होती. त्या फटीतून छोटुकल्या म्हातारीचा रोड चेहरा डोकावला. तिने अलेक्सेईला अविश्वासाने आणि शोधक नजरेने न्याहाळले. तो कोण, कुठला आणि त्याला कुणाला भेटायचे होते याबद्दल चौकशी केली. अलेक्सेईने तिला सर्व समाधानकारक उत्तरे दिल्यानंतरच केवळ साखळी खडखडली आणि दार सताड उघडे झाले.

"आन्ना दानिलोवना घरात नाही, पण तिनं तुमच्याबद्दल फोन केला होता. आत या. मी तिची खोली तुम्हाला दाखवते," म्हातारी म्हणाली. आपल्या निस्तेज, फिकट डोळयांनी तिने अलेक्सेईचा चेहरा, सदरा व विशेषत: त्याची थैली न्याहाळली. "तुम्हाला थोडं गरम पाणी हवंय का? स्वयंपाकघरात आनिच्काचा रॉकेलचा स्टोव्ह आहे. मी उकळून देते..."

नि:संकोच मनाने अलेक्सेई परिचित खोलीत शिरला. कुठेही घरासारखे मानून राहण्याची सैनिकाची क्षमता मेजर स्त्रूच्कोवच्या अंगी होती आणि त्याच्या सहवासामुळे आता अलेक्सेईच्या अंगीही ती आली होती. जुन्या लाकडाचे, धुळीचे आणि डांबराच्या गोळयांचे परिचित दर्प त्याला जाणवले. वर्षानुवर्षे प्रामाणिक सेवा बजाविणाऱ्या त्या वस्तूंच्या उग्र दर्पासरशी त्याच्या

भावना उमाळून आल्या. जणू अनेक वर्षांच्या भटकंतीनंतर तो आपल्या स्वतःच्या घरीच परतला होता.

म्हातारी सारखी त्याच्या मागे मागेच फिरत होती. तिची सारखी चर्पटपंजरी सुरू होती: बेकरीमध्ये लोकांच्या खूप लांब रांगा लागलेल्या असतात, तुम्ही सुदैवी असलात तर रेशनवर काळ्या रायच्या पावाऐवजी पांढरा गव्हाचा पाव मिळतो; एके दिवशी ट्रामगाडीत एक मोठा लष्करी अंमलदार सांगत होता की, जर्मनांना स्तालिनग्रादमध्ये चांगला चोप मिळत होता आणि त्यामुळं हिटलरचं डोकं फिरलंय, त्याला वेडयाच्या इस्पितळात टाकलंय व त्याचा तोतया म्हणे आता जर्मनीवर सत्ता गाजवतोय; तिची शेजारीण अलेवतिना अर्काद्येवना हिला खरे म्हणजे कामगारशिधापत्र मिळण्याचा अधिकार नव्हता, तिने सुरेख ॲल्युमिनियमची दुधाची चरवी मागून नेली होती आणि अजूनही परत केली नव्हती; आन्ना दानिलोवनाचे आई-वडील फार चांगली माणसे होती आणि आता स्थलांतरितांबरोबर दूर गेली होती; खुद्द आन्ना दानिलोवना फार छान मुलगी होती, शांत आणि सुस्व-भावी होती, इतर छचोर मुलींसारखी नव्हती, पुरुषांना आपल्या घरी आणत नव्हती, वगैरे वगैरे. शेवटी म्हातारीने विचारले:

"तिचा तो रणगाडावाला तूच का? सोविएत संघाचा वीर?"

"नाही, मी वैमानिक आहे," मेरेस्येव उत्तरला. म्हातारीच्या बोलक्या चेहऱ्यावर आश्चर्य, चीड, अविश्वास, दुःख ह्या भावना एकाच वेळी उमटलेल्या पाहून त्याला हसू आवरणे अवघड झाले.

तिने ओठांना मुरड घातली, रागाने जोरात दार आपटले आणि आता-पर्यंतचा प्रेमळ स्वर बदलून कॉरीडॉरमधूनच ती म्हणाली:

"तुला गरम पाणी पाहिजे असलं तर तुझं तू निळ्या स्टोव्हवर तापवून घे."

तळावरील इस्पितळात आन्यूता खूप कामात असावी. शरदामधील त्या अंधुक, उदास दिवशी तिचे घर अगदीच दुर्लक्षित वाटत होते. प्रत्येक वस्तूवर धुळीचा दाट थर बसला होता. खिडकीमधील आणि कुंड्यांमधील फुले जणू दीर्घ काळ पाणी न मिळाल्यामुळे पिवळट व कोमेजलेली दिसत होती. टेबलावर पावाचे कडक तुकडे होते आणि किटली तशीच पडली होती. पियानोवरही धुळीचे मऊ, पांढुरके वस्त्र पांघरले गेले होते. निळ्या पोटाची एक मोठी माशी त्या कोंदट वातावरणात घुममटलेली दिसत होती व खिडकीच्या धुरकट. [illegible] होती.

मेरेस्येवने खिडक्या सताड उघडचा टाकल्या. पलिकडे उतरता बगीचा [illegible] होता. आता त्याने भाजीच्या वाफ्यात रूपांतर झाले होते. ताज्या [illegible] एक झोत खोलीत आला आणि त्याने साचलेली धूळ एवढचा जोरात [illegible], की खोलीत धुके दाटल्यासारखे भासले. अलेक्सेईच्या मनात या [illegible] एक सुखद विचार चमकला... खोली स्वच्छ करायची आणि यदाकदा-[illegible] इस्पितळातून मुक्त होऊन संध्याकाळी ती त्याला भेटायला आली तर [illegible] चकित करायचे. म्हातारीकडून त्याने एक बादली, फडके आणि बोळा [illegible] काठी मागून घेतली व ज्या कामाकडे पुरुष मंडळी शतकानुशतके [illegible] पाहतात ते घरसफाईचे काम तो जोमाने करू लागला. दीड तासभर [illegible] घासत, पुसत होता, धूळ झटकत होता. त्या कामात तो पूर्ण रमला होता.

घरी येत असताना वाटेवर पुलापाशी काही मुली ॲस्टरची मोठी, [illegible] फुले विकत असलेल्या त्याने पाहिले होते. संध्याकाळी पुलावर जाऊन [illegible] फुलांचा एक गुच्छ विकत घेतला. पियानो आणि टेबलावरील फुलदाण्यां-[illegible] त्याने फुले ठेवली. हिरव्या आरामखुर्चीत स्वतः आरामशीर बैठक [illegible]. सबंध अंगभर त्याला एक सुखद थकवा जाणवत होता. त्याने [illegible] शिध्यामधून म्हातारी स्वयंपाकघरात जेवण शिजवीत होती, [illegible] खमंग वास तो मोठचा चवीने हुंगत होता.

[illegible] आन्यूता घरी आली तेव्हा एवढी थकलेली होती, की जेमतेम [illegible] दोन शब्द बोलून तिने कोचावर अंग टाकले. खोली किती स्वच्छ [illegible] होती इकडे तिचे मुळीच लक्ष गेले नाही. थोडी विश्रांती घेऊन जेव्हा [illegible] भर पाणी प्यायली तेव्हा कोठे खोलीतील बदल तिच्या ध्यानी आला. [illegible] होऊन तिने खोलीभर नजर टाकली. एक थकले स्मित करून आणि [illegible] मेरेस्येवचा दंड दाबून ती म्हणाली.

"ग्रीशा तुझ्यावर एवढं प्रेम का करतो यात आश्चर्य नाही! मला थोडा [illegible] सुद्धा वाटतो याचा! आल्योशा, तू केलंस हे... तू स्वतः? कित्ती [illegible] मुलगा आहेस रे! ग्रीशाकडून काही बातमी समजली? तो तिथं आहे. [illegible] दिवशी त्याच्याकडून दोन ओळींचं एक अगदी छोटं पत्र मिळालं. [illegible] ग्रादमध्ये आहे. तो वेडा मुलगा तिथं काय करत असेल असं वाटतं [illegible]? दाढी वाढवतोय! ह्या अशा काळात! तिथं खूप धोक्याचं आहे [illegible]? सांग आल्योशा, खरंच? स्तालिनग्रादबद्दल माणसं काय भयंकर [illegible] सांगताहेत!"

"तिथं ते लढताहेत!"

अलेक्सेईने कपाळाला आठ्या घातल्या आणि उसासा टाकला. वोल्गावर असलेल्या लोकांचा त्याला हेवा वाटत होता. प्रत्येकाच्या मुखी विषय झालेल्या त्या महाप्रचंड रणकंदनात भाग घेणाऱ्यांचा त्याला हेवा वाटत होता.

सारी संध्याकाळ त्यांनी गप्पा मारल्या. हवाबंद डब्यातील मांसाचा त्यांनी समाचार घेतला व दुसऱ्या खोलीत सामानाची अडगळ होती म्हणून एकाच खोलीत मित्रांप्रमाणे झोपायचे त्यांनी ठरविले. आन्यूता पलंगावर आणि अलेक्सेई कोचावर. दोघांनाही यौवनसुलभ गाढ झोपा लागल्या.

अलेक्सेईला जाग आली आणि तो कोचावर उठून बसला तेव्हा सूर्यकिरणांनी खोलीत एव्हाना तिरकस प्रवेश केला होता. आन्यूता निघून गेली होती. कोचाच्या पाठीशी टाचणीने टोचून ठेवलेली एक चिठी त्याला आढळली: "इस्पितळात पळाले आहे. टेबलावर चहा आहे आणि कपाटात पाव आहे. माझ्यापाशी साखर नाही. पुन्हा शनिवारपर्यंत मोकळीक मिळणार नाही. आ."

हे सगळे दिवस अलेक्सेई क्वचितच घरातून बाहेर पडला. दुसरा काहीच उद्योग नव्हता म्हणून म्हातारीचे प्रायमस स्टोव्ह त्याने दुरुस्त केले; रॉकेलचे स्टोव्ह, विजेचे तवे आणि विजेची बटणे दुरुस्त केली. आणि म्हातारीच्या विनंतीनुसार त्या भयानक अलेवतिना अर्काद्येवनाचे कॉफी दळण्याचे यंत्रही त्याने दुरुस्त करून दिले. जाता जाता सांगायचे म्हणजे तिने दुधाची चरवी अद्याप परत केली नव्हती. अशा रीतीने त्याने म्हातारीची मर्जी संपादन केली. तसेच, बांधकाम ट्रस्टमध्ये काम करणाऱ्या, हवाई हल्लाविरोधी पथकात क्रियाशील काम करणाऱ्या व दिवसचे दिवस आणि रात्री घरी येऊ न शकणाऱ्या तिच्या नवऱ्याचीही मर्जी त्याने संपादन केली. त्या म्हाताऱ्या जोडप्याचे असे मत बनले की, रणगाडावाले चांगले होतेच, पण वैमानिकसुद्धा काही वाईट नव्हते. हवाई धंदा असूनही वैमानिक मंडळी प्रामाणिक, घरप्रेमी असतात असा त्यांना अनुभव आला होता.

कार्यकारी विभागात जाऊन निर्णय घेण्याचा अलेक्सेईचा दिवस समोर येऊन ठेपला. आदली रात्र तो चक्क डोळे सताड उघडे टाकून पडला होता. सकाळी उठून त्याने दाढी केली, आंघोळ उरकली व ठरल्या वेळी कचेरीत दाखल झाला. त्याचे भवितव्य ठरविणाऱ्या कार्यकारी सेवाविभागातील मेजरच्या टेबलासमोर सर्वांत प्रथम तोच गेला. त्या मेजरवर नजर टाकताच

अलेक्सेईला तो आवडला नाही. अलेक्सेईला येताना जणू पाहिले नाही असा वहाणा करून मेजर आपले डोळे वर न उचलता टेबलावरील कामात मग्न राहिला. तो वेगवेगळ्या फायली उचलत-उघडत होता, विविध लोकांना फोन करीत होता. फायलींचा क्रम कसा लावायचा याचा त्याने कारकुनाला तपशीलवार खुलासा केला व मग तो बाहेर गेला आणि बराच वेळपर्यंत परत आला नाही. एवढ्या दरम्यान त्या मेजरच्या लांबट चेहऱ्याचा, लांब नाकाचा, गुळगुळीत दाढी केलेल्या गालांचा, लाल ओठांचा, त्याच्या चकचकत्या टकलाशी नकळत मिसळून गेलेल्या उतरत्या कपाळाचा अलेक्सेईला मनस्वी तिटकारा आला होता. सरतेशेवटी मेजर परत आला, खुर्चीवर बसला, आपल्या दिनदर्शिकेचे पान त्याने उलटले आणि नंतर अलेक्सेईकडे मोर्चा वळविला.

"कॉम्रेड सीनियर लेफ्टनंट, तुम्ही मला भेटू इच्छिता?" ऐटबाज, आत्मविश्वासपूर्ण खर्ज सुरात त्याने चौकशी केली.

मेरेस्येवने त्याला आपले काम सांगितले. अलेक्सेईचे कागदपत्र घेऊन येण्यास मेजरने कारकुनाला सांगितले व ते कागदपत्र येईपर्यंत तो पाय ताणून बसला आणि काडीने मनःपूर्वक दात कोरण्यात मग्न झाला. केवळ शिष्टाचारापायी त्याने दात कोरताना तोंडावर हाताचा आडोसा धरला होता. कागदपत्र आणल्यानंतर त्याने मेरेस्येवची फाईल तपासायला आरंभ केला. एकदम त्याने हात हलविला आणि अलेक्सेईला खुर्चीवर बसण्याची खूण केली. पाय कापण्याच्या उल्लेखापर्यंत तो येऊन ठेपला होता हे स्पष्ट होते. शेवटचे पान वाचून संपविल्यानंतर त्याने वर पाहिले आणि विचारले:

"मग, मी तुमच्यासाठी काय करावं अशी इच्छा आहे?"

"लढाऊ कमांडच्या विंगमध्ये मला नेमणूक हवीय!"

मेजर धपकन खुर्चीच्या मागे रेलला. अजूनही त्याच्या समोर उभ्याच असलेल्या वैमानिकाकडे त्याने आश्चर्याने पाहिले व स्वतःच्या हातांनी त्याने अलेक्सेईसाठी खुर्ची पुढे सरकवली. आपल्या झुपकेदार भुवया गुळगुळीत आणि चकचकत्या कपाळापर्यंत उंचावत तो म्हणाला:

"पण तुम्हाला विमान हाताळता येणार नाही!"

"मला विमान हाताळता येतं आणि मी हाताळीन! चाचणीसाठी ट्रेनिंग स्कूलमध्ये मला पाठवा," मेरेस्येव जवळ जवळ ओरडला. त्याच्या स्वरामधून असा काही दुर्दम्य निर्धार उमटला होता की, खोलीतील इतर

टेबलांजवळचे अंमलदार चौकस नजरांनी पाहू लागले. हा काळसर वर्णाचा, देखणा सीनियर लेफ्टनंट कशाचा आग्रह धरत होता याबद्दल त्यांना कुतूहल निर्माण झाले.

आपल्यासमोरील माणूस झपाटलेला अथवा वेडा आहे अशी मेजरची खात्री पटली. अलेक्सेईच्या रागीट चेहऱ्याकडे आणि वटारलेल्या "जंगली" डोळ्यांकडे एक तिरपा कटाक्ष टाकून, शक्यतो मवाळ स्वरात बोलण्याचा प्रयत्न करीत तो म्हणाला :

"हे बघा! पाय नसताना विमान चालवणं कसं शक्य आहे? अशी परवानगी तुम्हाला कोण देणार? हा अगदी विचित्रपणा आहे! असं यापूर्वी कधीही घडलेलं नाही!"

"कधीही घडलं नाही ते आता घडवण्यात येईल," खंबीरपणे अलेक्सेई म्हणाला. खिशातून त्याने टिपणवही काढली, मासिकाचे कात्रण तिच्यातून बाहेर काढले, त्यावरील सेलोफेनचे वेष्टन उलगडले आणि मेजरच्या पुढ्यात टेबलावर ठेवले .

इतर टेबलांवरील अंमलदारांनी आपल्या हातातील कामे बाजूला ठेवली व अलेक्सेईचे आणि मेजरचे संभाषण ते कान देऊन ऐकू लागले. त्यांच्यातील एक जण काही कामाचे निमित्त करून मेजरच्या टेबलापाशी आला. सिगारेट पेटविण्यासाठी त्याने काड्यापेटी मागितली व मेरेस्येवच्या चेहऱ्याकडे एक कटाक्ष टाकला. मेजरनें कात्रणावरून भराभरा डोळे फिरविले. शेवटी तो म्हणाला :

"ह्याचा आधार धरून आम्हाला जाता येत नाही. हा अधिकृत दस्तऐवज नाही. आम्हाला आमच्या सूचना आहेत आणि हवाई दलात भरती होण्यासाठी कोणकोणत्या क्षमता आवश्यक आहेत त्यांची काटेकोर नोंदणी त्यांच्यात आहे. तुम्हाला जर हाताची दोन बोटं नसती तरी मी विमान चालवायला परवानगी देऊ शकत नाही. मग दोन पाय नसतानाची गोष्टच नको. हे तुमचं कात्रण! हा पुरावा नव्हे. तुमच्या धैर्याचं मात्र मला कौतुक वाटतं, पण..."

मेरेस्येव संतापाने आतून नुसता उकळत होता. मेजरच्या टेबलावरील शाईदान उचलावे आणि त्याच्या चकचकीत टकलावर मारावे असे त्याला फार फार वाटत होते. गुदमरल्या आवाजात तो म्हणाला :

"याच्याबद्दल काय मत आहे?"

त्याने हुकमाचे शेवटचे पान टेबलावर ठेवले – प्रथम दर्जाचे सेना-सर्जन मिरोवोल्स्की यांच्या सहीचे प्रमाणपत्र. संशयित मनाने मेजरने ते उचलले. त्यावर योग्य तो मजकूर होता, सैन्याच्या वैद्यकीय विभागाचा शिक्का होता आणि हवाई दलात अत्यंत मान असणाऱ्या सर्जनची त्यावर सही होती. प्रमाण-पत्र वाचल्यानंतर मेजरचा आवाज स्नेहाळ बनला. त्याच्या समोरचा माणूस वेडा नव्हता. हा असाधारण तरुण माणूस पाय नसतानाही खरोखरीच हवाई दलात लढू इच्छित होता. तसे तो करू शकेल अशी त्याने एका मोठा अधिकार असलेल्या, समतोल वृत्तीच्या सेना-सर्जनची खात्रीही पटविली होती. मेजरने मेरेस्येवची फाईल एक सुस्कारा सोडून बाजूला सारली व तो म्हणाला:

"तुमच्यासाठी मला खूप काही करावंसं वाटेल, पण तरीही मी काहीही करू शकत नाही. प्रथम दर्जाचे सेना-सर्जन त्यांना काय हवं ते लिहू शकतात, पण आम्हाला स्पष्ट आणि ठाम आदेश आहेत. त्यांच्यापासून दूर जाता येत नाही... जर मी ते आदेश मोडले तर त्याबद्दल जबाबदार कोण? सेना-सर्जन?"

त्या मस्त खाऊन-पिऊन राहणाऱ्या, ठाम आत्मविश्वासाने, शांतपणे व सभ्यपणे वागणाऱ्या लष्करी अंमलदाराकडे अलेक्सेईने जळत्या तिरस्काराचा कटाक्ष टाकला. अंगात फिट्ट बसणाऱ्या त्याच्या सदऱ्याची व्यवस्थित कॉलर, त्याचे केसाळ हात व मोठी, आखूड कापलेली बोटांची विद्रूप नखे यांच्याकडे त्याने तिटकाऱ्याने पाहिले. कशा प्रकारे त्याला समजावून सांगायचे? तो समजून घेईल? हवाई लढाई कशी असते हे त्याला माहीत होते? कदाचित त्याने आयुष्यात कधी बंदुकीचा एक बारही ऐकला नसेल. सर्व ताकदीनिशी स्वतःचा संयम बाळगून मेरेस्येवने खालच्या आवाजात विचारले:

"मग मी काय करायचं?"

मेजरने खांदे उडविले आणि तो उत्तरला:

"तुमचा आग्रहच असेल तर सेनारचना विभागाच्या कमिशनकडं मी तुम्हाला पाठवू शकतो. पण मी आधीच इशारा देऊन ठेवतो – त्यातून काहीही निष्पन्न होणार नाही!"

"पुढचं पुढे! आत्ता तर मला कमिशनकडं पाठवा!" धाप टाकीत खुर्चीत कोसळत मेरेस्येव म्हणाला.

मग त्याच्या ह्या कचेरीतून त्या कचेरीत वाऱ्या सुरू झाल्या. गळ्यापर्यंत काम करून थकलेले अंमलदार त्याचे म्हणणे ऐकून घेत, आश्चर्य आणि सहा-नुभूती व्यक्त करीत व अगतिकपणे खांदे उडवीत. ते तरी काय करणार?

त्यांना हाय-कमांडकडून ठाम आदेश होते आणि सैन्याच्या पूर्वापार चालत आलेल्या परंपरा होत्या. त्यांचा भंग कसा करणार? आणि अशा ठळक प्रकरणी! युद्धआघाडीवर परत जाण्याची इच्छा बाळगणाऱ्या ह्या अदम्य, अपंग माणसाविषयी त्यांना खरोखर वाईट वाटत होते. त्याला ठाम नकार देण्याचा त्यांच्यापैकी कुणालाही धीर होत नव्हता. म्हणून त्याची ते इकडे-तिकडे पाठवणी करीत होते, करुणेपायी त्याला कमिशनकडे पाठवीत होते.

नकारांना अथवा धमक्यांना आता मेरेस्येव जुमानत नव्हता. त्याच्या मानी स्वभावाला त्रासदायक ठरणाऱ्या अपमानास्पद सहानुभूतीचे आणि अनुग्रहाचेही त्याला फारसे वाटेनासे झाले होते. स्वतःला काबूत राखायला तो शिकला. वकीली थाटात बोलायची ढब त्याने आत्मसात केली. एखाद्या दिवशी त्याला दोन-तीन ठिकाणीही नकार मिळत, पण तरीही तो आशा सोडत नव्हता. मासिकाचे कात्रण व सेना-सर्जनांचे प्रमाणपत्र वारंवार खिशातून बाहेर काढल्यामुळे घड्यांवर ते कागद फाटले आणि टेपने त्यांना चिकटविणे त्याला भाग पडले.

ह्या भटकंतीचा त्रास आणखी तीव्र वाटण्याचे कारण म्हणजे उत्तराची वाट पहात असताना तो शत्त्याविना जगत होता. सॅनाटोरियमकडून मिळालेला शिधा संपला होता. आन्यूताच्या घरात राहणारे म्हातारे जोडपे एव्हाना त्याचे चांगले स्नेही बनले होते व तो स्वतःचे जेवण शिजवीत नाही असे त्यांच्या ध्यानात येताच त्याला ते आग्रहाने जेवायला बोलावीत होते हे खरे! पण खिडकीखालच्या छोट्या भाजीच्या वाफ्यात ते जोडपे किती कष्टत होते हे त्याला माहीत होते. प्रत्येक कांदा, प्रत्येक गाजर त्यांच्या दृष्टीने किती मौल्यवान होते ह्याची त्याला कल्पना होती. छोट्या भावंडांनी गोड खाऊ वाटून खावा तसे ते जोडपे दररोज सकाळी पावाचे रेशन वाटून घेत होते. म्हणून त्याने त्यांना खोटेच सांगितले होते की, घरी जेवण बनविण्याचा त्रास चुकविण्यासाठी तो अधिकाऱ्यांच्या मेसमध्येच जेवत होता.

शनिवार उगवला. आन्यूता कामातून मोकळी होऊन घरी यायची होती. दरम्यान दररोज संध्याकाळी तिला फोन करून अलेक्सेई आपल्या अपयशी हालचालींची माहिती तिला देत होता. त्याने एक निकराचे पाऊल टाकण्याचा निर्णय घेतला. त्याच्या थैलीत त्याच्या वडिलांची जुनी चांदीची सिगारेट केस होती. तिच्यावर "निएलो" रंगविलेली त्रोयका* होती व आतमध्ये

---

* त्रोयका – बर्फावरची तीन घोड्यांची रशियन घसरगाडी. – अनु.

कोरलेले होते: "तुझ्या लग्नाच्या रौप्यमहोत्सवानिमित्त. मित्रांकडून." अलेक्सेई धूम्रपान करीत नव्हता, पण तो युद्धावर जायला निघाला तेव्हा त्याच्या आईने ही मौल्यवान कौटुंबिक ठेव त्याच्या खिशात घातली होती. आणि दर वेळी लढाईवर जाताना "शकुनी वस्तू" म्हणून त्याने ही चांदीची अवजड, गैरसोयीची केस खिशात बाळगली होती. त्याने थैलीमधून ती चांदीची सिगारेट केस शोधून काढली व जुन्या वस्तूंच्या दुकानाची वाट धरली.

डांबराच्या गोळ्यांचा अंगाला वास येणाऱ्या एका हडकुळ्या बाईने सिगारेट केस हातात उलटसुलट फिरविली व आपल्या किरकोळ बोटांनी त्यातील कोरीव शब्दांकडे लक्ष वेधीत सांगितले की, असे शब्द कोरलेल्या वस्तू विक्रीसाठी घेतल्या जात नाहीत.

"पण मी काही फार मागत नाही. तुम्ही सांगा किती द्याल ते!"

"छे: छे:! शिवाय कॉम्रेड अंमलदारसाहेब, मला वाटतं, लग्नाच्या रौप्यमहोत्सवासाठी अशा भेटी घ्यायला तुम्ही जरा घाई केलीय," त्या बाईने तिरसट, रंगविहीन डोळ्यांनी अलेक्सेईकडे कटाक्ष टाकीत खवचटपणे म्हटले.

शरमेने कानशिले तापलेला अलेक्सेई झटकन सिगारेट केस घेऊन बाहेरच्या दाराकडे निघाला. कुणीतरी त्याच्या दंडाला धरून थांबविले व मद्याचा भपकारा त्याच्या कानात सोडला.

"तुझ्यापाशी मोठी सुरेख वस्तू दिसतेय. स्वस्तात देतोस असं म्हणालास?" एका, दाढी वाढलेल्या चेहऱ्याच्या व बटबटीत निळसर नाकाच्या एका माणसाने विचारले. आपला गाठाळलेला, थरथर कापणारा हात सिगारेट केसपुढे लांबवीत तो म्हणाला: "प्रचंड. देशरक्षक युद्धातल्या वीराच्या आदरापोटी मी तुला पाचशे देतो!"

अलेक्सेई सौदा करीत बसला नाही. त्याने पाचशे रूबलच्या नोटा घेतल्या आणि त्या जुनाट, कुबट वस्तूंच्या जगामधून वेगाने बाहेर पडून तो ताज्या हवेत आला. जवळच्याच बाजारात मटण, चरबी, पाव, कांदे-बटाटे इत्यादी गोष्टी खरेदी केल्या. अजमोदाच्या काही काड्या घ्यायलाही तो विसरला नाही. अशा रीतीने पिशव्या लादून त्याची स्वारी चरबीचा तुकडा चघळीत चघळीत "घरी" परतली.

"माझं रेशन घेऊन परत घरात जेवण शिजवायचं मी ठरवलंय. मेसमधलं

जेवण फार भयानक असतं!" स्वयंपाकघरातील टेबलावर खरेदी केलेल्या खाद्यपदार्थांचा ढीग रचत त्याने म्हातारीला खोटे सांगितले.

त्या दिवशी संध्याकाळी आन्यूतासाठी सुरेख जेवण वाट पहात होते. मांसाचे तुकडे घालून उकळलेले बटाट्याचे सार होते. साराच्या पिवळसर तवंगावर अजमोदाचे तुकडे तरंगत होते. तळलेले मांस आणि कांदे होते. बटाट्याच्या सालींपासून काढलेल्या खळीमधून म्हातारीने क्रॅनबेरी फळांची जेलीसुद्धा बनविली होती. आन्यूता घरी आली तेव्हा फिकुटली आणि थकलेली होती. तिने कसेबसे हात-तोंड धुतले व कपडे बदलले. तिने घाईघाईने जेवण संपविले व त्या जुन्या, अद्भुत आरामखुर्चीत मस्त ताणून दिली. एखाद्या प्रेमळ जुन्या स्नेह्याप्रमाणे ती आरामखुर्ची तिला वाटली. तिच्या कानामध्ये ती खुर्ची गोड गोड स्वप्ने कुजबुजत होती. एवढ्या सायासांनी बनविलेली जेली नळाखाली ठेवलेल्या भांड्यात थंड करीत ठेवलेली होती. पण ती खाण्यासाठी वाट न पाहताच आन्यूता झोपेच्या आधीन झाली होती.

एक छान डुलकी काढल्यानंतर जेव्हा तिने डोळे उघडले तेव्हा त्या खोलीत संध्याछाया एव्हाना पसरल्या होत्या. जुने, आरामशीर फर्निचर असलेली ती छोटी खोली आता स्वच्छ आणि नीटनेटकी दिसत होती. जेवणाच्या टेबलाशी एका जुन्या दिव्याच्या शेडखाली अलेक्सेई बसला होता. त्याने आपल्या दोन्ही हातांमध्ये स्वत:चे डोके एवढे गच्च दाबून धरले होते, की जणू ते चिरडून टाकण्याचा त्याचा इरादा होता असे भासत होते. त्याचा चेहरा तिला दिसत नव्हता, पण ज्या तऱ्हेने तो बसला होता त्यावरून स्पष्ट होते की, तो अत्यंत निराश मन:स्थितीत होता. ह्या वळकट आणि निग्रही माणसाविषयी आन्यूताच्या अंत:करणात करुणा दाटून आली. ती उठली, हलक्या पावलांनी त्याच्या जवळ गेली, त्याचे मोठे डोके तिने आपल्या हातांमध्ये धरले व त्याच्या राठ केसांमधून हळुवारपणे बोटे फिरवीत थोपटले. त्याने तिचा हात पकडला, तिच्या तळहाताचे चुंबन घेतले. झटदिशी तो उभा राहिला व आनंदी, हसऱ्या चेहऱ्याने उद्गारला :

"क्रॅनबेरी जेली खाणार का? तुझी पण कमाल आहे! जेली व्यवस्थित जमावी म्हणून इथं मी नळाची धार सोडून बसलोय आणि तू खुशाल घोरायला लागलीस! कुठल्या बल्लवाचार्याला उत्साह येईल अशा वागण्यानं?"

आंबटढाण बनलेली ती "खास" जेली त्या प्रत्येकाने बशी बशीभर खाल्ली. सर्व विषयांवर मजेने त्यांनी गप्पा मारल्या. पण जणू काही आपरात

करार झाल्याप्रमाणे ग्वोझ्देव व मेरेस्येव ह्या दोन विषयांवर बोलायचे टाळले. नंतर त्यांनी आपापले बिछाने तयार केले. आन्यूता कॉरीडॉरमध्ये गेली व अलेक्सेईच्या कृत्रिम पायांचा फरशीवर ठप्प आवाजात होईपर्यंत वाट पहात तेथे थांबली. नंतर ती आत आली, तिने दिवा मालविला व कपडे बदलून पांघरुणात शिरली. खोलीत अंधार होता. ती दोघे गप्प होती. पण पांघरुणाच्या सळसळीवरून व स्प्रिंगांच्या करकरीवरून तिला समजत होते की तो जागा होता. शेवटी आन्यूताने विचारले:

"आल्योशा, झोपलास?"

"नाही."

"विचार करतो आहेस?"

"हो. तू?"

"मीसुद्धा विचार करतेय."

ती दोघे पुन्हा गप्प झाली. रस्त्यावर एक ट्रामगाडी वळणापाशी वळताना जोराने खडखडली. तिच्या डोक्यावरील विजेच्या तारेमधून उडालेल्या ठिणगीने खोली क्षणभर उजळली व त्याच क्षणाला त्या दोघांनी एकमेकांचा चेहरा पाहिला. दोघेही सताड उघडे डोळे ठेवून झोपले होते.

आपल्या निष्फळ भ्रमंतीविषयी अलेक्सेई आन्यूताला चकार शब्दाने बोलला नव्हता. पण तिने तर्क बांधला की, त्याची परिस्थिती काही चांगली नव्हती आणि त्याची अदम्य महत्त्वाकांक्षा कदाचित अपेक्षाभंगापायी क्षीणावत चालली होती. ह्या माणसाला किती यातना होत असाव्यात हे तिच्या स्त्रीसुलभ अंतर्मनाने तिला सांगितले. पण त्याच वेळी तिला ह्याचीही जाणीव होती की, त्याला ह्या क्षणी कितीही कठीण जात असले, तरी तिने सहानुभूतीचा एक शब्द उच्चारणे म्हणजे त्याचे दुःख अधिक गहिरे करण्यासारखे होते. दया दाखविण्यामुळे त्याचा केवळ अपमान झाला असता.

ह्या उलट तो आपले दोन्ही हात डोक्याखाली धरून, उताणा पडून आन्यूताविषयी विचार करीत होता. त्याच्या बिछान्यापासून अवघी काही पावले अंतरावर निजलेल्या ह्या सुंदर मुलीविषयी तो विचार करीत होता. ती त्याच्या मित्राची प्रेयसी होती आणि त्याची चांगली मैत्रीण होती. तिच्यापर्यंत जाण्यासाठी अंधाऱ्या खोलीत अवघी काही पावले टाकण्याचा अवकाश होता. पण जगातील कोणतीही गोष्ट त्याला ती पावले टाकायला उद्युक्त करू शकत नव्हती. त्याला फारशी परिचित नसलेली, पण त्याला निवारा

देणारी ही मुलगी जणू त्याची सख्खी बहीण होती. ह्याविषयी त्याने जर मेजर स्त्रूच्कोवला सांगितले असते तर कदाचित त्याने अलेक्सेईची टर उडविली असती, त्याच्यावर विश्वास ठेवला नसता. पण कुणास ठाऊक? कदाचित इतर कुणाहीपेक्षा तोच त्याला सर्वांत जास्त समजू शकला असता... आन्यूता किती छान मुलगी होती! बिच्चारी! किती दमून जायची! तरीही तळावरच्या इस्पितळातील काम ती उत्साहाने करीत होती.

"आल्योशा!" तिने अस्फुट हाक मारली.

मेरेस्येवच्या कोचाकडून संथ श्वासाचा आवाज येत होता. वैमानिकाला झोप लागली होती. आन्यूता आपल्या बिछान्यामधून उठली, अनवाणी पावलांनी हलकेच त्याच्या कोचापर्यंत चालत गेली. त्याची उशी तिने नीट केली आणि तो जणू लहान मूल असावा त्याप्रमाणे त्याच्या अंगावर व्यवस्थित पांघरुण घातले.

७

कमिशनने मेरेस्येवला सर्वांत प्रथम बोलाविले. प्रचंड, थुलथुलीत देहाचे प्रथम दर्जाचे सेना-सर्जन अखेरीस एकदाचे परतले होते व कमिशनच्या अध्यक्षपदावर होते. अलेक्सेईला त्यांनी तात्काळ ओळखले व त्याच्या स्वागता-साठी ते आपल्या जागेवरून उठलेसुद्धा.

"तुला ती माणसं अजून घेत नाहीत ना?" प्रेमळ, सहानुभूतीच्या स्वरात त्यांनी म्हटले. "खरंच, तुझं प्रकरण जरा जास्तच कठीण आहे. तुला कायद्याला बगल देऊन जायचंय आणि ते करणं सोपं नाही!"

अलेक्सेईची परीक्षा घेण्याची तसदी कमिशनने घेतली नाही. सेना-सर्जननी त्याच्या अर्जावर लाल पेन्सिलीने लिहिले: "पर्सोनेल विभाग. अर्जदाराला चाचणीसाठी प्रशिक्षण विद्यालयात पाठवावे असे वाटते." तो कागद घेऊन अलेक्सेई तडक पर्सोनेल विभागाच्या प्रमुखांकडे गेला. जनरलना भेटायची परवानगी त्याला देण्यात आली नाही. अलेक्सेई संतापायच्या बेतात होता. पण जनरलांचा ॲडज्युटंट एवढा आनंदी, प्रेमळ, स्नेहार्द्र चेहऱ्याचा तरुण, नीटनेटका, छोटी काळी मिशी राखलेला कप्तान होता की, अलेक्सेई त्याच्या टेबलाशी बसला व एरवी ॲडज्युटंट मंडळींची "पाठीराखे" म्हणून हेटाळणी करणाऱ्या त्याने, चक्क त्या कप्तानाला स्वतःची हकीकत तपशीलवार

सांगितली. आपल्या त्या कृतीचे खुद्द अलेक्सेईलाच नंतर आश्चर्य वाटले होते. कथनामध्ये टेलिफोनची घंटा वारंवार व्यत्यय आणत होती, तो कप्तान अधूनमधून उठत होता व आपल्या प्रमुखांच्या कचेरीत काही काळ गुडुप होत होता. पण दरवेळी परत येऊन तो अलेक्सेईसमोर बसायचा व आपल्या भाबड्या, बालिश डोळ्यांनी रोखून पहात रहायचा. त्याच्या नजरेत कुतूहल होते, कौतुक होते आणि अविश्वासही होता. घाईघाईने तो म्हणायचा :

"हं, तर मग नंतर काय झालं?" किंवा कथनामध्ये एकदम अडथळा आणून उद्‌गारायचा : "खरंच? तुम्ही थट्टा तर करत नाही? बरं, बरं!"

अलेक्सेईने जेव्हा त्याला आपल्या कचेरी ते कचेरीच्या भटकंतींविषयी सांगितले तेव्हा त्या तरुण दिसणाऱ्या, पण कचेऱ्यांमधील कारभाराच्या यंत्रणेच्या गुंतागुंतींची पूर्ण कल्पना असणाऱ्या कप्तानाने रागाने म्हटले :

"सैतान साले! तुम्हाला तसं पळवून लावायचं त्यांना काही एक कारण नव्हतं! तुम्ही खरंच वैशिष्ट्यपूर्ण... कसं सांगावं ते मला समजत नाही... अं... एक असाधारण माणूस आहात! .. पण त्यांचंही सरतेशेवटी बरोबर होतं... पाय नसलेली माणसं विमान उडवत नाहीत!"

"उडवतात! हे पहा," असे म्हणून मेरेस्येवने मासिकाचे कात्रण दाखविले. त्याचप्रमाणे सेना-सर्जनांचे मत दाखविले व पर्सोनेल विभागासाठी त्यांनी दिलेला कागदही दाखविला.

"पण पाय नसताना तुम्ही विमान कसं चालवणार? मोठे मजेशीर माणूस आहात! तुम्हाला एक म्हण ठाऊक आहे : पाय नसलेला माणूस कधीही नर्तक होणार नाही!"

दुसऱ्या कुणी असे म्हटले असते तर मेरेस्येवला नक्की अपमान वाटला असता. कदाचित चिडून उद्धटपणे त्याने तसेच प्रत्युत्तर केले असते. पण कप्तानाचा चेहरा सदिच्छेने एवढा उजळलेला होता की अलेक्सेई झटकन उभा राहिला व बालिश धिटाईने म्हणाला :

"कधीच नाही म्हणता? तर मग पहा!" असे बोलून त्याने त्या खोलीच्या मध्यभागी धमाल नाचून दाखविले.

कप्तान काही वेळपर्यंत कौतुकाने त्याला पहात राहिला. मग ताडकन उठला व एकही अक्षर न बोलता अलेक्सेईचे कागदपत्र खेचून घेऊन आपल्या प्रमुखांच्या कचेरीच्या दारामागे अदृश्य झाला.

तेथे तो बराच वेळपर्यंत राहिला : खोलीमधून संभाषणाचे मंद आवाज

ऐकू येत होते. आपले शरीर ताठरल्याचे अलेक्सेईला जाणवले. त्याच्या हृदयाची वेगाने धडधड होऊ लागली. जणू एखाद्या वेगवान वाहनात बसून जात होता.

कप्तान बाहेर आला तेव्हा प्रसन्न स्मित करीत होता.

"तुम्हाला वैमानिकांबरोबर पाठवायला अर्थातच जनरल तयार नाहीत," तो म्हणाला, "पण हे पहा त्यांनी काय लिहिलंय: 'अर्जदाराच्या पगारात अथवा रेशनमध्ये कपात न करता त्याला शिधा खात्यात कामावर नेमावे.' समजलं? कपात न करता..."

पण आनंदाऐवजी अलेक्सेईच्या मुद्रेवर संताप फुललेला कप्तानाने पाहिला.

"शिधा खात्यात कधीही नाही!" अलेक्सेई ओरडला. "तुम्हाला समजत नाही का? पगाराची किंवा रेशनची मला चिंता नाही! मी वैमानिक आहे! मला विमान चालवायचंय, लढायचंय!.. लोकांना हे का बरं समजत नाही?.."

कप्तान गोंधळात पडला. हा अर्जदार खरेच विचित्र होता. त्याच्या जागी दुसरा माणूस आनंदाने नाचला असता... पण हा! ठार चक्रम! मात्र हा चक्रम माणूस कप्तानाला जास्त जास्त आवडू लागला होता. त्याची समस्या त्याला प्रामाणिकपणे जाणवत होती व ती सोडवायला मदत करण्याची त्याची इच्छा होती. एकदम त्याच्या मनात एक कल्पना चमकली. त्याने मेरेस्येवला डोळा घातला, बोटाने खूण करून जवळ बोलाविले आणि आपल्या प्रमुखाच्या कचेरीच्या दाराकडे कटाक्ष टाकीत दबत्या आवाजात तो म्हणाला:

"जनरलनी करता येण्यासारखं सर्व काही केलंय. त्याहून जास्त काही करण्याचे अधिकार त्यांना नाहीत. अगदी प्रामाणिकपणं सांगतो. वैमानिक म्हणून तुमची त्यांनी नेमणूक केली असती तर त्यांनाच वेड लागलंय असं लोकांना वाटेल: तेव्हा मी सांगतो तसं करा. सरळ सर्वांत मोठ्या साहेबांकडं जा. फक्त तेच तुम्हाला मदत करू शकतील."

अलेक्सेईच्या नव्या मित्राने त्याला पास मिळवून दिला. अर्ध्या तासानंतर, सर्वांत मोठ्या साहेबांच्या कचेरीसमोरील प्रतीक्षा-कक्षातील गालिचा अंथरलेल्या फरशीवर अलेक्सेई अस्वस्थ मनाने येरझाऱ्या घालीत होता. त्याला हे आधी का सुचले नव्हते? खरेच! एवढा वेळ वाया न घालविता त्याने तात्काळ इकडे यायला पाहिजे होते! आता जय किंवा पराजय यांपैकी एक काहीतरी घडणार होते... मोठे साहेब स्वतः एकेकाळी पट्टीचे वैमानिक

असल्याचे ऐकिवात होते. ते मेरेस्येवला समजून घेतील! लढाऊ वैमानिकाला ते शिधा खात्यात पाठवणार नाहीत!

प्रतीक्षा-कक्षात अनेक धीरगंभीर जनरल आणि कर्नल खालच्या आवाजां-मध्ये एकमेकांशी बोलत होते. काहींची अस्वस्थता टळकपणे दिसत होती. ते अखंड धूम्रपान करीत होते. सीनियर लेफ्टनंट आपल्या विचित्र, लवचिक पावलांनी येरझाऱ्या घालीत होता. सर्वजण निघून गेले आणि मेरेस्येवची पाळी आली तेव्हा तो झपझप टेबलापाशी गेला. तेथे गोल चेहऱ्याचा एक तरुण मेजर बसला होता.

"कॉम्रेड सीनियर लेफ्टनंट, खुद्द साहेबांनाच भेटायची तुमची इच्छा आहे का?" मेजरने विचारले.

"होय. त्यांच्या समोर अत्यंत महत्त्वाची वैयक्तिक बाब मांडायची आहे."

"त्याबद्दल आधी मला थोडं सांगता का? खुर्ची घ्या आणि बसा! सिगारेट ओढता?" त्याने मेरेस्येवसमोर सिगारेट केस धरली.

अलेक्सेई धूम्रपान करीत नव्हता, तरीही त्याने एक सिगारेट घेतली, आपल्या बोटांमध्ये चुरगाळून टेबलावर ठेवली आणि पूर्वी कप्तानाला त्याने आपली हकीकत सांगितली होती तशी ह्या मेजरला आपल्या साहसांची कथा त्याने भडाभडा सांगितली. मेजरने त्याची कथा प्रेमाने, सहानुभूतीने आणि लक्षपूर्वक ऐकली. मासिकाचे कात्रण आणि सेना-सर्जनांचे मत त्याने वाचले. मेजरच्या सहानुभूतीने उत्तेजन मिळून मेरेस्येवने त्याला नाचूनही दाखविले. आपण कोठे आहोत याचे त्याला भानच राहिले नाही... आणि सगळ्या खेळाचा त्याने जवळ जवळ बेरंग केला, कारण त्याच क्षणाला कचेरीचे दार जोराने उघडले गेले व काळयाभोर केसांचा एक उंच, सडपातळ अंमलदार बाहेर आला. अलेक्सेईने त्याचा फोटो पूर्वी पाहिला असल्यामुळे त्याला तात्काळ ओळखले. चालता चालता ओव्हरकोटाची बटणे लावीत तो अंमलदार आपल्या मागून येणाऱ्या जनरलला काहीतरी सांगत होता. त्याच्या चेहऱ्यावर चिंता होती व मेरेस्येवकडे त्याचे लक्षही गेले नाही.

"मी क्रेमलिनमध्ये जातोय," घड्याळाकडे पहात तो मेजरला म्हणाला. "सहा वाजता स्तालिनग्रादसाठी विमान मागवा. वेर्खनाया पग्रोमनायाला उतरवा." एवढे बोलून जेवढ्या वेगाने तो उगवला होता तेवढ्याच वेगाने नाहीसा झाला.

मेजरने तातडतोब विमानाची व्यवस्था केली. मेरेस्येव तेथेच उभा होता याची आठवण झाल्यावर तो दिलगिरीच्या स्वरात म्हणाला :

"तुमचं नशीव नाही. आम्ही इथून दूर जातोय. तुम्हाला परत यावं लागेल. राहण्याची कुठं सोय आहे?"

क्षणापूर्वी कमालीचा निर्धारी आणि भक्कम वाटणाऱ्या ह्या असाधारण पाहुण्याचा काळसर चेहरा अचानक निराशेने व थकव्याने ग्रासलेला पाहताच मेजरने आपला विचार बदलला.

"ठीक आहे," तो म्हणाला. "साहेबांनीसुद्धा असंच केलं असतं हे मला माहीत आहे."

एका सरकारी कागदावर त्याने काही ओळी लिहिल्या, एका लिफाफ्यात तो कागद घातला व त्यावर पत्ता लिहिला: "पर्सोनेल विभाग-प्रमुख." मेरेस्येवच्या हाती लिफाफा देऊन हस्तांदोलन करीत मेजर म्हणाला :

"मी मनःपूर्वक तुम्हाला यश चिंततो!"

चिठीत म्हटले होते : "सीनियर लेफ्टनंट अ. मेरेस्येव कमांडरना भेटले. त्यांच्याकडे पूर्ण लक्ष देण्यात यावे. लढाऊ सेवेत त्यांना परत जाता यावे यासाठी सर्व मदत करण्यात यावी."

एक तासानंतर, बारीक मिशीवाल्या कप्तानाने मेरेस्येवला आपल्या प्रमुखाच्या कचेरीत नेले. उग्र, केसाळ भुवयांच्या त्या धिप्पाड, वयस्क जनरलनी चिठी वाचली. आपले आनंदी, निळे डोळे वर उचलून वैमानिकाकडे पाहिले व हसून ते म्हणाले :

"अच्छा, म्हणजे एव्हाना तू तिथं पोचलास? खूपच लौकर! मी तुला शिधा खात्यात पाठवलं म्हणून चिडलेला तूच तर तो! हा-हा-हा!" जनरल गालातल्या गालात गंमतीने हसले : "छान! तू अस्सल वैमानिक आहेस हे मला दिसतंय. शिधा खात्यात जायची इच्छा नाही! अपमान वाटला ना? .. गंमत आहे! .. पण तरुण नर्तका, मी काय करू तुझं? तुझी मान तू मोडून घेशील, मग तुझी नेमणूक करणारा मूर्ख म्हातारा म्हणून ते माझी मुंडी मुरगाळतील! अर्थात तू काय करू शकशील ते कोण सांगणार? ह्या युद्धात आपल्या पोरांनी याहून मोठ्या गोष्टी करून जगाला चकित केलंय... कुठं आहे तुझा कागद?"

बेफिकीर, वाईट हस्ताक्षरात, जेमतेम पूर्ण शब्द लिहीत जनरलनी त्या कागदावर निळ्या पेन्सिलीने खरडले: "अर्जदाराला प्रशिक्षण विद्यालयात

पाठवावे." थरथरत्या हाताने मेरेस्येवने कागद खेचून घेतला व तेथल्या तेथे वाचला. मग जिन्याच्या आरंभी वाचला, परत खाली पहारेकरी पास तपासत तेथे वाचला, नंतर ट्रामगाडीत बसून वाचला आणि शेवटी पावसात फरसबंदीवर वाचला. अत्यंत बेफिकीरपणे खरडलेल्या त्या शब्दांचा अर्थ काय होता व त्यांचे मूल्य काय होते ते सबंध जगात फक्त त्याला एकट्या-लाच माहीत होते.

त्या दिवशी अलेक्सेई मेरेस्येवने त्याला डिव्हिजन-कमांडरनी भेट म्हणून दिलेले घड्याळ विकले. आलेल्या पैशामधून त्याने बाजारात सर्व प्रकारचे खाद्यपदार्थ आणि मद्याची बाटली विकत घेतली. आन्यूताला त्याने फोन केला व निदान काही तासांपुरती सुटी घेऊन घरी यायचा आग्रह केला, म्हाताऱ्या जोडप्याला आन्यूताच्या फ्लॅटमध्ये बोलाविले आणि आपल्या मोठ्या विजयाचा आनंद व्यक्त करण्यासाठी त्याने मेजवानीचा बेत केला.

८

मॉस्कोनजीकच्या एका छोट्या विमानतळाजवळील प्रशिक्षण विद्यालय त्या धामधुमीच्या काळात खूप गजबजलेले होते.

स्तालिनग्रादच्या लढाईत हवाई दलाचा बराच मोठा वाटा होता. वोल्गा नदीवरील त्या बालेकिल्ल्यावरचे आकाश आगींच्या आणि स्फोटांच्या धुराने सतत कोंदलेले होते. त्या आकाशात हवाई चकमकींचे मोठ्या लढायांमध्ये रूपांतर घडत होते. दोन्ही बाजूंची हानी प्रचंड होती. स्तालिनग्राद लढविण्या-साठी अधिकाधिक वैमानिकांची जरूरी भासत होती... हवाई लढाईचे प्रशिक्षण देणाऱ्या त्या विद्यालयात इस्पितळांमधून मुक्त झालेले वैमानिक व आजपर्यंत नागरी हवाई वाहतूक करणारे वैमानिक दाखल करण्यात येत होते. विद्यालय पूर्ण क्षमतेने काम करीत होते. एखाद्या अस्वच्छ टेबलावर माशांचा घोळका गुणगुणत असावा त्याप्रमाणे पाकोळ्यांसारखी दिसणारी छोटी प्रशिक्षण विमाने धावपट्टीवर गर्दी करीत होती. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत त्यांचा घरघराट ऐकू येत होता. रबरी धावांचे पट्टे उमटलेल्या धावपट्टीवर केव्हाही नजर टाकली तरी एखादे विमान उतरताना अगर उड्डाण करीत असताना दृष्टीस पडायचे.

त्या प्रशिक्षण विद्यालयाचे चीफ ऑफ स्टाफ म्हणजे बुटके, भक्कम

बांध्याचे, लाल चेहऱ्याचे दमदार लेफ्टनंट-कर्नल होते. झोपेअभावी त्यांचे डोळे तांबारलेले होते. मेरेस्येवकडे त्यांनी रागाने एक कटाक्ष टाकला. जणू त्यांना म्हणायचे होते: "इथं कशाला तडमडायला आलास? तुझ्याशिवाय माझ्यापाशी करायला भरपूर उद्योग आहेत..." अलेक्सेईने पुढे केलेले कागद त्यांनी खस्सदिशी खेचून घेतले.

लेफ्टनंट-कर्नलच्या हनुवटीवरील काळया खुंटांकडे धास्तावल्या नजरेने पाहताना अलेक्सेईच्या मनात विचार आला: "माझ्या पायांबद्दल हा माणूस आक्षेप घेणार आणि मला इथून चालते व्हायला सांगणार!" पण तेवढ्यात लेफ्टनंट-कर्नलना एकाच वेळी दोन फोन आले. एका रिसीव्हरला खांद्याने टेकू देऊन त्यांनी कानाला लावले आणि दुसऱ्यामध्ये चिडखोरपणे ते काहीतरी गरजले. त्याच वेळी त्यांचे डोळे मेरेस्येवच्या कागदपत्रांवरून फिरत होते. जनरलनी खरडलेला हुकूम तेवढा त्यांनी व्यवस्थित वाचला असे दिसले, कारण अद्याप रिसीव्हर धरला असतानाच त्यांनी त्या हुकूमाखाली लिहिले: "लेफ्टनंट नाऊमोव, तिसरे प्रशिक्षण युनिट. दाखल करावे." मग दोन्ही रिसीव्हर खाली ठेवून त्यांनी थकल्या सुरात चौकशी केली.

"गणवेष देण्याबद्दलचे कागद आहेत? रेशनचे कागद? नाहीत? मला ठाऊक आहे तू काय उत्तर देणार ते! इस्पितळ! ह्या कागदपत्रांना तयार करायला वेळ नव्हता! पण मी तुला आता कसा खाऊ घालू? तावडतोब त्यासाठी अर्ज कर. भत्त्याच्या कागदपत्रांशिवाय मी तुला दाखल करून घेणार नाही."

"ठीक आहे. मी तावडतोब हे काम करतो!" अत्यंत आनंदाने मेरेस्येव म्हणाला व त्याने रुबाबदारपणे सलाम ठोकला. "मी जाऊ शकतो?"

"हो," विमनस्कपणे हात झटकीत लेफ्टनंट-कर्नल उत्तरला. अचानकपणे तो ओरडला: "थांब! ते काय?" वासिली वासिल्येविचनी अलेक्सेईला भेट दिलेल्या सोनेरी अक्षरे कोरलेल्या काठीकडे त्याने बोट दाखविले. कचेरी-मधून बाहेर पडताना धांदलीच्या भरात मेरेस्येव त्या काठीला कोपऱ्यात विसरला होता. "काय आहे ते? फेकून दे ती वस्तू! एखाद्याला वाटायचं, ही लष्करी तुकडी नाही, तर लमाणांचा तळ आहे! किंवा उद्यान! हातातल्या काठ्या, छड्या, घोड्यांचे चाबूक!.. लौकरच तुम्ही गळयांमध्ये ताईत बांधू लागाल आणि कॉकपिटमध्ये काळी मांजरं ठेवायला लागाल! पुन्हा ही भिकार वस्तू माझ्या दृष्टीला पडता कामा नये! नखरेबाज कुठला!"

"ठीक आहे कॉम्रेड लेफ्टनंट-कर्नल!"

अनेक अडचणी आणि कष्ट पुढे वाढून ठेवले होते हे अलेक्सेईला माहीत होते. नव्या कागदपत्रांसाठी त्याला अर्ज करणे भाग होते आणि मूळ कागद त्याने कसे हरवले त्याची हकीकत चिडक्या लेफ्टनंट-कर्नलला सांगावी लागणार होती. विद्यालयात माणसांची सतत रीघ लागल्यामुळे गोंधळ माजला होता, खाद्यपदार्थांचा तुटवडा भासत होता. प्रशिक्षार्थींचे दुपारचे जेवण संपते न संपते तोच त्यांना भूक लागायची व संध्याकाळच्या जेवणाची ते वाट पाहू लागायचे. तीन नंबरच्या युनिटसाठी तात्पुरते रहायला म्हणून दिलेल्या शाळेच्या इमारतीत माणसांची खूप दाटी होती. त्या इमारतीचे वाफेचे नळ फुटल्यामुळे खोल्यांमध्ये खूप थंडी होती. अंगात कातडी कोट घालून आणि वर पांघरूण घेऊनही पहिली सबंध रात्र अलेक्सेई कुडकुडत राहिला. पण तरीही, एवढा गोंधळ आणि एवढ्या गैरसोयी असूनही, वाळवंटी किनाऱ्यावर धापा टाकीत पडलेला मासा पाण्याच्या लाटेबरोबर परत समुद्रात फेकला गेला म्हणजे त्याला जसे वाटते तसे कदाचित अलेक्सेईला वाटत होते. येथे त्याला प्रत्येक गोष्ट आवडत होती. उघड्या तळावरील जीवनातील गैर-सोयीसुद्धा त्याला आठवण करून देत होत्या की, तो आपल्या उद्दिष्टाच्या नजीक पोहोचला होता.

भोवतालचे वातावरण त्याच्या परिचयाचे होते. आता सालटी निघालेल्या आणि फिकुटलेल्या कातडी कोटांमधील आनंदी माणसे; त्यांचे हवाई बूट; त्यांचे करपलेले चेहरे आणि घोगरे आवाज; विमानाच्या इंधनाच्या गोडसर, उग्र दर्पाने भरलेले परिचित वातावरण; गरम होणाऱ्या इंजिनांची घुमणारी घरघराट; उडणाऱ्या विमानाची एका संथ लयीतील घरघर; मेणचट उपवस्त्रांमधील मळकट चेहऱ्यांचे, अतिश्रमांनी थकलेले मेकॅनिक. ब्राँझसारखा चेहऱ्यांचा रंग झालेले चिडके शिक्षक; हवामान केंद्रातील लालबुंद गालांच्या पोरी; कमांड पोस्टमधील चुलाण्यातून बाहेर पडून थराथरांनी ओटंगलेला निळसर धूर; विजेच्या यंत्रांची मंद गुणगुण आणि टेलिफोनांची दचकविणारी घंटी; जाणाऱ्या वैमानिकांनी सोबत चमचे नेल्यामुळे मेसमध्ये निर्माण झालेली भगच्यांची चणचण; रंगीत पेन्सिलींनी चिताडलेली भित्ती-वर्तमानपत्रे; हवे-मध्ये आपल्या आवडत्या मुलींची स्वप्ने पाहणाऱ्या तरुण वैमानिकांचे अटळ व्यंग्यचित्र; चाकांनी आणि घसरींनी पिवळा चिखल माखलेली धावपट्टी; भावुक शब्दांच्या आणि हवाई दलातील सांकेतिक शब्दांच्या मसाल्याने भरलेले मजेदार संभाषण—हे सर्व काही परिचित आणि चाकोरीमधील होते.

मेरेस्येवचे व्यक्तिमत्व तात्काळ फुलले. लढाऊ कमांडमधील माणसांचे वैशिष्टय असलेला आनंदी आणि बेफिकीरपणा परत त्याच्यामध्ये आला. ही त्याची वृत्ती मध्यंतरीच्या काळात तो कायमचा गमावून बसला होता असे वाटले होते. त्याने स्वतःला सावरले. कनिष्ठांच्या सलामांना तो तावडतोब प्रत्युत्तर देऊ लागला. वरिष्ठांना भेटताना रुबाबदारपणे नियमांनुसार पावले टाकू लागला. नवा गणवेष मिळताच शिधा खात्यात म्हाताऱ्या क्वार्टरमास्टर सार्जंटकडे जाऊन त्याच्याकडून त्याने गणवेषात दुरुस्त्या करवून घेतल्या आणि "फिट्ट" गणवेष बनविला. हा क्वार्टरमास्टर सार्जंट नागरी जीवनात शिंपी-काम करीत होता आणि आता फावल्या वेळात रुबाबदार व चोखंदळ लेफ्टनंट मंडळींचे गणवेष "अंगासरशी" बसवून देण्याचे काम त्याने पत्करले होते.

पहिल्याच दिवशी मेरेस्येव विमानतळावर लेफ्टनंट नाऊमोवला भेटायला गेला. तीन नंबरच्या युनिटचे धुरीणत्वले. नाऊमोवकडे होते आणि मेरेस्येवची नियुक्ती तीन नंबरच्या युनिटमध्ये झालेली होती. बुटका, अत्यंत जोमदार, मोठे डोके आणि लांब हात असलेला नाऊमोव "T" चिन्हापाशी धावत होता व "क्षेत्रा"त उड्डाण करणाऱ्या आकाशातील छोटया विमानाकडे पहात होता. विमानातील वैमानिकावर चिडून तो ओरडत होता:

"साला रिकामं खोकं आहे नुसता! म्हणे लढाऊ कमांडमध्ये होता! मला बनवू शकणार नाही!"

स्वतःची ओळख करून देण्यासाठी मेरेस्येव ताठ उभा राहिला आणि नियमानुसार त्यानें सलाम ठोकला. पण नाऊमोवने हाताला नुसता झटका दिला व आकाशाकडे बोट करीत तो ओरडला:

"पाहिलंस? लढवय्या! हवेतला सैतान!.. साला बर्फाच्या भोकात मरगळून पडलेल्या डेझीच्या फुलासारखा खाली पडतोय..."

अलेक्सेईला हा इन्स्ट्रक्टर तावडतोब आवडला. ही किंचित माथेफिरू माणसे त्याला नेहमीच आवडत आली होती. ह्या माणसांचे आपल्या कामावर विलक्षण प्रेम होते आणि लायक, उत्साही वैमानिकाचे अशा लोकांशी उत्तम पटते. हवेत उडणाऱ्या वैमानिकाविषयी अलेक्सेईने काही शेरे मारले. बुटक्या इन्स्ट्रक्टरने त्याला आपादमस्तक न्याहाळले व विचारले:

"माझ्या युनिटमध्ये येत आहेस? काय नांव तुझं? कुठल्या प्रकारचं विमान उडवत होतास? लढाईत होतास? विमान चालवायचं सोडून किती दिवस झाले?"

आपली सर्व उत्तरे लेफ्टनंट नाऊमोवने ऐकलीच अशी अलेक्सेईची खात्री नव्हती. कारण तो पुन्हा आकाशाकडे बघत होता, उन्हाची तिरीप लागू नये म्हणून एक हात त्याने डोळ्यांवर आडवा धरला होता आणि दुसऱ्या हाताने मूठ वळवून ओरडत होता :

"साला ओझ्याची गाडी चालवावी तसा विमान चालवतोय! .. वळतोय पहा कसा! दिवाणखान्यात गेंडा चालावा तसा!"

दुसऱ्या दिवशी सकाळीच हजर राहण्याचा त्याने अलेक्सेईला हुकूम केला. त्याची तावडतोब "चाचणी घेण्याचे" त्याने आश्वासन दिले.

"आता जाऊन विश्रांती घे," तो म्हणाला. "प्रवासानंतर गरज असते. काही खाल्लं की नाही? इथल्या गोंधळात तुला खायला घालायचं ते विसरतील... येडपट लेकाचा! थांब, आता खाली तर ये! लढवय्या, गी दाखवतोच तुला इंगा!"

अलेक्सेई विश्रांती घ्यायला गेला नाही. याचे कारण ज्या "९अ" च्या वर्गात त्याला झोपायला जागा दिलेली होती, त्यापेक्षा इथे विमानतळावर अधिक उबदार वाटत होते. मात्र वाऱ्याबरोबर उडत येणारी कोरडी वाळू खुपत होती. अलेक्सेईने बटालियनमधील एक चांभार शोधून काढला व जुन्या लष्करी पट्ट्याचे कडी आणि बकले लावलेल्या दोन वाद्यांमध्ये रूपांतर करण्याची कामगिरी त्याच्यावर सोपविली. विमान चालवताना पावंड्यांना आपले कृत्रिम पाय बांधण्यासाठी तो ह्या वाद्यांचा वापर करणार होता. मोबदल्यादाखल अलेक्सेईने त्या चांभाराला आपली आठवड्याची तंबाखू देऊ केली. कामाची तातडी आणि कामाचे वेगळे स्वरूप लक्षात घेऊन त्या चांभाराने तंबाखूशिवाय आणखी अर्धा लिटर वोदकाची मागणी केली व मस्त काम करण्याचे आश्वासन दिले. मेरेस्येव विमानतळावर परतला आणि हवाई उड्डाणे पाहू लागला. ती नेहमीची प्रशिक्षणाची उड्डाणे नसून जणू निष्णात वैमानिकांमधील स्पर्धा चालू होती, अशा भावनेने त्याचे निरीक्षण चालले होते. अगदी शेवटचे विमान दोरखंडांनी बांधून ठेवीपर्यंत तो विमानतळावरच होता. खरे म्हणजे उड्डाणे पाहण्यापेक्षा विमानतळावरील वातावरण तो अनुभवत होता. तेथील धावपळ, इंजिनांची अखंड घरघराट, अग्निबाणांचा बोथट धप्प आवाज, इंधनाचा आणि वंगणाचा वास – ह्या सर्व गोष्टी तो आत्मसात करीत होता. त्याचे सर्वांग आनंदाने फुलले होते. उद्या त्याचे

विमान कदाचित त्याचे ऐकणार नाही, त्याच्या ताब्यात राहणार नाही व कोसळेल, अशा तऱ्हेचा विचारसुद्धा त्याला शिवला नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो विमानतळावर हजर झाला तेव्हा तेथे फारशी वर्दळ नव्हती. दूर रेषेपाशी गरम करण्यात येणाऱ्या इंजिनांची घरघराट ऐकू येत होती. गरम करणाऱ्या स्टोव्हांमधून ज्वाला बाहेर पडत होत्या. त्या जणू साप असल्यासारखे मानून पंखे सुरू करणारे मेकॅनिक दूर पळत होते. सकाळच्या वेळच्या परिचित आरोळ्या ऐकू येत होत्या :

"रेडी !"

"कॉन्टॅक्ट !"

"कॉन्टॅक्ट !"

कुणीतरी अलेक्सेईला शिवी हासडली आणि एवढ्या भल्या सकाळी विमानांभोवती तो कशाला घुटमळत होता, अशी पृच्छा केली. अलेक्सेईने थट्टेत उत्तर दिले. "रेडी, कॉन्टॅक्ट, कॉन्टॅक्ट" हे शब्द एखाद्या गाण्याच्या कडव्याप्रमाणे तो वारंवार म्हणू लागला होता. शेवटी विमानांना सावकाशपणे ओढून धावपट्टीवर आणण्यात आले. ती विमाने इकडे-तिकडे कलंडत होती, त्यांच्या थरथरत्या पंखांना मेकॅनिक सावरून धरत होते. दरम्यान नाऊमोव आला होता. सिगारेटचे थोटुक ओढत उभा होता. ते थोटुक एवढे छोटे होते की, निकोटिनचे डाग पडलेल्या त्याच्या हाताच्या बोटांमधून तो धूर खेचत होता असे भासत होते.

"अच्छा, आलास तर!" अलेक्सेईच्या सलामाला उत्तर म्हणून तो उद्‌गारला. "जो पहिल्यांदा येतो त्याला पहिली संधी. नऊ नंबरच्या मागच्या कॉकपिटमध्ये बैस. एका मिनिटात मी तिथं येतो. कुठल्या जातीचा तू पक्षी आहेस ते आपण पाहू!"

अलेक्सेई घाईघाईने विमानाकडे जात होता तेव्हा नाऊमोवने आपल्या थोटकाचे शेवटचे काही झुरके मारले. इन्स्ट्रक्टर विमानात चढण्यापूर्वी पावंड्यांना बुटाच्या वाद्या बांधायची अलेक्सेईला घाई झाली होती. तसा इन्स्ट्रक्टर सभ्य माणूस दिसत होता, पण कुणी सांगावे? एकदम त्याला झटका यायचा, भांडण उकरून काढायचा आणि चाचणी घ्यायला नकार द्यायचा. घसरत्या पंख्यावरून धडपडत चढत मेरेस्येवने कशीवशी कॉकपिटची कड पकडली. उत्तेजित झाल्यामुळे आणि सवय सुटल्यामुळे त्याला आपला पाय पलिकडे टाकणे काही केल्या जमेना. उदास चेहऱ्याच्या वयस्क

मेकॅनिकने चकित होऊन मेरेस्येवकडे पाहिले व त्याच्या मनात विचार आला : "साला झिंगलाय !"

सरतेशेवटी अलेक्सेईला आपला एक ताठर पाय कॉकपिटमध्ये टाकणे जमले. प्रचंड कष्टांनी त्याने दुसराही पाय आत टाकला व धप्पदिशी तो खुर्चीत बसला. वाद्यांच्या साह्याने त्याने आपले कृत्रिम पाय पावंड्यांना बांधले. लहानपणी चांगल्या स्केटची जोडी त्याच्या पायांना जशी छान बसायची तसे त्या चामडी वाद्यांमुळे विमानाचे पावंडे फिट्ट बसले.

इन्स्ट्रक्टरने कॉकपिटमध्ये मुंडके खुपशीत विचारले : "तू दारू प्यायला आहेस म्हणे ? बघू दे मला तुझ्या तोंडाचा वास !"

अलेक्सेईने श्वासाचा भपकारा सोडला. दारूचा वास नाही अशी खात्री पटल्यावर इन्स्ट्रक्टरने आपली मूठ वळवून मेकॅनिकला धमकावले.

"रेडी !"

"कॉन्टॅक्ट !"

"कॉन्टॅक्ट !"

इंजिन अनेकदा फुरफुरले आणि नंतर पिस्टन तालबद्धपणे फिरू लागले. मेरेस्येवला खूप आनंद झाला आणि त्याने यांत्रिकपणे इंधनाची तरफ खेचली. पण इंटरकॉममधून इन्स्ट्रक्टर गुरकावत असल्याचे त्याने ऐकले :

"फाटकावर धडक द्यायला निघालेल्या बैलासारखी घाई करू नको !"

वाफेची कळ खुद्द इन्स्ट्रक्टरनेच उघडली. इंजिनाने प्रचंड घरघराट केली. त्याच्या कर्कश्य आवाजाने आसमंत दणाणला. दुडक्या उड्या मारीत विमान धावू लागले. स्वाभाविकपणे इन्स्ट्रक्टरने दांडा खेचला आणि पाकोळीसारखे दिसणारे ते छोटे विमान आकाशात झेपावले. ह्या विमानाला उत्तर आघाडीवर "वनरक्षक" असे नांव मिळाले होते ; मध्यवर्ती आघाडीवर "कोबी बागवान" आणि दक्षिणेत "मकेवाला" अशा नांवांनी ते प्रसिद्ध बनले होते. सर्वत्र ह्या विमानाची सैनिक मंडळी मजेने टिंगल करीत. म्हाताऱ्या, किरकिऱ्या, पण कसोटीला उतरलेल्या निष्ठावंत मित्राप्रमाणे हे विमान त्यांना वाटे.

कोनात बसविलेल्या आरशामधून इन्स्ट्रक्टरला आपल्या नव्या प्रशिक्षणार्थीचा चेहरा दिसू शकत होता. मध्यंतरी बराच काळ उलटल्यानंतर पहिले उड्डाण करतेवेळीचे किती पुरुषांचे चेहरे त्याने आजवर पाहिले होते ! मुरब्बी लोकांचे विनम्र स्मित त्याने पाहिले होते. अनेक इस्पितळांच्या वाऱ्या करून कंटाळलेल्या आणि पुन्हा एकदा फॉर्मात आलेल्या उत्साही लोकांच्या चकाक-

त्या जळत्या डोळ्यांना त्याने पाहिले होते. विमान कोसळल्यानंतर महाभयंकर जखमी झालेले लोक परत पहिले उड्डाण करतात तेव्हा त्यांचे चेहरे फिकट होतात, घाबरल्याच्या सर्व खुणा त्यांच्यावर दिसतात, आपले ओठ ते चावत राहतात, हे त्याने पाहिले होते. पहिल्या उड्डाणाच्या वेळी नवशिक्यांचा धीट चौकसपणा त्याने पाहिला होता. पण ह्या काळसर, देखण्या सीनियर लेफ्टनंटच्या चेहऱ्यावरील विचित्र भावाचे आरशातील प्रतिबिंब त्याला आजवर कधीच पहायला मिळाले नव्हते. हा वैमानिक नवखा खासच नव्हता हे इन्स्ट्रक्टरच्या ध्यानी आले.

नव्या प्रशिक्षणार्थीच्या काळपट त्वचेवर लाली पसरली होती. त्याचे ओठ फिकटले होते. अर्थात भीतीमुळे नव्हे, पण नक्की कोणत्या उत्तेजित भावनेने याचा नाऊमोवला उलगडा होत नव्हता. कोण होता हा? त्याला काय होत होते? हा झिंगलाय असे मेकॅनिकला का वाटले?

विमानाने भरारी घेतली आणि ते आकाशात तरंगू लागले तेव्हा प्रशिक्षणार्थीच्या उन्हाचा चष्मा नसलेल्या काळ्या, निग्रही जिप्सी डोळ्यांमध्ये अश्रू तरारल्याचे इन्स्ट्रक्टरने पाहिले होते. विमानाने वळण घेतले तेव्हा हवेच्या झोतावरोबर अलेक्सेईच्या गालांवरील अश्रुधारा उडून गेल्या होत्या.

"स्वत:वरचा ताबा थोडा ढिला झालेला दिसतोय याचा! ह्याच्याशी मला सांभाळून वागलं पाहिजे. नेम नसतो कुणाचा..." नाऊमोव मनाशी विचार करीत होता. लांबट आरशामध्ये दिसणाऱ्या त्या खळबळलेल्या चेहऱ्यावरील भावात असे काहीतरी विलक्षण होते जे इन्स्ट्रक्टरला खूप आकर्षित करून गेले होते. त्याच्या गळ्यात आवंढा उमटला आणि समोरील उपकरणे अंधुक बनली तेव्हा त्याचे त्यालाच आश्चर्य वाटले.

"आता तू ताबा घे," इंटरकॉममधून तो म्हणाला. पण प्रत्यक्षात त्याने दांड्यावरची आणि पावंड्यावरची आपली पकड फक्त थोडी सैल केली. त्याच्या लोकविलक्षण प्रशिक्षणार्थीने जरासा दुबळेपणा दाखविला असता तर क्षणात परत विमानाचे नियंत्रण आपल्या हाती घेण्यास तो सज्ज होता. बदली गिअरमधून त्याला जाणवले की नव्या प्रशिक्षणार्थीच्या आत्मविश्वासपूर्वक आणि अनुभवी हातांमार्फत विमान हाताळले जात होते. "देवाच्या कृपेने बनलेला वैमानिक" अशी संज्ञा अशा प्रकारच्या वैमानिकाला प्रशिक्षण विद्यालयाच्या चीफ ऑफ स्टाफनी दिली होती. अगदी यादवी युद्धाच्या काळापासून हे चीफ ऑफ स्टाफ निष्णात वैमानिक होते.

पहिली फेरी पुरी झाली आणि नाऊमोवला नव्या प्रशिक्षणार्थीबद्दलच्या सर्व धास्त्या वाटेनाशा झाल्या. "नियमांनुसार" विमानाचे उड्डाण चालू होते. फक्त एकच गोष्ट खटकत होती. सरळ जाण्याऐवजी हा प्रशिक्षणार्थी अधून-मधून डावी-उजवीकडे अथवा खाली-वर किंचित जात होता. तो स्वतःचे कसब अजमावून पहात होता असे भासत होते. दुसऱ्या दिवशी ह्या माणसाला एकटचाला उड्डाण करू द्यायचे आणि दोन-तीन उड्डाणांनंतर "UT-2" प्रशिक्षण विमान त्याच्या ताब्यात द्यायचे असे नाऊमोवने ठरविले. हे विमान म्हणजे लढाऊ विमानाची छोटी, प्लायवूड प्रतिकृती होती.

थंडीचा कडाका होता. पंख्यावरील तपमान शून्याखाली १२° सें. होते. कॉकपिटमध्ये चावरे वारे घुसत होते आणि इन्स्ट्रक्टरचे पाय थंडगार गोठत होते. खाली उतरण्याची वेळ झाली होती.

पण "विमान खाली उतरव" असा हुकूम त्याने दिला म्हणजे दरवेळी त्याला आरशात काळ्या, जळत्या, आर्जवी डोळ्यांची जोडी दिसत होती. छे:, त्या डोळ्यांमध्ये आर्जव नव्हते, मागणी होती आणि त्या मागणीला नकार देण्याचे त्याच्या अंतःकरणाला मान्य होत नव्हते. दहा मिनिटांऐवजी त्यांनी अर्धा तास उड्डाण केले.

कॉकपिटमधून खाली उडी मारल्यानंतर नाऊमोवने आपले पाय आपटले आणि दंडांवर थापट्या मारल्या. त्या सकाळच्या गोठलेल्या थंडीत जोरदार चिमटा होता. पण प्रशिक्षणार्थी मात्र कॉकपिटमध्ये थोडा वेळ काही तरी खुडबुड करीत राहिला आणि नंतर सावकाशपणे व अनिच्छेने खाली उतरला असे भासले. जेव्हा त्याचे पाय जमिनीला टेकले तेव्हा पंखाशेजारी तो सस्मित चेहऱ्याने बसला. त्याच्या ओठांवर खरेखुरे धुंद स्मित खेळत होते. थंडीने आणि उत्तेजक मनःस्थितीमुळे त्याचे गाल लाल बनले होते.

"थंडी आहे ना?" इन्स्ट्रक्टरने विचारले. "माझ्या गरम बुटांमधून ती आरपार घुसली, पण तू तर साधे बूट घातले आहेस! तुझे पाय गोठले नाहीत?"

"मला पायच नाहीत!" स्वतःच्याच विचारांमध्ये गुरफटलेला प्रशिक्षणार्थी सस्मित वदनाने उत्तरला.

"काय?" आश्चर्याने 'आ' वासून नाऊमोव दचकून म्हणाला.

"मला पाय नाहीत," मेरेस्येव स्पष्टपणे परत म्हणाला.

"म्हणजे? याचा अर्थ काय? त्यांच्यात काही बिघाड झालाय असं म्हणायचंय?"

"नाही. मला मुळी पायच नाहीत. आणि आहेत ते खोटे!"

क्षणभर नाऊमोव आश्चर्यातिरेकाने जमिनीला खिळून उभा राहिला. ह्या विलक्षण माणसाने सांगितलेली गोष्ट अविश्वसनीय होती. पाय नाहीत! पण आत्ता थोड्या वेळापूर्वी तो विमान चालवीत होता... झकास चालवीत होता! ..

"बघू दे मला!" त्याच्या आवाजात भीती होती.

त्याच्या ह्या चौकसपणाचा अलेक्सेईला संताप आला नाही किंवा अपमानही वाटला नाही. उलट ह्या गंमतीदार अनुभवी माणसाच्या आश्चर्यावर तो एक कळस चढवू इच्छित होता. एखाद्या जादूगाराप्रमाणे हालचाल करीत त्याने आपली विजार वर करून पाय उघडे केले.

प्रशिक्षणार्थी कातड्याच्या आणि ॲल्युमिनियमच्या पायांवर उभा होता. आपल्या इन्स्ट्रक्टरकडे, मेकॅनिककडे व उड्डाणाच्या पाळीची वाट पाहणाऱ्या वैमानिकांच्या रांगेकडे मजेने पहात होता.

क्षणात नाऊमोवला सारा उलगडा झाला. ह्या वैमानिकाची तगमग का चालू होती, त्याच्या चेहऱ्यावर तो लोकविलक्षण भाव का होता, त्याच्या डोळ्यांमध्ये अश्रू का तरारले होते आणि विमानाचे उड्डाण जास्तीत जास्त लांबविण्यास तो का उत्सुक होता, ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे त्याला निमिषार्धात मिळाली. ह्या प्रशिक्षणार्थीने त्याला कमालीचे चकित केले होते. धावतच त्याच्यापाशी जाऊन, त्याचे हात जोरजोराने हलवीत तो उद्गारला:

"बापरे! कसं काय जमलं तुला? अरे, तू काय ताकदीचा माणूस आहेस याची कल्पना नाही तुला!"

मुख्य गोष्ट पार पडली होती. अलेक्सेईने इन्स्ट्रक्टरचे हृदय जिंकले होते. संध्याकाळी भेटून त्यांनी प्रशिक्षणाचा कार्यक्रम आखला. अलेक्सेईची अवस्था अवघड होती ह्यावर त्यांचे एकमत झाले. त्याने किंचित जरी चूक केली असती तरी त्याला विमान चालविण्यास कायमची मना झाली असती. आत्ता ह्या क्षणाला लढाऊ विमानात बसून वोल्गावरील त्या प्रसिद्ध शहराकडे जाण्याची त्याला अतीव इच्छा जरी होत होती, देशातील सर्वोत्तम लढवय्यांचा जेथे ओघ लागला होता तेथे आपली वर्दी देण्याची त्याची जरी इच्छा होती, तरी सर्व प्रशिक्षण पार पाडण्यास त्याने संमती दिली. स्वतःच्या बाबतीत केवळ "सर्वोत्तम" प्रमाणपत्रच पुरे पडणार ह्याची त्याला जाणीव होती.

मेरेस्येव त्या प्रशिक्षण विद्यालयात पाच महिन्यांपेक्षा अधिक काळ राहिला. धावपट्टीवर बर्फ पसरले होते. धावत्या पकडीवर विमाने ठेवली होती. अलेक्सेई वर "क्षेत्रात" असला म्हणजे आता त्याला खालती शारदीय रंगांची उधळण दिसत नव्हती, तर पांढरा आणि काळा असे फक्त दोनच रंग दिसत होते. स्तालिनग्रादमधील जर्मनांच्या पराभवाची सनसनाटी बातमी, सहाव्या जर्मन सेनेचा नाश व पॉलसला पकडल्याची बातमी, ह्या गोष्टी आता भूतकाळात जमा झाल्या होत्या. दक्षिणेत अभूतपूर्व आणि अदम्य चढाई आकार घेत होती. जनरल रोतमिस्त्रोव यांच्या रणगाड्यांनी जर्मन फळी फोडली होती आणि शत्रूच्या पिछाडीला धुमाकूळ घातला होता. युद्धआघाडीवर अशा घटना घडत असताना आणि युद्धआघाडीवरील आकाशात महाभयानक लढाया रंगत असताना, छोट्या प्रशिक्षण विमानांमध्ये मेहनतपूर्वक "खुडबुडत" राहणे अलेक्सेईला फारच कठीण जात होते. पूर्वी इस्पितळातील कॉरीडॉरमध्ये असंख्य फेऱ्या घालताना, अथवा सुजलेल्या आणि भयानक वेदना होणाऱ्या पायांच्या खुंटांवर माझूर्का व फॉक्सट्रॉट नाचतानाही त्याला एवढे अवघड गेले नव्हते.

पण लढाऊ कमांडमध्ये आपण प्रत्यक्ष लढायला जाऊ अशी पूर्वी इस्पितळात त्याने स्वतःशीच प्रतिज्ञा केली होती. त्याने स्वतःसमोर एक उद्दिष्ट धरले होते आणि दुःख, वेदना, थकवा व निराशा वाटचाला येऊनही त्या उद्दिष्टपूर्तीसाठी तो झटत होता. एक दिवस त्याच्या नव्या पत्त्यावर एक जाडजूड लिफाफा आला. क्लावदिया मिखाइलोवनाने तो पाठविला होता. त्या लिफाफ्यात काही पत्रे होती. एक पत्र तिने स्वतः लिहिलेले होते. त्याचे कसे चालले होते, कोणत्या यशांची प्राप्ती त्याने केली होती व त्याचे स्वप्न वास्तवात उतरले होते अथवा नाही, याबद्दलच्या चौकशा तिने त्या पत्रामधून केल्या होत्या.

"खरंच स्वप्न प्रत्यक्षात उतरलंय का?" त्याने स्वतःला प्रश्न विचारला. पण उत्तर न देता इतर पत्रे चाळायला आरंभ केला. अनेक पत्रे होती: एक आईकडून, एक ओल्याकडून, एक ग्वोझ्देवकडून आणि एका पत्राचे त्याला खूप आश्चर्य वाटले. त्या पत्रावरील पत्ता "हवामान सार्जंट"च्या हस्ताक्षरात लिहिलेला होता व खाली अक्षरे होती:

"कॅप्टन कॉ. कुकूश्किनकडून." हे पत्र अलेक्सेईने सर्वांत प्रथम वाचले.

कुकूश्किनने लिहिले होते की, त्याचे विमान पाडण्यात आले होते. त्याच्या विमानाला तडाखा लागून ते पेटले होते, त्याने हवाई छत्रीच्या साह्याने उडी मारली होती व स्वतःच्या हद्दीत उतरण्यात त्याला यश आले होते. पण असे करताना त्याचा हात निखळला होता आणि आता तो वैद्यकीय बटालियनमध्ये होता. त्याच्या भाषेत म्हणजे "एनीमांची पात्रे धरणाऱ्या थोर मंडळींमध्ये अतिकंटाळ्यापायी मरत होता." मात्र त्याला कसलीही चिंता वाटत नव्हती, कारण लौकरच तो परत विमान उडवू लागेल असा त्याला विश्वास वाटत होता. त्याने पुढे लिहिले होते की, अलेक्सेईच्या सुप्रसिद्ध पत्रलेखिकेला, वेरा गावरीलोवनाला, ह्या पत्राचा मजकूर तो तोंडी सांगत होता व ती लिहून घेत होती आणि त्याच्यामुळे तिला विंगमध्ये अजूनही "हवामान सार्जंट" म्हणूनच ओळखण्यात येत होते. त्या पत्रात असेही म्हटले होते की, वेरा ही एक उत्तम साथी होती व त्याच्या दुर्दैवी काळात तिने त्याला खूप आधार दिला होता. ह्या ठिकाणी वेराने स्वतःची पुस्ती जोडून लिहिले होते की, कोस्त्या अर्थातच अतिशयोक्ती करीत होता. ह्या पत्रावरून अलेक्सेईला समजले की, विंगमध्ये त्याची अजूनही आठवण निघत होती, मेसरूममध्ये टांगलेल्या विंगच्या वीरांच्या चित्रांमध्ये त्याच्या छायाचित्राची भर पडली होती आणि तो परत विंगमध्ये दाखल होईल अशी रक्षकांना अजूनही आशा वाटत होती. रक्षक! मेरेस्येवने स्मित करीत मान हलविली. विंगला रक्षक ध्वजा अर्पण करण्यात आली होती ही महत्त्वाची घटना कळवायला कुकूश्किन आणि त्याची स्वयंसेविका चिटणीस विसरले होते, त्याअर्थी त्यांची मने दुसऱ्या कसल्यातरी विचारांमध्ये व्यग्र होती.

अलेक्सेईने आपल्या आईकडून आलेले पत्र उघडले. म्हाताऱ्या माता नेहमी जो मजकूर लिहितात तोच त्यात होता. त्याच्याबद्दलच्या काळज्यांनी आणि चिंतांनी भरलेला: त्याचे कसे काय चालले होते? त्याला थंडी वाजत नव्हती ना? खायला व्यवस्थित मिळत होते ना? हिवाळी कपडे मिळाले होते का? त्याच्यासाठी हातमोजांची जोडी विणून पाठवायची का? तिने एव्हाना अशा पाच जोड्या विणल्या होत्या व सोविएत सेनेकडे भेट म्हणून पाठविल्या होत्या. त्या प्रत्येक जोडीच्या अंगठ्यात तिने चिठी लिहिली होती: "ही जोडी तुम्हाला शकुनी ठरो!" त्यांपैकी एखादी जोडी त्याला मिळाली असेल असे तिला वाटले होते. आपल्या सशांना विंचरून निघालेल्या लोकरी-

पासून तिने ते उबदार हातमोजे विणले होते. खरेच, आता तिच्यापाशी सशांचे एक कुटुंब होते हे कळवायला ती विसरली होती. एक ससा, सशाची मादी आणि त्यांची सात पिल्ले. ह्या सगळया प्रेमळ, वात्सल्यपूर्ण चर्पटपंजरी-नंतर पत्राच्या अखेरीस तिने सर्वांत महत्त्वाच्या बाबीविषयी लिहिले होते: जर्मनांना स्तालिनग्रादमधून हाकलून लावण्यात आले होते, त्यांचे खूप खूप लोक ठार मारले गेले होते आणि त्यांचा एक फार मोठा सेनापती कैद झाल्याचे लोक बोलत होते. त्यांना हाकलून दिल्यानंतर ओल्या पाच दिवसां-च्या सुटीवर कामीशिनला आली होती. ओल्गाचे घर बाँबहल्ल्यात उध्वस्त झाल्यामुळे ती अलेक्सेईच्या आईकडेच राहिली होती. खंदक खोदणाऱ्या बटालियनमध्ये ओल्गा आता लेफ्टनंट होती. तिला खांद्यात जखम झाली होती, पण आता बरी झाली होती व तिचा सन्मान झाला होता. मात्र त्या सन्मानपदकाचे नांव सांगावे असे म्हातारीला वाटले नव्हते. तिने पुढे लिहिले होते की, तिच्या घरी ओल्गा सारा वेळ झोपत होती आणि जेव्हा ती झोपलेली नसे तेव्हा त्याच्याबद्दल बोलत राही. पत्त्यांच्या साह्याने त्यांनी भविष्यकथन केले आणि दर वेळी किलवरच्या राजावर चौकटची राणी यायची. त्याचा अर्थ अर्थातच अलेक्सेईला माहीत होता. त्याच्या आईने लिहिले होते की, त्या चौकटच्या राणीपेक्षा अधिक चांगली सूनबाई निदान तिला तरी अपेक्षित नव्हती.

आपल्या आईच्या चातुर्यहीन मुत्सद्देगिरीचे अलेक्सेईला हसू आले. "चौकट-च्या राणी" चे पत्र सामावलेला राखी लिफाफा त्याने काळजीपूर्वक उघडला. ते छोटेसे पत्र होते. ओल्गाने लिहिले होते की, "खंदक" खणल्यानंतर तिच्या श्रमिक बटालियनमधील सर्वोत्तम लोकांना सेनेच्या खंदक तुकडीत दाखल करून घेण्यात आले होते. आता ती लेफ्टनंट-टेक्निशियनच्या हुद्यावर होती. तिच्या तुकडीने शत्रूकडून अग्निवर्षाव होत असताना मामायेव कूर्गानवर (मामायेव टेकड्या – अनु.) तटबंद्या उभारल्या होत्या. मामायेव कूर्गान हे स्थळ स्तालिनग्रादच्या लढाईनंतर खूप प्रसिद्धीस आले होते. तसेच ट्रॅक्टर कारखान्याभोवतीही खंदकांचे मोर्चे बांधले होते. त्याबद्दल तुकडीला लाल पताकेचा किताब मिळाला होता. ओल्गाने लिहिले होते की, त्यांना खूप हाल सोसावे लागले होते. हवाबंद डब्यातील अन्नापासून ते फावड्यांपर्यंत सर्व काही वोल्गाच्या दुसऱ्या तीरावरून, शत्रूचा मशिनगनचा सतत भडिमार चालू असताना, आणावे लागले होते. शहरात एकही इमारत धड राहिली

नव्हती, जमिनीला मोठमोठे खड्डे पडले होते व चंद्राच्या मोठ्या केलेल्या छायाचित्रासारखी जमीन दिसत होती, असे तिने लिहिले होते.

ओल्गाने लिहिले होते की, जेव्हा ती इस्पितळातून बाहेर पडली तेव्हा तिला व इतरांना मोटारीमधून स्तालिनग्राद शहरातून नेण्यात आले होते. मेलेल्या जर्मनांच्या शरीरांचे ढिगारे दफन करण्यासाठी रचून ठेवलेले तिने पाहिले होते. अनेक प्रेते त्याशिवाय रस्त्यांवर पडलेली होती. "तुझ्या रणगाडावाल्या मित्रानं, ज्याचं नांव मी विसरले आहे, पण ज्याचं सबंध कुटुंब मारलं गेलंय, त्यानं इथं यावं आणि स्वतःच्या डोळ्यांनी ते दृश्य पहावं, असं मला फार फार वाटलं. मला खरंच असं वाटतं की, ह्या सर्व गोष्टींचं चित्रीकरण करावं आणि त्याच्यासारख्या लोकांना दाखवावं. शत्रूवर आम्ही कसा सूड उगवलाय हे त्यांना पाहूं दे!" सरतेशेवटी तिने लिहिले होते: स्तालिनग्रादच्या लढाईनंतर तिला वाटत होते की, त्याच्यासारख्या वीरांच्या वीराला ती लायक बनली होती. हे अनाकलनीय वाक्य अलेक्सेईने अनेकदा वाचले. हे पत्र घाईघाईत रेल्वे स्टेशनवर त्यांची आगगाडी थांबली असताना लिहिलेले होते. ते कोठे चालले होते हे तिला माहीत नव्हते, त्यामुळे तिच्या टपाल कचेरीचा क्रमांक ती कळवू शकली नव्हती. परिणामी, तिचे पुढील पत्र मिळेपर्यंत अलेक्सेई तिला पत्र लिहू शकत नव्हता. वस्तुतः त्याला म्हणायचे होते की, लढाईच्या ऐन धुमाळीत उत्साहाने रावलेली ती छोटी, कृश मुलगीच खरी "वीरांची वीर" होती. त्याने लिफाफा परत उलटसुलट केला व प्रेषकाचे ठळक अक्षरातील नांव वाचले: गार्डस् ज्युनियर लेफ्टनंट-टेक्निशियन ओल्गा अमूक अमूक. विमानतळावर फुरसतीचा क्षण मिळताच हे पत्र आपल्या खिशामधून काढून अलेक्सेई त्याची अनेकदा पारायणे करीत होता. विमानतळावरील बोचऱ्या हिवाळी वाऱ्यामध्ये आणि अजूनही त्याचे घर ठरलेल्या गोठवणाऱ्या थंडीच्या "९ अ" च्या वर्गात ते पत्र बराच काळपर्यंत त्याला ऊब देत राहिले.

इन्स्ट्रक्टर नाऊमोवने अखेरीस मेरेस्येवच्या चाचणी उड्डाणाचा दिवस निश्चित केला. मेरेस्येवला लढाऊ-प्रशिक्षण विमान चालवायचे होते आणि उड्डाणाची पाहणी इन्स्ट्रक्टर करणार नव्हता, तर प्रशिक्षण विद्यालयाचे चीफ ऑफ स्टाफ करणार होते. मेरेस्येवचे आगमन झाले तेव्हा त्याचे थंडे स्वागत करणारा तोच धिप्पाड, तांबड्या चेहऱ्याचा, रसरशीत लेफ्टनंट-कर्नल.

जमिनीवरून आपले बारकाईने निरीक्षण केले जात होते आणि आपले

भवितव्य ठरणार होते ह्याची जाणीव असल्यामुळे अलेक्सेईने त्या दिवशी कमालच केली. ते छोटे, हलके विमान त्याने एवढ्या कौशल्याने हाताळले की, त्याचे उघड कौतुक केल्यावाचून लेफ्टनंट-कर्नलना राहवले नाही. जेव्हा मेरेस्येव विमानातून खाली उतरला व चीफ ऑफ स्टाफसमोर उभा राहिला तेव्हा नाऊमोवच्या आनंदित आणि उत्तेजित चेहऱ्यावरील रेषा न रेषा त्याला सांगत होती की, तो चाचणी उत्तीर्ण झाला होता.

"अतिशय उत्तम! खरंच... जन्मजात वैमानिक म्हणायला हरकत नाही," लेफ्टनंट-कर्नल आपल्या गडगडत्या आवाजात म्हणाले. "हे पहा, इथं इन्स्ट्रक्टर म्हणून रहायला आवडेल? आम्हाला तुझ्यासारखी माणसं हवी आहेत." मेरेस्येवने ठामपणे नकार दिला.

"मूर्ख आहेस! लढणं कुणालाही जमतं! पण इथं तू माणसांना उड्डाण करायला शिकवशील!"

मेरेस्येव ज्या काठीवर रेलला होता तिच्याकडे अचानक लेफ्टनंट-कर्नलांचे लक्ष गेले. त्यांचा चेहरा लालेलाल झाला.

"पुन्हा ही वस्तू तुझ्या हातात!" ते गरजले. "दे माझ्याकडं! हातात छडी धरून तू सहलीला निघालास असं समजतोस? बुलेवार्दवर फिरायला आलेला नाहीस तू... हुकूमाचा भंग केल्याबद्दल अठ्ठेचाळीस तास कोठडीत बंद! पुढच्या वेळी तुझ्या पाठीवर चौकटचा एक्का रंगवशील! अठ्ठेचाळीस तास! ऐकलंस मी काय सांगितलं ते?"

लेफ्टनंट-कर्नलनी ती काठी मेरेस्येवच्या हातून हिसकावून घेतली व ती कशावर तरी मोडण्यासाठी ते इकडेतिकडे पाहू लागले.

"मला थोडं बोलायला परवानगी द्या कॉम्रेड लेफ्टनंट-कर्नल. त्याला पाय नाहीत!" इन्स्ट्रक्टर नाऊमोव मध्ये पडला.

चीफ ऑफ स्टाफचा चेहरा आणखीच लाल बनला. त्यांचे डोळे विस्फारले व त्यांचा श्वासोच्छ्वास जोरजोराने होऊ लागला.

"तुमच्या बोलण्याचा अर्थ काय? मला मूर्ख बनवू पाहता? इन्स्ट्रक्टर आत्ता जे काही बोलला ते खरं आहे?"

मेरेस्येवने होकारार्थी मान हलवली व नाशाच्या धोक्यानजीक असलेल्या आपल्या काठीकडे एक धास्तावलेला कटाक्ष टाकला. वासिली वासिल्येविच यांनी दिलेल्या ह्या भेटवस्तूपासून तो खरेच कधीही दूर राहिला नव्हता.

लेफ्टनंट-कर्नलनी त्या दोघांकडे संशयाने पाहिले व ते गरजले:

"ठीक... तसं असेल तर... पाय दाखव मला! ... अं... हं हं!"

प्रथम दर्जाचे प्रमाणपत्र मिळवून अलेक्सेई प्रशिक्षण विद्यालयातून बाहेर पडला. ते चिडके लेफ्टनंट-कर्नल, तो अनुभवी "हवाई लांडगा," इतर कुणाहीपेक्षा अधिक चांगल्या रीतीने मेरेस्येवची करामत जाणू शकत होता. कौतुकाचे शब्द वापरताना त्यांनी हात राखला नाही. मेरेस्येवला त्यांनी प्रमाणपत्र दिले की, "हवाई दलाच्या कोणत्याही सेवेमध्ये काम करण्यास हा कुशल, अनुभवी आणि निर्धारी वैमानिक सुयोग्य आहे."

१०

हिवाळ्याचा ऊर्वरित भाग आणि वसंताचा आरंभीचा काळ मेरेस्येवने सुधार विद्यालयात घालविला. हवाई दलाचे ते जुने प्रस्थापित विद्यालय होते. तेथील विमानतळ उत्तम होता, राहण्याची सोय सुरेख होती. तेथील क्लबाची इमारत सुंदर होती व तेथील रंगमंचावर काही वेळा मॉस्कोतील नाटक कंपन्यांचे प्रयोग होत असत. ह्या विद्यालयातही गर्दी दाटलेली होती, पण युद्धपूर्व नियमांचे अजूनही काटेकोर रीतीने पालन केले जात होते. प्रशिक्षार्थींना पोषाखामधील बारीक तपशीलही काळजीपूर्वक पहावा लागे, कारण जर बुटांना पॉलिश नसेल, कोटावरील एखादे बटण गहाळ झाले असेल, अथवा नकाशाची पेटी घाईत पट्ट्यावर लावली असेल, तर अपराध्याला कमांडंटच्या आज्ञेनुसार दोन तास कवायत करावी लागे.

अलेक्सेई मेरेस्येव वैमानिकांच्या एका मोठ्या गटात होता व हा गट "ला-५" नांवाच्या नव्या सोविएत लढाऊ विमानांना चालविण्याचा सराव करीत होता. प्रशिक्षण सर्वांगीण होते आणि विमानाच्या इंजिनांच्या व इतर भागांच्या अभ्यासाचा त्यात समावेश होता. सैन्यामधील आपल्या अनुपस्थितीच्या अल्प काळात सोविएत विमानविद्येने केलेली प्रचंड प्रगती पाहून व्याख्याने ऐकताना अलेक्सेई चकित होत असे. युद्धाच्या आरंभीच्या काळात जे धाडसी संशोधन मानले गेले होते ते आता अगदी कालबाह्य ठरले होते. युद्धाच्या सुरुवातीला वेगवान "पाकोळया" आणि उंचीवरून उडणारी "मिग" विमाने सर्वोत्तम मानली जात होती. पण आता त्यांना मोडीत काढून सोविएत विमानबांधणी कारखाने अत्यंत अल्प अवधीत नव्या प्रकारची विमाने महाप्रचंड संख्येने निर्माण करीत होते. अत्याधुनिक बनावटीची

"याक" विमाने, लोकप्रिय बनलेली "ला-५" आणि दोन माणसे बसू शकणारी "ईल्" यांचा त्यात समावेश होता. हे उडते रणगाडे जमिनीला अक्षरश: भादरून काढत होते; शत्रूच्या डोक्यावर बाँबचा, गोळ्यांचा आणि कुलपी गोळ्यांचा अक्षरश: पाऊस पाडत होते. घाबरलेल्या जर्मन फौजा ह्या विमानांना "काळा मृत्यू" ह्या नांवाने ओळखू लागल्या होत्या. लढवय्यां-मधील बुद्धिमान लोकांनी निर्माण केलेल्या नव्या विमानांमुळे हवाई लढाईची कला कमालीची अवघड बनली होती. वैमानिकाला केवळ विमानाचे ज्ञान असून व अदम्य धाडस असून भागत नव्हते, तर हवेमध्ये असताना चटकन स्वत:ची परिस्थिती जाणून घेण्याची क्षमता असणे आवश्यक ठरले होते; कुणाच्या हुकूमांची वाट न पाहता स्वतंत्रपणे हवाई झुंजीचे पृथक्करण करण्या-ची, झुंजीविषयी निर्णय घेण्याची आणि त्या निर्णयांना अंमलात आणण्याची क्षमता असणे आवश्यक ठरले होते.

हे सर्व खूप स्वारस्यपूर्ण होते. पण युद्धआघाडीवर प्रखर आक्रमक चढाई तीळमात्र शिथिल न होता चालू होती. चकचकीत प्रकाशमान, उंच छताच्या वर्गात बसून व्याख्याने ऐकणारा अलेक्सेई मेरेस्येव युद्धआघाडीवर जाण्या-साठी तळमळत होता. युद्धआघाडीवरील आयुष्य जगण्यासाठी आसुसला होता. शारीरिक वेदनेवर मात करायला तो शिकला होता. सकृत्‌दर्शनी अशक्य वाटणाऱ्या गोष्टी पार पाडण्यास त्याने स्वत:ला समर्थ बनविले होते. पण सक्तीच्या रिकामपणातून निर्माण होणाऱ्या कंटाळ्यावर मात करण्याचा निर्धार मात्र त्याच्या अंगी नव्हता. त्यामुळे काही वेळा आठवडेच्या आठवडे दुर्मुखलेपणाने, विमनस्कपणे आणि चिडक्या मन:स्थितीमध्ये तो विद्यालयात वावरायचा.

सुदैवाने अलेक्सेईची विद्यालयामध्ये मेजर स्त्रूच्कोवशी भेट झाली होती. जुन्या मित्रांप्रमाणे ते एकमेकांना भेटले. स्त्रूच्कोव अलेक्सेईनंतर सुमारे दोन आठवड्यांनी दाखल झाला होता. पण विद्यालयाच्या दैनंदिन जीवनक्रमात तो तात्काळ रमून गेला होता, युद्धकाळामध्ये अनाठायी वाटणाऱ्या तेथील अत्यंत कडक नियमांशी त्याने स्वत:ला जुळवून घेतले होते व प्रत्येकाशी छान मैत्री जमविली होती. अलेक्सेईच्या वाईट मन:स्थितीचे कारण त्याने चटकन जाणले होते. रात्रीच्या वेळी आंघोळी करून झोपायला जाताना तो गंमतीने अलेक्सेईच्या कुशीत ढोसायचा व म्हणायचा:

"मित्रा, कुढू नकोस! आपल्यासाठी अजून भरपूर लढाई बाकी आहे.

बर्लिनपासून आपण किती तरी दूर आहोत ! खूप खूप अंतर काटायचं आहे. काळजी करू नको, आपला वाटा आपल्याला नक्की मिळेल. लढायची आपली हौस मनःपूत पुरी होईल."

त्या दोघांची भेट घडली नव्हती त्या मध्यंतरीच्या दोन-तीन महिन्यांमध्ये मेजर खूपच बारीक व वयस्क झाला होता. सैन्यामधील माणसांच्या परिभाषेत म्हणजे तो "मोडलेला" दिसत होता :

मेरेस्येव आणि स्त्रूच्कोव ज्या गटात होते त्या गटाने हिवाळ्याच्या मध्यास उड्डाणांचा सराव सुरू केला. एव्हाना "ला-५" विमानाची अलेक्सेईला चांगलीच ओळख झाली होती. हे छोटे, आखूड पंखांचे विमान उडत्या माशाच्या आकाराचे होते. मधल्या सुटीच्या वेळात अलेक्सेई अनेकदा धावपट्टीवर जायचा आणि थोडके अंतर धावून चटकन आकाशात झेपावणाऱ्या ह्या विमानांना निरखत रहायचा. सूर्यप्रकाशात चमकणारी त्यांची निळसर पोटे पहायचा. विमानतळावर उभ्या असलेल्या एखाद्या विमानापाशी जायचा, त्याची पाहणी करायचा व त्याचे पंख कुरवाळायचा, त्याच्या बगलेवर थोपटायचा. जणू ते विमान नव्हते, एक देखणा, छान पोसलेला, जातिवंत घोडा होता, अशा रीतीने तो वागायचा. सरतेशेवटी त्या गटाला उड्डाणासाठी एका ओळीत उभे करण्यात आले. प्रत्येक माणूस आपले कसब जोखण्यास उत्सुक बनला होता. प्रथम कुणी उड्डाण करायचे याबद्दल त्यांच्यात वितंडवाद सुरू झाला. इन्स्ट्रक्टरने प्रथम स्त्रूच्कोवला बोलाविले. मेजरचे डोळे चमकले. जाणल्याप्रमाणे त्याने स्मित केले. आपले पॅराशूटचे पट्टे बांधताना आणि कॉकपिटवरील झाकण ओढून घेताना तो मजेने शीळ घालत होता.

इंजिनाचा घरघराट झाला. धावपट्टीवरून विमान धावू लागले. त्याच्या पाठोपाठ हिमाची भुकटी उधळली आणि उन्हात तिचे इंद्रधनुष्यी रंग चमकले. दुसऱ्याच क्षणी विमान आकाशात झेपावले. सूर्यप्रकाशात त्याचे पंख चकचकत होते. स्त्रूच्कोवने विमानतळावर छोटे वळण घेतले. हवाई कसरतीचे नेमून दिलेले सर्व कार्यक्रम त्याने सुबकपणे पार पाडले. मग तो दृष्टीआड झाला आणि एकदम विद्यालयाच्या इमारतीच्या छपरावरून रोरावत खाली आला. धावपट्टीवर उभ्या असलेल्या प्रशिक्षार्थींच्या टोप्या अक्षरशः उडवून तो परत वर झेपावला. अत्यंत कुशलपणे त्याने विमान खाली उतरविले. एखाद्या मुलाने गंमतीदार खोडी केल्यानंतर वागावे तशा मजेने तो कॉकपिटमधून उडी मारून खाली उतरला.

--





"अरे हे विमान म्हणजे अक्षरशः व्हायोलिन आहे! खरंच!" क्षणाची उसंत न घेता तो ओरडला. त्याच्या बेदरकारपणाबद्दल त्याची खरडपट्टी घेणाऱ्या इन्स्ट्रक्टरचे बोलणे अर्ध्यावरच तोडत तो म्हणाला: "तुम्ही याच्यावर चैकोवस्कीची धुन वाजवू शकाल!" मेरेस्येवभोवती आपल्या बळकट बाहूंचा विळखा घालत तो उद्गारला: "आल्योशा! जिवंत असणं किती छान आहे!"

ते यान खरोखरीच सुरेख होते. प्रत्येकाचे त्यावर एकमत होते. मेरेस्येवची पाळी आली. पावंड्यांना आपले पाय बांधून तो हवेत वर गेला आणि त्याला एकदम जाणवले की, त्याच्यासारख्या पाय नसलेल्या स्वाराला हा घोडा फारच पाणीदार होता. त्याला अधिक काळजीपूर्वक हाताळणे भाग होते. विमान आकाशात चढले तेव्हा उड्डाणाच्या आनंदाला निर्माण करणारा यंत्राशी पूर्ण सुसंवाद त्याला जाणवला नाही. ते अत्यंत सुंदर बनावटीचे विमान होते. सुकाणूच्या चाकावरील हाताच्या प्रत्येक हालचालीला, प्रत्येक कंपनाला ते प्रतिसाद देत होते व तात्काळ अनुषंगिक वागत होते. खरोखरीच उत्तम स्वर लावलेल्या एखाद्या व्हायोलिनप्रमाणे त्याचा प्रतिसाद होता. या ठिकाणी मात्र अलेक्सेईला आपल्या कधीही भरून न येणाऱ्या हानीची तीव्रतेने जाणीव झाली; आपल्या कृत्रिम पायांच्या प्रतिसाद देण्याच्या अक्षमतेची जाणीव झाली. अशा विमानामध्ये सजीव, संवेदनाक्षम, लवचिक पायांच्या जागी कोणतेही सर्वोत्तम प्रशिक्षित, सर्वोत्तम कृत्रिम पाय उपयोगी पडणार नव्हते.

हवेमधून विमान सहजपणे आणि लवचिकपणे मार्गक्रमण करीत होते. सुकाणूच्या चाकाच्या प्रत्येक हालचालीला उत्तर देत होते. पण अलेक्सेईला त्याची भीती वाटत होती. त्याच्या ध्यानात आले की, दिशा बदलताना त्याचे पाय दिरंगाई करीत होते. स्वाभाविक प्रतिक्षिप्त क्रिया घडत नव्हती. सुसंवाद घडत नव्हता. त्या दिरंगाईपायी विमानाने गोता खाण्याची शक्यता होती व तसे होणे प्राणघातक ठरले असते. एखाद्या लंगड्या घोड्याप्रमाणे अलेक्सेईला वाटत होते. तो भेकड नव्हता. ठार होण्याची त्याला धास्ती वाटत नव्हती. आपली हवाई छत्री नीट चालते अथवा नाही ह्याची खात्रीही न करता त्याने उड्डाण केले होते. पण त्याच्याकडून किंचित घोटाळा झाला तर लढाऊ कमांडमधून त्याची हकालपट्टी झाली असती आणि त्याच्या प्रिय व्यवसायाची दारे त्याला कायमची घट्ट बंद झाली असती. ह्याची मात्र त्याला फार भीती वाटत होती. विमान खाली आणताना तो दुप्पट सावध

वागला होता आणि फार अस्वस्थ होता. त्याच्या पायांनी नीट प्रतिसाद न दिल्यामुळे तो अत्यंत वाईट रीतीने जमिनीवर टेकला व त्याच्या विमानाने बर्फावर अनेक वेळा वेडेवाकडे गचके खाल्ले.

अत्यंत मुकाटपणे व कपाळाला आठ्या घालून अलेक्सेई कॉकपिटमधून खाली उतरला. त्याच्या साथीदारांनी व इन्स्ट्रक्टरनेसुद्धा आपले शरमिंदेपण लपवून त्याचे कौतुक केले. पण त्यांच्या अशा वागण्यामुळे अलेक्सेईला अधिकच अपमानित वाटले. त्याने हाताने त्यांना बाजूला सारले व आपले पाय फरफटत, दुडक्या चालीने तो शाळेच्या राखी इमारतीकडे लंगडत निघून गेला. लढाऊ विमानात बसल्यानंतर अपयशी ठरायचे! त्या एप्रिलमधील सकाळी त्याचे मोडके विमान देवदारांच्या शेंड्यांना आपटल्यानंतर त्याच्यावर कोसळलेली ही सर्वांत वाईट आपत्ती होती. तो दुपारी जेवायला गेला नाही. संध्याकाळच्या जेवणालाही गेला नाही. दिवसाच्या वेळी प्रशिक्षार्थींनी वसतीगृहात रहायचे नाही असा विद्यालयाचा कडक नियम होता. पण तो धुडकावून लावून अलेक्सेई आपल्या बिछान्यात पायातील बुटांसह स्वस्थ पडून राहिला. तेथून जाणाऱ्या-येणाऱ्या कुणाही ऑर्डर्लीला अथवा अंमलदाराला त्याच्या दुःखाची कल्पना नव्हती. त्यामुळे प्रत्येकजण अलेक्सेईला बिछान्यात लोळण्याबद्दल हटकत होता. स्त्रूक्कोव खोलीत डोकावला आणि त्याने अलेक्सेईशी बोलण्याचा प्रयत्न केला. पण त्याला उत्तर मिळेना तेव्हा खेदाने मान हलवीत तो तेथून निघून गेला.

स्त्रूक्कोव खोलीतून निघून गेला न गेला तोच विद्यालयाचा राजकीय अधिकारी लेफ्टनंट-कर्नल कापूस्तीन आत आला. हा बुटका, जाड भिंगांचा चष्मा लावणारा बेडौल प्राणी त्याच्या ढगळ गणवेषात एखाद्या पोत्यात अडकविल्यासारखा दिसायचा. पण आंतरराष्ट्रीय समस्यांवरची त्याची व्याख्याने प्रशिक्षार्थींना खूप आवडत. ह्या महान युद्धात आपण सहभागी आहोत याबद्दल त्यांच्या मनात अभिमानाची भावना हा वेडावाकडा दिसणारा माणूस निर्माण करायचा. मात्र कुणीही त्याला अंमलदार मानीत नसे. योगायोगाने हवाई दलात आलेला तो एक नागरी माणूस होता आणि विमानविद्येची त्याला काहीही माहिती नव्हती अशी सर्वांची धारणा होती. मेरेस्येवकडे लक्ष न देता कापूस्तीनने खोलीभर नजर फिरविली, हवा नाकाने हुंगली आणि एकदम रागाने तो उद्‌गारला :

"कोण इथं धूम्रपान करीत होता? धूम्रपानासाठी वेगळी खोली आहे! कॉम्रेड सीनियर लेफ्टनंट, ह्याचा अर्थ काय?"

"मी धूम्रपान करत नाही," बिछान्यावर तसेच आडवे पडून रहात अलेक्सेई बेफिकीरपणे उत्तरला.

"तिथं लोळत का पडलाय? नियम ठाऊक नाहीत? वरिष्ठ अधिकारी आत आल्यावर उठत का नाही? उभे रहा!"

ही आज्ञा नव्हती. उलट एखादी नागरी व्यक्ती ज्या सभ्यपणे बोलेल त्या रीतीने ते शब्द उच्चारले होते. पण मेरेस्येवने विमनस्कपणे आज्ञापालन केले व कॉटशेजारी तो दक्ष पवित्र्यात उभा राहिला.

"हे ठीक झालं," कापूस्तीन शाबासकीच्या स्वरात म्हणाला. "आता खाली बसा आणि आपण बोलू या."

"कशाबद्दल?"

"तुमच्याबद्दल. चला, बाहेर जाऊ. मला धूम्रपान करावंसं वाटतंय आणि इथं तर त्याला परवानगी नाही."

अंधुक प्रकाशित कॉरीडॉरमध्ये ते बाहेर गेले. प्रकाशबंदीसाठी विजेच्या दिव्यांना निळा रंग देण्यात आला होता. एका खिडकीपाशी ते उभे राहिले. कापूस्तीन पाईप फुंकीत होता. प्रत्येक झुरक्याच्या वेळी पेटलेल्या तंबाखूच्या उजेडात त्याचा रुंद, विचारी चेहरा उजळून उठत होता.

"तुमच्या इन्स्ट्रक्टरला आज ताकीद द्यायचा माझा इरादा आहे," तो म्हणाला.

"कशाबद्दल?"

"त्याच्या वरिष्ठांकडून आधी परवानगी न घेता तुम्हाला "क्षेत्रात" जाऊ दिल्याबद्दल... असं माझ्याकडं रोखून काय पाहताय? खरं म्हणजे तुमच्याशी आधी चर्चा न केल्याबद्दल मलाच ताकीद मिळाली पाहिजे. मला कधीच वेळ नसतो. सारखा कामात गुंतलेला. माझा इरादा होता, पण... जाऊ दे! हे पहा मेरेस्येव, विमान चालवणं तुम्हाला काही सोपं नाही आणि म्हणून मी तुमच्या इन्स्ट्रक्टरची चांगली हजरी घेणार आहे."

अलेक्सेई काहीही बोलला नाही. हा पाईप फुंकणारा माणूस कोणत्या प्रकारचा होता याबद्दल तो मनाशी नवल करीत होता. विद्यालयाच्या मैदानात अघटित घटना घडल्याबद्दलची वार्ता त्याला न कळवून त्याच्या अधिकाराचा उपमर्द केल्याबद्दल चिडलेला एक नोकरशहा? शारीरिक व्यंग्य

असलेल्या लोकांना विमान उडविण्यास मनाई करणारे कलम हुडकून काढलेला एक किरकोळ अंमलदार? अथवा आपल्या अधिकाराच्या प्रदर्शनाची संधी घेणारा विक्षिप्त? त्याला काय पाहिजे होते? मेरेस्येव आधीच अंतःकरणाने व्यथित झाला होता, गळफास लावून आत्महत्या करण्याचे विचार त्याच्या मनात येत होते आणि अशा वेळी हा इसम तिथे कशाला टपकला होता?

ह्या माणसाला लाथ मारून बाहेर हाकलावे अशी मेरेस्येवला जबरदस्त ऊर्मी आली, पण त्याने मोठ्या कष्टाने स्वतःला आवरून धरले. अनेक महिने यातना सोसल्यानंतर तो एवढे शिकला होता की, घाईघाईने कोणतेही निष्कर्ष काढणे योग्य नव्हते. ह्या बेडौल कापूस्तीनमध्ये असे काहीतरी होते, की मेरेस्येव ज्यांना अस्सल माणूस म्हणत होता त्या कमिस्सार वोरोब्योव यांची पुसटशी आठवण त्याला होत होती. कापूस्तीनच्या पाईपमधला उजेड पेटला आणि मावळला. निळसर अंधारामधून त्याचा रुंद चेहरा, गुबगुबीत नाक व धूर्त, तीक्ष्ण डोळे चमकले आणि परत नाहीसे झाले. कापूस्तीन पुढे म्हणाला:

"ऐका मेरेस्येव. तुमची स्तुती करायची माझी मुळीच इच्छा नाही, पण लढाऊ विमान हाताळणारे जगातले तुम्ही एकमेव पांगळे वैमानिक आहात हे मात्र खरं!" त्याने आपल्या पाईपचा दांडा सुटा केला, विजेच्या अंधुक प्रकाशात त्याला निरखून पाहिले व गोंधळून मान हलविली. "लढाऊ तुकडीत जाण्याची इच्छा धरणाऱ्या तुमच्याविषयी मी बोलत नाही. तशी इच्छा असणं कौतुकास्पद आहे, पण त्यात विशेष असं काहीच नाही. अशा क्षणाला विजय साध्य करण्यासाठी प्रत्येकालाच प्रयत्नांची शर्थ करावीशी वाटतेय... छी:! काय झालं बरं ह्या भिकार पाईपला?"

कापूस्तीनने परत एकदा पाईपचा दांडा स्वच्छ करायला आरंभ केला. त्या कामात तो पूर्ण गर्क झाल्याचे दिसले. पण पुढे काहीतरी विशेष घडणार याची अलेक्सेईला अस्पष्ट जाणीव झाली. आता कापूस्तीन पुढे काय बोलणार हे ऐकायला तो आतुर बनला. आपल्या पाईपशी खटपट करीत कापूस्तीन पुढे बोलत राहिला. आपले शब्द अलेक्सेईवर काय परिणाम करतात ते पाहण्याची त्याला फारशी फिकीर नव्हती असे भासले.

"ही काही सीनियर लेफ्टनंट अलेक्सेई मेरेस्येव यांची वैयक्तिक बाब नाही. मुद्दा असा आहे की, फक्त निर्दोष प्रकृतीच्या आणि अव्यंग्य शरीराच्या माणसाला, तेसुद्धा शंभरात एखाद्याला, जे कसब साध्य करता येईल

अशी तमाम जगाची आजपर्यंत कल्पना होती ते कसब तुमच्यासारख्या पाय नसलेल्या माणसानं साध्य केलंय! तुम्ही केवळ एक मेरेस्येव नांवाचे नागरीक नाही... तुम्ही एक महान प्रयोग करणारे आहात!.. अरे वा! अखेर नीट झाला पाईप! काहीतरी अडकलं असावं मध्ये... तर मला असं म्हणायचंय की, एक सामान्य वैमानिक म्हणून तुम्हाला वागवण्याचा आम्हाला अधिकार नाही. अगदी मुळीच हक्क नाही! समजलं? तुम्ही एक महत्त्वाचा प्रयोग सुरू केलाय आणि तुम्हाला हरतऱ्हेनं मदत करणं हे आमचं कर्तव्य आहे. पण ती मदत कशा प्रकारं करायची? ते तुम्हीच आम्हाला सांगा! तुम्हाला मदत व्हावी म्हणून आम्ही काय करू?"

कापूस्तीनने पुन्हा आपला पाईप भरला आणि पेटविला. पाईपचा उजेड चमकला आणि विझला. त्याचा रुंद चेहरा आणि गुबगुबीत नाक अंधारात क्षणभर चमकले आणि नाहीसे झाले.

मेरेस्येवला जादा उड्डाणे द्यावीत अशी व्यवस्था विद्यालयाच्या प्रमुखांना सांगून करण्याचे त्याने आश्वासन दिले. अलेक्सेईने स्वतःचा प्रशिक्षणाचा कार्यक्रम आखावा असे त्याने सुचविले.

"पण त्यासाठी खूप इंधन खर्च होणार!" खेदाने अलेक्सेई म्हणाला. ह्या बुटक्या, बेडौल माणसाने त्याचे सर्व संशय चुटकीसरशी नाहीसे केल्यामुळे अलेक्सेई चकित झाला होता.

"इंधन महत्त्वाचं आहे हे खरं आणि सध्या तर विशेषच! आम्ही अगदी थेंबा-थेंबानं मोजून-मापून देतोय! पण इंधनापेक्षाही काही गोष्टी जास्त मोलाच्या आहेत," कापूस्तीन उत्तरला आणि आपल्या पाईपमधील गरम राख त्याने काळजीपूर्वक आपल्या टाचांवर आपटून झाडली.

दुसऱ्या दिवसापासून मेरेस्येवने एकटयाने सराव सुरू केला. चालायला, धावायला आणि नाचायला शिकतानाची चिकाटी तर त्याच्यापाशी होतीच, पण यावेळी एक झपाटलेपण त्याच्यात संचारले होते. उड्डाणाच्या तंत्राचे विश्लेषण करण्याचा, प्रत्येक तपशीलाचा अभ्यास करण्याचा, अत्यंत सूक्ष्मातिसूक्ष्म हालचालींमध्ये त्याची विभागणी करण्याचा व प्रत्येक हालचाल स्वतंत्रपणे आत्मसात करण्याचा त्याने प्रयत्न केला. आपल्या यौवनात त्याने जे सहजगत्या आत्मसात केले होते ते आता तो अभ्यासाने अवगत करू लागला. पूर्वी जे सरावाने आणि सवयीने त्याने मिळविले होते ते आता बुद्धीने तो साध्य करू लागला. विमान हाताळण्याच्या प्रक्रियेची त्याने मनाने

विभागणी केली व त्या प्रत्येक मूलभूत भागाला हाताळण्याची कला अवगत करून पायांच्या सर्व कार्यशील संवेदना त्याने आपल्या नडगींमध्ये आणल्या.

हे अत्यंत कठीण आणि कष्टाचे काम होते. त्याच्या फलश्रुती एवढ्या छोट्या होत्या, की त्या नीटशा दिसतही नसत. तरीही, प्रत्येक उड्डाणाबरोबर अलेक्सेईला जाणवत होते की, विमानाशी तो अधिकाधिक एकरूप होत होता. विमान त्याचे अधिकाधिक ऐकू लागले होते.

"कसं काय चाललंय?" त्याची भेट झाली तेव्हा कापूस्तीनने विचारले.

उत्तरादाखल मेरेस्येवने आपला अंगठा उचलून दाखविला. त्याने अतिशयोक्ती केली नव्हती. त्याची प्रगती कदाचित मंद होती, पण ती निश्चित होती. तगड्या घोड्यावर बसलेल्या दुबळ्या स्वाराप्रमाणे आता त्याला विमानात वाटत नव्हते ही फार महत्त्वाची बाब होती. आपल्या कौशल्याबाबतचा त्याचा आत्मविश्वास त्याच्याकडे परतला होता. विमान चालविताना आता ते जाणवत होते व चांगल्या स्वाराची आपल्यावर मांड आहे असे अनुभवणाऱ्या घोड्याप्रमाणे विमान अधिक आज्ञाधारक बनत होते. हळू हळू विमानाच्या सर्व खुब्या अलेक्सेईला माहीत होत होत्या.

११

फार फार पूर्वी, आपल्या बालपणी, अलेक्सेई बर्फावर स्केटिंग करायला शिकला होता. जेथे तो रहात होता तेथे वोल्गा नदीच्या खाडीत पारदर्शी बर्फ हिवाळ्याच्या आरंभी जमायचा व त्या नव्या, ताज्या बर्फावर अलेक्सेई स्केटिंग करायचा. प्रत्यक्षात त्याच्यापाशी स्केटची जोडी नव्हती. त्याला स्केट विकत घेऊन देण्याची त्याच्या आईची ऐपत नव्हती. पण ज्या लोहाराकडे त्याची आई कपडे धुण्याचे काम करीत होती त्या लोहाराने तिच्या विनंतीवरून अलेक्सेईला दोन छोट्या लाकडी ठोकळ्यांचे स्केट बनवून दिले होते.

दोरीच्या आणि लाकडाच्या तुकड्यांच्या साहाय्याने हे ठोकळे अलेक्सेईने आपल्या जुन्या, ठिगळे जोडलेल्या नमदी बुटांना बांधले. मग तो नदीवर गेला. तेथील पातळ, निसरडा बर्फ मधुरपणे कडकड आवाज करीत फुटत होता. कामीशिन गावाच्या आसपासची सगळी मुले तेथे आनंदाने बागडत,

एकमेकांशी स्पर्धा लावीत, बर्फावर उड्या मारीत नाचत होती. त्यांच्या कसरती बघताना सोप्या वाटत, पण ज्या क्षणी अलेक्सेईने बर्फावर पाय ठेवला त्या क्षणाला तो बर्फ पायांखालून निसटतोय असे त्याला भासले व तो धाडदिशी पाठीवर खाली पडला. मोठ्या गडबडीने तो परत उठून उभा राहिला. आपल्याला दुखापत झालेली आपल्या खेळगड्यांनी पाहू नये असे त्याला वाटले. तो पुन्हा स्केटिंग करण्याचा प्रयत्न करू लागला. पाठीवर उताणे पडू नये म्हणून त्याने आपले शरीर पुढे झुकवले, पण ह्यावेळी तो नाकावर आपटला. पुन्हा उडी मारून उठून तो उभा राहिला. आपल्या थरथरत्या पायांना सावरीत आपले काय चुकले त्याचा विचार त्याने केला व इतर मुले कशी स्केट करतात ते लक्षपूर्वक पाहिले. आता त्याला एवढे समजले की, आपले शरीर जास्त मागे अथवा पुढे झुकवायचे नाही. शरीर ताठ राखून त्याने काही तिरपी पावले टाकली. ह्यावेळी तो कुशीवर पडला. अशा रीतीने थेट सूर्यास्तापर्यंत त्याचे पडणे-उठणे चालले होते. तो घरी परतला तेव्हा त्याचे शरीर बर्फाने माखून निघाले होते व थकव्यामुळे पाय थरथर कापत होते. त्याचा हा अवतार पाहून त्याची आई त्याच्यावर खूप चिडली होती.

पण दुसऱ्या दिवशी सकाळी त्याची स्वारी परत बर्फावर हजर झाली. आता तो अधिक विश्वासपूर्वक हालचाली करीत होता, वारंवार पडत नव्हता. थोडे धावून अनेक मीटरपर्यंत घसरू शकत होता. पण संध्याकाळपर्यंत प्रयत्न करूनही त्याची त्याहून जास्त प्रगती घडली नव्हती.

एके दिवशी मात्र योगायोगाने त्याने अशी एक हालचाल केली, की प्रत्येक फेरीबरोबर तो अधिक वेगाने व विश्वासपूर्वक घसरत राहिला. तो कडाक्याच्या थंडीचा, हिमवादळी दिवस अलेक्सेई कधीही विसरला नव्हता. चकचकीत बर्फावर वाऱ्यांमुळे हिमाची भुकटी उधळत होती. आपल्या यशाचे अलेक्सेईला स्वतःलाच आश्चर्य वाटले. खाली पडताना आणि स्वतःला दुखापती करून घेताना, पुनःपुन्हा प्रयत्न करताना, नकळतपणे त्याने जो अनुभव गोळा केला होता तो त्याच्या उपयोगी आला होता. त्याने आत्मसात केलेल्या छोट्या लकबी आणि सवयी त्या अनुभवात मिसळून अचानक त्याला स्केटिंगची विद्या अवगत झाली होती. पायांच्या आणि पावलांच्या योग्य हालचाली करून स्केटिंगचा मनमुराद आनंद तो उपभोगू लागला होता.

आत्तासुद्धा त्याचे तसेच झाले. मोठ्या चिकाटीने त्याने अनेकवार उड्डाणे केली. विमानांच्या यंत्राशी एकरूप होण्याचा पुन्हा प्रयत्न केला. आपल्या कृत्रिम पायांच्या धातूमधून आणि कातड्यामधून त्या विमानाला अनुभवण्याचा यत्न केला. आपल्याला त्यात यश लाभतेय असे काही वेळा त्याला वाटले व त्याचा त्याला प्रचंड आनंद झाला. त्याने एक साहस करून पाहिले. पण तात्काळ त्याला जाणवले की, त्याच्या हालचालीत आत्मविश्वासाचा अभाव होता. विमान त्याच्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करतेय असे वाटले. मावळत्या आशेचा कडवटपणा गिळून त्याने पुन्हा रटाळ सरावाचा मार्ग अनुसरला.

मार्च महिन्यातील एक सकाळ. बर्फ वितळत होता. विमानाची धावपट्टी एकदम काळी दिसू लागली होती व झिरपणारा बर्फ एवढा आकसला होता की, विमानांच्या त्याच्यावर ठळक रेघा उमटत होत्या. अलेक्सेई आपले लढाऊ विमान घेऊन हवेत चढला. एका बाजूने वाहणारा सोसाट्याचा वारा त्याच्या विमानाला सतत मार्गापासून बाजूला ढकलत होता व विमानाची दिशा योग्य राखणे अलेक्सेईला भाग पडत होते. विमानाला योग्य मार्गावर आणत असता अचानक त्याला जाणवले की, विमान आज्ञाधारक बनले होते, सर्वांगाने तो त्याला जाणवू शकत होता. ही भावना विजेसारखी चमकून गेली आणि आरंभी तिच्यावर त्याचा विश्वास बसेना. आजवर त्याने एवढी निराशा अनुभवली होती की, आपल्या सुदैवावर त्याचा एकदम विश्वास बसेना.

त्याने उजवीकडे जोरदार वळण घेतले. विमान आज्ञाधारकपणे आणि अचूकपणे वागत होते. लहानपणी वोल्गाच्या त्या छोट्या खाडीत स्केटिंग शिकताना त्या काळसर, चुरचुरीत बर्फावर त्याला जे वाटले होते, तेच नेमके आत्ता त्याला वाटले. रटाळ दिवस अचानक तेजस्वी भासला. आनंदाने त्याचे काळीज धडधडू लागले. भावनातिरेकाने गळा दाटल्याचे त्याला जाणवले.

एका विशिष्ट अदृश्य रेषेला त्याच्या प्रशिक्षणामधील प्रयत्नांची संपूर्ण फलश्रुती कसोटीला लागली होती. ती रेषा त्याने ओलांडली होती व खडतर कष्टांच्या त्या असंख्य दिवसांची गोमटी फळे आता तो सहजपणे आणि कोणत्याही ताणाविना चाखत होता. प्रदीर्घ काळपर्यंत यश न लाभलेली मुख्य गोष्ट त्याने साध्य केली होती. आपल्या विमानाशी तो एकरूप झाला होता.

ते विमान म्हणजे त्याला आपल्याच शरीराचा एक भाग वाटू लागले होते. ह्या जाणीवेत त्याच्या संवेदनारहित आणि ताठर कृत्रिम पायांनीसुद्धा अडथळा आणला नाही. आनंदाच्या असीम ऊर्मी अनुभवीत त्याने अनेकदा विमान डावी-उजवीकडे वळविले, एक कोलांटी घेतली व जोराने गिरक्या मारायला आरंभ केला. जमीन जोरजोराने गरगरू लागली, कर्कश्य शिटी वाजल्यासारखा आवाज ऐकू येऊ लागला. विमानतळाची धावपट्टी, विद्यालयाची इमारत, हवामानकेंद्राचा मनोरा—ह्या सर्व गोष्टी एका सतत फिरणाऱ्या चक्रात मिसळल्या. मोठ्या आत्मविश्वासाने त्याने विमानाला ह्या गिरक्यांमधून बाहेर काढले आणि आणखी एक कोलांटी घेतली. तेव्हा कुठे त्याला प्रसिद्ध "ला-५" विमानाच्या सर्व ज्ञात-अज्ञात गुणांचा थांग लागला. अनुभवी हातांमध्ये ते विमान म्हणजे सोने होते! स्टीअरिंग गीअरच्या प्रत्येक हालचालीला ते तत्परतेने प्रतिसाद देत होते, अत्यंत गुंतागुंतीच्या कसरती सहजतेने पार पाडत होते व एखाद्या अग्निबाणाप्रमाणे चपखलतेने आणि वेगाने सूर मारत होते.

मेरेस्येव कॉकपिटमधून बाहेर पडला तेव्हा झिंगलेल्या माणसाप्रमाणे त्याच्या झोकांड्या जात होत्या. त्याच्या चेहऱ्यावर वेडसर स्मित पसरले होते. चिडलेला इन्स्ट्रक्टर त्याला दिसला नाही, त्याची संतापी बडबड त्याला ऐकू आली नाही. खुशाल बोंबलू दे! कोठडीत बसवील? ठीक. कोठडीत बसायची शिक्षा भोगायला आता तो तयार होता. काय फरक पडणार होता? एक गोष्ट स्पष्ट झाली होती: तो वैमानिक होता! एक चांगला वैमानिक होता!! त्याच्या प्रशिक्षणासाठी खर्च झालेले जादा इंधन वाया गेले नव्हते. त्याची शंभरपटींनी परतफेड करायला तो तयार होता. मात्र त्यांनी त्याला युद्धआघाडीवर जाऊ द्यायला हवे होते!

त्याच्या खोलीवर आणखी एक सुखद आश्चर्य त्याची वाट पहात होते: ग्वोझ्देवचे पत्र त्याच्या उशीवर पडले होते. ते पत्र ह्या ठिकाणापर्यंत येऊन पोहोचेपर्यंत कोठे, किती वेळ आणि कुणा-कुणाच्या खिशामधून फिरले होते ते सांगणे कठीण होते. कारण लिफाफा चुरगळलेला होता, त्याच्यावर घाणीचे आणि तेलाचे डाग पडलेले होते. आन्यूताच्या सुवाक्षरातील परशागध्ये व्यवस्थित बंद केलेल्या लिफाफ्यात ग्वोझ्देवचे पत्र होते.

रणगाडाचालकाने त्याला कळविले होते की, एक वाईट गोष्ट घडली

होती. एका जर्मन विमानाच्या पंख्यामुळे त्याच्या डोक्याला जखम झाली होती. सध्या तो कोअरच्या इस्पितळात होता, पण एक-दोन दिवसात त्याची तेथून मुक्तता व्हायची होती. ती विलक्षण घटना अशी घडली होती: सहाव्या जर्मन सेनेला स्तालिनग्रादपासून तोडल्यानंतर, ग्वोझ्देव ज्या रणगाडा तुकडीत होता त्या तुकडीने माघार घेणाऱ्या जर्मनांची फळी फोडली व स्तेपमधून थेट जर्मन पिछाडी गाठली. त्या हल्ल्याचे नेतृत्व ग्वोझ्देवकडे होते.

रणगाड्यांची ती धाड मस्त होती! ती पोलादी धूडे जर्मनांच्या पिछाडीवर अचानक चालून गेली होती. कडक बंदोबस्ताच्या खेड्यांना आणि रेल्वे जंक्शनांना ओलांडून! रणगाड्यांनी रस्त्या-रस्त्यामधून हल्ले चढविले. वाटेत आडव्या येणाऱ्या जर्मनांना गोळ्या घालून मारले आणि चिरडले. जर्मन शिबंदीचे उरलेले लोक पळून गेले तेव्हा रणगाड्यांनी आणि त्यांच्यावरोबर गेलेल्या चिलखती पायदळाने शत्रूचे दारूगोळ्याचे साठे व पूल उडवून दिले, रेल्वेच्या यंत्रणेची नासधूस केली. अशा प्रकारे माघार घेणाऱ्या जर्मनांच्या आगगाड्यांचा मार्ग अडविला. जर्मन सैनिक भानावर येण्याच्या आत त्यांनी रणगाड्यांमध्ये भरपूर इंधन भरून घेतले, शत्रूच्या रसदीमधून खाद्यपदार्थ उचलून घेतले. रणगाडे कोणत्या दिशेने पुढे जातील याचा जर्मनांनी तर्क बांधायच्या आत त्यांनी पुढची चाल सुरू केली.

"आल्योशा, बुद्योन्नीच्या घोडदळासारखे आम्ही स्तेपमधून भरधाव निघालो होतो! त्या फॅसिस्टांची आम्ही दाणादाण उडवली. तुझा विश्वास बसणार नाही, पण काही वेळा तीन रणगाडे आणि काबीज केलेली एक चिलखती गाडी यांच्या साहाय्याने सबंध खेडीच्या खेडी व रसदीचे तळ आम्ही जिंकून घेतले. युद्धात घबराट माजवणे ही फार मोठी गोष्ट आहे. शत्रूमध्ये छान घबराट माजवणे हे आख्ख्या दोन डिव्हिजन सेनेच्या हल्ल्याच्या ताकदीएवढे आहे. मात्र शेकोटीप्रमाणे ती घबराट काळजीपूर्वक राखली पाहिजे. ती विझू नये म्हणून अनपेक्षित दणक्यांचे इंधन सारखे घातले पाहिजे. जर्मन चिलखती सेनेला आम्ही थेट फाडत गेलो. आतमध्ये सगळा कुजका आणि फुसका मामला आढळला! चीज कापावे तितक्या सहजपणे आम्ही त्यांना कापत गेलो.

"...आणि माझ्या बाबतीत ही मूर्ख घटना अशी घडली. प्रमुखाने आम्हा सर्वांना एकत्र बोलावले आणि सांगितले की, टेहळणी करणाऱ्या

एका विमानाने त्याला निरोप टाकला होता: अमूक अमूक ठिकाणी एक मोठा विमानतळ होता. सुमारे तीनशे विमाने, इंधन आणि रसद. आपल्या तांबूस-पिंगट मिशा पिळत तो म्हणाला: 'ग्वोझ्देव, आज रात्री त्या विमान-तळावर जा. मात्र गुपचूप जा. एकही गोळी न झाडता. जणू काही तुम्ही जर्मन आहात असे! आणि विमानतळाच्या जवळ पोचलात म्हणजे उडवा धूमधडाका, माजवा एकच हलकल्लोळ! एकाही हरामखोराला सोडू नका'. माझ्या लोकांवर आणि आणखी एका बटालियनवर ही कामगिरी सोपवण्यात आली. त्या दुसऱ्या बटालियनचे नेतृत्वही माझ्याकडे देण्यात आले होते. बाकी रणगाडे रोस्तोवच्या दिशेने गेले.

"तर कोंबडयांच्या खुराडयात कोल्हा चुपचाप घुसतो तसे आम्ही विमान-तळावर पोहोचलो. आल्योशा, तुझा विश्वास बसणार नाही, पण तळावरच्या जर्मन वाहतूक नियंत्रकांपर्यंत आम्ही थेट पोचलो. कुणीही आम्हाला अडवले नाही. धुके दाटले होते, त्यामुळे आम्हाला ते पाहू शकले नाही. फक्त इंजिनांचा आवाज आणि साखळयांचा खडखडाट ऐकू येत होता. आम्ही जर्मन आहोत असे त्यांना वाटले. मग आम्ही त्यांच्यावर हल्ला चढवला. आल्योशा, काय धमाल आली! विमाने रांगांनी उभी होती. चिलखतभेदी तोफगोळे आम्ही मारले आणि एकेका गोळयाने किमान सहा-सहा विमाने खतम केली. पण अशा रीतीने कामगिरी पूर्ण करणे शक्य नव्हते असे आम्हाला दिसले. कारण काही धाडसी वैमानिकांनी इंजिने सुरू केली होती. तेव्हा आम्ही रणगाडयांच्या झडपा बंद केल्या आणि विमानांच्या शेपटयांवर धडका मारायला आरंभ केला. ती प्रचंड आकाराची वाहतूक-विमाने होती. त्यांच्या इंजिनांपर्यंत आमच्या धडकांचा पल्ला पोहचत नव्हता, म्हणून आम्ही शेपटयांचा चुराडा सुरू केला. जसे इंजिनांशिवाय विमाने उडू शकत नाहीत तसेच शेपटयांशिवायही उडू शकत नाहीत. आणि तेथेच माझ्याकडून गफलत झाली. झडप उघडून मी सभोवतालचा अंदाज घेत होतो, तेवढयात माझा रणगाडा एका विमानावर जाऊन आदळला. विमानाच्या पंख्याच्या एका तुकडयाचा माझ्या डोक्याला तडाखा बसला. बरे तर बरे, डोक्यावर पोलादी शिरस्त्राण होते त्यामुळे मार कमी बसला. नाही तर माझा कारभार तेथेच आटोपला असता! आता सर्व काही ठीक आहे. लौकरच मी इस्पितळ सोडीन आणि माझ्या पथकात परत दाखल होईन. मुख्य संकट म्हणजे इस्पितळात त्यांनी माझी दाढी साफ उडवली. खरे म्हणजे दाढी वाढवायला मी किती मेहनत

घेतली होती ! छान, भरदार वाढली होती ! पण मुळीच दया-माया न बाळगता त्यांनी माझी दाढी उडवून टाकली ! मरो साली ती दाढी ! आता आपल्या हालचाली खूप वेगाने घडताहेत, पण तरीही युद्ध संपायच्या आधी मी परत एकदा दाढी वाढवू शकेन व माझा कुरूप चेहरा लपवू शकेन असे मला वाटते. मात्र तुला सांगतो आल्योशा, काही कारणाने आन्यूताने माझ्या दाढीचा राग धरलाय आणि दर पत्रात त्या दाढीबद्दल ती माझी हजामत करते ! ''

पत्र खूप मोठें होते. इस्पितळातील कंटाळवाणा वेळ सुसह्य करायला ग्वोझ्देवने ते लिहिले होते हे उघड होते. जाता जाता सांगायचे म्हणजे पत्राच्या अखेरी त्याने उल्लेख केला होता की, स्तालिनग्रादजवळ जेव्हा तो आणि त्याचे लोक पायउतारा होऊन लढत होते, आपले रणगाडे त्यांनी गमावले होते व नव्या रणगाड्यांची जेव्हा ते वाट पहात होते, तेव्हा विख्यात मामायेव कूर्गानच्या प्रदेशात त्याची स्तेपान इवानोविचशी गाठ पडली होती. म्हातारबाबाने प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम पार पाडला होता आणि आता रणगाडाविरोधी रायफल पथकात सार्जंट-मेजरच्या हुद्द्यावर होता. पण आपल्या बंदुकवाल्याच्या सवयी त्यांनी सोडल्या नव्हत्या. ग्वोझ्देवला त्यांनी सांगितले होते त्याप्रमाणे एकच फरक म्हणजे आता ते मोठ्या शिकारीच्या मागे होते. ऊन खाण्यासाठी खंदकातून वर आलेल्या निष्काळजी फॅसिस्ट सैनिकांना टिपण्याऐवजी आता ते भक्कम आणि धूर्त पशूसारख्या जर्मन रणगाड्यांना टिपत होते. ह्या शिकारीच्या खेळातही म्हातारबाबांनी पूर्वीची सैबेरियातील शिकारीची कौशल्ये राखली होती: विलक्षण संयम, धैर्य आणि अचूक नेमबाजी. त्यांची भेट झाली तेव्हा त्या दोघांनी एक फालतू दारूची बाटली झोकली. स्तेपान इवानोविचनी ती लूट काळजीपूर्वक राखून ठेवली होती. पिताना त्यांनी सर्व मित्रांच्या आठवणी काढल्या. स्तेपान इवानोविचनी मेरेस्येवची आठवण काढली होती व युद्ध संपल्यावर ग्वोझ्देवला आणि मेरेस्येवला आपल्या सामुदायिक शेतावर येण्याचे, तेथे शिकारीची मजा लुटण्याचे आमंत्रण दिले होते.

ह्या पत्रामुळे अलेक्सेईचे सांत्वन झाले, पण तरीही तो खिन्न बनला. बेचाळीस नंबरच्या वॉर्डमधले त्याचे सर्व मित्र केव्हाचे परत लढू लागले होते. ग्रीशा ग्वोझ्देव आणि म्हातारे स्तेपान इवानोविच आता कोठे होते? त्यांचे कसे चालले होते? युद्धाच्या वाऱ्याने त्यांना कोणत्या

भागांमध्ये वाहून नेले होते? ते अजून जिवंत होते का? ओल्गा कोठे होती?

कमिस्सार वोरोब्योव सैनिकांच्या पत्रांविषयी एकदा काय म्हणाले होते ते अलेक्सेईला परत आठवले: ही सैनिकांची पत्रे विझलेल्या ताऱ्यांपासून निघालेल्या प्रकाशासारखी असतात. हा प्रकाश आपल्यापर्यंत पोहोचायला एवढा प्रदीर्घ काळ लागतो की, कदाचित असेही घडते: तो तारा केव्हाचा विझून गेलेला असतो; पण त्याचा तेजस्वी, आनंदी प्रकाश अंतराळ भेदून आपल्यापर्यंत मंद तेज आणत राहतो – नसलेल्या ताऱ्याचे!

भाग चौथा

१

१९४३ मधील एक कडक उन्हाळी दिवस. एक जुनाट ट्रक तांबूस लव्हाळयांचे रान माजलेल्या दुर्लक्षित शेतांमधून भरधाव चालला होता. आगेकूच करणाऱ्या सोविएत सेनेच्या डिव्हिजनांचे सामान घेऊन जाणाऱ्या मोटारींच्या धावांमुळे त्या मैदानात चाकोऱ्यांची वाट तयार झाली होती. खड्ड्यांमधून ठेचकाळत आणि आपल्या खिळखिळया शरीराचा खडखडाट करीत ट्रक युद्धआघाडीच्या दिशेने धावत होता. त्याच्या खिळखिळया झालेल्या व धुळीने माखलेल्या दोन्ही बाजूंना पांढऱ्या रंगांतील पट्टीवरची अक्षरे जेमतेम दिसत होती: "रणांगणावरील टपाल सेवा." ट्रक वेगाने धावत होता आणि त्याच्या मागे धुळीचा प्रचंड लोट उमटत होता. कोंदलेल्या स्तब्ध वातावरणात तो धुळीचा ढग सावकाशपणे खाली बसत होता.

ट्रकमध्ये टपालाच्या पिशव्या आणि ताज्या वर्तमानपत्रांचे गठ्ठे भरलेले होते. वैमानिकी सदरे घातलेले व निळया फितीच्या टोकदार टोप्या डोक्यावर चढविलेले दोन सैनिक त्या ट्रकमध्ये बसले होते. ट्रकच्या गतीबरोबर ते जोडीने हिंदकळत व झोके खात होते. त्या दोघांमधला जो वयाने लहान होता त्याच्या खांद्यांवरील नव्याकोऱ्या फिती तो हवाई दलात सार्जंट-मेजर असल्याचे सांगत होत्या. त्याचा बांधा सडपातळ, पिळदार होता व केस सोनेरी होते. त्याच्या चेहऱ्यावर नव्हाळीची अशी कोवळीक होती, जणू त्याच्या नितळ कांतीमधून रक्त चमकत असल्याचा भास होत होता. त्याचे वय सुमारे एकोणीस असावे. पण अनुभवी सैनिकाप्रमाणे वागण्याचा तो प्रयत्न करीत होता: दातांच्या फटीमधून पचकन थुंकत होता, घोगऱ्या आवाजात शिव्या उच्चारत होता, बोटाएवढ्या जाडीच्या सिगारेटी वळत होता व प्रत्येक बाबतीत बेफिकीरी दाखविण्याचा प्रयत्न करीत होता. पण एवढे सगळे असूनही तो प्रथमच रणांगणावर चालला होता व मनातून घाबरला होता हे स्पष्ट दिसत होते. जमिनीत नळी घुसलेली रस्त्याकडेची मोडलेली तोफ, वरच्या झडपेपर्यंत तण उगवलेल्या मैदानात उध्वस्त पडलेला एक सोविएत रणगाडा, बाँब पडल्यामुळे ठिकऱ्या उडालेल्या जर्मन रणगाड्याचे

विखुरलेले अवशेष, गवताने झाकून गेलेले तोफगोळ्यांच्या स्फोटांचे खड्डे, सुरुंग वेचणाऱ्या शिपायांनी रस्त्याच्या कडेला रचून ठेवलेल्या सुरुंगांच्या थाळया, दूरवर दिसणारी जर्मन सैनिकांची स्मशानभूमी व तेथील भोजाचे क्रूस – ह्या सर्व गोष्टी तेथे घडून गेलेल्या लढायांची साक्ष देत होत्या. युद्धात तावून सुलाखून निघालेल्या सैनिकाने त्यांच्याकडे ढुंकूनही पाहिले नसते. पण हा पोरगा मात्र त्या सर्व गोष्टी पाहून चकित झाला होता, भांबावला होता. त्याला तो सर्व तपशील महत्त्वाचा आणि अत्यंत कुतूहलजनक वाटत होता.

याउलट त्याचा सहकारी, एक सीनियर लेफ्टनंट, खरोखरीच अनुभवी सैनिक असल्याचे सहज जाणवत होते. पहिल्याच दृष्टिक्षेपात तुम्ही त्याला तेवीस-चोवीस वर्षांचे समजला असता. पण त्याचा रापलेला, थंडीवाऱ्यात करपलेला चेहरा, त्याच्या डोळ्यांभोवतालच्या रेषा, त्याच्या जिवणीभोवतालच्या आणि कपाळावरच्या रेषा, त्याचे काळे, विचारमग्न व थकलेले डोळे – ह्या सर्व गोष्टी लक्षपूर्वक निरखल्या असत्या, तर त्याच्या वयात तुम्ही आणखी दहा वर्षांची भर टाकली असती. भोवतालच्या दृश्यांचा त्याच्यावर काहीही परिणाम घडत नव्हता. स्फोटांमुळे उध्वस्त, वेडयावाकडया पडलेल्या युद्ध-यंत्रांचे अवशेष पाहून, अथवा ट्रक जात होता त्या खेडयांची जळकी, निर्जन दृश्ये पाहून, अथवा एखाद्या कोसळलेल्या सोविएत विमानाचे अवशेष पाहूनही त्याला मुळीच आश्चर्य वाटत नव्हते. वेडयावाकडया झालेल्या ॲल्युमिनियमचा एक छोटा ढीग, थोडया दूर अंतरावर मोडके इंजिन व लाल तारा आणि क्रमांक असलेली उध्वस्त शेपटी – असे सोविएत विमानाचे भग्न अवशेष पाहून तो दुसरा लहान वयाचा सैनिक मात्र गोरामोरा झाला होता, त्याचे अंग शहारले होते.

सीनियर लेफ्टनंटने वर्तमानपत्रांच्या गठ्ठयांची स्वतःसाठी आरामशीर खुर्ची बनविली होती व सोनेरी आद्याक्षरे असलेल्या, अवजड हस्तीदंती मुठीच्या शिरावी काठीवर आपली हनुवटी टेकवून तो डुलक्या काढत होता. अधूनमधून दचकून तो डोळे उघडायचा, जणू येणारा पेंगुळलेपणा झटकून टाकू पहायचा, सभोवार सस्मित नजरेने न्याहाळायचा व गरम, गंधित हवेचा खोल श्वास घ्यायचा. रस्त्यापासून दूर अंतरावर, तांबूस लव्हाळ्यांच्या डोलत्या सागरावर त्याला दोन बारीक ठिपके आढळले. अधिक बारकाईने न्याहाळून पाहता त्याने तर्काने जाणले की, दोन विमाने एका-पाठोपाठ आरामात आकाशात उडत होती. त्याचे पेंगुळलेपण क्षणात नाहीसे झाले.

त्याचे डोळे चमकले, नाकपुड्या थरारल्या आणि त्या जेमतेम दिसणाऱ्या दोन ठिपक्यांवर स्थिर नजर राखून ड्रायव्हरच्या केबिनच्या टपावर जोरजोराने बुक्के मारीत तो ओरडला :

"आडोसा घे! रस्त्यापासून बाजूला जा!"

तो उभा झाला, अनुभवी नजरेने त्याने प्रदेश न्याहाळला व एका ओढ्याची खोलगट जागा त्याने ड्रायव्हरला दाखवली. त्या ओढ्याच्या दोन्ही तीरांना पिवळ्या फुलांच्या दाट वनस्पती वाढल्या होत्या.

लहाना सैनिक सौम्यसा हसला. ती विमाने दूरवर घिरट्या मारीत होती. निर्जन, वैराण मैदानांमधून धुळीचा प्रचंड लोट उडवीत जाणाऱ्या एकाकी ट्रकबद्दल त्यांना मुळीच स्वारस्य नसावे असे भासत होते. पण त्याने विरोधाचा एखादा शब्द तोंडातून उच्चारण्यापूर्वीच ड्रायव्हरने मूळ रस्त्यापासून ट्रक बाजूला फिरवला आणि खडखड आवाज करीत तो घळीकडे निघाला.

खळग्याशी पोहोचताच सीनियर लेफ्टनंट खाली उतरला व गवतावर बसून सावध नजरेने रस्ता निरखू लागला.

"काय चालवलाय हा सगळा प्रकार..." लहाना सैनिक त्या अंमलदाराकडे उपहासाने पहात बोलू लागला, पण त्याने आपले वाक्य संपविण्याच्या आतच तो अंमलदार जमिनीवर पालथा होत ओरडला :

"खाली पड!"

त्याच क्षणाला दोन महाप्रचंड सावल्या इंजिने रोरावत थेट त्यांच्या डोक्यांवरून गेल्या. कसलातरी विचित्र कडकड आवाज झाला व वातावरण हादरले. पण एवढे होऊनही तो लहाना सैनिक घाबरला नव्हता : साधी तर विमाने! आपलीच असणार! त्याने भोवती नजर टाकली आणि अचानक रस्त्याच्या कडेशी एक उलटलेला, गंजका ट्रक धूर ओकत असलेला व आगीच्या ज्वालांमध्ये वेढलेला त्याला दिसला.

"हं! ते आगलावे बाँब टाकताहेत!" टपालाच्या ट्रकचा ड्रायव्हर स्मित करीत, त्या जळक्या ट्रककडे टक लावून पहात म्हणाला. "ट्रकच्या पाठलागावर आहेत!"

"शिकारी साले," गवतावर अधिक आरामशीरपणे देह पसरीत सीनियर लेफ्टनंट शांतपणे उत्तरला. "आपल्याला थांबलं पाहिजे. लौकरच ते परत येतील. रस्ता विंचरून काढताहेत. तुझा ट्रक तू आणखी थोडा मागं, त्या भोजाच्या झाडाखाली आणलास तर बरं होईल."



तो एवढ्या शांतपणे आणि विश्वासाने हे म्हणाला, की जणू जर्मन वैमानिकांनी आत्ताच त्याला आपल्या योजना कळविल्या होत्या असे वाटावे. त्याच्या जोडीला सैन्यातील एक पोस्टमन मुलगी होती. ही तरुणी ड्रायव्हर-शेजारी बसलेली होती. तिचा चेहरा फिकट पडला होता व तिच्या सुकलेल्या ओठांवर एक गोंधळलेले स्मित उमटले होते. लाटालाटांचे उन्हाळी ढग आकाशामधून सरकत होते व त्या शांत आकाशात घाबरल्या नजरेने ती पाहात होती. तिला धीर यावा म्हणून सार्जंट-मेजर बोलला. त्याला खूप शरमल्यासारखे वाटत होते तरी शांतपणे तो म्हणाला:

"आपण पुढं निघणं इष्ट ठरेल. कशाला वेळ वाया घालवायचा? ज्या माणसाच्या नशीबी फाशी आहे तो कधीही बुडून मरणार नाही!"

सीनियर लेफ्टनंटने शांतपणे गवताचे पाते चघळीत त्या तरुणाकडे एक दृष्टिक्षेप टाकला. त्याच्या कठोर डोळ्यात थट्टेची छटा क्षणभर चमकून गेली. तो म्हणाला:

"माझं ऐक पोरा! खूप उशीर होण्यापूर्वीच ही खुळचट म्हण विसरून जा. आणि दुसरी एक गोष्ट कॉम्रेड सार्जंट-मेजर. युद्धआघाडीवर तुझ्या वरिष्ठांची आज्ञा पाळणं हे तुझं कर्तव्य आहे. जर हुकूम असला 'खाली पडा!' तर तू मुकाट खाली पडून राहिलं पाहिजे."

गवतामध्ये त्याला तांबड्या चुक्याचा एक रसाळ देठ गवसला. आपल्या नखांनी त्याची जाळीदार साल सोलून ती चवदार वनस्पती तो मोठ्या चवीने चघळू लागला. पुन्हा विमानांच्या इंजिनांचा आवाज ऐकू आला व तीन शत्रू विमाने रस्त्याशी समांतर खूप खालून उडत गेली. त्यांच्या पंखांवरचा गडद पिवळा रंग, पांढरे आणि काळे क्रूस अगदी स्पष्ट दिसत होते. इतकेच नव्हे तर सर्वांत जवळच्या विमानाच्या पोटावर रंगविलेला इस्पिकचा एक्का ठळकपणे दिसला. सीनियर लेफ्टनंटने थंडपणे आणखी काही त्या चुक्याचे देठ उपटले, आपल्या घड्याळाकडे पाहिले व आज्ञा केली:

"सब ठीक! चला! आणि वेगानं चला! ह्या ठिकाणापासून आपण जितकं जास्त दूर जाऊ तेवढं चांगलं!"

ड्रायव्हरने कर्णा वाजविला. पोस्टमन मुलगी खळग्यामधून धावत आली. लाल रंगाच्या जंगली स्ट्रॉबेरींची अनेक फळे देठांसकट तिने सीनियर लेफ्टनंटला देऊ केली.

"ही पहा पिकू लागलीत... उन्हाळा सुरू होतोय हे आपल्या ध्यानातच

आलं नाही," बेरींचा वास घेत तो म्हणाला. फुलांच्या गुच्छाप्रमाणे त्याने आपल्या शर्टाच्या बटणहोलमध्ये त्या बेरी खोवल्या.

"ती विमानं परत येणार नाहीत आणि पुढं जाणं सुरक्षित आहे हे तुम्हाला कसं कळलं?" तरुण सैनिकाने सीनियर लेफ्टनंटला विचारले. एव्हाना सीनियर लेफ्टनंट गप्प झाला होता व ट्रकच्या गतीबरोबर डुलत होता.

"अगदी सोपं आहे खुलासा करणं! ती "मेस्सेर" जातीची विमानं होती, "मे-१०९". त्यांच्यापाशी फक्त पंचेचाळीस मिनिटं उडण्यापुरतं इंधन असतं. ते इंधन त्यांनी खर्चलं होतं आणि आता परत इंधन भरून घ्यायला ती गेली आहेत."

सीनियर लेफ्टनंटने अशा काही सुरात हा खुलासा केला की, जणू अशा साध्या-सोप्या गोष्टी लोकांना कशा समजत नाहीत असे त्याला सुचवायचे होते. लहाना सैनिक आता अधिक दक्षतेने आकाश धुंडाळू लागला. "मेस्सेर" परत आल्याचा इशारा सर्वांत प्रथम आपण द्यायचा असा त्याचा इरादा होता. पण हवा इतकी स्वच्छ होती, वातावरणात गवताचे, धुळीचे व तापल्या जमिनीचे मादक गंध एवढे दरवळले होते, किड्यांची किरकिर एवढ्या मजेने चालली होती, लव्हाळयांनी झाकलेल्या निर्जन भूमीवर चंडोल पक्षी एवढ्या मोठ्याने गाणी गात होते, की तो तरुण सैनिक जर्मन विमानांविषयी, धोक्याविषयी पार विसरून गेला आणि त्या दिवसांमध्ये युद्धआघाडीवर लोकप्रिय असलेले एक गाणे त्याने आपल्या खड्या आवाजात गायला आरंभ केला. खंदकामधील एक तरुण सैनिक आपल्या प्रेयसीच्या आठवणीने झुरतोय असा त्या गाण्याचा मतितार्थ होता.

"तुला ते 'अॅशच्या झाडाचं' गाणं ठाऊक आहे?" त्याच्या गाण्यात अडथळा आणत त्याच्या वरिष्ठ सहकाऱ्याने विचारले.

तरुणाने संमतीदर्शक मान डोलावली आणि ते जुने गीत सुरू केले. सीनियर लेफ्टनंटच्या थकल्या, धूळमाखल्या चेहऱ्यावर विषादाची छटा चमकून गेली.

"गड्या हे गाणं तू बरोबर गात नाहीस," तो म्हणाला. "हे काही विनोदी गाणं नाही. त्यात तुझं काळीज ओतलं पाहिजेस." मग त्याने अत्यंत मंदपणे, खालच्या पण नितळ आवाजात गाण्याची धून पकडली.

ड्रायव्हर क्षणभर थांबला आणि पोस्टमन मुलगी केबिनमधून बाहेर आली. चाकावर पाय टेकवून शरीराला हलकेच झोका देत ट्रकच्या मागील

भागात तिने उडी घेतली. तेथे त्या दोघा सैनिकांच्या वळकट हातांनी तिला अलगद सावरले.

"तुमची गाणी मी ऐकली, म्हणून तुमच्याबरोबर गायला मी आल्ये..."

अशा रीतीने ट्रकच्या खडखडीची साथ धरून व नाकतोड्याची जोरदार किरकिर पार्श्वसंगीत मानून ती तिघे गाणी गात राहिली.

तो तरुण सैनिक आता पुरता रंगला. आपल्या सामानाच्या थैलीतून त्याने मोठा वाजा काढला. एका क्षणी गाण्याची सुरावट तो वाजावर वाजवायचा, तर दुसऱ्या क्षणी वाद्यवृंदाच्या संचालकाप्रमाणे वाजाची छडी बनवून गायकांचे नेतृत्व करायचा. त्या भकास आणि आता निर्जन बनलेल्या रस्त्यावर, धुळकट आणि भरघोस वाढलेल्या रानगवतामध्ये चाबकाचे सपासप फटकारे मारावेत तसे गाण्याचे भरदार व करुण स्वर घुमत होते. उन्हाळी भागात मैदाने सुस्तावून पसरली होती; उबदार, गंधित गवतात नाकतोड्यांची किरकिर चालू होती; निरभ्र ग्रीष्माच्या आकाशात चंडोल पक्षी त्या आकाशाएवढ्या उंच व अनंतापर्यंत जाणाऱ्या स्वरांमध्ये गाणी गात होते.

गाण्यामध्ये ते सारेजण एवढे गुंगले होते की, ड्रायव्हरने अचानक ब्रेक मारले तेव्हा धक्क्याने सगळे जवळ जवळ कोलमडले. रस्त्याच्या मध्यभागी ट्रक थांबला. रस्त्याच्या कडेला एका खड्ड्यात एक तीन टनी ट्रक आपली उलटी चाके वर करून उताणा कलंडला होता. तरुण सैनिकाचा चेहरा एकदम पांढराफटक पडला. पण त्याचा वरिष्ठ सहकारी चटकन ट्रकमधून खाली उतरला व घाईघाईने खड्ड्याकडे गेला. त्याची चाल विचित्र, दुडकी होती. क्षणानंतर टपाल ट्रकचा ड्रायव्हर त्या उलटलेल्या ट्रकच्या केबिनमधून त्या क्वार्टरमास्टर कॅप्टनचा रक्ताळलेला देह बाहेर ओढून काढत होता. काच फुटल्यामुळे त्याचा चेहरा कापला व खरचटला होता आणि राखेसारखा रंग त्यावर चढला होता. सीनियर लेफ्टनंटने त्याची पापणी उचलून तपासले.

"हा मेलाय," डोक्यावरील टोपी उतरवीत तो म्हणाला. "आणखी कुणी आहे तिथं?"

"होय. ड्रायव्हर!" टपाल ट्रकचा ड्रायव्हर उत्तरला.

"अरे तिथं नुसता उभा काय राहिलास? इकडं येऊन मदत कर!" रंग उडालेल्या तरुणावर सीनियर लेफ्टनंट खेकसला. "यापूर्वी कधी रक्त पाहिलं नाहीस का? आता सवय कर त्याची! पुढं खूप पहावं लागेल तुला! हे पाहिलंस त्या शिकाऱ्यांचं सावज!"

उलटलेल्या ट्रकचा ड्रायव्हर जिवंत होता. तो मंदपणे कण्हत होता, पण त्याचे डोळे मिटलेले होते. त्याच्या देहावर जखमा दिसत नव्हत्या. पण ट्रकवर जेव्हा बाँब पडला असावा व तो खड्ड्यात उलटला असावा तेव्हा ड्रायव्हरच्या छातीत चाक जोराने आदळले असावे आणि मोडलेल्या केबिन-मध्ये तो अडकून पडला असावा. टपालाच्या ट्रकमध्ये त्या ड्रायव्हरला उचलून ठेवण्याची सीनियर लेफ्टनंटने आज्ञा केली. एका सुती कपड्यात काळजीपूर्वक गुंडाळलेला नवा कोरा ग्रेटकोट त्या लेफ्टनंटपाशी होता. त्याने तो कोट त्या जखमी ड्रायव्हरला झोपविण्यासाठी पसरला व स्वत: ट्रकमध्ये खाली फळीवर बसून त्याने त्या जखमी माणसाचे डोके आपल्या मांडीवर घेतले.

"सगळं करावं पणाला लावून ट्रक पिटाळ!" त्याने आज्ञा केली.

जखमी माणसाच्या डोक्याला हलकेच आधार देऊन तो स्वत:शीच हसला. कसलातरी खूप पूर्वीचा विचार त्याच्या मनात आला होता.

एका छोट्या खेड्याच्या रस्त्यावरून ट्रक धावत होता तेव्हा एव्हाना संध्याकाळ झाली होती. अनुभवी नजरेला चटकन समजत होते की, एका छोट्या विमान तुकडीचे मुख्य ठाणे तेथे होते. बागांसमोरील नेरीच्या झाडांच्या धुळकट पानांमधून आणि सफरचंदांच्या रोडावलेल्या झाडांमधून, विहीरींच्या बाकणांवरून आणि कुंपणांच्या खांबांवरून तारांची अनेक भेंडोळी पसरलेली होती. घरांशेजारच्या शाकारलेल्या पडव्यांमध्ये – जेथे शेतकरी सर्वसाधारणपणे आपल्या गाड्या व शेतीची अवजारे ठेवीत – खिळखिळया झालेल्या "एमका" मोटारी आणि जीप उभ्या होत्या. खेड्यामधील छोट्या झोपड्यांच्या मंद प्रकाशित खिडक्यांच्या तावदानांमधून निळया फितींच्या टोकदार टोप्यांचे सैनिक इकडे तिकडे वावरताना दिसत होते. टंकयंत्रांचा खडखडाट ऐकू येत होता. एका घरावर तारांची भेंडोळी एकत्र सांधलेली होती व तेथून तारयंत्राचा कडकट्ट आवाजही ऐकू येत होता.

मुख्य आणि किरकोळ रस्त्यांपासून एका बाजूला उभे असलेले हे खेडे जणू ह्या आता निर्जन आणि रानगवत माजलेल्या ठिकाणी प्राचीन अवशेषा-प्रमाणे उभे होते व हिटलरच्या आक्रमणापूर्वी ह्या प्रदेशात राहणे किती छान होते याची साक्ष देत होते. पिवळट लव्हाळी बेसुमार वाढलेले छोटे तळेसुद्धा पाण्याने गच्च भरलेले होते. जुन्या रडक्या वाळुंजांच्या सावलीत तळयाचा शीतल, चकाकता पट्टा पसरला होता. लव्हाळयांमधून वाट काढत, पक्षांची

फडफड करीत, पांढऱ्याशुभ्र पिसांची, लाल चोचींची बदकांची जोडी तळयात विहार करत होती.

रेड क्रॉसचा झेंडा लावलेल्या झोपडीपाशी जखमी माणसाला आणण्यात आले. मग ट्रक खेड्यामधून फिरत एका नीटस छोट्या इमारतीपाशी थांबला. ती इमारत म्हणजे खेड्याची शाळा होती. एका मोडक्या खिडकीमधून गेलेल्या असंख्य तारा व पोर्चमध्ये सबमशिनगन घेऊन उभा असलेला पहारेकरी पाहिल्यानंतर, लष्करी अधिकाऱ्यांचे मुख्य ठाणे तेथे होते याचा कुणीही तर्क केला असता.

"मला विंग कमांडरना भेटायचंय," एका मासिकामधील कोडे सोडवीत उघड्या खिडकीपाशी बसलेल्या ऑर्डर्लीला सीनियर लेफ्टनंट म्हणाला.

सीनियर लेफ्टनंटच्या पाठोपाठ आलेल्या तरुण सैनिकाने पाहिले होते की, इमारतीत प्रवेश करताच सीनियर लेफ्टनंटने यांत्रिकपणे आपल्या शर्टाची पुढील बाजू नीट केली होती, पट्ट्यामधील चुण्या हाताच्या अंगठ्यांनी सरळ केल्या होत्या व कॉलरचे बटण लावले होते. तरुण सैनिकानेही तात्काळ आपल्या वरिष्ठाचे अनुकरण केले. हा मितभाषी सहकारी त्याला खूप आवडू लागला व सर्व बाबतीत त्याचे अनुकरण करण्याचा तो प्रयत्न करीत होता.

"कर्नल कामात आहेत," ऑर्डर्ली उत्तरला.

"हवाई दलाच्या स्टाफ हेडक्वार्टर्सच्या पर्सोनेल डिपार्टमेंटकडून तातडीचा लिफाफा घेऊन मी आलोय असं त्यांना सांग."

"तुम्हाला थांबावं लागेल. हवाई टेहळया पथकाबरोबर ते बोलताहेत. त्यात मध्ये अडथळा आणायचा नाही अशी त्यांची ताकीद आहे. बाहेर जाऊन थोडा वेळ बागेत बसा."

ऑर्डर्ली पुन्हा कोडे सोडविण्यात गुंतला. नव्याने आलेले ते दोघे बागेत गेले व फुलांच्या ताटव्याशेजारी एका जुनाट बाकड्यावर बसले. फुलांच्या ताटव्याभोवती विटांची किनार काळजीपूर्वक बांधलेली होती, पण आता त्याच्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे गवताचे रान माजले होते. युद्धापूर्वी, अशा वेळी निवांत सायंकाळच्या वेळांना, शाळेतील वयोवृद्ध शिक्षिका दिवसभराच्या कामानंतर कदाचित येथे विश्रांती घेत बसत असाव्यात. उघड्या खिडक्यांमधून दोन आवाज स्पष्टपणे ऐकू येत होते. एक घोगरा आणि उत्तेजित आवाज अहवाल देत होता :

"ह्या रस्त्यावर बल्शोये गोरोखवोला आणि क्रेस्तोवोझ्दविझेन्स्की स्मशानाकडं जाणाऱ्या रस्त्यावर बरीच हालचाल आहे. ट्रकच्या रांगांमागून रांगा एकाच दिशेनं – म्हणजे युद्धआघाडीकडं जात आहेत. इथं स्मशानापाशी एका खोल भागात ट्रक किंवा रणगाडे आहेत... मला वाटतं इथं एक मोठा विभाग एकवटतोय."

"असं का वाटतं तुम्हाला?" एका घनगंभीर आवाजाने मध्येच पृच्छा केली.

"आम्हाला प्रचंड भडिमाराला तोंड द्यावं लागलं. आम्ही जेमतेम निसटून आलो. काल इथं काहीही नव्हतं, फक्त धूर ओकणारे रणांगणावरचे काही भटारखाने होते. काल मी थेट त्यांच्या डोक्यावर उडालो आणि त्यांना हादरा द्यावा म्हणून उध्वस्त करून टाकलं. पण आज! त्यांचा मारा जबरदस्त होता! .. युद्धआघाडीकडं त्यांचा मोर्चा आहे हे उघड आहे."

"'झेड्' चौकोनाचं काय?"

"तिथंही काही हालचाल आहे, पण फारशी नाही. इथं जंगलापाशी रणगाड्यांची मोठी रांग वाटचाल करतेय. जवळ जवळ शंभर असावेत. पाच किलोमीटरच्या परिसरात पसरलेत आणि आडोसा न धरता दिवसाढवळ्या पुढं चाललेत. कदाचित ही फसवी हालचाल असेल... इथं, इथं आणि इथं, अगदी पुढच्या पुढच्या फळ्यांवर आम्हाला तोफखाना दिसला. दारूगोळयाचे साठेही दिसले. लाकडांच्या ढिगाऱ्यांखाली झाकलेले होते. काल तिथं नव्हते... खूप मोठे साठे आहेत."

"संपलं?"

"होय कॉम्रेड कर्नल. मी अहवाल लिहून काढू?"

"अहवाल? छे:! आता त्याला वेळ नाही! तावडतोब मुख्य लष्करी ठाण्याला जा! याचा अर्थ समजतो? ए ऑर्डर्ली! माझी गाडी! कॅप्टनला हवाई दलाच्या मुख्य ठाण्याला पाठवा!"

प्रशस्त वर्गाच्या खोलीत कर्नलचे ऑफिस थाटले होते. लाकडी ओंडक्यांच्या भिंती असलेल्या ह्या खोलीत फक्त एक टेबल होते. त्या टेबलावर रणांगणावरील टेलिफोनांच्या कातडी पिशव्या पसरल्या होत्या आणि लाल पेन्सिलीसह हवाई नकाशाची एक केस पडली होती. बुटक्या, बांधीव अंगाचे जोमदार कर्नल पाठीशी हात धरून खोलीत येरझाऱ्या घालत होते. आपल्या विचारांमध्ये गर्क असताना दक्ष पवित्र्यात उभ्या असलेल्या वैमानिकांच्या

अंगांवरून ते पुढे गेले. अचानक ते त्यांच्या पुढयात थांबले आणि त्यांनी प्रश्नार्थक चेहऱ्याने पाहिले.

"सीनियर लेफ्टनंट अलेक्सेई मेरेस्येव वर्दी देत आहे," काळसर वर्णाचा अधिकारी खाडदिशी टाचा जुळवीत, सलाम करीत म्हणाला.

"सार्जंट-मेजर अलेक्सान्दर पेत्रोव," अधिक जोरात टाचा आपटीत व जास्त रुबाबदारपणे सलाम ठोकण्याचा प्रयत्न करीत तरुण सैनिक म्हणाला.

"विंग कमांडर कर्नल इवानोव," मुख्य अंमलदार गरजले. "खलिता ?"

झटपट हालचाल करीत मेरेस्येवने नकाशाच्या केसमधून खलिता बाहेर काढला आणि कर्नलच्या हाती दिला. कर्नलनी झरझर छोटया संदेशावरून नजर फिरविली, नवागतांकडे एक चौकस कटाक्ष चटदिशी फेकला व म्हटले:

"छान! अगदी योग्य वेळी आलात! पण एवढी कमी माणसं त्यांनी का पाठवली?" अचानक त्यांच्या मुद्रेवर आश्चर्याचा भाव उमटला. जणू कशाची तरी त्यांना आठवण झाली होती. "थांबा एक मिनिट!" ते उद्गारले. "तुम्ही का तो मेरेस्येव? हवाई दलाच्या चीफ ऑफ स्टाफनी फोन करून मला तुमच्याबद्दल सांगितलंय. त्यांनी मला ताकीद-दिलीय की तुम्ही..."

"ते महत्त्वाचं नाही कॉम्रेड कर्नल," थोडयाशा रांगडेपणानेच अलेक्सेईने त्यांचे बोलणे अडविले. "मला माझ्या कामावर हजर होण्याची परवानगी द्या."

कर्नलनी त्या सीनियर लेफ्टनंटकडे कुतूहलाने पाहिले आणि मान डोलावीत, संमतीदर्शक स्मित करीत ते म्हणाले:

"ठीक! ऑर्डर्ली! ह्या लोकांना चीफ ऑफ स्टाफकडे घेऊन जा आणि माझ्या वतीनं त्यांना हुकूम सांग की, ह्यांना खाऊ-पिऊ घाला आणि त्यांच्या आरामाची व्यवस्था करा. गार्ड कॅप्टन चेस्लोवच्या स्क्वाड्रनमध्ये ह्यांची भरती करा."

विंग कमांडर जरा जास्तच धांदरट होते असे पेत्रोवचे मत पडले. अलेक्सेला ते आवडले. झटपट वागणारे, परिस्थितीचा चटकन आवाका घेणारे, स्पष्टपणे विचार करून ठाम निर्णय घेऊ शकणारे लोक त्याला आवडत असत. हवाई टेहळयाचा अहवाल बागेत बसून त्याने ऐकला होता व तो त्याच्या मनात खोल ठसला होता. युद्धआघाडीवरील शांतता संपत

आल्याची अनेक चिन्हे मेरेस्येवला आढळली होती. लष्करी मुख्य ठाणे सोडल्यानंतर रस्त्यांवर त्यांना आढळलेली दाटी; रात्रीच्या वेळी रस्त्यावरचे पहारेकरी प्रकाशबंदी काटेकोर पाळीत होते आणि आज्ञाभंग करणाऱ्यांच्या खरी धावांवर गोळ्या झाडण्याची धमकावणी देत होते; रणगाडे, ट्रक आणि तोफखाना यांच्या जमवाजमवीमुळे मूळ रस्त्यांलगतच्या भोजवृक्षांच्या जंगलांमध्ये उडालेला आवाजांचा गोंगाट आणि दाटी होती; त्या दिवशी अगदी निर्जन मैदानी रस्त्यांवरसुद्धा जर्मन "शिकारी" विमानांनी त्यांच्यावर हल्ला चढविला होता... ह्या सर्व गोष्टींवरून मेरेस्येवला जाणवत होते की, युद्धआघाडीवरील तात्पुरती शांतता संपुष्टात आली होती. ह्या प्रदेशात नवा दणका मारण्याचा जर्मनांचा इरादा स्पष्ट जाणवत होता. हा प्रहार लौकरच बसणार ह्याची सोविएत सेनेच्या अधिकाऱ्यांना जाणीव होती व त्याला योग्य प्रत्युत्तर देण्याची त्यांनी तयारी केली होती.

२

अस्वस्थ सीनियर लेफ्टनंटने बिचाऱ्या पेत्रोवला पुरते जेवूही दिले नाही. विमानतळाकडे जाणाऱ्या इंधनाच्या ट्रकमध्ये त्याला घाईघाईने बसायला लावले. ही विमानाची धावपट्टी खेड्याबाहेर एका कुरणात होती. स्क्वाड्रन कमांडर असलेल्या गार्डस कॅप्टन चेस्लोवला ह्या दोन नवागतांनी वर्दी दिली. कॅप्टन चेस्लोव हा सदैव कपाळाला आठ्या घालणारा व मितभाषी असला, तरी स्वभावाने तो अत्यंत चांगला माणूस होता. फारशी लांबण न लावता त्याने ह्या दोघांना गवताचे आच्छादन असलेल्या मातीच्या आडोशांकडे नेले. तेथे दोन नवी कोरी, चकचकीत घासलेली, निळी "ला-५" विमाने उभी होती. त्यांच्या सुकाणूंवर "११" व "१२" असे क्रमांक रंगविलेले होते. ह्या नवागतांना ही विमाने उडवायची होती. दिवसाचा उरलेला वेळ त्या दोघांनी गंधित भोजवृक्षांच्या जंगलातच घालविला. विमानांच्या इंजिनांची घरघरसुद्धा तेथील पक्ष्यांच्या गाण्यांचा आवाज लोपवू शकत नव्हती. आपल्या विमानांची तपासणी करण्यात, नव्या मेकॅनिकांशी गप्पा मारण्यात आणि विंगच्या जीवनाची ओळख करून घेण्यात त्या दोघांनी आपला वेळ घालविला.

आपल्या कामात ते एवढे गुंगून गेले की, खूप अंधार पडल्यानंतर अगदी शेवटच्या ट्रकने ते खेड्यात परतले. त्यांना परतायला उशीर झाल्या-

…ळे त्यांचे रात्रीचे जेवण चुकले. पण त्याची त्यांना पर्वा नव्हती. प्रवासा-…ाठी त्यांना दिलेला कोरडा शिधा अद्याप त्यांच्या पडशांमध्ये शिल्लक होता. …ाण्याची जागा मिळविणे मात्र फार अवघड समस्या होती. त्या एकाकी, …ोवती गवताचे रान माजलेल्या 'ओयासिस' मध्ये हवाई दलाच्या दोन …ी माणसे एकत्र आलेली असल्यामुळे खूप दाटी झाली होती. क्वार्टर-…स्टर त्यांना ह्या घरापासून त्या घरापर्यंत नेत होता. आधीच माणसांची …ी झालेल्या त्या घरांमधील रहिवासी नवागतांना सामावून घ्यायला तयार …ते. रागीट शब्दांच्या चकमकी झडत होत्या. पण घरे काही रबराची …लेली नसतात आणि त्यांना ताणून मोठे करता येत नाही, असा पोक्त … विचार मनात येताच क्वार्टरमास्टर माघार घेई व नवे घर शोधू …ग. रस्तेशेवटी एका घरात ह्या दोन नवागतांना लोटण्यात त्याला यश आले.

"आजची रात्र इथं झोपा. उद्या सकाळी तुमच्यासाठी दुसरी काही …री व्यवस्था करीन," तो त्यांना म्हणाला.

…्या छोट्या खोपटात आधीच नऊ माणसे होती व ती एव्हाना झोपली …ती. तोफगोळ्याच्या चपट्या कवचाचा बनविलेला एक धूर ओकणारा …ेलाचा दिवा मिणमिणत होता. युद्धाच्या पहिल्या काळात ह्या तोफ-…ांना "कात्यूशा" म्हणत व स्तालिनग्रादच्या लढाईनंतर त्यांना "स्तालिन-…" असे नवे नांव मिळाले होते. त्या दिव्याच्या मंद प्रकाशात झोपले-…्या काळ्या आकृती उठून दिसत होत्या. काही लोक बिछान्यांवर आणि …ांवर झोपले होते, तर काही जमिनीवर गवत पसरून त्यावर झोपले …. …ा नऊ पाहुण्यांव्यतिरिक्त त्या खोपटाची मालकीण असलेली एक …ारी व तिची वयात आलेली मुलगीही तेथे होती. जागेच्या अभावी … खोपटामधील प्रचंड रशियन चुलाण्याच्या कडेशी झोपल्या होत्या.

…ागत उंबऱ्याशी थबकले. झोपलेल्या लोकांना ओलांडून कसे जायचे … विचार करीत होते. चुलाण्यावरूनच म्हातारी त्यांच्यावर रागाने …ली :

"…ं जागा नाही! मुळीच जागा नाही! इथं किती दाटी झालीय … नाही का तुम्हाला? आता तुम्हाला आम्ही कुठं चिकटवू? छताला?"

… एवढा शरमला की, तो परत जायला निघाला होता. पण … शरीरांवर पाय देण्याचे टाळीत मेरेस्येव एव्हाना टेबलाच्या … निघाला होता.

"आजीबाई, आम्हाला दोन घास खाण्यापुरता एक बारका कोपरा हवाय. सबंध दिवसभरात काही खाल्लं नाही," मेरेस्येव म्हणाला. "एक बशी आणि दोन कप देणार का? आम्ही इथं झोपून तुमची गैरसोय करणार नाही. हवा उबदार आहे आणि आम्ही बागेत झोपू शकू."

चुलाण्याच्या कडेच्या मागील भागातून, चिडलेल्या म्हातारीच्या पाठी-मागून, दोन छोटी अनवाणी पावले पुढे आली. एक सडपातळ आकृती गुपचूप चुलाण्यावरून खाली उतरली आणि झोपलेल्या माणसांमधून तोल सावरीत व्हरांड्याच्या दारामागे नाहीशी झाली. लौकरच ती काही बशा घेऊन परतली. आपल्या सडपातळ बोटांमध्ये तिने दोन रंगीत कप धरले होते. प्रथम पेत्रोवला वाटले की लहान मूल असावे. पण ती जेव्हा टेबलापाशी आली आणि फिकट पिवळसर उजेडात तिचा चेहरा अवतीर्ण झाला तेव्हा ती तरुणी असल्याचे आणि सुंदर असल्याचे त्याने पाहिले. पण तिच्या तपकिरी पोलक्यामुळे, तरटाच्या कापडाच्या स्कर्टमुळे आणि म्हाताऱ्या बाईप्रमाणे एक फाटकी शाल छातीवरून आवळून पाठीशी तिची गच्च गाठ बांधल्यामुळे तिच्या सौंदर्याला बाधा येत होती.

"मरीना! मरीना! इकडं ये रांडे!" म्हातारी चुलाण्यावरून फिस्कारली.

पण म्हातारीचे बोलणे ऐकू आल्याचे कोणतेही चिन्ह त्या तरुणीने दाखविले नाही. सराईतपणे तिने टेबलावर वर्तमानपत्राचा कागद पसरला, त्यावर बशा, कप, काटे ठेवले. हे सर्व करीत असताना ती पेत्रोवकडे सतत तिरपे कटाक्ष फेकत होती.

"जेवा तुम्ही, छान मजेनं," ती म्हणाली. "तुम्हाला काही कापून पाहिजे किंवा गरम करून पाहिजे का? एका मिनिटात करून देते. पण क्वार्टरमास्टरनं सांगितलंय की, बाहेर आग पेटवायची नाही."

"मरीना, इकडं ये!" म्हातारीने हाक मारली.

"तिच्याकडं लक्ष देऊ नका. तिच्या मनावर थोडा परिणाम झालाय. जर्मनांची तिनं फार धास्ती घेतलीय," तरुणी म्हणाली. "रात्रीच्या वेळी सैनिक पाहिले रे पाहिले, की तिला माझी काळजी वाटते. तिचा राग धरू नका. फक्त रात्रीची ती तशी वागते. दिवसा ठीक असते."

डुकराचे उकडलेले थोडे मांस, मटणाचा एक हवाबंद डबा, चपट्या पोटांवर मीठ चमकत असलेले दोन सुके हेरिंग मासे आणि सैन्यात देण्यात

ंभारा गोल पाव एवढ्या गोष्टी मेरेस्येवला आपल्या पडशीत सापडल्या. ंत्रोवकडे त्यामानाने कमी वस्तू होत्या. त्याच्यापाशी थोडे मटण व कुरकुरीत ाांचे काही तुकडे होते. मरीनाने ह्या सर्व गोष्टी आपल्या छोट्या हातांनी ाभरा कापल्या व आकर्षक पद्धतीने बशांमध्ये मांडल्या. लांब पापण्यांखाली ेले तिचे डोळे वारंवार पेत्रोवच्या चेहऱ्याचे निरीक्षण करीत होते, तर ्रोव तिच्याकडे चोरून पहात होता. जेव्हा त्यांचे डोळे एकमेकांशी भिडले ्हा दोघेही लाजली, त्यांनी कपाळांना आठ्या घातल्या आणि माना फिर- ल्या. सारे संभाषण ती दोघे केवळ मेरेस्येवमार्फत करीत होती. एकमेकांना ्र उद्देशून मुळीच बोलत नव्हती. त्यांना तसे वागताना पाहून अलेक्सेईला ्री गंमत वाटली. पण गंमत वाटली तरी थोडा विषादही जाणवला. ती ्घी खूप तरुण होती. आणि त्यांच्या तुलनेने त्याला आपण वयस्क ाल्यासारखे वाटले. आपण खूप थकलो आहोत आणि आपल्या जीवनाचा ार मोठा भाग मागे सरून गेला आहे असे त्याला वाटले.

"मरीना, तुझ्याकडं थोड्या काकड्या नाहीत का?" त्याने विचारले.

"आहेत ना," ती तरुणी मिस्कील स्मित करीत म्हणाली.

"आणि कदाचित तुझ्यापाशी एक-दोन उकडलेले बटाटेही सापडतील?"

"हो तर! मात्र नीट मागितलं तर..."

ोपलेल्या लोकांना हलकेच, आवाज न करता ओलांडून एखाद्या पतंगा- ाणे ती परत खोलीतून नाहीशी झाली.

"कॉम्रेड सीनियर लेफ्टनंट," पेत्रोव किंचित रोषाने म्हणाला. "ाला माहीत नसलेल्या मुलीशी तुम्ही एवढ्या सलगीनं कसं वागता? ्या मागता तिच्यापाशी आणि..."

ेस्येवला हसू फुटले.

"अरे भल्या माणसा, आपण कुठं आहोत असं वाटतं तुला? रणांगणावर ाहोत ना?.. ए आजीबाई, उगीच कुरकुरत बसू नको! खाली उतर ाणि आमच्याबरोबर खा थोडंसं!"

ाा खाकरत आणि पुटपुटत म्हातारी चुलाण्यावरून खाली उतरली, ाापाशी आली आणि तात्काळ डुकराच्या उकडलेल्या मांसावर तुटून ्ली. युद्धापूर्वी तिला हा पदार्थ बहुधा खूप आवडत असावा असे दिसले.

ती चौघेही टेबलाशी बसली व इतरांच्या घोरण्यांच्या आणि झोपेतल्या ्ण्यांच्या पार्श्वसंगीतावर मोठ्या मजेत त्यांनी जेवण केले. अलेक्सेई सारा

वेळ बडबडत होता, म्हातारीला चिडवीत होता आणि मरीनाला हसवीत होता. उघड्या तळावरील जीवनात आल्याची जाणीव होताच त्याचा मूळ आनंदी स्वभाव उसळून आला होता. हे भटके जीवन त्याला मनापासून आवडत होते. जणू काही परकी देशांची खूप भटकंती करून स्वतःच्या घरी परतल्यासारखे त्याला वाटत होते.

जेवणाच्या अखेरी त्या दोघांना समजले की, ह्या खेड्यामध्ये जर्मन तुकडीचे मुख्य ठाणे होते म्हणून हे खेडे वाचले होते. सोविएत सेनेने चढाई सुरू केल्यानंतर जर्मन एवढ्या घाईने पळाले होते की, खेडे नष्ट करायला त्यांना वेळच सापडला नव्हता. त्या म्हातारीच्या डोळयांदेखत तिच्या सर्वांत मोठ्या मुलीवर फॅसिस्टांनी बलात्कार केल्यामुळे म्हातारी भ्रमिष्ट बनली होती. नंतर त्या मुलीने तळयात जीव दिला होता. आठ महिनेपर्यंत फॅसिस्ट त्या प्रदेशात राहिले होते व तो सर्व काळ मरीनाने परसदारीच्या रिकाम्या, धान्य झोडपण्याच्या कोठारात लपून काढला होता. त्या कोठाराचे दार वाळक्या गवताच्या ढिगांनी व सटरफटर वस्तूंनी झाकून टाकण्यात आले होते. ह्या सगळ्या काळात मरीनाला सूर्यदर्शन घडले नव्हते. रात्रीच्या वेळी तिची आई तिला अन्न-पाणी नेऊन द्यायची. धुराड्याच्या भोकामधून हे अन्न-पाणी मरीनापर्यंत पोचविले जायचे. अलेक्सेई त्या तरुणीशी जेवढ्या जास्त गप्पा मारत होता तेवढ्या वारंवारपणे ती पेत्रोवकडे कटाक्ष टाकत होती. तिचे डोळे धीट होते, पण तरीही त्यांच्यात एक लाजरेपण होते. मात्र पेत्रोवविषयीची आवड तिच्या डोळयांमध्ये लपून राहिली नव्हती.

हसत-खेळत, गप्पा मारीत त्यांनी जेवण संपविले. उरलेले अन्न मरीनाने काटकसरीने परत मेरेस्येवच्या पडशीत ठेवले. सैनिकाला वेळप्रसंगी सर्व काही उपयोगी पडते असा तिने शेराही मारला. नंतर ती आपल्या आईच्या कानात काहीतरी कुजबुजली व मागे फिरून ठामपणे म्हणाली :

"ऐका! ज्याअर्थी क्वार्टरमास्टरनं तुम्हाला इथं आणून सोडलंय, त्याअर्थी तुम्ही इथं रहावं अशी माझी इच्छा आहे. तुम्ही चुलाण्यावर चढा. मी आणि आई तळघरात जातो. प्रवासानंतर तुम्हाला विश्रांती मिळाली पाहिजे. उद्या आपण तुमच्यासाठी जागा शोधू."

पुन्हा एकदा हलकेच झोपलेल्यांना ओलांडीत ती बाहेर गेली आणि कडब्याचा भारा घेऊन आली. तिने चपखलपणे ते वाळके गवत चुलाण्याच्या कट्ट्यावर पसरले व उशा म्हणून कापडांच्या गुंडाळया बनविल्या. ह्या सर्व

गोष्टी तिने अत्यंत झटपट, सुबक, मुळीच आवाज न करता आणि मांजरी-च्या डौलाने पार पाडल्या.

"काय रे मित्रा, छान पोरगी आहे नाही?" गवतावर सुखाने पहुडत आणि सांध्याची हाडे कडकड वाजेतोवर अंग ताणून देत मेरेस्येव म्हणाला.

"काही वाईट नाही," खोटया बेपर्वाईने पेत्रोव उत्तरला.

"तुझ्याकडं ती सारखी कशी बघत होती ते पाहिलंस?"

"नाही! सगळा वेळ ती तुमच्याशीच बडबडत होती!"

क्षणानंतर त्याचा नियमित श्वास चाललेला ऐकू येऊ लागला. पण मेरेस्येवला झोप लागली नाही. त्या शीतल, सुगंधित वाळक्या गवतावर पडल्या पडल्या त्याने पाहिले की, मरीना खोलीमध्ये येऊन काहीतरी शोधत होती व पुन:पुन्हा चुलाण्याच्या दिशेने चोरटे कटाक्ष टाकत होती. टेबलावरील दिव्याची ज्योत तिने बारीक केली, चुलाण्याकडे पुन्हा एक दृष्टीक्षेप टाकला व झोपलेल्या मंडळींमधून वाट काढीत हळूच ती दाराकडे निघाली. फाटक्या-तुटक्या कपडयांमधील ह्या सुंदर, डौलदार मुलीला पाहिल्यापासून काही कारणानें अलेक्सेईच्या अंत:करणात खिन्नता दाटून आली. पण त्याचबरोबर त्याचे चित्त शांतही झाले होते. झोपण्याच्या जागेची समस्या मिटली होती. सकाळी तो हवाई झुंजीसाठी पहिले उड्डाण करणार होता. त्याची पेत्रोवबरोबर जोडी लावण्यात आली होती. तो स्वत: नेता होता. कसे काय जमणार होते? पेत्रोव चांगला मुलगा दिसत होता. प्रथम दृष्टीक्षेपातच मरीना पेत्रोव-च्या प्रेमात पडली होती. आता थोडी झोप काढणे इष्ट असे मेरेस्येवने ठरविले.

आपल्या कुशीवर तो वळला. गवताची थोडी सळसळ झाली व त्याला गाढ झोप लागली.

काहीतरी भयंकर घडले होते अशा भावनेने त्याला जाग आली. काय घडले ते त्याला तात्काळ समजले नाही, पण सैनिकी अंत:प्रेरणेनुसार त्याने उडी मारली व आपले पिस्तूल हाती पकडले. तो कोठे होता हे त्याला समजेना. लसणीसारख्या वासाच्या कडवट धुराच्या लोटाने सर्व काही गुरफटून गेले होते. वाऱ्याने जेव्हा तो धुराचा ढग विरून गेला तेव्हा त्याने वर पाहिले. त्याच्या डोक्यावर विलक्षण, प्रचंड तारे तेजाने चमकत होते. दिवसासारखा ढळढळीत उजेड पडला होता व काडयांप्रमाणे विस्कटलेले छपराचे खांब त्याला दिसत होते. छप्पर सरकले होते, तुळया पुढे आल्या

होत्या व थोड्या दूर अंतरावर एक आकारहीन वस्तू जळत होती. लाकाच्या काण्हण्याचे आवाज त्याला ऐकू आले. विमानांच्या इंजिनांची अखंड घरघराट सुरू होती व खाली पडणाऱ्या बाँबगोळयांचे कर्कश्य आवाज घुमत होते.

"खाली पड!" तो पेत्रोववर ओरडला. त्या भग्न अवशेषांमध्ये मनोऱ्यासारख्या भासणाऱ्या चुलाण्याच्या कडेवर पेत्रोव उकीडवा बसला होता व धास्तावल्या नजरेने भिरीभिरी पहात होता.

विटांवर ते सपाट आडवे झाले. त्यांची शरीरे विटांना गच्च बिलगली होती. त्याच क्षणाला बाँबचा एक भलामोठा कपचा चिमणीवर आपटला व तांबड्या धुळीचा आणि कोरड्या मातीचा त्यांच्यावर वर्षाव झाला.

"हलू नको! निश्चित पडून रहा!" मेरेस्येवने आज्ञा केली. वस्तुत: उडी मारून उठावे आणि तेथून कुठेतरी रानत धावत दूर जावे अशी त्याला जबरदस्त इच्छा होत होती. रात्रीच्या बाँब हल्ल्यांच्या वेळी प्रत्येक माणसाला असे तीव्रतेने वाटत राहते. पण त्याने स्वत:ला आवरून धरले.

बाँबफेकी विमाने दिसत नव्हती. त्यांनी टाकलेल्या प्रकाशज्योतींच्या खूप वरती अंधारात ती घिरट्या घालत होती. पण थरथरत्या, झगझगीत प्रकाशित पट्ट्यांमध्ये काळ्या थेंबांप्रमाणे पडणारे बाँब मात्र स्पष्ट दिसत होते. जमिनीवर जोरात खाली येताना त्यांचा आकार डोळ्यांदेखत मोठा होत जाई. त्या ग्रीष्म-रात्रीच्या अंधारात लाल ज्वाला फुटत होत्या. पृथ्वीला दुभंगून तडे जात होते, प्रचंड ध्वनी गर्जत होते असे वाटत होते.

मेरेस्येव आणि पेत्रोव चुलाण्याला चिकटून होते. प्रत्येक स्फोटाबरोबर चुलाणा हिंदकळत होता व थरथरत होता. चुलाण्याच्या कडेला त्यांनी आपली संपूर्ण शरीरे घट्ट चिकटवून धरली होती. जास्तीत जास्त सपाट राहून विटांशी एकजीव व्हायचा ते प्रयत्न करीत होते. इंजिनांची घरघर विरत गेली आणि तात्काळ रस्त्याच्या विरुद्ध बाजूच्या जळत्या अवशेषांच्या ज्वालांचा प्रचंड ध्वनी ऐकू आला.

"त्यांनी आपल्याला थोडा नमुना चाखवला," आपल्या कपड्यांवरील गवत व धूळ झटकून टाकीत मेरेस्येव उसन्या शांतपणे म्हणाला.

"पण इथं झोपलेल्या माणसांचं काय झालं?" चिंतेच्या सुरात पेत्रोवने विचारले. आपल्या जबड्याची भीतीमुळे होणारी थरथर थांबविण्याचा आणि घशातून येणारी उचकी थोपविण्याचा तो प्रयत्न करीत होता. "आणि मरीना कुठाय?"

चुलाण्यारून ते खाली उतरले. मेरेस्येवपाशी विजेरी होती. जमिनीवर विखुरलेल्या फळ्यांखाली व लाकडांखाली त्याने शोधले. तेथे कुणीही नव्हते. नंतर त्यांना समजले की, वैमानिकांनी धोक्याचा इशारा ऐकला होता व खंदकात पळून जाण्यात ते यशस्वी झाले होते. पेत्रोवने आणि मेरेस्येवने सर्व पडझडींमधून शोध घेतला, पण मरीना किंवा तिची आई त्यांना सापडली नाही. त्यांनी मोठ्यांदा हाका मारल्या, पण त्यांना उत्तर मिळाले नाही. त्यांचे काय झाले असावे? हल्ल्यामधून त्या वाचल्या होत्या का?

पुनश्च सुव्यवस्था निर्माण करायला एव्हाना रस्त्यांमधून गस्ती फिरू लागले होते. खंदक खोदणाऱ्या शिपायांनी आगी विझविल्या, पडक्या इमारती पूर्ण पाडून टाकल्या व जमिनीत गाडल्या गेलेल्या मृत आणि जखमींना बाहेर काढले. ऑर्डर्ली रस्त्यांवरून धावपळ करीत वैमानिकांची नांवे पुकारीत होते. विंगचा तावडतोब दुसऱ्या तळावर मुक्काम हलविण्यात आला होता. पहाटे आपल्या विमानांसकट निघण्याच्या तयारीने हवाई दलातील लोक विमानतळावर गोळा झाले होते. प्राथमिक मोजणीवरून आढळले होते की, फारशी मनुष्यहानी झाली नव्हती. एक वैमानिक जखमी झाला होता, दोन मेकॅनिक आणि चौक्यांवरचे अनेक पहारेकरी ठार झाले होते. अनेक खेडुत मरण पावले असावेत असा अंदाज होता. पण अंधारामुळे व गोंधळामुळे त्यांची नक्की संख्या सांगणे कठीण होते.

पहाट फुटण्याच्या जरा आधी, विमानतळाकडे जाताना, मेरेस्येव आणि पेत्रोव यांना त्यांच्या त्या रात्रीच्या मुक्कामाच्या घरापाशी थांबल्याविना राहवले नाही. लाकडी खांबांच्या आणि फळ्यांच्या गदारोळामधून दोन खंदकी सैनिक एक स्ट्रेचर वाहून नेत होते. रक्ताचे डाग पडलेल्या चादरीने कुणाला-तरी त्या स्ट्रेचरवर झाकले होते.

"कोण आहे?" फिकट चेहऱ्याने त्याने विचारले. अनिष्टाच्या भीतीने त्याचे काळीज जडावले होते.

स्ट्रेचर वाहून नेणाऱ्या दोघा सैनिकांपैकी एका वयस्क सैनिकाला पाहताच मेरेस्येवला स्तेपान इवानोविच यांची आठवण झाली. केसांचे कल्ले राखलेल्या त्या सैनिकाने तपशीलवार खुलासा केला:

"एक म्हातारी आणि एक मुलगी. आम्हाला त्या तळघरात सापडल्या. वरून पडणाऱ्या विटांचा त्यांना मार बसला. जागच्याजागी ठार झाल्या. धाकटी मुलगी होती, किंवा बाई होती ते मला ठाऊक नाही. अगदी छोटा

जीव आहे. देखणी असावी. तिच्या छातीत वीट बसली. एखाद्या लहान मुलासारखी सुंदर आहे."

त्या रात्री जर्मन सेनेने आपली शेवटची मोठी चढाई सुरू केली. सोविएत सेनांच्या फळ्यांवर त्यांचे हल्ले सुरू झाले व जर्मन सेनेची अखेर घडविणाऱ्या कूर्स्कच्या लढाईचा आरंभ झाला.

३

सूर्य अजून उगवला नव्हता. उन्हाळ्यामधील छोट्या रात्रीचा तो गडद अंधारा प्रहर होता. पण विमानतळावरील तापविलेली इंजिने एव्हाना घरघरू लागली होती. दंवमाखल्या गवतावर नकाशा पसरून कॅप्टन चेस्लोव आपल्या स्क्वाड्रनमधील वैमानिकांना नव्या विमानतळाची व तेथे जाण्याच्या मार्गाची माहिती देत होते.

"डोळे उघडे ठेवा," ते म्हणत होते. "एकमेकांना नजरेच्या टप्प्यातून हरवू नका. विमानतळ थेट पुढच्या फळीशी आहे."

नवा तळ खरोखरीच रणरेषेवर होता. ही रणरेषा नकाशावर निळ्या पेन्सिलीने आखलेली होती. जर्मन सेनांच्या ताब्यात असलेल्या फुगीर प्रदेशावर होती. तेथे पोहोचायला त्यांना मागे नव्हे तर पुढे उडावे लागणार होते. वैमानिक खूप झाले होते. शत्रूने परत पुढाकार घेतला होता अशी जरी वस्तुस्थिती होती तरी सोविएत सेना माघारीला तयार नव्हती, उलट हल्ला करायला सज्ज होती.

सूर्याच्या पहिल्या किरणांनी आकाश उजळले होते. गुलाबी धुके धावपट्टीवर अद्याप रेंगाळत होते. पण एव्हाना दुसरे स्क्वाड्रन आपल्या कमांडरच्या पाठोपाठ आकाशात झेपावले होते व निकट रांगा राखून विमानांनी दक्षिणेची वाट धरली होती.

मेरेस्येव आणि पेत्रोव आपल्या पहिल्या संयुक्त उड्डाणात एकमेकांच्या अगदी जवळ राहिले. ते उड्डाण जरी छोटे होते तरी आपल्या नेत्याचे विश्वासपूर्वक आणि जातिवंत विमानसारथ्य पेत्रोवच्या नजरेत ठसले. मेरेस्येवने वाटेत मुद्दामच अनेकदा जोरदार व अनपेक्षित वळणे घेतली. आपल्या अनुयायाला अक्कल आहे, त्याची नजर चांगली आहे, तो खंबीर धीराचा आहे असे त्याच्या लक्षात आले. विशेष म्हणजे खंबीर नसली तरी त्याची उड्डाणाची शैली चांगली होती, हे महत्त्वाचे होते.

नवी धावपट्टी पायदळी रेजिमेंटच्या पिछाडीला होती. जर्मनांना ती जर सापडली असती तर अगदी हलक्या तोफा घेऊन किंवा अवजड खंदकी उखळी तोफांच्या साह्याने ते सहज मारा करू शकले असते. पण थेट त्यांच्या नाकांखाली निर्माण झालेल्या विमानतळाकडे लक्ष द्यायला त्यांना सवड नव्हती. वसंताच्या मोसमात तेथे एकवटलेल्या सर्व तोफखान्यासह त्यांनी दिवस उजाडायच्या आधीच सोविएत फौजांच्या तटबंदींवर आग ओकायला आरंभ केला होता. तटबंदीच्या प्रदेशात आकाशामध्ये तांबडा, थरथरता प्रकाश उजळला होता. काळ्या झाडांच्या दाट अरण्याप्रमाणे सर्व काही गोष्टी स्फोट झाकून टाकत होता. दर क्षणाला अशी अरण्ये उमटत होती. सूर्य उगवला तरीही अंधाराचे साम्राज्य होते. त्या प्रचंड घरघरत्या, थरथरत्या अंधारात कोणतीही गोष्ट ओळखणे अवघड ठरले. एखाद्या मंद, काळपट-लाल थिरड्याप्रमाणे सूर्य आकाशात ओठंगला होता.

महिन्यापूर्वी जर्मन मोर्चांवर सोविएत टेहळ्या विमानाने मारलेल्या चकरा वाया गेल्या नव्हत्या. जर्मन कमांडचे हेतू स्पष्ट झाले होते. त्यांचे मोर्चे आणि त्यांची एकवटण्याची ठिकाणे नकाशावर नमूद झाली होती व त्यांचा तपशीलवार अभ्यास करण्यात आला होता. सवयीनुसार जर्मनांना वाटले होते की, आपल्या निद्रिस्त आणि निःशंक शत्रूच्या पाठीत सर्व शक्तीनिशी खंजीर खुपसणे सहज शक्य होईल. पण शत्रूने झोपण्याचा केवळ बहाणा केला होता. त्याने हल्लेखोराचा हात पकडला आणि आपल्या पोलादी घट्ट पकडीत चिरडला. कित्येक किलोमीटरच्या युद्ध आघाडीवरील आरंभीच्या तोफगर्जना विरतात न विरतात तोच जर्मनांना स्वतःच्या खंदकांमध्ये स्फोटांचे लाल गोळे उमटताना दिसू लागले. सोविएत तोफखान्याची मारगिरी अचूक होती. जर्मनांप्रमाणे तो चौकोनी प्रदेश विंचरून काढत नव्हता, तर निश्चित लक्ष्यांवर त्याचा मारा होता. जर्मन तोफखान्याचे मोर्चे, रणगाडे आणि पायदळ एकवटलेल्या जागा, पूल, भूमीगत दारूगोळ्याचे साठे, लष्करी ठाण्यांच्या चौक्या – ह्या सर्वांवर सोविएत तोफखान्याचा अचूक भडिमार सुरू झाला.

हल्ल्याचा आरंभ करणाऱ्या जर्मन तोफा धडाडणे सुरूच होते. विविध पल्ल्यांच्या तोफांचे आता तुंबळ युद्ध सुरू झाले. कॅप्टन चेस्लोवच्या स्क्वाड्रनची विमाने नव्या तळावर उतरली तेव्हा जमीन कंप पावत होती. स्फोटांच्या सतत आवाजांमधून एक प्रचंड मेघनाद ऐकू येत होता. जणू एक अखंड

आगगाडी रेल्वेच्या पुलावरून शिट्टी वाजवीत आणि खडखडाट करीत जात होती, पण तो पूल ओलांडणे संपत नव्हते आणि आगगाडीचे डबेही संपत नव्हते! संपूर्ण क्षितीजावर धुराचे महाप्रचंड लोट उसळले होते. छोट्या विमानतळावरून बाँबफेक्या विमानांच्या लाटांमागून लाटा झेपावत जात होत्या. काही विमाने हंसाकार रचनेत येत, काही करकोच्यांप्रमाणे, तर काही खुल्या तऱ्हेने येत होती. त्यांनी टाकलेल्या बाँबच्या स्फोटांचे बद्द आवाज तोफखान्याच्या सतत गर्जनांमधून वेगळे ओळखता येत होते.

"२ क्रमांकाच्या सज्जतेत" राहण्याचा स्क्वाड्रनना हुकूम मिळाला होता. याचा अर्थ वैमानिकांनी आपापल्या विमानांच्या कॉकपिटमध्ये बसून रहायचे होते व पहिला अग्निबाण उडताच आकाशात झेप घ्यायची होती. भोजवृक्षांच्या जंगलाच्या किनाऱ्याशी विमाने उभी करून ठेवली होती आणि झाडांच्या डहाळ्यांनी त्यांना झाकले होते. जंगलच्या थंड वातावरणात अळंब्यांचा सुगंध मिसळला होता. लढाईच्या आवाजांमध्ये डासांचे गुणगुणणे बुडून गेले होते तरी वैमानिकांच्या तोंडांवर, मानांवर आणि हातांवर डासांचे सणसणीत चावे बसत होते.

डोक्यावरील शिरस्त्राण काढून मेरेस्येव शांतपणे डासांना हाकलीत विमानात बसून होता. जंगलचा भल्या सकाळच्या प्रहरीचा कडवट दर्प त्याला खूप आवडत होता. शेजारीच त्याच्या अनुयायाचे विमान उभे होते. पेत्रोव आपल्या बैठकीच्या जागेवरून वारंवार उठत होता व जेथे लढाई चालली होती तिकडे पहात होता अथवा डोक्यावरून जाणारी बाँबफेकी विमाने न्याहाळत होता. आकाशात झेपावून शत्रूशी भिडायला तो उत्सुक झाला होता. त्याची आयुष्यातील ही लढाईची पहिलीच खेप होती. खऱ्याखुऱ्या शत्रूच्या विमानावर तो प्रथमच गोळ्या झाडणार होता. कदाचित त्यांपैकीच एखाद्या विमानात गोगलगायीप्रमाणे तो जर्मन वैमानिक बसला असेल, ज्याने त्या खेड्यातील सुंदर मुलीला ठार मारले! पेत्रोवला आता ती मुलगी एखाद्या सुंदर स्वप्नात पाहिल्यासारखे भासत होते.

मेरेस्येवने आपल्या अस्वस्थ अनुयायाकडे टक लावून पाहिले. त्याच्या मनात विचार आला: "आम्ही दोघं जवळ जवळ एकाच वयाचे आहोत. तो एकोणीस आणि मी तेवीस. तीन-चार वर्षांचा फरक माणसाच्या दृष्टीने असा काय महत्त्वाचा?" पण आपल्या अनुयायाच्या शेजारी उभे राहताना

त्याला अनुभवी, धीरगंभीर, थकलेल्या म्हाताऱ्या माणसाप्रमाणे वाटत होते. या क्षणाला पेत्रोव आपल्या कॉकपिटमध्ये बसून चुळबुळत होता, आपले हात चोळत होता, डोक्यावरून जाणाऱ्या सोविएत विमानांना उद्देशून काही तरी ओरडत होता, हसत होता; याउलट अलेक्सेई आपल्या खुर्चीत आरामात पसरून बसला होता. तो शांत होता. त्याला पाय नव्हते. जगातील दुसऱ्या कोणत्याही वैमानिकापेक्षा त्याला विमान उडविणे खूप अवघड होते. पण त्याची त्याला क्षिती नव्हती. आपल्या कौशल्याची त्याला खात्री होती व आपल्या कापलेल्या पायांवर त्याचा विश्वास होता.

संध्याकाळपर्यंत विंग "२ क्रमांकाच्या राखीव" [illegible]. [illegible] कारणास्तव तिला राखीव ठेवले होते. विंगचे ठिकाण [illegible] इच्छा नव्हती हे स्पष्ट होते.

विंगच्या लोकांना झोपण्यासाठी [illegible] पूर्वी हे ठिकाण जर्मनांच्या [illegible]. [illegible] बनविण्यासाठी त्यांनी [illegible] दाचे आच्छादन घातले होते. अजूनही [illegible] होती, जर्मन शहरांचे तैलरंगातील [illegible].

तोफखान्यांची लढाई चालू होती. [illegible]. [illegible] कागदावरून कोरडी वाळू घरंगळत होती व [illegible] आणि [illegible] आवाज त्यामुळे ऐकू येत होते. जणू भुयारात अनेक [illegible] असा भास होत होता.

मेरेस्येवने आणि पेत्रोवने उघड्यावरच झोपायचे ठरविले. पूर्ण [illegible] झोपण्याचे हुकूम होते. मेरेस्येवने फक्त आपल्या पायांचे पट्टे ढिले केले. उताणे पडून तो आकाश निरखीत होता. स्फोटांच्या लाल चकचकाटांनी आकाश थरारत असल्याचा भास होत होता. पेत्रोव मात्र तात्काळ गाढ झोपला. झोपेमध्ये तो घोरत होता, बडबडत होता, दात कराकरा चावत होता, ओठ चाटत होता. एखाद्या लहान बाळाप्रमाणे त्याने अंगाची मुरकुंडी केली होती. मेरेस्येवने त्याच्या अंगावर आपला ग्रेटकोट टाकला. आपल्याला झोप लागणे शक्य नाही असे जेव्हा त्याला जाणवले तेव्हा तो उठला व थंडीमध्ये कुडकुडत त्याने भराभरा व्यायाम केला. अंगात ऊब आल्यानंतर तो एका झाडाच्या तोडलेल्या बुंध्यावर जाऊन बसला.

तोफांचे वादळ शमले होते. फक्त अधून मधून तोफखान्याच्या तुरळक

फैरी उडत होत्या. अनेक वाट चुकलेले तोफगोळे डोक्यावरून भणाणत जात होते आणि धावपट्टीच्या आसपास त्यांचे स्फोट उडत होते. हा तथाकथित वैताग देणारा भडिमार कुणालाच विचलित करीत नव्हता. स्फोटांच्या आवाजाच्या दिशेने अलेक्सेई मान वळवूनसुद्धा पहात नव्हता. त्याची नजर झुंजीच्या दिशेकडे खिळली होती. अंधारात ती स्पष्ट दिसत होती. रात्रीच्या ह्या अशा उशीरा प्रहरीसुद्धा घनघोर लढाई पेटलेली होती. सवंध क्षितीज लाल प्रकाशाने उजळले होते. त्या उजळलेल्या क्षितीजावर प्रकाशशलाका थरथरत उडत होत्या – निळसर गंधकाच्या जर्मनांकडून आणि पिवळसर रंगाच्या सोविएत फौजांकडून. अधूनमधून एखादी महाप्रचंड अग्निज्वाला जिभा चाटीत वर उसळत होती, पृथ्वीवरील अंधाराचा पडदा क्षणभर वर उचलत होती आणि पाठोपाठ स्फोटाचा जड निःश्वास ऐकू येत होता.

रात्रीच्या वेळी बाँबफेक करणाऱ्या विमानांचा घरघराट ऐकू आला आणि संपूर्ण युद्धआघाडीवर ट्रेसर काडतूसांची विविधरंगी महिरप उमटली. विमानविरोधी तोफांमधून रक्ताच्या थेंबांप्रमाणे धडाधड तोफगोळे उडू लागले. पुन्हा एकदा धरती थरथरली, कण्हली, विव्हळली. मात्र झाडांच्या शेंड्यांवरचे रातकिडे त्यामुळे मुळीच विचलित झाले नाही. दूर दाट जंगलात एक घुबड मानवी आवाजात घूत्कारले. त्याने अनिष्टाची पूर्वसूचना दिली. झुडुपांमधील ढोलीत दिवसभराच्या भीतीने गप्प बसून राहिलेला बुलबुल पक्षी गाऊ लागला. प्रथम तो विचकत गात होता. जणू आवाज जोखून पहात होता, किंवा वाद्याची पट्टी जुळवीत होता. मग मात्र त्याने मुक्त ताना मारायला सुरुवात केली. त्याच्या त्या उन्मादी गाण्याने त्याचाच ऊर फुटेल असे वाटत होते. त्याच्या गाण्याचा सूर इतर पक्ष्यांनी उचलला आणि चारी बाजूंनी मधुर सुरांची उधळण सुरू झाली. कूर्स्कचे बुलबुल जगभर प्रसिद्ध आहेत यात आश्चर्य नाही!

बुलबुलांच्या गाण्याने सारे नभोमंडळ दुमदुमले होते. दुसऱ्या दिवशी, आयोगासमोर कसोटी द्यायला नव्हे तर खुद्द मृत्यूला सामोरे जाणारा अलेक्सेई सबंध रात्रभर ह्या बुलबुलांच्या वृंदगानामुळे जागा राहिला. त्याच्या मनात उद्याबद्दलचे विचार नव्हते, आगामी लढाईबद्दलचे विचार नव्हते, ठार होण्याच्या संभाव्यतेविषयीचे विचार नव्हते; त्याच्या मनात कामीशीनजवळच्या, एकेकाळी त्याच्यासाठी आणि ओल्गासाठी गायलेल्या बुलबुलाचे विचार येत होते.

पूर्वेकडील आकाश फिकटले. हळू हळू बुलबुलांच्या लकेरी तोफांच्या गडगडाटामध्ये बुडून गेल्या. रणांगणावर सूर्य सावकाश उगवला. त्याचा मोठा आणि लाल गोल स्फोटांच्या दाट धुरामधून दिसणे मोठे अवघड झाले होते.

४

कूर्स्कच्या फुगीर प्रदेशातील लढाई घनघोर चालू राहिली. रणगाडयांची वेगवान चाल करून कूर्स्कच्या दक्षिणेची आणि उत्तरेची सोविएत मोर्चेबंदी नष्ट करण्याच्या व चिमटयाचा व्यूह रचून कूर्स्कमधील सोविएत सेनेला वेढा घालून तेथे "जर्मन स्तालिनग्राद" करण्याच्या मूळ जर्मन योजना खंबीर सोविएत संरक्षक व्यवस्थेमुळे फसल्या. काही दिवसांनंतर जर्मन सेनाधिकाऱ्यांच्या ध्यानात आले की, ही सोविएत संरक्षक तटबंदी भेदून जाणे त्यांना अशक्य होते आणि तशी ती भेदण्यात जरी त्यांना यश आले असते तरी त्यांना एवढी प्रचंड हानी सोसावी लागली असती की, चिमटयाचा व्यूह रचायला त्यांच्यापाशी पुरेसे सेनाबळ उरले नसते. पण आता थांबायलाही उशीर झाला होता. ह्या मोहीमेवर व्यूहात्मकदृष्टया, डावपेचात्मक आणि राजकीय दृष्टया हिटलरने फार मोठया अपेक्षा ठेवल्या होत्या. धुमश्चक्री बेबंद चालू होती. युद्धाचा हिमप्रपात वाढत्या वेगाने उतारावरून कोसळत होता. त्याच्या वाटेत येणाऱ्या सर्व गोष्टींना तो स्वाहा करीत होता. ज्यांनी हा प्रपात वरून लोटून दिला होता त्यांना तो थांबविण्याचे सामर्थ्य नव्हते. जर्मनांची प्रगती किलोमीटरनी मोजली जात होती, त्यांची हानी डिव्हिजनांनी, सेना कोअरनी, शेकडो रणगाडे आणि तोफा व हजारो वाहनांनी गणली जात होती. पुढे जाणाऱ्या फौजांचा भयानक रक्तपात घडत होता, त्यांचे सामर्थ्य कमी होत चालले होते. जर्मन मुख्य ठाण्याला याची जाणीव होती, पण परिस्थिती बदलणे त्याच्या आटोक्याबाहेरचे होते. त्यामुळे युद्धाच्या खाईत अधिकाधिक राखीव दलांची आहुती देणे त्याला भाग पडत होते.

संरक्षक आघाडी सावरून धरणाऱ्या सोविएत फौजांनी जर्मन प्रहारांना झेलले होते. जर्मनांचा वाढता त्वेष पाहून सोविएत सेनाधिकाऱ्यांनी आपल्या राखीव दलांना दूर पिछाडीला ठेवले होते. शत्रूचा चेव संपून जाण्याची वाट

ते पहात होते. मेरेस्येवला नंतर समजले होते की, प्रतिहल्ला चढविणाऱ्या सेनेला छत्र देण्यासाठी त्याची हवाई तुकडी राखून ठेवण्यात आली होती. त्यांच्या जोडीने ज्यांना कृती करावयाची होती अशा लढाऊ तुकड्या व रणगाडा पथके त्या महान लढाईच्या पहिल्या टप्प्यात केवळ बघ्यांची भूमिका का करीत होती, याचा खुलासा झाला. शत्रूची सर्व दले लढाईत उतरली तेव्हा विमानतळावर "२ क्रमांकाची सज्जता" रद्द करण्यात आली. वैमानिकांना भुयारांमध्ये झोपण्याची परवानगी देण्यात आली व गणवेषासह झोपण्याचे बंधनही रद्द करण्यात आले. मेरेस्येवने आणि पेत्रोवने आपल्या राहण्याच्या जागेची पुनर्रचना केली. टंच नटयांची चित्रे व परकी शहरांचे देखावे त्यांनी फेकून दिले. जर्मन कार्डबोर्ड आणि पॅकिंग कागद फाडून टाकले. त्याऐवजी फर आणि भोजाच्या डहाळयांनी भिंती सजवल्या. त्यानंतर घरंगळणाऱ्या वाळूची त्रासदायक सळसळ बंद झाली.

एके सकाळी भुयारी वसतीस्थानाच्या उघड्या दारामधून तेजस्वी सूर्यकिरणे एव्हाना पाझरू लागली होती. जमिनीवर देवदाराच्या टोकदार पानांचा गालिचा पसरलेला होता. भिंतींच्या कोनाड्यांमध्ये बांधलेल्या फळयांवर मेरेस्येव आणि पेत्रोव अजून ताणून झोपलेले होते. एवढ्यात डोक्यावरील पाऊलवाटेवर कुणाची तरी पावले घाईघाईने वाजली आणि रणांगणावर जादुमय ठरलेला तो शब्द कुणीतरी ओरडले: "पोस्टमन!"

दोघांनी एकाच वेळी अंगावरची पांघरूणे फेकली. पण मेरेस्येव आपल्या बुटांचे पट्टे बांधत होता तोवर पेत्रोव वर धावला होता, त्याने पोस्टमनला गाठले होते आणि अलेक्सेईची दोन पत्रे घेऊन विजयी मुद्रेने परतला होता. एक पत्र आईचे होते व दुसरे ओल्गाचे. अलेक्सेईने आपली पत्रे झटकन पेत्रोवच्या हातून खेचून घेतली. तेवढ्यात विमानतळावर ढणढण थाळी वाजू लागली. वैमानिकांनी आपापल्या विमानांमध्ये चढण्याचा तो इशारा होता.

मेरेस्येवने ती पत्रे आपल्या शर्टाच्या खिशात कोंबली. त्यांच्याबद्दल तो तात्काळ विसरून गेला आणि पेत्रोवच्या पाठोपाठ जंगलातील पाऊलवाटेवरून आपल्या विमानाकडे धावला. आता तो बराच वेगाने धावत होता, आपल्या हातातील काठीचा उपयोग करीत होता व थोडासाच लंगडत होता. विमानापाशी तो पोहोचला तेव्हा आच्छादन आधीच दूर केलेले होते आणि देवीचे वण चेहऱ्यावर असलेला, हसऱ्या चेहऱ्याचा पोरगेला मेकॅनिक त्याची अधीरपणे वाट पहात होता.

इंजिनाने घरघराट केली. मेरेस्येवने "६" नंबरकडे पाहिले. ते स्क्वाड्रन कमांडरचे विमान होते. कॅप्टन चेस्लोवने आपले विमान उघडचा जागेत आणले. त्याने आपला हात उंचावला – त्याचा अर्थ होता "सावधान!" इतर विमानांची इंजिने घरघरली. निर्माण झालेल्या वाऱ्याच्या झोतांनी गवताची पाती जमिनीवर वाकली. रडणाऱ्या भोजांच्या हिरव्या झिंज्या जणू झाडांपासून तुटून जातील एवढचा फडफडल्या.

अलेक्सेई आपल्या विमानाकडे धावत चालला होता तेव्हा पाठीमागून येऊन त्याला गाठणाऱ्या दुसऱ्या वैमानिकाने ओरडून माहिती दिली होती की, रणगाडे चढाईला निघाले होते. याचा अर्थ विस्कटलेल्या शत्रूच्या मोर्चांमधून रणगाडचांचा मार्ग सुकर व्हावा यासाठी लढाऊ विमानांनी त्यांना संरक्षण द्यायचे होते. हल्ला चढविणाऱ्यांसाठी आकाश मोकळे ठेवायचे होते आणि संरक्षक आच्छादन राखायचे होते. आच्छादन? आकाशाला? काय फरक पडणार होता? अशा घनघोर लढाईत सुखा-समाधानाचे उड्डाण घडणे शक्यच नव्हते. थोडचा-फार अंतराच्या अवधीनंतर त्याची शत्रूच्या विमानांशी गाठ पडणारच होती. आता कसोटी आली होती! कुठल्याही वैमानिकापेक्षा आपण कमी नाही हे तो आता सिद्ध करणार होता. आपले उद्दिष्ट त्याने साध्य केल्याचे दाखविणार होता.

अलेक्सेई किंचित घाबरला होता. पण ठार होण्याच्या धास्तीपायी नव्हे. अत्यंत धैर्यवान आणि अत्यंत थंड प्रवृत्तीच्या माणसांनाही धोक्याच्या जाणीवेने काहीसे अस्वस्थ वाटते. पण तसेही अलेक्सेईला वाटत नव्हते. त्याला दुसरीच चिंता भेडसावीत होती. त्याच्या मशिनगन आणि तोफेची चाचणी घेतलेली झाली ना? लढाईत अद्याप त्याने न वापरलेल्या नव्या शिरस्त्राणामधील कर्णयंत्रे नीट काम करत होती ना? शत्रूशी झुंजायची वेळ आली तर पेत्रोव मागे पडेल का, अथवा फार घाईने पुढे जाईल? काठी कुठे होती? वासिली आगल्येविच यांनी दिलेली ती भेट गमावण्याची त्याची मुळीच इच्छा नव्हती. आगारामध्ये आदल्या दिवशी टेबलावर अर्धवट वाचून घाईघाईने तेथेच ठेवलेली चित्तथरारक कादंबरी कुणीतरी उचलून नेईल, अशी हुरहूरही आत्ता त्याला छळत होती. पेत्रोवचा आपण निरोप न घेतल्याची त्याला आठवण आली आणि कॉकपिटमधून त्याने हात हलविला. पण पेत्रोवचे त्याच्याकडे लक्ष नव्हते. कमांडरने उंचावलेल्या हाताकडे तो अधीरपणे पहात होता.

चामड्याच्या शिरस्त्राणामधील त्याचा चेहरा लालबुंद झाला होता. हात खाली झाला. कॉकपिटवरील झाकणे ओढली गेली.

तीन विमाने रेषेशी पुढे झाली. एकापाठी एक ती धावली. पहिली तीन विमाने आकाशात चढताच मेरेस्येवचा गट पुढे झाला व त्यानेही उड्डाण केले. त्यांच्या खाली सपाट जमीन तरंगू लागली. पुढील तीन विमानांना दृष्टीच्या टप्प्यात राखून मेरेस्येव त्यांच्या पाठीशी समांतर रांगेत आला. त्याच्या मागे तिसरा गट आला.

आघाडीपाशी ते पोहोचले. तोफगोळ्यांच्या आणि बाँबगोळ्यांच्या स्फोटांचे खड्डे पडलेली जमीन विमानातून पाहताना जोरदार पावसाच्या सरीच्या पहिल्या थेंबांनंतर दिसणाऱ्या धुळकट रस्त्याप्रमाणे भासत होती. खोदलेले चर, जाळ्यांची आच्छादने घातलेल्या लपण्याच्या •जागा पुटकुळ्यांप्रमाणे दिसत होत्या. तोफांच्या मोर्चांच्या जागी आता केवळ लाकडांचे व विटांचे ढिगारे दिसत होते. विदीर्ण खोऱ्यामध्ये सर्वत्र पिवळ्या ठिणग्या चमकत होत्या. खाली पेटलेल्या महाप्रचंड लढाईच्या त्या खुणा होत्या. वरून सर्व दृश्य किती छोटे, खेळण्यासारखे आणि विलक्षण दिसत होते! खाली जमिनीवर प्रत्येक गोष्ट जळत होती, तडफडत होती, विदीर्ण भूमीवर धूर आणि काजळीमधून मृत्यू झडपा घालीत चालला होता, त्याला अपरंपार भक्ष्ये मिळत होती, ह्यावर क्वचितच कुणाचा विश्वास बसला असता.

युद्धरेषेवरून ते उडत गेले, शत्रूच्या पिछाडीला त्यांनी अर्धवर्तुळ घेतले आणि पुन्हा एकदा युद्धरेषा ओलांडली. कुणीही त्यांच्यावर मारा केला नाही. खाली जमिनीवरील मंडळी आपल्या ऐहिक भानगडींमध्ये एवढी गुंतलेली होती, की त्यांच्या डोक्यांवर घिरट्या घालणाऱ्या नऊ छोट्या विमानांकडे लक्ष द्यायला त्यांना अवसर नव्हता. पण रणगाडे कुठे होते? अरेच्चा! ते पहा! जंगलामधून एका पाठोपाठ एक ते सरपटत बाहेर येताना मेरेस्येवला दिसले. आकाशामधून ते राखाडी रंगाच्या बेढब किड्यांसारखे दिसत होते. लौकरच अनेक रणगाडे जंगलाबाहेर पडले. तरीही झाडीमधून येणारी रांग थांबली नव्हती. रस्त्यांच्या आणि खोलगट प्रदेशांच्या कडेने ते पुढे सरपटत होते. सर्वांत पुढील रणगाडा टेकडीवर चढला आणि स्फोटांनी विवर्ण झालेल्या मैदानापर्यंत पोहोचला. त्यांच्या सोंडांमधून लाल ठिणग्या उडाल्या. मेरेस्येवबरोबर विमानात बसून एखाद्या लहान मुलाने किंवा घाबरट स्वभावाच्या बाईने जमिनीवरील हा रणगाड्यांचा प्रचंड हल्ला निरखला असता

तरी ती मुळीच भ्यायली नसती. उरल्यासुरल्या जर्मन फळयांवर ते रणगाडे सर्व शक्तीनिशी धावून जात होते. एवढयात शिरस्त्राणामधील कर्णयंत्रांमधून अनेक आवाजांच्या गोंगाटात त्याला कॅप्टन चेस्लोवचा घोगरा व शुष्क आवाज ऐकू आला :

"सावधान! मी लिओपार्द तीन! मी लिओपार्द तीन! उजवीकडं "युंकर", "युंकर!"

अलेक्सेईला नजरेसमोर एक छोटी आडवी रेषा दिसत होती. ते कमांडरचे विमान होते. ते विमान डोलले. त्याचा अर्थ होता : "माझ्याप्रमाणे करा!"

आपल्या सहकाऱ्यांसाठी मेरेस्येवने त्या हुकूमाचा पुनरुच्चार केला. त्याने भोवती पाहिले. त्याचा अनुयायी त्याच्या शेजारीच होता. त्याच्याशी अगदी समांतर राहून उड्डाण करीत होता. पोरगा छान होता!

"मित्रा, घट्ट धरून रहा!" तो त्याला उद्देशून ओरडला.

"मी तसाच वागतोय," कडकड आवाजांच्या गोंगाटामधून शब्द आले.

पुन्हा कॅप्टनचा आवाज उमटला :

"मी लिओपार्द तीन, लिओपार्द तीन! माझ्यामागं चला!"

शत्रू जवळ आला होता. जर्मनांच्या आवडत्या रचनेनुसार, म्हणजे एकापाठोपाठ एक अशा रीतीने, एका इंजिनाची, सूर मारणारी "यू-८७" बाँबफेकी विमाने सोविएत विमानांच्या अगदी खालूनच उडत होती. पोलंड, फ्रान्स, हॉलंड, डेन्मार्क, बेल्जियम आणि युगोस्लावियामध्ये ह्या चांच्या विमानांनी युद्धाच्या आरंभीच्या वर्षात धुमाकूळ घातला होता. ह्या नव्या जर्मन शस्त्राच्या भयानकतेविषयी जगभर वृत्तपत्रांमधून रकानेच्या रकाने छापून आले होते. पण विस्तीर्ण सोविएत प्रदेशावर ही विमाने निःष्प्रभ ठरली होती. असंख्य हवाई झुंजींमध्ये सोविएत वैमानिकांनी ह्या विमानांमधील वैगुण्ये हेरली होती. त्यानंतर खंदे सोविएत वैमानिक ह्या युंकर विमानांना कस्पटासमान मानू लागले होते. त्यांच्याशी झुंजणे म्हणजे पाणकोंबडयांची किंवा सशांची शिकार मानू लागले होते.

कॅप्टन चेस्लोवने आपले स्क्वाड्रन शत्रूवर थेट भिडवले नाही. त्याने थोडा वळणाचा मार्ग पत्करला. सावध कॅप्टन "सूर्याला आपल्यापाठी" घालू पहात होता व तेजस्वी सूर्यकिरणांचा आडोसा धरून शत्रूच्या नकळत त्याच्यापाशी सरकून त्याच्यावर हल्ला चढविण्याचा त्याचा इरादा होता,

असे मेरेस्येवला वाटले. अलेक्सेई स्वतःशीच हसला. त्याच्या मनात आले: "हा अवघड डावपेच लढवून तो त्या युंकर विमानांचा फारच मान राखतोय. पण सावध राहण्यात काहीच नुकसान नाही." त्याने परत सभोवार पाहिले. पेत्रोव त्याच्या मागेच होता. पांढऱ्या ढगाच्या पार्श्वभूमीवर त्याला तो स्पष्ट पाहू शकत होता.

जर्मन पथक आता त्यांच्या उजव्या अंगाला होते. जणू काही अदृश्य धाग्यांनी एकमेकांना बांधल्याप्रमाणे त्यांची विमाने सुंदर रचनेत, एकसारखी उडत होती. त्यांचे पंखे सूर्यप्रकाशात चमचमत होते.

कमांडरच्या हुकूमातील अखेरचे शब्द अलेक्सेईला ऐकू आले:

"...लिओपार्द तीन. हल्ला चढवा!"

चेस्लोव आणि त्याचा अनुयायी शत्रूच्या फळीवर बहिरीससाण्यांप्रमाणे तुटून पडलेले मेरेस्येवने पाहिले. सर्वांत जवळच्या युंकर विमानावर काडतूसांची फैर उडाली. युंकर खाली कोसळले व जर्मन फळीत पडलेल्या भगदाडामधून चेस्लोव आणि त्याचे दोन अनुयायी घुसले. जर्मन वैमानिक तात्काळ जवळ झाले व युंकर विमाने पुन्हा रांगेत उडू लागली.

अलेक्सेईने इशारा दिला. त्याला ओरडायचे होते: "हल्ला चढवा!" पण तो एवढा उत्तेजित झाला होता की "हल्ला ऽऽ" एवढेच शब्द त्याच्या तोंडून उमटले. एव्हाना तो खाली झेपावत होता. संथ उडणाऱ्या जर्मन विमानांच्या रेषेविना दुसरे-तिसरे त्याला काहीही दिसत नव्हते. चेस्लोवने पाडलेल्या विमानाची जागा ज्या युंकरने घेतली होती त्याच विमानाला मेरेस्येवने आपले लक्ष्य म्हणून निवडले. त्याच्या कानात जोरजोरात घंटा वाजत होत्या. त्याचे काळीज एवढ्या जोराने धडधडत होते की त्याचा जवळ जवळ जीव घुसमटला. आपल्या भक्ष्यावर त्याने माशी रोखली व चापांच्या बटणांवर दोन्ही अंगठे टेकवून तो झेपावला. पांढुरक्या धुराची रेषा त्याच्याजवळून सरकून गेली. अरेच्चा! ते सुद्धा गोळ्या झाडताहेत! चुकला! पुन्हा! ह्या वेळी जास्त जवळ. काही नुकसान नाही! पेत्रोवचे काय? त्यालाही मार बसलेला नाही. तो डाव्या बाजूला आहे. त्यांना खिळवून धरलेय. शाबास! जर्मन विमानाची राखाडी कूस त्याच्या माशीवर लांबोळकी बनली. त्याच्या अंगठ्यांना थंडगार ॲल्युमिनियमच्या बटणांचा स्पर्श झाला. आणखी जरा जवळ...

त्या क्षणाला आपल्या विमानाशी आपण संपूर्ण एकजीव झाल्याचे

अलेक्सेईला जाणवले. इंजिनाची धडधड म्हणजे आपल्याच छातीमध्ये चाललेली धडधड होती असे त्याला वाटले. पंखांची व शेपटाची संवेदना त्याला सर्वांगाने जाणवली. आपले वेडेवाकडे, कृत्रिम पायसुद्धा संवेदनाक्षम बनले होते आणि विमानाच्या वेगवान हालचालींमध्ये ते मुळीच अडथळा आणत नव्हते असे त्याला भासले. फॅसिस्ट विमानाची डौलदार, सडपातळ आकृती त्याच्या माशीवरून निसटली, पण त्याने पुन्हा तिला धरली आणि चाप दावला. गोळया उडाल्याचे आवाज त्याने ऐकले नाही, काडतूसांची उडालेली माळसुद्धा त्याने पाहिली. पण आपली शिकार फत्ते झाल्याचे त्याला समजले व तो पुढे सरला. त्याचे सावज आता खाली कोसळणार होते आणि त्याच्याशी टक्कर टळणार होती. माशीवरून नजर दूर काढताच आणखी एक विमान कोसळत असलेले त्याच्या दृष्टीस पडले व तो चकित झाला. त्याने दोन विमाने पाडली काय? नाही. ती पेत्रोवची कामगिरी होती. तो त्याच्या उजव्या अंगाला होता. ह्या नवख्याने सलामी तर छान दिली होती! स्वतःच्या यशापेक्षा पेत्रोवच्या यशाचा मेरेस्येवला जास्त आनंद झाला.

जर्मन फळीला पडलेल्या भगदाडामधून दुसरी तीन सोविएत विमाने निसटली. आणि मग गंमतीला आरंभ झाला. जर्मन विमानांची दुसरी लाट आली. ही विमाने कमी अनुभवी वैमानिक चालवीत होते हे स्पष्ट दिसत होते. त्यांनी आपली रचना मोडली. उधळलेल्या युंकरांमध्ये चेस्लोवचा गट घुसला, त्याने त्यांचा पाठलाग केला व त्यांचे बॉंब त्यांना स्वतःच्याच मोर्चांवर घाईघाईने टाकायला भाग पाडले. आपला डावपेच लढविताना कॅप्टन चेस्लोवने नेमके हेच मनाशी योजले होते – शत्रूला स्वतःच्याच मोर्चांवर बॉंब टाकायला भाग पाडायचे! केवळ सूर्य पाठीशी घालायचा एवढेच काही त्याचे मुख्य उद्दिष्ट नव्हते.

मात्र जर्मनांची पहिली रांग परत निकट झाली आणि रणगाड्यांनी फळी फोडली होती त्या दिशेने युंकर विमानांनी मोहरा धरला. सोविएत विमानांच्या तिसऱ्या गटाने केलेला हल्ला अयशस्वी झाला होता. जर्मनांनी एकही विमान गमावले नाही. उलट जर्मन वैमानिकाने एक सोविएत लढाऊ विमान पाडले. रणगाडे जेथे हल्ला चढविणार होते त्या जागेच्या ते जवळ येत होते. उंचीवर जायला वेळ नव्हता. धोका पत्करून खालूनच हल्ला चढविण्याचा चेस्लोवने निर्णय घेतला. मनातल्या मनात अलेक्सेई त्याच्याशी सहमत झाला. शत्रूच्या पोटात "मुसंडी" मारण्याच्या "ला-५" विमानांच्या

लंवपातळी हालचालींचा फायदा घ्यायला तो उत्सुक होता. पहिला गट एव्हाना काडतूसांचे कारंजे वर उडवीत होता. दोन जर्मन विमाने तात्काळ खाली कोसळली. त्यातील एकाचे दोन तुकडे झाले असावे, कारण ते अचानक दुभंगले व त्याच्या शेपटीवर मेरेस्येवचे इंजिन आपटायचे थोडक्यात चुकले.

"माझ्यामागून चल!" मेरेस्येव ओरडला आणि पेत्रोवच्या विमानाच्या छायाकृतीकडे तिरपा कटाक्ष टाकून त्याने आपल्या विमानाचा दांडा खेचला.

जमीन उलटी दिसू लागली. जोराचा दणका बसावा त्याप्रमाणे अलेक्सेई आपल्या खुर्चीत मागे फेकला गेला. तोंडात आणि ओठांवर त्याला रक्ताची खारट चव जाणवली. त्याच्या डोळ्यांसमोर अंधारी आली. त्याचे विमान उभेच्या उभे उडू लागले. युंकरच्या पोटावरील ठिपके, त्याच्या जाड चाकांचे गंमतीदार लांबुळके पायबंद, विमानतळावरील मातीची त्यांना चिकटलेली ढेकळे वगैरे सर्व गोष्टी त्याच्या नजरेसमोर झर्रदिशी चमकून गेल्या.

त्याने चापाची बटणे दाबली. शत्रूच्या विमानाला त्याने टाकीवर, इंजिनावर वा बाँबच्या पेटीवर तडाखा मारला ते त्याला समजले नाही. पण स्फोटाच्या तपकिरी धुरात ते विमान क्षणार्धात नाहीसे झाले.

स्फोटाने मेरेस्येवचे विमान एका बाजूला कलले व आगीच्या एका गोळ्यापासून वेगाने पसार झाले. अलेक्सेईने आपल्या विमानाचा तोल सावरला आणि आकाश न्याहाळले. त्याचा अनुयायी उजव्या अंगाने उडत होता. साबणाच्या फुग्यांप्रमाणे दिसणाऱ्या शुभ्र ढगांच्या सागरावरून अथांग निळाईत त्याचे विमान तरंगत जात होते. आकाश रिते झाले होते. फक्त क्षितीजावर, दूरच्या ढगांच्या पार्श्वभूमीवर बारीक ठिपके दिसत होते. वेगवेगळ्या दिशांना विखरून गेलेली ती युंकर विमाने होती. अलेक्सेईने आपल्या घड्याळाकडे नजर टाकली आणि तो चकित झाला. त्याला वाटले होते की, आकाशातील झुंज किमान अर्धा तास चालली होती आणि त्याचे पेट्रोल आता संपत आले असावे. पण आकाशामधील लढाई फक्त साडेतीन मिनिटे चालल्याचे घड्याळ दाखवीत होते.

"जिवंत आहेस?" आपल्या अनुयायाकडे नजर टाकीत त्याने विचारले.

"सरपटत येऊन" त्याचा अनुयायी आता त्याच्याशी समांतर उडत होता.

कर्णयंत्रांमधून येणाऱ्या अनेक आवाजांमधून त्याने दूर भासणारा, उत्तेजित स्वर ऐकला:

"जिवंत आहे... खाली... खाली पहा..."

खाली डोंगराळ खोऱ्यामध्ये इंधनाच्या टाक्या अनेक ठिकाणी धडाडून पेटल्या होत्या. स्तब्ध वातावरणात दाट धुराचे लोट उठत होते. पण शत्रूच्या विमानांच्या जळक्या अवशेषांकडे अलेक्सेईने लक्ष दिले नाही. मैदानांमधून वेगाने सरपटत जाणाऱ्या हिरवट-राखाडी किड्यांवर त्याची नजर खिळली होती. दोन खोलगट प्रदेशांमधून ते शत्रूच्या मोर्चांपर्यंत सरपटत गेले होते व पुढील रणगाडे तर एव्हाना खंदकांना तुडवून जात होते. त्यांच्या सोंडांमधून तांबड्या ठिणग्या उडत होत्या. शत्रूच्या फळ्यांमधून ते रांगत पुढे पुढे जात होते. मात्र अजूनही त्यांच्या पिछाडीला स्फोट उडत होते आणि जर्मन तोफांमधून निघणारा धूर दिसत होता. शत्रूच्या उध्वस्त मोर्चांमध्ये खोलवर घुसलेले हे शेकडो किडे म्हणजे रणांगणावरील परिस्थिती काय होती, याची मेरेस्येवला कल्पना होती.

सोविएत जनता आणि सर्व स्वातंत्र्यप्रेमी देशांमधील जनता उद्याच्या वर्तमानपत्रांमध्ये अत्यंत आनंदाने व उल्हासाने काय वाचणार होती ते तो त्या क्षणी प्रत्यक्ष पहात होता. दोन तास तोफांचा मारा करून सोविएत सेनेने कूर्स्कच्या फुगवटयामधील एका क्षेत्रात शत्रूची फळी फोडली होती आणि चढाई करणाऱ्या सोविएत सेनादलांसाठी रस्ता मोकळा करून दिला होता.

कॅप्टन चेस्लोवच्या स्क्वाड्रनमधील नऊ विमानांपैकी दोन विमाने तळावर परतली नाही. नऊ युंकर विमाने पाडण्यात आली. विमानांची हानी मोजता नऊला दोन हे प्रमाण निश्चितच चांगले होते. पण दोन साथीदारांच्या मृत्यु-मुळे विजयाच्या आनंदाला गालबोट लागले. सर्वसाधारणपणे यशस्वी झुंजी-नंतर वैमानिक मंडळी विमानांमधून उतरताच आनंदाने आरोळ्या ठोकतात, लढाईसंबंधी पुनःपुन्हा चर्चा करतात, नुकतेच पार पडलेले त्यांच्या आयु-ष्यातील धोक्याचे क्षण पुन्हा जगतात. पण यावेळी तसे कुणीही वागले नाही. उदास मुद्रांनी ते चीफ ऑफ स्टाफपाशी गेले; शुष्क आणि त्रोटक शब्दात अहवाल देऊन एकमेकांकडे नजरही न टाकता ते निघून गेले.

विंगमध्ये अलेक्सेई नवा होता. ठार झालेले दोन लोक त्याच्या माहितीचे नव्हते. पण तेथील एकूण वातावरणाचा त्याच्यावरही परिणाम झाला. त्याच्या आयुष्यातील सर्वांत मोठी आणि महत्त्वाची घटना घडली होती. ज्या गोष्टीसाठी तो तन-मनाने झटला होता आणि जी गोष्ट त्याच्या आयुष्याचा

पुढील क्रम निश्चित करणार होती, ती गोष्ट घडली होती. वैमानिकांच्या रांगेत तो पुनश्च दाखल झाला होता. हे स्वप्न त्याने किती वेळा पाहिले होते : इस्पितळातील बिछान्यावर पडून असताना; नंतर चालायला आणि नाचायला शिकताना; अवघड प्रशिक्षण पार पाडून वैमानिक म्हणून परत कसब मिळवताना! आणि आता तो दीर्घ वांच्छित दिवस उगवल्यानंतर, दोन जर्मन विमाने त्याने पाडल्यानंतर, लढाऊ वैमानिकांच्या रांगेत सारख्याच मानाचे स्थान त्याला मिळाल्यानंतर, इतरांप्रमाणेच त्याने चीफ ऑफ स्टाफ-समोर आपला अहवाल दिला होता, परिस्थितीचा खुलासा केला होता आणि आपल्या अनुयायाची स्तुती केली होती व नंतर भोजाच्या झाडाच्या सावलीत वसून त्या दिवशी न परतलेल्या लोकांविषयी तो विचार करीत राहिला.

एकटा पेत्रोव तेवढा सर्व विमानतळभर उत्साहाने धावत होता. शिरस्त्राण नसल्यामुळे त्याचे सोनेरी केस वाऱ्याने भुरूभुरू उडत होते. वाटेत भेटणाऱ्या प्रत्येकाच्या बाहूला धरून तो सांगत होता :

"...अगदी माझ्या शेजारी, हाताच्या अंतरावर तो होता... ऐक... सीनियर लेफ्टनंट त्यांच्या पुढाऱ्यावर नेम धरत असलेला मी पाहिला... त्याच्या जवळच्याला मी माझ्या माशीच्या टप्प्यात आणलं. ठो ठो!"

मेरेस्येवपाशी तो धावत गेला. मऊ, गवताळ शेवाळयावर त्याच्या पायाशी धपकन खाली बसला आणि त्याने आपले शरीर तणावून दिले. पण अशा आरामशीर अवस्थेत त्याला फार वेळ स्वस्थ बसवले नाही. परत उडी मारून उठत तो उद्‌गारला :

"आज तुम्ही काही विलक्षण डावपेच लढवले! झकास! माझा तर श्वास घुसमटला बघताना! ... त्या वैमानिकाला मी कसं पाडलं ठाऊक आहे? ऐका... मी तुमच्या मागोमाग येत होतो आणि एकदम त्याला अगदी माझ्या शेजारी पाहिलं... अगदी आत्ता तुम्ही माझ्यापासून आहात तेवढ्या अंतरावर..."

"अरे भल्या गृहस्था, जरा थांब," अलेक्सेईने त्याला मध्येच अडवले व आपले खिसे चाचपले. "ती पत्रं! ती पत्रं कुठं ठेवली मी?"

त्या दिवशी त्याला मिळालेल्या पत्रांची आता त्याला आठवण झाली होती. ती पत्रे वाचायला अजूनपर्यंत त्याला सवडच मिळाली नव्हती. आपल्या खिशांमध्ये त्याला ती पत्रे सापडेनात तेव्हा मात्र त्याला दरदरून घाम फुटला. आपल्या शर्टाच्या आत त्याने हात सरकावला, लिफाफ्यांची सळसळ

त्याला जाणवली व त्याने सुटकेचा निःश्वास टाकला. पेत्रोवच्या उत्साही निवेदनाकडे लक्ष न देता त्याने ओल्गाचे पत्र हाती घेतले व काळजीपूर्वक लिफाफा फोडला.

तेवढ्यात एक अग्निबाण उडाला. एक लाल, संतप्त साप आकाशात झेपावला आणि विमानतळावर कमान करून अदृश्य झाला. त्याच्यापाठी फक्त राखी धुराचा पट्टा सावकाशपणे विरत गेला. वैमानिक तात्काळ उठले. एकही शब्द न वाचता अलेक्सेईने ते पत्र परत शर्टाच्या आत खुपसले. लिफाफा उघडताना आतमध्ये कागदाशिवाय काहीतरी कठीण वस्तू असल्याचे त्याला जाणवले होते. आता परिचित झालेल्या मार्गावरून उड्डाण करीत असताना तो खिशातील लिफाफा अधूनमधून चाचपत होता आणि त्यात काय असावे याबद्दल नवल करीत होता.

ज्या दिवशी रणगाडादलाने शत्रूचे खिंडार फोडले तेव्हापासून अलेक्सेई ज्या गार्डस् लढाऊ हवाई दलात होता त्या दलाचा घाईगर्दीचा कालखंड सुरू झाला. खिंडार पडलेल्या स्थळी स्क्वाड्रनमागून स्क्वाड्रन उड्डाण करीत होते. लढाई करून एक स्क्वाड्रन तळावर उतरते न उतरते तोच दुसरे स्क्वाड्रन हवेत झेपावत होते. तळावर उतरलेल्या विमानांमध्ये इंधन भरण्या-साठी इंधनाचे ट्रक तात्काळ धावत होते. रिकाम्या टाक्यांमध्ये पेट्रोल वाहात होते. शेतामध्ये उबदार, उन्हाळी पाऊस पडल्यानंतर जशा वाफा निघतात, तशी तापलेल्या इंजिनांवर हवा थरथरत होती. जेवणासाठी देखील वैमानिक कॉकपिटमधून खाली उतरत नव्हते. ॲल्युमिनियमच्या पात्रांमधून त्यांच्या-साठी विमानापर्यंत जेवण आणून दिले जात होते. पण कुणालाही खाण्याची इच्छा होत नव्हती. अन्न त्यांच्या घशांमध्ये अडकत होते.

कॅप्टन चेस्लोवचे स्क्वाड्रन पुन्हा तळावर उतरले आणि विमानांना जंगलच्या कडेला ओढत नेण्यात येऊन त्यांच्या टाक्यांमध्ये इंधन भरण्यात येऊ लागले. दरम्यान मेरेस्येव कॉकपिटमध्ये सस्मित चेहऱ्याने बसला होता. एक सुखद, दुखरा थकवा त्याला जाणवत होता. आकाशाकडे अधीर नजर टाकत तो इंधन भरणाऱ्यांना घाई करीत होता. झुंजीमध्ये परत जाण्याची, पुन्हा एकदा आपले कसब जोखण्याची त्याला ओढ लागली होती. आपल्या सदऱ्याच्या आत हात खुपसून वारंवार तो पत्र चाचपून पहात होता. पण अशा परिस्थितीत ते पत्र वाचण्याची त्याची इच्छा नव्हती.

अखेरीस संध्याकाळ झाली, अंधार पडला आणि वैमानिकांना रजा

देण्यात आली. मेरेस्येव आपल्या निवासाकडे चालत निघाला. एरवी तो जंगलामधून जवळच्या वाटेने जाई, पण आज मात्र त्याने तण वाढलेल्या मैदानातील दूरचा रस्ता धरला. त्याला आपले मन ताळ्यावर आणायचे होते. सगळ्या घाई-गडबडींनतर विसावा घ्यायचा होता. तो दिवस जणू संपणारच नाही असे भासले होते आणि वेगाने बदलत गेलेल्या मन:स्थितींचा त्याला पुन्हा एकदा स्वस्थ चित्ताने आढावा घ्यायचा होता.

संध्याकाळचे वातावरण नितळ, सुगंधित होते. त्या शांततेमध्ये दूरवरचे तोफांचे आवाज लढाईच्या आवाजांप्रमाणे वाटत नव्हते, तर बाजूने जाणाऱ्या तुफानाची मेघगर्जना भासत होती. पूर्वी रायचे शेत असलेल्या मैदानातून रस्ता जात होता. एरवी सर्वसामान्य मानवी जगात एखाद्या आवाराच्या कोपऱ्यात अगर मालकाच्या नजरेचा टप्पा पोहोचणार नाही अशा दूरवर शेताच्या बांधाशी दगडांच्या ढिगावर उगवणारे रानगवताचे उदास दांडोरे ह्या ठिकाणी मात्र एखाद्या महाप्रचंड, उर्मट, अभेद्य भिंतीप्रमाणे उभे होते. कष्टकऱ्यांच्या अनेक पिढ्यांनी घाम गाळून सुपीक बनवलेल्या ह्या जमिनीवर आता रानगवताने आपले अधिराज्य प्रस्थापित केले होते. गवताच्या दुबळ्या पात्यांप्रमाणे जंगली रायची थोडीशी बारीक कणसे ह्या माजलेल्या रानगवताशी टक्कर देऊन कशीबशी उभी होती. रानगवताने जमिनीचा सगळा कस खाऊन फस्त केला होता, सगळे सूर्यकिरण शोषून घेतले होते, रायच्या पिकाला उजेड आणि जीवनरस मिळू दिले नव्हते. त्यामुळे ही थोडीशी कणसें फुलण्यापूर्वीच सुकून गेली होती. त्यांच्यात दाणा धरलाच नव्हता.

मेरेस्येवच्या मनात विचार आला: फॅसिस्टांना असेच आमच्या भूमीत मूळ धरायचे होते, आमच्या मातीचा कस खाऊन फस्त करायचा होता, आमची संपदा लुटायची होती, असे भयानक आणि उर्मटपणे रहायचे होते, सूर्याला झाकून टाकून आमच्या थोर, श्रम-प्रेमी बलाढ्य लोकांना त्यांच्या शेतांमधून व बागांमधून हाकून लावायचे होते, त्यांना सर्व गोष्टींपासून वंचित करायचे होते; भक्कम आणि सुंदर धान्याचे बाह्यस्वरूपही गमावून बसलेल्या ह्या दुबळ्या कणसांना रानगवताने जसे चिरडून टाकले तसे फॅसिस्ट आमच्या लोकांना चिरडून टाकू पहात होते. अलेक्सेईच्या देहात बालसुलभ ताकद संचारली आणि आपली हस्तीदंती काठी त्याने तांबूस, गिधाडलेल्या रानगवताच्या दांडोऱ्यांवर सपासप चालविली. त्या उर्मट रानगवताचे शेंडे झपक्यांनी तुटून पडले तेव्हा त्याला समाधान वाटले. त्याच्या चेहऱ्यावरून

घामाच्या धारा निथळल्या. पण रायची मुस्कटदाबी करणाऱ्या त्या रानगवताला तो झोडपत राहिला. त्याच्या थकल्या देहामध्ये लढण्याची आणि कृतीची संवेदना सुखाने अनुभवीत राहिला.

अगदी अनपेक्षितपणे त्याच्यामागे एक जीप फर्रर्र आवाज करीत थांबली. मागे न पाहताही अलेक्सेईने तर्काने जाणले की, विंग कमांडरनी त्याला गाठले होते व त्याचा हा पोरकट उद्योग पाहिला होता. शरमेने अलेक्सेईचे कान लाल झाले. जीप जवळ आल्याचे आपण ऐकलेच नाही असा बहाणा करून तो आपल्या काठीने जमीन खणत राहिला. पण कर्नलचा आवाज त्याला ऐकू आला :

"त्यांना तोडता काय? चांगला उपयुक्त धंदा आहे. मी तुम्हाला सगळीकडं शोधलं. आपला हीरो कुठेय? आणि हा हीरो इथं रानगवताशी लढत बसलाय!"

कर्नलनी जीपमधून खाली उडी टाकली. त्यांना मोटार चालवायला आवडायचे आणि रिकाम्या वेळात मोटारच्या इंजिनाशी ते खुडबूड करीत बसायचे. तसेच अवघड कसरतींमध्ये आपल्या विंगचे नेतृत्व करायला त्यांना आवडायचे आणि संध्याकाळच्या वेळी तेलकट इंजिनांशी मेकॅनिकांबरोबर खुडबूड करायला त्यांना आवडायचे. बहुतेक वेळा ते निळे मलवस्त्र वापरीत. केवळ त्यांचा धारदार चेहरा आणि त्यांची रुबाबदार, नवी टोकदार टोपी ह्यांच्यामुळेच ते मळकट-तेलकट मेकॅनिकांच्या जमावातून वेगळे ओळखू येत.

अजूनही शरमिंद्या मन:स्थितीमध्ये असलेला मेरेस्येव उगीचच काठीने जमीन उकरीत उभा होता. कर्नल त्याच्या खांद्यावर हात ठेवीत म्हणाले :

"जरा तुमच्याकडं नजर टाकू दे मला! हात्तिच्या! काहीच विशेष नाही! आता मी कबूल करू शकतो. तुमच्याबद्दल लष्करी मुख्य ठाण्यात खूप सांगितलं गेलं होतं तरी तुम्ही प्रथम आलात तेव्हा त्या कुठल्याही गोष्टीवर माझा विश्वास बसला नव्हता. लढाईमधून तुम्ही पार पडाल याबद्दल माझी खात्री पटत नव्हती. पण तुम्ही खरंच कर्तृत्व दाखवलंत! अफाट...! आपल्या मायभूमी रशियातच असे चमत्कार घडतात! अभिनंदन! मी तुमचं अभिनंदन करतो आणि कौतुकही करतो. मुक्कामावर चाललात? मी तुम्हाला मोटारीतून सोडतो."

मैदानी रस्त्यामधून जीप भरवेगाने धावत होती. वळणांवर भन्नाट जात होती.

"तुम्हाला काही गरज असली, कांही अडचण असली तर मला सांगा! मुळीच लाजू नका. समजलं? तुमचा तो हक्क समजा," कर्नल म्हणाले. वैमानिकांनी आपल्या निवासाच्या स्थळांना "वारूळे" असे टोपणनांव ठेवले होते. त्या "वारूळां"कडे कर्नल कुशलतेने जीप चालवीत जात होते.

"मला कशाचीही गरज नाही कॉम्रेड कर्नल. इतर कुणाहीपेक्षा मी वेगळा नाही. मला पाय नाहीत हे जर लोक विसरले तर फार बरं होईल," मेरेस्येव उत्तरला.

"खरंच, बरोबर आहे तुमचं! तुमची जागा कोणती? ही?"

भुयारी निवासस्थानाच्या दाराशी कर्नलनी जोरदार वळण घेऊन जीप थांबवली. मेरेस्येव खाली उतरला असेल नसेल तेवढ्यात समोरच्या जंगलामधून झाडांना चुकवीत जीप पसार झाली.

अलेक्सेई भुयारी घरात गेला नाही. एका भोजाच्या झाडाखाली लोकरीसारख्या, अळंब्यांचा गंध येणाऱ्या शेवाळयावर तो पहुडला. ओल्गाचे पत्र त्याने लिफाफ्यामधून हळुवारपणे बाहेर काढले. एक फोटो निसटला व गवतावर पडला. अलेक्सेईने पटकन तो वर उचलला. त्याच्या काळजाचे जलद ठोके पडत होते.

एक परिचित, तरीही ओळखू न येणारा चेहरा त्या फोटोमधून त्याच्याकडे टक लावून पहात होता. ती लष्करी गणवेषामधील ओल्गा होती. लष्करी शर्ट, तलवारीचा कमरपट्टा, लाल ताऱ्याचा किताब आणि गार्डची फीतसुद्धा! तिला हे सर्व खुलून दिसत होते. अंमलदाराच्या गणवेषामधील देखण्या मुलाप्रमाणे ती दिसत होती. फक्त ह्या मुलाचा चेहरा थकलेला होता आणि त्याच्या टपोऱ्या, गोल, तेजस्वी डोळयांमध्ये एक प्रौढ, भेदक भाव होता.

त्या डोळयांकडे अलेक्सेई खूप वेळपर्यंत टक लावून पहात राहिला. आवडत्या गाण्याचे स्वर संध्याकाळच्या वेळी दूरवरून ऐकू आले म्हणजे एखाद्याच्या अंतःकरणात जशी गोड खिन्नता भरून येते, तसे त्याचे या क्षणाला झाले. आपल्या खिशामधून त्याने ओल्गाचा पूर्वीचा फोटो काढला. शुभ्र, तारकांसमान डेझीच्या फुलांमध्ये कुरणात ती बसली होती: फुलाफुलांचा फ्रॉक घालून. त्याने कधीही न पाहिलेली लष्करी गणवेषामधील थकल्या डोळयांची मुलगी ही त्याला ठाऊक असलेल्या मुलीपेक्षा त्याला जास्त प्रिय होती, असे म्हणणे विचित्र ठरले असते. पण ते खरे होते. नव्या फोटोच्या मागे लिहिले होते: "नेहमी आठव!"

पत्र छोटेच, पण मजेदार होते. खंदक खणणाऱ्या पलटणीचे आता तिच्याकडे नेतृत्व होते. मात्र ही पलटण लढत नव्हती, तर शांततामय कामात गुंतली होती. स्तालिनग्राद नव्याने बांधायला मदत करीत होती. स्वतःबद्दल तिने फार थोडे लिहिले होते. पण स्तालिनग्रादसंबंधी, तेथील पुनरुज्जीवित होणाऱ्या इमारतींविषयी, नगरीच्या उभारणीसाठी देशाच्या सर्व भागांमधून तेथे आलेल्या बायका, मुली व तरुणांविषयी तिने खूप उचंबळून लिहिले होते. शहर नव्याने बांधायला आलेले हे लोक तळघरांमध्ये, तोफांच्या खोलगट मोर्चांमध्ये, लढाईनंतर रित्या पडलेल्या खळग्यांमध्ये, रेल्वेच्या डब्यांमध्ये, लाकडी खोपटांमध्ये आणि भुयारी घरांमध्ये रहात होते. ओल्गाने लिहिले होते की, चांगले काम करणाऱ्या प्रत्येकाला नव्याने बांधलेल्या शहरात रहायला गाळा मिळणार असा लोकांमध्ये प्रवाद होता. ही गोष्ट जर खरी असेल तर युद्धानंतर अलेक्सेईला खात्रीने रहायला जागा असणार, असेही तिने सुचविले होते.

उन्हाळ्यामध्ये संधिप्रकाश फार थोडा वेळ असतो. त्यामुळे पत्राच्या शेवटच्या ओळी अलेक्सेईला विजेरीच्या प्रकाशात वाचाव्या लागल्या. पत्र वाचून झाल्यानंतर त्याने प्रकाशझोत फोटोवरून फिरविला. ती सैनिक मुलगी त्याच्याकडे कणखर, प्रामाणिक डोळ्यांनी पहात होती. "लाडके, तुला खूप कष्टांमधून जगावं लागतंय... युद्धानं तुझी गय केली नाही, पण त्यानं तुला मोडून टाकलं नाही! तू वाट पाहते आहेस? थांब. मी येईन. तू माझ्यावर प्रेम करतेस. लाडके, माझ्यावर सदैव प्रेम कर." एकदम अलेक्सेईला शरम वाटली. तिच्यापासून, स्तालिनग्रादच्या रणदिव्यातून पार पडलेल्या तिच्यासारख्या मुलीपासून, त्याने स्वतःवर कोसळलेल्या दुर्दैवाची बातमी गेले अठरा महिने लपवून ठेवली होती. तात्काळ भुयारी घरात जावे आणि प्रांजलपणे तिला सर्व काही लिहून कळवावे असे त्याला तीव्रतेने वाटले. तिचा तिलाच निर्णय करू दे! जेवढा अधिक लौकर तेवढे अधिक चांगले! सर्व काही निश्चित झाले म्हणजे दोघांच्याही दृष्टीने अधिक सोपे गेले असते.

त्या दिवशी त्याने साध्य केलेल्या यशानंतर आता समपातळीवर तो तिच्याशी बोलू शकत होता. तो केवळ विमान उडवीत नव्हता, तर लढतही होता. त्याने स्वतःशी प्रतिज्ञा केली नव्हती का? एक तर जेव्हा त्याच्या सर्व आशा धुळीला मिळतील तेव्हा, अगर लढाईत तो इतरांच्या बरोबरीला

येईल तेव्हा त्याने तिला सर्व काही सांगायचे! आता त्याने आपले उद्दिष्ट गाठले होते. त्याने पाडलेली दोन विमाने सर्वांच्या डोळ्यांदेखत भस्मसात झाली होती. विंगच्या नोंदवहीत त्या दिवशी ह्या घटनेची नोंद झाली होती. डिव्हिजनच्या आणि सेनेच्या मुख्य ठाण्यांना व मॉस्कोला याचा अहवाल गेला होता.

हे सर्व खरे होते. त्याने आपली प्रतिज्ञा पूर्ण केली होती आणि आता तो लिहू शकत होता. पण विचार केला तर "युंकर" हा लढाऊ विमानाला तुल्यबळ शत्रू होता का? जातिवंत शिकारी आपल्या कौशल्याचा पुरावा म्हणून मारलेला ससा दाखवील का?

दमट रात्रीचा अंधार जंगलात दाटला. लढाईच्या गर्जना दक्षिणेकडे मागे सरकल्या होत्या. झाडांच्या फांद्यांमधून दूरवरील आगींचा प्रकाश जेमतेम दिसत होता. गंधित, सुखासीन ग्रीष्मकालीन राईमधले रात्रीचे सर्व ध्वनी स्पष्ट ऐकू येत होते. घळींमध्ये नाकतोड्यांची तुफान ओरड चालली होती, जवळच्या दलदली प्रदेशात शेकडो बेडूक डरांव-डरांव करीत होते. एका पक्ष्याची कर्कश्य शीळ घुमत होती व ह्या सर्वांहून त्या ओलसर अर्धवट अंधारात बुलबुलांच्या गाण्याचे अधिराज्य पसरले होते.

अलेक्सेई अजूनही त्या भोजाच्या झाडाखाली बसला होता. आता मऊ शेवाळे दंवाने माखले होते व काळ्या सावल्यांची सरमिसळ झालेले चांदणे त्याच्या पायांपाशी सरपटत आले होते. पुन्हा त्याने खिशामधून फोटो काढला, आपल्या मांडीवर ठेवला आणि चांदण्याच्या प्रकाशात त्याला न्याहाळीत तो विचारमग्न झाला. रात्रीच्या वेळी बॉंबफेक करणाऱ्या विमानांच्या लहान, मोठ्या सावल्या स्वच्छ, गडद-निळ्या आकाशातून दक्षिणेकडे वेगाने जाताना दिसत होत्या. त्यांच्या इंजिनांची घरघर मंद, खर्ज स्वरामध्ये ऐकू येत होती. पण बुलबुलांच्या गाण्याने दुमदुमलेल्या, चंद्रप्रकाशात न्हालेल्या त्या जंगलात हा युद्धाचा आवाजसुद्धा शांतताप्रेमी किड्यांच्या गुणगुणीसारखा भासत होता. अलेक्सेईने एक उसासा टाकला, शर्टाच्या खिशात तो फोटो परत ठेवला व उभे रहात त्याने अंग झटकले. त्या रात्रीची धुंदी जणू तो झटकून टाकू पहात होता. जमिनीवर वाळक्या काटक्या तुडवीत तो पटकन भुयारात शिरला. तेथे एका अरुंद कोचावर पेत्रोवची स्वारी राक्षसासारखी पसरली होती व दणदणून घोरत होती.

५

वैमानिकांना पहाटेपूर्वीच जागे करण्यात आले. लष्करी मुख्य ठाण्याला माहिती मिळाली होती की, सोविएत रणगाड्यांनी शत्रूच्या फळीला जेथे खिंडार पाडले होते त्या ठिकाणी आदल्या दिवशी जर्मन विमानांचे एक मोठे पथक येऊन थडकले होते. सोविएत रणगाड्यांनी खुद्द कूर्स्कच्या फुगवटयाच्या प्रदेशात मुसंडी मारल्यामुळे फार मोठा धोका उत्पन्न झाल्याचे जर्मन कमांडने जाणले होते आणि जर्मनीतील उत्तमोत्तम वैमानिकांचा समावेश असलेल्या "रिख्तहॉफेन" हवाई डिव्हिजनला पाचारण केले होते, असा सोविएत टेहळयांचा अहवाल होता. ह्या हवाई डिव्हिजनांचा स्तालिनग्रादपाशी धुव्वा उडाला होता, पण जर्मन पिछाडीवर दूर कोठेतरी तिची फेरउभारणी करण्यात आली होती. विंगला इशारा देण्यात आला होता की, शत्रू संख्येने भारी होता, त्याच्यापाशी "फॉक्के-वोल्फ–१९०" सारखी अत्याधुनिक विमाने होती व लढाईचा त्याला भरपूर अनुभव होता. विंगला सज्ज राहण्याचा हुकूम होता. रणगाड्यांपाठोपाठ चिलखती गाड्यांचा दुसरा काफला खिंडारामधून जाणार होता व त्याला हवाई संरक्षणाचे छत्र देण्याची कामगिरी विंगवर सोपविण्यात आली होती.

"रिख्तहॉफेन". अनुभवी वैमानिकांना हे नांव चांगल्या परिचयाचे होते. हेर्मान गोअरिंगचा ह्या डिव्हिजनवर खास अनुग्रह होता. जर्मन फौजा जेथे संकटात असत तेथे ही डिव्हिजन पाठविण्यात येई. तिच्यामधील काही वैमानिकांनी स्पेनच्या प्रजासत्ताकावर हवाई धाडी घातलेल्या होत्या. ते प्रखर आणि कसवी लढवय्ये होते. धोकेबाज शत्रू म्हणून त्यांची ख्याती होती.

"आपल्याविरुद्ध कुणी "रिख्तहॉफेन" पाठवलेत असं माणसं म्हणताहेत! हा: हा:! मला वाटतं लौकरच आपली त्यांच्याशी भेट होईल! त्या "रिख्तहॉफेन" ना आपण चांगला हिसका दाखवू!" भोजनगृहात पेत्रोव बडबडत होता. एकीकडे भराभरा घास गिळताना दुसरीकडे तो राया नांवाच्या वेट्रेसकडे कटाक्ष टाकत होता. राया फुलांच्या मोठ्या गुच्छामधून फुले वेचून काढत होती व खडूने घासून चकचकीत बनविलेल्या तोफगोळयांच्या रिकाम्या टोपणांमध्ये खोवत होती.

"रिख्तहॉफेन" संबंधीचे तुच्छतादर्शक उद्‌गार पेत्रोवने अलेक्सेईला ऐकवले नव्हते, तर फुलांमध्ये गुंतलेल्या रायावर भाव खाण्यासाठी फेकले

होते हे अगदी स्पष्ट होते. अलेक्सेई मुकाटपणे आपली कॉफी संपवीत होता व देखण्या, लालबुंद चेहऱ्याच्या पेत्रोवकडे राया अधून मधून तिरपे कटाक्ष फेकीत होती. स्वत:शीच हसत मेरेस्येव त्या दोघांना निरखीत होता. पण गंभीर कामगिरीबाबत कुणी उथळ चर्चा अगर विनोद केलेले त्याला आवडत नसत.

"रिख्तहॉफेन"चा अर्थ आज तुला रानगवतात जळून मरायचं नसलं तर डोळ्यात तेल घालून सावध रहा. आणि त्याचा अर्थ : कान नीट उघडे ठेव आणि संपर्क सुटू देऊ नको. बेटा, हे "रिख्तहॉफेन" जंगली पशू आहेत. तुला समजायच्या आत तुझ्या शरीरात दात खुपसतील!"

पहाटेला खुद्द कर्नलांच्या नेतृत्वाखाली पहिले स्क्वाड्रन आकाशात उडाले. ते हवेत असतानाच बारा लढाऊ विमानांचा दुसरा गट उड्डाणासाठी सज्ज झाला. विंगमध्ये कमांडरव्यतिरिक्त सर्वांत जास्त अनुभवी असलेल्या, सोविएत संघाचे वीर ह्या किताबाचे मानकरी असलेल्या, गार्डस् मेजर फेदोतोव यांच्याकडे दुसऱ्या गटाचे नेतृत्व होते. विमाने तयार होती, वैमानिक आपापल्या जागी स्थानापन्न झाले होते, इंजिनांची खालच्या पट्टीत घरघर चालू होती. तृषार्त जमिनीवर पावसाचे पहिले, टप्पोरे थेंब आधीच कोसळू लागलेले असतात व तुफानापूर्वी मातीचे लोट उठवून झाडांना गदगदा हलविणारे जसे वाऱ्याचे झोत उमटतात, तसे वाऱ्याचे झोत विमानांच्या इंजिनांमधून उमटत होते व जंगलाच्या कडेच्या झाडांना गदागदा हलवीत होते.

पहिल्या गटाची विमाने जणू आकाशातून निसटल्याप्रमाणे खाली उतरत असलेली अलेक्सेईने आपल्या कॉकपिटमधून पाहिली. इच्छा नसतानाही आणि नकळतपणे त्याने त्यांची संख्या मोजली व दोन विमानांच्या दरम्यान जेव्हा फार वेळ मोकळा गेला तेव्हा काळजीने त्याचे हृदय लकाकले. पण शेवटचे विमानही उतरले. सारे परतले होते. अलेक्सेईने सुटकेचा निःश्वास टाकला.

पहिल्या गटाचे शेवटचे विमान धावपट्टीवरून ओढून नेले असेल-नसेल तोच फेदोतोव यांच्या गटाचे "नंबर १" आकाशात उडाले. त्या पाठोपाठ इतर लढाऊ विमानेही जोडीने उडाली. जंगलापलिकडे त्यांनी दिशा धरली. फेदोतोव यांनी स्वत:चे विमान हलवून इतरांना पाठोपाठ येण्याचा इशारा दिला. आदल्या दिवशीच्या खिंडाराचा पट्टा नजरेसमोर ठेवून ते सावधपणे

मागून उडत होते. अलेक्सेईला आता विमानाखालील जमीन वेगाने सरकताना दिसत होती. फार उंचीवरून तो उडत नसल्यामुळे जमिनीवरील गोष्टी आदल्या दिवसाप्रमाणे खेळण्यातल्यासारख्या दिसत नव्हत्या. विमानाखाली अफाट, असीम रणांगण पसरलेले दिसत होते. शेते, कुरणे, कोअरचे तळ तोफगोळ्यांनी व बाँबनी उकरून काढले होते. जखमांच्या व्रणांप्रमाणे खंदक भासत होते. शेतांमध्ये मृत देह विखुरले होते. टाकून दिलेल्या तोफा पडल्या होत्या. कधी एकाकी, तर कधी अनेक. उध्वस्त रणगाडे होते. जेथे तोफखान्याने भडिमार केला होता तेथे वेड्यावाकड्या लोखंडांचे लांबोडे ढिगारे व चिंध्या झालेली झाडे पडली होती. एक सबंध मोठी राई संपूर्ण जमीनदोस्त झाली होती. एखाद्या मोठ्या कळपाने ती राई तुडविली असावी असे विमानातून वरून पाहताना भासत होते. चित्रपटामधील दृश्यमालिकेप्रमाणे ह्या सर्व गोष्टी सरसर नजरेसमोरून सरकत होत्या व हा चित्रपट कधी संपणारच नाही असे वाटत होते. तेथे किती तुंबळ लढाई माजली होती, किती महाप्रचंड हानी झाली होती व प्राप्त केलेला विजय केवढा मोठा होता, त्याची साक्ष ह्या सर्व गोष्टी देत होत्या.

विस्तीर्ण मैदानावर रणगाड्यांच्या अनेक चाकोऱ्या उमटल्या होत्या. शत्रूच्या मोर्चांमध्ये खूप दूरवर, अगदी क्षितीजापर्यंत त्या घुसत गेलेल्या होत्या. जणू विचित्र जनावरांचा एखादा प्रचंड कळप वाटेत येणाऱ्या सर्व गोष्टींना पायांखाली तुडवून हुंदडत दक्षिणेकडे गेला होता. रणगाड्यांच्या चाकोऱ्यांचा मार्ग धरून मोटारींवरील तोफखान्यांच्या अखंड रांगा वाटचाल करीत होत्या. इंधनाच्या टाक्या घेऊन प्रचंड ट्रक चालले होते, दुरुस्ती-पथके ट्रॅक्टर खेचत नेत होती. आच्छादन घातलेल्या लॉरींचे काफले धूळ उडवीत चाललेले दुरूनही दिसत होते. ही सर्व वाहने गोगलगायीच्या गतीने पुढे सरकत होती असे विमानामधून पाहताना वाटत होते. आणि लढाऊ विमाने जेव्हा अधिक उंचीवर चढली तेव्हा ह्या सर्व गोष्टी वसंतामध्ये जंगलच्या वाटांवरून जाणाऱ्या मुंग्यांच्या सैन्याप्रमाणे दिसू लागल्या.

ढगांमध्ये मुसंडी मारून जावे त्याप्रमाणे उंच उठलेल्या धुळीच्या लोटांमधून मुसंडी मारून लढाऊ विमाने ह्या रांगांच्या अग्रभागी असलेल्या जीपगाड्यांकडे उडत गेली. रणगाडादलाचे सेनापती त्या गाड्यांमध्ये बसले होते हे स्पष्ट होते. ह्या रांगांच्या डोक्यावरील आकाशात शत्रू नव्हता. दूर अंतरावर, धुंदकारल्या क्षितीजावर, लढाईचे धुराचे लोट एव्हाना अधूनमधून

उमटत होते. खेळातील पतंगाप्रमाणे गिरक्या घेत विमाने माघारी वळली. त्याच क्षणाला नेमक्या क्षितीजावर अलेक्सेईला एक व नंतर अनेक काळ्या ठिपक्यांची झुंड खूप खालून उडत असलेली दिसली. जर्मन! तेसुद्धा खूप खालून उडत होते. लालसर, रानगवताने झाकलेल्या शेतांमधून उगटणाऱ्या धुळीच्या लोटांचा मागोवा घेत ते जात होते हे उघड होते. सहजस्वभावानुसार अलेक्सेईने भोवती नजर टाकली. त्याचा सहकारी त्याला अगदी बिलगून पाठीमागून उडत होता.

त्याने कान टवकारले. एक दूरवरचा आवाज आला:

"मी सागरपक्षी दोन, फेदोतोव; मी सागरपक्षी दोन, फेदोतोव. सावधान! माझ्या मागोमाग चला!"

हवेत असताना वैमानिकाच्या सर्व संवेदना पराकोटीला ताणलेल्या असतात आणि शिस्त एवढी विलक्षण असते की, काहीवेळा त्यांच्या कमांडरने हुकूमाचे शब्द पुरते उच्चारायच्या आतच वैमानिक त्याप्रमाणे वागलेले असतात. पुढचा हुकूम येईपर्यंत सबंध गट जोडीने, अगदी जवळून उडत राहिला. जर्मनांना अडवण्यासाठी तो निघाला होता. दृष्टी, कान आणि मन कमाल मर्यादांपर्यंत एकवटले होते. डोळ्यांदेखत आकार मोठा होत जाणाऱ्या शत्रूच्या विमानांखेरीज अलेक्सेईला दुसरे काहीही दिसत नव्हते. त्याच्या कर्णयंत्रांमधून अनेक आवाजांचा गोंगाट ऐकू येत होता. पुढचा हुकूम ऐकायला त्याचे कान आतुरले होते. पण त्याऐवजी त्याला जर्मन भाषेतील उत्तेजित आरोळी ऐकू आली:

«Achtung! Achtung! «la — fünf!» Achtung!» जर्मनांचा टेहळ्या आपल्या विमानांना धोक्याचा इशारा देत असावा.

हवाई लढायांच्या अपेक्षित प्रदेशामध्ये त्या विख्यात जर्मन हवाई डिव्हिजनने आपल्या परंपरेनुसार आदल्या रात्रीच निशाणबाजांना आणि टेहळ्यांना हवाई छत्र्यांमार्फत खाली उतरवून त्यांचे जाळे पसरले होते. त्या छत्रीधारी सैनिकांपाशी रेडिओ-प्रक्षेपकांसारखी साधने होती.

नंतर काहीसा अस्पष्ट, घोगरा आणि रागीट जर्मन आवाज ओरडला:

«Donnerwetter! Links! «La-fünf»! Links! «La-fünf!»

चिडीशिवाय त्या आवाजात धोक्याचा इशाराही होता.

"रिख्तहॉफेन! पण तुम्हाला आमच्या "लावोचकिनां"ची भीती वाटत आहे?" मेरेस्येव गंभीरपणे पुटपुटला. शत्रूची विमाने जवळ येत असलेली त्याने पाहिली. त्याच्या ताठरलेल्या देहामधून थरार चमकून गेला.

शत्रू आता अगदी स्पष्ट दिसत होता. "फॉक्के-वोल्फ-१९०" जातीची ती हल्ला चढविणारी विमाने होती. अत्यंत प्रभावी, वेगवान इंजिनाची ही विमाने नुकतीच वापरात आणलेली होती.

फेदोतोव यांच्या गटापेक्षा जर्मनांच्या विमानांची संख्या दुप्पट होती. जोडीने, पायऱ्या-पायऱ्यांच्या शिडीच्या रचनेत उडायचे हे "रिख्तहॉफेन" डिव्हिजनच्या तुकड्यांचे खासे वैशिष्ट्य होते. प्रत्येक जोडी आपल्या पुढील जोडीची पिछाडी सांभाळीत असे. फेदोतोव यांनी अधिक उंचीवर असल्याचा फायदा घेऊन शत्रूवर हल्ला चढविला. अलेक्सेईने आपले लक्ष्य आधीच निवडले होते व इतरांना नजरेच्या आवाक्यात राखून तो आपल्या सावजाच्या मागे जात होता, बंदुकांच्या माशीच्या टप्प्यात त्याला आणू पहात होता. पण कुणीतरी फेदोतोव यांच्यावर आघाडी मारली. "याक" विमानांचा एक गट दुसऱ्या बाजूने वेगाने आला व त्याने जर्मनांवर वरच्या बाजूने हल्ला चढविला. तो प्रहार एवढा यशस्वी ठरला, की शत्रूची रचना तात्काळ मोडली. आकाशात एकच गोंधळ उडाला. दोन-दोन चार-चार अशा गटांमध्ये दोन्ही बाजू लढू लागल्या. लढाऊ विमाने शत्रूवर गोळ्यांचा पाऊस पाडू लागली, त्यांच्या शेपटांवर वा बगलांवर किरण साधण्याचा प्रयत्न करू लागली.

जोड्या गिरक्या घेत होत्या, एकमेकांचा पाठलाग धरीत होत्या. एक विलक्षण चक्री पाळणा फिरू लागला होता.

ह्या गोंधळात नेमके काय घडत होते ते फक्त अनुभवी नजरेलाच सांगता आले असते. त्याचप्रमाणे केवळ अनुभवी वैमानिकालाच आपल्या कर्णयंत्रा-मधून येणाऱ्या विविध गोंगाटातून नेमक्या शब्दांचा अर्थ लावता आला असता. ईथरच्या वातावरणात त्यावेळी काय काय ऐकू येत होते: हल्ला करणाऱ्यांनी उच्चारलेल्या घोगऱ्या, अश्लील शिव्या, बळी पडणाऱ्यांच्या भीतीदायक किंकाळ्या, विजेत्यांची आरोळी, जखमींचे विव्हळणे, जोरदार वळण घेताना वैमानिकाने करकरा चावलेले दात, जोरजोराने टाकलेल्या धापा! लढाईच्या धुंदीत कुणी जर्मन गाणे रेकत होते, कुणी घाबरून "आई" म्हणून किंचाळत होते, तर कुणी चापाचे बटण दावता दावता ओरडत होते: "हे घे! हे घे!"

मेरेस्येवने निवडलेले लक्ष्य त्याच्या तावडीतून निसटले होते. त्याच्या जागी त्याला डोक्यावर एक "याक" उडत असलेले दिसले. त्या "याक"-

च्या पाठोपाठ सिगारच्या आकाराचे, सरळ पंखांचे "फॉक्के" निघाले होते व आपल्या पंखांमधून "याक" वर काडतूसांच्या दोन समांतर फैरी झाडत होते. "याक" च्या शेपटीने मार खाल्ला. त्याच्या सुटकेसाठी मेरेस्येव अग्निबाणाप्रमाणे वर चढला. एक क्षणभर त्याच्या डोक्यावर सावली सरकून गेली व त्या सावलीवर त्याने आपल्या सर्व बंदुकींमधून आग ओकली. "फॉक्के" चे काय झाले ते त्याने पाहिले नाही. पण शेपटीवर घायाळ झालेले "याक" एकटेच उडत होते. ह्या गोंधळात आपला साथीदार हरवला की काय अशा विचाराने मेरेस्येवने मागे पाहिले, पण नाही! तो त्याच्याशी समांतर उडत होता.

"मागे पडू नकोस," आवळल्या दातांमधून अलेक्सेई म्हणाला.

दोन भाषांमधील विजयाच्या आणि भीतीच्या आरोळ्या, गाणी, घोगरे आवाज, दातांचे रगडणे, शिव्या, जोरजोराने चाललेले श्वास, कडकड-घरघर आवाज—अशा सर्व ध्वनींनी त्याचे कान बधीर झाले होते. ही हवाई लढाई चालली नव्हती तर माणसे पायउतार होऊन एकमेकांना भिडली होती, जमिनीवर गडबडा लोळत होती, सर्व ताकद पणाला लावून झुंजत होती असे ह्या आवाजांवरून वाटत होते.

मेरेस्येव शत्रूला धुंडाळीत होता. अचानक त्याच्या पाठीमधून थंड शहारा गेला. अगदी त्याच्या खालून एक "फॉक्के" एका "ला-५" वर हल्ला चढवीत होते. सोविएत विमानावरचा क्रमांक त्याने पाहिला नाही, पण अंतःप्रेरणेने त्याला समजले की, ते पेत्रोवचे विमान होते. "फॉक्के-वोल्फ" सर्व बंदुकांमधून गोळ्यांचा वर्षाव करीत धावून जात होते. पेत्रोवला जगण्यासाठी अवघा एक क्षण उरला होता. ती दोन विमाने एकमेकांना भिडली होती. हवाई हल्ल्याचे कोणतेही डावपेच लढवून आपल्या मित्राच्या मदतीला धावून जाणे अलेक्सेईला अशक्य ठरले होते. ना अवधी होता ना जागा होती. पण त्याच्या साथीदाराचे आयुष्य धोक्यात होते, तेव्हा त्याने एक धाडसी पाऊल उचलण्याचे ठरविले. त्याने आपले विमान उभेच्या उभे खाली नेले व वेग वाढविला. स्वतःचे वजन, इंजिनांची पूर्ण ताकद आणि स्थिती-सातत्य यांच्या गोळाबेरजेतून मेरेस्येवचे विमान एखाद्या दगडाप्रमाणे —नव्हे एखाद्या महाअस्त्राप्रमाणे—थेट "फॉक्केच्या" आखूडपंखी शरीरावर कोसळले व त्याने काडतूसांच्या फैरी उडविल्या. ह्या महाप्रचंड वेगापायी, अशा त्वरित खाली उतरण्यापायी आपली शुद्ध हरपत चालल्याचे मेरेस्येवला

जाणवले. आपल्या विमानाच्या थेट पंख्यासमोर "फॉक्के" स्फोटाच्या धुरात गुरफटलेले त्याच्या मंद होणाऱ्या दृष्टीने पाहिले. पण पेत्रोव कुठे होता? तो अदृश्य झाला होता. कुठे होता तो? त्याला पाडले? त्याने विमानातून बाहेर उडी टाकली का? तो निसटला का?

भोवताली आता कुणीही नव्हते. अदृश्य विमानामधून एक दूरवरचा आवाज आला:

"मी सागरपक्षी दोन, फेदोतोव. मी सागरपक्षी दोन, फेदोतोव. माझ्या पाठोपाठ चला. घरी! मी सागरपक्षी दोन..."

फेदोतोव आपला गट माघारी नेत होते.

"फॉक्के-वोल्फ" चा फडशा पाडल्यानंतर आणि बेभान सूर मारून परत विमानाला ठिकाणावर आणल्यानंतर, अलेक्सेई धापा टाकीत होता. धोका टळून गेल्यानंतरच्या आणि विजयानंतरच्या शांततेचा आनंद अनुभवत होता. परतीचा मार्ग निश्चित करण्यासाठी त्याने कंपासवर नजर टाकली व नंतर इंधनाच्या काट्यांकडे पाहिले. त्याच्या कपाळावर आठ्या पडल्या. इंधन कमी होते व त्याच्या तळापर्यंत पोहोचण्यास पुरेसे नव्हते. पण इंधनाचा काटा शून्यापर्यंत गेलेला पाहण्यापेक्षाही भयानक अशी दुसरीच गोष्ट पुढच्याच क्षणी त्याच्या नजरेला पडली. त्याच्या मागून, एका प्रचंड ढगामधून, अचानकपणे एक "फॉक्के-वोल्फ-१९०" थेट त्याच्या अंगावर चालून येत होते. त्याला विचार करायला अवसर नव्हता, पळून जायला फुरसत नव्हती. प्रचंड वेगाने ते एकमेकांवर चालून गेले.

६

आकाशात चाललेल्या ह्या लढाईचे आवाज लढणाऱ्या विमानांचे वैमानिक केवळ ऐकत नव्हते, तर गार्डस् फाईटर विंगचे कमांडर कर्नल इवानोव खाली विमानतळावर आपल्या प्रभावी रेडिओ सेटद्वारे ऐकत होते. ते स्वतः अनुभवी वैमानिक होते व ईथरवर येणाऱ्या ध्वनींवरून आकाशात तुंबळ लढाई चालल्याचे त्यांनी जाणले होते. शत्रू बळकट आणि निग्रही होता व आकाश सोडण्याला तयार नव्हता, हे त्यांना समजत होते. आपल्यापेक्षा संख्येने भारी असलेल्या शत्रूशी फेदोतोव लढाई देत होते ही बातमी सबंध विमानतळावर वेगाने पसरली होती. जंगलातून उघडच्या मैदानात जे येऊ

शकले ते सर्व दक्षिण दिशेकडे चिंतायुक्त नजरांनी पहात होते. विमाने त्या दिशेने परतायची होती.

पांढऱ्या झग्यांमधील सर्जन मंडळी घाईघाईने जेवणे आटोपून पळत आली. छपरांवर मोठ्या तांबड्या क्रूसांना रंगविलेल्या रुग्णवाहिका झुडुपांमधून बाहेर निघाल्या. कोणत्याही क्षणी जाण्याच्या तयारीने त्यांची इंजिने घुमत राहिली.

विमानांची पहिली जोडी झाडांच्या शेंड्यांवरून उडत आली व विमानतळावर घिरटी न मारता सरळ खाली उतरली. त्यांना विस्तीर्ण मैदानात तावडतोब ओढून नेण्यात आले. "क्रमांक १" मध्ये सोविएत संघाचे वीर फेदोतोव होते आणि "क्र. २" मध्ये त्यांचा साथीदार होता. त्यांच्या पाठोपाठच दुसरी जोडी आली. परतणाऱ्या विमानांच्या इंजिनांच्या आवाजांनी जंगलातील वातावरण घुमू लागले.

"सात, आठ, नऊ, दहा..." पाहणारे लोक मोजत होते. आकाश निरखताना त्यांची चिंता वाढली होती.

जमिनीवर उतरलेली विमाने तात्काळ आपापल्या आडोशांमध्ये गेली होती. दोन विमाने अद्याप बेपत्ता होती.

वाट पाहणाऱ्या जमावात एक विचित्र स्तब्धता पसरली. अत्यंत पीडादायी मंदपणे वेळ सरकत होता. "मेरेस्येव आणि पेत्रोव," कुणीतरी शांतपणे म्हणाले.

अचानक एका स्त्रीचा आनंदी आवाज मैदानात उमटला:

"ते पहा एक आलं!"

विमानाच्या इंजिनाची घरघर ऐकू येत होती. भोजाच्या झाडांच्या शेंड्यांना अक्षरशः घासत "क्रमांक १२" आले. विमानाने बराच मार खाल्ला होता. त्याची शेपटी तुटली होती. त्याच्या डाव्या पंख्याचे टोक उडाले होते व तो तुकडा एका तारेला लोंबत होता. जमिनीवर उतरल्यावर विमानाने चमत्कारिक उड्या मारल्या. जवळ जवळ बेडूकउड्या मारीतच ते थेट धावपट्टीच्या टोकापर्यंत गेले आणि तेथे शेपूट उंच करून थांबले. फूटबोर्डावर उभ्या राहिलेल्या सर्जनांसकट रुग्णवाहिका विमानाकडे पळाल्या. इतर अनेक जीपगाड्या व वाट पहात उभा असलेला संपूर्ण जमाव, असे सर्व धावले. कॉकपिटमधून कुणीही उठले नाही.

विमानाचे छप्पर बाजूला सरकविण्यात आले. रक्ताच्या थारोळ्यात पेत्रोव कोलमडलेला होता. त्याचे डोके त्याच्या छातीवर लोंबकळत होते.

त्याच्या तोंडावर त्याचे ओले सोनेरी केस विखुरले होते. सर्जनांनी व परिचारिकांनी पट्टे सोडले. बाँबच्या कपचाने फाटलेली त्याची हवाई छत्रीची पिशवी बाजूला केली. पेत्रोवचे अचेतन शरीर काळजीपूर्वक उचलले आणि खाली जमिनीवर आणले. वैमानिकाला पायात आणि हातावर जखमा झाल्या होत्या. त्याच्या निळया पोषाखावर काळपट डाग वेगाने पसरले.

पेत्रोववर प्रथमोपचार करण्यात आले व त्याला स्ट्रेचरवर ठेवण्यात आले. रुग्णवाहिकेमध्ये त्याला उचलून ठेवत होते तेव्हा तो शुद्धीवर आला व त्याने डोळे उघडले. तो काहीतरी पुटपुटला. पण त्याचे बोलणे कुणालाच ऐकू आले नाही. कर्नल त्याच्यावर ओणवे झाले.

"मेरेस्येव कुठं आहे?" पेत्रोवने विचारले.

"अजून तो परतला नाही."

स्ट्रेचर पुन्हा उचलण्यात आला, पण जखमी माणसाने जोराने डोके फिरविले व उठायचा प्रयत्न केला.

"थांबा!" तो म्हणाला. "मला इथून दूर नेऊ नका. मला जायचं नाही. मी मेरेस्येवची वाट पाहतो. त्यानं माझा जीव वाचवलाय!"

पेत्रोवने एवढा जोरदार विरोध केला, आपल्या मलमपट्टया टरकावण्याची धमकी घातली, तेव्हा कर्नलनी हात झटकला व मान फिरवून, दात आवळून ते म्हणाले:

"ठीक आहे. पडूं दे स्वस्थ त्याला. तो काही मरणार नाही. आणखी एक मिनिट पुरू शकेल एवढंच इंधन मेरेस्येवपाशी आहे."

कर्नलनी आपले डोळे स्टॉप-वॉचवर खिळविले. तांबडया सेकंद काटयाने वर्तुळ पुरे केले. बाकी प्रत्येकजण जंगलाच्या माथ्याकडे पहात होता. शेवटचे विमान तेथून परतायचे होते. सर्वांचे कान टवकारलेले होते. पण दूरवरच्या तोफांच्या गडगडाटाशिवाय आणि जवळच कुठेतरी टोक्-टोक् करणाऱ्या सुतारपक्ष्याच्या आवाजाशिवाय दुसरे काहीही ऐकू येत नव्हते.

काही वेळा एक मिनिटाचा काळ केवढा प्रदीर्घ भासतो!

७

प्रचंड वेगाने ते एकमेकांवर चालून गेले.

"लावोचकिन-५" आणि "फॉक्के-वोल्फ १९०" ही वेगवान विमाने होती. स्वनातित वेगाने ती एकमेकांच्या जवळ जात होती.

अलेक्सेई मेरेस्येव आणि विख्यात "रिख्तहॉफेन" डिव्हिजनचा अज्ञात निष्णात जर्मन वैमानिक एकमेकांना थेट सामोरे जात होते. अशा प्रकारचा हल्ला निमिषमात्र घडतो. अट्टल धूम्रपानवाल्याला सिगारेट पेटवायला लागतो त्यापेक्षाही कमी वेळ. पण हा निमिषमात्र काळ वैमानिकावर अतिप्रचंड ताण निर्माण करतो. जमिनीवर लढाई करणाऱ्याला सबंध दिवस लढून जेवढा ताण सोसावा लागेल, त्यापेक्षा जास्त कसोटीतून वैमानिकाला जावे लागते.

एकमेकांवर चालून जाणाऱ्या दोन वेगवान लढाऊ विमानांपैकी एका विमानात तुम्ही आहात अशी कल्पना करा. तुमच्या डोळ्यांदेखत शत्रूच्या विमानाचा आकार मोठा होत जातो. अचानक त्याचे पूर्ण तपशीलवार दर्शन घडते : पंखे, गरगर फिरणाऱ्या पंख्याचे चकाकते वर्तुळ, काळे ठिपके— म्हणजे त्याच्या बंदुका. दुसऱ्याच क्षणी विमाने एकमेकांवर आपटतील आणि त्यांच्या एवढ्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतील की, विमानांच्या अवशेषांमधून वैमानिकांचे अवशेष वेगळे काढणे अशक्य ठरेल. त्या क्षणाला वैमानिकाचा केवळ निर्धारच नव्हे, तर त्याची सर्व नैतिक शक्तीही पणाला लागलेली असते. कच्च्या मनाची माणसे हा ताण सहन करू शकणार नाहीत. विजया-साठी मरण्याची तयारी नसलेला माणूस अंतःप्रेरणेने दांडा खेचील आणि त्याच्या दिशेने घोंघावत येणाऱ्या मृत्यूच्या तुफानाला चुकवील. पण पुढच्याच क्षणी त्याचे विमान भिरभिरत जमिनीवर जाऊन कोसळेल आणि त्या विमा-नाचे पोट फाटेल अथवा पंखा तुटून पडेल. त्याला काहीही वाचवू शकणार नाही. अनुभवी वैमानिकांना हे उत्तम माहीत असते आणि फक्त अत्यंत धाडसी लोक असा समोरासमोरचा हल्ला करायला धजावतात.

हवा फाडीत विमाने रोरावत होती.

आपल्याला टक्कर द्यायला येणारा समोरचा माणूस कुणी लेचापेचा नव्हता याची अलेक्सेईला कल्पना होती. पूर्व आघाडीवर प्रचंड मनुष्यहानी झाल्यानंतर गोअरिंगने जर्मन हवाई दलात घाईघाईने नव्या लोकांची भरती केलेली होती, ह्या नव्या लोकांना पुरते प्रशिक्षण मिळालेले नव्हते. पण तशा कच्च्या लोकांपैकी आपला प्रतिस्पर्धी नाही हे अलेक्सेईने ओळखले होते. "रिख्तहॉफेन" डिव्हिजनमधील तो पट्टीचा वैमानिक होता. त्याच्या विमानाच्या बगलांवर विमानांच्या छायाकृती रेखाटलेल्या होत्या. हवेमधील त्याच्या विजयांची ती मानचिन्हे होती. हा जर्मन वैमानिक अडखळणार नव्हता, बाजूला सरणार नव्हता, लढाई टाळणार नव्हता.

"सांभाळ "रिख्तहॉफेन" !" दात रगडीत अलेक्सेई पुटपुटला. त्याने आपले ओठ एवढे जोरात चावले, की त्यांच्यामधून रक्त ठिबकू लागले होते. आपल्या माशीवर त्याने नजर खिळवून धरली होती. सरळ त्याच्या अंगावर चालून येणाऱ्या शत्रूच्या विमानासमोर आपले डोळे मिटू नयेत म्हणून त्याने आपली शरीरातील सर्व ताकद डोळ्यांमध्ये एकवटली होती.

त्याच्या संवेदना एवढ्या तरल बनल्या होत्या की, त्याच्या गरगर फिरणाऱ्या पंख्यामधील धुंद वातावरणातून त्याला शत्रूच्या कॉकपिटचा पारदर्शी पडदा दिसत होता व दोन मानवी डोळे त्याच्यावर रोखून पहात होते, असे त्याला भासत होते. त्या रोखलेल्या डोळ्यांमध्ये काठोकाठ तिटकारा भरला होता. आत्यंतिक मानसिक ताणामध्ये असा आभास घडतो पण आपण ते डोळे पाहिलेच असे अलेक्सेईला खात्रीपूर्वक वाटत होते. "हीच अखेर," आपले सर्व स्नायू अधिक घट्ट आवळीत तो मनाशी म्हणाला. "हीच अखेर!" त्याने समोर पाहिले. वेगाने आकार मोठा होत चाललेले ते विमान सोसाट्याच्या वाऱ्याप्रमाणे त्याच्या दिशेने येत होते. छे:! तो जर्मनही मागे हटणार नव्हता! हीच अखेर होती.

क्षणात येणाऱ्या मरणाला तो तयार झाला. पण अचानक त्याला भासले की, हाताच्या अंतरावर असताना त्या जर्मन वैमानिकाचा धीर खचला होता व त्याचे विमान वरती झेपावले. जर्मन विमानाचे उन्हात तळपणारे निळसर पोट विजेप्रमाणे त्याच्यासमोरून चमकून गेले. त्याच क्षणाला अलेक्सेईने सर्व चाप दाबले व कोलांटी घेतली. तीन धुरांच्या रेषा जर्मन विमानाला भिडल्या. अलेक्सेईच्या डोक्यावर धरती भिरभिरली तेव्हा जर्मन विमान भेलकांडत कोसळत असलेले त्याने पाहिले. "ओल्या!" बेभान विजयाने तो ओरडला व सर्व काही विसरून छोट्या वर्तुळाकार गिरक्या घेत त्याने जर्मन विमानाला त्याच्या अखेरच्या प्रवासात थेटपर्यंत सोबत केली. तांबडे रानगवत माजलेल्या धरतीवर ते जर्मन विमान आपटले व काळ्या धुराचा प्रचंड लोट उसळला.

तेव्हा कुठे मेरेस्येवचा सर्व ताण शिथिल झाला. त्याला एकदम विलक्षण थकल्यासारखे वाटले. त्याने इंधनाचा दर्शक पाहिला. काटा जवळ जवळ शून्यावर थरथरत होता.

तीन किंवा फार तर चार मिनिटे पुरेल एवढेच इंधन शिल्लक होते. विमानतळापर्यंत पोहोचायला किमान दहा मिनिटे लागणार होती. शिवाय

परत उंचीवर चढायला अधिक इंधन आवश्यक होते. त्या "फोक्के" ची सोबत करायला खाली उतरण्यात त्याने मूर्खपणा केला होता. "अगदी मूर्ख पोरासारखा वागलो!" तो स्वतःला दूषणे देत म्हणाला.

धोक्याच्या क्षणी शूर आणि धीम्या माणसांप्रमाणे त्याचे मन अत्यंत कार्यक्षम होते व अचूकपणे काम करीत होते. आता गिरक्या घेत वर न चढता विमानतळाच्या दिशेने तिरकस वर जायचे! छान!

त्याने आपल्या विमानाला योग्य ती दिशा दिली. जमीन दूर गेली व क्षितीज धुंदकारलेले दिसू लागले तेव्हा अधिक शांतपणे तो हिशेब करू लागला. इंधनावर विसंबण्यात अर्थ नव्हता. दर्शकात जरी थोडासा दोष असला तरी फारसे इंधन शिल्लक असणे शक्य नव्हते. विमानतळाआधीच खाली उतरायचे? पण कुठे? मनातल्या मनात त्याने सबंध छोट्या मार्गाची उजळणी केली. जंगले, दलदल आणि कायम संरक्षक मोर्चांच्या पट्ट्यातील उंच-सखल मैदाने. तेथे उभे-आडवे चर खणलेले, खड्डे पडलेले व काटेरी तारा पसरलेल्या.

"छे! तिथं उतरायचं म्हणजे स्वतःवर मरण ओढवून घेण्यासारखं आहे!"

उडी टाकायची? ते करणे शक्य होते. आत्ता! छप्पर उघडायचे, वळण घ्यायचे, दांडा दाबायचा – बस्स! पण विमानाचे काय? ह्या सुंदर, चपळ, वेगवान पक्ष्याचे काय? त्या दिवशी ह्या विमानाच्या उत्तम लढाऊ गुणांमुळे त्याचा तीनदा जीव बचावला होता. अशा विमानाला टाकून द्यायचे? आपटून फोडायचे? वेड्यावाकड्या धातूचा एक ढीग बनवायचा? असे करण्याबद्दल त्याला दोषी ठरविण्यात येईल म्हणून नव्हे. त्याला त्याची भीती वाटत नव्हती. उलट अशा परिस्थितीत उडी मारून स्वतःला वाचविण्याचा त्याला हक्क होता. पण त्या क्षणाला ते विमान त्याला भक्कम, उदार आणि निष्ठावंत सजीव प्राण्याप्रमाणे भासले. त्याचा त्याग करणे म्हणजे धडधडीत विश्वासघात होता. मग काय? पहिल्याच झुंजीनंतर विमानाशिवाय परतायचे आणि दुसरे विमान मिळेपर्यंत वाट पहायची. युद्धआघाडीवर महान विजयाला आरंभ झाला असताना, अशा धामधुमीच्या वेळी राखीव दलात नुसते वाट पहात बसून रहायचे! केवळ रिकामटेकडे फिरायचे!

"मुळीच भीत नाही!" अलेक्सेई मोठ्यांदा म्हणाला. जणू कुणी त्याला प्रश्न विचारला होता.

इंजिन बंद पडेपर्यंत उडत रहायचे. आणि मग? मग पाहू काय करायचे ते!

आणि तो उडत राहिला. प्रथम तीन हजार आणि नंतर चार हजार मीटर उंचीवर. एखादी मोकळी जागा दिसेल अशा आशेने धुंडाळीत. विमानतळ ज्या जंगलाच्या मागे होता ते जंगल क्षितीजावर अंधुक दिसू लागले होते. सुमारे पंधरा किलोमीटर अंतर उरले होते. इंधनाचा काटा आता थरथरत नव्हता. मर्यादेच्या बटणावर तो मान टाकून निपचित पडला होता. पण इंजिन अजूनही चालू होते! कशावर चालले होते? उंच, आणखी उंच... छान!

निकोप माणूस आपल्या काळजाच्या ठोक्यांकडे जसा लक्ष देत नाही, तसा वैमानिक आपल्या विमानाच्या संथ घरघरीकडे लक्ष देत नसतो. पण अचानक ह्या घरघरीची पट्टी बदलली. हा बदल अलेक्सेईला तात्काळ समजला. जंगल स्पष्ट दिसत होते. ते सुमारे सात किलोमीटर दूर होते. त्याचा विस्तार तीन-चार किलोमीटर होता. फार नाही. पण इंजिनाच्या नियमित घरघरीत हा अनिष्टसूचक बदल झाला होता. वैमानिकाला हा बदल सर्वांगाने जाणवतो. जणू इंजिन नव्हे तर तो स्वतःच घुसमटलेला असतो. एकदम तो अभद्र "चक्, चक्, चक्" आवाज येतो व त्यासरशी सबंध देहातून भयानक वेदना शहारत जाते.

"नाही! ठीक आहे. पुन्हा ते नीट काम करतंय. पुन्हा चालतंय! हुर्रा ऽऽऽ! आणि हे आलंच जंगल!!" सूर्यप्रकाशात हिंदकळणाऱ्या हिरव्या सागराप्रमाणे भोजांचे शेंडे त्याला दिसत होते. आता विमानतळाशिवाय इतरत्र कुठेही उतरणे अशक्य होते. एकच गोष्ट आता करणे शक्य होते—सतत पुढे जायचे!

चक्, चक्, चक्!

इंजिन पुन्हा घरघरले. किती वेळ? तो जंगलावर होता. विंग कमांडर-च्या डोक्यावरील भांगाप्रमाणे सरळ गेलेला वाळवंटी रस्ता त्याला दिसत होता. विमानतळ आता तीन किलोमीटरवर होता. त्या दंताकार सीमेच्या पलिकडे होता. आपल्याला विमानतळ एव्हाना दिसतोय असे अलेक्सेईला वाटले.

चक्, चक्, चक्! अचानक स्तब्धता पसरली. पूर्ण शांतता! अखेर? मेरेस्येवच्या पाठीमधून थंडगार शहारा गेला. उडी मारायची? नाही. आणखी

थोडे पुढे जायचे. त्याने विमान खाली उतरवायला आरंभ केला व तरंगत तो निघाला. तोल सावरून धरायचा व गोते न खाण्याचा तो आटोकाट प्रयत्न करीत होता.

हवेमधील ही पूर्ण स्तब्धता किती भयाण होती! ती शांतता एवढी तीव्र होती की, थंड होत जाणाऱ्या इंजिनांमधील कडकड आवाज त्याला ऐकू आला. त्याच्या कपाळामधील उडणाऱ्या शिरांचा थाड थाड आवाज व वेगाने खाली जात असल्यामुळे कानांमध्ये होणारे आवाज ह्याला ठळकपणे जाणवत होते. त्याला भेटण्यासाठी जमीन वेगाने वर उठत होती. जणू महाप्रचंड चुंबक धरतीला विमानाकडे खेचत होता.

जंगलाची किनार आणि पलिकडील विमानतळाचा पाचूसारखा हिरवा पट्टा त्याला दिसत होता. खूप उशीर झाला? अर्ध्या फेरीवरच पंखा अडकून थांबला. हवेत असताना तो गतिहीन पाहणे भयानक होते. जंगल अगदी जवळ होते. हीच अखेर होती? त्याला काय झाले, गेले अठरा महिने किती अमानवी प्रयत्न त्याने केले होते आणि आपले ध्येय साध्य केल्यानंतर, तो अस्सल माणूस बनल्यानंतर, खराखुरा अस्सल माणूस बनल्यानंतर, त्याच क्षणी विचित्ररीत्या विमान कोसळून मेला होता, हे तिला कधी तरी माहीत होणार होते?

उडी मारायची? फार उशीर झाला! त्याच्या खालून जंगल वेगाने सरकत होते आणि त्याच्या वादळी उड्डाणामध्ये झाडांचे शेंडे सतत हिरव्या पट्ट्यांमध्ये मिसळत होते. यापूर्वी त्याने असे पाहिले होते. केव्हा? अर्थातच त्या वसंतात! त्याचे विमान कोसळण्यापूर्वी! त्या वेळीसुद्धा अशाच रीतीने हिरवे पट्टे त्याच्या खालून धावत होते. त्याने शेवटचा प्रयत्न केला व दांडा खेचला...

८

रक्तस्त्रावामुळे पेत्रोवच्या कानात आवाज होत होते. विमानतळ, परिचित चेहरे, सायंकाळचे सोनेरी ढग अशा सर्व गोष्टी अचानक गरगर फिरू लागल्या, हळूहळू उलटचा दिसू लागल्या व विरून गेल्या. त्याने आपला जखमी पाय हलविला व त्यामुळे झालेल्या तीव्र वेदनेपायी परत तो शुद्धीवर आला.

"अजून तो आला नाही?" त्याने विचारले.

"अजून नाही. बोलू नकोस," उत्तर आले.

आपली अखेर जवळ आली असे त्या दिवशी आकाशात पेत्रोवला वाटले होते. त्याच क्षणाला एखाद्या पंख असलेल्या देवासारखा मेरेस्येव अवतरला होता व त्याने त्या राक्षसी जर्मनाचा फडशा पाडला होता. आता तोच मेरेस्येव आकारहीन मांसाचा जळका लोळागोळा होऊन रणदग्ध भूमीवर कोठेतरी पडला नव्हता ना? सार्जंट-मेजर पेत्रोवला आपल्या नेत्याचे काळे, काहीसे विस्फारलेले व मिस्कील डोळे परत कधीच दिसणार नव्हते? कधीच नव्हते?

विंग कमांडरनी आपली बाही खाली खेचली. त्यांना आता आपल्या घड्याळाकडे पाहण्याची इतःपर गरज नव्हती. आपल्या नरम केसांमधून दोन्ही हात फिरवीत ते मंद स्वरात म्हणाले:

"बस्स! संपलं!"

"काही आशा नाही?" कुणीतरी विचारले.

"नाही. इंधन संपलंय. कदाचित तो मध्येच कुठंतरी उतरला असेल. किंवा त्यानं उडी टाकली असेल... हा स्ट्रेचर घेऊन चला!"

कर्नल मागे फिरले व अगदी बेसूरपणे कुठलेतरी गाणे शीळेवर वाजवू लागले. पेत्रोवच्या गळयात मोठा आवंढा दाटला व त्याचा श्वास घुसमटला. खोकण्याचा विचित्र आवाज ऐकू आला. धावपट्टीच्या मध्यभागी उभ्या असलेल्या लोकांनी सभोवताली पाहिले व पटकन माना फिरविल्या. जखमी वैमानिक हुंदके देत होता...

"त्याला इथून घेऊ जा बघू...!" घुसमटल्या आवाजात कर्नल ओरडले आणि तरातरा चालत निघून गेले. त्यांनी आपला चेहरा लोकांपासून दुसरीकडे वळविला होता व जणू काही झोंबऱ्या वाऱ्यापासून संरक्षण करावे तसे आपले डोळे आकुंचित केले होते.

लोक पांगू लागले, तेवढ्यात जंगलाच्या टोकाशी एक विमान एखाद्या सावलीप्रमाणे आवाज न करता तरंगत आले. झाडांच्या शेंड्यांना त्याची चाके किंचित घासत होती. एखाद्या पिशाच्चाप्रमाणे ते लोकांच्या डोक्यांवर, मैदानावर, तरंगले आणि जणू काही जमिनीकडे खेचले गेल्याप्रमाणे तीनही चाकांवर त्याने गवताला स्पर्श केला. बद्द आपटल्याचा, खडीचा रस्ता चुरडल्याचा आणि गवताची पाती सळसळ दबल्याचा असे वेगवेगळे आवाज झाले. हे सारे आगळे होते, कारण विमान उतरताना इंजिनांच्या होणाऱ्या

आवाजामुळे वैमानिकांना हे आवाज कधीच ऐकू येत नसत. हे सर्व काही एवढे अचानक घडले होते, की कुणालाच काही नीटसे समजले नाही. वस्तुतः ती एक सामान्य घटना घडली होती : एक विमान उतरले होते, ते "क्रमांक ११" होते व आत्तापर्यंत ह्याच विमानाची प्रत्येकजण चिंतेने वाट पहात होता.

"तो आला!" कुणीतरी अस्पष्ट, अनैसर्गिक आवाजात ओरडले व तात्काळ सगळे तंद्रीमधून जागे झाले.

विमान धावपट्टीच्या अगदी टोकाशी येऊन थांबले. मावळतीच्या उन्हात नारिंगी रंगाने न्हायलेल्या भोजाच्या कोवळ्या, कुरळ्या, पांढऱ्या सालीच्या झाडांची भिंत त्या विमानासमोर उभी होती.

पुन्हा एकदा कॉकपिटमधून कुणीच उठले नाही. धापा टाकीत, वेगाने आणि अभद्र शंकांनी भरलेल्या मनाने लोक विमानाकडे धावले. त्या सर्वांपुढे कर्नल धावत होते. पंखावर उडी मारून ते वर चढले आणि त्यांनी झडप मागे सारली. कॉकपिटमध्ये मेरेस्येव बसला होता. त्याचे डोके उघडे होते. त्याचा चेहरा पांढराफटक दिसत होता, त्याच्या रक्तहीन हिरवट ओठांवर स्मित तरळत होते. त्याच्या चावलेल्या ओठामधून रक्ताच्या दोन धारा त्याच्या हनुवटीवर ओघळल्या.

"जिवंत आहेस? जखमी झालास?"

मेरेस्येव क्षीण हसला. कमालीच्या थकल्या डोळयांनी कर्नलकडे पहात म्हणाला :

"मी ठीक आहे. थोडासा घाबरलो होतो... जवळ जवळ सहा किलो-मीटर विमानात पेट्रोलचा एक थेंब नव्हता."

सगळ्या वैमानिकांनी विमानाभोवती गर्दी केली. आरडाओरडा करीत ते अलेक्सेईचे अभिनंदन करू लागले, त्याच्याशी हस्तांदोलन करू लागले.

"सावकाश मित्रांनो! तुम्ही विमानाचा पंखा मोडून ठेवाल! मला बाहेर पडूं द्या!" हसत अलेक्सेईने सर्वांना दटावले.

त्या क्षणाला, लोकांच्या त्या गर्दीमधून त्याला एक परिचित आवाज ऐकू आला. पण खूप दूरवरून आल्याप्रमाणे तो आवाज अगदी फिकट भासत होता :

"आल्योशा! आल्योशा!"

क्षणात मेरेस्येवने आपली ताकद परत एकवटली. त्याने सर्वांना आपल्या

हातांनी बाजूला सारले व कुणाला तरी पंखापाशी जवळ जवळ ढकलूनच जमिनीवर उडी घेतली.

पेत्रोवचा चेहरा त्याच्या डोक्याखालील उशीशी एकरूप झाल्यासारखा भासला. त्याच्या डोळयांच्या खोल, काळसर खोबणीत दोन टप्पोरी आसवे तरारली होती.

"अरेच्चा, तू जिवंत आहेस! तू... अरे दुष्ट सैताना!" स्ट्रेचर-शेजारी गुडघे टेकून बसत अलेक्सेई ओरडला. आपल्या साथीदाराचे लुळे पडलेले डोके त्याने आपल्या हाती धरले व त्याच्या यातना सोसणाऱ्या, तरीही आनंदाने चमकणाऱ्या डोळयांमध्ये निरखून पाहिले.

"तू जिवंत आहेस!"

"आल्योशा, तुझे माझ्यावर फार उपकार झालेत. माझा जीव आज तू वाचवलास! आल्योशा... तू..."

"अरे मूर्खांनो! त्या जखमी माणसाला तावडतोब घेऊन जा ना! नुसते आ वासून उभे काय राहिलात?" कर्नलांचा आवाज गरजला.

आपल्या भक्कम पायांवर डुलत बुटक्या बांध्याचे कर्नल [illegible] होते. त्यांच्या निळया पोषाखामधून त्यांचे फिट्ट, चकचकीत [illegible] दिसत होते.

"सीनियर लेफ्टनंट मेरेस्येव, तुमच्या उड्डाणाचा अहवाल द्या. किती विमानं पाडलीत?" अधिकारी स्वरात त्यांनी विचारणा केली.

"होय कॉम्रेड कर्नल. दोन फॉक्के-वोल्फ."

"कुठल्या परिस्थितीत?"

"एक लंब रेषेतल्या हल्ल्यात. ते पेत्रोवच्या शेपटीला चिकटले होते. दुसरे आमने-सामने. झटापटीच्या क्षेत्रापासून सुमारे तीन किलोमीटर उत्तरेला."

"मला ठाऊक आहे. जमिनीवरच्या टेहळयानं आत्ताच कळवलं... थँक्स!"

"सेवा बजावतोय..." नेहमीच्या पद्धतीने अलेक्सेईने बोलायला आरंभ केला, पण एरवी याबाबतीत काटेकोर वागणाऱ्या कर्नलनी त्याला अडवले आणि अनौपचारिक स्वरात ते म्हणाले:

"छान! उद्या तुम्ही... कमांड घ्या... तीन नंबरच्या स्क्वाड्रनचा कमांडर तळावर परतला नाही."

कमांड पोस्टकडे ते बरोबर चालत गेले. त्या दिवशीची उड्डाणे संपल्यामुळे

सगळा जमाव त्यांच्या पाठोपाठ चालत गेला. कमांड पोस्टजवळच्या हिरव्या उंचवटयापाशी ते पोहोचले होते तेवढयात कामावरचा अधिकारी त्यांच्याकडे धावत आला. कर्नलांच्या समोर तो एकदम थबकला. तो बोडका होता, खूप आनंदी आणि उत्तेजित दिसत होता. काहीतरी सांगण्यासाठी त्याने तोंड उघडले, पण कर्नलनी त्याला शुष्क, करडया आवाजात दाटले :

"तुमच्या डोक्यावर टोपी का नाही? कोण समजतो स्वतःला? मधल्या सुट्टीत बागडणारा शाळकरी मुलगा?"

"कॉम्रेड कर्नल, अहवाल सांगायला परवानगी द्या," दक्ष पवित्र्यात उभे रहात, लागलेली धाप आवरीत तो उत्तेजित लेफ्टनंट म्हणाला.

"काय झालं?"

"आपले शेजारी, "याक"चे कमांडर, तुमच्याशी टेलिफोनवर बोलू इच्छिताहेत."

"आपले शेजारी? काय पाहिजे त्यांना?..."

कर्नल वेगाने भुयाराकडे निघाले.

"तुमच्याबद्दल आहे..." त्या लेफ्टनंटने मेरेस्येवला सांगायला आरंभ केला, तेवढयात खालून कर्नलांचा आवाज आला :

"मेरेस्येवला माझ्याकडं पाठवा!"

मेरेस्येव जेव्हा कर्नलांसमोर ताठ पवित्र्यात उभा राहिला तेव्हा कर्नलनी टेलिफोनच्या रिसीव्हरला हाताच्या पंजाने झाकले व ते मेरेस्येववर खेकसले :

"तुम्ही मला चुकीची माहिती का दिलीत? आपल्या शेजाऱ्यानं विचारलं –"अकरा नंबर" कोण चालवत होतं." मी उत्तरलो–'मेरेस्येव, सीनियर लेफ्टनंट.' मग त्यानं विचारलं–'आज त्यानं किती विमानं पाडली असं लिहिलंस?' मी उत्तरलो–'दोन.' तो म्हणतो–'त्याच्या खात्यावर आणखी एक जमा कर! त्यानं माझ्या पाठीशी लागलेलं एक "फॉक्के-वोल्फ" आज उडवलं! मी स्वतः ते खाली पडताना पाहिलं.' मग? गप्प का तुम्ही?" कर्नलनी कपाळाला आठ्या घालीत अलेक्सेईकडे पाहिले. ते चेष्टेत बोलत होते की खरोखर चिडले होते हे सांगणे अवघड होते. "खरं आहे हे? तुम्ही स्वतःच बोला त्याच्याशी... हॅलो! आहेस का तिथं? मी रिसीव्हर सीनियर लेफ्टनंट मेरेस्येवला देतोय..."

एक अज्ञात, घोगरा, खर्ज आवाज फोनमधून उमटला:

"आभारी आहे सीनियर लेफ्टनंट. कमाल केलीस. तू मला वाचवलंस. खरंच! शत्रू पार जमिनीवर कोसळेपर्यंत मी पाहिलं... दारू पितोस? माझ्याकडं ये. मी तुला एक लिटर देणं लागतो. पुन्हा एकदा आभार! भेटू तेव्हा बोलू! असंच चालू ठेव!"

मेरेस्येवने रिसीव्हर खाली ठेवला. एवढ्या सर्व गोष्टींमधून पार पडल्यानंतर तो इतका दमला होता, की धड उभे राहणे त्याला अशक्य झाले होते. एकच विचार त्याच्या डोक्यात होता: लौकरात लौकर "वारूळ" नगरीत जायचे, कृत्रिम पायांचे पट्टे सोडून त्यांना बाजूला फेकायचे आणि फळीवर ताणून झोप काढायची. क्षणभर टेलिफोनपाशी घुटमळून तो सावकाशपणे दाराकडे निघाला.

"कुठं निघालात?" त्याला अडवीत कर्नल म्हणाले. त्यांनी मेरेस्येवचा हात पकडला व आपल्या लहान, बारकुळ्या पंजांमध्ये एवढ्या जोराने दाबला, की मेरेस्येवला दुखले. "काय म्हणू तुम्हाला? शाबास! तुमच्यासारखी माणसं माझ्यापाशी आहेत याचा मला अभिमान वाटतो... आणखी काय? आभारी आहे... अरे हो, तुमचा तो दोस्त, पेत्रोव. तोसुद्धा छान पोरगा आहे. आणि बाकीचेसुद्धा... तुम्हाला सांगू, तुमच्यासारखी माणसं असताना आपण युद्ध हरणं शक्यच नाही!"

पुन्हा एकदा कर्नलनी मेरेस्येवचा हात जोराने दाबला.

मेरेस्येवला आपल्या भुयारी मुक्कामाला पोहोचेपर्यंत रात्र झाली. पण त्याला झोप येईना. त्याने उशी तोंडावर धरली व हजारपर्यंत आकडे मोजले. मग परत उलटे हजार मोजले. "अ" पासून नांवाला आरंभ होणाऱ्या सर्व ओळखीच्यांना आठवले, मग "ब" पासून सुरू होणारी सर्व नांवे आठवून पाहिली. शेवटी केरोसीनच्या दिव्याच्या मंद उजेडाकडे डोळ्याची पापणी न लवविता तो पाहू लागला... पण झोप आणण्याच्या ह्या सर्व वापरलेल्या पद्धती निःष्प्रभ ठरल्या. डोळे मिटताच त्याच्यासमोर परिचित दृश्ये कधी ठळकपणे, तर कधी अंधुकपणे उभी रहात होती: रुपेरी झुलूपांमधून मिखाईल आजोबांचे चिंतायुक्त डोळे त्याच्याकडे रोखून पहात होते; आंद्रेई देगत्यारेन्को आपल्या "गायीच्या पापण्यांची" उघड-झाप करीत होता; वासिली वासिल्येविच आपली पांढुरकी आयाळ झटकीत होते व कुणाची तरी खरडपट्टी काढीत होते; म्हातारा नेमवाज, स्मितामुळे सुरकुत्या पडलेला त्याचा चेहरा;

उशीवर टेकलेला कमिस्सार वोरोब्योव यांचा मेणचट चेहरा, त्यांचे भेदक, चतुर, मिस्कील, समंजस डोळे; वाऱ्याने फडफडणारे ग्रीनोचकाचे लाल केस एकदम चमकून गेले; लहान बांध्याचा, जोमदार स्वभावाचा इन्स्ट्रक्टर नाऊमोव सहानुभूतीने व समंजसपणे स्मित करीत होता, डोळा मिचकावीत होता. त्या अंधारामधून अनेक सुरेख, सस्नेह चेहरे अलेक्सेईकडे पाहून स्मित करीत होते. त्याच्या आठवणी जाग्या होत होत्या. आधीच उचंबळलेले त्याचे अंतःकरण आता दुथडी भरून वाहू लागले होते. पण हे सर्व चेहरे एकदम पुसले गेले व ओल्गाचा चेहरा उमटला. लष्करी अंमलदाराच्या वेषातील मुलाचा रोड चेहरा व मोठ्ठे, थकलेले डोळे. जणू ती साक्षात त्याच्या समोर उभी होती इतकी स्वच्छ आणि स्पष्टपणे त्याला ती दिसली. प्रत्यक्ष जीवनात त्याने कधीही तिला पाहिले नव्हते अशा रीतीने. तो भास एवढा ठळक होता, की त्यामुळे अलेक्सेई दचकला.

झोपण्याचा प्रयत्न करण्यात काय अर्थ होता? अंगात जोम चढत असल्याची जाणीव होताच तो उठून बसला. "स्तालिनग्रादका" ला त्याने सतेज केले, एका वहीतून एक कागद फाडून घेतला, पेन्सिलीला टोक केले व लिहायला आरंभ केला.

"माझ्या लाडके," वेडयावाकडया हस्ताक्षरात त्याने लिहिले. मनातले विचार ज्या वेगाने उमटत होते त्या वेगाने लिहिणे त्याला अशक्य जात होते. "आज मी तीन जर्मन विमानं पाडली. पण महत्त्वाचं ते नाही. माझे काही साथी जवळ जवळ रोजच असं करताहेत. त्याबद्दल मी तुझ्यापाशी फुशारकी मारणार नाही. माझ्या लाडके, माझ्या प्रिये! आज मला तुला सांगायचंय – अठरा महिन्यांपूर्वी माझ्या आयुष्यात काय घडलं ते! आता तसा मला हक्क आहे! मला क्षमा कर... इतके दिवस ही गोष्ट तुझ्यापासून लपविल्याबद्दल मला माफ कर! पण आज अखेर मी निर्णय घेतला..."

अलेक्सेई विचारांमध्ये हरवून गेला. भुयारामधील फळ्यांमागून उंदरांची कुचकुच ऐकू येत होती. कोरडी वाळू भुळभुळू सांडत होती. उघडया दरवाजामधून भोजाच्या झाडांचा व फुललेल्या गवताचा ताजा, ओलसर गंध दरवळत येत होता. बुलबुलांच्या लकेरी किंचित दबत्या आवाजात उमटत होत्या. दूरवर कुठेतरी, ओहळापलिकडे, कदाचित लष्करी अंमलदारांच्या मेसपाशी, काही स्त्री-पुरुष ॲशच्या झाडाबद्दलचे करुण गीत गात होते.



दूर अंतरामुळे त्या स्वराला मऊपण लाभले होते, रात्रीच्या वेळेचा एक वेगळा गोडवा लाभला होता. त्यामुळे अंतःकरण मधुर खिन्नतेने भरून येत होते. अपेक्षेमधील खिन्नता दाटत होती, आशेमधील खिन्नता दाटत होती.

दूरवरून ऐकू येणारा तोफांचा गडगडाट आता विमानतळापाशी अगदीच अस्पष्ट बनला होता. सोविएत फौजांनी खूप आघाडी मारली होती व हा विमानतळ आता त्यांच्या खोल पिछाडीला राहिला होता. लढाईचे आवाज आता बुलबुलांच्या लकेरींना बुडवून टाकीत नव्हते, गीताच्या स्वरांना लोपवून टाकीत नव्हते. जंगलची हलकी, स्वप्निल सळसळसुद्धा स्पष्ट ऐकू येत होती.

ताजा कलम

ओरेलच्या लढाईचा विजयी शेवट एव्हाना दृष्टीपथात आला होता. उत्तरेकडून पुढे सरकणाऱ्या आघाडीच्या रेजिमेंटा बातम्या देत होत्या की, क्रास्नोगोर्स्के टेकड्यांवरून त्यांना जळते शहर दिसत होते. ब्र्यान्स्क आघाडीच्या मुख्य ठाण्याला कळविण्यात आले होते की, त्या प्रदेशात काम करणाऱ्या लढाऊ विमानदलाच्या रक्षक गटाने शत्रूची सत्तेचाळीस विमाने पाडली होती. त्याची स्वतःची पाच विमाने गमावली होती आणि फक्त तीन लोक ठार झाले होते, कारण बाकीचे दोघे हवाई छत्र्यांद्वारा खाली उतरले होते व आपल्या तळापर्यंत पायी चालत पोहोचले होते. सोविएत सेनेच्या वेगवान प्रगतीच्या त्या दिवसांमध्येसुद्धा असा विजय असाधारण होता. हवाईदलाच्या त्या गटाच्या विमानतळावर जाणाऱ्या एका संपर्क-विमानात मला जागा मिळाली होती व ह्या रक्षक-वैमानिकांच्या पराक्रमांच्या कथा वर्णन करणारा लेख 'प्रावदा' साठी तयार करण्याचा माझा उद्देश होता.

ह्या गटाचा विमानतळ एका सामान्य कुरणावर वसला होता. तेथील ढेकळे व वारूळे साफ करण्यात आली होती. पक्ष्यांची पिले घरट्यात झाकावीत तशी नव्हाळीच्या भोजवृक्षांच्या राईच्या कडेला विमाने लपवून ठेवलेली होती. थोडक्यात म्हणजे लढाईच्या धामधुमीच्या दिवसातील तात्पुरत्या विमानतळांसारखा तो एक तळ होता.

दुपार सरण्याच्या सुमारास आम्ही त्या विमानतळावर उतरलो. एव्हाना त्या गटाची विमाने दिवसभराच्या कामगिऱ्यांची धांदल संपविण्याच्या बेतात होती. ओरेलच्या प्रदेशात जर्मनांच्या आकाशात विशेष हालचाली होत्या आणि त्या दिवशी प्रत्येक लढाऊ विमानाने सहा-सहा झुंजींची उड्डाणे केली होती. सूर्यास्ताच्या वेळी शेवटची विमाने सातवे उड्डाण करून परतत होती. छोट्या चणीचा, घट्ट कमरपट्टा बांधलेला, रापलेल्या चेहऱ्याचा, जलद हालचाली करणारा, केसांचा काळजीपूर्वक भांग पाडलेला व नवा, निळा हवाई पोषाख केलेला एक कर्नल प्रांजलपणे म्हणाला की, त्या दिवसाची सुसंबद्ध हकीकत सांगण्यास तो असमर्थ होता; सकाळी सहापासून तो विमानतळावर

होता, स्वतः त्याने तीन उड्डाणें केली होती आणि तो इतका दमला होता की, धड उभें राहणेही त्याला अशक्य झाले होते. त्या संध्याकाळी इतर अधिकारीही वृत्तपत्राला मुलाखती देण्याच्या मनःस्थितीत नव्हते. दुसऱ्या दिवसापर्यंत वाट पाहणे आवश्यक होते याची मला जाणीव झाली. कोणत्याही परिस्थितीत परतायला फार उशीर झाला होता. सूर्य एव्हाना भोजाच्या शेंड्यांना टेकला होता व ओतीव सोन्याचा मुलामा त्यांना चढवीत होता.

शेवटचे विमान जमिनीवर टेकले व त्यांची इंजिने चालू असतानाच त्यांना थेट राईकडे खेचून नेण्यात आले. मेकॅनिक मंडळींनी त्यांना गराडा घातला होता. गर्द हिरव्या आच्छादनांखाली विमाने सुरक्षितपणें ठेवल्या-नंतरच केवळ वैमानिकांच्या जागांमधून थकलेले, पांढुरक्या चेहऱ्यांचे वैमानिक सावकाशपणे खाली उतरले.

सर्वांत शेवटचे विमान आले होते तीन क्रमांकाच्या स्क्वाड्रनच्या कमांडरचे. वैमानिकाच्या आसनावरील पारदर्शी आच्छादन मागे सारलेले होते. प्रथम, सोनेरी कोरीवकामाची एक मोठी हस्तीदंती मुठीची काठी हवेतून धप्पदिशी गवतावर पडली. मग एका रापलेल्या रुंद चेहऱ्याच्या, काळया केसांच्या माणसाने आपल्या भक्कम हातांवर स्वतःचा देह सावरीत एका बाजूला झोका घेतला व विमानाच्या पंखावरून तो धप्प आवाज करीत जमिनीवर टेकला. कुणीतरी मला म्हणाले की, तो त्या गटातील सर्वोत्तम वैमानिक होता. संध्याकाळ वाया घालविण्याची माझी इच्छा नव्हती, म्हणून मी त्याच्याशी बोलण्याचे ठरविले. आपल्या आनंदी, जोगदार, काळया डोळयांनी तो माझ्याकडे पहात असल्याचे मला स्पष्टपणे आठवते. अद्याप न शमलेले बालिश धीट कुतूहल आणि प्रचंड दिव्यामधून पार पडलेल्या माणसाची सावध सूज्ञता यांचे विलक्षण मिश्रण त्याच्या नजरेत होते. माझ्या-कडे पाहून स्मित करीत तो म्हणत होता :

"अजून जिवंत आहे! मी फार थकलोय. माझे पाय कसेबसे फरफटत नेतोय आणि माझं डोकं गरगरतंय. तुम्ही काही खाल्लंय का? नाही! मग माझ्याबरोबर मेसमध्ये चला. आपण बरोबरच जेवण घेऊ. आम्ही खाली पाडलेल्या प्रत्येक विमानाबद्दल ते आम्हाला रात्रीच्या जेवणाबरोबर दोनशे ग्राम वोदका देतात. आज मला चारशे ग्राम मिळाले पाहिजेत एवढी कामगिरी मी बजावलीय. दोघांना तेवढी वोदका पुरे होईल. येणार? तुम्ही माहिती मिळवायला खूप अधीर आहात, तेव्हा खाता खाता बोलू!"

मी कबूल झालो. हा स्पष्टवक्ता, आनंदी अधिकारी मला आवडला होता. राईमध्ये वैमानिकांनी तुडविलेल्या पाऊलवाटेवरून आम्ही चालत गेलो. माझी नुकतीच ओळख झालेला माणूस झपाझप चालत होता, अधूनमधून खाली वाकून रानफळांच्या फांद्या तोडून तो फळे मटकावीत होता. तो खूप दमला असावा, कारण त्याची पावले धपधप आवाज करीत पडत होती, पण त्याच्या विचित्र काठीवर मात्र तो आपला भार मुळीच टाकीत नव्हता. त्याच्या हातावर ती लोंबत होती आणि क्वचित अधूनमधून एखादी अळंबी अथवा वाळुंजीचे एखादे झुडुप एका तडाख्यात उडविण्यासाठी त्या काठीला तो हातात धरीत होता. एका नाल्याला ओलांडताना निसरड्या, चिखलभरल्या उतारावर त्या वैमानिकाला फार अवघड झाले व झुडुपांना धरून त्याला स्वत:चा तोल सावरावा लागला. पण तो आपल्या काठीवर टेकला नाही.

मेसमध्ये त्याचा थकवा तावडतोब पार पळाला. त्याने खिडकीजवळचे एक टेबल निवडले. तेथून सूर्यास्ताची थंड, लाल आभा आम्ही पाहू शकत होतो. अशी लाली पडली म्हणजे दुसऱ्या दिवशी वादळी हवा राहणार असा वैमानिक अंदाज बांधायचे. वाडगाभर पाणी तो घटाघटा प्यायला. देखण्या, कुरळ्या केसांच्या वेट्रेसला त्याने तिच्या इस्पितळातील मित्राबद्दल छेडले. त्या मित्रापायी तिने इतर सर्वांचे जीवन बिघडवून टाकले होते असे तो वैमानिक म्हणाला. मोठ्या चवीने तो खात होता आणि बळकट दातांनी मटणाचे हाड कुरतडत होता. शेजारच्याच टेबलावर बसलेल्या आपल्या सहकाऱ्यां-बरोबर त्याने थट्टा-मस्करी केली, मॉस्कोतील नव्या गोष्टींबद्दल, नव्या नाटकांबद्दल आणि नव्या पुस्तकांबद्दल माझ्यापाशी चौकशी केली. मॉस्कोत नाटक पहायला जाणे कधीच जमले नव्हते म्हणून त्याने खेद व्यक्त केला. जेवणाचा तिसरा भाग – येथे वैमानिकांमध्ये "पावसाळी मेघ" म्हणून ओळखली जाणारी विलबेरी जेली – आम्ही जेव्हा संपविला, तेव्हा त्याने मला विचारले :

"आज रात्रीच्या मुक्कामाची तुम्ही व्यवस्था केलीय?" मी म्हणालो "नाही". "तर मग माझ्या खंदकात रहायला या," तो म्हणाला. क्षणभर त्याने कपाळाला आठ्या घातल्या व हलक्या आवाजात तो पुढे म्हणाला : "माझा खोलीतला सहकारी आज परतला नाही... तेव्हा तिथं मोकळी फळी आहे. स्वच्छ चादर आणि पांघरूण मी कुठूनतरी पैदा करीन. चला."

नवागताशी बोलायला आवडणाऱ्यांपैकी तो एक होता हे स्पष्ट होते.

मी संमती दिली. आम्ही घळीत उतरलो. उताराच्या दोन्ही बाजूंना खंदक बांधलेले होते. जंगली रासबेरी, वाळुंजी आणि वाळून कुजणाऱ्या पानांचा व अळंब्याचा उग्र दर्प वातावरणात दाटला होता.

"स्तालिनग्रादका" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या घरगुती बनावटीच्या राकेलच्या धुरकट दिव्याची वात जेव्हा व्यवस्थित पेटली व खंदकाचा अंतर्भाग उजळून निघाला तेव्हा तो खंदक जरा ऐसपैस आणि आरामदायी भासला. त्यात माणसांची बराच काळ वस्ती असावी असे दिसले. मातीच्या भिंतीं-मधल्या खोलगट भागात दोन व्यवस्थित फळ्या बसविलेल्या होत्या व त्यांच्यावर ताज्या, सुगंधित गवताच्या गाद्या पसरलेल्या होत्या. अद्याप ताजी पाने असलेली भोजाची काही कोवळी झाडे कोपऱ्यांमध्ये खोवली होती. "सुगंधासाठी" असा वैमानिकाने त्या झाडांबाबत खुलासा केला. निजण्याच्या फळ्यांवर भिंतींमध्ये व्यवस्थित, सरळ फडताळे खोदलेली होती आणि वर्तमानपत्रे पसरलेल्या त्यांच्या कप्प्यांवर पुस्तकांचे ढीग, दाढीचे सामान, साबण आणि दाताचा ब्रश ह्या वस्तू ठेवलेल्या होत्या. एका फळीच्या डोक्यावर सुंदर, घरगुती बनावटीच्या जाळीदार चौकटींमध्ये दोन फोटो अंधुकपणे दिसत होते. निष्क्रीयतेच्या स्तब्ध काळांमध्ये कंटाळा घालविण्यासाठी शत्रू-च्या विमानांच्या मोडक्या सामानामधून हवाई दलातील कारागीर गाणरो अशा चौकटींसारख्या अनेक वस्तू बनवीत. टेबलावर टिनचा वाटोळा डबा सुगंधी जंगली रासबेरींनी भरून ठेवलेला होता व त्यावर एका झुडुपाचे पान आच्छादून ठेवले होते. रासबेरी, भोजाची कोवळी झाडे, वाळके गवत आणि जमिनीवर पसरलेल्या सूचीपर्णीच्या डहाळ्या, ह्या सर्वांचा मिळून एक गोड तीव्र वास सुटला होता. खंदकात छान गारवा होता आणि घळीमधील नाकतोडयांची किरकिर मनाला प्रसन्न करीत होती. सर्व अंगभर एक छान सुस्ती आली होती. आमच्या गप्पा आणि रासबेरी खाणे ह्या दोन्ही गोष्टी आम्ही सकाळपर्यंत लांबणीवर टाकण्याचे ठरविले.

वैमानिक बाहेर गेला होता. त्याचे जोरजोराने दात घासण्याचे व थंड पाण्याने अंग धुण्याचे आवाज मला ऐकू येत होते. त्याच्या खाकरण्याच्या आणि फुरफुरण्याच्या आवाजांनी सगळी राई दुमदुमत होती. ताज्यातवान्या आणि प्रसन्न मुद्रेने तो आत आला. त्याच्या केसांवर व भुवयांवर पाण्याचे थेंब चमकत होते. दिव्याची वात खाली करून त्याने कपडे उतरवायला आरंभ केला. जमिनीवर काहीतरी जड वस्तू खळखळत पडल्याचा आवाज

झाला. मी खालीं पाहिले आणि माझ्या डोळ्यांवर माझा विश्वासच बसेना त्याचे पाय जमिनीवर पडले होते! पाय नसलेला वैमानिक! तोसुद्धा लढाऊ विमानाचा! ह्या वैमानिकाने त्या दिवशी सात झुंजीची उड्डाणे केली होती व शत्रूची दोन विमाने पाडली होती! विश्वास ठेवणे कठीण होते.

पण त्याचे पाय, अर्थात कृत्रिम पाय, सुरेख लष्करी बुटांसह जमिनीवर पडले होते ही वस्तुस्थिती होती! वरचे भाग फळीखाली होते. पाय पुढे आलेला एक माणूस तेथे लपला होता असा भास होत होता. मला वाटलेले आश्चर्य माझ्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटले असावे, कारण माझ्या यजमानाने माझ्याकडे पाहिले व खूष होऊन धूर्त स्मित करीत विचारले:

"याआधी तुमच्या लक्षात आलं नव्हतं?"

"मला स्वप्नातसुद्धा कधी..."

"हे ऐकून मला खूप आनंद झाला! धन्यवाद! पण कुणीही तुम्हाला याबद्दल सांगितलं नाही ह्याचं मला आश्चर्य वाटतंय. ह्या गटात जेवढे झुंजार वैमानिक आहेत, तेवढेच लष्करच्या भाकऱ्या भाजणारे आहेत. एक नवा माणूस, तोसुद्धा 'प्रावदा'चा वार्ताहर, इथं आला आणि त्यांच्यात एक चक्रम राहतोय हे त्याला सांगायला कुणी धावलं नाही म्हणजे गंमतच आहे."

"पण ही लोकविलक्षण गोष्ट आहे हे तुम्ही मान्य कराल. पाय नसताना लढाऊ विमान चालवायचं! केवढी प्रचंड करामत! वैमानिक कलेच्या इतिहासात असं काही ज्ञात नाही."

मजेत शीळ वाजवीत वैमानिक म्हणाला:

"वैमानिक कलेच्या इतिहासात! त्याला अनेक गोष्टी माहीत नव्हत्या, पण ह्या युद्धात आपल्या वैमानिकांपासून आता खूप काही माहीत झालंय! पण त्यात आनंद वाटून घेण्यासारखं काय आहे? ह्या पायांपेक्षा खऱ्या पायांसकट उड्डाण करणं मला आवडलं असतं. पण इलाज नाही. हे असं घडलंय खरं." वैमानिकाने एक सुस्कारा सोडला आणि तो पुढे म्हणाला: "नेमकं सांगायचं तर वैमानिक कलेच्या इतिहासाला अशा गोष्टी ठाऊक आहेत."

नकाशाच्या गुंडाळीत त्याने चाचपडले व सेलोफेनवर चिकटविलेले एक जीर्णशीर्ण कात्रण बाहेर काढले. पाय गमावूनही विमान चालविलेल्या एका वैमानिकाची हकीकत त्या कात्रणात सांगितलेली होती.

"पण त्याला एक पाय होता. शिवाय, त्यानं लढाऊ विमान चालवलं नव्हतं, तर जुनंपुराणं 'फार्मन' चालवलं होतं," मी म्हणालो.

"पण मी सोविएत वैमानिक आहे," पटकन उत्तर आले. "मात्र मी बढाई मारतोय असं समजू नका. हे माझे शब्द नाहीत. एका फार छान, एका अस्सल माणसानं, त्यांचा माझ्यापाशी उच्चार केला होता" ("अस्सल" ह्या शब्दावर त्याने विशेष जोर दिला). "आता तो जिवंत नाही."

वैमानिकाच्या रुंद, दमदार चेहऱ्यावर एक हळुवार, विषण्णतेची छटा उमटली. त्याच्या डोळ्यांमध्ये प्रेमळ, नितळ प्रकाश चमकत होता. त्याचा चेहरा किमान दहा वर्षांनी तरुण भासत होता, अगदी कोवळा दिसत होता. ज्या माणसाला अवघ्या क्षणापूर्वी मी मध्यमवयीन समजलो होतो तो जेमतेम तेवीस वर्षांचा होता ह्याची जाणीव होताच मी चकित झालो.

"हे काय, केव्हा आणि कसं झालं याची लोक माझ्यापाशी चौकशी करतात तेव्हा मला आवडत नाही... पण आत्ता या क्षणी सगळ्या आठवणी मनात भरून येत आहेत... तुम्ही मला अनोळखी आहात. उद्या आपण एकमेकांचा निरोप घेऊ आणि कदाचित पुन्हा कधीही भेटणार नाही... तुमची इच्छा असेल तर माझ्या पायांची कथा मी तुम्हाला ऐकवतो."

आपल्या फळीवर तो उठून बसला. हनुवटीपर्यंत त्याने पांघरूण ओढून घेतले आणि कहाणीला आरंभ केला. असे भासत होते की त्याचे प्रकट चिंतन चालले होते आणि माझे अस्तित्व तो पार विसरून गेला होता. पण त्याने कहाणी उत्तम आणि ठसठशीत सांगितली. त्याची बुद्धी तीव्र होती, स्मरणशक्ती चांगली होती व त्याचे अंतःकरण मोठे होते हे उघड जाणवत होते. काहीतरी महत्त्वाचे आणि अभूतपूर्व ऐकायला मिळणार व कदाचित पुन्हा ऐकायला मिळणार नाही ह्याची मला तात्काळ जाणीव झाल्यामुळे, "तीन क्रमांकाच्या स्क्वाड्रनच्या लढाऊ उड्डाणांचा तक्ता" असे मुखपृष्ठावर लिहिलेली टेबलावरील वही मी खस्सदिशी ओढून घेतली आणि तो जे सांगत होता ते टिपून घेऊ लागलो.

राईवरून रात्र कशी पसार झाली ते समजलेच नाही. टेबलावरील दिवा फडफडत होता व "स्स" आवाज करीत होता. त्याच्यावर झेपावलेले अनेक पतंग अवतीभवती मरून पडले होते. ॲकॉर्डियनचे सूर आरंभी वाऱ्याच्या झुळूकीबरोबर आमच्या कानी पडले. मग ॲकॉर्डियनचे विव्हळणे थांबले आणि जंगलातील रात्रीचे आवाज ऐकू येऊ लागले. बगळ्याच्या जातीच्या पक्ष्यांची

तीव्र आरोळी, दूरवरच्या घुबडाचा घूत्कार, नजीकच्या दलदलीमधील बेडकांची डरांव-डरांव, आणि नाकतोड्यांची किरकिर ह्या सर्व आवाजांची त्या वैमानिकाच्या विषण्ण, खालच्या स्वरातील तालबद्ध निवेदनाला साथ लाभली होती.

ह्या माणूस सांगत असलेली आश्चर्यकारक कहाणी एवढी रोमांचकारी होती की, तिला जास्तीत जास्त पूर्णत्वाने टिपून घेण्याचा मी प्रयत्न केला. मी एक वही भरून टाकली, फडताळावर सापडलेली दुसरी वहीसुद्धा भरली. खंदकाच्या अरुंद दारामधून दिसणारे आकाश फिकटल्याचे माझ्या ध्यानातच आले नाही. "रिख्तहॉफेन" डिव्हिजनची तीन विमाने पाडल्यानंतर, आपण इतरांच्या तोलाचे वैमानिक झालो अशी जाणीव होण्याच्या दिवसापर्यंत अलेक्सेई मारेस्येवने त्याची कहाणी आणून सोडली होती.

"आपण गप्पा मारत बसलो आणि त्यातच रात्र उलटून गेली. मला सकाळी परत उड्डाण करायचंय," आपल्या कहाणीत खंड पाडीत तो उद्गारला. "मी तुम्हाला थकवा आणला असणार. आता थोडी झोप घेऊ या."

"पण ओलगाचं काय झालं? तिनं काय उत्तर दिलं?" मी विचारले आणि मग एकदम स्वतःला आवरून म्हणालो: "माफ करा! कदाचित ह्या विचित्र प्रश्न आहे. त्याचं उत्तर देऊ नका जर..."

"का नको?" हसत तो म्हणाला. "आम्ही दोघंही चक्रम आहोत. असं आढळलं की, तिला सर्व ठाऊक होतं. माझ्या मित्रानं, आंद्रेई देगत्यारेन्को यानं, तावडतोब तिला सर्व कळवलं होतं—प्रथम माझं विमान कोसळल्याबद्दल आणि नंतर, माझे पाय कापल्याबद्दल. पण मी तिच्यापासून ही वस्तुस्थिती लपवून ठेवत होतो त्याअर्थी तिला हे सांगायला मला जड जात होतं ह्याची जाणीव होऊन तिनं स्वतःला काहीच माहीत नसल्याचा वहाणा केला. आम्ही एकमेकांना फसवत होतो. कशासाठी कोण जाणे! तिला पहायचं आहे?"

त्याने दिव्याची वात मोठी केली व त्याच्या उशाशी भिंतीवर टांगलेल्या फोटोंपाशी दिवा नेला. एक हौशी छायाचित्रकाराने काढलेला फोटो होता. अगदी पुसट व जीर्ण बनलेल्या त्या फोटोत कुरणावर फुलांमध्ये बसलेली एक हसरी मुलगी जेमतेम दिसत होती. दुसऱ्या फोटोत तीच मुलगी कनिष्ठ लेफ्टनंट-तंत्रज्ञाच्या गणवेषात दिसत होती. तिचा चेहरा कठोर, रोड आणि बुद्धिमान दिसत होता व सर्व यातना तिच्या डोळ्यांमध्ये एकवटलेल्या होत्या.

ती एवढी छोटी होती की, गणवेषामध्ये एखाद्या सुरेख मुलाप्रमाणे भासत होती. फक्त ह्या मुलाचे डोळे थकलेले, प्रौढ आणि भेदक वाटत होते.

"तुम्हाला आवडली ?"

"खूप," मी अत्यंत प्रामाणिकपणे उत्तरलो.

"मलासुद्धा खूप आवडते," मोकळे स्मित करीत तो म्हणाला.

"आणि स्त्रूच्कोव आता कुठं आहे ?"

"मला माहीत नाही. त्याचं शेवटचं पत्र मला हिवाळ्यात मिळालं होतं. वेलीकीये लूकीच्या आसपास कुठंतरी तो होता."

"आणि तो रणगाडावाला ? काय त्याचं नांव ?"

"ग्रीशा ग्वोझ्देवबद्दल विचारता आहात काय ? आता तो मेजर बनलाय. प्रोखोरोवकाच्या प्रसिद्ध लढाईत त्यानं भाग घेतला होता आणि नंतर कूर्स्कच्या फुगवटयात रणगाडयांच्या मुरांडीत. आम्ही त्याच प्रदेशात लढाईत होतो, पण आमची भेट घडली नाही. रणगाडा रेजिमेंटचा तो प्रमुख आहे. गेल्या काही काळात त्यानं पत्र का पाठवलं नाही ते माहीत नाही. पण काही बिघडत नाही त्यामुळं. युद्धानंतर आम्ही जगलो-वाचलो तर [illegible] एकमेकांना ! पण आम्ही का... बरं, आता थोडं झोपू या ! [illegible] !"

त्याने फुंकर मारून दिवा विझविला आणि [illegible] अंधारात बुडाला. पहाटेच्या अंधुक, धूसर प्रकाशात डासांची गुणगुण आम्हाला ऐकू येत होती. जंगलच्या त्या सुरेख वस्तीत तेवढी एकच गैरसोय कदाचित होती.

"'प्रावदा' मध्ये तुमच्याबद्दल लिहिण्याची माझी फार इच्छा आहे," मी म्हणालो.

"ते ठरवणं तुमचं काम," विशेष उत्साह न दाखविता वैमानिक म्हणाला. आणि नंतर अगदी पेंगुळल्या आवाजात तो पुढे बोलला : "पण कदाचित तुम्ही न लिहिणंच बरं ! गोबेल्स ह्याच गोष्टीचं भांडवल करील आणि जगभर नगारे बडवील की, लंगडया लोकांना रशियन लढायला लावताहेत, वगैरे वगैरे... ते फॅसिस्ट कसे आहेत तुम्हाला माहीत आहे !"

क्षणानंतर तो खणखणीत घोरू लागला. पण मला झोप येईना. त्या कबुलीजबाबातील साधेपणाने आणि भव्यतेने मी भारून गेलो होतो. त्या कहाणीचा नायक जर माझ्या समोरच झोपलेला नसता आणि आर्द्रतेमुळे चकाकणारे व पहाटेच्या धूसर उजेडात स्पष्ट दिसणारे जमिनीवर पडलेले कृत्रिम पाय नसते, तर ही एक सुंदर काल्पनिक कथा ठरली असती.

त्यानंतर प्रदीर्घ काळपर्यंत अलेक्सेई मारेस्येवशी माझी गाठ पडली नाही. पण युद्धाच्या लाटेने जेथे जेथे मला नेले, तेथे तेथे माझ्या सांगाती ह्या वैमानिकाच्या विलक्षण जीवनकहाणीच्या मी ओरेलनजीक नोंद केलेल्या दोन वह्या होत्या. युद्धाच्या दरम्यान अनेक वेळा स्तब्धतेच्या काळात आणि नंतर, विमुक्त युरोपीय देशांमधून प्रवास करीत असताना, त्याची कहाणी लिहायला मी आरंभ केला होता. पण दर वेळी मी लेखणी बाजूला ठेवली होती, कारण त्याच्या वास्तव जीवनाची फक्त अंधुक छाया उमटविण्यातच केवळ मला यश आले होते!

न्यूरेम्बर्गमधील आंतरराष्ट्रीय लष्करी न्यायालयाच्या बैठकीला मी हजर होतो. हर्मान्न गोअरिंगच्या उलटतपासणीच्या अखेरीचा तो दिवस होता. सादर केलेल्या प्रचंड पुराव्याने हादरलेल्या आणि सोविएत फिर्यादी वकीलाने प्रश्नांचा भडिमार करून खिळवून टाकलेल्या "जर्मन नाझी क्र. २" याने अनिच्छेने, दात आवळून, न्यायालयापुढे सांगितले होते की, तोवर अजिंक्य मानल्या गेलेल्या फॅसिझमच्या प्रचंड सेनेचा माझ्या देशाच्या अफाट मैदानांवरील लढायांमध्ये सोविएत सेनेने वज्राघात करून कसा चुराडा केला होता आणि ती कशी विरून गेली होती. स्वतःचे समर्थन करण्यासाठी गोअरिंगने आपली मंद नजर आकाशाकडे उचलून म्हटले होते: "नियतीची तशी इच्छा होती."

"सोविएत संघावर विश्वासघातकी हल्ला करून, ज्याच्या परिणामी जर्मनांचा पाडाव झाला, तुम्ही अत्यंत किळसवाणा गुन्हा केला होता हे तुम्ही मान्य करता?" सोविएत वकील रोमान रूदेन्को यांनी गोअरिंगला विचारले होते.

"तो गुन्हा नव्हता, ती मरणांतिक चूक होती," कपाळाला आठ्या घालीत आणि नजर खाली वळवीत गोअरिंग खालच्या आवाजात उत्तरला होता. "मी एवढंच मान्य करू शकतो की, आम्ही बेदरकार वागलो, कारण युद्धाच्या क्रमात स्पष्ट झालं की, अनेक बाबतीत आम्ही अज्ञानात होतो आणि अनेक गोष्टींची तर आम्हाला पुसटशीसुद्धा शंका नव्हती. आम्हाला मुख्य गोष्ट माहीत नव्हती, किंवा समजूही शकली नाही, ती म्हणजे सोविएत रशियनांचा स्वभाव. ते आम्हाला कोडं होतं आणि आजही ते उलगडलेलं नाही. सोविएतांच्या खऱ्या युद्धसामर्थ्याचा शोध जगातील सर्वोत्तम गुप्तहेर-संस्थाही घेऊ शकणार नाही. तोफा, विमानं, रणगाडे यांची संख्या मला

अभिप्रेत नाही. ते आकडे आम्हाला अंदाजे ठाऊक होते. अथवा त्यांच्या उद्योगधंद्यांची ताकद आणि क्षमता यांचाही माझ्या मनात विचार नाही. माझ्या मनात आहेत त्यांचे लोक. रशियन लोक नेहमीच परकयांना कोडं वाटत आले आहेत. त्यांना समजून घेण्यात नेपोलियनसुद्धा अपयशी ठरला होता. आम्ही केवळ नेपोलियनच्या चुकीची पुनरुक्ती केली."

"रशियनांच्या कोड्या" विषयीचा, आमच्या देशाच्या "अज्ञात युद्ध-सामर्थ्या" बद्दलचा हा अनिच्छेने दिलेला "कबुलीजबाव" ऐकून आम्हाला अभिमानाचे भरते आले. युद्धाच्या दरम्यान जगाला चकित करणारे सोविएत लोक – त्यांची क्षमता, त्यांचे गुण, त्यांचे आत्मत्याग – ह्या सगळ्या गोअरिंगना प्राणघातक कोडे ठरले होते व अद्यापही त्यांना ते सुटले नव्हते, ह्यावर आम्ही विश्वास ठेवू शकत होतो. जर्मन Herrenvolk आहेत असा भिकार "सिद्धांत" शोधून काढणाऱ्यांना एका समाजसत्तावादी देशात जोपासलेल्या माणसांचा आत्मा आणि त्यांचे सामर्थ्य कसे समजणार? आणि अचानक मला अलेक्सेई मारेस्येवची आठवण झाली. त्याची अर्धवट विसरलेली प्रतिमा तेथे त्या उदास, ओकच्या फळ्यांच्या भिंतींच्या दालनात माझ्यासमोर स्पष्ट-पणे उभी राहिली. आणि त्याच स्थळी, न्यूरेम्बर्गमध्ये, फॅसिझमच्या जन्म-स्थळी, दशलक्षावधी सामान्य सोविएत लोकांपैकी एकाची कहाणी सांगण्याची मला अतीव तीव्रतेने इच्छा झाली; ज्या लोकांनी कीतेलच्या सेनांना आणि गोअरिंगच्या हवाई काफल्यांचा धुव्वा उडविला होता, ज्यांनी रोदेरच्या जहाजांना जलसमाधी दिली होती, ज्यांच्या वज्रप्रहारांनी हिटलरचे पुंड राज्य ठिकऱ्या ठिकऱ्या होऊन कोसळले होते.

न्यूरेम्बर्गमध्ये माझ्यापाशी पिवळ्या मुखपृष्ठाच्या शाळकरी वह्या होत्या. त्यांपैकी एकीवर मारेस्येवच्या हस्ताक्षरात लिहिलेले होते: "तीन क्रमांकाच्या स्क्वाड्रनच्या लढाऊ उड्डाणांचा तक्ता." न्यायालयातून परत आल्यावर माझ्या निवासस्थानी मी ती जुनी टिपणे परत एकदा वाचून काढली व पुन्हा लेखनाला आरंभ केला. अलेक्सेई मारेस्येवने सांगितलेली कहाणी सत्य स्वरूपात मांडण्याचा मी प्रयत्न केला.

त्याने सांगितलेल्या बऱ्याच गोष्टी मला टिपून घेता आल्या नव्हत्या आणि त्या चार वर्षांच्या अवधीत बरेच काही स्मरणातून निघून गेले होते. अलेक्सेई मारेस्येवने नम्र राहून स्वतःबद्दल फारसे सांगितलेले नव्हते आणि ह्या पोकळ्या मला मनाने भरून काढाव्या लागल्या. त्या रात्री स्पष्टपणे

आणि जिव्हाळयाने त्याने रेखाटलेली त्याच्या मित्रांची व्यक्तीचित्रे माझ्या स्मरणात पुसट बनली होती व त्यांना परत रेखाटणे मला भाग पडले. वस्तुस्थितींशी पूर्णतः चिकटून राहणे अशक्य ठरल्यामुळे मी नायकाच्या नांवात किंचित बदल केला व त्याच्या खडतर आणि धैर्यशाली पथावरील त्याच्या सोबत्यांना आणि मदत करणाऱ्यांना नवी नांवे दिली. ह्या कहाणीत जर त्यांनी स्वतःची व्यक्तीचित्रे ओळखली तर ते याबद्दल मला क्षमा करतील अशी आशा आहे.

ह्या पुस्तकाला मी 'एका अस्सल माणसाची कहाणी' असे नांव दिले, कारण अलेक्सेई मारेस्येव हा एक अस्सल सोविएत माणूस आहे. त्याच्यासारख्या माणसांना हर्मान्न गोअरिंग स्वतःच्या लाजिरवाण्या मृत्यूच्या दिवसापर्यंत कधीही ओळखू शकला नाही आणि इतिहासाचे धडे विसरण्याकडे ज्यांचा कल आहे, नेपोलीयनचा अथवा हिटलरचा मार्ग स्वीकारण्याची ज्यांच्या मनात आजही सुप्त इच्छा आहे अशा लोकांना आजतागायत त्यांची ओळख पटलेली नाही.

'एका अस्सल माणसाची कहाणी' अशा रीतीने लिहीली गेली. मुद्रणासाठी हस्तलिखित तयार झाल्यानंतर, प्रकाशनापूर्वी ते पुस्तकाच्या मुख्य नायकाने वाचावे अशी माझी इच्छा होती, पण युद्धाच्या धामधुमीत त्याचा ठावठिकाणा माझ्यापाशी राहिला नव्हता. शिवाय आम्हा दोघांच्या परिचयाचे जे वैमानिक होते त्यांपैकी कुणाकडूनही, अथवा अधिकृत कचेऱ्यांमध्ये चौकशा करूनही, अलेक्सेई पेत्रोविच मारेस्येवचा शोध घेण्यात मला यश आले नव्हते.

ही कहाणी मासिकात क्रमशः प्रसिद्धहोऊ लागली होती आणि नभोवाणीवर तिचे वाचन घडत होते, अशा वेळी एके सकाळी माझा टेलिफोन खणखणला.

रिसीव्हरमधून थोडासा घोगरा, पुरुषी आणि पुसट परिचयाचा आवाज ऐकू आला :

"मला तुमची भेट घ्यायची इच्छा आहे."

"कोण बोलतंय?"

"रक्षक मेजर अलेक्सेई मारेस्येव."

काही तासांनंतर अलेक्सेई मारेस्येव आपल्या अस्वलासारख्या, किंचित निसटत्या चालीने झपझप माझ्या खोलीत प्रवेशले. नेहमीप्रमाणे त्यांची मुद्रा

आनंदी आणि दक्ष होती. युद्धाच्या चार वर्षांनी त्यांच्यात फारसा बदल घडविला नव्हता.

"मी घरात वाचत बसलो होतो. रेडिओ लावलेला होता, पण मी पुस्तकात गुरफटून गेलो होतो आणि रेडिओच्या कार्यक्रमाकडं माझं ध्यान नव्हतं. अचानक माझी आई म्हणाली: "ऐकलंस का रे! तुझ्याबद्दल बोलताहेत!" मी कान टवकारले. खरंच ते माझ्याविषयी बोलत होते. माझ्या साहसांची हकीकत सांगत होते. आश्चर्य वाटलं — कुणी लिहिली असावी? मी कुणाला माझी हकीकत सांगितल्याचं मला आठवलं नाही. आणि एकदम ओरेलजवळची खंदकातली आपली भेट मला आठवली. माझे अनुभव सांगत सारी रात्र मी तुम्हाला कसं जागवत ठेवलं होतं ते आठवलं... पण कसं शक्य आहे? मी स्वत:शी विचार केला. खूप काळापूर्वी, जवळ जवळ पाच वर्षांपूर्वी ती भेट घडली होती. पण आता मी प्रत्यक्ष माझ्या कानांनी ऐकत होतो. निवेदकानं प्रकरण संपवलं आणि लेखकाचं नाव सांगितलं. मग तुमचा शोध घ्यायचं मी ठरवलं."

हे सर्व एका दमात त्यांनी भडाभडा बोलून टाकलं. बोलत असताना त्यांच्या मुद्रेवर रुंद, काहीसे लाजरे स्मित उमटले होते. [illegible] ते स्मित मी यापूर्वी पाहिलेले होते.

एकमेकांची प्रदीर्घ काळ भेट न झालेल्या दोन सैनिकांच्या बाबतीत जे नेहमी घडते, तेच घडले. आमच्या लढाया आम्ही परत लढलो, आम्हा दोघांच्याही परिचयाच्या अधिकाऱ्यांविषयी बोललो आणि आमचा विजय पाहण्यास न जगलेल्यांबद्दल चार जिव्हाळ्याचे शब्द उच्चारले. पूर्वीप्रमाणेच, स्वत:बद्दल बोलण्यास अलेक्सेई नाखूष होते. तरीही, आमच्या त्या भेटीनंतर त्यांनी अनेक यशस्वी लढाया लढल्याची माहिती मी त्यांच्याकडून काढून घेतली. त्यांच्या रक्षक गटामार्फत १९४३-४५ च्या दरम्यानच्या मोहीमा त्यांनी पार पाडल्या होत्या. ओरेलपाशी त्यांचा मी निरोप घेऊन गेल्यानंतर त्यांनी शत्रूची तीन विमाने पाडली होती आणि नंतर, बाल्तिक सागरी प्रदेशातील लढायांमध्ये आणखी दोनांची त्यांनी भर घातली होती. थोडक्यात, आपल्या पायांच्या बदल्यात त्यांनी शत्रूकडून जबर खंडणी वसूल केली होती. सरकारने त्यांचा 'सोविएत संघाचे वीर' किताब देऊन गौरव केला होता.

अलेक्सेईनी आपल्या वैयक्तिक जीवनाविषयीही माहिती सांगितली आणि माझ्या कथेचा ह्या दृष्टीनेही सुखी शेवट असल्याचे नमूद करण्यास मला

खूप आनंद होत आहे. जिच्यावर त्यांचे प्रेम होते त्याच मुलीशी युद्धानंतर अलेक्सेईनी लग्न केले. आणि आता त्यांना एक मुलगा आहे: विक्तर. मारेस्येव यांची आई कामीशिनहून आली होती व आता त्यांच्यापाशीच रहात होती. आपल्या मुलाच्या सुखात सहभागी होत होती आणि छोट्या विक्तरचे संगोपन करीत होती.

अशा रीतीने अलेक्सेई मारेस्येव यांच्या – एका अस्सल सोविएत माणसाच्या – ह्या कहाणीचा पुढील भाग खुद्द जीवनच लिहीत आहे.

न्युरेम्बर्ग-मॉस्को, १९४६

वाचकांना विनंती

'राहुगा प्रकाशना'ला या पुस्तकाच्या अनुवादाबाबत व रचनेबाबत आपले मत जाणून घ्यायला आनंद वाटेल. आपल्या इतर सूचनांचाही अवश्य विचार केला जाईल. कृपया पुढील पत्त्यावर पत्रव्यवहार करा :

राहुगा प्रकाशन
१७, झुबोव्स्की बुलेवार्द,
मॉस्को, सोविएत संघ.

Борис Полевой

ПОВЕСТЬ О НАСТОЯЩЕМ ЧЕЛОВЕКЕ,

на языке маратхи.

Перевод сделан по изданию:
Полевой Б., Повесть о настоящем человеке,
издательство «Художественная литература», 1969.



कुटुंबियांसह



जमिनीवरची खंबीर चाल
(मध्यभागी अलेक्सेई
मरेस्येवा, डावीकडून दुसरे
बरीस पलेवोय)



अलेक्सेई मारेस्येव आणि
गागारीन



शांततेचे आवाहन.
शांततावाद्यांच्या जागतिक
काँग्रेसमध्ये अलेक्सेई